हिंदवी लष्करी इतिहासः पुस्तक १ लें

# प्रतापगडचें युद्ध

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

NEW & SECONDHAND BOOKS
PURCHASED & SOLD



श्री छत्रपति शिवाजी महाराज.

ॐ

# प्रतापगडचें युद्ध

## A STUDY OF
## THE CAMPAIGN OF PRATAPGAD


लेखक

**कॅप्टन गणेश वासुदेव मोडक**

( असिस्टंट क्वार्टर मास्टर जनरल; माजी अंमलदार, फर्स्ट ग्वालियर इंपीरियल सर्व्हिस लान्सर्स; माजी लेक्चरर, आर्मी ट्रेनिंग स्कूल; माजी जनरल स्टाफ आर्मी हेडक्वार्टर्स ग्वालेर; "मस्केट्री लेक्चर्स," "व्हिज्युअल ट्रेनिंग नोट्स्" वगैरे पुस्तकांचे कर्ते. )



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
१९२७

ग्रंथ स्थानांक
दाखल नं.
पाने
किंमत
दिनांक



प्रकाशकः– **एन्. एन्. दातार अँन्ड सन्स**

७२, बुधवार पेठ, पुणें शहर.

मुद्रकः-**वामन वासुदेव अतीतकर**, बी. ए.,
**समर्थ-भारत छापखाना**, ३२५ सदाशिव पेठ, पुणें शहर.
लिथो प्रिंटर्सः-**भारत प्रिंटिंग वर्क्स**, पुणें शहर.

IN MEMORY

OF

HIS LATE MASTER

# His Highness The Maharaja Scindia.



AS A TOKEN OF RESPECT & GRATITUDE.

THIS WORK HAS BEEN

PATRONISED

BY

# Thakursaheb Sajjan Sinhji,



SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ(THORALE)
NAGAR WACHNALAYA SATARA
109220

CHIEF OF BAGLI STATE. (C. I.)

# प्रस्तावना

" प्रतापगडचे युद्ध " ची सामुग्री जमा करण्यामध्यें ग्रंथकर्त्याचीं सुमारें अठरा वर्षे कारणीं लागलीं आहेत. एका तपाच्यावर अनेक परिश्रम करून तयार झालेलें पुस्तक देशबांधवांच्या हातीं देतांना, पुष्कळ दिवस पर्यंत मनांत घोळत असलेली गोष्ट सिद्धीस जाण्याची वेळ आतां आली म्हणून एक प्रकारचा निरतिशय आनंद होत आहे. तो आनंद अनेक वाचकांचे बरोबर अनुभवून सहानुभूतीनें त्याचा भर वाढावा अशा इच्छेनें सदर ग्रंथाच्या भूमिकेचा परिचय करून दिला पाहिजे.

" युद्धस्य कथा रम्या " अशा समजुतीनें या पुस्तकाकडे पहाणाऱ्यां-करितां पुस्तकाची रचना मुख्यतः केलेली नाहीं हें सहज पानें चाळून लक्ष्यांत येण्यासारखें आहे. विषयाची पद्धतशीर मांडणी, शास्त्रीय परिभाषायुक्त रचना, मजकुराची परिश्रमानें केलेली फोड, युद्धभूमीचे भरपूर नकाशे, व त्यामुळें आणि इतर साधनांनीं प्राप्त झालेले ऐतिहासिक आडाखे, टिपांतून दिलेले संदर्भ, विशेषतः अभ्यासकांचे उपयोगांकरितां जोडलेली युद्धशास्त्रावरील पुस्तकांची यादी, युद्धकला-विषयक शब्दांचा विस्तृत कोश आणि रम्य कथेच्या कधीं हि वांट्यास न येणारी सूचि या गोष्टी, ही कृति एका अभ्यासकाची आणि अर्थात् अभ्यासकोपयोगी आहे असें उघड दर्श-वितात. युद्धशास्त्रावरील फ्रेंच, जर्मन, इंग्लिश वगैरे भाषांतील पुस्तकें इतकीं पद्धतशीर लिहिलेलीं नसतात हें तज्ज्ञ वाचकांच्या सहज लक्ष्यांत येईल. वर्ण-नाचे भरांत येणाऱ्या पारिभाषिक संज्ञा सुसंगतपणें उलगडण्याचा किंवा शास्त्रीय दृष्ट्या सुसंबद्धता आणण्याचा तेथें क्वचित् प्रयत्न केला जातो. माझ्या दीड तप अभ्यासाचा निष्कर्ष म्हणून हें पुस्तक लिहितांना प्रतापगडच्या युद्धाचें

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

च केवळ वर्णन करावें असा मर्यादित उद्देश न ठेवितांना, त्या युद्धांतील गोष्टींचें अनुषंगानें एकंदर गतकालीन व आधुनिक युद्धशास्त्र यामध्यें वाचकाची गति व्हावी, त्यांतील आरंभापासून राजकारण, युद्धधोरण व डावपेंच यांतील आडाखे समजावे, असें धोरण ठेविलें आहे. त्यांकरितां शक्य तितकें पृथःकरण करून छोटीं आणि सूचक अशीं स्वतंत्र नांवें परिच्छेदानां हि दिलीं आहेत. अशा पुस्तकांचा अभ्यास प्रत्यक्ष सैन्यांत सामील झालेल्या लोकांना च विशेष व्हावा हें उघड आहे. यू. टी. सी. किंवा इतर सैन्यविभाग यांमधील महत्वाकांक्षी विद्यार्थी, या विषयाचा अभ्यास आस्थेनें करूं पाहतील तर त्यांस परकी भाषेंतील प्रसिद्ध पुस्तकांवरून प्रथम बोध थोडा च होईल. पद्धतशीर पुस्तकांचे अभावीं, अपुरें राहिलेलें त्यांचे ज्ञान, त्यांनीं या पुस्तकाचा उपयोग केल्यास बरें च संपूर्ण होईल अशी उमेद आहे. वास्तविक हें पुस्तक सैन्यांतील होतकरू लोकांकरितां च लिहिलें आहे. तथापि यांतील परिमेयें अगदीं सुलभ करून लिहिलीं आहेत. यामुळें या पुस्तकाचा स्वीकार महाराष्ट्रांतील इतिहासज्ञांनीं आणि इतिहास जिज्ञासूंनीं हि प्रेमानें करण्यास हरकत नाहीं असें वाटतें. सामान्य वाचकवर्गाला बहुधा समाधान व्हावें अशी च सुलभ लेखन–पद्धति स्वीकारली असल्यामुळें त्यांना देखील हें अन्न रुचकर होईल अशी उमेद आहे. हा इतिहास स्वातंत्र्य-संस्थापक व स्वधर्म-रक्षक शिवरायांच्या पराक्रमांनीं पुनीत झालेला आहे. याकरितां स्वदेशाभिमानानें प्रेरित झालेल्या बऱ्या च लोकांचे हातीं हें पुस्तक जाऊन त्यांना हि यांतील स्फूर्ति सुलभ होईल अशी आशा वाटते. तथापि थोडा विचार केला असतां आढळून येईल कीं, ह्या पुस्तकाला प्रत्यक्ष सैनिक किंवा भावी महत्वाकांक्षी सेनापति, यां स्वभावसिद्ध वाचकां शिवाय, ज्या वाचक वर्गाची अपेक्षा आहे ती विशेषतः ‘ इतिहासाची रचना करण्याचे हेतूनें किंवा त्यांतील मर्म समजून घेण्याच्या इच्छेनें ’ जे कोणी लोक सध्यां प्रोत्साहित झालेले आहेत किंवा पुढें होतील अशांची च आहे. पाश्चात्य देशांमध्यें असा विषय वाचणाऱ्यां

मध्यें उभय वर्गांचा हि समावेश होतो. सैनिकांचा तो उद्योग च असल्यामुळें सैनिक वर्ग आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि स्वाभिमान यांची परंपरा जीवंत असल्यामुळें सामान्य नागरिक वर्ग तितक्या च उत्सुकतेनें स्वदेशी युद्धवीरांचे पराक्रम बुद्धी वापरून वाचण्यास तयार असतात. आमचे देशामध्यें लष्करी विद्यार्थी च अशा माहितीचे अभावीं अज्ञानांत आहेत तर इतर जनांची काय कथा ? तेव्हां सर्वांनीं च असें वाचन करणें इष्ट आहे. परंतु बुद्धि, वाचन आणि धारणा यांनीं थोडा अधिक पुढें असलेला इतिहासज्ञ वर्ग च आज कांहीं जलद ग्रहण करूं शकेल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कै० इतिहासाचार्य राजवाडे यांच्या विशाल बुद्धीला इतिहासाचा व्याप केवढा दिसत होता ह्याचें दिग्दर्शन त्यांनीं ‘ इतिहास आणि ऐतिहासिक ’ मासिकाच्या एका अंकांत व सहाव्या खंडाचे प्रस्तावनेंत केलेलें आहे. त्यांचेपाशीं या विषयाचा प्रस्ताव करण्याची संधि मला खरे च वेळां मिळाली. त्या वेळीं त्यांना झालेला आनंद आणि त्यांनीं दिलेलें उत्तेजन मी कधीं हि विसरणार नाहीं. “ हें पुस्तक कोण घेणार ? ” असें निराशेचे उद्गार ऐकण्यास ते तयार नव्हते. “तुम्हीं हें पुस्तक छापा. पहिलें गिऱ्हाईक मला समजा. मीं एक पुस्तक ३०० रुपये देऊन विकत घेईन” असें कळकळीनें सांगणारी उत्साहमूर्ती आज माझें तयार झालेलें हें पुस्तक पाहण्यास हयात नाहीं हें दुर्दैव आहे !

मला हें काम करण्याची स्फूर्ती कशा करितां वाटली, कै. राजवाडे आदिकरून विद्वानांपुढें हा प्रयत्न आल्याबरोबर त्यांना त्याचें इतकें महत्त्व कां वाटलें, आणि वाचकांनीं सदर पुस्तकाचा परामर्ष कसा घेतला असतां लेखनाचें सार्थक झाल्याची मला धन्यता वाटेल, हें थोडेंसें स्पष्ट करून सांगितलें म्हणजे माझ्या सारख्या सध्याच्या कोत्या सैनिक पेशाच्या माणसानें अशा तऱ्हेच्या पुस्तकलेखनाच्या व्यवसायाला अनभ्यस्त असून हि हें धाडस करण्याला कां प्रवृत्त व्हावें याचा उलगडा होणार आहे.

ह्या पुस्तकांत प्रतापगडच्या युद्धाचा साधा इतिहास दिला आहे. म्हणजे युद्ध हा या पुस्तकाचा मुख्य विवेचनाचा विषय आहे. तो मुख्य धरून त्याचीं कारणें, पूर्व परिस्थिती, युद्ध प्रत्यक्ष चालू झालें तेथपासून संपून जाई पर्यंतचा कापाकापीचा सांगोपांग अनुक्रम, त्यांतील लहान मोठ्या चकमकी, उभय-पक्षांनीं युद्धभूमीवर प्रगट केलेलें सामर्थ्य, शत्रूविरुद्ध लढविलेले डावपेंच, त्यांची यथार्थता, ज्या भूमीच्या आश्रयानें ते लढविले गेले तिचे, युद्धाची परिस्थिती आणि अखेर निकाल या दृष्टीनें महत्त्व, या सर्व गोष्टींचा युद्धशास्त्र दृष्ट्या खुलासा, अशा विस्तारानें त्याची फोड करून दाखविली आहे. युध्य-मान सैन्याचे गुणदोष लष्करी दृष्टीनें विचारांत घेतले आहेत. उभय सेना-पतींनीं सेनानायक या दृष्टीनें प्रदर्शित केलेले कौशल्यविशेष हि बारकाईनें अभ्यास करून लिहिले आहेत.

सारांश, युद्धभूमीवरील पडदा बाजूला सारून तेथें चाललेला प्रसंग वाच-कांच्या नजरेसमोर प्रत्यक्ष उभा केला आहे. युद्धभूमी म्हणजे केवळ रक्तपात आणि हाणामारी अशा समजुतीनें कित्येकांची नजर, भूतदयेमुळें युद्धापासून परावृत्त होत असली, तर तेथें बरा च भाग सेनानायकांनीं प्रगट केलेल्या बुद्धिबळाचा आहे, हें दिसून आल्यावर तरी त्यांचें मन युद्धांचा अभ्यास करण्याकडे कौतुकानें वळेल अशा आशेनें सर्व अंगाचें व उपांगांचें सोपपत्तिक विवेचन करण्याचा येथें प्रयत्न केला आहे. तें वाचून युद्ध म्हणजे $\frac{3}{4}$ राजका-रण च आहे हें समजूं लागेल. आणि अनभ्यासामुळें किंवा पूर्व-ग्रहांमुळें झालेले गैर समज दूर होऊन इतिहासांतील युद्धशास्त्र आणि प्रत्यक्ष युद्धें यांकडे दुर्लक्ष्य करण्याची प्रवृत्ति नष्ट होईल.

आजपर्यंतच्या इतिहासाच्या वाचनानें इतिहासांतील मुत्सद्दी, अभ्यास-कांचे परिचयाचे झालेले आहेत अशी समजूत झालेली दिसते. परंतु त्यांचा परिचय उत्तम झालेला दिसत नाहीं. मुत्सद्दी आणि दंडनीति यांचें साहचर्य चांगलें लक्ष्यांत आलें नाहीं तर इतिहास वाचून कांहीं च उपयोग नाहीं.

मुत्सद्दी मंडळीच्या बुद्धीला युद्ध हें पूरक होतें. आणि युद्धाला प्रेरक मुत्सद्याची अचूक बुद्धी च होय. हा अखंड संबंध लक्ष्यांत ठेवून इतिहास वाचील त्याला इतिहासाचें प्रबळ आणि समूळ तत्त्वज्ञान समजलें असें म्हणतां येईल. वैयक्तिक नफा तोटयाबद्दलच्या कल्पना, स्वार्थ आणि परार्थ अशासारख्या व्यवहारगम्य तत्त्वज्ञानाचे जोरावर व अशा च कल्पनांवर उभारलेलें मुत्सद्याचें मोठ्या प्रमाणावरील राजकारण, साधारणपणें आपल्याला उलगडतां येईल असें समजणारांची कींव च करावी. सर्व जग न्यायबुद्धीनें दुसऱ्याचे हक्क आणि विचार प्रांजलपणें कबूल करण्यास तयार नसतें. अखेरीला बरेचसे प्रश्न ठोसाठोशीनें तलवारीच्या जोरावर सोडविले जातात. राजकारणाचें गंभीरपणें तात्विक विवेचन करणाऱ्या ग्रंथांतून हि (force) म्हणजे पाशवी सामर्थ्य याचा मान निर्वाणीचा म्हणून राखून ठेविलेला आढळतो. अशा परिस्थितींत मुत्सद्याचें सामोपचाराचे व तडजोडीचे बोलण्याला जर कशाचें बळ मिळत असेल तर तें त्याच्या शब्दाबरोबर त्याच्या मागें केवढें लष्करी सैन्य जमा होऊं शकेल या अंदाजाचें च होय. कांहीं एक मर्यादेपर्यंत राजकारण तडजोडीचे नागमोडी मार्गावर खेळवून अखेरीला तें सेनानीचे च हातीं द्यावें लागतें, आणि त्यापुढील सर्व कामगिरी आणि कर्तबगारी तलवारीचे करामतीचे बळावर दाखवीली जाते. अनेक ध्येयवाद्यांनीं आजपर्यंत वेळोवेळीं अनेक शांतिपाठ म्हटले, तथापि त्यांपैकीं अगदीं अल्प अंश देखील सत्ताधिशांच्या पचनीं पडण्याचें चिन्ह अद्यापि हि दिसूं लागलें नाहीं. प्रत्येक जीवंत सत्ताधीश राष्ट्राची मदार त्याच्या सौख्यावर च असते. आपला अपमान आणि पायमल्ली होऊं नये अशी आकांक्षा असणाऱ्या प्रत्येक राष्ट्रानें अपमान झाल्यास तो शत्रूच्या रक्तानें धुवून काढण्याची तयारी दाखविणें हा च एक बाणेदारपणाचा अचुक मार्ग असतो.

मराठ्यांना मराठ्यांच्या मुलुखांत पारतंत्र्यांत जखडून मारावें, महाराष्ट्रांत नुकत्या च उदय पावणाऱ्या स्वातंत्र्य-सूर्याला ग्रासावें, अशा दुष्ट महत्त्वा-

कांक्षेनें प्रेरित होऊन प्रबल सेनासागरासहित चालून आलेल्या खानाला हि आपल्या बाहुबलाच्या जोरावर, शिवाजीमहाराजांनीं कसें चीत केलें हा इतिहास शूरांच्या शौर्याला, देशाभिमान्यांच्या स्वदेश–प्रेमाला आणि मुत्स-द्यांच्या भेदक बुद्धीला सहज च आनंदवील. या इतिहासावरून मराठ्यांची युद्ध विषयक बाजू किती तयार आणि समर्थ होती या गोष्टीवर प्रकाश पडल्यानें आपल्या पूर्वजांना ओळखण्याचा आणखी एक प्रकार आपण हस्तगत केल्या सारखा होणार आहे. पण केवळ पुस्तकांच्या वाचनानें पूर्वजांच्या पराक्रमाचें आकलन किंवा त्यांच्या बाहुबलाचा व बुद्धिबलाचा परिचय होईल अशी अपेक्षा करणें म्हणजे वस्तुस्थितीचें अज्ञान प्रगट करण्यासारखें आहे. शूराचें शौर्य शूर च अजमावूं शकतो. शूर पूर्वजांचें मोठेपण नेभळ्या वंशजांना कसें दिसावें ? म्हणून प्रस्तुत तरुण पिढीमध्यें लष्करी वारें संचारावयास लागल्या शिवाय पूर्वजांबद्दल योग्य अभिमान हि बाळगविण्यास आपण समर्थ होणार नाहीं. मग पराक्रमाची गोष्ट च कशाला बोलावी ! या करितां जरूर तें लष्करी वळण आपल्या शिक्षणाला लागावें आणि त्याचे इष्ट परिणाम राष्ट्रीय दानत आणि शील यांवर व्हावें म्हणून सर्वांनीं अटोकाट प्रयत्न केला पाहिजे.

युद्धकला ही चीज आपल्या आंवाक्याबाहेर गेल्याला आज १०० चे वर वर्षें होऊन गेलीं. गेल्या एक शतकभर युद्धाच्या कामगिरीपासून आपल्या बुद्धिमान वर्गाची सोडवणूक झाली. हुकुमाप्रमाणें मागें पुढें हलणारीं यंत्रें, अडाणी लोकांना पर–भाषेंतील हुकुमाच्या शब्दांची जबर तालीम, त्यांच्या विचारशक्तीचा खून करून जुलमानें केल्यावर, सहज पैदा होऊं लागलीं ! त्या प्याद्याचें काम निर्बुद्ध माणसांकडून च उत्तम होतें असें तज्ञ राजकर्त्यांचें मत असल्यामुळें, बुद्धीला लष्करी वळण देण्याच्या शिक्षणाला हिंदुस्थानांत प्रवेश मिळण्याचें कारण च राहिलें नाहीं. शिक्षणांतून हकालपट्टी झाली यामुळें त्या च शिक्षणांत तयार झालेल्या संशोधकांचे बैठकींत तरी त्याची संभावना कशानें होणार ? अर्थात लढणें याचा लौकिक अर्थ

मारामारी, आणि 'पूर्वी शस्त्रें होतीं' ही पुस्तकांतील माहिती, मुलांना शिकविणाऱ्या शिक्षकाच्या कोशांत 'कापाकापी' इतका च रूढ आणि सुट-सुटीत अर्थ बऱ्या च जणांना माहीत होता. यामुळें जयापजयाची मीमांसा करितांना संख्याबलाचा हवाला लेखकांना पुरेसा वाटला असल्यास नवल नाहीं च. रजपुतांचे वर्णनांतून 'शौर्य' या गुणाची अंधुक कल्पना वाच-कांना येते.

परंतु "जिवाची तमा न धरतां लढणें" हा बुद्धीच्या सामर्थ्याचा अभाव गृहीत धरणारा गूण च त्यामध्यें विशेष स्पष्ट होतो. युरोपिअन लोकांशीं वाचकांचा परिचय होऊं लागतां च, त्यांच्या च सांगण्याप्रमाणें, 'लष्करी शिस्त' हा अगदीं हिंदुस्थानच्या रक्तांत न समावणारा गुणविशेष पुढें उभा राहतो. परंतु वरिष्ठांचे हुकूम मानणें हा च धडा स्वकीयांना आजन्म गिरवावा लागत असल्यामुळें, एक प्रकारची जबर गुलामगिरी या पलीकडे त्यांतील स्वाभिमानप्रेरक स्वारस्य आजपर्यंत आपल्या हस्तगत झालें नाहीं ही खेदाची गोष्ट आहे. शिस्त आणि सकाळचे प्रहरीं मैदानावर चाललेली हडेलहप्पी कवाईत यांचे अस्पृहणीय साहचर्य च प्रत्यहीं प्रत्ययास येत असल्यामुळें, असें होणें साहजीक आहे. याशिवाय अडचणीच्या जागीं शत्रू दुर्जय होतो ही हि गोष्ट कधीं कधीं वाचनांत येते. परंतु तो केवळ कांहीं मुलुखांचा विशेष गुण आहे असें च समजण्याची युद्धशास्त्रांत अनभ्यस्त वाचकाची प्रवृत्ती होते आणि युद्धकौशल्य ( strategy ) या शब्दाचा कांहीं खोल अर्थ समजून घ्यावा अशी साधनांचे अभावीं इच्छा च होत नाहीं. युद्ध व युद्धशास्त्रविषयक परिभाषा यांचे बाबतींत साधारणपणें सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या वाचकवर्गाची ही अवस्था झाली.

तशांतून या गोष्टींच्या शाब्दिक कल्पना असल्या तरी त्यांची प्रात्य-क्षिकें केव्हां हि नजरेखालीं येण्याचा संभव नसल्यामुळें मानवी कर्तबगारीची एवढी मोठी शाखा एकजात सर्व हिंदवासियांना पारखी झाली होती यांत

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

नवल नाहीं. व्यवहारांत सुशिक्षित हिंदी माणसांचा गेल्या एक शतकांत लष्करांतील उच्च जागांवर प्रवेश होत नसे. यामुळें युद्धकलेचा अभ्यास केवळ बुद्धिगम्य हि करण्याचें साधन कोणाच्या हातीं नव्हतें. तें साधन अगदीं प्रथम पायरी म्हणून कां होईना या पुस्तकानें निर्माण होत आहे, याबद्दल मला अत्यंत आनंद वाटतो.

हें साधन निर्माण करतांना बदललेल्या परिस्थितीनें बरा च हुरूप आला. गेल्या तीन चार वर्षांत किंवा तसें पाहूं गेलें तर महायुद्धापासून च हिंदुस्थानांतील लष्करी शिक्षणाचे बाबतींत परिस्थिती बदलूं लागली. आय. डी. एफ. च्या निमित्तानें कॉलेजांच्या विद्यार्थ्यांतलि निवडक लोकांना फक्त कांहीं कवायतीचें शिक्षण मिळूं लागलें.

पुढें लष्करी शिक्षणाच्या प्रश्नाला विशेष च महत्त्व प्राप्त झालें. कान्स-लांतील प्रतिनिधींच्या खटपटीनें स्कीन कमिटीकडून चौकशी होऊन सँढर्स्टचे मिलिटरी कॉलेजमध्यें मर्यादित संख्येनें कां होईना उमेदवारांचा प्रवेश होऊं लागला. सँढर्स्ट मिलिटरी कॉलेजमध्यें सर्व हिंदुस्थानांतून दरसाल आठ उमेद-वारांना प्रवेश मिळतो. देशाच्या महत्त्वाचे मानानें ही संख्या म्हणजे कांहीं च नव्हें. अलीकडे यू. टी. सी. ही संस्था लष्करी शिक्षणाचें प्रत्यक्ष प्रतीक म्हणून विश्वविद्यालयांमध्यें कायम होऊं पहात आहे. माजी शिक्षणमंत्री डॉ. रँग्लर परांजपे यांच्या खटपटीला अखेर यश येऊन, शारीरिक शिक्षणाचें महत्त्व मान्य होऊन विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत त्याला स्थान देण्याचें घाटत आहे. हल्लींचे शिक्षणमंत्री ना. हरिलाल देसाई यांचें हि या योजनेला भरपूर पाठबळ दिसून येत आहे. अशा तऱ्हेनें चालू झालेल्या ह्या छोट्या निर्झराला लवकर च महानदीचें स्वरूप प्राप्त होऊन, आपल्या देशांतील बुद्धिमान् तरुणांना लवकर च लष्करी शिक्षण चांगलें मिळूं लागेल, आणि देशसेवेचा एक नवा परंतु अत्यंत महत्त्वाचा मार्ग उघडा होईल अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं आहेत.

या नवीन जागृतीचे काळांत लष्करी अभ्यासाकडे लोकांचें लक्ष वेधणें आवश्यक आहे. या बाबतींतील लोकांच्या आकांक्षा पूर्ण झाल्या तर सैनिक–शिक्षणाच्या संस्था हिंदुस्थानांत उत्पन्न होतील आणि युद्धकलेचें शिक्षण देण्याकरितां लष्करी इतिहास शिकविण्याची जरूरी भासेल. परदेशांतील युद्धें आणि त्यांचा इतिहास यांचे बरोबर च अधिक महत्त्वाचा असा आपल्या देशांतील निरनिराळ्या युद्धांचा इतिहास त्या वेळीं जरूर अभ्यासावा लागेल. आपल्या देशांतील विशेष परिस्थिती, विशेषतः लहान लहान स्वतंत्र राजे आणि त्यांमधील विवक्षित प्रकारचें युद्धमय राजकारण, भौगोलिक रचना आणि तिला अनुसरून प्रगट झालेलें युद्ध-कौशल्य यांचा कार्यकारण-भाव व्यक्त करणारा प्रतापगडच्या युद्धाचा इतिहास शास्त्रीय दृष्टीनें लिहिल्या-मुळें जिज्ञासूंना अभ्यासनीय आहे असें दिसून येईल.

आपल्या देशामध्यें सदर विषयाकडे नव्यानें च लक्ष दिलें जात आहे. ही जागृती अगदीं नवीन असल्यामुळें तिजबद्दल कौतुकाची भावना मावळून संथ अभ्यासाची प्रवृत्ति होण्यास अर्थात च अद्यापि पुष्कळ काळ लोटला पाहिजे. वस्तुस्थिति अशी आहे कीं शिक्षणामध्यें युद्धकलेबद्दल माहितीचा समावेश आपल्या देशांत केला जात नाहीं याबद्दल वैषम्य वाटून, तिजबद्दल आपल्या शिक्षणसंस्थांकडे आपण जोराची मागणी केली पाहिजे. यूरोपांतील वगैरे सर्व स्वतंत्र-राष्ट्रांत व ज्या देशांतील विश्वविद्यालयांच्या नमुन्यावर आपलीं विश्वविद्यालयें बनविलीं आहेत असें सांगतात, त्या इंग्लंडांत 'लष्करी इतिहास' हा एक महत्त्वाचा विषय म्हणून शिकविला जातो. ऑक्सफोर्ड, केंब्रिज, वगैरे युनिव्हर्सिट्यांच्या अभ्यासक्रमाच्या कॅलेंडरवरून ही गोष्ट स्पष्ट होण्यासारखी आहे. जगतांतील सर्व उपयुक्त ज्ञान आपले विद्यार्थ्यांच्या कक्षेंत आणून ठेवणें हें ज्यांचें ब्रीद आहे, अशा विश्वविद्यालयांनीं आपले शिक्षणक्रमांत युद्धनीतीचा समावेश करून ह्या एका अंगाशिवाय शिक्षणाची पूर्ति होत नाहीं असें ध्वनित केल्यासारखें होत नाहीं काय ? हिंदी लोकांना ज्याप्रमाणें राजकारणी जीवित

स्वतंत्रपणें अनुभवण्यास मिळत नाहीं त्याचप्रमाणें त्यांचें शैक्षणिक वातावरण हि लष्करी शिक्षणाच्या अभावामुळें व्यंगपूर्ण झालें आहे. खऱ्या शिक्षणाचा हेतु मानवी अंतःकरणांतील सर्व विकार, भावना आणि बुद्धि यांना योग्य वळण लावणें असा असेल तर ज्ञान-विज्ञानाच्या सर्व शाखोपशाखांचा समावेश अर्थात् विश्वविद्यालयीन शिक्षणांत झाला पाहिजे. राष्ट्राचा बाणेदारपणा, स्वतःच्या सामर्थ्याचा उपयोग स्वत्वरक्षणांत करतां येणाऱ्या प्रजाजनांच्या किंवा समर्थ पूर्वजांचें जीवंत स्मरण हृदयांत बाळगणाऱ्या स्मृतिवीर लोकांच्या झग-झगीत आकांक्षांवर अवलंबून असतो. आपल्या राष्ट्राच्या आजच्या परिस्थितींत नष्ट झालेली लष्करी पराक्रमांची अभिरुची आपल्या तरुण पिढींत उत्पन्न केली पाहिजे. अशाकरितां ऐतिहासिक संशोधकांनीं पूर्वजांचे लष्करी पराक्रमांचा सहानुभूतीनें अभ्यास करून हा लष्करी इतिहास सुसंगतपणें लिहिला पाहिजे. प्रतापगडच्या युद्धानें-या लष्करी इतिहासाच्या योगानें—अशा तऱ्हेची अभिरुची वाचकांचे अंतःकरणांत अवश्य उत्पन्न होईल अशी आशा आहे.

लष्करी शिक्षणाचा अभाव ही राष्ट्रीय शीलवर्धनाचे बाबतींत महत्त्वाची उणीव आहे असें म्हणावें लागतें. सामान्य व्यवहारापासून तों थेट राष्ट्रीय कारभारापर्यंत युद्धाचा प्रसंग नाहीं कोणाला ?

मोठ्या प्रमाणावरील युद्ध म्हटलें म्हणजे एका पक्षानें प्रतिपक्षाला संघटित स्वरूपांत केलेला विरोध च होय. कित्येक तत्त्वज्ञान्यांनीं या विरोध-बुद्धीचे इतके गोडवे गाइले आहेत कीं त्यांचे मतानें "युद्ध हें च सद्गुणांची जननी होय." समोरासमोर युद्धाला उभे ठाकण्यामध्यें एक प्रकारचा उदार सरळपणा असतो. जनतेच्या विचारकक्षेंतून आणि पर्यायानें आचारकक्षेंतून परस्परांचें सामर्थ्य युद्धानें अजमावण्याचा शेवटचा मार्ग काढून टाकल्यानें राष्ट्रीय आणि वैयक्तिक जीवनावर अर्थात् अनिष्ट परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं. युद्धाचे प्रसंग नाहींत किंवा असून नसल्यासारखे च आहेत, आणि युद्धाचें शिक्षण हि नाहीं यामुळें वीरवृत्तीचा दणकटपणा वगैरे

शारीरिक गुण आणि धैर्य, शौर्य वगैरे मानसिक सात्त्विक गुण यांना आधार च नाहींसा होतो. म्हणून आपण असहाय व जित आहोंत ही कल्पना ठाम व कायमची सर्व राष्ट्रावर पसरण्यापूर्वीं च स्वकीयांच्या पराक्रमी पूर्वेतिहासाच्या जाणीवेचे हेमगर्भाचे वळसे आज च देण्यास सुरुवात केली नाहीं तर गुलामगिरीच्या वातावरणांतील सर्व त्रिदोष जोर करून आपण, आपले पूर्वज आणि म्हणून आपले वंशज नेभळे किंवा नेभळ्याची च प्रजा आहों, आपल्यांत नांव घेण्यासारखे वीर्यगुण नाहींत, सैनिकाचा पेशा आपल्या लोकांना जमण्यासारखा नाहीं अशी सर्व राष्ट्राची कायमची समजूत होऊन बसेल. आणि अशा नेभळटपणानें इंग्रज राज्यकर्त्यांना हि त्यांच्या अडचणीचे वेळीं आपण मदत करूं शकणार नाहीं. आपली उज्ज्वल राष्ट्रपरंपरा यथार्थ ओळखल्या शिवाय आपल्या राष्ट्राच्या स्वभावांत इष्ट असे फरक घडून येणार नाहींत. अभिमान मानण्या सारखा आपल्या पूर्वजांचा इतिहास असणें, आणि अभिमान वाटण्याइतकें त्याचें ज्ञान व जाणीव बाळगणें हें राष्ट्रीय स्वभावाला एक पौष्टिक अनुपान आहे. आपला इतिहास परकीयांचे लेखणीनें लिहिला गेल्यामुळें तो किती विकृत स्वरूपांत आपल्याला वाचावा लागतो ही गोष्ट आतां सर्वांच्या परिचयाची झाली आहे. मुसुलमान आणि यूरोपिअन इतिहासकार सहानुभूतीनें आपल्या पूर्वजांचें वास्तविक उज्ज्वल स्वरूप आपल्यापुढें ठेवणार नाहींत. म्हणून उदयोन्मुख राष्ट्रानें आपला इतिहास आपण च लिहिला पाहिजे. ज्या राष्ट्राचा गतकाल लिहिण्यास उज्ज्वलतेचें पाठबळ आणि स्वदेशाभिमानानें प्रेरित झालेली लेखणी यांचें सहाय्य मिळत नाहीं त्या राष्ट्राला त्याच्या भवितव्यते बद्दल आत्मविश्वास वाटणें अशक्य आहे.

आमच्या राष्ट्रीय अभिमानाचें केंद्र शिवाजीमहाराज किंवा त्यांच्यासारखे अन्य राष्ट्रपुरुष; परंतु त्यांच्या वर भलते सलते आरोप करून त्यांचें नांव बदू करण्यांत येतें. त्यांच्या श्रेष्ठपणाचें अनुकरण करण्याचा प्रयत्न करण्याची महत्त्वाकांक्षा धरावी तर त्यांच्या मध्यें दोष दाखवून, तुम्हां मध्यें कोणी च श्रेष्ठ

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

नव्हते असें म्हणावें; हिंदुस्थानांतील सर्व लोक च नालायक आहेत असें विधान करावें आणि तें अविचारी वाचक आणि विद्यार्थी यांनीं खरें मानून मानस-शास्त्राच्या प्रसिद्ध सिद्धांताप्रमाणें अधिकाधिक नाकर्ते व्हावें. हा राष्ट्रीय शीला-वरील होणारा घातुक परिणाम वाचविण्याची अल्पशी तरी कामगिरी या पुस्तकानें व्हावी अशी इच्छा आहे.

प्रस्तुत पुस्तकाचा विषय झालेल्या प्रसंगाला अफझलखानाचा वध असें नांव देणाऱ्या लोकांचा आणि इतिहासकारांचा अक्कलशून्यपणा किंवा कांहीं बाबतींतील कांगावखोरपणा, या पुस्तकाचे वाचनानें स्पष्टपणें नजरेस येऊन शिवाजीमहाराजां बद्दलचा आदर निश्चयानें वृद्धिंगत होईल (पृ. ४ व ५ पहा).

वरील विवेचनांत लष्करी शिक्षणाची आवश्यकता आणि लष्करी इतिहास शिकविण्याची जरूरी किती आहे या बद्दल चर्चा केली. अशा ह्या उपयुक्त विषयाचा अंगिकार आजपर्यंत कसा झाला आणि कसा होणें आवश्यक आहे, याचा विचार करणें जरूर आहे.

आपल्या व्यापक दृष्टीनें भारतइतिहासाच्या संशोधनाचें काम करण्या-करितां महाराष्ट्रानें 'भारत–इतिहास–संशोधक मंडळा'ची उभारणी करून सदर बाबतींतील आपलें धोरण जाहीर केलें च आहे. परकीय लोक हि हिंदवी इतिहासाचें महत्त्व लक्षांत घेऊन कांहीं विवक्षित उद्देशानें तरी यामध्यें लक्ष घालूं लागलेले दिसतात. ऐतिहासिक संशोधनाची जरूरी या प्रमाणें सर्वांना मान्य झाली असून हि अद्यापि हिंदवी इतिहास हा विषय विश्वविद्यालयांतील संशोधन शाखेंत योग्य जागा पटकावूं शकला नाहीं! मग ऐतिहासिक संशो-धनाचे विभाग कल्पून त्यांतील युद्धविषयक राजकारण, धोरण, डांवपेंच, इत्यादि विशेष अभ्यास करण्याकरितां म्हणून हिंदवी लष्करी इतिहासाचा प्रवेश विश्व-विद्यालयांत कसा व्हावा, अशी कोणी शंका प्रदर्शित केल्यास ती अगदीं च अनाठायीं होईल असें नाहीं. द्रव्याचा अभाव किंवा अधिकाऱ्यांची अनास्था अशासारखें कारण दिलें असतां त्यावर विश्वास ठेवण्यास आमची तयारी होईल.

परंतु असे सरळ मार्ग सोडून जेव्हां आक्षेपक ह्या विषयाच्या उपयुक्तते-बद्दल आणि अभ्यासक्रमांत दाखल होण्याच्या लायखीबद्दल संशय प्रदर्शित करतात तेव्हां त्यांच्या विचारसरणीबद्दल काय म्हणावें हें च समजत नाहीं. परराष्ट्रांतील लोक आपआपल्या राष्ट्राचा युद्धेतिहास शिकतांना दिसून येतात त्या अर्थीं ते ज्या कारणाकरितां तो शिकतात त्या च कारणाकरितां तो आपल्या देशांत हि शिकणें जरूर आणि इष्ट आहे असें म्हटल्यानें कांहीं अतिक्रम केला जातो असें कोणास वाटत असल्यास आश्चर्य आहे.

दुसरें एक बिनतोड कारण म्हणून असें पुढें मांडण्यांत येतें कीं, या विषयावर वाचण्यासारखीं पुस्तकें तयार नाहींत, त्या अर्थीं हा विषय अभ्यास करण्यास कठीण म्हणून अभ्यासक्रमांत घालण्यायोग्य नाहीं. या विलक्षण आक्षेपामध्यें इतकी अविचारदर्शक प्रमाणांची गुंतागुंत झाली आहे कीं जागेची मर्यादा नसती तर या कारणाची संपूर्ण मीमांसा करणें फार मनोरंजक झालें असतें. अभ्यासाकरितां पुस्तकें इंग्रजींत पाहिजेत ही एक आपल्या परकीय भाषेला चटावलेल्या देशांतील विशेष गोष्ट आहे. इंग्रजी ज्यांची मातृभाषा आहे त्यांना हिंदुस्थानच्या इतिहासाची कांहीं सहानुभूती नाहीं; म्हणून ते लिहीत नाहींत. मराठी मातृभाषा ज्यांची आहे अशांचें पुस्तक इंग्रजींत होत नाहीं. बरें, सर्व च विषयांवर योग्य पुस्तकें होई तोंपर्यंत वाट पहावयाची तर पोहावयास आल्याशिवाय पाण्यांत न उतरण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या विद्यार्थ्यांची च अवस्था झाली ! संशोधनाची मजल यथायोग्य पुस्तकें रचण्या इतपत पोंचल्यावर हीं पुस्तकें वाचावयास लावून विश्वविद्यालयानें विशेष तें काय केलें बरें ? स्वतः संशोधनाला उत्तेजन देऊन जरूर तर इष्ट विषयाचा परदेशांत अभ्यास करवून आणविलेल्या विद्वांनांकडून, स्वदेशीय परिस्थितींचा विचार करवून स्वदेश विषयक उपयुक्त ज्ञानांत भर घालण्याचें काम करण्याची जबाबदारी विश्वविद्यालयें घेणार नसलीं तर मग तीं विश्वविद्यालयें तरी कसलीं ? एकाद्या विषयावर वाङ्मय नाहीं हें कारण विश्व-

विद्यालयांनीं त्या विषयाची हकालपट्टी करण्यास पुरेसें नसून उलट त्या विषयाचा पाठपुरावा करून त्याच्या अभ्यासाचीं साधनें निर्माण करून देण्याकरतां संशोधनाला उत्तेजन देण्याला तें एक महत्वाचें सहाय्य झालें. विश्वविद्यालयाचें मुख्य काम अस्तित्वांतील पुस्तकें शिकून मिळविलेल्या ज्ञानाचें निवळ माप घेणें हें नसून देशाच्या ज्ञानांत उत्तरोत्तर भर घालण्याकरतां संशोधनाला उत्तेजन देणें हें च आहे हें जितक्या लवकर समजूं लागेल तितकें चांगलें; आणि येवढ्यां च करतां प्रत्येक विश्वविद्यालयांत कार्यक्षम अशा संशोधन शाखेचें महत्त्व आहे. त्यांतून एकाद्या विषयाची नेमणूक झाल्यानंतर कमी अधिक प्रमाणामध्यें योग्य वाङ्मय निर्माण होतें, असा अनुभव आहे. तेव्हां या आक्षेपामध्यें कांहीं विशेष अर्थ आहे असें वाटत नाहीं. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन या समृद्ध भाषांतून आजमितीला हजारों ग्रंथ सदर विषयांवर दिसून येतात, त्यांचा आरंभ एका काळीं असा च लहान होता. परंतु ही अगदीं साधी गोष्ट स्पष्ट करून सांगावयास लागावी असें यांत नवीन काय आहे ? जेथें इच्छा असेल तेथें मार्ग सांपडेल अशी सदिच्छा व्यक्त करून प्रयत्न करीत रहावें. दुसरें काय ?

विश्वविद्यालयासारख्या समर्थ संस्था महत्त्वाच्या बाबतींत कानाडोळा करतांना दिसतात तेथें मजसारख्या माणसाच्या एकाकी प्रयत्नानें काय होणार ? तथापि राष्ट्रीय जीवनामध्यें एका महत्त्वाच्या विषयाचा अभ्यास फैलाववावा आणि त्याकरतां आपल्याकडून होईल तें ‘ फूल नाहीं फुलाची पाकळी ’ राष्ट्रपुरुषाला अर्पण करावें या इच्छेनें हें पुस्तक लिहिलें आहे. हें वाचून तरी त्यांतील गुणदोष-विवेचन करण्याकडे संशोधकांची, स्फूर्ति स्वीकारण्याकडे तरुणांची, त्यांतील विचारसरणीची छाननी करण्याकडे अभ्यासकांची प्रवृत्ति झाल्यास मला धन्यता वाटेल.

आपल्याकडील विद्वानांचें इकडे लक्ष वेधलें तर मला वाटतें युद्धशास्त्रविषयक पुस्तकांची आपल्याला वाण भासणार नाहीं. सुदैवानें अभ्यास

करण्यासारख्या लढाया, कीं ज्यांविषयीं बराचसा लेखी पुरावा उपलब्ध आहे अशा इंग्रजी अमदानीच्या आरंभाच्या, किंवा त्याच्या पूर्वीच्या अनेक सांपडतील. मीं स्वतः गेल्या आठरा-एकोणीस वर्षांत सुमारें शेंदीडशें लढायांबाबतींतील बरेंचसें ऐतिहासिक वाङ्मय वाचून प्रत्यक्ष रणभूमीवर निरीक्षण करून माझ्या ज्ञानांत भर घालण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या सर्व लढायांचें राजकीय धोरण व युद्धनीति या दृष्टीनें अभ्यास करण्याकरितां आणि आपल्या अभ्यासांचें फल समाजाच्या उपयोगाकरितां पद्धतशीर लिहून देशाच्या वाङ्मयांत भर घालण्याकरितां उत्साही, तरुण, शरीरानें व मनानें सुदृढ अशा संशोधक अभ्यासकांची जरूरी आहे. जिज्ञासूंना मार्ग दर्शविण्याकरितां माझे अनुभवाप्रमाणें पूर्व तयारी कितपत लागते याचें आतां दिग्दर्शन करितों.

लष्करी असो, धार्मिक असो, राजकीय असो, वाङ्मयिक असो कोणत्या हि प्रकारचा इतिहास निर्माण करावयाचा म्हटला म्हणजे हा संशोधकांचा च प्रांत आहे. तेव्हां संशोधन म्हणजे काय याची पुरी कल्पना असलेला, संशोधनाच्या कार्यांतील अफाट आणि कित्येक वेळां निष्फल प्रयत्नांना न कंटाळणारा, चिकाटीचा, उत्साही, शोधक अशा च अभ्यासकाची येथें जरूरी आहे. संशोधकाची मनोभूमिका नुसती कांहीं कार्य करूं शकणार नाहीं. संशोधकाला पूर्वीच्या सर्व निश्चित गोष्टींचा आढावा घेऊन त्यावर आपल्या सिद्धांतांची उभारणी केली पाहिजे. आपल्या लष्करी तऱ्हेच्या संशोधनाला इतिहास हा सर्वत्र आधारभूत असल्यामुळें इतिहासाचें उत्तम ज्ञान संपादन केलें पाहिजे. युद्धाचीं कारणें, व युद्ध चालू होईपर्यंतची परिस्थिति हे धागे दोरे सर्व इतिहासांत निगडित झालेले असतात. तेव्हां स्वदेशाचा लष्करी इतिहास अभ्यासण्यास किंवा लिहिण्यास सज्ज झालेल्या संशोधकानें स्वदेशाचा सामान्य राजकीय इतिहास उत्तम तऱ्हेनें हस्तगत केला पाहिजे.

लष्करी संशोधनाचा मुख्य विषय युद्धनीति किंवा युद्धशास्त्र हा असल्यामुळें युद्धकला ( art of war ) या विषयाचें ज्ञान सदर संशोधकानें प्रथम

प्राप्त करून घेतलें पाहिजे. युध्दामध्यें कला नाहीं, तें एक हडेलहप्पी माणसाचें काम आहे ही गोष्ट केवळ हुकूम पाळणाऱ्या शिपाई गड्याबद्दल सर्वस्वीं खरी आहे. परंतु सैन्याचे पराक्रम आणि युध्दाचे निकाल केवळ त्या प्याद्याच्या कारवाईवर निश्चित होत नसतात. ते सर्व, त्या प्याद्याला रणक्षेत्राच्या अफाट पटावर आपल्या बुद्धिबळानें इतस्तत: खेळवणाऱ्या चतुर सेनापतीच्या कर्तबगारीवर अवलंबून असतात. हुषार सेनापति, कुशल सेनानायक आणि चाणाक्ष सेनाध्यक्ष म्हणजे केवळ शिपाई नसून तो शिपाई अधिक मेंदू असा जोड असतो. तो सर्व सेनेचा शिरोभाग म्हणजे चालक होय. युद्धनीतीचा अभ्यास करावयाचा म्हणजे ह्या सेनानायकाच्या डावपेंचाचें यथार्थ ज्ञान मिळविणें आणि त्यांचें यथेष्ट परीक्षण करून बरें वाईट जाणण्याचा प्रयत्न करणें होय. सेनानायकाचे डावपेंच योग्य तऱ्हेनें परीक्षावयाचे तर परीक्षक हि उत्तम सेनानायका इतका तज्ज्ञ पाहिजे. शूर किंवा धोरणी लोकांच्या कार्याबद्दल त्यांचेवर वाटेल ते अभिप्राय खरडण्यापूर्वी आपल्यावर किती मोठी जबाबदारी येऊन पडते याचा विचार करण्याइतका प्रामाणिकपणा असणाऱ्या कोणा हि माणसाला, म्हणजे युध्दशास्त्रावर ग्रंथ लिहूं पहाणाऱ्या किंवा अभ्यासक अशा संशोधकाला किती खबरदारी घेणें जरूर आहे हें लक्ष्यांत येईल.

ह्या गोष्टीचें अधिक स्पष्टीकरण करण्या करितां म्हणून युद्धकला किंवा युद्धशास्त्र ही गोष्ट किती व्यापक आहे याचा विचार करूं. उत्तम सेनापतीला अनेक शास्त्रांचें चांगलें ज्ञान असणें जरूर आहे. खरें पाहिलें तर युद्धशास्त्र हें सर्व शास्त्रांचें शास्त्र आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पहा: चतुर सेनापतीला शत्रूच्या सर्व सामर्थ्याचे तणावे माहिती पाहिजेत. त्याला देशांतील व परदेशांतील राजकारणाबद्दलची पूर्ण कल्पना पाहिजे. शत्रूचें सैन्य किती आहे, तें कोणत्या वर्गाचें आहे, त्याच्या अन्नपाण्याची तरतूद कोठून आणि कशी होणार आहे, त्यांतील हिंमत कोणत्या प्रकारची आहे ह्या प्रकारच्या सर्व गोष्टींची माहिती ठेवून त्याचा उपयोग स्वतःच्या यशा करितां करून घेतां

आला पाहिजे. कित्येक वेळां शत्रूच्या धर्म-समजुती, त्याचे आचार किंवा त्याच्या संवयी या माहीत असल्यापासून अनेक फायदे होतात. युद्धभूमीचें उत्तम तऱ्हेचें भौगोलिक ज्ञान सेनापतीला पाहिजे. हें ज्ञान त्यानें युद्धभूमीचें प्रत्यक्ष निरीक्षण करून मिळविलें पाहिजे. लहान मोठे उंचवटे, उतार, नद्या, नाले, खोंड, डोंगराचे सुळके, सोंडा यांचा त्यानें पुरता अभ्यास केल्या शिवाय स्वतःचें सैन्य शत्रूचे नजरे पासून छपवून ठेवणें आणि शत्रूवर त्याला समजूं न देतां अचानक हल्ला करणें हें त्याला समजणार नाहीं. आपल्या सैन्याचे लहान लहान भाग विखरून ठेविले असतील, त्यांस योग्य वेळीं योग्य तऱ्हेनें बातमी पोंचविणें, त्या बाबतींत आवाज, अगर आगटी यांचा प्रसंगोपात उपयोग करून घेण्याकरितां आसपासच्या सर्व भूप्रदेशाची माहिती व प्रसंगावधान आणि अनुभवाचें शास्त्रीय ज्ञान यांची आवश्यकता आहे. बंदुकांचा किंवा तोफांचा मारा किती अंतरावर होईल वगैरे गोष्टी गणितानें आंकडेमोड करून काढतां आलें पाहिजे. स्वतःच्या सैन्याची हिंमत वगैरे व्यवस्थित राखणें या व अशा मानस शास्त्रीय बाबतींत हि तो तरबेज पाहिजे. अलीकडचे ( स्पेशलायझेशनचे ) युगांत राजकारण आणि युद्धकला यांची फारखत झालेली दिसते तशी पूर्वीचे आपले इतिहासांत झाली नव्हती. शिवाजी महाराजांना राजे व परराष्ट्रमंत्री या न्यायानें राजकारणाचे दोन हात करावे लागत. त्या च बरोबर प्रत्यक्ष रणांगणावर आपल्या सैन्याचें नेतृत्व हि पत्करावें लागे. अशा सव्यसाची माणसांचे कर्तबगारीवर मत देण्याचें काम अविचारी लेखकांना किती ही बेदरकाराचें वाटलें तथापि विचारी वाचकांना दीर्घ परिश्रमानें तें समजून घेण्याकरितां शांतपणें ज्ञानसंचय करीत रहाणें हें च अधिक महत्त्वाचें वाटेल यांत शंका नाहीं.

केवळ ( art of war ) आणि तिला पोषक अशा आनुषंगिक गोष्टींचें पुस्तकी ज्ञान युद्धकलेचें चांगलें मर्म कळण्यास पुरेसें होणार नाहीं. ज्या रणभूमीवर हे रक्तपाताचे खेळ खेळून राष्ट्रीय जीवन जगविण्याचें



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

महत्कार्य करण्यांत आलें त्या युद्धभूमीचें दर्शन संथपणें आणि सूक्ष्म दृष्टीनें घेतलें पाहिजे. ही गोष्ट देवदर्शनाप्रमाणें केवळ भक्तिभावानें करावयाच्या कळसदर्शना सारखी नसून तिजकरितां उन्हातान्हांतून डोंगर खिंडींतून, चढउतारांनीं, पायपीट केली पाहिजे. प्रतापगडच्या युध्दाची च भूमी पाया-खालीं घालणें असें म्हटलें तर प्रतापगडाच्या लगत्या पासून विजापूर पर्यंतचा दोन अडीचशें मैलांचा आणि कित्येक ठिकाणीं तितक्या च रुंदीचा टापू अनेक वेळां तुडवावा लागतो. मला करावा लागणाऱ्या प्रवासाचें कोणीं टिप्पण च ठेविलें असतें तर कित्येक हजार मैलांची नोंद त्याला करावी लागली असती. अशा करितां महत्त्वाकांक्षी संशोधकानें शरीराला दृढता आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आखाड्यांतील तालमीनें संपादन केलेल्या स्नायूंच्या दृढते पेक्षां प्रत्यक्ष वनसंचाराच्या संवयीनें, उपास तापास काढण्याच्या करारानें प्राप्त होणारा कंटकपणा जो सर्वसाधारणपणें सैनिकांत दिसून येतो अशा संशोध-कांच्या उपयोगी पडेल असें माझें मत आहे. कै० इतिहासाचार्य राजवाडे यांचे परिश्रम आणि कार्यक्रम लक्षांत आणले म्हणजे या बाबतींत विशेष लिहिण्याची जरूरी नाहीं.

इतकें बिकट बौद्धिक आणि शारीरिक काम करणारा कै० राजवा-ड्यासारखा किंवा कै. पांडोबा पटवर्धनासारखा संशोधक मिळाला तर भाग्य च म्हणावयाचें. परंतु राजवाडे हि आपल्याला अशा संशोधनाचे कामाकरितां सर्वतोपरी लायक समजत होते असें मुळीं च नाहीं. त्यांचें म्हणणें असें होतें कीं, लष्करी संशोधनाचें काम कोणा सैनिकानें च अंगावर घेतलें पाहिजे. ह्या त्यांच्या म्हणण्यांत बरें च तथ्य आहे. म्हणजे आज च सैनिकामध्यें बुध्दिमान माणसांची वाण असल्यास, राष्ट्रेतिहासाचा उद्धार करणाऱ्या तरुण सुशि-क्षित विद्यार्थ्यांनीं सैनिकांचा पेशा स्वीकारला च पाहिजे. आपल्या राष्ट्रांत सर्व वर्णांतील आणि सर्व वर्गांतील लोकांत वीरवृत्तीच्या माणसांची कधीं हि वाण पडेल असें वाटत नाहीं. ज्यांचें लक्ष सर्व बाजूंनीं हिंदी राष्ट्राची खच्ची कर-

ण्याकडे च लागून राहिलें आहे अशा आपमतलबी लेखकांनीं हिंदी लोकांत लष्करी पाणी व धमक नाहीं अशी हाकाटी चालविली आहे तिला समर्पक उत्तर द्यावयाचें असल्यास तें उदाहरणांनीं च दिलें पाहिजे. आज विश्वविद्यालयांतील पुस्तकी विद्या हस्तगत करण्यामध्यें सर्व वर्णांतील व वर्गांतील लोक पुढें येत आहेत. या विद्येंत यूरोपियन लोकांची बरोबरी करूं शकणारे विद्यार्थी लष्करी अधिकारांच्या जागा वापरण्यास नालायक ठरत नाहींत हें हजारों जातिवंत व सुशिक्षित क्षत्रियांनीं आणि इतरांनीं सैन्यांत शिरून सिद्ध करून दिलें पाहिजे. सैन्याचें जीवित कष्टतर आहे म्हणून मागें राहिल्यास देशाचें नुकसान अनंत आहे हें ध्यानांत आणिलें पाहिजे. इंग्लंड वगैरे देशांत ऑफिसर्स लोक ज्या लोकांतून निवडले जातात तो विद्यार्थीवर्ग तेथील पब्लिक स्कूल्समधून तयार होत असतो. ह्या विद्यार्थ्यांचें शिक्षण बौद्धिक बाजूला इकडील साधारणपणें ग्रॅज्युएट पदवीधर इतकें असतें. शारिरिक खेळ, वगैरे बाबतींत त्याची चांगली च तयारी असते. म्हणजे इकडील नवीन समर्थ विद्यालय, वांईची प्राज्ञ पाठशाळा, उत्तर हिंदुस्थानांतील गुरुकुलें वगैरे सारख्या संस्थांमध्यें ग्रॅजुएटपर्यंत पदवीचें शिक्षण मिळाल्यास तें शिक्षण घेतलेला इसम तिकडील सैन्यांत अधिकार मिळविण्याकरितां दाखल होतो असें म्हटलें असतां चालेल. अधिकारांत बढती मिळविण्याकरितां जें शिक्षण घ्यावें लागतें त्याचा उपयोग अशा अधिकाऱ्यांना स्वदेशांतील युध्दांचे इतिहास लिहिण्यास उपयोगी पडेल आणि राष्ट्रीय वाङ्मयांत उत्तम भर पडूं लागेल. पाश्चात्य देशांतील युध्दविषयक वाङ्मय सर्वत्र युध्दनीतींतील पारंगत अशा लष्करी अधिकाऱ्यांनीं च लिहिलेलें आहे, आणि हें स्वाभाविक हि आहे. लष्करी संशोधन करण्याकरितां लष्करी अधिकाऱ्यांतून च लेखन करणारा वर्ग उत्पन्न झाला पाहिजे यांत संशय च नाहीं. याकरितां स्वराष्ट्रेतिहासाचे उद्धाराकरितां बुद्धिमान् सैनिक पैदा झाले पाहिजेत, हें खरें आहे. परंतु विद्यार्थ्यांनीं लष्करी बाजूला वळावें अशी आकर्षक परिस्थिति निर्माण झाल्याशिवाय विद्यार्थी त्या

बाजूला जाणार कसे आणि इष्ट लष्करी संशोधक आपल्याला प्राप्त होणार कसे? ही गोष्ट थोडेंबहुत लष्करी इतिहासासारखें शिक्षण विश्वविद्यालयांत प्रविष्ट झाल्याशिवाय होणारी नव्हे. आणि हें शिक्षण त्या विषयांतील वाङ्मय-वृद्धीवर अवलंबून ! आणि वाङ्मय वृद्धि तरी आपोआप कोठून होणार ? म्हणजे राष्ट्रीय उन्नतीचा विचार महत्त्वाचा मानला जाईल अशा चालकवर्गाच्या हातांत विश्वविद्यालयांचा कारभार जाऊन त्यांच्याकडून कांहीं अशा तऱ्हेच्या संशोधनाला आणि अभ्यासाला उत्तेजन मिळेल तर च ही गोष्ट साध्य होईल हें उघड आहे. अशा तऱ्हेचें हें विचित्र वर्तुळ फुटेल तेथें खरें ! तूर्त त्या दिशेनें प्रयत्न करीत रहाणें एवढें च आपल्याला करितां येण्यासारखें आहे. आणि हा च विचार मनांत आणून हें पुस्तकाचें धाडस केलें आहे. परंतु या एका पुस्तकाकरितां इतके श्रम आणि इतका खर्च करावा लागला कीं यापुढें दुसरें एकादें पुस्तक हातीं घेणें म्हणजे मुष्किलीचें काम होऊन बसलें आहे. असलीं कामें एका व्यक्तीच्या फायद्याकरितां होत नसतात. आणि एका व्यक्तीचीं साधनें त्यांना पुरीं हि पडत नाहींत. संशोधनाचा जगडव्याळ खर्च संस्थांना च करतां येणें शक्य असतें. युनिव्हर्सिटीसारख्या मातबर संस्था च या मोठ्या कामाला चालना देऊं शकतील तर फार बरें होईल. अशा विचारानें विचारी लोकांचे अंतःकरणांत थोडीफार सहानुभूती उत्पन्न करावी म्हणून च ह्या प्रस्तावनेंत मोकळेपणानें आत्मनिवेदन केलें आहे.

लष्करी शिक्षणाला मज्जाव आहे हा दोष सर्वस्वीं शिक्षण-संस्थांच्या माथीं मारतां येईल अशी परिस्थिती नाहीं. कोणत्या हि प्रकारच्या संस्थांमध्यें नेहमीं देशाच्या परिस्थितीचें केवळ प्रतिबिंब दिसत असतें. राष्ट्रांतील तरुण लोकांना कोणतें काम करूं द्यावें आणि कोणतें करूं देऊं नये हें राजकीय अधिकारी ठरवीत असतात. तेथें हि एकसारखें ठोठावून बंद केलेले दरवाजे उघडण्यास लाविलें पाहिजे. आपल्या सरकारनें ठरविलेल्या धोरणामुळें, तीन महत्त्वाचे मार्ग बहुतांशीं त्यांच्या जातभाई करितां च राखून कारभार चाल-

लेला दिसतो. या गोष्टी म्हणजे सैन्य, आरमार आणि व्यापार. या तिहींपैकीं तळांतील जागा हिंदवासियांना मोकळ्या राहिल्या आहेत. परंतु वरील मलई संभाळण्याचें मात्र काम करण्याची मुभा यूरोपिअनांना आपल्या सरकारनें दिलेली आहे! या बाबतींत कौन्सिलांमधून वगैरे होणाऱ्या प्रयत्नांना राष्ट्रांतील सर्व बुद्धिमान् व चळवळ्या वर्गानें पाठिंबा दिला पाहिजे. यांतील प्रथम दोहोंचा राष्ट्रीय शीलावर आणि तिसऱ्याचा राष्ट्रीय संपत्तीवर होणाऱ्या इष्ट परिणामापासून आपल्याला पिढ्यान्‌पिढ्या दूर ठेवण्यांत येत आहे या गोष्टीचा विचार करून पोटाचा प्रश्न सोडविण्याकरितां म्हणून तरी लोकांनीं हा प्रश्न हातांत घेतला पाहिजे. ठरलेल्या चकारींतून जाण्याचे इतर मार्ग निरुपयोगी आहेत. धाडस, धैर्य, आत्मविश्वास हे उच्च तऱ्हेचे आणि स्वातंत्र्यप्रेरक गुण अंगीं बाणण्याचे उद्योग हे च आहेत; त्यांची कांस धरली पाहिजे. आपल्याला आपल्या जन्मसिद्ध हक्कांपासून जुलमानें कोणी मागें ठेवीत असला तर हजारों कष्टांना न जुमानतां परवानगी असेल तेवढ्या च कक्षेंत आपली लायकी सिद्ध करण्याच्या खटपटीला लागलें पाहिजे. उत्साही आणि महत्वाकांक्षी तरुणांनीं कोणत्या हि सबबी न सांगतां अगर ऐकतां मिळेल त्या तऱ्हेनें आणि अटींवर आंत प्रवेश करून घेण्या-शिवाय गत्यंतर नाहीं. हा केवळ पोटाचा प्रश्न म्हणून हि विचार केला तर हा मार्ग इष्ट च आहे. अशा तऱ्हेनें आंत घुसणाऱ्यांची, 'सुशिक्षित तरुणांची' संख्या वाढूं लागली म्हणजे लष्करी शिक्षणाची तीव्र जरूरी भासूं लागेल. तो प्रश्न या बाजूनें हि कदाचित् सुटण्याला थोडीफार मदत झाली तरी एकंदरींत इष्ट च आहे. हिंदी सुशिक्षित वर्गांत लष्करी पेशा लोकप्रिय नाहीं, हिंदु-स्थानांत विशेष महत्त्वाच्या आणि अधिकारी होण्याच्या लायकीच्या जाती च नाहींत, या आक्षेपाचा खरोखर कंटाळा आला असेल आणि हीं विधानें म्हणजे हिंदुस्थानच्या बुध्दिमत्तेची निव्वळ बदनामी आहे, अशी तीव्र जाणीव झाली असेल तर त्यांतील अनेक कष्ट आनंदानें पत्करून, तो पेशा स्वीकार-

ण्याला तरुणांनीं कंबर बांधली पाहिजे. एकदां त्यांतील श्रम अंगवळणीं पडल्या-नंतर इतर कोणत्या हि बुद्धिगम्य विषयाप्रमाणें च त्यांत आनंद आहे हें मी स्वानुभवानें सांगूं शकतों. युध्दकलेंतील अंतर्गत गाभा एकदां परिचित झाल्या-नंतर वाटेल त्या तऱ्हेची बौद्धिक कसरत करण्यास त्यांत भरपूर जागा आहे. आपलें ज्ञान हिंदी इतिहासांतील एकेका लढईवर चालवून पहाणें म्हणजे अव-र्णनीय शिक्षण आहे. त्याला लागणारें पूर्व वाचन, युद्धभूमीचें सम्यक् दर्शन, युद्धाच्या हालचालींचें निरीक्षण या सर्व गोष्टीमुळें आपलें ज्ञान व बुद्धि यांना भरपूर अन्न मिळणार च. यशस्वी तऱ्हेनें माहीत झालेल्या युद्धांची सुसंगत हकीकत लिहिणें हा नंतर हातचा मळ आहे. अशा तऱ्हेच्या संशोधनाला अद्याप हि परदेशांत जागा असून एकेका युद्धावर अनेक ग्रंथ प्रसिद्ध होत असतात. आपल्या देशांत तर अजून एक हि ग्रंथ तयार नाहीं. तेव्हां बुद्धि-मत्तेला पुष्कळ काम करतां येण्यासारखें आहे. तेव्हां हा पेशा पत्करून पुढें काय करावयाचें असा प्रश्न आज च विचारण्याचें कारण नाहीं.

संशोधनाची पूर्व तयारी कोणत्या प्रकारची असावी आणि संशोधन कोणीं करावें किंवा कोणाला करणें शक्य आहे याचा खुलासा केल्या नंतर प्रत्यक्ष संशोधन चालू झाल्या पासून कोणती खबरदारी घेणें अवश्य आहे हें हि थोडक्यांत सांगतों. सदर गोष्टींचें दिग्दर्शन सविस्तर करण्याचें हें स्थळ हि नव्हे. पुढील पुस्तकांमध्यें प्रत्यक्ष केलेल्या संशोधनानें च प्राप्त झालेले सिद्धांत नमूद केले असल्यामुळें त्या मजकुराचें काळजी पूर्वक वाचन करणाऱ्याला येथें दर्शविलेल्या गोष्टी आपोआप उलगडून दिसतील.

वर सांगितल्या प्रमाणें पूर्व तयारी झालेल्या संशोधकानें आपल्या इति-हास-वाचनांतून एकादा युध्द—प्रसंग अभ्यासा करितां निवडावा. आणि त्या बद्दल साधारणपणें अस्तित्वांत असलेलीं सर्व छापील व हस्तलिखित कागद-पत्रें मिळवून मननपूर्वक त्यांचें वाचन करावें. सर्व कागदपत्रें वाचतांना सत्यान्वेषणाकडे दृष्टि केंद्रीभूत करून समोर येणाऱ्या पुराव्याची बारकाईनें

छाननी करून खरा खोट्याचा निर्णय केला पाहिजे. आपल्याला अभ्यास करावयाचा तो काल निश्चित असला तथापि त्याला उपयुक्त माहिती कोठें आणि कशी उपलब्ध होईल याबद्दल कांहीं च निश्चित सांगतां येण्यासारखें नाहीं.

प्रतापगडच्या युद्धाच्या पुस्तकांत संदर्भ दिले आहेत, ते पाहिले असतां या म्हणण्याची सत्यता दिसून येईल. सामान्यपणें इतिहासाचीं म्हणून समजल्या जाणाऱ्या पुस्तकांशिवाय प्रवासवर्णनें, डायऱ्या, महजर यांचा हि उपयोग होतो. एकाद्या युद्धाचा यथाशास्त्र अभ्यास करीत असतांना युद्धकालाच्या वेळीं प्रचलित असलेली राहाणी, सामाजिक, धार्मिक वगैरे बाबींबद्दलच्या अनेक कल्पना यांबद्दल जेथें जेथें म्हणून माहिती मिळेल ती जमा करावी लागते. युध्दामध्यें भाग घेणारीं माणसें नेहमीं कांहीं भावनांनीं प्रेरित असल्यामुळें या सर्व गोष्टींचा उपयोग त्यांच्या त्या भावना समजून घेण्याला होतो. शिवाजी महाराजांना श्री भवानी देवीचें आश्वासन किंवा त्याच्या उलट अफझलखानाच्या तोरव्याच्या गुरूनें अफझलखानाला " तूं डोक्याशिवाय च मला दिसत आहेस " असें म्हणणें, यांचा परिणाम तत्कालीन परिस्थितीवर काय झाला असेल हें समजावून घेण्याकरितां प्रत्यक्ष युद्धाच्या बाबींखेरीज अनंत अवांतर गोष्टींचें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हल्लींच्या युगांत वाढलेल्या, आमच्या कल्पनेला खरें हि वाटणार नाहीं इतक्या तऱ्हेनें त्या वेळेला त्या धर्मभोळ्या भाविक लोकांवर इष्ट किंवा अनिष्ट परिणाम अशा गोष्टींनीं घडत असले पाहिजेत, त्यांचा हि विचार अवश्य केला पाहिजे. तात्पर्य, एका युद्धाचा इतिहास अभ्यासावयाचा म्हणजे युध्दशास्त्राच्या दृष्टीनें सर्व पुरावा गोळा करून हि शिवाय युद्धांत भाग घेणाऱ्या उभयपक्षांच्या मनुष्यांबद्दल सर्व प्रकारचें ज्ञान संपादन केलें पाहिजे.

असें करीत असतांना खर्च करावा लागणारा काळ व पैसा इकडे फार लक्ष्य देऊन चालणार नाहीं. अभ्यासकाला प्रत्यक्ष रणभूमीवर अनेक वेळां संचार करावा लागेल. तो करण्याचा कंटाळा करतां कामां नये. प्रत्यक्ष

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

ठिकाणांवरील भौगोलिक रूपरेखा खडान् खडा समजून घेऊन या माहितीचा उपयोग युद्धांतील हालचालींची जुळणी करण्यांत करून घेतला पाहिजे. टोपो-शीट नकाशे, स्थूल मानानें काढले असल्यामुळें प्रत्यक्ष भूप्रदेश आणि नकाशा यांचे बरें च वेळां सूत जमत नाहीं, ही गोष्ट काळजीपूर्वक प्रवास करून नकाशा वरून ताडून पाहाणारांच्या लक्ष्यांत येईल च. मोठ्या टेकड्या आणि सहज उतार न देणाऱ्या रुंद नद्या नकाशांत गडप झालेल्या दिसतात. मोठ्या रचनाविशेषाची ही स्थिती तेथें ४।५ फुटांचा उंचवटा किंवा एकाद्या मैदानाचा एका विवक्षित दिशेकडे असलेला उतार आपण घरीं बसून केवळ नकाशा वरून केलेल्या कल्पनेला केव्हां खो देईल हें समजावयाचें नाहीं. इतके बारकाईचे चढ उतार ३०० वर्षांपुर्वींचे आज हि कायम राहातात किंवा कसें अशी कोणी शंका घेतल्यास ती अनाठायीं होणार नाहीं. असा फेर बदल झाला असल्यास मग आतां प्रत्यक्ष भूमीच्या दर्शनानें त्या वेळची वस्तुस्थिती कशी कळावी बरें ? इतर सपाट प्रदेशांबद्दल हें म्हणणें खरें असलें तरी सह्याद्री आदिकरून डोंगराळ मुलुखाबद्दल असें विधान करतां येणार नाहीं. त्या वेळचे बारीक सारीक खळ्या खळगे थोडे बहुत बदलले असले तरी कांहीं इंच अधिक चढ किंवा १।२ फूट अधीक खोल या पलीकडे विशेष फरक पडला असण्याचा संभव नाहीं. सह्याद्री हा जुना डोंगर असून आज अनेक शतकें वारा पाऊस यांच्या परिणामानें वरील भुसभुशीत भाग झडून जाऊन राहि-लेले पर्वतविशेष गेल्या तीनशें वर्षें तसे च राहिले असण्याचा बरा च संभव आहे. निदान मुख्य टेंकड्या, प्रमुख सोंडी व यांचे मधील खोरीं यांची परि-स्थिती तशी च राहिली आहे असें ग्रहित धरण्यास हरकत नाहीं. भूगर्भ-शास्त्रीय दृष्टीनें जी पाहाणी झालेली आहे तिजमध्यें ह्या म्हणण्याला पुष्टी मिळेल, असा पुरावा उपलब्ध झालेला आहे. शिवाय माझ्या प्रत्यक्ष अनुभवा-वरून ही गतकालीन भूपृष्ठरचना बहुतांशीं तशी च कायम राहिली आहे, असें म्हणण्यास मला प्रत्यवाय दिसत नाहीं.

संशोधकानें अंतर्गत राजकारणाचा फार कसून विचार केला पाहिजे. युद्धकला आणि युद्धांतील डांवपेंच हे प्रत्यक्ष युद्धभूमीवर चाललेले दिसतात, ह्यांना युद्धाचें शरीर असें मानलें तर या युद्ध-पुरुषाचा आत्मा म्हणजे ज्या उद्देशानें हीं युद्धें पुकारलीं जातात ते उद्देश किंवा कारणें हीं होत. युद्धाचीं कारणें समजणें हा मात्र युद्धाभ्यासाचा महत्त्वाचा भाग आहे. चतुर मुत्सद्दी दूरवर नजर ठेवून आपल्या धोरणांना आड येणाऱ्या शत्रूचा कांटा काढण्याचा विचार नक्की ठरवून मग युद्धाचीं कांहीं दिखाऊ कारणें शोधून काढितात. या वरवरच्या कारणांचा भयंकर गाजावाजा केला जातो आणि अंतर्गत राजकारणांच्या नीचपणावर किंवा दुष्टपणावर सरळपणाचा आणि नाइलाजाचा आव आणून पडदा ओढण्यांत येतो. इतिहासाच्या खऱ्या अभ्यासकाला या अंतर्गत व अंतस्थ राजकारणाचा छडा लावतां आला नाहीं तर त्याला इतिहासाचें मर्म समजणार नाहीं. लोक काय बोलतात यावरून किंवा लिहिलेलें किंवा छापलेलें काय आढळतें यावरून कोणीं एखादा सिद्धांत बांधूं म्हणेल तर त्याला त्या कामीं यश येणार नाहीं. उभय पक्ष आपआपलें समर्थन करून परक्याचे दोष पुढें मांडणार. अशा परिस्थितींत वस्तुस्थितीचा खोल कयास बांधून च संशोधकानें स्वतःच्या तर्कशास्त्रावर भिस्त ठेवण्यास तयार झालें पाहिजे.

मराठ्यांशीं इंग्रजांचें झालेलें पहिलें युद्ध च (१७७५–८२), कीं ज्यांत सुप्रसिद्ध वडगांवची लढाई लढली गेली, तें घ्या. नारायणराव पेशव्यांचा खून झाल्यानंतर मराठे हे घातकी राघोबादादावर उठले, तेव्हां त्याला मदत देऊन आपला हात मराठ्यांच्या राज्यव्यवस्थेंत शिरकविण्याचा प्रयत्न करण्यामध्यें इंग्रजांनीं दाखविलेलें धोरण पुढील भवितव्यतेचा विचार करूं लागलें म्हणजे किती अचूक, किती खोल, किती दूरदर्शीपणाचें, किती विनाशक आणि किती भयंकर होतें याची कल्पना त्या वेळीं एका नाना फडणीसाला च आली असेल. हें त्यांचें धोरण अंतर्गत राजकारणांतील म्हणून ओळखण्याचा चाणाक्षपणा

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं. १०८२२ ग्रंथानुक्रमांक ९११ १९८८
किंमत — पाने १०२

संशोधकांत पाहिजे. आज कॉलेजमधून पुस्तकांवरून शिकविलें जातें तें खरें राजकारण नसून या लढाईंत दिसून आलेल्या महाराष्ट्र–साम्राज्याला धुळीस मिळवूं पहाणाऱ्या शक्तीचा आणि या विघातक शक्तीचा प्रतिकार करण्याला मराठ्यांनीं अमलांत आणलेल्या डावपेंचांचा अभ्यास करणें हा खरें अंतर्गत राजकारण ( internal politics ) शिकण्याचा मार्ग आहे !

या गोष्टी थोड्या सरावानें, वाचनानें आणि विशेषतः मननानें चांगल्या समजूं लागतात आणि निरनिराळ्या राष्ट्रांनीं निरनिराळ्या प्रसंगीं प्रदर्शित केलेला उदारपणा, नीचपणा, लुच्चेगिरी वगैरे स्वभाव–विशेषांशीं इतिहास-वाचकाचा परिचय होऊं लागतो, आणि जयापजयाच्या खऱ्या कारणांची मीमांसा समजूं लागते. ज्या त्या लोकांविषयीं शौर्य, धाडस, उदारपणा, लोक-कल्याणेच्छा, निरपेक्षपणा, लुटारूपणा, अन्याय, क्रौर्य वगैरे उदार अनुदार गुणांचें खरें स्थान आणि जाहीर केलेलें स्वरूप यांतील साम्य–भेद दिसूं लागतात. राष्ट्र या दृष्टीनें स्वकीयांचे गुणदोष स्वच्छ दिसतात आणि झालेल्या चुका इतरांच्या उदाहरणानें दुरुस्त करण्याची संधि मिळते. स्वतःच्या नादानपणा-बद्दल आणि परक्यांच्या विशेष लायकीबद्दलच्या अवास्तव कल्पना देशोधडीला जातात आणि कोणा एका राष्ट्रानें कोणा एका अन्य राष्ट्राला जिंकणें हा परमे-श्वर–दत्त ताम्रपटाचा किंवा वर्णन करतात त्याप्रमाणें जन्मतः वर्चस्वाचा प्रकार नसून आपण व्यवहारांत पहातों तशा साध्या लबाडीचा प्रकार आहे, किंवा फार तर 'बळी तो कान पिळी' असा प्रकार आहे याची स्पष्ट कल्पना येते. थोड्याशा प्रयत्नांनीं अशा तऱ्हेचें राष्ट्रीय वैगुण्य दूर करणें अशक्य नाहीं असें हि त्यावरून उघड समजतां येतें, आणि निराशेचा नाश होऊन प्रगति आणि उन्नति करण्याची आशा वाटून स्फूर्ती मिळते.

माझ्या शक्तिप्रमाणें मी माझ्या आवडत्या विषयाचें समर्थन करून मला समजली अशा भाषेंत आणि स्वरूपांत त्याची फलश्रुती हि सांगितली. माझ्या परिश्रमांनीं लष्करी इतिहासाला महत्त्व येऊन, माझे देशबांधवांनीं

राष्ट्रीय लष्करी इतिहासाचा अभ्यास करावा, गतकालीं वैभवाचे गिरिशिखरावर असलेलें आपलें राष्ट्र हल्लींच्या पारतंत्र्य–गर्तेत कोणत्या कारण–परंपरेनें आलें याचा नीट छडा लावावा, सर्व शास्त्रीय सामुग्रीच्या सहाय्यानें ज्या त्यांनीं आपलें वैभव हरण केलें त्यांच्या विशेष लायकीचें व वर्चस्वाचें स्वच्छ पृथक्करण करतां यावें आणि राजकारणांतील यश कोणत्या सद्‌गुण–संग्रहावर अवलंबून आहे याचा विचार करावा, अशी माझी सर्व बांधवांना नम्र विनंति आहे. बुद्धिगत बहुतेक सर्व शाखांमधून आमचे शास्त्रज्ञ, आमचे गणितज्ञ आतां चमकूं लागले आहेत, त्यांच्यामध्यें आमच्या देशांतील जगविख्यात् सेनापतींची भर पडावी असें माझ्या शिपाई–बाण्याच्या अंतःकरणाला वाटतें; आणि अशा भावी शिकंदरांना स्फूर्ती मिळावी म्हणून मी माझ्या महाराष्ट्राच्या नेपोलिअनचें यशोगान मोठ्या प्रेमानें केलें आहे, तें वाचकांनीं मान्य करून घ्यावें व आपल्या तरुणांना अशी स्फूर्ती मिळावी म्हणून लष्करी शिक्षण विश्वविद्यालयांतून मिळावें म्हणून झटून खटपट करावी.

यापुढें या पुस्तकाबद्दल व स्वतः एक दोन गोष्टी सांगून तें मी वाचकवर्गाच्या स्वभाव–भेदाप्रमाणें प्रेमळ किंवा कठोर विचिकित्सेकरितां त्यांच्या हवालीं करणार आहें. वाचकांनीं शास्त्रीय बुद्धीचा अवलंब करून दिसतील त्या चुका मोकळेपणानें पुढें मांडल्यास त्याच्या योगानें माझा फायदा करून घेण्यास मला अर्थात् आनंद च वाटेल. माझ्या पुस्तकाचा विषय आजपर्यंत अनेक विद्वानांनीं समाजाच्या पुढें मांडलेला आहे, त्याची मला जाणीव असून त्या सर्व वाङ्मयाचें सेवन मी आदरपूर्वक केलें आहे; आणि त्यांनीं केलेल्या परिश्रमाचा आस्वाद घेऊन च मला हें पुस्तक लिहिण्याची स्फूर्ती झाली हें मी आभारपूर्वक येथें नमूद करून ठेवतों. पुरावा तो च, आधार ते च, असें असून हि ते आधार उपयोगांत आणण्याची भूमिका आणि प्रवृत्ति भिन्न असल्यामुळें बरे च वेळां परिपाक भिन्न होण्याचा संभव लक्ष्यांत घेऊन टीकाकारांनीं टीका केल्यास तिचा विचार करणें सोईचें जाईल असें नम्रपणें

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

सुचवून ठेवितों. गोष्टींचा अर्थ लावणें, आणि त्या सुस्पष्ट करणें हें महत्त्वाचें काम सुसंगत इतिहास लिहिणाऱ्याला करावें लागतें. माझा विचार मीं सर्वत्र सर्वज्ञात लष्करी तत्त्वानुसार करून माझ्या ज्ञानाप्रमाणें प्रत्यक्ष भूमीचें निरीक्षण करून हा इतिहास लिहिला आहे. क्वचित् ठिकाणीं कांहीं दिवसांचा किंवा राजकारणांचा व युद्ध-शास्त्राचा फरक पडत असला तर तसा फरक म्हणजे अगदीं अक्षम्य अशी कांहींची समजूत झाल्यास संशोधनामध्यें पर-मताची क्षिती च बाळगण्याचें कारण नाहीं असा एकादा विचित्र सिद्धांत प्रस्थापित होऊं पाहील. वरे च ठिकाणीं माझ्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ मीं विपुल संदर्भ दाखविले आहेत. अगदीं अलीकडे प्रसिद्ध झालेल्या आणि प्रथम दोन फर्में छापून गेल्यावर माझे हातीं आलेल्या शिवभारतांतील उल्लेखांनीं हि माझे सिद्धांत समर्थित च आहेत असें शोधक वाचकांचे नजरेस येईल.

जुन्या विषयाचें नव्या तऱ्हेनें प्रतिपादन करण्यामध्यें जो एक धोका असतो त्याची मला परिपूर्ण रीतीनें जाणीव आहे. सर्वांना परिचित असलेल्या जुन्या कल्पनांना सर्वत्र धोका बसला नाहीं तथापि सर्व च उठाव नवीन दृष्टीनें उभारलेला एकदां नजरेंत भरेपर्यंत, त्याबद्दल सर्वांचे मनांत थोड्याशा आपलेपणाच्या अभावाची, अपरिचयाच्या संशयाची छटा कदाचित् आल्या-शिवाय राहणार नाहीं. ‘अगदीं नवीन च कोणीं तरी उद्योग करितो म्हणून त्याला हाणून पाडूं या’ अशी अनुदारपणाची कल्पना कोणा हि प्रामाणिक वाङ्मयभक्ताचे अंतःकरणांत असेल असें कोणी मला सुचविलें तरी मी तें खरें मानण्यास तयार नाहीं. तथापि नित्याच्या परिचयाच्या स्नेह्याप्रमाणें माझ्या पुस्तकाशीं मोकळेपणानें सर्व च अधिकारी संशोधक एकदम सलगी करतील अशी माझी अपेक्षा हि नाहीं. परंतु कालांतरानें सदर पुस्तकाचा विषय जनतेच्या आदराला पात्र व्हावा अशी आणि एवढी च महत्त्वाकांक्षा धरून मीं प्रसिद्ध संशोधकांच्या कडून या पुस्तकाचें सहानुभूतीनें परीक्षण

करून घेण्याची इच्छा करितों; असें स्पष्ट सांगण्यानें मजबद्दल कोणत्या हि गैरसमजाला स्थान मिळूं नये अशी अपेक्षा आहे.

मात्र विद्वान् व चिकित्सक संशोधकांचे हातीं सदर पुस्तक देतांना, मला एक प्रकारचा विशेष आत्मविश्वास वाटतो, ही गोष्ट अवश्य नमूद करण्यासारखी आहे. मनाला आत्मविश्वास वाटण्याचीं कारणें अनेक आहेत, तथापि ज्यामुळें होतकरू अभ्यासकांस विशेष हुरूप येईल अशीं एकदोन येथें सांगतों. प्रतापगडचें युद्ध हें पुस्तक तयार करतांना या विषयावर शक्य तोंवर पर्शियन, पोर्तुगीज, मराठी, इंग्रजी वगैरे सर्व उपलब्ध वाङ्मय वाचलें. युद्धाची हकीकत लिहिणाऱ्यांची दृष्टि व्यावहारिक असल्यामुळें त्या वर्णनांतील युद्धकलेच्या दृष्टीनें महत्त्वाच्या गोष्टींकडे बरेंच दुर्लक्ष केलेलें दिसतें. जिज्ञासू वाचकाला शिवाजी महाराजांच्या सैन्याच्या हालचालींबद्दल जितकी सविस्तर हकीकत वाचावयास मिळावी असें वाटत असतें तितकी अर्थात् कोणत्या हि एके ठिकाणीं मिळणें शक्य झालें नाहीं. मात्र अनेक वर्णनें वाचून, 'अफझलखानाचा विश्वासघातानें खून झाला' हें विधान सपशेल खोटें असल्याचें मनावर पक्कें बिंबलें. बखरींच्या वगैरे वर्णनावरून शिवाजीमहाराज व अफझलखान यांच्या पुस्तकांत वर्णिल्याप्रमाणें निरनिराळ्या चार ठिकाणीं लढाया झाल्या असें समजून आलें आणि बखरींतील वगैरे तुटपुंज्या आधारांच्या सहाय्यानें मीं त्या चकमकींनीं बनलेल्या संपूर्ण सूक्ष्म युद्धाची अथपासून इतिपर्यंत युद्धशास्त्राच्या अनुरोधानें जुळणी करण्याचें ठरविलें. युद्धभूमीचें सूक्ष्म निरीक्षण करून आधुनिक युद्धशास्त्राच्या नियमांप्रमाणें, खुद्द त्या स्थानाची शक्यता वगैरे निश्चित करून मीं केलेल्या विचाराप्रमाणें युद्धापूर्वी स्वराष्ट्रांतील व परराष्ट्रांतील राजकारण, त्याचा परिणाम व विचार, युद्धा पैकीं शिवाजी महाराज आणि अफझलखान या उभयतांचें सैन्य, त्यांची संख्या, परस्परांच्या सैन्यांची बचावा करितां व चढाई करितां केलेली रचना, त्यांना दिलेले हुकूम, प्रत्येक सैन्याच्या तुकडीच्या हालचाली आणि त्यांच्या सर्व गती, हल्ले, वगैरेंचा परिणाम या सर्व

गोष्टींची स्थळ व काळ यांच्या अनुरोधानें मी संगति जुळविली. मूळ वर्णनांतून अगदीं ढोबळ गोष्टी म्हणजे कित्येक सरदारांचीं नावें आणि त्यांनीं फक्त हल्ले केले इत्यादि आहेत. त्यांत मी पुष्कळ तपशीलाची माझ्या कल्पनेप्रमाणें युद्धशास्त्राच्या त्रिकालाबाधित अशा तत्त्वानुसार भर घालीत गेलों, प्रत्यक्ष ठिकाणांच्या माहिती वरून कोणाचें सैन्य कोठें ठेविलें असावें ह्या जागा निश्चित केल्या (पृ. १९१ ). सेनापतींचे हाताखालील सैन्याचा अंदाज केला. सैन्य पायदळ होतें कीं घोडेस्वारांचें असेल या बद्दल तारतम्यानें निर्णय दिला ( पृ. २३७ ) आणि युद्धाला त्या वेळेच्या परिस्थित्यनुरूप लागलेल्या काळाचें हि गणित केलें (पृ. २२१, २३७). या माझ्या तर्कांना ठिकठिकाणीं भरपूर कारणें देण्याची काळजी घेतली आहे, त्यावरून त्यांची यथार्थता लक्ष्यांत येईल. हे सर्व तर्क युद्धशास्त्रावर उभारलेले आहेत, आणि शास्त्र म्हणजे सामान्य तर्कांचे विरुद्ध नसल्यामुळें पुढें मांडलेल्या प्रमाणांचे अनुसार त्यांचे युक्तायुक्ततेबद्दल सामान्य वाचकांचें हि समाधान होईल.

या च तर्कांना बऱ्या च अंशीं विश्वसनीय समजल्या जाणाऱ्या एकाद्या साधनाचें पाठबळ मिळाल्यास ज्या शास्त्राच्या सहाय्यानें असे निष्कर्ष काढिले असतात या शास्त्राबद्दल आदर वाटणें साहजिक आहे. माझे निष्कर्ष अगदीं नुकत्या प्रसिद्ध झालेल्या शिवभारतानें मान्य केल्यासारखे दिसतात, हें जागोजाग शिवभारतांतील दिलेल्या संदर्भावरून लक्ष्यांत येईल, पण शिवभारतांतील संदर्भ व माझे निष्कर्ष यांचें महत्त्व सदर ग्रंथांत भिन्न भिन्न आहे हें वाचकांनीं लक्षांत ठेवण्याची मेहरबानी करावी. शिव-भारतेतर ग्रंथांतील उल्लेखांच्या जुळणीनें च सदर वृत्तांत तयार केला आहे, म्हणजे हें पुस्तक तयार होण्यापूर्वीच इतर उल्लेखांच्या छाननी करून त्यांचा ह्या ग्रंथलेखनाचे कामीं उपयोग केला आहे हें उघड आहे. हें पुस्तक लिहून आज जवळ जवळ आठ वर्षें झालीं. हें पुस्तक छापखान्याकडे देऊन एक दोन फर्मे छापून झाल्यावर शिवभारत माझे हातीं आलें. त्या-

नंतर तें वाचून पाहतां, समकालीन म्हणून नांवाजलेल्या या पुस्तकांत तर्कानें म्हणून मी काढलेल्या बऱ्या च गोष्टींना विरुद्ध असा पुरावा बहुधां उपलब्ध झाला नाहीं एवढें च नव्हे तर बहुतेक गोष्टींना मोठ्या अचानक तऱ्हेनें दुजोरा च मिळतो. माझ्या पुस्तकांतील प्रकरणें ६ व ७ हीं युद्धांतील महत्त्वाच्या हालचालींचीं वर्णनें देतात. शिवभारतांतील अध्याय २२ व २३ हे हि या च वर्णनांनीं भरलेले आहेत. या दोहोंची तुलना केली म्हणजे वरील विधानाचें प्रत्यंतर येईल.

माझ्या पुस्तकांतील खालील विधानें कारणें देऊन सिद्ध करण्याचा प्रयत्न केला असल्यामुळें तीं तर्कावर बसविलीं आहेत हें सहज च ध्यानांत येईलः—

(१) महाराजांचें मोरोपंत पिंगळ्याच्या हाताखालील वगैरे सन्य पायदळ होतें (पृ. २२७–२८; २३५; शि. भा. अ. २२; ३२–३३).

(२) नेताजी पालकराच्या हाताखालील सामान्य राखीव सैन्य घोडदळ होतें ( पृ. २५०; शि. भा. १५१–१५४; २३–७).

(३) शिवाजी महाराजांच्या तोफा कामाला आल्या नाहींत (पृ. १७४; शि. भा.त याचे उलट उल्लेख नाहींत).

(४) खानाच्या तोफांचा हि हातघाईच्या लढाईंत विशेष उपयोग झाला नाहीं. ( पृ. २४२–४३; शि. भा.त याचे उलट उल्लेख नाहींत).

(५) कोयनापार येथील खानाच्या सैन्यावर मोरोपंत पिंगळे वगैरेंच्या सैन्यानें अचानक हल्ला करून (surprise attack) खानाच्या सैन्याला नामोहरम केलें ( पृ. २३६–२३९; शि. भा. अ. २२–४०–४४ ).

(६) नेताजी पालकर वायव्येच्या बाजूला घोडदळासह होता. त्यानें एकदम वांईच्या मुख्य सैन्यावर हल्ला केला ( पृ. १५१ ते १५४; शि. भा. २३–२२–२३ ).

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा

(७) वरील प्रकारचे युद्धाच्या यशस्वितेचे दृष्टीनें अचानक हल्ले करण्यास संधिप्रकाशाची किंवा रात्री नंतर थोडक्या च वेळांत पडणाऱ्या अंधाराची मदत होते, यास्तव युद्धाची वेळ सायंकाळची असली पाहिजे. ( पृ. २००–२०१; शि. भा. अ. २३–२८; तिसरे प्रहरापासून पुढील काळ ध्वनित केला आहे ).

यांतील तर्कपद्धतीचा अवलंब अर्थात् शिवभारतानें केलेला नाहीं. त्यामध्यें फक्त वस्तुस्थितीचा उल्लेख समकालीन ग्रंथकर्त्यानें केला आहे. पण त्यांत कवीच्या भराऱ्या हि जरी थोड्या फार आहेत तरी त्यांचा एकंदरींत बऱ्या च गोष्टींवर चांगला प्रकाश पडण्यास उपयोग होतो, ह्यांत शंका नाहीं. प्रत्येक विधानाच्या पुढें ह्या पुस्तकांतील पृष्ठें व समान मजकुराचा शिवभारतांतिल संदर्भ दर्शविला आहे. शास्त्रीय तर्कपद्धतीनें युद्धशास्त्रांतील प्रमेयें काढतां येतात आणि तीं महत्त्वाच्या कागद–आधारांवरून खरीं ठरतात ही गोष्ट भावी अभ्यासकांना खरोखर उत्तेजन देईल. उशीरां कां होईना परंतु शिवभारत हातीं आल्यावर माझे निष्कर्ष असे विश्वसनीय ठरलेले पाहून मला किती तरी समाधान झालें आणि माझा आत्मविश्वास वाढला, आणि इतरांना ह्या विषयाचें महत्त्व सांगण्यास उमेद आली.

माझे या पुस्तकांत संकलित केलेले सर्व सिद्धांत बखरी वगैरे वरून च काढलेले आहेत. आणि ते च शिवभारतासारख्या समकालीन ग्रंथावरून विश्वसनीय ठरत आहेत यावरून एक धडा घेण्यासारखा दिसतो. केवळ त्यांतील कांहीं मजकुराला योग्य दुजोरा मिळत नाहीं एवढ्याकरितां म्हणून त्या बखरी सर्वस्वीं टाकाऊ ठरवूं नयेत. आज नाहीं उद्यां दुसऱ्या एकाद्या विश्वसनीय हकीकतीवरून त्यांतलि आज निराधार वाटणारी हकीकत विश्वसनीय ठरेल. हें माझें विधान कित्येकांना आक्षेपार्ह वाटेल, हें मी जाणून आहें. परंतु निर्भेळ सत्यान्वेषाच्या मृगजलाच्या मागें लागून आणि सत्यदर्शनाची विशेष घाई करतांना कित्येक वेळां आज कांहीं लोकांना असत्य भासणाऱ्या

आणि म्हणून त्याज्य वाटणाऱ्या, गोष्टींबरोबर च राष्ट्रीय जीवनाला आवश्यक आणि राष्ट्रांतील बाणेदार वृत्ति जागृत करणाऱ्या अनेक अमोलिक चिजा आपण कायमचे गमावून बसूं अशी मला भीति वाटते. म्हणून हा इशारा देत आहें.

ह्या पुस्तकामध्यें युद्धकलाविषयक विवेचन करतांना बरें च आधार इंग्रजी पुस्तकांतून घ्यावे लागले आहेत. अर्थात् हल्लींच्या मराठीमध्यें या सर्व इंग्रजींतील कल्पना सुटसुटीत स्वरूपांत वापरण्याजोगा मराठी शब्दांचा भरणा नाहीं. निदान पूर्वीच्या युद्धकलापूर्ण युगाची आणि आमची इतकी फारखत झाली आहे कीं पूर्वीचे अस्तित्वांत असलेले बरेचसे शब्द, त्यांचा उपयोग करण्याचा प्रसंग निघून गेल्यामुळें, आतां विस्मृतींत गेले आहेत. अशा परिस्थितींत कांहीं आढळले त्या शब्दांचा पूर्वीच्या च स्वरूपांत उपयोग करून घेतला आहे. बरे च ठिकाणीं इंग्रजी कल्पना भाषांतरित करून मराठी शब्द बनविले आहेत. अशा सर्व शब्दांचा आधुनिक युद्ध-शास्त्राशीं संबंध दर्शविण्याकरितां त्यांच्यापुढें कंसांत इंग्रजी शब्द आणि शब्दसंग्रह दिले आहेत. बहुतेक सर्व ठिकाणीं या योजनेशिवाय विस्तृत अर्थ-संदर्भानुरोधानें देण्याची खबरदारी घेतली आहे. त्या खेरीज पुस्तकाचे अखेरीस सर्व पारिभाषिक शब्दांचा कोश इंग्रजी-मराठी असा दिला आहे. तात्पर्य, लष्करी परिभाषा सर्वांच्या अंगवळणीं पडावी, तिजमुळें कोणाला हि पुस्तक वाचतांना बहुधां ठेंचाळावें लागूं नये अशी शक्य ती काळजी घेण्याचा प्रयत्न केला आहे.

मजजवळ येथें ( पुणें येथें ) युद्धशास्त्रांचे आधारभूत ग्रंथ नसल्यानें व तयार केलेले कागद वेळेवर नसल्यानें युद्धशास्त्राच्या आधारभूत ग्रंथांतलि तत्त्वें व आधार ह्यांत देतां आले नाहींत तरी पुढच्या आवृत्तीच्या वेळेस ही उणीव भरून काढण्याचा विचार आहे.

वाचकांना सोईचें जावें म्हणून अशा च सारखी एक महत्त्वाची सुधारणा केली आहे, ती परिच्छेदवार सूचक मथळे देऊन विषयाची अत्यंत

फोड करणें ही होय. विषयाचें नाविन्य लक्षांत घेऊन वाचणाऱ्यांपैकीं कोणत्या हि दर्जाच्या वाचकाला समजण्यास अडचण पडूं नये म्हणून अनेक वेळां पुनरावृत्ति करून हि त्या त्या वेळीं, त्या त्या ठिकाणीं संदर्भानें आली ती गोष्ट पुनः पुनः निरनिराळ्या संबंधांत, कित्येक वेळां त्या च शब्दांत पुनः सांगितली आहे. केवळ शब्दरचनेंत लक्ष्य घालणाऱ्या मंडळींत या दोषाची पुनः पुनरावृत्ति म्हणून विशेष हजेरी घेतली जाईल. परंतु माझे कित्येक होतकरू व्यवसायमित्र तो एक विषयस्पष्टीकरणाचे दृष्टीनें गुण हि समजतील. तथापि पुनरावृत्तींचा दोषारोप करणाऱ्या मंडळीं करितां येथें एवढें सांगून ठेविणें जरूर आहे कीं सर्व वृत्तांतांत एक च गोष्ट पुनः पुनः निरनिराळ्या संबंधांत निरनिराळ्या तऱ्हेनें विचारांत घेऊन पुढें मांडावी लागते; त्या त्या वेळीं संक्षेप करण्याचे ऐवजीं मीं तेथें हि ती पुनः विस्तृत स्वरूपांत च लिहिली आहे. कारण युद्धशास्त्राप्रमाणें युद्धाचा इतिहास आपणांस थोडा नवीन च आहे. म्हणून त्या इतिहासांतील हे विषय पुनः पुनः मांडणें भाग आहे.

याशिवाय इतर अनेक गोष्टी अनेकांना दोषास्पद वाटतील. मला ज्या गोष्टींबद्दल जाणीव अहे त्या गोष्टींचा मीं उल्लेख केला आहे. सदर पुस्तकाची सामुग्री बरे च दिवसपर्यंत टिपणांच्या स्वरूपांत मजजवळ पडून होती. परंतु द्रव्याच्या अभावीं आजपर्यंत कामाची सुरवात व पूर्तता झाली नव्हती. सुमारें महिन्यापूर्वीं एकदम कामास सुरवात झाली, तों छापखान्याकरितां हस्तलिखित प्रत तयार करण्यापासून तों तहत नकाशे, चित्रें जमविणें वगैरे इतर सर्व च गोष्टींची गर्दी उसळून, छापण्याच्या कामामध्यें प्रत्येक ग्रंथकर्ता व प्रकाशक याची अखंड सहचारिणी म्हणून प्रसिद्ध असलेली घाई आमचे हि पाठीस लागली. आणि आज हें पुस्तक प्रिय वाचकांचे हातीं देतांना तिनें त्यामध्यें कांहीं गोंधळ माजविलेला दिसल्यास वाचकांनीं थेट तिजकडे पृच्छा करावी; आम्हीं शक्य तों पर्यंत स्वतःच्या जीवाचे हाल करून तिच्या दृश्य परिणामांपासून वाचकांना वांचववायाचा प्रयत्न केला च आहे !

हें पुस्तक ग्रंथकर्त्यांच्या श्रमांचें फल असलें तथापि तें ह्या स्वरूपांत प्रसिद्ध होण्याचें सर्व श्रेय सध्याची देशस्थिती व ग्रंथकर्त्यांचे अनेक स्नेही आणि परिचित यांजकडे च आहे हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. स्वतःचे समाधाना करितां गेल्या अठरा, एकोणीस वर्षांपासून या संशोधनाचें काम चालू झालें. त्यामध्यें अनेकांची मदत मला अनेक वेळां झाली आहे. या कामाच्या निमित्तानें ज्या अनेक लोकांशीं परिचय झाला किंवा नंतर ज्यांना या कामाची कांहीं थोडी बहुत माहिती झाली त्यांपैकीं पुष्कळांनीं माझे पाठीस लागून मला हें पुस्तक छापवून प्रसिद्ध करण्याचा लकडा एक सारखा लावला नसता तर वाचकांना त्यांच्या आवडी नावडीप्रमाणें हें पुस्तक वाचावयास मिळालें हि नसतें. पुस्तकाच्या संशोधनापासून तें प्रसिद्ध होई पर्यंतच्या सर्व वेळीं अनेकांची सहानुभूति व हातभार यांचा मला लाभ झाला आहे. ज्या नामनिर्देश करूं न देणाऱ्या कित्येक मित्रांनीं आजपर्यंत ह्या माझ्या खर्चाच्या संशोधनाच्या कामीं, हिंदीकरण, स्कीन कमिटी वगैरे सारख्या राष्ट्रीय प्रश्नांच्या व हिंदुस्थानच्या लष्करी प्रश्ना संबंधींच्या सर्व कार्यांत मला द्रव्यानें सहाय्य केलें त्यांचा मी फार आभारी आहें. आतां हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे हें त्यांच्या सर्वांच्या पुण्याईचें फल आहे असें समजून या पुस्तका संबंधीं कार्यकर्तृत्वाची खरी किल्ली ज्या माझ्या सुहृदांच्या हातीं आहे त्यांपैकीं कांहींचा च अल्पपरिचय करून देण्याचें योजिलें आहे.

" न मातुः परदैवतम् " ! निस्पृह प्रेमाचें परमस्थान आणि वात्सल्याचें आगर अशी माझी माता माझ्या लष्करी बाण्याची " मूर्तिमंत प्रेरणा च होय " ही जाणीव मला सर्व संकटांतून आणि अडचणींतून बचावून नेत असते. जिनें अनुपम अशा शिक्षणानें, राष्ट्रकार्याच्या दंगलींत देशाकरितां व धर्माकरितां वाहिलेला सैनिक, असा माझा गौरवानें उल्लेख करून मला स्फूर्तीचा सैनिक बनविलें आणि मजसारख्या नाकर्त्यास प्रेमानें व शिक्षणानें कर्ता बनविलें, त्या माझ्या मातेच्या त्यागाची आणि उदार आत्मयज्ञाची

शिकवण ही माझ्या सर्व कर्तृत्वाची गुरुकिल्ली आहे. माझ्या कार्यांतील अनेक आपत्ति सहन करण्यास मला अहोरात्र उत्तेजन जर मिळत असेल तर तें निरतिशय प्रेमाचें स्थान जी माझी माता तिच्या उत्तेजनाचें च फल आहे. असें नमूद करण्यानें हि वस्तुस्थितीचें योग्य वर्णन करणें शब्दाच्या सामर्थ्या पलीकडे आहे.

माझ्या आवडी प्रमाणें, सैनिकाचा पेशा स्वीकारण्यास माझ्या जातीमुळें आणि त्यांत हि एका विशेष पोटभेदामुळें, इंग्रजी राज्यांत पुष्कळ च अडथळे आले. परंतु ग्वाल्हेर सैन्यांत प्रवेश मिळाला. तेथें ह्या विषयाचा अभ्यास व संशोधन या कार्यास मी लागलों व प्रत्येक वर्षी अनेक वेळां रजा, सुट्टी घेऊन वेळोवेळीं निरनिराळ्या युद्धक्षेत्रांचा व रणक्षेत्रांचा अभ्यास करूं लागलों.

कै. श्रीमंत सरकार अलिजाबहाद्दर माधवराव शिंदे यांच्या स्वतःच्या अप्रतिम अशा शिपाइगिरी बाण्यानें मला ह्या विषयाचा अभ्यास करण्यास जास्त च प्रोत्साहन मिळालें. कै. महाराज हे शिपाईगिरीचे उत्तम आदर्श असून त्यांच्या लष्करी कर्तबगारीवरून ते श्रीशिवाजी महाराजांनंतर त्यांचे पूर्वज महादजी शिंदे किंवा थोरले बाजीराव साहेब यांच्या रूपानें अवतरले कीं काय असें वाटत असे !

ग्वाल्हेर दरबारांतील सेनापति राजवाडे व कांहीं मोठे अधिकारी यांनीं माझ्या कामामध्यें वेळोवेळीं लक्ष्य घातलें याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

लष्करीइतिहाससंशोधनाचें स्वरूप, त्यांतील कष्ट वगैरे गोष्टी केवळ कल्पनागम्य आहेत, परंतु खर्चाचा आंकडा सहज छाती दडपून टाकणारा असा आहे. अलीकडे समाधानकारक पुस्तकप्रकाशनाचें काम फार च खर्चाचें झालें आहे. विशेषतः खुद्द युद्धक्षेत्राच्या पहाणीचा खर्च, नकाशे, चित्रें अशासारखीं लोकशिक्षणाचीं महत्त्वाचीं साधनें संपादन करून लोकांचे आटोक्यांत स्वल्प किंमतींत आणून ठेवणें हा बहुधा आंतबट्याचा व्यापार असतो. कळकळीच्या संशोधकानें जिवाचा किती हि खेळखंडोबा केला तरी

द्रव्याचे अभावीं त्याचें कार्य देशाच्या हातीं पडणें अशक्य होतें. माझें पुस्तक कदाचित् बुकशेल्फवर पडून राहिलें असतें; परंतु ग्वाल्हेर दरबारचे अमलाखालील गॅरंटिड स्टेट बागली, येथील श्रमिंत **ठाकूरसाहेब सज्जनसिंहजी** यांनीं मोठ्या उदारपणें व आपल्या क्षत्रियवृत्तीला साजेसें, आपले प्रभु कै. माधवराव शिंदे यांच्या स्मरणार्थ त्यांच्या अत्यंत आवडीचें व अगदीं जिव्हाळ्याचें असें जें कार्य—म्हणजे "अखिल भारतीय श्रीशिवछत्रपतीस्मारक" जें पुणें येथें सुरळीतपणें घडवून आणण्यासाठीं महाराज नेहमीं अस्वस्थ असत—त्या कार्याला परिपोषक व योग्य, अशा त्या पुण्यश्लोक श्रीशिवरायाच्या चरित्रांतील पहिल्या युद्धाचा लष्करी इतिहास प्रसिद्ध करण्याला प्रोत्साहन व आर्थिक मदत देऊन, एकाअर्थीं श्री. कै. महाराजांचें स्मारक, त्यांच्या जयन्तीचे दिवशीं अगदीं यथायोग्य असें करण्याचें श्रेय घेण्याचे हेतूनें च, हें पुस्तक प्रसिद्ध होऊन आपलें व आपल्या संस्थानचें नांव या स्मारकाशीं निगडित होण्याच्या सदिच्छेनें, माझी अडचण बरे च अंशानें दूर करण्यास मदत केली. अशा रीतीनें एका शिपाईबाण्याच्या सरदारानें आपल्या सैनिकप्रिय व लष्करीबाण्याच्या प्रभूचें स्मारक महाराष्ट्राच्या च नव्हे, परंतु सर्व जगतांतील एका महत्तम सेनापतीच्या पराक्रमाचें वर्णन—म्हणजे च शिवरायानें विजापूरशीं केलेलें प्रथम युद्ध—एका मजसारख्या साध्या सैनिकाकडून करवून घेऊन, तें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास, क्षत्रियाच्या अनुपम अशा उत्साहानें व उदारपणानें मदत केली, त्या करितां च हें पुस्तक प्रसिद्ध होण्याचें सर्व श्रेय श्री. ठाकूरसाहेब सज्जनसिंहजी ह्यांना च आहे. ह्याबद्दल मी त्यांचे किती हि आभार मानले तरी ते कमी च आहेत. ठाकूरसाहेबांच्या मदतीच्या अभावीं हें पुस्तक वाचावयास मिळालें नसतें म्हणून वाचकवर्ग हि त्यांचा आभारी होईल यांत शंका नाहीं असें वाटतें!

प्रतापगडासारख्या मोहिमांचें युद्धशास्त्रदृष्ट्या परीक्षण करून पुस्तकप्रकाशनाच्या कामीं द्रव्यसाहाय्य वगैरे देण्याइतकें लक्ष अद्यापि दुसऱ्या कोणा

संस्थानिकांचें वळलें नाहीं, हें लक्ष्यांत घेतलें असतां बागलीचे ठाकूरसाहेबांच्या उपकाराचें महत्त्व समजून अंतःकरण कृतज्ञतेनें भरून येतें. परमेश्वरकृपेनें मजपाशीं अद्यापि अनेक मोहिमांचा अभ्यास होऊन टिपणें तयार आहेत. तेव्हां संस्थानिकांनीं ठाकूरसाहेबांचें अनुकरण केल्यास महाराष्ट्राच्या गळ्यांत अनेक पुस्तकरत्नांचा हार अल्पकाळांत च पडेल !

श्रीमंत सरदार खासेराव पवार ( देवास ) यांनीं मोठ्या कळकळीनें वारंवार उत्तेजन दिलें. लष्करी इतिहासा सारख्या बाबतींत श्रीमंत खासेराव साहेबां प्रमाणें च इतरांनीं लक्ष्य घातल्या शिवाय इष्ट अशा ह्या लष्करी इतिहासवाङ्मयाची वाढ झपाट्यानें होणार नाहीं. त्यांना शिवाजीमहाराजांच्या युद्धकौशल्या बद्दल वाटणारा आदर व अभिमान, बंधुभावानें त्यांनीं वारंवार दिलेलें उत्तेजन, शिवरायांच्या ह्या व अशा दुसऱ्या लढाया छापून केव्हां प्रसिद्ध होतील या बद्दलची त्यांची तळमळ, व त्यांनीं केलेली खटपट, ह्या मुळें च हें प्रथमयुध्द इतक्या लवकर छापून प्रसिध्द होऊं शकत आहे. नाहीं तर कदाचित् हें हस्तलिखित न जाणों किती वर्षें तशा च स्थितींत पडलें असतें. म्हणून त्यांचा हि मी अत्यंत आभारी आहें.

माझे व्यासंगी स्नेही इतिहाससंशोधक व महाराष्ट्रीय ज्ञानकोशाचे उप-संपादक रा. आबासाहेब चांदोरकर यांना माझ्या कच्च्या हस्तलिखिताला पक्क्या प्रतीचें रूप देण्यामध्यें आणि एकंदर पुस्तक छापत असतांना तज्ज्ञ इतिहासज्ञ म्हणून रात्रंदिवस पडलेला त्रास, उभयतांचे हि स्मरणांतून बरे च दिवस जाण्यासारखा नाहीं. त्याचे स्मरणांमध्यें जन्म पावणारा सहानुभूतिचा बंधुभाव निरंतर टिकेल यांत संशय नाहीं, तेव्हां माझ्या या मित्राचे मी किती हि आभार मानले तरी ते पुरे होणार नाहींत. कारण पुस्तक छापण्यास सुरवात होऊन फक्त १८ दिवस झाले व तेवढ्यांत हें पुस्तक बाहेर पडत आहे, हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे त्यांच्या अहोरात्र परिश्रमाशिवाय हें पुस्तक इतक्या लवकर प्रसिद्ध होणें कसें अशक्य होतें हें सहज वाचकांच्या ध्यानांत येईल.

पुण्याचे भारत इतिहास–संशोधक मंडळाचे कार्यकर्ते चिटणीस प्रो. द. वा. पोतदार यांचें या ग्रंथावरील प्रेम आरंभापासून च व्यक्त होत आलें आहे. सदर पुस्तकांतील श्री. छत्रपति शिवाजी महाराजांचें सिंहाच्या शिकारीचें चित्र प्रथम या पुस्तकांत छापण्यास दिल्याबद्दल भा. इ. सं. मंडळाचे व अवांतर बरी च मदत केल्याबद्दल पोतदारांचे आभार मानतों. त्या च प्रमाणें दुय्यम चिटणीस श्री. सरदार आबासाहेब मुजुमदार व श्री. सरदार तात्यासाहेब मेहेंदळे, श्री. रा. चिं. वि. वैद्य व श्री. रा. गो. स. सरदेसाई, श्री. रा. दत्तोपंत आपटे, श्री. बेंद्रे वगैरे इतर सर्व इतिहासज्ञ मंडळींचा हि मी आभारी आहें.

या शिवाय ज्या ग्रंथकारांचा ह्या पुस्तकलेखना मध्यें उपयोग झाला आणि ज्यांपैकीं बहुतेकांचा उल्लेख टीपांतून केलेला आहे ते विद्वान् ग्रंथकार, विशेषतः प्रो. जदुनाथ सरकार, ज्यांच्या भारतेतिहासांतील संशोधनक्षेत्रांतील कामगिरी आज सर्वश्रुत आहे, त्यांचा हि उल्लेख आभारपूर्वक केला पाहिजे. प्रो. जदुनाथ सरकार यांचें लक्ष्य या विषयाकडे वेधल्या पासून इंग्रजी भाषेंत उत्तम ग्रंथ निर्माण झाल्यावर युनिव्हर्सिटींत सदर विषयाचा प्रवेश होण्याबद्दल ते सहानुभूतीनें बोलतात, एवढें च नव्हे तर मराठ्यांच्या इतिहासांत एकादें हि चांगलें पुस्तक झाल्या बरोबर विश्वविद्यालयामध्यें त्याचा समावेश करणें त्यांना शक्य वाटतें. या विचारी वृत्तीबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडे च आहेत.

या पुस्तकामध्यें प्रतापगडचें चित्र जोडलें आहे तें त्वरित करून दिल्याबद्दल येथील आर्किआलॉजिकल डिपार्टमेंटचे सुपरिंटेंडंट मि. चंद्र, पुस्तकांत घातलेल्या अनेक चित्रांचे व नकशांचे वगैरे ब्लॉक्स सुबक करून दिल्याबद्दल येथील फोटो झिंको ऑफिसचे अंमलदार, अफझलखानाचे चित्राकरितां कै. श्री. पारसनीस ( इतिहाससंग्रहकार ), आरंभापासून सहानुभूतीनें लक्ष्य घालणारे माझे असंख्य स्नेही, जीं कांहीं पुस्तकें मला सर्व्हंट्स् ऑफ इंडिया

सोसायटींतून मिळूं शकलीं त्याबद्दल सोसायटीचे चिटणीस, वारंवार भेटी देऊन विचार–विनियम करणारे मुंबई युनिव्हर्सिटीचे सिंडिकेट, सेनेट वगैरेंचे सभासद यांनीं आपआपल्या सूचना देऊन मला जी मदत केली त्या सर्वांचा या पुस्तकाच्या बाबतींत मी फार आभारी आहें.

हें पुस्तक हातीं पडल्यानंतर युनिव्हर्सिटींतील चालक मंडळींची या विषयाबद्दलची सहानुभूति पुष्कळ च वाढेल अशी आशा करण्यास जागा आहे. भावी मदत होईल तो काळ पुष्कळ च आभार मानण्यासारखा येईल व तो अत्यंत आनंदाचा होईल.

इतक्या थोड्या वेळांत पुस्तकाची सर्व छपाई इतकी सुबक करून दिली या अत्यंत स्तुत्य खटपटीबद्दल आणि मेहनतीबद्दल समर्थ–भारत छापखान्याचे व्यवस्थापक रा. सरदेसाई आणि रा. अतीतकर यांचा हि मी पुष्कळ च आभारी आहें.

मला रजा मिळेल न मिळेल व ग्वाल्हेराहून येऊन मला प्रकाशनाचें काम येथें राहून करतां येईल न येईल हें निश्चित नसल्यामुळें मी हें प्रकाशनाचें काम माझे मित्र श्री. आबासाहेब चांदोरकर व श्री. शंभुराव दातार ह्यांच्या हवालीं केलें होतें व तें त्या दोघांनीं मोठ्या उत्साहानें करण्याचें कबूल केलें. परंतु त्यांतूनच श्री. शंभुराव ह्यांना युद्धशास्त्रवाङ्मयप्रकाशक होण्याची सूचना पटल्यामुळें त्यांनीं हें काम मोठ्या आनंदानें व उत्साहानें करण्याचें कबूल केलें. आपल्या देशांत युद्धशास्त्राचें वाङ्मय हि आपल्या भाषेंत नाहीं, व तसे खास प्रकाशक हि नाहींत. इंग्लंडमध्यें जसे कित्येक मिलीटरी पब्लिशर्स आहेत, त्यांतल्या Gale Polden & Co. सारख्या पाशीं हजारों लष्करी पुस्तकांचा सांठा आहे, त्या प्रमाणें च आपल्या देशांत हि असे स्वतंत्र प्रकाशक होऊन अडचण असून हि, लष्करी बुद्धीच्या माणसांना रिघाव नसून हि, पुस्तकें कां निर्माण होऊं नयेत ? ती अडचण काढून टाकण्याची महत्त्वाकांक्षा माझे मित्र रा. शंभुराव ह्यांना आहे हें पाहून

अत्यंत आनंद होतो व अभिमान वाटतो. पुस्तकाच्या प्रकाशनाचें काम सर्वांगीण उत्तम व्हावें ह्या बद्दल त्यांनीं अहोरात्र मेहनत घेतली व एवढ्या थोड्या अवधींत पुस्तक छापवून घेतलें, ह्यांत च त्यांचा अमोघ उत्साह दिसून येतो. सर्वोत्कृष्ट नकाशांचे पब्लिशर म्हणून ते आज बरीं च वर्षे सर्वमान्य आहेत. सदर पुस्तकाची छपाई, बांधणी, आंतील नकाशे, चित्रें वगैरे बाबतींत ज्या ज्या सूचना उशीरानें हि मिळाल्या त्यांत कांहीं हि न्यून राहूं न देण्याच्या बाबतींत त्यांची महत्त्वाकांक्षा अत्यंत कौतुकास्पद आहे. या अगदीं नवीन विषयावरील पुस्तकप्रकाशनाचें काम करण्याचें माझ्या करितां त्यांनीं अंगावर घेतलें त्याबद्दल त्यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्यांतील नकाशे, चित्रें वगैरे सर्व कामें त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं व आपल्या च कलाकारांकडून करविलीं आहेत. तेव्हां त्यांचे व इतर त्यांच्या स्टाफचीं सर्व माणसें ह्यांचा हि मी फार आभारी आहें.

कित्येक स्नेही आपलें नांव प्रसिध्द करूं इच्छित नाहींत त्या मंडळींचे हि कृतज्ञतापूर्वक आभार मानिले पाहिजेत. माझें पुस्तक छापण्याचें काम चालूं असतां कॉलेजांतील व शाळांतील अनेक उत्साही व जोमदार तरुणांनीं निष्ठेनें मला मदत केली. आज अठरा वर्षे डोंगरांतून, जंगलांतून व इतर ठिकाणीं फिरत असतांना ज्या मावळ्यांनीं स्थानिक माहिती पुरवून व इतर बाजूंनीं शिवरायाच्या युद्धेतिहासाच्या संशोधन–कामांत मला मदत केली आणि ज्यांना हे आभार वाचण्या इतकें हि ज्ञान नाहीं त्या माझ्या प्रेमळ सोबत्यांचें मला या प्रसंगीं स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं. हा विषय प्रत्येक हिंदवासी–याच्या जिव्हाळ्याचा व जिवाभावाचा असल्यामुळें पुष्कळ लोकांचा उत्साह पाहून च मला जी मदत व उत्तेजन मिळालें त्या सर्वांचा मी आभारी आहें. अखेरीस या सर्वांचें आणि सर्व काम यशस्वी रीतीनें पार पाडल्या बद्दल त्या जगन्नियंत्याचें स्मरण करून ही प्रस्तावना मीं पुरी करितों.

पुणें, १५-१०-२७.) ग. वा. मोडक.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

# अनुक्रमणिका.

——:o:——

**प्रकरण १ लें** **पान १–५८**

१. प्रतापगडचें सामान्य वर्णन; २. प्रतापगडचें युद्ध हें नांव देण्याचें कारण; ३. प्रतापगडचें युद्ध कीं अफझलखानाचा वध? ४. तत्कालिन राजकीय परिस्थिति व युद्धाचीं कारणें; ५. विजापूरदरबारचें युद्धमंडळ; ६. विजापुर सैन्याची कमरबंदी; ७. हांकारा किंवा लढाईचा पुकार; ८. खानाचें सैन्य; ९. खानानें नवीन उभारलेलें तीन हजार मावळी पायदळ; १०. शत्रु पक्षाकडील लोक भरती करून आपल्या फौजेची हिंमत व आत्मविश्वास वाढविणें आणि शत्रुपक्षाची हिंमत कमी करणें; ११. अफझलनें घातलेला पेंच व महाराजांची मुत्सद्देगिरी; १२. खंडोजी खोपडे सिलीमकर वगैरे इतर जमावांची मदत; १३. खानाचें वांई येथील एकंदर सैन्य; १४. तत्कालिन सैन्याचें सर्व साधारण शिक्षण व संघटना; १५. सैन्य विभाग; १६ पायदळ; १७ घोडदळ; १८. आदिलशाही सैन्यांतील हत्यारें व एकंदर सैन्य व्यवस्था; १९. पायदळाचीं हत्यारें; २०. घोडदळाचीं हत्यारें २१. तोफखाना; २२. कुऱ्हाडे—बेलदार; २३ शिस्त; २४. खानाच्या फौजेची हिंमत; २५. अपशकून व त्याचें बेहिंमतींत होणारें पर्यवसान; २६. दारूगोळा व छकडे; २७. खानाचा तीन वर्षांचा पुरवठा; २८. वांई येथील खानाचा बारुदखाना; २९. शांततेच्या वेळचीं धान्याचीं कोठारें; ३०. रसदमार्ग; ३१. दळणवळणाचे किंवा संदेश मार्ग;

३२. नजरबाज खातें; ३३. विजापुरी फौजेचा कूच; ३४. खानाच्या धार्मिक जुलमाचा परिणाम; ३५. खानानें रस्ता कां बदलला; ३६. रस्ता बदलण्याचीं कारणें; ३७ बातमी राखण्याचें महत्व; ३८. वांई येथील छावणी; ३९. वांई-अघाडीची कोठी; ४०. युद्धकौशल्याच्या दृष्टीनें वांई येथें सैन्याचें एकीकरण.

**प्रकरण २ रें.** **पान ५९–१००**

१. शिवाजी महाराज व युद्धाची पूर्व तयारी; २. शांततेच्या काळीं बातमी राखण्याचें महत्त्व; ३. खानाच्या लष्कराबद्दल महाराजांची बातमी; ४. बातमीचें महत्व; ५. बातमीखातें आणि सांपत्तिक जोड; ६. शहाजीराजांकडून महाराजांना मिळालेली बातमी; ७. युद्धतयारी; ८. महाराजांचें युद्धमंडळ; ९ महाराजांच्या सैन्याच्या कमरबंदीचे हुकूम; १०. सरहद्दीची टेहळी फौज; ११. सावंत व सुर्वे; १२. महाराजांची सैन्यसंख्या; १३. तोफखाना; १४. तोफखान्याचा तपशील; १५. महाराजांचा तोफखाना; १६. पायदळाच्या हत्यारांची माहिती; १७. घोडदळाच्या हत्यारांचा प्रसंग व उपयोग; १८. फौजेचीं इतर अंगें; १९. लष्करी शिक्षण; २०. लष्करी शिक्षणाची मुख्य रूपरेषा; २१. सैन्याची कमलजारी व संघटना; २२. महाराजांचें सैन्य; २३. महाराजांच्या सैन्याची हिंमत; २४. किल्ले व त्यांची व्यवस्था; २५. महाराजांच्या दारुगोळ्याचा पुरवठा; २६. रणक्षेत्र व अघाडीच्या कोठीची निवड; २७. बचावाच्या अथवा चढावाच्या धोरणावर रणक्षेत्र व अघाडीची कोठी यांची निवड; २८. लष्करी धोरणाला अनुसरून एकीकरणाचे हुकूम; २९. दोस्त; ३०. तयारीचा अभाव व नाश.

**प्रकरण ३ रें.** **पान १०१–११४**

१. खानाचें एकंदर धोरण व उद्दिष्ट अथवा साध्य; २. चढावाचें धोरण; ३. खानाच्या चढाईच्या धोरणाचा पुरावा; ४. परिस्थितीचें अवलोकन; ५. खानाचा युद्धबेत किंवा आडाखा; ६. खानाच्या बेतांना अडथळे; ७. प्रदेशाची अपुरी माहिती; ८. सैन्याची घरकोठी; ९. उद्दिष्ट; १०. आडाख्यांत बदल व रणक्षेत्र; ११. खानाचें उद्दिष्ट व रणक्षेत्र; १२. कूच व पहिला उपक्रम; १३. खानाच्या फोजेची विभागणी; १४. युद्धाचा पुकारा; १५. वांई ते प्रतापगडचा मार्ग; १६. खानाचें मुख्य उद्दिष्ट.

**प्रकरण ४ थें.** **पान ११५–१५८**

१. बचावाच्या लढाईचें धोरण; २. संभवनीय रणक्षेत्र; ३. लढाई पूर्वीचें धोरण व परराष्ट्रीय राजकारण; ४. लढाईचें ठरविलेलें बचावाचें सामान्य धोरण; ५. सैन्याची विभागणी व नेमणूक ६. खानाच्या चढाईचीं कारणें; ७. गडावरील तोफा ८. दळणवळण; ९. भौगोलिक परिस्थिति व रणक्षेत्राची निवड; १०. युद्धाच्या निरनिराळ्या पद्धती व त्यांचें एकीकरण; ११. परिस्थितीमुळें रणक्षेत्र बदलण्याचा विचार; १२. पिछेहाटीचा मार्ग व रणक्षेत्र; १३. वस्तुस्थितीचें अवलोकन; १४. चढाई व बचावांतील पिछेहाट; १५. बेत किंवा आडाख्यावर होणारा वेळेचा व जागेचा परिणाम; १६. प्रतापगडची निवड कां केली; १७. महाराजांचे राजकारणांतील डांवपेंच; १८. हालचालींच्या क्षेत्रांचें स्वरूप व साधनें; १९. रणांगण; २०. रस्ते; २१. नद्यानाले; २२. पुरवठा व लोकसंख्या; २३. बचावाच्या

युद्धाची व छबिन्याची फौज; २४. छबिन्याच्या क्षेत्रांतील चौक्या; २५. ठरविलेल्या ठिकाणीं खानास येण्यास भाग पाडणें; २६. नेताजीची कामगिरी व त्याच्या सैन्याची जागा; २७. बहुतेक सर्व सामान्य राखीव सैन्य केवळ घोडदळाचें नसतें; २८. महाराजांचें नेताजीशीं दळणवळण; २९. बचावाच्या लढाईचीं तत्त्वें; ३०. रणक्षेत्रांत वावरण्याचे मार्ग; ३१. पहिला तडाखा.

**प्रकरण ५ वें.** १५९–१८९

१. खान राजकारण करतो; २. कृष्णाजी भास्कराची महाराजांशीं भेट; ३. महाराजांचे राजकीय धोरण; ४. पंताजी गोपिनाथ खानाकडे जातो; ५. भेटीचा निष्कर्ष; ६. राजकारण व मुत्सद्देगिरी यांचा अखंड धागा; ७. भेट ठरली; ८. भेटीच्या अटी; ९. भेटीसाठीं खान निघतो; १०. भेटीपूर्वी महाराजांची स्वतःची तयारी; ११. अचानक हल्ल्याला रोकण्याकरितां फौजेच्या जागजागच्या चोक्या; १२. बचावासाठीं केलेल्या योजना; १३. फौजेची विभागणी; १४. जिजाबाई; १५. परिस्थितीचें पूर्ण आकलन व जलद निकाल; १६. खान दगा देईल ही महाराजांची शंका; १७. भेटीचा दिवस; १८. महाराजांचा वैयक्तिक बचाव; १९. खानाचा लवाजमा; २०. खानाचा लवाजमा म्हणजे दग्याचा बेत; २१. दोघां प्रतिस्पर्ध्यांची भेट; २२ भेटींत खान दगा देतो; २३. दळणवळणाच्या जुन्या व नव्या पद्धति; २४. तोफांचे बार व कर्ण्यांचे आवाज या संकेतांचीं कारणें.

प्रकरण ६ वें. १९०–२३२

१. जनींटेंबची लढाई; २. जनीच्या टेंबाखालील खानाची तुकडी; ३. वकील पंताजीची मुत्सद्देगिरी; ४. छबिन्याच्या फौजेंतील टेहळणीच्या क्षेत्रांतील चौक्या; ५. सेनापतीस मनुष्यस्वभावाच्या ज्ञानामुळें होणारा फायदा; ६. जनीदरींतील टेहळ्यांची कामगिरी; ७. छबिन्याच्या फौजेच्या सेनापतींचा प्रथमोपक्रम; ८ तोफेचे सांकेतिक बार; ९. तोफांचे बार, संदेश व हुकूम; १०. रणक्षेत्रांतील प्रत्येक स्थलाची माहिती; ११. होकायंत्राचा उपयोग; १२. अंतर व गोळागोळीची लढाई; १३. लढाई सुरू झाली; १४. महाराज बचावाचें धोरण सोडून चढाई करतात; १५. भरारी, सुटसुटीतपणा व अचानकपणा; १६. वेळेचें महत्त्व; १७. खानाच्या फौजेची नवीन हालचाल; १८. मराठी दुय्यम सेनापतींचा प्रथमोपक्रम; १९. प्रथमोपक्रमाचें महत्त्व; २०. जनी टेंबची लढाई; २१. हिरोजी फर्जंद व त्याची तुकडी; २२. छबिन्याचें क्षेत्र व त्याच्या चौक्यांमधील अंतर; २३. फौजांच्या टेहळणीच्या जागेची निवड व काम; २४. मराठ्यांचे यशस्वी प्रतिहल्ले; २५. जनीच्या लढाईतील मराठी फौजेची संख्या; २६. खानाकडील गोळागोळी; २७. लढाईला लागलेला साधारण काळ; २८. हातघाईच्या लढाईचा काळ; २९. जनीची लढाई लवकर संपल्याचीं कारणें ३०. एकगठ्ठा, पिच्छेहाट, पाठलाग व मदत. ३१. खानाचें सैन्य एकगठ्ठा झालें नाहीं; ३२. खानानें केलेला अपुरा विचार; ३३. पाठलाग कां शक्य नव्हता ?; ३४. लढाईंत पाठलागाची आवश्यता; ३५. पायउतार मराठी फौज; ३६. खानाच्या सेनापतींमधील पहिला तडाखा हाणण्याची

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ग्रंथालय, सातारा

उणीव; ३७. संदेश मार्गाचा अभाव; ३८. जासूद हलकारा; ३९. वेळेवर पोहोंचलेल्या उपराळ्याचा परिणाम; ४०. पहिला जय तोच शेवटचा जय; ४१. मेलेल्यांची व जखम्यांची संख्या; ४२. कैदी व रणांगणावर मिळालेलें सामान.

**प्रकरण ७ वें.** **पान २३३–२६६**

१. कोयनापारची लढाई; २. मोरोपंत पिंगळे यांची कामगिरी; ३. कोयनापारच्या लढाईस प्रारंभ; ४. मोरोपंत व पारघाट; ५. मोरोपंताचा अचानक हल्ला व फौजेची हिंमत; ६. स्थानिक राखीव सैन्य; ७. लहान तोफा; ८. मोरोपंतांच्या फौजेची विभागणी; ९. खानाच्या तोफा; १०. तपाशिलाची उणीव व त्याचा परिणाम; ११. अंतर, डावपेंच, अंधःकार; १२. खानाची फौज उधळली; १३. लढाईंत मिळालेली सामुग्री; १४. युद्धांत पकडलेल्या लोकांची प्रशंसनीय व्यवस्था व विल्हेवाट; १५. परिस्थित्यनुरूप महाराजांचा बिनचूक आडाखा व अंमलबजावणी; १६. नेताजीची कामगिरी; १७. सेनापतीचे गुण, युद्धाचा आडाखा; १८. खानाचा डाव हुकण्याचीं कारणें; १९. वांई व कोयनापार यांत दळणवळण नव्हतें; २०. पिछेहाटीचा मार्ग; २१. बाबाजी भोसल्यानें केलेली आडवणूक व पाठलाग; २२. संख्याबलापेक्षां हिंमतीचें बल आधिक; २३. कामास आलेले लोक; २४. देशद्रोह्यांस कडक शिक्षा; २५. सेनापती व फौजेची हिंमत; २६. जय कां अपजय; २७. जावळीची लढाई.

**प्रकरण ८ वें.** **पान २६७–२८३**

१. वांईची लढाई; २. नेताजी खानाचे पिछेहाटीचे मार्ग रोखून उपयोगांत आणतो; ३. सर्वसाधारण राखीव सैन्याचें कूच; ४. नेताजीचा अचानक हल्ला; ५. खानाचा दळणवळणाचा अभाव; ६. सर्वसामान्य राखीव फौज व तोफखाना; ७. चढाईचें धोरण; ८. सर्व साधारण राखीव सैन्य नुसतें घोडदळ कां ? ९. बचाव व राखीव फौज; १०. सर्वसाधारण राखीव फौज व हल्ला; ११. महाराजांची सर्वसाधारण राखीव फौज व योग्य संधि; १२. खानाची वांईची फौज व स्थिति; १३. नेताजीचा अचानक हल्ला; १४. लढाई सुरू झाली; १५. अंधकार--एक अडथळा; १६. लढाईचा शेवट.

**प्रकरण ९ वें.** **पान २८४–३०२**

१. युद्धकुशल सेनापति; २. सेनापतीचे आवश्यक गुण; ३. युयुत्सूचें कर्तव्य; ४. युद्धकौशल्य व हिकमत; ५. तत्वांचें उल्लंघन व सेनापति; ६. युद्धकुशल सेनापति व दैव; ७. युध्दकौशल्य, युक्ति हिकमत; ८. प्रदेशाचा उपयोग, ९ दगा कीं, द्वंद्व-युध्द; १०. विजापूर--दरबारचा महाराजांना दगा करण्याचा स्पष्ट हुकूम; ११. प्रतापगडच्या युध्दांत काबीज केलेली सामुग्री; १२ युध्दकैदी व जखमी वगैरे लोकांची व्यवस्था; १३. बक्षिसें, मानसन्मान, गौरव, रांडरोटी, जखमी पेनशन; १४. अबदुल बुरूज; १५. जाहीरनामा; १६. उपसंहार.

**युद्धशास्त्राचा शब्दकोश.**

**आधारभूत ग्रंथांची यादी.**

**सूचि.**

**युद्धशास्त्रावरील वाचनीय पुस्तकें.**

**अभिप्राय.**

# चित्रांची अनुक्रमणिका

१. **श्रीछत्रपति शिवाजी महाराज** : ( सिंहाची शिकार करीत आहेत. संशोधक—**आबासाहेब चांदोरकर**. अधिक भाद्रपद, राज्याभिषेक शके २४४. संशोधकांच्या व भा. इ. सं. मंडळाच्या उदार परवानगीनें ). मुख पृष्ठ.

२. **प्रतापगड** : ( सुपरिंटेंडेंट आर्किऑलॉजिकल डिपार्टमेंट, वेस्टर्न सर्कल यांच्या परवानगीनें ). पृ. १ समोर.

३. **अफझलखान** : ( इतिहास संग्रहांतील फोटोवरून एन्लार्जमेंट ). पृ. १४ समोर.


४. **प्रतापगड व अफझलखानाची कबर** : (सु. आ. डि. वे. स. यांच्या परवानगीनें). पृ. २९८ समोर.

# नकाशांची यादी.

१. युद्धक्षेत्र.
२. रणक्षेत्र.
३. खानाचा विजापुर ते वांई मार्ग.
४. खानाचा वांई ते कोयनापार मार्ग.
५. महाराजांचा आंतर-दळणवळणाचा मार्ग.
६. महाराजांचें सरहद्दीचें टेहळें सैन्य.
७. जनी टेंबाची लढाई.
८. कोयनापारची लढाई.
९. जावळीची लढाई.
१०. वांईची लढाई.
११. रेंज कार्ड.

नकाशांची पिशवी पुस्तकाबरोबर मिळेल.

प्रतापगड.



॥ ॐ ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

# प्रतापगडचें युद्ध

## प्रकरण १ लें

**१. प्रतापगडचें सामान्य वर्णनः**

सातारा जिल्ह्यांत वांई तालुक्यांत महाबळेश्वरापासून पश्चिमेस आठ मैलांवर प्रतापगडचा किल्ला आहे. ह्या किल्ल्याच्या खालीं पायथ्याशीं स्वराज्यसंस्थापक शिवाजीमहाराज व विजापूरच्या आदिलशाहीचा सरदार अफजलखान ह्यांच्यांमध्यें सन १६५९ च्या नोव्हेंबर महिन्याचे १० वे तारखेस[1] युद्ध होऊन खानाचा शेवट झाला.

ज्या डोंगरावर प्रतापगडचा किल्ला बांधला आहे त्यास ढोपऱ्याचा डोंगर असें स्थानिक नांव आहे. हा डोंगर समुद्रसपाटीपेक्षां ३५४३ फूट उंच असून खुद्द किल्ल्याचें क्षेत्रफळ ३००×४०० यार्ड आहे[2]. त्याचा आकार साधारण फुलपांखराच्या आकारासारखा आहे. हा किल्ला सेनापती मोरोपंत पिंगळे यांनीं शिवाजीमहाराजांच्या आज्ञेवरून सन

१. शके १५८१ मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी गुरुवार—जे. श. २. सा. ग्या.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
... सातारा

१६५६।५७ चे सुमारास बांधली[1]. किल्लयाचें बांधकाम मोरोपंतांच्या नेतृत्वाखालीं वर्ष दीड वर्ष चाललें होतें.

किल्लयाची बांधणी

जावळीप्रांत मोऱ्यांकडून काबीज केल्या नंतर त्या प्रांतावर जरब बसविण्यासाठीं व कोंकणांत महाडाकडे जाणाऱ्या पार घाटावर नजर ठेवण्याकरितां असल्या एका किल्लयाची अत्यंत जरूरी होती. ह्यामुळें शत्रूचा उपसर्ग न होतां आपल्याला सुरक्षितपणें कोंकणांतून वावरतां येईल व युद्धशास्त्रदृष्ट्या असली महत्त्वाची आणि तटबंदीची व माऱ्याची जागा (fortification) आपल्या हातांत राहून, आपण मनांत योजिलेल्या कार्यास उपयोगी पडेल असें जाणून महाराजांनीं ह्या ठिकाणीं किल्ला बांधविला[2]. त्यांतल्या त्यांत हें काम मोरोपंतांसारख्या पायदळाच्या अत्यंत कुशल, कसलेल्या व युद्धखात्यांतील आणि किल्ले बांधणींतील तज्ज्ञ अशा सेनापतीकडे सोंपविल्यामुळें त्यांनीं चढाईच्या व बचावाच्या (offensive व defensive) लढायांचें धोरण लक्षांत घेऊन हा किल्ला बांधला. पंतांनीं तोरणा व राजगड हे किल्ले नुक्ते च बांधले होते व पुरंदर किल्ला आणि तो प्रांत त्यांच्या हुकमतीखालीं होता[3]. त्यामुळें, युद्धशास्त्रदृष्ट्या किल्ले कसे बांधावेत हें ज्ञान त्यांना उत्तम प्रकारें झालें होतें. युद्धकलेच्या अंगांपैकीं, मुख्य अंग, तटबंदीची व माऱ्याची जागा आपल्या हातीं असणें हें होय. ही हि गोष्ट लक्षांत ठेऊन हा किल्ला बांधण्यांत आला आहे. आजकालचा कोणी हि युद्धशास्त्रविशारद या किल्लयाची बांधणी व इतर

---

१. किं. १५१; स. दे. २३९. २. स. दे. २३९; किं. १५१. ३. किं. १३९; स. दे. २३९.

कामें निरखून पाहील, तर त्यास वरील विधानाची सत्यता बांधणीच्या प्रत्येक इंचाइंचांत पटेल.

डोंगराळ मुलखांतील गनिमी युद्धांत घाटांचें व खिंडींचें महत्त्व फार असतें. असल्या माऱ्याच्या जागा ताब्यांत असल्यामुळें चढाईच्या (offensive) लढाईमध्यें शत्रूच्या प्रचंड सैन्यास फार च थोड्या सैन्यानिशीं थोपवून धरतां येऊन त्याचा सहज नाश करतां येतो; त्याचप्रमाणें बचावाच्या (defensive) लढाईमध्यें हि स्वतःचा बचाव उत्तम तऱ्हेनें करितां येतो.

**माऱ्यांच्या जागा व तटबंदी**

स्वराज्य व स्वधर्मस्थापनेचें ध्येय शिवाजीमहाराजांनीं आपल्यापुढें ठेविल्यामुळें, त्याला विरोध करणाऱ्या निरनिराळ्या मुसुलमानी सत्तांपासून आपला बचाव करण्यासाठीं, प्रतापगडासारख्या अनेक माऱ्यांच्या जागा निर्माण करणें किंवा जुन्या असतील त्यांची दुरुस्ती करणें युद्धशास्त्रांतील निरनिराळ्या अंगांच्या दृष्टीनें अत्यावश्यक होतें. महाराजांनीं नुकत्या च स्थापिलेल्या स्वराज्याच्या उत्तरेस मोंगल, पश्चिमेस शिद्दी, दक्षिणेस विजापूर आणि गोवळकोंडें येथील बादशाह्या आणि पूर्वेस विजापूरकर व मोंगल यांच्या सरहद्दी होत्या. या सर्वांच्या मध्यें राहून त्यांस हार न जातां व प्रसंगीं त्यांना विरोध करून हि स्वराज्याचा विस्तार करण्याचें अत्यंत बिकट काम महाराजांना साधावयाचें होतें. त्यामुळें प्रतापगडासारखे किल्ले ठिकठिकाणीं व विशेषतः त्या सुरवातीच्या स्वराज्याच्या सरहद्दीवर, कीं ज्यांमुळें या परकीय राज्यांवर

१. रा. खं. १५. ले. २६८.

दाब बसेल अशा जागीं बांधावे लागले. वरील धोरणास अनुसरून महाराजांनीं आपल्या सरहद्दीवरील सह्याद्रीच्या प्रत्येक घाटावर व माऱ्याच्या जागीं जे किल्ले बांधले, घेतले व दुरुस्त केले, त्यांपैकीं कांहीं पुढीलप्रमाणें होते:—( १ ) उत्तर तिवरा घाटाजवळील व पारघाटाच्या दक्षिणेस असलेला व्याघ्रगड, ( २ ) कुंभारली घाट व मळेघाट यांच्या जवळचे भैरवगड, गुणवंतगड व दातेगड, ( ३ ) दक्षिण तिवरा घाटानजीकचा अवचितगड, ( ४ ) प्रभानवल्ली घाटाजवळचा विशाळगड, ( ५ ) पारघाटाच्या उत्तरेस असलेल्या ढवळ्या घाटाजवळचे चंद्रगड, पांडवगड, कमळगड व मकरंदगड, ( ६ ) वरधा, भोरप्या, मढया, शिवळे, लिंगाणा इत्यादि, घाटांजवळ राजगड, प्रचंडगड ( तोरणा ), सिंहगड, ( ७ ) लेंढ्या घाटाजवळ कोरिगड, तुंग व तिकोना आणि ( ८ ) बोरघाटाजवळ राजमाची, लोहगड इ. इ. इ. यांखेरीज आणीक हि महत्त्वाच्या जागीं चाकण, पुरंदर, शिवनेर सारखे असलेले बरेचसे किल्ले त्यांनीं काबीज केले होते.

## २. प्रतापगडचें युद्ध हें नांव देण्याचें कारण:

या युद्धास प्रतापगडचें युद्ध म्हणण्याचें कारण असें कीं, शिवाजी महाराजांनीं अफझलखानाच्या सैन्याशीं प्रतापगडीं व त्याच्या पूर्वेकडील आसपासच्या २५–३० मैलांतील टापूंत लढाया देऊन त्यास नेस्तनाबूत केलें. या युद्धांत ज्या निरनिराळ्या लढाया झाल्या त्यांपैकीं पहिली ढेप्याच्या डोंगरावर, दुसरी पार येथें कोयनेच्या कांठीं, तिसरी अत्यंत घनघोर लढाई वांई येथें व चवथी जावळीचे रानांत झाली. ह्यामुळें या सर्व लढायांना प्रतापगडचें युद्ध असें एक सबंध नांव दिलें आहे; कारण एका युद्धांत अनेक लढाया होतात.

## ३. प्रतापगडचें युद्ध कीं अफजलखानाचा वध ?

आजपर्यंत अफझलखानाचा वध या नांवानें प्रसिद्ध असलेल्या प्रसंगास आम्हीं यापुढें **प्रतापगडचें युद्ध** हें योग्य नांव जाणून बुजून देत आहों. ह्या प्रसंगाचें योग्य महत्त्व लक्षांत न आल्यामुळें व परकीय इतिहासकारांनीं बनविलेल्या इतिहासामुळें, शिवाजीमहाराजांचें खरें राजकारण आम्हांस न दिसतां, या प्रसंगास आम्हीं " अफझलखानाचा वध " हें चुकीचें नांव आजपर्यंत देत आलों. त्यामुळें या प्रसंगाचें खरें महत्त्व व त्यांतील युद्धशास्त्राचीं महत्त्वाचीं निरनिराळीं अंगें यांचें ज्ञान होणें एकीकडे च राहून, हा प्रसंग एक वादाचें खूळ माजविण्यास मात्र कारणीभूत होऊन बसला.

लष्करी इतिहासदृष्टया हें प्रतापगडचें युद्ध फार महत्त्वाचें आहे. नेपोलिअननें यूरोपमध्यें, जेना, आस्टरलीड्झ, कोनिग्रेट्स येथें ज्या मोठ-मोठ्या लढाया मारल्या त्यांच्या तोडीचें व कांहीं बाबतींत तर त्यांहून हि हें युद्ध श्रेष्ठ आहे. तें कसें याचें च साग्र विवरण करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

**बाजी-शामराज**

खानाचें साध्य किंवा उद्दिष्ट ( objective ) महाराजांना जिवंत पकडून अथवा मारून विजापुरास न्यावयाचें हें होतें.[१] हें साध्य साधण्यासाठीं त्यांच्यांशीं लढल्या-शिवाय आपल्यास गत्यंतर नाहीं, हें खान पूर्णपणें जाणून होता. कारण, महाराजांनीं नुकतें च विजापूरचा सरदार बाजी शामराज यास या च पारघाटामध्यें, दहा हजार फौजेनिशीं तो चढाई करून आला असतां,

---

१. शि. भा. अ. १७ श्लो. ३१, ३७.

त्याजवर अचानकपणें हल्ला चढवून त्यास दांतीं तृण धरावयास लाविलें होतें.[1]

चंद्रराव मोरे

तसें च, जावळीचा चंद्रराव मोरे, जो स्वतःस " बारा रावांचा काळ " असें म्हणवीत असे व ज्यास उपद्रव देण्यास खुद्द आदिलशाहाचीं हि हिंमत नव्हती, त्यास महाराजांनीं एका झटक्यासरशीं धुळीस मिळविलें होतें[2]. तेव्हां, अशा बलाढ्य शत्रूशीं आपणास तोंड द्यावयाचें आहे व आपलें उद्दिष्ट साधावयाचें आहे, हें जागून च खानानें आपल्या बरोबर भरभक्कम सैन्य, म्हणजे ३०–४० हजार फौज घेतली होती (या संख्येची फोड पुढें केली आहे.). खानाचें उद्दिष्ट काय आहे, हें महाराजांना त्यांच्या नजरबाज खात्यांतील हेरांकडून अगाऊ कळून चुकलें होतें.[3] त्यामुळें त्यांनीं हि त्याचें उद्दिष्ट सिद्धीस जाऊं नये म्हणून बचावाप्रीत्यर्थ होईल तितका बंदोबस्त करून आपल्या सैन्याची जमवाजमव केली. ह्याप्रमाणें दोन्ही पक्ष आपापलीं उद्दिष्टें साधण्याकरितां सैन्यासह तयार होते; त्यामुळें याचें पर्यवसान अखेर एवढ्या मोठ्या युद्धांत झालें कीं, ज्यांत तीनचार लढाया व बऱ्या च चकमकी होऊन त्यांत दोन्ही पक्षांकडील मिळून ५।६ हजार माणूस कामास आलें व जखमी झालें.[4] म्हणून या प्रसंगास अफजलखानाचा वध असें नांव न देतां, " प्रतापगडाचें युद्ध " असें आम्हीं म्हटलें आहे.

---

१. चि. ३६; ज. ४९; शि. भा. अ. १८. श्लो. ४, ६. २. इ. सं. जावळीची बखर. ३. पो. चौ १४. ४. रेव्हिंग्टन, इं. फ्या. रे; पो. चौ. ३५.

महाराजांचें धोरण

हा प्रसंग महाराजांनीं कसा पार पाडला याबद्दल स्थूलपणें विचार केला असतां पुढील गोष्टी आढळून येतात. विजापूरच्या ह्या धाडीचा महाराजांनीं दोन तऱ्हेनें विचार केला असावा. एक तर, एवढया मोठया अफाट सैन्यासह आलेल्या खानाशीं प्रत्यक्ष लढाई न देतां, त्याची भेट घेऊन व त्याचें म्हणणें कबूल करून किंवा प्रसंगीं नुकसानकारक असा तह करून हि तूर्त आपली बाजू संभाळणें व दुसरें, खानाशीं कोणत्या हि तऱ्हेचा तह न करितां त्याच्या अजस्र सैन्याबरोबर युद्धाला तयार होणें. परंतु, खानानें आपल्या प्रचंड सैन्यास तीन वर्षे पुरेल इतकें सामान व दारूगोळा, आपल्या बरोबर विजापूराहून आणला असल्यामुळें[1] व त्याशिवाय मावळांतील बरेचसे मराठे सरदार त्यानें आपल्या बाजूस वळवून घेतल्यामुळें[2], असल्या बलाढय शत्रूशीं आपल्या छोटेखानी सैन्यानिशीं तोंड देऊन चढाई करणें शक्य नाहीं, हें जाणून महाराजांनीं फक्त आपल्या (स्वराज्याच्या) संरक्षणाच्या दृष्टीनें च बचावाच्या लढाईची तयारी केली[3].

तरी पण, खानानें आपला वकील कृष्णाजी भास्कर यास भेटीचें संधान बांधण्याकरितां जेव्हां महाराजांकडे पाठविलें, तेव्हां ह्यांतून हि जें कांहीं साधतां येईल तें साधावें व सध्यां लढाई टळल्यास पहावी, अशा दृष्टीनें महाराजांनीं, वकिलास भेटीच्या बोलण्यास होकार दिला व त्या च वेळीं त्याच्याकडून खानाचा मुख्य मतलब काय आहे हें चतुराईनें

१. पो. चौ. ७. २. जे. क; शि. च. प्र. ४३; शि. भा. अ. १७ श्लो. ५५–५८; अ. २३ श्लो. १६–१७. ३. शि. भा. अ. २३, श्लो.१९; पो. चौ. १६, १७.

काढून घेतलें. पुढें ठरल्याप्रमाणें भेट झाली. भेटींत प्रथम खानानें दगा दिला, त्यामुळें खान व महाराज यांच्यांत द्वंद्वयुद्ध झालें, द्वंद्वयुद्धांत खान मारला गेला[२], त्याचें पर्यवसान युद्धांत झालें आणि त्यांत मोठमोठ्या चार लढाया झाल्या. या च कारणासाठीं मागें सांगितल्याप्रमाणें आम्ही या प्रसंगास खानाचा वध असें न म्हणतां "प्रतापगडचें युद्ध" असें म्हणतों.

## ४. तत्कालीन राजकीय परिस्थिति व युद्धाचीं कारणें:

या युद्धास जीं अनेक कारणें उपस्थित झालीं त्यांची त्रोटक माहिती पुढें देत आहें. महाराजांनीं गेल्या तीन चार वर्षांत[१] आदिलशाहीची सत्ता न जुमानतां तिच्या ताब्यांतील जे किल्ले व इतर प्रांत आपल्या ताब्यांत घेण्याचा सपाटा चालविला होता, त्यांत च या युद्धाचें कारण आहे. ज्याप्रमाणें खुद्द विजापूरच्या राज्यांतील प्रांत महाराजांनीं घेतले, त्याप्रमाणें च विजापूरच्या मांडलीक सरदारांना हि आपल्या ताब्यांत आणण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न चालविले होते.[३]

**देश-आक्रमण**

पुणें व सुपें ह्या प्रांतांत त्या वेळीं आदिलशाहीची सत्ता नामधारी असल्यामुळें, आपल्या जहागिरीच्या बंदोबस्ताच्या निमित्तानें तो प्रांत चटकन् महाराजांनीं आपल्या हाताखालीं घातला आणि त्याबरोबर च त्या प्रांताच्या शेजारचे किल्ले हि त्यांनीं घेतले (इ. स. १६४६–४७). मात्र ते घेण्याचें कारण विजापूर दरबारास असें कळविलें कीं, राज्यांत पुंड, पाळेगार माजल्यामुळें त्यांच्यापासून प्रजेचें व राज्याचें संरक्षण करण्यासाठीं ते मी आपल्या

---

१. स. १४. २. स. १५; पो. चौ. ३०; शि. भा. अ. २१ श्लो. ३०, ३४–३६. ३. स. ३–६.

ताब्यांत घेत आहें. शिवाय मी तर दरबारचा मांडलीक च आहें. तेव्हां माझ्या ताब्यांत ते असल्यानें सरकाराचें कांहीं नुकसान व्हावयाचें नाहीं.[1] त्यामुळें पहिल्यापहिल्यानें विजापूरदरबारनें इकडे दुर्लक्ष्य केलें. परंतु, या सबबीवर जसजसा महाराजांनीं आपला उद्योग वाढविला व त्याबरोबर च त्यांच्याबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या सुभेदारांच्या कागाळ्या जेव्हां दरबारांत जास्त जास्त येऊं लागल्या, तेव्हां मात्र दरबारास या गोष्टींत लक्ष घालणें भाग पडलें.[2] दरबारास प्रथम असें वाटलें कीं, महाराजांच्या या कृत्यास त्यांच्या वडिलांची आंतून फूस असावी; कारण, शहाजीराजांनीं निजामशाहीस नुकतें च आपल्या एकट्याच्या बळावर दोनतीन वर्षें जिवंत राखल्याचें उदाहरण दरबारच्या डोळ्यासमोर होतें व संधि सांपडल्यास अजून हि आपल्यापासून फटकून निघून शहाजीराजे आपली स्वतंत्र सत्ता स्थापन करतील अशी सकारण भीति दरबारास नेहमीं च वाटत असे. एकदां तर शहाजीराजांनीं आदिलशहास आपण रजपूत आहों, आपण दोन तीन पातशाह्या पालथ्या घातल्या आहेत, सावध रहा, अशी धमकी दिली होती. ह्या साठीं व आपली इभ्रत राखण्यासाठीं, दरबारानें बाजी घोरपड्यांकडून विश्वासघातानें शहाजीराजांस पकडून विजापुरास कैदेंत आणून ठेविलें व अशा रीतीनें महाराजांना आपल्या कार्यापासून परावृत्त करण्याचा पेंच टाकिला (१६४८). परंतु, तोडीस तोड अशा मुत्सद्देगिरीनें महाराजांनीं मोंगलांकडून वडिलांची सुटका करून, तो पेंच मोडून काढला[3] (१६४९).

१. स. ३-६. २. पो. चौ. ५; स. ८. ३. किं. १४२, १४९; रा. खं. ८. ले. ३.

## प्रतापगडचें युद्ध

अफजलाची तक्रार

यानंतर कांहीं काळानें महाराजांसंबंधीं दरबारांत पुन्हां कागाळ्या येण्यास सुरवात झाली. या कागाळ्या आणणाऱ्या लोकांत खुद्द वांईचा सुभेदार अफझलखान हा होता. त्याचें कारण असें कीं वांई, मिरज ह्या बाजूला खुद्द त्याची च खाजगी जहागीर पसरलेली होती आणि महाराजांनीं ह्या च प्रांतांत जास्त धुमाकूळ माजविला होता[1]. हा प्रांत, महाराजांनीं आतांपर्यंत आपल्या ताब्यांत घेतलेल्या प्रांताच्या सरहद्दीला लागून होता, म्हणून ओघानें च तो कावीज करणें त्यांना भाग होतें. त्यासाठीं या प्रांतांतील गडांचे किल्लेदार व प्रांतांतील वतनदार देशमूख देशपांडे यांस त्यांच्यांत स्वराज्याची भावना जागृत करून किंवा मुसुलमानी जुलमी अंमलांबद्दल त्यांच्यांत तिटकारा उत्पन्न करून अथवा त्यांचीं वतनें वगैरे त्यांच्याकडे चालविलीं जातील असें आश्वासन देऊन, इत्यादि कोणत्याना कोणत्या तऱ्हेनें, महाराजांनीं आपल्यास अनुकूल करून घेतलें होतें.[2] यामुळें विजापूर दरबारापेक्षां खानाचें नुकसान जास्त होई. दरबाराला व खानाला आपला वसूल जमा करण्यास बऱ्या च अडचणी उत्पन्न होत. हें सर्व नुकसान होण्यास महाराजांची ह्या लोकांस आंतून फूस आहे असें दरबारास भासविण्यासाठीं खानानें आपली पराकाष्ठा केली. अर्थात च दरबारला महाराजांचा बंदोबस्त करणें भाग पडलें व त्यासाठीं दरबारानें प्रथम बाजी शामराज हा सरदार त्यांजवर पाठविला. त्याचा व त्याला मदत करणाऱ्या जावळीच्या चंद्रराव मोऱ्याचा कांटा महाराजांनीं कसा काढला तें पुढें दिलें आहे.

---

१. रा. खं. २०, ले. ८९, ९०, ९२, ९३.

२. रा. खं. १५ ले. २६८, स. ३.

## बाजी शामराज व जावळीचे मोरे

बाजी शामराज

वर सांगितल्याप्रमाणें विजापुराहून बाजी शामराज नांवाचा आदिलशाही सरदार दहा हजार फौज घेऊन महाराजांवर चालून आला. त्याचा हि मुख्य उद्देश खानासारखा च म्हणजे महाराजांना जिवंत पकडून नेण्याचा अथवा त्यांना ठार करून त्यांचें शव विजापुरास नेण्याचा होता. जावळीच्या मोऱ्यांच्या मदतीनें वांईजवळील पारघाटांत तो आपल्या सर्व सैन्यासह दबा धरून महाराजांची वाट पहात होता[1]. या वेळीं ते महाडाकडे होते. त्यांना ही बातमी लागतां च, ते तेथून एकदम निघून, आपल्या हालचालींची खबर बाजीस न लागूं देतां अचानकपणें येऊन त्याच्यावर तुटून पडले. अशा तऱ्हेनें महाराजांनीं आपल्या भरारी (rapidity) मुळें, सुटसुटीतपणा ( mobility ) मुळें व अचानक घाल्या ( surprise ) मुळें बाजीच्या एवढ्या मोठ्या फौजेला पारघाटांत च एका झटक्यांत नेस्तनाबूत करून टाकलें.

जावळीचे मोरे

बाजी शामराजास या वेळीं जावळीच्या चंद्रराव मोऱ्यानें सर्व तऱ्हेनें मदत केली होती.[2] या सुमारास त्याच्या जहागिरीची सरहद्द महाराजांच्या प्रांताला लागून होती. मोरे आपणास बाह्यतः जरी आदिलशहाचा मांडलीक म्हणवीत असे, तरी वास्तविक तो स्वतंत्र होता. शिवाय महाराजांनीं त्याला आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न केला असतां हि तो वळला नाहीं. अशा कारणांसाठीं मोऱ्यासारखा शत्रू आपल्या सरहद्दीला लागून जवळ राहूं देणें, आपल्या पुढल्या कामगिरीच्या दृष्टीनें घातुक आहे, हें लक्ष्यांत

१. किं. १४४; स. दे. २३५. २. किं. १४७.

घेऊन च महाराजांनीं यापुढें आपला मोर्चा जावळीकडे वळविला व मोऱ्याशीं युद्ध करून आपल्या वाटेंतील त्याचा कांटा दूर केला. ह्या हि युद्धांत महाराजांनीं आपल्या नेहमींच्या युद्धकुशलते ( strategy ) प्रमाणें स्वतःच्या हालचालींची बातमी शत्रूस लागूं न देतां, त्यावर अचानक छापा घातला होता. अशा तऱ्हेनें १६५५ मध्यें सर्व जावळी प्रांत महाराजांनीं आपल्या ताब्यांत आणिला[1].

**कल्याणची लूट**

यानंतर घडलेल्या प्रसंगाचा फायदा घेऊन व त्या च वेळीं (१६५७) विजापूर दरबारची ढिलाई व गृहकलह पाहून महाराजांनीं आदिलशाहींतील व्यापारी व महत्त्वाचा असा कल्याणचा सुभा काबीज करून आपल्या राज्यास जोडला. लागलीं च कल्याण ते राजापुरापर्यंतच्या कोंकणभागांत स्वाऱ्या करून त्यांनीं बरा च मुलूख काबीज करण्याचा सपाटा चालविला. त्या च वेळीं जंजिऱ्याच्या शिद्दीला हि शह देऊन सर्व कोंकणपट्टी हळू हळू ताब्यांत घेण्याचा त्यांचा बेत होता[2].

**सावंत, सुर्वे आणि दळवी**

कोंकणांतील महाराजांच्या या मोहिमांत वाडीचे सांवत, शृंगारपूरचे सुर्वे व नरसिंगपूरचे दळवी यांच्यांशीं त्यांचा संबंध आला. हे जहागीरदार मधून मधून त्यांच्या सैन्याला त्रास देत असत. परंतु, पुढें जेव्हां मोंगलानें विजापूरला वेढा दिला आणि इकडे महाराज प्रबळ होत चालले, तेव्हां विजापुराहून ह्या लोकांना मदत मिळण्याची आशा खुंटल्यामुळें आणि

---

१. इ. सं. जावळीची बखर; जे. श. २. जे. श; स. ६; किं. १४०; जे. क. शि. च. प्र. ४२.

आपल्या स्वतःच्या बळावर महाराजांशीं टक्कर देणें यांना शक्य नसल्यामुळें, या तिघांनीं त्यांच्यांशीं नमतें घेऊन १६५९ च्या एप्रिलचे सुमारास सलोख्याचें बोलणें केलें व आपला बचाव करून घेतला.

याप्रमाणें या प्रतापगडच्या युद्धास जीं कारणें घडलीं तीं व तत्कालीन परिस्थिती यांचें त्रोटक वर्णन असें आहे.

**५. विजापूरदरबारचें युद्धमंडळः**

महाराजांच्या या सर्व उलाढालींमुळें विजापूरदरबाराला भीति उत्पन्न झाली व त्यामुळें त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठीं काय उपाय योजावा हें ठरविण्यास दरबारानें आपले प्रख्यात मुत्सद्दी व सेनापती बोलावून मसलत चालविली.[२] यापुढें महाराजांच्या प्राबल्याकडे तत्काळ लक्ष्य न दिल्यास त्याचा परिणाम दरबारास लवकर च भोगावा लागेल, म्हणून होईल तितक्या लवकर त्यांचा बंदोबस्त करणें हें दरबारची इभ्रत व सत्ता ह्या दृष्टीनें अत्यंत अवश्य व जरूरीचें होतें. या युद्धमंडळाकरितां आदिलशाहीच्या ठिकठिकाणच्या सुभायतींतील जे सुभेदार व सरदार बोलाविले होते, त्यांत च वांई प्रांताचा सुभेदार अफझलखान हा हि एक होता.

**युद्धमंडळाचें खलबत व निवाडा**

या वेळीं विजापूरचा अलि आदिलशहा अज्ञान असल्यामुळें, त्याची आई बडी साहेबीण ही आपला दिवाण खवासखान ह्याच्या तंत्रानें राज्यकारभार चालवीत होती. खवासखान हा महाराजांच्या विरुद्ध होता. त्यामुळें युद्धमंडळावर त्याचें विशेष वजन पडून महाराजांचा कायमचा बंदोबस्त

१. स. ७; स. दे. २६४. २. पो. चौ. ६.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
... सातारा

करण्याची मसलत नक्की ठरली व तत्काळ मोहीम सुरू करावी, असा निवाडा युद्धमंडळानें दिला.

या मोहिमीचें आधिपत्य कोणाकडे द्यावें याचा विचार होऊन व त्यावर बरी च भवती न भवती होऊन, अखेरीस तें काम अफझलखान यास देण्याचें ठरलें व तें त्यानें कबूल हि केलें. कारण, खानाला इकडील प्रांताची माहिती चांगली च होती व तो च महाराजांच्या कागाळ्या दरबारीं पोंहच-विण्यांत मुख्य होता. शिवाय नुकतें च त्यानें मोंगलांशीं लढून नांव गाजविल्यामुळें त्यास आपल्या सामर्थ्याबद्दल गर्व हि झाला होता. म्हणून हें काम शेवटीं युद्धमंडळानें त्याच्यावर सोंपविलें व दरबारनें त्याला सेना-पतीचीं वस्त्रें व पोषाख वगैरे देऊन त्याचा पुष्कळ गौरव केला. खानाचें खरें नांव अबदुल्ला असें असून तो महमद आदिलशहाचा दासीपुत्र असावा असें सरदेसाई म्हणतात.[2] अगीनदास तर त्याला "भटारनी का छोकरा" असें म्हणतो.[3] तो महमद आदिलशहाच्या कारकीर्दीत बऱ्या च योग्यतेस चढल्यामुळें त्यास अफझलखान ही पदवी मिळाली होती.

**अफझलखानाची मुख्य सेनापतीच्या जागीं नेमणूक**

**६. विजापूर सैन्याची कमरबंदी** ( Mobilization ):

खानाबरोबर पाठविण्याकरितां फौजेची तयारी फार जोरानें होऊं लागली. तसें च त्याच्या सैन्याला लागणाऱ्या युद्धसामुग्रीचा पुरवठा व दारुगोळा यांचा हि भरपूर बंदोबस्त झाला. मुख्य सेनापतीचा अधिकार व वस्त्रें आणि महाराजांस कैद करून आणण्याचें बादशाही फर्मान घेऊन, फौजफांटा वगैरेची योग्य तजवीज व जमवाजमव करून खान

१. पो. चौ. ७. २. स. दे. २४२. ३. पो. चौ. २९.



अफझलखान.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

थोडया च दिवसांत (१६५९ च्या एप्रिल अखेरीस) महाराजांवर स्वारी करण्याकरितां विजापुराहून निघाला. त्याच वेळीं त्यानें विजापूर राज्याच्या निरनिराळ्या सुभायतींतील लष्करी छावण्यांच्या अधिकारी लोकांना सर्व फौजेसह तयार होण्याचे हुकूम पाठविले.[1]

**७. हांकारा किंवा लढाईचा पुकार**( Declaration of War ):

पूर्वी, आजच्या सारखें आम्ही तुमच्याशीं युद्ध पुकारूं, नाहीं तर आमचें जें म्हणणें आहे तें लक्ष्यांत घेऊन त्याचा योग्य व अनुकूल विचार करावा असें म्हणण्याची व निर्वाणीचा खलिता (ultimatum) पाठविण्याची आणि वरपांगी भाषा वापरण्याची, म्हणजे एक प्रकारें दरबारी देखावा करण्याची आवश्यकता नसे. बहुतेक दोन्ही पक्ष पर्यायानें युद्धाला आपोआप च तयार होत; कारण एकमेकांचे हितसंबंध कोठें बिघडले आहेत, हें कळल्याबरोबर एकमेक आपल्या सैन्यांची तयारी करीत असत.

**परराष्ट्रीय वकील**

हल्लीं, लढाई पुकारण्यापूर्वी परकीय दरबारांत असलेल्या आपापल्या परराष्ट्रीय वकिलांना परत स्वदेशीं बोलावण्याचा नियम आहे. असें न करतां च जर युद्ध पुकारलें गेलें, तर त्या वकिलांना स्वदेशीं येण्याची फार मुष्कील पडते; एवढ्या करितां त्यांना अगोदर बोलावून घेतात. नाहीं तर, ते लोक ज्या दरबारांत असतात, तेथील फौजांच्या तयारीची, त्या देशांतील सुरक्षित जागांची ( tactical points ) व अशी च इतर महत्त्वाची बातमी आपल्या राष्ट्रांत पोंचवितील या सबबींवर तें तें दरबार त्यांना कैदेंत

१. शि. भा. अ. १७ श्लो. ३१,३७. प्रस्ता. १९१

ठेवतें. ह्यामुळें युद्ध पुकारण्यापूर्वी च ह्या वकिलांना परत स्वदेशीं बोलावून घेण्यांत येतें.

असा कांहींसा प्रकार पूर्वी थोडाफार प्रचारांत होता. खडर्याच्या लढाईच्या अगोदर, निजामानें आम्हीं तुमची बाकी देत नाहीं, वाटल्यास लढाईस तयार व्हावें, असें म्हणून लढाई पुकारली. त्या प्रसंगीं निजामाच्या दरबारांत गोविंदपंत काळे हे पेशव्यांचे वकील होते. परंतु, त्यांस त्रास न देतां अथवा कैद न करितां निजामानें त्यांना पुण्यास बिनहरकत जाऊं दिलें ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे.

**परराष्ट्रीय वकिलांचें काम**

हल्लीं, अशा परकीय दरबारांत असलेल्या परराष्ट्रीय वकिलांना दोन प्रकारचें काम करावें लागतें. पहिलें काम उघड असून, दुसरें काम गुप्त व आंतून करण्याचें पण मुख्य आणि महत्त्वाचें आहे; तरी पण, पहिल्या च कामाला विशेष महत्त्व आहे असें दाखविण्यांत येतें. ज्या परराज्याच्या दरबारांत वकील ठेवला जातो, त्या दरबारच्या व आपल्या राष्ट्राच्या हितसंबंधांच्या प्रश्नांत मुत्सद्देगिरीनें राजकारण करून आपले हितसंबंध साधणें हें पहिलें काम होय. दुसरें काम जाहीर नसून गुप्तपणानें करावें लागतें. तें म्हणजे, त्या देशासंबंधीं युद्धोपयोगी अशी सर्व माहिती गोळा करणें हें होय; म्हणजे पुढें मागें त्या देशाशीं आपल्या देशाचें युद्ध झाल्यास शत्रूची तयारी, फौज, हत्यारें, त्यानें लाविलेल्या नवीन शोधांचा युद्धांत होणारा उपयोग, त्याचा दारूगोळा, पैका, पुरवठा, सैन्याची संख्या, नकाशे, मुख्य सेनापतीची माहिती व त्याच्या बद्दलचें एकंदर लोकमत वगैरे सर्व गोष्टींची माहिती काढून आपल्या देशांतील मुत्सद्यांना व सेनानायकांना कळविणें. तसें च त्या देशाचें इतर

राष्ट्रांबरोबर चाललेलें अंतस्थ असें राजकारण समजून घेऊन, त्याची हि माहिती आपल्या देशास कळविणें, हें च या परराष्ट्रीय वकिलाचें मुख्य व महत्त्वाचें काम आहे.[1]

**महाराजांचें नजरबाज खातें**

विजापूरदरबारनें, महाराजांना आम्हीं तुमच्यावर मोहीम करतों किंवा तुमच्या बरोबर युद्ध करतों असें मुळीं च कळविलें नाहीं. ह्या वेळीं अशा तऱ्हेचा महाराजांचा कोणी हि परराष्ट्रीय वकील विजापूरदरबारांत नव्हता; तरी पण, त्यांचें नजरबाज खातें (intelligence department) इतक्या श्रेष्ठ प्रतीचें होतें कीं, शत्रूच्या दरबारांत ठरलेली प्रत्येक गोष्ट त्यांना तत्काळ कळत असे. त्यामुळें आजच्या परराष्ट्रीय वकिलातीचें ( foreign embassy ) काम आपोआप घडून येत असे. ह्या मार्गानें विजापुरांत झालेल्या मसलतीची, युद्धाच्या तयारीची व पर्यायानें आपल्या विरुद्ध युद्ध पुकारल्याची बातमी, त्यांना, त्यांच्या नजरबाज खात्याकडून तत्काळ कळली होती. तिचा फायदा घेऊन, येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची महाराजांनीं आपल्याकडून तयारी चालविली.[2]

### ८. खानाचें सैन्यः

विजापुराहून खान निघाला, तेव्हां त्याजपाशीं पुढील प्रमाणें सैन्य

---

१. "अन्य राजे व संस्थानिक यांजकडे पाठवावयाचे ते चार ( गुप्त हेर किंवा परराष्ट्रीय वकील) कसे असावे ? बहुत सावध व समर्पक उत्तरें करणार व तर्क करून मंत्र काय जहाला हें समजणार, परकी राजे यांचीं मनें हरणार व त्यांजपासूनहि दुसरें वेतन भक्षणार असे." म. रा. राजनीति, पृ. ४८
२ किं. १४७.

२

होतें:--१२ हजार घोडदळ, १० हजार पायदळ, ८०-९० मोठ्या तोफा, ३००-४०० लहान तोफा, मोठ्या तोफखान्याकडील हजारबाराशें खलाशी व लहान तोफखान्याकडील साडेचार हजार खलाशी. ह्या प्रमाणें विजापुराहून १६५९ च्या एप्रिल अखेरीस सैन्यासह निघाल्यानंतर खान वांईप्रांतीं जूनमध्यें म्हणजे आषाढ शके १५८१ त येऊन पोंहचला.[1][2]

**९. खानानें नवीन उभारलेलें तीन हजार मावळी पायदळ:**

खान जसजसा वांईकडील डोंगराळ मुलखांत येत चालला, तसतसा त्यानें आणखी नवें सैन्य उभारण्याचा प्रयत्न जोरानें केला; तें हि सैन्य बरें च होतें. शिवाय, वांई येथें आल्यावर त्यानें तेथील डोंगराळ मुलखाची संवय असलेले व ह्या प्रांताची माहिती असलेले तीन हजार मावळे आपल्या पायदळांत भरती केले.[3] यांत त्याचा मुख्य उद्देश एवढा च होता कीं, आपल्या बादशाही सैन्याला इकडील डोंगराळ प्रदेशांत लढाई करण्याची संवय व प्रदेशाची माहिती नसल्यामुळें, त्याच्यापेक्षां या नवीन उभारलेल्या मावळी पायदळाचा, मनांत नसतां हि पहाडी व दऱ्याखोऱ्यांच्या लढाईचा प्रसंग पडल्यास चांगला च उपयोग करून घेतां येईल. हे मावळे या च डोंगराळ प्रदेशांतील राहणारे असल्यामुळें व त्या डोंगरांतील दऱ्याखोऱ्यांतून नेहमीं हिंडून फिरून, तेथील रस्ते, वाटा, घाट, रानें, जंगलें, खांचाखोचा, नदीनाले, दऱ्याखोरीं वगैरे एकंदरींत सर्व प्रदेशाची त्यांना पूर्ण

---

१. इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ६४; २. पो. चौ. ९; स. ७; ज. ६८-६९; शि. भा. प्र. १९१; शे. व. २४; खान पंढरपुराहून वांईस तेरावे दिवशीं आला. इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ६५; ३. चि. ५४.

माहिती असल्यामुळें, त्यांचा उपयोग आपणांस येथील डोंगराळ युद्धांत फायदेशीर असा करून घेतां येईल असें त्याला वाटलें. यामुळें खानानें दोन गोष्टी साधल्या. एक तर, महाराजांच्या जातींचे व या प्रदेशाचे माहितगार असलेले व जे महाराजांच्या हालचालींची बित्तं बातमी देऊं शकतील असे लोक त्यांना मिळूं न देतां आपण मिळवून घेतले. दुसरें, तितक्या च नवीन लोकांच्या भरतीनें आपल्या सैन्याची संख्या जास्त करून घेतली व तितकी च पर्यायानें महाराजांच्या फौजेची कमी केली.

**१०. शत्रुपक्षाकडील लोक भरती करून आपल्या फौजेची हिंमत (morale) व आत्मविश्वास वाढविणें आणि शत्रुपक्षाची हिंमत कमी करणें:**

शत्रूच्या जातीच्या, धर्माच्या, चालीरीतींच्या, भाषेच्या व सर्वसाधारणपणें त्या च गुणांनीं युक्त अशा लोकांची आपल्या सैन्यांत भरती करण्यांत एक प्रकारचा विशेष फायदा असतो. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कांट्यानें कांटा काढावयाचा, या तत्त्वानें जो फायदा मिळतो तो च फायदा या कृत्यानें हि मिळतो. त्यांतून हे लोक जर अशिक्षित, मूढ, स्वार्थी, पोटभरू व पगारी दृष्टीचे असतील तर अशा लोकांचा फायदा, त्यांचा स्वधर्माभिमान व स्वदेशाभिमान या गुणांच्या योग्य अभावीं आपल्या पक्षास चांगला च करून घेतां येतो.

**कान्होजी जेध्याचा स्वदेशाभिमान**

खानाच्या सैन्यांत दाखल झालेल्या सगळ्या मावळ्यांना स्वधर्माभिमान किंवा स्वदेशाभिमान नव्हता असें आमचें म्हणणें नाहीं. ते जात्या च गरीब असल्यामुळें, परिस्थितीनें गांजून कदाचित् पोटासाठीं चार पैसे मिळविण्याच्या इच्छेनें हि, तो एक मार्ग म्हणून, खानाच्या सैन्यांत

दाखल झाले असतील. तसें च ज्याचें आपण मीठ खाऊं त्याला (स्वदेश व स्वधर्म यांच्या विरुद्ध जाऊन हि) जागलें पाहिजे, ही आंधळी भावना त्यांच्या मनांत उद्भवली असेल. उदाहरणार्थ, चंद्रराव मोरे याचें महाराजांशीं घडलेलें वर्तन. याच्या उलट हि उदाहरण त्या वेळीं घडलेलें दिसून येतें. कारीचा देशमुख कान्होजी जेधे यानें खानास न मिळतां महाराजांचा पक्ष उचलला. खानाकडून त्यास महाराजांच्या विरुद्ध विजापुरीफौजेस मिळाल्यास, मोठमोठ्या जहागिरींची व इनामांची लालूच दाखविण्यांत आली होती; परंतु तीस बळी न पडतां आणि आपलें पारिपत्य विजापूरदरबाराकडून होईल ह्याची भीति न बाळगतां, तो महाराजांना आपल्या सर्व जमावांनिशीं सामील झाला. एवढें च नव्हे तर, महाराजांनीं त्याची परीक्षा घेण्याच्या निमित्तानें त्याच्या वतनाची त्याला आडकाठी दाखविली. तेव्हां त्यानें आपल्या वतनावर पाणी हि सोडलें. हें त्याचें वर्तन स्वाभिमानाचें, स्वधर्माचें व स्वदेशाभिमानाचें द्योतक नव्हे असें कोण म्हणेल? हिंदवी स्वराज्यस्थापनेच्या कामीं महाराजांना त्यानें मदत करूं नये म्हणून विजापूरदरबारनें त्याला पूर्वी दिलेल्या व आणखी जास्त देऊं केलेल्या वतनांवर त्यानें पाणी सोडिलें व खानाला मदत करून जो पादशाही मानपान मिळण्याजोगा होता त्याला हि लाथेनें झुगारून दिलें. महाराजांकडून कोणत्या हि तऱ्हेचा वतन, जहागीर किंवा मानमरातब यांचा फायदा होण्याचा त्या वेळीं बिलकूल संभव नव्हता. उलट सर्व प्रकारें त्रास, हालअपेष्टा व शत्रूच्या (खानाच्या) हातीं लागल्यास अत्यंत भयंकर

१. जे. क. शि. च. प्र.; जे. श.

छळ होण्याची व प्राणावर बेतण्याची खात्री असतां हि कान्होजीनें महाराजांची च बाजू उचलली.

खानास मिळालेले मराठे

कान्होजी शिवाय इतर मावळे सरदार म्हणजे मंबाजी भोंसले, (त्याचा भाऊ बाबाजी भोंसले हा महाराजांच्या बाजूनें लढला. हा बोचेघोळीच्या घाटांत होता[२]), बेंद्रे, बांदल, इंगळे, घाटगे, खराटे, पांढरे, जाधवराव, प्रतापराव मोरे, घोरपडे, काटे[३] वगैरे जे खानाला मिळाले असें आपण ऐकतों, ते आंतून खानाची बातमी महाराजांना पुरविण्याचें काम करून, अशा तऱ्हेनें त्यांना मदत करीत नसतील हें तरी कशावरून? किंवा ऐन प्रसंगीं खानाच्या बाजूनें लढण्यांत कुचराई तरी करीत नसतील कशावरून? कारण स्वधर्म व स्वराज्य यांच्या विस्ताराला होईल त्या प्रकारें प्रत्येकानें मदत केली पाहिजे, ही भावना महाराजांनीं आपल्या उदाहरणानें प्रत्येक जाणत्या हिंदूंत उत्पन्न केली होती. अशा प्रकारचे कांहीं लोक सोडून दिल्यास मागें म्हटल्याप्रमाणें केवळ पोटभरू असे थोडे लोक खानास मिळाले असण्याचा संभव आहे.

महाराजांबद्दल सार्वत्रिक सहानुभूति

त्या वेळीं चहूंकडे च माजलेल्या यावनी सत्तेच्या विरुद्ध, महाराजांनीं जो स्तुत्य उपक्रम सुरू केला होता, त्याबद्दल त्या वेळच्या प्रत्येक हिंदु माणसाला सहानुभूति असणें स्वाभाविक होतें. जवळ कोणत्या हि प्रकारची मदत नसतां महाराजांनीं स्वराज्य व स्वधर्माकरितां कंबर बांधून,

---

१. शि. भा. अ. २२. श्लो. ४६; पो. चौ. ६; २. शे. ब. २५.
३. शि. भा. अ. १७. श्लो. ५५. ५८.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

येणाऱ्या संकटांना न जुमानतां तोंड देऊन व स्वार्थत्याग करून जो प्रयत्न चालविला होता, तो पाहून प्रत्येक माणसास त्यांना प्रत्यक्षाप्रत्यक्ष मदत करण्याची इच्छा होणें साहजिक होतें. महाराजांची कार्य करण्याची हातोटी, त्यांचें साहस, युक्ति, पराक्रम, अचाट बुद्धि, आत्मविश्वास, शिकवणूक, निश्चय, स्वार्थत्याग वगैरे अनेक गुणांवर लुब्ध होऊन, त्या वेळच्या लोकांना त्यांच्या कार्याविषयीं सहानुभूती वाटत होती; आणि म्हणून ज्यांना उघड रीतीनें त्यांना मिळतां येणें शक्य नव्हतें त्यांनीं अंतस्थ रीतीनें आपापल्या शक्त्यनुसार त्यांना मदत केली.

**शत्रूकडील फितूर**

शत्रूच्या सैन्यांतील गरीब व पैशाच्या अडचणींत असलेले, हुषार असून हि वरिष्ठांच्या गैरमर्जीमुळें मागें पडलेले, असे लोक हुडकून काढून, त्यांना आपल्या जाळ्यांत पकडून व पैशाची मदत करून, त्यांच्याकडून त्यांच्या च सैन्याची बातमी मिळविण्याचा प्रयत्न आजकाल सुद्धां होत असतो. खानाच्या सैन्यांत अशा तऱ्हेचे कांहीं हिंदु सरदार असूं शकतील. कारण, खानानें पूर्वीं पंढरपूर, शिंगणापूर व तुळजापूर येथें देवांवर अत्याचार केले होते असें म्हणतात. त्यामुळें त्याच्या हिंदु सरदारांत आणि सैन्यांत बेदिली झाली असावी. अशांना महाराजांनीं आपल्या बुद्धिचातुर्यानें व त्यांचें मन स्वधर्मसंरक्षणाकडे ओढ घेईल अशा कर्तबगारीनें वश करून घेऊन, त्यांच्याकडून खानाच्या सैन्यांत हेराचें काम करवून, पाहिजे असलेली सर्व प्रकारची माहिती वेळोवेळीं मिळविली असण्याचा संभव आहे. ( पूर्वीं अहमदनगरचा सुभा नसीरखान ह्याच्यावर शिवाजीनें चांभारगोंद्याकडे स्वारी केली तेव्हां फितूर होऊन शत्रूस मदत व माहिती पाठविणाऱ्यांना देहांत शिक्षा देण्यास औरंगजेबानें नसीरखानास कळविलें. )

## ११. अफझलनें घातलेला पेंच व महाराजांची मुत्सद्देगिरीः

बजाजी निंबाळकरा-वरील संकट.

मागें सांगितल्याप्रमाणें खान हा विजापुराहून निघून पंढरपूर मार्गानें शिंगणापुरापर्यंत येऊन थडकला. शिंगाणापुराहून वांईकडे जाण्यास दोन रस्ते फुटतात. एक मलवडीवरून व दुसरा फलटणवरून. फलटणास या वेळीं महाराजांचा व्याही बजाजी निंबाळकर हा हजार बाराशें फौजेसह होता. बाह्यतः तो विजापूरकरांचा मांडलीक असला तरी अंतस्थपणें महाराजांच्या बाजूचा होता. या अफझल-प्रकरणांत त्यानें उघडपणें कोणती च कामगिरी केल्याचा उल्लेख आढळत नाहीं; ह्मणजे त्यानें विजापूरदरबारास किंवा महाराजांना प्रत्यक्ष मदत केल्याचा पुरावा सांपडत नाहीं. तथापि, असें असतां हि, तो महाराजांना आंतून सामील असावा अशी शंका कोणास हि येणें साहजिक होतें; तशी ती खानाच्या मनांत आली व त्यावर त्यानें एक कडक उपाय हि योजला. त्यानें मलवडी येथें असतांना बजाजीला पकडून आणलें आणि त्याच्यावर महाराजांना आंतून सामील असल्याचा आरोप ठेऊन त्याच्या गळ्यांत तोफ घालून व त्याची सुंता करून हत्तीच्या पायाखालीं देण्याची शिक्षा त्याला फर्माविली. बजाजीवर हा सुंतेचा प्रसंग दुसऱ्यानें येणार होता. कारण, पूर्वी एकदां त्याला विजापूरच्या आदिलशहानें जुलमानें बाटविलें होतें. ही गोष्ट मातुश्री जिजाबाईस समजल्यावर तिला व महाराजांना फार वाईट वाटलें. निंबाळकर घराण्याचा व भोंसल्याचा पिढीजाद सोयरीकसंबंध होता, तेव्हां ह्या व इतर कारणांमुळें महाराजांनीं व जिजाबाईसाहेबांनीं बजाजीला शुद्ध करून, पुन्हां हिंदुधर्मात घेतलें व कर्मठ मराठ्यांना बोलावयास सवड राहूं नये म्हणून महाराजांनीं आपली कन्या

सखुताई बजाजीचा मुलगा महादजी यास दिली. हे अंदाजे १६५७ त घडलें पुढें दोन वर्षांनीं पुन्हां तें च संकट खान बजाजीवर आणूं पहात होता.

महाराजांची मुत्सद्देगिरी

याप्रमाणें संकटांत सांपडल्यावर बजाजीनें ती हकीकत महाराजांना कळविली; तेव्हां ते मोठ्या विचारांत पडले. या प्रसंगीं खानावर एकदम चाल करून जाण्याइतपत त्यांची तयारी झाली नव्हती. कदाचित् तयारी करून त्याच्यावर हल्ला केला असता, तर इष्टा ऐवजीं अनिष्ट परिणाम झाला असता. म्हणजे खानानें बजाजीला हत्तीच्या पायांखालीं चटकन् देऊन टाकलें असतें. प्रथम बजाजीची सुटका करणें हें मुख्य काम; मग खानाचें पारिपत्य करतां येईल. म्हणून या नाजुक प्रसंगीं शक्ती ऐवजीं युक्तीचा उपाय त्यांनीं अंमलांत आणला. खानाचा मुक्काम मलवडीस होता. मलवडीचा जहागीरदार नाईकजीराजे पांढरे हा आदिलशाही सरदार असून या वेळीं खानाबरोबरच्या सैन्यांत होता. खानाजवळ त्याचें वजन होतें व या वेळीं खान त्याचा च पाहुणचार घेत होता. महाराजांनीं या नाईकजीस बजाजीला सोडविण्याची खटपट करण्याबद्दल पत्रें लिहिलीं. तेव्हां नाईकजीनें खानाजवळ रदबदल करून बजाजीजवळून साठ हजार होन दंड देण्याचें कबूल करवून त्याची सुटका मोठ्या मिनतवारीनें केली.[२] सत्ताधीश सेनापती राष्ट्राची ताकद एकवटण्याला कालमानाप्रमाणें प्रयत्न करतो व तो अत्यंत अवश्य असतो. ह्या दृष्टीनें ही हिंदूंनीं शुद्धि व स्पृश्यास्पृश्याचा विचार करावा.

---

१. स. दे. ४९०-९१.; २. रत्नाकर मासिक व. २ अं. ९.

## खानाचें दोस्त-सैन्य

खानाची मुत्सद्देगिरी व युद्धपैक्यांत भर.

खान हा जाडा मुत्सदी व चतुर सेनापती होता; बखरकार किंवा आतांपर्यंतचे इतिहासकार समजतात तसा तो नुसता आडमुठा व गर्विष्ठ नव्हता, याबद्दलचे पुरावे आमच्या या पुस्तकांत आढळतील. या प्रसंगीं हि खानानें चतुराई प्रगट करून सेनापतीचें काम बजावलें होतें. बजाजीस आपण पकडलें तर महाराज त्याला सोडविण्याची खटपट अवश्य करणार हें तो जाणून होता. तेव्हां, त्या खटपटींत आपल्या मोहिमेला आर्थिक परिस्थितीचा फायदा करून घ्यावा असा बेत त्यानें मनांत योजून हें नाटक घडवून आणलें. त्यांत त्याचा कयास खरा ठरून त्याला साठ हजार होनांची प्राप्ति झाली व त्याच्या सैन्याचा थोडासा खर्च परस्पर भागण्यास मदत झाली.

### १२. खंडोजी खोपडे, सिलीमकर वगैरे इतर जमावांची मदतः

खानाचे मदतनीस किंवा दोस्त

वरील तीन हजार मावळ्यांशिवाय, खानानें उत्रोलीचा केदारजी व खंडोजी खोपडे देशमूख व त्यांचा पांच हजार मावळ्यांचा जमाव ह्यांची मदत मिळविली.[1] तसें च गुंजण मावळचा देशमूख विठोजी सिलीमकर व मावळांतील आणखी हि इतर जमातदार ह्यांना लांचलुचपतीनें जहागिरीचीं व वतनदारीचीं आमिषें दाखवून आपल्या बाजूस वळवून घेतलें. विठोजीचा भाऊ बाळाजी सिलीमकर हा मात्र इकडे महाराजांना मिळाला होता.[2] त्याची विशेष माहिती ढेप्याच्या लढाईंत देण्यांत येईल.[3] मंबाजी भोसले

१. म. सा. ब. २३; ए. क. ब. ३२; २. जे. क. शि. च. प्र. जे. शे; ३. शे. ब. २५.

२५ श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं ______ ग्रंथानुक्रमांक ____
किंमत ______ पाने ______

ह्याला हि खानानें वरच्याप्रमाणें, युक्तीनें आपल्या बाजूस वळवून घेतलें[1]. ह्याचा भाऊ बाबाजी हा पारच्या लढाईंत महाराजांतर्फे लढत होता, त्याची हि माहिती पुढें देण्यांत येईल. या लोकांखेरीज किंवा दोस्तां-(allies) खेरिज म्हसवडचा रतनजी माने, मलवडीचा नाईकजी व मलजी पांढरे, रविराव ढोणे, भोसल्यांचे नेहमींचे हाडवैरी व महाराजांचे मातुलपक्षीय दौलताबादकर जाधवराव, धुळाजीराजे शेडगे, देवजीराजे धायगुडे, तानाजीराजे कोकरे इत्यादि सरदार व सरंजामदारांची ससैन्य मदत खानास होती[2].

महाराजांचे मदतनीस

याप्रमाणें खानानें अल्ली आदिलशहाच्या नांवाचीं इनाम, वतन, जहागीर वगैरे बक्षिसांचीं बादशाही फर्मानें[3] धाडून मावळांतील पांढरे, इंगळे, खराडे, घोरपडे, घाडगे, काटे, बेदरे, बांदल, प्रतापराव मोरे, पिलाजी व शंकराजी मोहिते वगैरे बऱ्या च देशमूखदेशपांड्यांस आपल्या बाजूस वळवून घेण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या आमिषास वरील मंडळी बळी पडली[4]. फक्त कान्होजी जेधे, बाळाजी सिलीमकर, बाबाजी भोसले वगैरे फार च थोडी मंडळी महाराजांस चिकटून राहिली व अशा तऱ्हेनें त्यांनीं आपला स्वदेशाभिमान आणि बाणेदारपणा व्यक्त केला[5]. इकडे मागें, सांगितल्याप्रमाणें मावळे देशमुखांना त्यांच्या जमावासह आपल्याकडे मिळवून घेण्यांत खानानें दुहेरी डाव साधला.

---

१. शे. ब. २५; २ रत्नाकर व. २ अं. ९.; ३. जे. श.; ४. शि. भा. अ. १७ श्लो. ५५–५८; अ. १८ श्लो. ८; अ. २१ श्लो. ५७–६१; अ. २३ श्लो. १६, १७, ३४, ३५; जे. क. शि. च. प्र.; ५. जे. क. शि. च. प्र.

खान वांईस पोंहोंचल्यावर जशी त्यानें वाटेंत नवीन फौजभरती केली, तसें च वांई येथें आल्यावर हि त्यानें आपली फौज वाढविण्याचा सपाटा चालविला.

**१३. खानाचें वांई येथील एकंदर सैन्य:**

वांईस आल्यानंतर, खानाच्या एकंदर सैन्याची संख्या पुढील-प्रमाणें होती:—

तो विजापुराहून निघाला तेव्हां त्याजपाशीं बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ, ८०।९० मोठ्या तोफा, त्यांचे हजार बाराशें खलाशी, ३००।४०० लहान तोफा व त्यांचे हि ४५०० खलाशी होते. नंतर, त्यानें वाटेंत तीन हजार मावळ्यांचें पायदळ जमविलें होतें. शिवाय खोपडे, सिलिमकर, भोसले, पांढरे, इंगळे, बेंद्रे, घाटगे इत्यादि मागें सांगितलेल्या सरदारांचे कमींत कमी आठ नऊ हजार लोक हि होते. खुद्द वांई येथें आल्यानंतर लढाईच्या वेळेपर्यंत रोजच्यारोज जास्त जास्त फौज जमा होत च होती. येणें प्रमाणें ही सर्व संख्या एकत्रित केल्यास जवळ जवळ चौतीस पस्तीस हजार किंवा याहून थोडीशी जास्त फौज खानाजवळ होती, असें मानणें चुकीचें ठरणार नाहीं. याशिवाय प्रत्येक सैन्याबरोबर असणारें बाजारबुणगे ( हे लोक प्रसंगीं लढाई हि खेळत. टिपूवरील अनेक मोहिमांत यांनीं त्याच्या कहीवर हल्ला केल्याचे उल्लेख खरेशास्त्र्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहांत आलेले आहेत. ) व बिन लढाऊ लोक असतील ते निराळे च. त्यांची संख्या सैनिकांच्या गणनेंत करण्याची आवश्यकता नाहीं.

---

१. ज. ६९; चि. ५४; शे. ब. २५.

## १४. तत्कालिन सैन्याचें सर्वसाधारण शिक्षण व संघटना:

**सरंजामी सैन्य**

त्या वेळीं, बहुतेक सर्व राज्यांमधून सरंजामी पद्धत च विशेष चालू असे. त्यामुळें सरकारास खडी फौज कमी ठेवणें परवडत असे. सरंजामी फौजा हि सतत वर्षभर पदरीं न ठेवितां, आठ महिने कामावर रहात असत. पावसाळ्याचे चार महिने फौजेला विश्रांति मिळे. पावसाळयांत स्वाऱ्याशिकारी क्वचित् होत. तशी च पाळी आल्यास फौजेला मुद्दाम बोलवण्यांत येई. ह्यामुळें खडें सैन्य सतत बारा महिने ठेवण्याच्या खर्चापेक्षां या रीतीनें कमी खर्च येई. मात्र सरकारचें हुजरात ( गडांवरील वगैरे शिबंदी हि ) नांवाचें जें सैन्य असे, तें बारा महिने नोकरीवर असे.

**सैन्याचीं हत्यारें**

हुजरात सैन्याचें लष्करी सामान व हत्यारें हीं चांगल्या तऱ्हेचीं असत. त्या वेळीं फौजेला जीं हत्यारें वगैरे पुरविलीं जात, त्यांत पट्टा, तरवार, वीट, भाला, दारूचे बाण, सांग, खांडा, कट्यारी, माडू, खंजीर, बिचवा, वगैरे ह्यांचा समावेश होई[1]. त्यामुळें या प्रत्येक हत्याराचें शिक्षण शिपायांना अत्यंत आवश्यक असे.

**तोफखाना**

सैन्यांपैकीं तोफखाना हा खुद्द सरकारच्या मालकीचा असे. सरंजामदारांपैकीं अतिशय उच्च दर्जाच्या सरदारां-जवळ तोफा असत पण त्या थोड्या असत. तसें च घोडा व बंदूक ह्यांचें हि शिक्षण सार्वत्रिक असे. ह्यांचें शिक्षण नाहीं असा मनुष्य त्या काळीं पोरापासून थोरापर्यंत विरळा! तोफांचें शिक्षण मात्र वरीलप्रमाणें सार्वत्रिक नसे.

---

१. पो. खर्ड्याच्या लढाईचा.

## १५. सैन्य–विभागः

त्या काळीं आजच्या सारखे सैन्याचे निरनिराळ्या प्रकारचे सूक्ष्म विभाग केलेले नसत. आजकाल जसें सेक्शन, प्लाटून, कंपनी, बॅटालियन, ब्रिग्रेड, डिव्हिजन, आर्मी-कोअर, आर्मी वगैरे एकाहून एक मोठे व सुव्यवस्थित असे भाग असतात, तसे व बरोबर इतक्या च संख्येचे एक एक भाग त्या वेळीं नसत. हे असे विभाग पाडण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, व्यवस्थितपणानें व वेळच्यावेळीं ज्याचे त्यांना हुकूम पोंहचणें, सैन्याच्या तुकड्या आपापल्या छोट्या छोटया सेनापतींच्या कह्यांत व ताब्यांत रहाणें या गोष्टी साधल्या जाव्या व सैन्यास अवश्य अशी जी शिस्त व वळण तें लागलें जावें.

**आजचे सैन्यविभाग**

आजकाल लांब पल्ल्याच्या व काडतुसाच्या बंदुका ( ब्रीच लोडर्स गन्स अँड रायफल्स), तोफा, विमानें, धूर न होणारी दारू वगैरे गोष्टी व शोध अस्तित्वांत आल्यामुळें, युद्धांतील माऱ्याचें क्षेत्र ( range of cover ) ह्या बाबतींत बरा च मोठा फरक झाला आहे. पूर्वी आजच्या मानानें फार लांब पल्ल्याच्या बंदुका व तोफा नव्हत्या. तसें च त्या वेळीं वापरली जाणारी दारू बिन धुराची नसून तिच्यांतून बरा च धूर निघत असे व त्यामुळें शत्रूची व स्वतःची जागा ताबडतोब उघडकीस येई. ह्या सर्वांचा परिणाम हातघाईच्या लढाईंत होतो. त्या काळच्या सैन्यविभागणीमुळें एकंदर सैन्यावरील हुकमतीचा प्रश्न ( control of force ) आजच्यापेक्षां बऱ्या च निराळ्या तऱ्हेनें सुटत असे. आजच्या प्रमाणें सैन्याचे विभाग वं ठराविक संख्येच्या लहान मोठ्या तुकड्या करण्याचें तेव्हां कारण नव्हतें. तरीपण तेव्हां हि जवळ जवळ ह्या च प्रकारचे, सैन्याचे लहान मोठे विभाग असत.

**माऱ्याचें क्षेत्र**

१६. पायदळ:

महाराजांच्या सैन्यांत, दहा शिपायांपासून सैन्याचे विभाग होत.

सैन्यश्रेणि

दहा शिपायांवर एक नाईक, पांच नाइकांवर एक हवालदार, तीन हवालदारांवर एक जुमलेदार, दहा जुमलेदारांवर एक हजारी, अशा पांच हजाऱ्यांवर एक पंचहजारी, सात हजाऱ्यांवर एक सप्तहजारी व या सर्व पायदळावर एक सरसेनापती असून त्यास सरनोबत म्हणत[1]. अशा च प्रकारचे पायदळी सैन्यांतील विभाग थोड्या फार फरकानें निरनिराळ्या राजांच्या सैन्यांत त्या वेळीं असत. सैन्याचे असल्या प्रकारचे विभाग पाडण्याचें कारण, वर सांगितल्याप्रमाणें लढाईंत केव्हां हि यश येण्यास सैन्यांत उत्तम अशी शिस्त व वळण अवश्य लागतें हें होय.

१७. घोडदळ:

महाराजांच्या घोडदळांत पंचवीस स्वारांचें एक पथक असे; त्यावर एक हवालदार असे. पांच हवालदारांवर एक जुमलेदार आणि दहा जुमलेदारांवर किंवा १२५० माणसांवर एक हजारी असे. अशा पांच हजाऱ्यांवर एक पंचहजारी असे आणि अशा पांच पंचहजाऱ्यांवर म्हणजे या सर्व घोडदळावर सरसेनापती असे. त्यास हि सरनोबत ही पदवी होती[2]. दर २५ घोडयांमागें एक नालबंद व एक पखाली असे[3]. ह्याप्रमाणें विजापूर दरबारच्या सैन्यांत हि थोड्या फार प्रमाणांत असे च विभाग होते.

---

१. स. २२–२३. २. शे. ब. ३९.

३. स. २२-२३; शे. ब. ३१.

**१८. आदिलशाही सैन्यांतील हत्यारें व एकंदर सैन्यव्यवस्थाः**

विजापूरच्या सैन्यांत पुढील बहुतेक लष्करी अंगांचा समावेश झाला होता. पायदळ, घोडदळ, तोफखाना, मोदीखाना ( commissariat ) वाहतूकींचीं साधनें वगैरे ( transport ), बेलदार व कुऱ्हाडे ( engineers, sappers & miners छप्पर मैना ), हेर व टेहळ्ये यांचें नजरबाज खातें ( intelligence dept. ) वगैरे खातीं मराठ्यांच्या सैन्यासारखींच होतीं.

**१९. पायदळाचीं हत्यारें:**

पायदळाची संघटना वर सांगितली च आहे. आतां त्याच्या हत्यारांबद्दल विचार करूं पूर्वी पायदळांत बंदूक व तरवार हीं च मुख्य हत्यारें असत. हल्लीं पायदळाला दूरच्या किंवा गोळीबाराच्या लढाईसाठीं बंदूक व हातघाईच्या लढाईसाठीं त्याच बंदुकीला पुढें जोडण्यांत येणारी संगीन असते. हल्लीं पूर्वीप्रमाणें पायदळाजवळ तलवार नसते. तलवारीचा उपयोग हात घाईच्या च प्रसंगीं होतो. परंतु, तलवारी ऐवजीं संगिनींचा उपयोग करतां येत असल्यामुळें व शिपायांना अंगावर जास्त वजन लादून नेणें त्रासदायक असल्यामुळें दोन अगदीं निरनिराळीं हत्यारें वाळगणें सोईचें नसल्यामुळें, हल्लीं सैन्यांतून पायदळाच्या तलवारी काढून त्यांच्या ऐवजीं बंदुकीला पुढें जोडतां येतील अशा संगिनींची योजना केलेली असते. त्या मुळें बंदुकीचा उपयोग गोळीबाराच्या लढाईमध्यें ( fire action ) व संगिनीचा उपयोग हातघाईच्या लढाईंत ( shock action ) होतो. पूर्वींच्या पायदळांतील बीट, खांडा, सांग वगैरे निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें वापरणाऱ्या लोकांवर एकशिस्तीचा व एकहुकमतीचा ताबा राहण्याची

*तरवार व संगीन*



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

इतकी आवश्यकता नव्हती; परंतु हल्लीं तशी परिस्थिती नाहीं. ह्यामुळें हीं सर्व हत्यारें काढून टाकून त्यांच्या जागीं संगीन हें एक च सर्व-साधारण हत्यार सांप्रत उपयोगांत आणून हातघाईच्या लढाईंत एकसूत्री-पणा आणला आहे. तरी सुद्धां हल्लीं संगीन असून हि हातघाईच्या लढाईंत एकसूत्रीपणा ठेवण्यांत पूर्वींच्या निरनिराळ्या हत्यारांच्या ज्या अडचणी होत्या त्या आहेत च फक्त एका च हत्याराचें शिक्षण सार्व-त्रिक झालें, एवढें मात्र म्हणतां येईल. त्याशिवाय विशेष प्रकारचा फायदा संगीनीनें लढाई खेळण्यांत होतो असें कांहीं नाहीं.

**२०. घोडदळाचीं हत्यारें:**

**पूर्वींच्या घोडदळाचीं हत्यारें**

घोडदळाची सामान्य रूपरेखा वर दिलेली च आहे. घोडदळाचीं मुख्य हत्यारें त्या वेळेस तलवार व भाला हीं असत. शिवाय, बंदूक, पट्टा वगैरे इतर हत्यारें हि कोणा-कोणांजवळ असत. त्या काळीं घोडदळाचें मुख्य काम हातघाईच्या लढाई ( shock action or shock tactics ) चें व हात-घाईच्या लढाईस लागणाऱ्या डावपेंचांचें असे. ज्यांच्या जवळ बंदुका असत, ते विशेष प्रसंगीं आपल्या बंदुकांचा उपयोग हि करीत. सर्व घोडदळाजवळ बंदुका नसल्यामुळें, सर्वांना च गोळीबाराची ( fire action ) लढाई करण्याचा प्रसंग नेहमीं येत नसे.

**आजच्या घोड-दळाचीं हत्यारें**

हल्लीं घोडदळाचे दोन भाग असतात; ते म्हणजे, हलकें व भारी घोडदळ ( light and heavy cavalry ) होत. तसें च हत्यारांच्या बाबतींत, सांप्रत, सर्व घोड-दळांत गोळीबाराच्या आणि हातघाईच्या लढाईला अवश्य लागणारीं दोन्हीं प्रकारचीं हत्यारें असतात; म्हणजे हातघाईच्या

लढाईसाठीं तलवार किंवा भाला व गोळीबाराच्या लढाईकरितां बंदुक व मशीनगन्स वगैरे असतात. प्रसंगविशेषीं, घोडदळाला हातघाईच्या लढाईच्या वेळीं, बंदूक बाजूला सारून तलवार व भाला यांचा उपयोग करतां येतो. अशा वेळीं केव्हां केव्हां घोडेस्वार हा, हातघाईचा प्रसंग जवळ आणण्याकरितां पायउतारा होऊन बंदुकीनें पायदळ शिपाया-प्रमाणें हि काम करितो. म्हणजे घोडदळांतील प्रत्येक शिपायास दोन्ही कामांची ( घोडेस्वाराची व पायदळ शिपायाची ) माहिती असणें अत्यंत आवश्यक असतें.

**२१. तोफखाना** ( artillery ):

**खानाचा तोफखाना**

हल्लींच्या युद्धांत जसें तोफखाना हें सैन्याचें मुख्य अंग आहे, तसें च पूर्वीं सुद्धां त्यास तितकें च महत्त्व होतें. खानाच्या बरोबर भरभक्कम तोफखाना होता[१]. मात्र तोफांची संख्या किती होती हें नक्की सांगतां येत नाहीं. तरीपण पुढील गोष्टीवरून अनुमान बसवितां येतें. त्याच्या सैन्यांत महाराजांना युद्धाच्या अखेरीस जो माल सांपडला, त्यांतील हत्ती, उंट वगैरे जनावरां-वरून ही संख्या निश्चित करतां येईल. निरनिराळ्या यादींतून हत्तींची संख्या पासष्ट पासून पंचाण्णव पर्यंत दिलेली आहे[२].

**अवजड तोफखाना (heavy artillery)**

त्या वेळीं लढाईंत हत्तींचा उपयोग मुख्यतः अवजड तोफा ओढ-ण्याकडे केला जाई. तसें च निशाण नेण्याकरितां, स्वारीकरितां आणि किल्ल्यांचे दरवाजे फोडण्या-करितां हि हत्ती सैन्यांत बाळगीत असत. खानाच्या

१. शि. भा. अ. २२, श्लो. ३७. पो. चौ. ९. २. शे. ब. ३२; स. १९.

सैन्यांतील वरील कामासाठीं दहा वीस हत्ती सोडून दिल्यास साधारणपणें ७०।७५ हत्ती तोफा ओढण्याच्या कामीं शिल्लक राहतात. ह्यापेक्षां हि जास्त हत्ती तोफखान्याकडे असण्याचा संभव आहे. कारण, महाराजांना मिळालेल्या सामानांत खानाचे सर्व च हत्ती त्यांना मिळाले असतील असें कांहीं नाहीं.

पल्लेदार तोफांची आवश्यकता

शिवाजीमहाराज हे बहुधां डोंगरांत अडचणीच्या जागीं अथवा किल्ल्यांत राहून आपल्यास तोंड देतील; कारण, असल्या लढाईंत ते फार तरबेज आहेत; तेव्हां त्यास उपाय म्हणून आपल्याजवळ मोठमोठया लांब पल्ल्याच्या म्हणजे माऱ्याच्या ( long range guns ) घेणें अवश्य आहे असें खानाला वाटणें साहजिक होतें. आपल्या इच्छेप्रमाणें महाराजांनीं मैदानांत लढाई दिली नाहीं तर, त्यांना, ते असतील तेथें तटबंदीच्या अथवा कोट किल्ल्याच्या जागीं गांठण्याकरितां वेढा देणें खानास भाग होतें. म्हणून, असला वेढा देण्याच्या कामीं उत्तम तऱ्हेनें उपयोगी पडतील अशा लांब पल्ल्याच्या मोठमोठया तोफा बरोबर घेणें त्याचें कर्तव्य होतें. वेढ्याच्या लढाईंत, मैदानांतील लढाईपेक्षां केव्हां हि मोठमोठया व लांब माऱ्याच्या तोफांचें प्रमाण बरें च जास्त असतें. विजापूर व वांई या दरम्यान जे गड, किल्ले अथवा तटबंदीचीं ठिकाणें होतीं, तेथें वाटेंत च महाराजांनीं आपणांस गांठलें तर मैदानांतील व वेढ्याची हि लढाई करण्याचा प्रसंग येणार, हें खान जाणून होता. म्हणून अशा प्रसंगाला पूर्णपणें तोंड देतां यावें यासाठीं त्याच्या सैन्याबरोबर असल्या मोठया व पल्लेदार तोफा पुष्कळ असणें योग्य होतें.

तोफांचें सर्वसाधारण प्रमाण

पूर्वींपासून आजपर्यंत जड तोफांचें प्रमाण, दर एक हजार शिपायांमागें कमींत कमी व जास्तींत जास्ती सहा ते आठ असें आहे. खानाच्या सैन्यांत तोफखान्याकडील लोकांची संख्या व बेलदार, कुऱ्हाडे, ( engineers व छप्परमैना ) वगैरे इतर लोक सोडून देतां स्वार व पायदळ मिळून चौतीस पस्तीस हजार सैन्य होतें. तेव्हां वरील प्रमाणानें १२८ पासून २५६ पर्यंत मोठया तोफा त्याच्या सैन्याबरोबर असणें कांहीं वावगें नाहीं. तरी पण ही संख्या सोडून देऊन, आम्हीं हत्तींची संख्या लक्ष्यांत घेऊन असें म्हणतों कीं, खानापाशीं निदान कमींत कमी ७० ते ७५ पर्यंत मोठया व जड तोफा असाव्यात.[1]

हलक्या तोफा (light artillery)

वर सांगितलेल्या जड व भारी तोफा डोंगराळ व पहाडी मुलखांत, जेथें त्या नेण्याला रस्ते नसतात, अशा ठिकाणीं फारशा उपयोगीं पडत नाहींत. अशा जागीं लहान व हलक्या तोफांचा उपयोग चांगला होतो. या दृष्टीनें खानानें आपल्या बरोबर हलक्या तोफा हि आणल्या होत्या[2]. कारण, जर एखाद्या बिकट व रस्ते नसलेल्या अशा डोंगराळ प्रदेशांत व पहाडी किल्ल्यांत महाराज दबा धरून बसतील, तर तसल्या प्रदेशांत नेण्याला योग्य अशा लहान व कमी अवजड तोफा जवळ बाळगणें खानास अवश्य होतें. म्हणजे, अशा प्रसंगीं त्या ७०।७५ मोठ्या तोफांचा फारसा उपयोग झाला नसता. खानानें आणिलेल्या हलक्या तोफांचा अंदाज महाराजांना युद्धअखेरीस सांपडलेल्या बैल, उंट वगैरेंच्या संख्येवरून समजेल.

---

१. शे. ब. ३२. २. शे. ब. २४.

अवजड तोफांची अडचण

या मोठ्या तोफांपैकीं, थोडयाशा तोफा त्याला असल्या अड-चणींच्या जागीं कदाचित् नेतां आल्या असतील व त्यानें त्या नेल्या असतील हि. बाकी बहुतेक मोठ्या तोफा त्यानें वांई येथें ठेवल्या असाव्यात. कारण वांई ही त्याची अघाडीची कोठी ( advanced base) होती. वांई सोडून खान पार मुक्कामीं जरी पुढें आला होता, तरी त्याची मुख्य फौज वांई येथें च होती[1]. शिवाय, प्रसंगविशेषीं जर खानाला युद्धांत माघार घेण्याची पाळी आली असती, तर त्या घाईत त्याला त्या मोठ्या तोफा सुरक्षितपणें निभावून मागें आणणें मुळीं च साधलें नसतें. अशा वेळीं असल्या तोफा रणांगणांत च टाकून जावें लागतें आणि जातांना त्या शत्रूच्या उपयोगीं पडूं नयेत म्हणून त्यांच्या कान्यांत खिळे मारून अथवा त्या मोडून तोडून टाकणें भाग पडतें. सांप्रत, अशा प्रसंगीं गन कॉटन, कार्डाईट, जिलाईट वगैरे स्फोटक द्रव्यांच्या सहाय्यानें ह्या तोफा बरबाद हि करितात. वांई पासून पार पर्यंतचा त्या वेळचा रस्ता अतिशय बिकट व अरुंद होता. त्यांत ठिकठिकाणीं भयं-कर चढउतार, वळणेंवांकणें, दऱ्याखोरीं व दाट जंगल होतें. ह्यामुळें रडतोंडीच्या घाटानें आपल्या जड तोफा पारपर्यंत नेणें सुद्धां, खानाला अतिशय गैरसोईचें व त्रासदायक झालें असतें.

लहान तोफांचे प्रकार

त्या वेळच्या लहान व हलक्या तोफांत धूतरनाळा, जंबूर, गरनाळ व जेजाला वगैरेंचा समावेश होई. लांबी, घेर, वजन वगैरे सर्व बाबतींत ह्या तोफा हल्लींच्या पहाडी व

---

१. म. सा. ब. २२.

## लहान तोफांचे प्रकार

डोंगराळ मुलखांत उपयोगांत आणल्या जाणाऱ्या तोफां ( mountain guns ) सारख्या च असत. आजच्या ह्या पहाडी तोफा उंटांवर, खेंचरांवर व तट्टांवर लादून नेतात. त्या च प्रमाणें त्यावेळच्या या जेजाला, जंबूर, षूतरनाळा, गरनाळा वगैरे तोफा उंटांवर व तट्टांवर लादून नेत असत. षूतर म्हणजे उंट व नाळ म्हणजे बंदूक किंवा तोफेची नळी. षूतरनाळ म्हणजे उंटावरील तोफ असा या शब्दाचा अर्थ आहे. उंटावरून नेल्या जाणाऱ्या ह्या लहान तोफा कमी वजनाच्या असल्या पाहिजेत. आजकालच्या पहाडी तोफा तट्टांवर व खेंचरांवर लादतात. त्यांचे लहान व सुटेसुटे असे भाग तट्टाच्या लादीवर दोन्हीं बाजूला घालतात, त्यामुळें तट्टाच्या पाठीवरून दोन्हींकडे सारखें वजन झाल्यामुळें लादी घसरत नाहीं. पूर्वीच्या पहाडी तोफा म्हणजे जेजाला, जंबुरे व षूतरनाळा इत्यादिकांचे मात्र निरनिराळे दोन भाग नसत. त्यामुळें ती संबंध तोफच्या तोफ च या जनावरांच्या पाठीवरील लाद्यांत लादीत असले पाहिजेत हें उघड आहे. परंतु, एक च तोफ लादीच्या एका बाजूला घातली असतां लादी निसटून पडण्याचा संभव असल्यामुळें, तसल्या लहान लहान दोन तोफा लादीच्या दोन्हीं बाजूस घालणें संभवनीय दिसतें. असल्या जेजालांची लांबी साधारणपणें पांच ते सात फूट असून त्यांच्या तोंडाचा आंतील व्यास ( bore ) दीड ते दोन इंच पर्यंत असे. आजचा एखादा सशक्त मनुष्य आपल्या दोन्ही हातांनीं अशा प्रकारचा जेजाला उचलूं शकेल. ह्यावरून उंटावर दोन्हीं बाजूला अशा दोन तोफा लादल्या जाणें शक्य व संभवनीय दिसतें. तत्कालीन या लहान मोठया तोफांचे प्रकार ज्यास पहावयाचे असतील त्यास ते विजापूर या एका च शहरीं पहावयास सांपडतील.



श्री. छ. प्रतापसिंह ... नगर वाचनालय, सातारा.

या युद्धांत महाराजांना बाराशें उंट व चार हजार घोडे मिळाल्याचा उल्लेख आहे.[1] तेव्हां ह्यांपैकीं उंट व तट्टें मिळून ४००-५०० जनावरें ह्या हलक्या पहाडी तोफा ओढण्याच्या कामीं उपयोगांत आणिलीं असावींत. मागें सांगितल्याप्रमाणें, महाराज आपल्याला बहुतेक डोंगराळ मुलुखांत च लढाई करण्यास भाग पाडतील असें जाणून, खानानें आपल्याबरोबर मुबलक हलक्या तोफा घेतल्या असल्या पाहिजेत व त्या तशा घेतल्याबद्दलचा उल्लेख हि आहे, पण नक्की संख्या आढळत नाहीं.[2] आम्हीं ती कमींत कमी ४००-५०० असावी असें म्हणतों. नक्की आंकडा कळल्यास आमची संख्या कदाचित् दिढीदुपटीनें हि वाढवावी लागेल. डोंगरी लढाई करण्यासाठीं खानाच्या ३४।३५ हजार सैन्याबरोबर वर सांगितल्याप्रमाणें कमींत कमी चारशें ते पांचशें हलक्या पहाडी तोफा असणें अवश्य आहे.

**लहान तोफांची संख्या**

हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीच्या टिऱ्हावरील स्वारींत, ह्या डोंगरी तोफां ( mountain guns ) चा मैदानी तोफां ( field guns ) पेक्षां जास्त उपयोग झाला. कारण तो मुलूख सर्व डोंगराळ व पहाडी असून, रस्ते अगदीं अरुंद व अडचणींचे आहेत. तेथें तटबंदीच्या जागा आणि किल्ले हि फार आहेत. तो प्रदेश जवळजवळ प्रतापगडच्या युद्धटापूसारखा च आहे. विशेष फरक इतकाच कीं, सह्याद्रीप्रमाणें तिकडील प्रांतांत गर्द झाडी मात्र नाहीं. तिकडील डोंगर उघडेबोडके

**पहाडी तोफांचें प्रमाण**

---

१. स. १९. २. शे. ब. २४, ३१.

व दाट जंगलाशिवाय आहेत. ह्या स्वारींत ह्या पहाडी तोफांचें प्रमाण प्रत्येक हजार शिपायांमागें बारा ते सोळा होतें. वायव्यसरहद्दीवरील मलाकंद वगैरे मोहिमेनंतर हें प्रमाण हजारीं वीस ते बावीस पर्यंत गेलें होतें. ह्यावरून असल्या डोंगराळ प्रदेशांत ह्या पहाडी तोफांचें किती महत्त्व असतें व त्या किती जास्त प्रमाणांत वापराव्या लागतात हें दिसून येईल. वरील प्रमाण साधारणपणें लावून पाहिलें तर खानाच्या बत्तीस किंवा मागें समजावून सांगितल्याप्रमाणें चौतीस ते पस्तीस हजार फौजे-बरोबर १ हजार शिपायांमागें १२ ह्या हिशेबानें ३८४ ते ४२० व २० या हिशेबानें ६४० ते ७०० पर्यंत डोंगरी तोफा असाव्यात असें म्हणतां येईल. सारांश, अगदीं नक्की माहितीच्या अभावीं सुद्धां ठोकळ मानानें असें धरून चालण्यास हरकत नाहीं कीं, खानाच्या तोफखान्यांत कमींत कमी ७० ते ७५ मोठ्या तोफा व ३०० ते ४०० लहान पहाडी तोफा असाव्यात.

२२. **कुऱ्हाडे-बेलदार** ( engineers, sappers and miners ):

सैन्यांतील मोठमोठ्या विभागांबरोबर, आजकाल कुऱ्हाडे, बेलदार वगैरे छपरमैनांतील लोक आणि त्यांच्यावरील अधिकारी इंजिनियर्स हे लोक झाडी वगैरे तोडून, खांचखळगे बुजवून व असले रस्ते फौजांच्या चालीस अडथळा होऊं नये म्हणून फौजांच्या अघाडीस राहून तयार करितात; त्या च प्रमाणें तोफांकरितां किंवा बाकींच्या लोकांकरितां खंदक (trenches) व धमधमे ( gun-apaulments ) वगैरे हि तयार करि-तात. त्यामुळें शिपाई लोक विन हरकत एकदम पुढें जाऊन आप-आपल्या ठरलेल्या जागा घेऊं शकतात; तसें च योग्य जागीं तोफा हि रोखल्या जातात. ह्यामुळें शत्रुसैन्यापासून आपल्या शिपायांचा बचाव

होऊन त्यांचा वेळ फुकट जात नाहीं. ह्या च प्रमाणें पूर्वीच्या सैन्यांत सुद्धां बेलदार, कुऱ्हाडे वगैरे लोक हीं च कामें करीत असत.[1]

**२३. शिस्त** ( discipline ):

आजच्या सारखी कडक शिस्त त्या वेळीं आदिलशाहीच्या सैन्यांत नव्हती. कारण, बादशाही मिजाशीची संवय सैन्यांतील शिपायांस झाली होती. त्यांत हि मुसुलमानी शिपायांत शिस्तीच्या कामीं जास्त ढिलाई असे. कारण, आपले च जातभाई राज्यकर्ते आहेत, ही घमेंडीची भावना शिपायांत असल्यामुळें व साधारणतः मुसुलमान हा बढाईखोर असल्यामुळें, बेशिस्तपणास अधिक च वाव मिळण्याचा संभव होता. त्यामुळें सैन्यांतील वरिष्ठांचे हुकूम, शब्दशः व वेळच्यावेळीं पाळण्याच्या कामीं बेफिकीरी दिसून येई. मात्र ह्या प्रसंगीं खानासारखा कावेबाज व करडा सेनापती असल्यामुळें आदिलशाही फौजेला त्याच्या कडक शिस्तीनें चालणें भाग पडलें. परंतु, अशा प्रकारची ढिली शिस्त महाराजांच्या सैन्यांत नसे; त्यांची शिस्त अगदीं कडक असे.[2]

**२४. खानाच्या फौजेची हिंमत** (morale):

**मुसुलमानी सैन्याची हिंमत**

खाना बरोबर आलेलें विजापूरचें सैन्य कर्नाटकच्या व मोंगलांच्या थोड्या दिवसांपूर्वी झालेल्या युद्धांत यशस्वी झालें नव्हतें; त्यामुळें त्याची हिंमत यापूर्वी च एकप्रकारें खचली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं.[3] तशांत, आतां तर महाराजांशीं प्रसंग असल्यामुळें विजा-

१. रा. नी. प्र. ७; ए. क. क. ३१; शि. दि. १६३. २. स. २२–२६.
३. रा. मा. चं. प्र. ९३.

पुरी सैन्याची हिंमत जास्त वाढण्याचा संभव कमी च होता. कारण, महाराजांसारख्या हुन्नरबाज शत्रूशीं तोंड द्यावयाचें होतें. नुकतें च त्यांनीं बाजी शामराजास, तो विजापूरची मोठी फौज घेऊन आला असतां, आपल्या सुटसुटीतपणानें, भरारीनें, आणि अचानक छापा घालण्याच्या हातोटीनें ( mobility, rapidity and surprise ) धूळ चारावयास लाविली होती; ही गोष्ट विजापूरच्या सैन्यांत अजून जुनी झाली नव्हती. त्यामुळें त्या सैन्याच्या हिंमतीवर थोडासा वाईट परिणाम होण्याचा संभव होता.

**खानाच्या मराठी सैन्याची कम-हिंमत**

खानानें मावळांतील देशमुख, देशपांडे वगैरे सरदारांस आपल्यास येऊन मिळण्यासाठीं फर्मानें पाठविलीं होतीं, हें त्याच्या सैन्यास ठाऊक होतें. महाराजांशीं बहुतेक पहाडी प्रदेशांत युद्ध करावें लागेल, म्हणून खानानें त्या च प्रदेशांतील मावळ्यांना आपल्या मदतीसाठीं बोलाविलें असावें, हें हि विजापुरी सैन्याच्या ध्यानांत आलें होतें. तेव्हां, आपल्याला असल्या डोंगराळ मुलखांत लढाई खेळावी लागेल आणि आपणांस तर असल्या लढाईची संवय नसून, साधारणतः मैदानी लढायांची संवय आहे, अशा प्रकारचे विचार आदिलशाही सैन्याच्या मनांत येत होते व त्यामुळें हि त्यांची हिंमत कमी होण्याचा संभव होता. खानाच्या बरोबर मावळांतले खोपडे, बांदल, सिलीमकर, भोंसले वगैरे सरदार होते, त्यांच्या हि मनांत एक प्रकारें महाराजांच्या बद्दल धाक होता. त्यांना असें वाटत असावें कीं, कदाचित् खानाचा पराजय झाल्यास, चंद्रराव मोऱ्यानें बाजी शामराजास मदत केल्यामुळें, त्याची जी अवस्था महाराजांनीं केली, ती च अवस्था, आपण महाराजांचा

विश्वासघात करून खानास मिळाल्यानें आपली हि होईल. म्हणजे खानाला मिळालेल्या या मराठी फौजेची सुद्धां हिंमत कमी असण्याचा संभव होता.

**आदिलशाही हिंदु प्रजेची मदत**

महाराजांचें स्वराज्यसाधन व स्वधर्मपालन हें ध्येय फार उच्च असल्यामुळें, त्या प्रांतांतील सर्व हिंदूंची मदत त्यांना मिळणें साहजिक होतें. मुसुलमानांनीं हिंदूंवर केलेल्या अन्याय व जबरदस्तीमुळें आणि देवस्थानांवर केलेल्या अत्याचारांमुळें[1] खुद्द त्यांच्या राज्यांतील हि हिंदू प्रजेचीं मनें त्यांच्या विरुद्ध कलुषित झालीं होतीं. एवढें च नव्हें तर, हस्तें परहस्तें व गुप्तपणानें आपल्या हातून होईल तेवढी मदत महाराजांस करण्यास ती प्रजा नेहमीं तयार असे. ह्या हि कारणानें आदिलशाहि सैन्याची हिंमत कमी झाली असावी.

**विजापुरी सैन्याची हिंमत**

एकंदरींत, वर सांगितलेल्या अनेक कारणांनीं जरी विजापुरी सैन्याची हिंमत प्रथमतः खचली असली, तरी पण खानासारख्या विजापूरच्या दरबारांतील तत्कालीन श्रेष्ठ सेनापतीच्या हाताखालीं आपण काम करणार आहों व ज्यानें नुकता च व्यक्तिशः मोंगलांना हात दाखविला व बहादरी मिळविली, असा अफझलखान आपला सेनापति आहे, या गोष्टीनें धीर येऊन आदिलशाही सैन्यांत थोडीशी हिंमत उरली असेल. तसें च खानानें इकडील प्रांतांत पुष्कळ वर्षें घालविलीं असल्यामुळें, तो आपल्याला इकडच्या डोंगराळ लढाईत संभाळून घेईल

---

१. स. १०; पो. ची. १०.

व आपल्या हातून शिवाजीला नेस्तनाबूद करील असा सुद्धां भरंवसा सैन्यांत उत्पन्न होणें शक्य होतें.

**२५. अपशकून व त्याचें बेहिंमतींत होणारें पर्यवसानः**

खुद्द खानाच्या मनानें, विजापुराहून निघतांना त्याला झालेल्या अपशकुनामुळें, कच खाल्ली होती. त्याचा एक अवलिया गुरू होता. युद्धापूर्वी त्याच्या दर्शनास खान गेला असतां, याला त्यानें सांगितलें कीं, या युद्धांत तुला यश मिळणार नाहीं. शेडगांवकर बखरींत असें हि सांगितलें आहे कीं, या भेटींत त्या अवलियाला खानाचें धड मस्तक विरहित दिसलें[1]; परंतु,हातांत घेतलेली कामगिरी इभ्रतीच्या दृष्टीनें सोडणें शक्य नसल्यानें, त्यानें तिकडे तात्पुरतें दुर्लक्ष्य केलें. मात्र त्याचा परिणाम त्याच्या मनावर थोडा फार झाला. त्यामुळें स्वारीवर निघतांना, त्यानें आपल्या ६३ बिब्यांचीं मुंडकीं छाटून टाकिलीं. विजापुराहून दीड कोसावर असलेल्या खानाच्या तोरवें नांवाच्या राहत्या गांवीं हीं बिब्यांचीं थडगीं आहेत. पुढें खान सैन्यासह निघाला असतां त्याच्या निशाणाचा हत्ती मेला[2]. यामुळें हि त्याचा थोडासा धीर खचला असण्याचा संभव आहे. तसें च खान हा मूळचा भटाऱ्याचा मुलगा असल्यानें दरबारी खानदानीचे प्रतिष्ठित लोक त्याला कमी लेखीत आणि सैन्यांतील लोक हि त्याच्याबद्दल मनांत फारसा आदर बाळगीत नसत. या गोष्टींचा हि परिणाम त्याच्या मनावर मधून मधून होई. मुख्य सेनापतीच्या मनांत आत्मविश्वासाबद्दल थोडा हि संशय डोकावणें युद्धशास्त्रदृष्ट्या नुकसानकारक असतें. त्याच्या असल्या मनस्थितीचा परिणाम पर्यायानें त्याच्या हुक-

---

१. शे. ब. २४. २. शि. दि. १६५; पो. ची. ८.

मांत, त्याच्या सैन्यांत, एकंदरीनें त्याच्या युद्धाच्या भावी कामगिरींत दिसून येणें साहजीक च असतें.

**२६. दारूगोळा व छकडे:**

पूर्वींच्या युद्धांत, ज्या मोठमोठ्या लढाया होत, त्या बहुतेक एखाददुसऱ्या दिवसांत व शत्रूची रणांगणावर भेट झाल्यावर थोड्या च अवधींत आटपत असत. यूरोपमध्यें झालेल्या त्या वेळच्या लढायांत हि हें दिसून येतें. पूर्वी आजच्यापेक्षां दोन्ही फौजांच्या संख्या लहान असत. अर्थात् अशा लहान सैन्याबरोबर, तोफा व बंदुका तितक्या च मानानें कमी असणार व त्या मानानें त्यांना लागणारा दारूगोळा हि थोडासा असणार. आजकाल युद्धाचा काळ फार लांबलेला असतो. तेव्हां मोठ्या फौजेला जास्त दिवस पुरेल इतकी दारूगोळ्याची सोंय करावी लागते.

**दारूगोळ्याचा पुरवठा**

युद्ध जर आपल्या आघाडीच्या कोठीपासून ( advanced base ) फार लांब असेल ( बहुतेक तें असतें ) तर तेथून अघाडीला तितक्या दूरवर तो दारूगोळा पोहोंचण्याच्या वेळेपर्यंत, अघाडीच्या सैन्याला पुरेल इतका दारूगोळा अघाडीवर च ठेवावा लागतो. खुद्द शिपायांच्या जवळ च अगोदर पुरेसा दारूगोळा असतो. म्हणजे त्यांच्या तुकडीच्या ( company ) किंवा पायदळाच्या शिलकीसांठ्या ( reserve ) मध्यें ठेवलेला असतो, त्याच्यामागें कांहीं अंतरावर असलेल्या ब्रिगेड ( brigade ) च्या शिलकीसांठ्यामध्यें असतो, त्याच्या हि मागें डिव्हिजन ( divisiou ) चा सांठा असतो, आणि या डिव्हिजनच्या हि मागें आर्मी ( army ) चा सांठा असतो. येथें मात्र तो पुरवठा अघाडीच्या

**आघाडीच्या कोठीचा बारूदखाना ( advanced base and magazine )**

कोठ्या ( advanced base ) च्या सांठ्याच्या कोठांरातून होतो. या प्रमाणें हा दारूगोळ्याच्या पुरवठ्याचा झरा सैन्यांत सतत चालू असतो.

पूर्वींच्या युद्धांचा काळ, सैन्य व संख्या वगैरे गोष्टी लक्ष्यांत घेतां इतक्या निरनिराळ्या ठिकाणीं दारूगोळा पुरविण्याचा बंदोबस्त करणें जरूर नसे. फक्त शिपायांच्या जवळ असलेला व त्यांच्या तळावर ठेविलेला सांठा पुरेसा होई.

**दारूगोळ्याची लाद**

एका छकड्यांत किंवा बैलगाडींत, गाडी वाटेंत मोडून न पडेल अशा रीतीनें जर दारूगोळा भरावयाचा झाला, तर लायक अशा बारदानांत तो हुशारीनें भरून सुद्धां, १०–१५ मणांपेक्षां जास्त लादणें गैर सोयींचें ठरतें. कारण पहिली गोष्ट ही कीं, या लादींत इतर कोणतें हि सामान नसून केवळ दारूगोळा च असतो; हें विशेष लक्षांत ठेविलें पाहिजे. दारूगोळ्याशिवाय इतर कोणतें हि सामान वेळीं जास्त लादलें असतां चालेल. मात्र, जास्त लादल्यास पहिलें नुकसान म्हणजे गाडीचा आंख किंवा जूं मोडून गाडी उलथून पडून दारूगोळ्याची नासधूस होईल. गाडींत जास्त वजन झाल्यानें घर्षणामुळें ठिणग्या उडून गाडीला, दारूगोळ्याला व पर्यायानें आजूबाजूंच्या लोकांना धोका होण्याचा संभव असतो. ह्याकरितां गाडी जितकी भरपूर दारूगोळ्यानें भरतां येईल तितकी च भरणें योग्य असतें.

**छकड्यांची संख्या**

खानाच्या सैन्याबरोबर ज्या लहान व जड तोफा होत्या, त्यांच्या साठीं दारूगोळ्याला लागणारे छकडे किंवा गाड्या बऱ्या च असाव्यात. त्या किती असाव्यात हें तूर्त कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. मध्यम तोफांना लागणारे गोळे, दारूच्या थैल्या, इतर लहान मोठे गोळे, त्यांना शिलगाविण्यास लागणारे फटाके वगैरे

सामान गाडींत भरीत असावेत. मात्र हें सर्व सामान निरानिराळें घेऊन निर-निराळ्या गाड्यांत भरीत असावेत. पांच पौंडी तोफेच्या एका बाराला वरील सर्व सामान लागतें; त्याचें कमींत कमी वजन पांच शेरांपर्यंत असतें. खानाच्या सैन्यांत ६ पौंडी, १२ पौंडी, १८ पौंडी व कांहींतर २४ पौंडी तोफा असण्याचा संभव होता. पांच पौंडी तोफ म्हणजे अडीच शेर वजनाचा गोळा फेंकणारी तोफ होय. गोळ्याच्या व दारूच्या थैलीच्या मानानें तोफेचे गोळे लक्षांत घेतल्यास साधारणपणें असें म्हणतां येईल कीं, पांच पौंडी तोफेचे ऐंशी गोळे गाडींत राहण्यास हरकत नाहीं. जस-जसे तोफेचे गोळे मोठे त्या मानानें कमी कमी गोळे छकड्यामध्यें भरले जाणार हें उघड आहे. जर ४ किंवा ८ शेरी गोळे असतील तर इतर सामानासह ते ६० पर्यंत गाडींत भरले जातील, सहा ते बारा शेरी असल्यास ४५ गोळे, सोळा शेरी असल्यास ३०, अठरा शेरी असल्यास २८ आणि २४ शेरी असल्यास १८ गोळे गाडींत भरले जातील. एवढ्या मोठ्या सैन्याबरोबर भर भक्कम तोफखाना घेऊन जाणारा खान, प्रत्येक तोफेकरितां कमींत कमी शेंदीडशें गोळे तरी जरूर घेऊन गेला असेल. म्हणजे जड तोफांच्या दारूगोळ्या साठीं १५० ते २०० छकडे त्याच्या बरोबर असणें गैर नसून उलट अवश्य होतें.

त्या च प्रमाणें लहान व हलक्या प्रकारच्या तोफांकरितां खानानें विजापुराहून फारसा दारूगोळा न नेतां, आपल्या वांईच्या अघाडीच्या दारूगोळ्याच्या सांठ्याच्या बारुदखान्यांतून नेला असावा. तरीपण असल्या लहान तोफांना लागणाऱ्या दारूगोळ्याच्या हि पाऊणशें ते शंभर गाड्या त्याच्या बरोबर असणें कांहीं वावगें नव्हतें. लहान मोठ्या सर्व तोफांना थेट विजापुराहून दारूगोळ्याचा पुरवठा होऊन त्यावर युद्ध

चालविलें जाईल, असा विचार त्यानें करणें शक्य नव्हतें. पण, युद्ध जर अंदाजापेक्षां जास्त लांबलें असतें व वांई ते विजापूर यांमधील दळणवळणाचे किंवा संदेश मार्ग ( line of communication ) जर त्याला आपल्या ताब्यांत सुरक्षित ठेवतां आले असते, तर मात्र वांईचा दारूगोळा संपल्या नंतर त्याला विजापूरच्या दारूगोळ्याचा पुरवठयावर अवलंबून रहातां आलें असतें.

**२७. खानाचा तीन वर्षांचा पुरवठाः**

खान विजापुराहून निघाला तेव्हां सैन्यांतील जनावरांना व माणसांना तीन वर्षे पुरेल इतका चाऱ्याचा व दाणागोटयाचा पुरवठा त्यानें आपल्या बरोबर करून घेतला होता[१]. त्या काळीं फौजा लहान असल्यामुळें ज्या मुलखांत स्वारी करण्यांत येत असे तेथील च रसदेचा उपयोग आपल्या सैन्यासाठीं करता येई. आपल्या च देशांतून रसद आणविण्याची विशेष जरूर भासत नसे.

**२८. वांई येथील खानाचा बारुदखाना** ( magazine at Wai ):

वांई हें ठिकाण सरहद्दीवरील खानाची अगदीं अघाडीची कोठी होती. त्याशिवाय विजापूरदरबारचें तें सुभायतीचें ठाणें असून, शांततेच्या काळीं आदिलशाही फौजेचें तें सरहद्दीवरील एक लष्करी ठाणें हि होतें[२]. तेव्हां त्या ठिकाणीं दारूगोळयाचीं कोठारें पूर्वीपासून च होतीं असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. खान हा वांईस १० वर्षांवर सुभेदार होता[३]. त्याची जहागीर हि वांई प्रांताला लागून च होती[४]. त्या जहागिरींत

१. पो. चौ. ७. २. रा. खं. २०. ले. ९८–१०५. ३. रा. खं. २०. ले. ८९–१०५. (इ. स. १६४९ ते १६५९). ४. कित्ता.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

व शेजारच्या आदिलशाहीच्या प्रांतांत बऱ्या च वर्षांपासून महाराजांचा धुमाकूळ किंवा मुलूखगिरीचा प्रयत्न चालू होता. त्यामुळें खानाचें व विजापूरदरबारचें आर्थिक नुकसान होत होतें; तें टाळण्यासाठीं आदिल-शाही फौज घेऊन महाराजांविरुद्ध युद्ध करण्याच्या खटपटींत खान होता. तेव्हां या सर्व कारणांसाठीं पाहिल्यापासून च खानानें वांई येथें दारूगोळयाचा भरपूर पुरवठा करून ठेवला असेल, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पूर्वीं गडोगडीं व किल्लोकिल्लीं वर्षानुवर्षें पुरेल इतका दारूगोळयाचा बंदोबस्त करून ठेवीत असत.

खानानें सैन्याबरोबर तीन वर्षें पुरेल इतका रसदेचा पुरवठा केला होता च. तेव्हां युद्ध उपस्थित होण्यापूर्वीं, लढाईंत मुख्य बाब जी दारूगोळा त्याचा वांई येथें पूर्ण बंदोबस्त करण्यास खान विसरला असेल हें शक्य नाहीं. तसें च विजापूर ही राजधानी वांईपासून फार दूर असल्यामुळें, तेथून दारूगोळयांचा नवा पुरवठा वांईला बिनहरकत होणें फार जड गेलें असतें. जरी दळणवळणाचे किंवा संदेश-मार्ग (lines of communication) व रसदमार्ग किंवा पुरवठ्याचे मार्ग ( lines of supplies ) हे दोन्ही त्याच्या ताब्यांत होते,[1] तरी महाराजांसारख्या धाडशी, शूर व चपल अशा शत्रूच्या विरुद्ध आपल्या रसदमार्गावर दारूगोळयांच्या पुरवठ्याकरितां कितपत विसंबून राहतां येईल याची त्याला शंका असावी. त्या वेळीं शत्रूच्या च रसदीचा उपयोग आपल्या सैन्यासाठीं करून घेणें, जास्त प्रचारांत होतें. ह्यामुळें आपली रसद वांचते व शत्रूच्या प्रांतांतील रसद नाहींशी

१. शि. दि. १४०.

करून शत्रूला फांक्या पाडतां येतो आणि त्याला युद्ध चालविणें फार कठीण जातें. तसें च शत्रूचा दाणागोटा व इतर रसद घेऊन त्याच्या कोठी ( base ) कडे जाणाऱ्या त्याच्या कहीच्या टोळयांना त्यांच्या रसदमार्गांत मध्यें च अचानक गांठून मारणें हें युद्धांतील एक विशेष अंग समजलें जातें. त्या काळीं मुख्यतः या च गोष्टीनें शत्रू जेरीस येत असे.

**२९. शांततेच्या वेळचीं धान्याचीं कोठारें:**

शांततेच्या वेळीं आपल्या देशांत फौजेला लागणारीं धान्याचीं कोठारें ठिकठिकाणीं करून ठेवण्याची अत्यंत अवश्यकता असते. ही युद्धकौशल्यांतील एक फारच महत्त्वाची बाब आहे. कारण त्यांचा उपयोग लढाईच्या प्रसंगीं साहजिक होतो. वांई हें सुभायतीचें ठिकाण असल्यामुळें तेथें असलीं कोठारें होतीं.

**३०. रसदमार्ग** ( lines of supplies ):

वर सांगितलेल्या आपल्या देशांतील ठिकठिकाणच्या धान्याच्या कोठारांपासून शत्रूच्या मुलखांत जेथें आपण लढाई खेळतों तेथपर्यंत, हा रसदीचा मार्ग सुरक्षित ठेवणें हें सेनापतीच्या अनेक डावपेचांपैकीं एक विशिष्ट अंग आहे. त्या प्रमाणें खानाचा विजापूर ते वांई हा रसदीचा मार्ग सुरक्षित होता. या मार्गांत ठिकठिकाणीं असलेले किल्ले, तटबंदीच्या जागा विजापुरकरांच्या ताब्यांत असल्यामुळें खानाच्या सैन्याला लागणाऱ्या रसदीचा बंदोबस्त पूर्णपणें झाला होता असें म्हणतां येईल; निदान, विजापुराहून आणलेला तीन वर्षांचा पुरवठा तरी खानानें वांई येथें च ठेविला असला पाहिजे; कारण, त्याच्या फौजेचा मुख्य तळ व कोठी अखेरपर्यंत वांई येथें च होती.

४

**३१. दळणवळणाचे किंवा संदेश मार्ग** ( lines of communications ):

खानाचा संदेश व दळवळणाचा मार्ग जरी त्याच्या राज्यांतून होता व तो सुरक्षित ठेवण्याकरितां जरी त्यानें ठिकठिकाणीं चौक्या पहारे ठेविले होते, तरी पण, महाराजांसारख्या लष्करी डावपेंचांत तरबेज असलेल्या सेनापतीला, अचानकपणें हल्ला करून व चौक्या पहारे मारून, खानाचा संदेशमार्ग तोडणें मुष्किलीचें नव्हतें. आपल्या घोडदळाच्या योगानें असली गोष्ट करणें महाराजांना सहज साधलें असतें. ( Rapid & mobile ) सुटसुटीत व सड्या अशा महाराजांच्या घोडदळासारख्या सैन्याची ही विशिष्ट अशी कामगिरी होती.

होड्यांची तरतूद

पण खान हि चतुर सेनापति व मुत्सद्दि असल्यानें त्यानें आपले रसदेचे व दळणवळणाचे मार्ग सुरक्षित ठेवण्याची काळजी उत्तम प्रकारें घेतली होती. त्यानें विचार केला कीं, आपण पावसाळ्यांत वांईस मुक्काम करूं; वेळप्रसंगीं विजापुराहून सामानाचा पुरवठा किंवा सैन्याचा उपराळा ( reinforcement ) वगैरे आणवावा लागेल; पण वाटेंत तर भीमा, डोण वगैरे सारख्या लहान मोठ्या नद्या व त्यांचे फाटे आणि इतर नाले व ओढे आहेत; ते पावसाळ्यांत दुथडी वाहणार, मग आपल्याला सामान वगैरे कसें आणतां येईल आणि हा दळणवळणाचा मार्ग कसा अखंडित ठेवितां येईल ? दुसरी गोष्ट, भर पावसाळ्यांत जर महाराजांनीं आपल्या या मार्गावर हल्ले करून आपलें दळणवळण तोडलें तर काय करावयाचें ? किंवा त्यांनीं आपल्यावर अचानक चढाई करून एकीकडे आपला पराभव केला व दुसरीकडे आपल्या दळणवळणाच्या मार्गांत



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं. 10220 ग्रंथानुक्रमांक 51-1188
किंमत — पाने 102

असलेल्या नद्यांचे उतार ताब्यांत घेतले, तर आपल्याला विजापुरास तरी सुरक्षित कसें जातां येईल ? आपण तर मधल्यामध्यें कैचींत सांपडून सैन्याची धूळधाण होईल व वेळेवर रसदी शिवाय उपासमार होईल. तेव्हां यास उपाय म्हणजे, आपल्या या दळणवळणाच्या मार्गांत महत्त्वाच्या जागीं असलेले चौक्या पहारे ( picquets ) मजबूत करणें व नद्यांच्या उतारांच्या जागीं होड्या राखून ठेवणें. म्हणजे वेळ च पडल्यास निदान सुरक्षित व व्यवस्थित पीछेहाट तरी फार नुकसानाशिवाय करतां यावी यासाठीं त्यानें होड्यांची हि व्यवस्था केली. खान हा वांईस आल्यावर त्याला संगमेश्वरचा देशकुळकरण्याचा गुमास्ता तिमाजीपंत हेळवांककर हा येऊन भेटला. त्याचा यजमान मेला असून यजमानाला मूल नव्हतें व यजमानाची बायको म्हातारी होती. त्यामुळें तिमाजीच्या मनांत तें देशकुळकरणाचें वतन स्वतः च उपटावें असें येऊन त्यानें तशी खटपट चालविली. तो वांई येथें आला व तेथील विजापुरी बडा मुलकी अधिकारी कासी दियानतराव याच्या शिफारसीनें त्यानें अफझलची भेट घेतली आणि आपल्याला देशकुळकरण्याचा बादशाही फर्मान करून द्यावा म्हणून खानास विनंती केली. तिमाजी हा लुच्चेगिरी करीत आहे हें खानास माहीत होतें. पण, आपली एक कामगिरी बजावल्यास तुला मीं बादशाही फर्मान देतों, असें खानानें त्यास सांगितलें. कामगिरी म्हणजे संगमेश्वर भागांतून ३०० नावा तिमाजीनें आपण सांगूं त्या ठिकाणीं—म्हणजे विजापूर ते वांई या दरम्यानच्या दळणवळणाच्या मार्गांतील नद्या, ओढ्यांच्या उतारांवर—पोहोंचवाव्यात. ही गोष्ट तिमाजीनें कबूल केली व खानानें त्याला बादशाही फर्मान—देश-

होड्यांबद्दल फर्मानांचीं डौलें

कुळकरण दिल्यांचें–दिलें[1]. खान जेव्हां विजापुराहून निघाला होता तेव्हां त्यानें आपल्या बरोबर बादशाही फर्मानांचीं डौलें घेतलीं होतीं. डौल म्हणजे ज्या कागदांवर बादशाही (किंवा सरकारी अधिकाऱ्यांचीं) शिक्का मोर्तबें झालेलीं असतात असे कोरे कागद ( written power of attorney ). याचा अर्थ असा कीं, ते कागद ज्याच्या जवळ दिले असतात, त्यानें अत्यंत जरूरीच्या प्रसंगीं च मात्र ते उपयोगांत आणावेत; म्हणजे त्यांत त्यानें वाटेल तो मजकूर लिहावा. वांटल्यास त्यांचीं इनामपत्रें, फर्मानें, बक्षीसपत्रें तयार करावींत. मुख्य अधिकारी किंवा राजा दूर असतो व सेनापतीला तर कांहीं गोष्टी आपल्या जबाबदारीवर ताबडतोब करावयाच्या असतात, अशा प्रसंगीं उपयोगांत आणण्यासाठीं ही डौलांची योजना केलेली असते. या प्रमाणें खानानें तिमाजीस त्याचा हक्क नसतां हि देशकुळकरण दिलें व त्या मोबदल्यांत आपला दळणवळणाचा मार्ग सुरक्षित राखण्या साठीं तीनशें नावा फुकटांत पदरांत पाडून घेतल्या.

**३२. नजरबाज खातें** ( intelligence department ):

**महाराजांस बातमी मिळते**

आज ज्याप्रमाणें, परराष्ट्राच्या दरबारीं आपला वकील असतो व त्याच्याकडून शत्रूनें आपल्याशीं युद्ध पुकारल्याची बातमी मिळूं शकते, तसा ह्या वेळीं विजापूरचा कोणी वकील महाराजांच्या दरबारीं नव्हता किंवा महाराजांचा हि कोणी वकील विजापूर–दरबारीं नव्हता. तरी पण खान विजापुराहून निघाल्याची बातमी महाराजांना ताबडतोब कळली. विजापूरच्या दरबारांत

१. द्वि. सं. वृ. ५३.

किंवा आसपास असणाऱ्या हिंदु लोकांपैकीं ज्यांच्या मनांत महाराजां-बद्दल श्रद्धा उत्पन्न झाली होती, अशा लोकांकडून महाराजांना तेथील दरबारांतील बारीक सारीक बातम्या सुद्धां जर कळत होत्या, तर खान एवढ्या जंगी तयारीसह आपल्यावर स्वारीला निघाला आहे एवढी मोठी गोष्ट त्यांना कळल्याशिवाय कशी राहील ?[1]

आडाखे (plans)

युद्धशास्त्रांत शत्रूकडील बातमी वेळोवेळीं काढून त्या प्रमाणें आपले आडाखे बसविणें हें एक महत्त्वाचें काम आहे. खानाला महाराजांच्या हालचालींची माहिती वर-वरची लागत असे; अगदीं बारीकसारीक बातमी त्याला मिळाली असेल असें दिसत नाहीं. ती मिळविण्यासाठीं म्हणून सुद्धां खोपडे, बांदल, भोंसले वगैरे महाराजांच्या मुलखांतील सरदारांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचा त्यानें प्रयत्न केला असावा हें जास्त सयुक्तिक व अवश्य दिसतें.

**३३. विजापुरी फौजेचा कूच** (advance of Bijapur army):

खान हा १६५९ च्या एप्रिलच्या अखेरीस बारा हजार घोडदळ, दहा हजार पायदळ व मागें सांगितल्याप्रमाणें बराचसा तोफखाना बरोबर घेऊन, महाराजांना जिवंत पकडून विजापूरदरबारीं नेण्याची किंवा त्यांना ठार करण्याची प्रतिज्ञा भर दरबारांत करून निघाला.

**३४. खानाच्या धार्मिक जुलुमाचा परिणाम:**

वाटेंतून येतां येतां खानानें पंढरपूर ( तुळजापूर ? ) व शंभू-महादेव येथील देवस्थानें भ्रष्ट केलीं असें बखरींतून व पोवाड्यांतून

---

१. शे. ब. २४.

वर्णन आलें आहे. हें जर खरें धरलें तर, आपल्या च राज्यांत असलेल्या हिंदू प्रजेची व आपल्या सैन्यांतील हिंदू सैनिकांचीं मनें त्यानें दुखावून आपल्या बद्दलची सहानुभूती गमाविली असती. शिवाय, या त्याच्या कृत्यानें या हिंदू लोकांचा ओढा महाराजांकडे वळला असता आणि त्यांच्या स्वराज्यस्थापनेच्या कामीं आपल्या हातून होईल तितकी मदत करावी असा त्यांनीं गुप्तपणें उपक्रम केला असता. एवढें च नव्हें तर केवळ या च कृत्यासाठीं कोणत्या हि उपायानें महाराजांकडून खानाचा नाश व्हावा, असें त्यांना वाटलें असतें. खानाच्या या कृत्यामुळें महाराजांना हि बराच फायदा मिळाला असता. या प्रसंगाचा फायदा घेऊन त्यांनीं या युद्धाला ( व पर्यायानें हिंदवी इतिहासाला ) एक नवीन दिशा व स्वरूप दिलें असतें. तें म्हणजे धार्मिक युद्ध हें होय. हिंदूंची संघटना करण्यास व आपसांतील क्षुद्र भेद टाकून धर्माच्या झेंड्या खालीं स्वराज्य स्थापण्यास आणि अठरा पगड जातींना या ध्येयाकडे वळविण्यास त्यांना हा मोठा प्रसंगोचित व नामी असा योग लाभला असता. परंतु हीं देवस्थानें भ्रष्ट केल्याचा नक्की आधार आढळत नाहीं. खानानें हें कृत्य कदाचित् केलें असेल किंवा कदाचित् केलें हि नसेल. आपला वचक व दरारा बसविण्यासाठीं त्यानें ही गोष्ट केली हि असेल. पण, आपल्या या कृत्याचें पर्यवसान हिंदूंच्या संघटणेंत होईल व मग आपल्या सैन्यांतील हिंदूंचीं मनें आपल्या विरुद्ध चेततील ही कल्पना जर त्याला शिवली असेल तर त्यानें हें कृत्य केलें नसेल आणि यदाकदाचित् केलें

---

१. स. १३; शे. ब. २४, २५; पो. चौ. १०, १२; चि. ५४; शि. दि. १५७.

असेल तर त्यांत त्यानें बरी च सावधगिरी ठेविली असेल. कोणता हि चतुर सेनापति शत्रूवर चालून जात असतां, आपल्या सैन्यांत जेणें करून बेदिली व बेभरंवसा उत्पन्न होईल असें कृत्य जाणून बुजून करणार नाहीं.

खानानें हा प्रकार केला असें धरलें, तर आम्हांला तो प्रकार फक्त पंढरपूर व शिंगणापूर येथें च घडला असावा असें वाटतें, तुळजापुरास घडला असें वाटत नाहीं. कारण, पंढरपुराहून तुळजापूर हें ईशान्येस ४८ मैलांवर असून पंढरपूर-पुणें या रस्त्याच्या विरुद्ध दिशेस म्हणजे ईशान्येस आहे. तेव्हां मुख्य रस्ता सोडून मुद्दाम आडवाटेस, नव्हे विरुद्ध दिशेस भीमा व सीना या मोठ्या नद्या आपलें सैन्य व भारी आटाळा यांसह ओलांडून जाणें अत्यंत अडचणीचें व अनवश्यक होतें.

खानानें हा देवांच्या भ्रष्टीकरणाचा प्रकार केला हें गृहित धरलें तर पुढील एक गोष्ट ओघानें सिद्ध होऊं पहाते. त्यानें ज्या वेळेस वरील प्रकार केला, त्या वेळीं त्याच्या सैन्यांत हिंदु सरदार होते. पण त्यांनीं प्रतिकार न करतां ती गोष्ट निमूटपणें सहन केली. त्यावरून हिंदु लोक स्वधर्माच्या बाबतींत स्वाभिमानशून्य असून, चीड येण्या सारखे प्रसंग घडले असतां हि क्षमाशील वृत्ति न सोडणारे, आपसांतील भेद-भाव विसरून अशा प्रसंगीं एकजूट न करणारे आहेत, असें मुसुल-मानांस वाटलें असावें. इसाई, मुसुलमान वगैरे लोकांत स्वतःच्या धर्मा-साठीं आपसांतील किरकोळ भेदभाव विसरून शत्रूला तोंड देण्याचा व प्रसंगीं प्राण हि अर्पण करण्याचा गुण दिसून येतो. यूरोपांतील धर्म-युद्धें आपल्यांला काय शिकवितात ? उलट हिंदूंच्या धर्मांत स्वतःच्या धर्मासाठीं मरावें असें तत्व असतां हि हिंदु लोक त्या तत्वाकडे दुर्लक्ष्य करून आपलें स्वराज्य गमाविण्यास तयार होतात.

**३५. खानानें रस्ता कां बदलला ?**

**खानाचा पंढरपूर-वांई रस्ता**

खान जेव्हां प्रथम विजापुराहून निघाला, त्या वेळीं महाराज रायगड, राजगड, पुणें या बाजूला होते. त्यामुळें त्यांच्यावर जाण्याच्या हेतूनें खानानें प्रथम पंढरपूर-पुण्याचा मार्ग धरला. परंतु पंढरपूर येथें, महाराज प्रतापगडीं गेल्याची खबर लागल्यामुळें त्यानें तो पहिला मार्ग बदलून, प्रतापगडाकडे जाण्यासाठीं, म्हसवड, दहिवडी, शंभू महादेव ( शिंगणापूर ), मलवडी, रहिमतपूर, सातारा, वांई हा मार्ग पत्करला[१] ( पहा, नकाशा नं. ३ ).

**३६. रस्ता बदलण्याचीं कारणें:**

**बातमीचा आंखीव धोरणावर परिणाम**

खान मोठें सैन्य घेऊन आपल्यावर चाल करून येत आहे, हें महाराजांस समजल्यावर, ज्या प्रमाणें त्यांनीं रायगड सोडून प्रतापगडीं आपलें ठाणें दिलें, त्या प्रमाणें महाराजांनीं आपलें ठाणें बदलल्याची खबर गुप्तहेरांकडून खानाला कळल्यावर, त्याला आपल्या आंखीव धोरणांत जो फेरफार करावा लागणें भाग होतें तो त्यानें केला. म्हणजे त्यानें पहिला रस्ता बदलून व पुण्याचा रोख सोडून देऊन, दक्षिणेकडे थोडेसें वळून वांई कडे जाण्याचा रस्ता पकडला.

**३७. बातमी राखण्याचें महत्त्व:**

बातमी राखणें हें एक लढाई मधील अत्यंत महत्वाचें अंग आहे. तें तसें कां मानिलें जातें, हें वरील उदाहरणा ( खानाच्या आंखीव धोरणांत व बेतांतील फेरफार व रस्ता बदल ह्या ) वरून दिसून येईल.

---

१. चि. ५४; शि. दि. १५८; पो. चौ. १०-१२.

## ३८. वांई येथील छावणीः

वांईच्या फौजेचा तळ

मागें सांगितलेल्या मार्गानें येतां येतां खानानें आपला अखेरचा मुक्काम वांई येथें केला ( जून सुरवात ). नंतर कांहीं दिवसांनीं वांई पासून पुढें प्रतापगडाच्या रोखानें महाबळेश्वर पर्यंत आपली फौज त्यानें पसरविली. वांई येथें कृष्णेच्या पलीकडे म्हणजे कृष्णा उजव्या बाजूस व थोडीशी पिछाडीस टाकून प्रतापगडाकडे तोंड करून त्यानें आपल्या फौजेचा तळ दिला होता व तो स्वतः कृष्णे पलीकडे आपल्या राहत्या वाडयांत होता. या वाड्याचा बंदोबस्त त्यानें चांगला ठेविला होता. हा वाडा वांई गांवाच्या दक्षिणेस एका ओढ्याच्या काठीं आहे. वाड्याच्या पलीकडे म्हणजे दक्षिणेस कृष्णेचा प्रवाह वाहत असून वाड्याच्या दोन बाजूस ओढा आहे. म्हणजे वाडा तिन्ही बाजूंनीं पाण्यानें वेढलेला होता. वांईच्या क्षेत्रस्थ ब्राह्मणांना वेठीला पकडून खानानें हा वाडा बांधला अशी वांईस लौकिक कथा आहे.

## ३९. वांई–अघाडीची कोठीः

विजापूरच्या सुभायतींतील वांई हें ठिकाण, त्या प्रांतांत सरहद्दीवरची एक मोठी जागा असल्यामुळें व आजूबाजूंच्या तटबंदीच्या जागांनीं, किल्यांनीं व कृष्णा नदीनें वेढल्यामुळें, अत्यंत सुरक्षित होतें. कृष्णानदी गांवाच्या दक्षिणबाजूनें खेटून गेली असल्यामुळें, वांई ही आपली कोठी करणें खानास सर्वतोपरीं योग्य वाटलें. रसदीच्या व सैन्याच्या संरक्षणाच्या ( supplies & army protection ) दृष्टीनें, आपल्या हालचाली ( operations ) सुरू करणाऱ्याला प्रतापगडच्या जवळची अशी ही च सोईस्कर जागा असल्यामुळें खानानें ती पसंत करावी हें उघड होतें.

हल्लीं वांईस खानाची राहण्याची जी जागा दाखवितात तिच्या आसपास पडका तट असून ती एका उंच टेंकाडावर आहे. त्यावरून खानानें आपली मुख्य कोठी ( base ) तटबंदीनें जास्त सुरक्षित केली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.[1]

**४०. युद्धकौशल्याच्या दृष्टीनें वांई येथें सैन्याचें एकीकरण ( strategical concentration at Wai ):**

महाराजांशीं युद्ध करावयाचें ठरल्यानंतर फौजेचें आधिपत्य खानाला मिळून, सर्व फौजांना कमरबंदीचे ( mobilization ) हुकूम गेले. नंतर युद्धाकरितां फौजांचें एकीकरण ( concentration ) होऊं लागलें. त्या च वेळीं खानानें आपल्या मोहिमेचा सर्व साधारण आडाखा ( general plan of campaign ) ठरविला. वांई प्रांताच्या पूर्वेकडील आदिलशाही व महाराजांचें राज्य यांच्या मधील सरहद्दीची जी सह्याद्रीची रांग होती त्या ठिकाणीं फौजांचें एकीकरण करावयाचें असें खानानें ठरवून, त्याप्रमाणें अमक्यानें अमक्या जागीं अमक्या वेळीं येऊन मिळावें असे हुकूम ठिकठिकाणच्या सरदारांना पाठविले. अशा च प्रकारचे एकीकरणाचे हुकूम हल्लीं हि पाठविण्यांत येतात. या हुकूमांवरून वांई हें ठिकाण हालचाली करण्याला व आपलें उद्दिष्ट ( object ) साधण्याला सर्वतोपरीं उपयोगी पडेल, असें खानास वाटलें असावें असें दिसतें. पण, हें त्याचें उद्दिष्ट या मार्गानें कितपत साधलें हें पुढील विवेचनावरून ध्यानांत येईल !

—— × ——

१. पो. ची. १४. २. जे. क. शि. च. प्र.

## प्रकरण २ रें

### १. शिवाजी महाराज व युद्धाची पूर्व तयारी:

महाराजांचा प्रथमोपक्रम

शिवाजी महाराज हे स्वराज्य स्थापनेच्या ध्येयानें व यवनांपासून स्वधर्मरक्षण करण्याच्या हेतूनें प्रेरित झाले होते. स्वराज्याकरितां व स्वधर्माकरितां वाटेल ते हाल सोसण्यास व त्या च कार्यासाठीं वाटेल तेव्हां प्राणाची आहुति देण्यास हि त्यांची तयारी होती. स्वराज्यस्थापनेच्या सुरवातीला महाराजांनीं प्रथम पुणें, इंदापूर, सुपें वगैरे आपल्या जहागिरींचा उत्तम बंदोबस्त केला; त्या जाहागिरींमधील किल्ल्यांची व नजीकच्या प्रांतांतील कुबल व माऱ्याच्या जागा आपल्या ताब्यांत घेऊन त्यांची त्यांनीं हळू हळू डागडुजी केली आणि तेथें दारूगोळा व फौज-फांटा हि ठेवण्यास प्रारंभ केला[1]. उत्तम निवडक माणसें व आपल्या ध्येयास ज्यांची सहानुभूति आहे असले लोक व शिपाई निवडून त्यांना ते आपल्या पदरीं ठेऊं लागले[2]. त्यांच्या मदतीनें ते हळू हळू आपल्या मार्गाला म्हणजे सैन्य वाढविण्याच्या कामाला लागले. नंतर हलके हलके मोंगल व विजापूरकर यांच्या प्रांतांतील शिद्दी, सावंत, सुर्वे, मोरे वगैरे लहान लहान सरदार हि ते आपल्या ताब्यांत आणूं लागले[3] व त्याबरोबर च साधेल तितका मोंगली व विजापुरी मुलुख हि काबीज करूं लागले[4].

---

१. स. ८; चि. ३२; शि. दि. ११९–२०; पो. चौ. ३, ४.
२. स. २२. ३. पो. चौ. ५; जे. श. ४. कित्ता; चि. ३१; बर्नि. १७८.

इ० स० १६५६ मध्यें औरंगझेब गोवळकोंड्याच्या स्वारींत गुंतला होता व नंतर जेव्हां त्यानें आपला मोर्चा विजापूरकडे वळविला त्या वेळीं महाराजांना मोंगलांच्या प्रांतांत घुसून मुलूख मारण्याची व खंडणी गोळा करण्याची आणि पैका मिळविण्याची उत्तम संधी मिळाली. त्या संधीचा त्यांनीं योग्य तो फायदा घेतला. मोंगली सैन्य विजापूरच्या कामगिरींत गुंतलेलें पाहून मोंगली मुलखांत थेट औरंगाबादेपर्यंत त्यांनीं स्वारी करण्याचें ठरविलें.

**दख्खनच्या मोंगली राजधानीवर चढाई**

त्या च वेळीं विजापूर दरबारानें महाराजांशीं अंतस्थ असें बोलणें लाविलें होतें कीं, तुम्हीं या वेळीं जर उत्तरेकडील मोंगली मुलखांत स्वारी कराल व तिकडून औरंगझेबास शह बसवाल तर आम्हीं तुम्हांला मागील अपराधांची क्षमा करूं व थोडे फार प्रांत हि देऊं[२]. महाराजांना मोंगलांवर जावयाचें च होतें. त्यांत ही संधी आल्यानें त्यांच्या पुढील कार्यास आपोआप च मदत झाली. आदिलशाही दरबारनें असें पाहिलें कीं, या कृत्यानें औरंगझेब हा गोवळकोंड्याचा वेढा उठवून आपल्या प्रांताच्या रक्षणाकरितां मागें जाईल व आपल्या वरील संकट टळेल. इकडे महाराजांनीं दरबारचें म्हणणें मान्य करून प्रथम मानाजी भोंसले वगैरे मंडळीस मोंगली मुलूखांवर पुढें पाठविलें[२]. त्यांनीं १६५७ च्या मार्च महिन्यांत भीमानदी ओलांडून चांभारगोंद्याजवळच्या मुलुखांत खंडण्या घेण्यास सुरुवात केली[३].

---

१. इं. फ्या. ६४, ६५; जे. श. २. जे. श; अदब इ अलमगिरी १४८ अ (ज.). बर्नि. १७८. ३. ज. ६०, ६१.

## औरंगझेब तह करतो

त्यानंतर स्वतः महाराजांनीं थेट अहमदनगर पावेतों मोहीम केली व तिकडून जुन्नर वगैरे शहरांतील खंडण्या घेऊन ते मानाजीच्या मदतीस गेले. या स्वारींत खुद्द मोंगली दख्खनची राजधानी जी अहमदनगर तेथें नौसीरखानाचा पराभव महाराजांनीं केला व मोंगलांच्या सैन्याचें पाणी जोंखलें. जुन्नर व अहमदनगर येथील मुलुखगिरींत महाराजांना २०० घोडीं व ३।४ लाख होन मिळाले.[2] नवीन बारगीर ठेऊन या मिळालेल्या घोडयांचें त्यांनीं घोडदळ तयार केलें आणि मिळालेले पैसे खर्चून जास्त फौजफांटा ठेऊन ते युद्धाची तयारी करूं लागले. इतक्यांत शाहजहान अतिशय अजारी पडल्याची बातमी आल्यामुळें विजापूरकरांशीं गडबडीनें तह करून औरंगझेब दिल्लीकडे जाण्यास निघाला.[3]

**महाराजांचा मुत्सद्दीपणा**

त्या वेळीं महाराजांचा बंदोबस्त करण्याचें काम त्यानें आपल्या सरदारांवर सोंपविलें. विजापूरकरांवरील युद्धांतून मोंगल मोकळे होतां च ते आपल्या पाठीस लागतील हें महाराज जाणून होते. तेव्हां त्या वेळीं कसें वागावयाचें हें हि त्यांनीं अगोदर च ठरवून ठेविलें होतें. औरंगझेब दिल्लीस जाण्याच्या गडबडींत आहे असें पाहून त्यांनीं आपला वकील सोनाजीपंत यांस त्याच्याकडे सलोखा करण्यास पाठविलें. औरंगझेबास हि आपल्या मागें दक्षिणेंत कोणी गडबड करावयास नको होतें. म्हणून त्यानें हि वेळ मारून नेण्याचें ठरविलें आणि त्या साठीं महाराजांच्या सर्व मागण्या कबूल केल्या. ह्या प्रसंगानें कोंकणपट्टी व विजापूरचा

---

१. जे. श. २. स. ७. ३. जे. श.

मिळविलेला आतांपर्यंतचा सर्व मुलूख महाराजांकडे चालविण्यास औरंगझेबानें मान्यता दिली आणि त्या च प्रमाणें दक्षिणेंतील आपली ( मोंगली ) सरहद्द आपल्या सुभेदाराच्या मदतीनें संभाळण्याचें त्यांच्यावर सोंपविलें.[1] नाइलाजानें औरंगझेबानें महाराजांशीं हा तह केला होता. त्यामुळें त्यानें दख्खनचा सुभेदार नौशिरखान व मीर झुमला यांस महाराजांवर बारीक नजर ठेवण्यास सांगितलें आणि त्याप्रमाणें त्यांनीं हि महाराजांच्या व आपल्या सरहद्दीवरील महत्त्वाच्या ठाण्यांवर जास्त फौज वगैरे ठेऊन बंदोबस्त केला.[2]

**आदिलशाही राज्याचें आक्रमण**

वरीलप्रमाणें अप्रत्यक्षपणें मोंगलांचें पाठबळ आपल्या राजकारणास महाराजांनीं मिळविलें आणि त्या च पाठबळाचा दाब विजापुरकरांवर बसवून यापुढें त्यांच्या मुलखांत ते स्वाऱ्याशिकारी करूं लागले.[3] त्यांचा उपसर्ग जेव्हां जास्त त्रासदायक होऊं लागला, तेव्हां आदिलशाही दरबारनें बाजी शामराजास मोठ्या सैन्यानिशीं त्यांच्यावर पाठविलें. परंतु, मागें सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं अचानकपणें हल्ला करून त्याला पारघाटांत नेस्तनाबूत करून टाकिलें. नंतर बाजी शामराजास मदत करणाऱ्या व पर्यायानें आपल्या ध्येयास म्हणजे स्वराज्यस्थापनेस अडथळा करणाऱ्या चंद्रराव मोऱ्यावर चालून जाऊन व त्याच्याशीं उघड उघड युद्ध करून त्याचा महाराजांनीं नाश केला आणि जावळी प्रांत आपल्या राज्यास जोडला.[4] या जयाचा व त्या वेळीं विजापुरदरबारीं असलेल्या

---

१. रा. खं. ८ ले. ५, ६. २. अदब. ९८ अ. ( ज ). ३. बर्नि. १७८. ४. जे. श.

दुफळीचा[1] फायदा घेऊन यापुढें त्यांनीं आदिलशाहीचा आपल्या राज्याच्या आसपासचा एक एक प्रांत काबीज करण्याचा सपाटा चालविला. प्रथम हिरडोसी मावळ घेऊन कल्याण, भिंवडी, महाड, कुलाबा, रत्नागिरी, वगैरे ठाणीं व तळघाटांतील किल्ले ते हस्तगत करूं लागले.[2] ह्या कार्यांत जंजिऱ्याच्या शिद्दीनें त्यांस अडथळा केला. तेव्हां त्याच्यावर शामराजपंत पेशवे यांना पाठविलें.[3] त्यांनीं दंडाराजपुरी येथें शिद्दीशीं लढाई घेतली. परंतु शिद्दीची तयारी पूर्ण असल्यामुळें पंतांस यश आलें नाहीं.

**शिद्दीवरील स्वारी**

त्यांस परत बोलावून राघो बल्लाळ आत्रे यांस त्या कामगिरीवर पाठविलें. पण थोडया च दिवसांनीं पावसाळा लागल्यामुळें युद्धाचा शेवट न होतां तें लांबत च चाललें. पावसाळा संपल्यानंतर मोरोपंत पिंगळे व नेताजी पालकर या पायदळाच्या व घोडदळाच्या मुख्य व कर्तृत्ववान् सेनापतींना पाठविण्यांत आलें.[4] ह्यांचें युद्धास तोंड लागतें न लागतें तों च अफझलखान हा विजापुराहून प्रचंड फौजेनिशीं निघाल्याचें वर्तमान येऊन थडकलें. तेव्हां महाराजांनीं या दोन्ही सेनापतींस शिद्दीच्या कामगिरीवरून परत बोलाविलें.[5] त्या वेळीं शिद्दीकडून आपल्यास पायबंद बसूं नये, ह्यासाठीं त्या प्रांतांत सरहद्दीच्या टेहेळया फौजेच्या चौकी पहाऱ्यांची लष्करी तजवीज करून ठेवून हे दोघे सेनापती परत आले.

---

१. ज. ३४; जे. श. (खानमहंमदास बडे साहेबिणीनें या च गृहकलहांत ठार मारिलें.) २. जे. श; ज. ५६, ५८; शि. भा. अ. १८ श्लो. ४८–५२; इं. पया. २५०. ३. किं. १५६. ४. किं. १५७. ५. स. १५; नि. ५६,५७,५९.

**२. शांततेच्या काळीं बातमी राखण्याचें महत्त्व** ( intelligence in peace ):

युद्ध सुरू करण्यापूर्वी युद्धाचे बेत (plans) ज्या माहितीवर बसवावयाचे ती ती सर्व माहिती मिळविणें हें पहिलें काम होय. संभवनीय व शक्य अशा लढाई खेळण्याच्या सर्व जागा (theatre of war) बद्दल माहिती गोळा करणें, शांततेच्या काळीं बातमी राखणें, त्या ठिकाणीं कोण कोणता व किती पुरवठा कोठून कोठून पुरविला जाईल त्याचा शोध करणें, फौजांच्या हालचालींसाठीं कोणकोणते रस्ते आहेत व त्यांचें स्वरूप आणि स्थिती कशी आहे ह्या विषयीं माहिती मिळविणें, रस्त्यांतील नद्या, कालवे, ओढे वगैरे ह्यांची माहिती मिळविणें, म्हणजे एकंदर प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती जाणणें, या प्रमाणें च तेथील लोकसंख्येची माहिती मिळविणें आणि शत्रूचें सैन्य, त्याची संख्या, त्याचें लष्करी शिक्षण, शिस्त व व्यवस्था, लष्करी कारभार, नांवाजलेले सेनापती, त्यांची हिंमत, त्यांचीं हत्यारें, दारूगोळा व इतर पुरवठा, त्यांची युद्ध करण्याची पद्धति, मुख्य सेनापतीचे विशेष गुणावगुण, त्याची तयारी, आपल्या सरहद्दीवरील किल्ले व इतर तटबंदीच्या जागा, शत्रूचें परराष्ट्रीय राजकारण, त्याला असलेला लोकांचा पाठिंबा वगैरे सर्व गोष्टींची माहिती असल्याशिवाय युद्धाचे बेत चांगले ठरवितां येत नाहींत. म्हणून वर सांगितलेल्या गोष्टींची माहिती जितकी मिळवितां येईल तितकी महाराजांनीं मिळविली व ती मिळवून मग त्यांनीं तीवर आपले बेत ठरविले.

युद्धाच्या आडाख्यांस अवश्य ती माहिती

---

१. स. १३; शे व ३९; चित्र. ९.

**३. खानाच्या लष्कराबद्दल महाराजांची बातमी:**

खान भरभक्कम फौज घेऊन तोरवें, डोण नदी, पंढरपूर, माळशिरस, शिंगणापूर, मलवडी, रहिमतपूर, सातारा, वांई ह्या मार्गानें आपल्यावर येत आहे, अमक्या जागीं त्याचे मुक्काम होत आहेत, पंढरपूर, (तुळजापुर ?) येथील देवस्थानें त्यानें भ्रष्ट केलीं, त्यामुळें हिंदु लोक मनांतून फार संतप्त झाले आहेत, वगैरे बातम्या महाराजांच्या नजरबाज खात्याकडून त्यांना वेळच्या वेळीं मिळत होत्या[1]. या नजरबाज खात्याशिवाय बातम्या मिळण्याचे आणखीं अनेक मार्ग त्यांना लाभले होते. ठिकठिकाणचे मातब्बर हिंदू लोक त्यांच्या फायद्याच्या किंवा संकटाच्या बातम्या त्यांना कळवीत असत. खानानें पंढरपूरचें देवस्थान भ्रष्ट केल्यावर तेथील पुजाऱ्यानें ती हकीकत व खानाच्या तयारीची एकंदर हकीकत महाराजांना गुप्तपणें कळविली होती[2].

**समर्थ-शिवराय-संबंध**

ज्याप्रमाणें महाराजांना स्वराज्य स्थापण्याची इच्छा होती त्याचप्रमाणें यवनांचें बंड मोडून या " आनंदवन-भुवनांत " धर्मराज्य करण्याची उत्कट इच्छा मनांत बाळगून त्याप्रमाणें गुप्तपणें प्रयत्न करणारा एक महापुरुष ह्या वेळीं महाराष्ट्रांत नांदत होता. तो म्हणजे महाराजांचे गुरु श्री समर्थ रामदास स्वामी हे होत. यांच्या आज्ञेनें व सल्लामसलतीनें च महाराजांनीं या प्रचंड कार्यास हात घातला होता[3]; महाराजांना समर्थांनीं स्वराज्य स्थापन करून दुष्ट तुरुकांचा नायनाट करण्यास प्रत्यक्ष आज्ञा च

---

१. चित्र ९; किं. १४७. २. शि. दि. १५६–५७. ३. महाराजांनीं समर्थांस लिहिलेलें पत्र; रामदास रामदासी. भा. २ प्र. ४०.

५

केली होती. ह्यामुळें अडचणी व संकटें उद्भवल्यास महाराज या आपल्या गुरूंचा विचार घेत व हे गुरु हि आपल्या शिष्यास जेणें करून त्याच्या कार्यास व्यत्यय न येतां संकटनिवारण होईल अशी च मसलत सांगत असत. समर्थ, हे नुसते निवृत्तीपर एकांगी संत नसून, प्रवृत्तिनिवृत्तीचे, शक्तियुक्तीचे व महाराष्ट्रधर्माचे प्रणेते होते. त्यांच्या महाराष्ट्रधर्मांतील अनेक अंगांपैकीं एक अंग जें लोक पारखून सोडणें, तें साधण्यासाठीं त्यांनीं सर्व हिंदुस्थानभर संचार करून मोठमोठ्या ठिकाणीं व तीर्थक्षेत्रीं एकंदर सातशें मठ स्थापन केले होते. ह्या मठांच्या व तेथील मठपतींच्या द्वारें ते आपली चाळणा सर्वत्र पसरवीत असत.

**समर्थांकडून आलेलें पत्र**

या मठपतींच्या कडून त्यांच्या प्रांतांतील बारिकसारिक माहितीची मदत महाराजांना मिळत असे. ह्या मदती शिवाय समर्थांचे इतर हजारों शिष्य देशांत सर्वत्र संचार करीत असत. देशांतील सर्व ठिकाणची बातमी मिळविण्यांत त्यांचा उपयोग होई. असल्या बातम्यां पैकीं ज्या राजकीय महत्त्वाच्या बातम्या असत व महाराजांच्या राजकारणास उपयोगीं पडणाऱ्या असत त्या त्यांना तावडतोब कळविण्याची व्यवस्था हि समर्थांकडून होत असे. विजापुराहून खान निघाल्यानंतर ती बातमी असल्या च एका शिष्याकडून पुढील पत्रद्वारें समर्थांकडे आली व ती त्यांनीं महाराजांकडे पाठविली; ही बातमी ज्या शब्दांत कळविली, ते शब्द जरी आजकालच्या सांकेतिक भाषेंतील शब्दांप्रमाणें नसले, तरी पण तो मजकूर वरवर वाचणाऱ्याला एकाएकीं न उलगडण्यासारखा होता. कारण, आजकाल ( cypher किंवा code messages ) हे संदेश पाठविणाऱ्याला कांहीं एका विवक्षित key word च्या सहाय्यानें

ते तयार करवून पाठवावे लागतात. आणि ज्याच्याकडे असा संदेश पाठविला जातो त्याच्या जवळ तो संकेत (की वर्ड) असल्यानें त्याला तो संदेश कळूं शकतो. परंतु इतर लोकांच्या किंवा शत्रूच्या हातीं जरी तो संदेश पडला तरी त्या key word च्या अभावीं त्यांस त्याचा उपयोग करून घेतां येत नाहीं. म्हणून असा संदेश इतरांना मिळून न मिळून सारखाच. समर्थांचें पत्र कसें होतें तें समजण्यास तें पत्र च खालीं देतों. हें ओंवीबद्ध पत्र पुढीलप्रमाणें आहे:—

विवेकें करावें कार्य साधन ।
जाणार नरतनु हें जाणोन ।
पुढील भविष्यार्थीं मन ।
रहाटोंची नये ॥ १ ॥
चालों नये असन्मार्गीं ।
सत्यता बाणल्या आंगीं
रघुवीर कृपा ते प्रसंगीं ।
दास महात्म वाढवी ॥ २ ॥
रजनीनाथ आणि दिवाकर ।
नित्यनेमें करिती संचार ।
घालीताती येरझार ।
लाविलें भ्रमण जगदीशें ॥ ३ ॥
आदिमाया मूळ भवानी ।
हेची जगताची स्वमिनी ।
एकांतीं विवेकें धरूनी ।
इष्ट योजना करावी ॥ ४ ॥

ह्या ओंव्या नेहमीं प्रमाणें वाचल्या तर त्यांत विशेष असें कांहीं च वाटणार नाहीं व त्यांत कांहीं बातमी हि सांगितली आहे अशी तर शंका हि येणार नाहीं. परंतु दर एक चरणाचें पहिलें अक्षर घेऊन तीं सर्व अक्षरें एके ठिकाणीं मांडल्यास त्यांत एक महत्वाची बातमी आढळून येईल. ती म्हणजे, **'विजापूरचा सरदार निघाला आहे'** ही होय. ह्या शिवाय खोल विचार करून हें पत्र वाचल्यास, ह्यांत आणखी हि कांहीं गोष्टी सांपडूं शकतील.

**४. बातमीचें महत्त्वः**

याप्रमाणें निरनिराळ्या बाजूंनीं महाराजांना ज्या खबरी मिळत असत त्यांचा त्यांनीं जो फायदा करून घेतला, त्यावरून बातम्यांचें महत्त्व किती असतें हें महाराज पूर्णपणें ओळखून होते असें सिद्ध होतें. शरीराला जसा आत्मा तसा लढाईचा मुख्य भाग म्हणजे बातमी ही होय, असें युद्धकलेंतील एक मोठें तत्व आहे. लढाईच्या पूर्वीं व लढाई चालू असतां हल्लीं हेरांच्या कडून जशा बातम्या येतात तशा त्या वेळेस हि येत असत. आजकालच्या लढाया जास्त विस्तृत स्वरूपाच्या होत असल्यामुळें व लढण्याच्या आणि इतर साधनांत बरी च सुधारणा झाल्यामुळें, या लढाया फार दिवस टिकणाऱ्या झाल्या आहेत. हें जरी खरें आहे तरी पण त्या च प्रमाणांत शास्त्रीय शोधांत, हत्यारांत व इतर साधनांत झालेली वाढ आणि इतर राष्ट्रांच्या लोकांबद्दल असणारी संशयी वृत्ति व कडक देखरेख ( censorship ) या व इतर कारणांमुळें शत्रूसंबंधाच्या सर्व प्रकारच्या बातम्या काढण्याचें काम हि वाढून जास्त अडचणीचें झालें आहे हें हि तितकें च खरें आहे.

---

१. रा. रा. व. ५. जोड अंक ५३-५५. पृ. १९६

**५. बातमीखातें आणि सांपत्तिक जोडः**

आजकाल बातमीखातें संघटित करण्यासाठीं कोणत्या हि राष्ट्राला पाण्यासारखा पैसा ओतावा लागतो. या न्यायानें त्या वेळीं महाराजांना हि थोड्याबहुत प्रमाणांत पैसा खर्च करावा लागला च असेल. त्यांचें कार्य फार उच्च व उदात्त असल्यामुळें व त्याच्या पूर्तते साठीं बहुतेक सर्व हिंदू लोकांची त्यांना सहानुभूति असल्यामुळें कदाचित ही पैशाची अडचण सुद्धां त्यांना विशेष भासली नसेल. तसें च त्यांच्या वरील श्रद्धेमुळें कांही कांहीं लोकांनीं आपण होऊन त्यांना बातमी पुरविली हि असेल. कोणाला कोणती गोष्ट पटेल व त्याच्यापासून स्वराज्याच्या कामाला जास्तींत जास्त कोणता फायदा व मदत मिळवितां येईल हें जाणण्यांत व त्याप्रमाणें वर्तन करण्यांत महाराज सदा तत्पर असत. यामुळें व महाराजांवरील भक्ती आणि त्यांनीं अंगिकारलेल्या कार्याच्या महत्त्वामुळें, परकीय राज्यांत व अमलांत महाराजांविरुद्ध निघालेले गुप्त हुकूम, ते बजावणी करणाऱ्या बड्या अधिकाऱ्यांना कळण्या पूर्वीं च, महाराजांकडे विशेष ओढ असलेल्या त्या परकीय राज्यांतील वरील प्रकारच्या लोकांकडून व छोट्या अधिकाऱ्यां कडून पैशाच्या अपेक्षे विरहित केवळ हें आपलें पवित्र कर्तव्य म्हणून, महाराजांना गुप्तपणें कळविले जात आणि याप्रमाणें हे हुकूम कळल्यामुळें त्यांची अंमल-बजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पूर्वीं च महाराज त्या हुकुमांवर तोडीस तोड अशी योजना अगाऊ च करून ठेवीत.

**६. शहाजीराजां कडून महाराजांना मिळालेली बातमीः**

वरीलप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणांहून महाराजांना जशा बातम्या मिळाल्या तशी च खुद्द शहाजी राजांकडून हि खान निघाल्याची व त्याच्या

अंतस्थ हेतूची माहिती त्यांना मिळाली. खान दगलबाज आहे, त्यानें दगलबाजी करून तुमच्या वडील भावास (संभाजीस) ठार मारिलें तेव्हां अशा माणसा बरोबर तुम्ही फार सावधगिरीनें वागावें असें शहाजी राजांनीं त्यांस सांगून पाठविलें होतें[1]. अशी च, बाजी घोरपड्याबद्दलची हि बातमी शहाजी राजांनीं महाराजांस पाठविली होती[2].

**नजरबाज खात्याचा मुख्य विश्वासराव**

महाराजांच्या हेर खात्यांत विश्वासराव नाना मुसेखोरेकर हा एक अधिकारी होता[3]. खानानें वांईला येऊन तळ दिल्यावर त्याच्या सैन्यांतील बातमी काढण्याचें काम विश्वासरावाकडे सोंपविण्यांत आलें होतें. तो नित्य खानाच्या सैन्यांत फकीराच्या वेषानें जाऊन माहिती मिळवीत असे[4]. खानाचें एकंदर सैन्य, त्याची संख्या, त्यांतील घोडदळ, पायदळ, त्यांच्या हालचाली, सैनिकांचीं हत्यारें, दारूगोळा, पुरवठा, शिस्त व सैन्याचें शिक्षण कोणत्या प्रकारचें आहे, त्यांचे बेत काय काय चालले आहेत वगैरे सर्व प्रकारची माहिती तो काढी. आपल्या विषयीं खानाला काय काय बातमी लागली आहे, त्यामुळें त्यानें आपले बेत कसकसे ठरविले आहेत, त्याच्या सैन्यांत आपल्या विषयीं एकंदर बोलवा काय आहे, सैन्याचा उत्साह कितपत आहे, प्रतापगडावर कधीं, कोणत्या रस्त्यानें, किती लोकांनिशीं चालून यावयाचें घाटत आहे, इत्यादि बारीकसारीक माहिती विश्वासराव व त्याच्या हाताखालचे हेर ह्यांनीं मिळविली व ती ताबडतोब महाराजांकडे रवाना केली. अशा प्रकारच्या

---

१ विल्क्स म्हैसूर भा. १. ७५; स. दे. २०८. २. किं. १४८. ३. शि. दि. १३७–३८. ४. प्र. र. मा. ३७; किं. १५८.

बातम्या रोजच्या रोज विश्वासराव हा महाराजांना पुरवीत असे; त्यामुळें महाराजांना त्या प्रमाणें आपला बेत व तयारी करण्यास पुष्कळ च मदत झाली. आपले बेत यशस्वी करण्यास शत्रूविषयीं तपशीलवार, बरोबर व वेळेवर माहिती मिळणें अत्यावश्यक आहे. कारण विश्वसनीय व खऱ्या बातमी शिवाय कोणता हि सेनापती झाला, तरी तो बराच लंगडा झाल्या सारखा होतो.

**खान वांईला येण्या-पूर्वींची माहिती**

खान वांईला येण्यापूर्वीं, एवढें च नव्हें तर तो विजापुराहून निघण्यापूर्वीं विजापूर येथें झालेल्या एकंदर घडामोडींची बातमी महाराजांना त्यांच्या हेरांकडून कळली होती[1]. आदिलशाही दरबारनें आपल्या विरुद्ध मोहीम करण्याचें ठरविलें असून तें काम अफझलखानाकडे दिलें आहे, खान मोठें सैन्य घेऊन येणार आहे, त्या साठीं तो विजापुरास सैन्याची जमवाजमव करीत आहे, "आपणांस चढ्या घोडयांनिशीं" जिवंत पकडून विजापुरीं घेऊन जाण्याची अथवा ठार मारण्याची त्यानें भरदरबारांत प्रतिज्ञा केली आहे[2], तीन वर्षें युद्ध चाललें तरी सामानाचा तुटवडा पडणार नाहीं इतकें युद्धोपयोगीं सर्व प्रकारचें सामान त्यानें जमविलें आहे[3], वगैरे बातम्या आदिलशाही सैन्य विजापुराहून निघण्यापूर्वीं च महाराजांना त्यांच्या बातमी खात्यांतील हेरांकडून कळल्या होत्या.

**७. युद्धतयारीः**

वरील बातम्या महाराजांना राजगड येथें समजल्या. तेव्हां तेथून ते आपल्या सर्व प्रांताचा बंदोबस्त करण्याकरितां स्वतः फिरतीवर

१. शि. दि. १५६, १५७. २. स. १०; शे. ब. २४. ३. पो. चौ. ७.

निघाले. प्रथम त्यांनीं ठिकठिकाणच्या महत्वाच्या जागीं शिबंदी वगैरे ठेऊन त्यांची मजबुती केली. नंतर राजगडाहून पुरंदरला जाऊन तेथून ते प्रतापगडास आले आणि प्रतापगड ते राजगड ह्यांच्या मधील टापूंत जागजागीं चौक्या पहारे ठेवून योग्य तो वंदोबस्त त्यांनीं केला.[1]

**८. महाराजांचें युद्धमंडळः**

खानाच्या या मोहिमेची बातमी समजल्यावर महाराजांनीं आपल्या मुत्सद्यांस व सेनापतींस त्या संबंधीं विचार व खल करण्यास एकत्र बोलाविलें[2]. महाराजांची त्या वेळची परिस्थिती लक्ष्यांत घेऊन खानाशीं लढाई द्यावी किंवा नाहीं, द्यावयाची असल्यास कोठें व कशी द्यावी, ह्याचें मुख्य खलबत ह्या मंडळांत होणार होतें. ह्या मंडळाच्या बैठकीस हजर रहाण्याकरितां आपापल्या ठिकाणांहून व ठाण्यांहून फौजे शिवाय फक्त सडे असे पुढील मुत्सदी व सेनापती आले होते. नारोपंत हणमंते, शामराजपंत, सोनाजीपंत दबीर, निळोपंत मुजूमदार, मोरोपंत पिंगळे, नेताजी सरनोबत, रघुनाथपंत सबनीस, गोमाजी पाणसंबळ, गंगाजी मंगाजी वांकनीस, आण्णाजी पंत, सुभानजी नाईक, कृष्णाजी पानसंबळ, जिवाजी देवकांते, माणकोजी दहातोंडे, सुभानजी इंगळे, नारायण ब्राह्मण सेनापति, उपाध्ये बोवा, इ. इ. हे सर्व हुषार मुत्सद्दी चाललेल्या राजकीय घडामोडींत नित्य भाग घेणारे होते. ह्या मंडळाच्या बैठकींत पुढील तजविजींची वाटाघाट चालली. ही युद्धमंडळाची बैठक दोन दिवस चालू होती[3].

१. शे. ब. २५. २. चित्र १०; चि. ५५; पो. चौ. २३, २४; स. ११. ३. ज. ७२; चि. ५५.

स्वतःची फौज थोडी, तसें च युद्धोपयोगी सामान व दारूगोळ्याची कमतरता, सांवत, सिद्दी, सुर्वे, मोंगल, वगैरे शत्रूपक्षीय मंडळीकडून पुढें मागें उद्भवणाच्या त्रासाचा संभव आणि याच्या उलट खानाची जंगी फौज व युद्धोपयोगी सर्व सामानाचा मुबलक पुरवठा, खानाचें उद्दिष्ट, अडचणींच्या प्रसंगीं खानाला विजापुराहून होणारी पैशाची व सैन्याची मदत इत्यादि सर्व गोष्टी मुत्सदीमंडळा पुढें ह्या बैठकींत महाराजांनीं मांडल्या आणि मुत्सद्दीमंडळानें त्यांचा सर्व तऱ्हेनें विचार केला.

परिस्थितीचा विचार-विनिमय

शेवटीं सर्व बाजूंनीं विचार करून असें ठरलें कीं, शक्य असल्यास लढाईचा प्रसंग टाळावा; मात्र आपल्या ध्येयास जेणेंकरून बाध येईल अशी कोणची हि गोष्ट करूं नये. परंतु खानानें हें न च ऐकल्यास आणि विजापुरास आपल्यास घेऊन जाण्याचा आग्रह धरून चढाई केल्यास, मग मात्र आपण त्याच्याशीं लढाई द्यावी. तथापि ती बचावाच्या स्वरूपाची असावी, आपण होऊन चढाईचें धोरण घेऊं नये. खान मोठी फौज घेऊन आपल्यावर चालून येण्यासाठीं विजापुराहून निघाला आहे ही बातमी कळल्याबरोबर महाराजांनीं वरीलप्रमाणें युद्धमंडळ बोलावून नक्की काय करावयाचें तें ठरविलें.

युद्धमंडळाचा निकाल

**९. महाराजांच्या सैन्याच्या कमरबंदीचे हुकूमः**

युद्धमंडळाचा निकाल झाल्याप्रमाणें बचावाचें धोरण स्वीकारण्याकरतां व तयारीसाठीं महाराजांनीं जागजागीं हुकूम पाठविले. मोरोपंत पिंगळे व नेताजी पालकर यांना शिद्दीकडील बंदोबस्त नीट करून प्रताप-

१. शि. भा. अ. २३ श्लो. १९, २१; शे. ब. २६.

गडाकडे जितक्या जास्त फौजा आणतां येतील तितक्यासह येण्याचें करावें असें सांगितलें. त्या च प्रमाणें कान्होजी जेधे, सिलीमकर, भोंसले, वगैरे सरदारांना फौजा तयार करण्यास हुकूम सोडले[1]. आपल्या फौजा शांततेच्या वेळीं ज्या ज्या लष्करी ठाण्यांवर त्यांची नेमणूक केल्या-प्रमाणें रहात असतील, त्यांना लढाई पुकारल्या बरोबर किंवा क्वचित् प्रसंगीं लढाई पुकारण्याच्या थोडेसें अगोदर, एकदम लढाईला तयार होण्याची जी सूचना व जो हुकूम मुख्य सेनापतीकडून मिळतो त्याला च कमरबंदीचा हुकूम ( mobilization order ) म्हणतात.

**१०. सरहद्दीची टेहळी फौज** ( army of observation ):

महाराजांची टेहळी फौज

शिद्दीच्या प्रांतांतून सर्व सैन्य काढून घेतल्यानंतर त्याला जोर येऊन, आपण खानाशीं लढण्यांत गुंतलों असतां तो पाठीमागून आपल्यावर हल्ले करील, आपले दळणवळणाचे व संदेशाचे मार्ग मारून आपली रसद व दाणागोटा लुटील व याप्रमाणें आपल्याला पायबंद देईल, हें जाणून महाराजांनीं त्याच्या तोंडावर थोडी निवडक फौज ठेवली असावी. महाराजांच्या फौजेची तयारी चालू असतां व ज्या ठिकाणीं त्यांच्या फौजांचें एकीकरण झालें त्या ठिकाणांवर शिद्दीनें कधीं हल्ला केला नाहीं, ही आश्चर्याची गोष्ट आहे. वास्तविक जर त्यानें हल्ला केला असता व तेणें करून महाराजांना पायबंद लावला असता, तर विजापुरकराकडून त्याचा गौरव झाला असता व त्याला असल्या कामीं मदत हि मिळाली असती. ज्या अर्थीं त्यानें ही आलेली अनुकूल संधि घाल-

१. चित्र. ११; शे. ब. २५

विली, त्या अर्थी दोन च गोष्टी संभवतात, एकतर त्यानें आपलें सैन्य पाठविलें च नसावें अथवा दुसरें, पाठविलें असल्यास महाराजांनीं त्याच्यावर दाबासाठीं ठेवलेल्या सैन्यानें त्याला वाटेंत च आडवून परत लाविलें असावें. मोरोपंत व नेताजी यांच्या फौजा अशा तऱ्हेनें विजापूरच्या मोहिमेकरितां परत मागें बोलाविल्या, हें पाहून महाराजांचें सैन्य पेंचांत सांपडून परत बोलाविलें गेलें, हें शिद्दीला तेव्हां च कळून आलें असावें. परंतु, महाराजांच्या पिछाडीवर येऊन पडण्याची त्याला जी पूर्ण संधी मिळाली होती, तिचा त्यानें फायदा घेतला नाहीं आणि महाड व कुलाबा भागांत म्हणजे महाराजांच्या पिछाडीला त्यानें त्रास हि दिला नाहीं. याचें कारण वर सांगितलेल्या दोन च गोष्टी होत. शिद्दीशीं महाराजांचा जो दोन तीन वर्षें झगडा चालला होता, त्यामुळें अशी संधी शिद्दीला मिळाल्यावर हि इतके दिवस महाराजांना दाद न देणारा शिद्दी तिचा फायदा घेतल्या शिवाय राहिला असता असें वाटत नाहीं. म्हणून च त्याच्या बंदोबस्ता करितां वाटेंत जागजागीं नाक्यांनाक्यांनीं महाराजांच्या सरहद्दीच्या टेहळी सैन्याच्या तुकड्या ठेवल्या गेल्या असाव्यात असें म्हणणें भाग पडतें. महाराजांच्या सरहद्दीवर व दळणवळणाच्या मार्गांत जागजागीं तटबंदीच्या जागा व किल्ले असल्यानें व ते बंदोबस्तानें सज्ज असल्यानें शिद्दीचें कांहीं साधलें नाहीं.

**चौक्या पहाऱ्यांची रांग** ( thin outpost-line )

शत्रूचें सैन्य येण्याच्या मार्गावर असे थोड्या लोकांचे चौक्या पहारे एकमेकांच्या टप्प्यांत ( thin outpost line ) ठेवण्यानें बचावाची बाजू तात्पुरती बरी च मजबूत होते. म्हणजे शत्रूला पहिली चौक्या पहाऱ्याची रांग मारून आंत घुसणें बरेंच कठीण जातें.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा
दाखल ९०८८२ ग्रंथानुक्रमांक ५१७.११८८
किंमत ——— पाने १०२



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

शत्रू कोठून हि जोर करून आंत शिरला तर पाठीमागून मदत मागून घेऊन ह्या शत्रूच्या सैन्याच्या लोंढयास अडविण्याचे प्रयत्न पुन्हां दुसऱ्या चौक्या पहाऱ्यांच्या रांगेवर करतां येतात. अशा तऱ्हेच्या बऱ्या च दूरवर पसरलेल्या चौक्या पाहाऱ्याच्या रांगांमध्यें असलेल्या सर्व फौजेला एक च काम असतें. तें काम म्हणजे, त्या रांगेभर शत्रूचा आंत शिरकाव अथवा त्याचा जवळपास जमाव होऊं न देणें, ह्या साठीं सारखा पहारा ठेवणें हें होय. ह्या करितां महाराजांची अशी चौक्या पहाऱ्यांची फौज त्या बाजूस असणें शक्य असावें. अशा फौजेला त्या बाजूची ( army of observation ) सरहद्दीवरील टेहळी फौज असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही फौज ठेवल्यानें महाराजांना खानाच्या सैन्याशीं निर्धास्तपणें तोंड देणें व पारघाटाचा बचाव करणें शक्य झालें होतें. असें केलें नसतें, तर मात्र पारघाटाच्या खिंडींपाशीं आपल्या फौजांचें एकीकरण करणें धोक्याचें झालें असतें. म्हणून जी टेहळी फौज शिद्दीच्या तोंडावर आणि सरहद्दीच्या तटबंदीच्या व माऱ्याच्या जाग्यांवर ठेविली होती तिची छावण्याची हद्द (outpost zone) दंडाराजपुरीच्या पूर्वेस तळें किल्लयापाशीं आठ मैल, नंतर जनाबाचा डोंगर, तेथून घोसाळयाची दिशा (line) व तेथून रोहें आणि खेडगांव या जागां ( line ) मध्यें चौक्या पहाऱ्यांनीं टेहळणी व माऱ्याच्या जागां (commanding positions) वर होणें शक्य आहे. म्हणजे उत्तरेस कुंडलिका नदी व पदम डोंगर, दक्षिणेस तळ्याचा डोंगर व राजपुरीची खाडी, त्याची ही उत्तर-दक्षिण सीमा होय. याप्रमाणें टेहळीफौज ठेवल्यानें पारघाटाच्या मागें महाराजांनीं जी फौज जमविली होती ती बरचि कमी असली पाहिजे.

**११. सांवत व सुर्वें**

सिद्दीशीं महाराजांचा झगडा चाललेला पाहून व त्यांना मोंगलाचा आंतून मिळालेला पाठिंबा पाहून, वाडीकर सांवत व श्रृंगारपूरकर सुर्वे यांनीं हि महाराजांच्या धाडीपासून स्वतःला वांचविण्याकरितां त्यांच्याशीं सलोख्याचें बोलणें केलें.[1] महाराजांच्या धामधुमीला आळा घालण्याची खबरदारी घेण्यास विजापुरकरांनीं जो उशीर लावला, त्यामुळें च मुख्यतः सांवत-सुर्वे यांनीं महाराजांशीं जलदीनें समेट केला. महाराज विजापुरदरबाराला जर इतके जड वाटत आहेत, तर आपण त्यांच्याशीं वाकडें न रहातां नमून च रहाणें बरें असें त्यांना वाटणें साहजिक होतें.

**१२. महाराजांची सैन्यसंख्या** ( strength ):

महाराजांजवळ नक्की सैन्य किती होतें ह्याचा खात्रीलायक उल्लेख आढळत नाहीं. जावळीच्या प्रसंगाच्या वेळीं त्यांचें सैन्य १० हजार पायदळ व १० हजार घोडदळ, (७००० बारगीर, ३००० शिलेदार) असल्याचा उल्लेख मात्र एके ठिकाणीं आढळतो.[2] जावळी घेतल्या नंतर मोऱ्यांच्या पदरचें कांहीं सैन्य महाराजांना मिळालें असण्याचा संभव आहे. तसें च ७०० पठाणांची एक तुकडी या वेळीं महाराजांकडे नौकरीस आली असतां त्यांनीं ती ठेवल्याचा दाखला हि आढळतो.[3] एकंदरींत जास्तींत जास्त १२००० घोडदळ व १०००० पायदळ इतकें सैन्य व थोडासा तोफखाना ह्या प्रसंगाच्या वेळीं त्यांच्या पदरीं होता असें दिसतें. त्यांपैकीं जरूर तेवढी फौज शिद्दीच्या तोंडावर ठेवण्यांत आली होती.

---

१. स. ७; प. या. ३७०. २. स. ९. ३. चि. ३३.

**१३. तोफखाना** ( artillery ):

महाराजांच्या तोफखान्यांत भारी व हलक्या तोफा किती होत्या हें नक्की सांगतां येत नाहीं. प्रतापगडाच्या रक्षणासाठीं मुख्य व आंतील दरवाज्यांजवळ व बुरुजांवर कांहीं तोफा होत्या एवढें मात्र निश्चित आहे. मोरोपंत व नेताजी यांच्याबरोबर हि त्यांच्या सैन्याच्या संख्येप्रमाणें हलक्या व जड तोफा असल्या पाहिजेत. मात्र त्यांत डोंगरी तोफांची संख्या जास्त असावी. कारण ह्या भागांतील रस्ते भारी तोफा न्यावयास योग्य नव्हते. हल्लींप्रमाणें खडी टाकून तयार केलेले पक्के रस्ते त्या वेळीं नसल्यानें, बैलांनीं, घोड्यांनीं व हत्ती वगैरेंनीं वाहून नेल्या जाणाऱ्या प्रचंड तोफा ह्या पहाडी प्रदेशांत महाराजांच्या घोडदळाबरोबर फारशा नसाव्यात. रणक्षेत्रांतील (theatre of operation) असल्या टापूंत अथवा अडचणीच्या जागीं व दऱ्याखोऱ्यांतून या प्रचंड तोफा आणणें हें अव्यवहार्य, अडचणींचें व महाराजांच्या युद्धपद्धतीला न साजणारें झालें असतें.

**लहान तोफा व पहाडी लढाई**

लहानसहान डोंगरी तोफा म्हणजे घोडदळाबरोबर उंटांवर अथवा तट्टांवर नेतां येणाऱ्या तोफा, नेताजी व मोरोपंत ह्या दोघांच्या सैन्यांत असणें शक्य होतें. एवढें च नव्हें तर त्यांच्या सैन्यांत ह्या तोफा होत्या असें म्हणण्यास बरी च जागा आहे. दऱ्याखोऱ्यांतील लढाईत सैन्याला सामानसुमान (transport) आपल्या पाठीवर च विंचवाच्या बिऱ्हाडा प्रमाणें न्यावें लागतें. अशा स्थितींत भारी तोफा बरोबर घेणें ह्मणजे त्या सैन्याच्या भरारी (rapidity) व सुटसुटितपणा (mobility) ला आळा घालणें अथवा त्यास एक प्रकारचा अडथळा करण्यासारखें होतें. कारण, चांगले रस्ते नसल्यामुळें वाटेल

त्या आडमार्गानें, रानांतून, जंगलांतून, नदीनाल्यांतून, दरीखोऱ्यांतून व पहाडडोंगरांतून असल्या सैन्यास आपला रस्ता काढावा लागतो. तेव्हां त्याच्याबरोबर या जड तोफांचें लटांबर असल्यास त्याला चटदिशीं नेमलेल्या ठिकाणीं जातां येत नाहीं. गनीमी काव्याच्या (ambush, hill, partisan, & guierella warfare या) पद्धतीनें रानावनांतून व दरीखोऱ्यांतून लढणाऱ्या सैन्यास बरोबर जड तोफा घेऊन लढणें शक्य नसतें. कारण त्याच्या बरोबर इतर हि भारी सामान व आटाळा ( baggage & equipment) असतो. त्यांत च या जड तोफांची भर पडल्यास सैन्याची हालचाल झटपट करण्यास जड जातें. अशा वेळीं सैन्याचा सुटसुटीतपणा ( mobility ) नाहींसा होतो. तसें च शत्रूचा दाब आपल्या आघाडीवर पडून पीछेहाट करावी लागल्यास त्या जड तोफा तेथें च टाकून देऊन मागें फिरावें लागतें व त्या शत्रूच्या हातीं आयत्या च पडतात. त्यामुळें त्या च तोफा आपल्या नाशाला कारणीभूत होतात. अशा प्रकारच्या अनेक कारणांसाठीं व आपलें नुकसान न होऊं देण्यासाठीं वरील पद्धतीनें लढाई करणारी फौज अशा प्रदेशांत आपल्या बरोबर जड तोफा ठेवीत नाहीं, व ज्या ठेवते त्या हलक्या असून उंटांवरून व तट्टांवरून सहज नेतां येण्या सारख्या असतात.

**१४. तोफखान्याचा तपशीलः**

तेव्हांच्या सर्व तोफा व बंदुका हातांनीं ठासून गोळे भरावयाच्या ( muzzle loaders ) असत. काडतुसाच्या ( breech loaders ) बंदुकी अथवा तोफा त्या वेळीं नसत. आज ह्या च वापरण्यांत येतात. त्या वेळच्या अतिशय मोठ्या तोफेचा नमुना पहावयाचा असल्यास विजापूरची मलीक इ मैदान ही तोफ पहावी. तिच्या वरील कोरींव लेखां-

वरून ती अहमदनगर येथें ओतल्याचें दिसतें. तेथून ती विजापुरास आणलेली आहे. यामुळें मधील रस्ता चांगला पक्का असावा असें दिसतें. त्या वेळीं आजच्या सारखा यांत्रिक गाड्यांचा ( tractors ) उपयोग मोठ्या तोफा ओढण्याकरितां करीत नसत. हत्ती, बैल, घोडे वगैरे जनावरें ह्या तोफा वहाण्याचें काम करीत. ह्या बैलांची जात काठेवाडी अवलादिची असे. पेशवाई गेल्या नंतर ही अवलाद नाहीशीं करण्यांत आली असें कळतें. त्या वेळच्या सर्वसाधारण तोफा ३ पासून ६ इंच व्यासाच्या तोंडाच्या असत आणि त्यांची लांबी ३॥ ते ७ फूट पर्यंत असे; कचित् १२ फूट हि असे.[1] अगदीं लहान तोफा २ ते ३॥ फूट लांबीच्या असत व यांच्या तोंडाचा व्यास १॥ ते ३ इंचांपर्यंत असे. अशा कमी लांबीच्या गरनाळांच्या तोंडाचा व्यास कचित् ४॥ ते ५ इंचांपर्यंत हि असतो. तोफखान्याकडे मोरचे वगैरे खणण्या साठीं व धमधमे बांधण्यासाठीं इंजिनियरां ( engineers )ची तुकडी आजच्या प्रमाणें तेव्हां असे. मुसुलमानी अमदानींत तोफा ओतण्याचे व बंदुका, दारूगोळा तयार करण्याचे कारखाने हिंदुस्थानांत थोडे होते. बहुतेक पोर्तुगीज लोकां कडून च हें सर्व सामान विकत घेण्यांत येई.

**१५. महाराजांचा तोफखानाः**

महाराजांनीं हि गोंव्याच्या पोर्तुगीझां कडून असलें सामान घेण्याचा परिपाठ ठेविला होता.[2] तरी पण त्यांनीं रायगड, मालवण, कुलाबा[3] वगैरे ठिकाणीं दारूगोळा तयार करण्याचे व मैदानी तोफा ओतण्याचे कारखाने काढले होते. त्यांत परदेशी उत्तम उत्तम कारागीर आणून त्यांच्या

१. प्रत्यक्ष वर्णन. २. पा. म. आ; चित्र. १२५. ३. स. दे. ४८१.

कडून हें काम करून घेण्यांत येई. प्रत्येक किल्ल्यावर शिलेखाना (हत्यारांचें कोठार) आणि धान्य वगैरे ठेवण्याचे अंबरखाने हि असत. अशा तऱ्हेनें आंतील शिबंदीला व सैन्याला युद्धाच्या वेळीं धान्य, दारूगोळा, व हत्यारें यांचा भरपूर पुरवठा होण्याची व्यवस्था केलेली असे.

**१६. पायदळाच्या हत्यारांची माहितीः**

पायदळांत हि सर्व शिपायांजवळ बंदुका असत असें नाहीं. त्यांत पट्टेकरी, बरकंदाज, धाराईत, विटेकरी वगैरे लोक असत. इटा किंवा विटा नांवाचें हत्यार भाल्या प्रमाणें च असतें. परंतु त्याचें पातें तीन हात लांबीचें असतें. ह्याचा मारा २४ हातां पर्यंत चालतो व त्यांवरून "दहा पट्टेकरी व एक विटेकरी" अशी म्हण पडली आहे. ह्या प्रमाणें च सैन्यांत गोफणवाले, दारूचे बाणवाले, तीरकमठेवाले हि लोक असत. ज्या ज्या शिपायाजवळ बंदूक असे त्याच्या पाशीं दारूगोळा हि त्याच्या जवळच्या शिंगड्यांत ठेवलेला असे. त्या शिवाय ज्यास्त लागल्यास त्याच्या सैन्याच्या तुकडीच्या राखीव साठ्यांतून ( reserve store ) त्याला मिळत असे. बहुतेक ज्याचें जें हत्यार असेल व ज्यांत जो निष्णात असेल त्याचा च तो उपयोग करी.

**१७. घोडदळाच्या हत्यारांचा प्रसंग व उपयोगः**

पायदळा प्रमाणें घोडदळा पाशीं भाला, तलवार हीं हत्यारें असत व कांहीं कांहीं जणांजवळ बंदुका हि असत. अशांना बरकंदाज ( बंदुकवाला शिपाई ) म्हणत. हल्लीं घोडेस्वाराला तलवार, भाला व बंदूक अशीं तिन्हीं हत्यारें दिलीं जातात. शत्रू दूर असल्यास, पायउतार

---

१. स. २२; आर्म. ९३–९४.

६

होऊन पायदळा प्रमाणें बंदुकीनें काम करावें लागतें व शत्रू जवळ असल्यास पायदळांतील संगीनींच्या कामाप्रमाणें तलवारीनें अगर भाल्यानें हातघाईची लढाई खेळावी लागते.

**१८. फौजेचीं इतर अंगें:**

हल्लींचीं वहातुकीचीं साधनें ( transport ), पुरवठा ( supply ), मोदीखाना (commissariat), शिलेखाना (ordinance) वगैरे फौजेचीं इतर अंगें त्या वेळीं त्या कालास अनुरूप अशीं होतीं व त्यांचें काम आणि व्यवस्था ठोकळ प्रमाणांवर आजच्या सारखी होती.

**१९. लष्करी शिक्षण** ( army training ):

आजच्या सारखा हत्यारांचा कायदा त्या वेळीं नसल्यानें लहानांपासून थोरा पर्यंत बहुतेक सर्व लोकांना कोणतेंना कोणतें एखादें तरी हत्यार चालविण्याची संवय असे च. हातीं हत्यार होतें म्हणून उगींच विनाकारण कोणीं हि कोणावर तें चालविल्याचें उदाहरण इतिहासांत आढळून येत नाहीं. हत्यारांचा शोक सर्वांना असे, ह्यामुळें हत्यार चालविण्याचें शिक्षण लहानपणा पासून च मिळत असे. दांडपट्टा, बोथाटी, काठी,लाठी वगैरे खेळणें व बंदूक मारतां येणें हें मर्दपणाचें लक्षण समजलें जाई. अंगमेहनत करून शरीर कमावणें, लांब पल्याच्या मजला मारणें, घोड्यांवरून दौडतां दौडतां शेतांतील कणसें हातांवर मळून त्याचा हुरडा खाऊन भूक शमविणें, कांदाभाकरी सारखे साधें अन्न खाणें, वगैरे गोष्टी त्या वेळीं बहुतेकांच्या अंगवळणीं च पडलेल्या होत्या. शिपाई गडी व शिलेदार बाण्याचे लोक तर हत्यारें चालविण्यांत निष्णात असत. हल्लीं असा समज झाला आहे कीं, शरीर कमावण्यास पुष्कळ मेहनत, त्रास, खर्च व वेळ लागतो. परंतु ही समजूत चुकीची आहे.

थोडासा व्यायाम, मग तो नित्यनियमानें घेतल्यास व हळू हळू तो वाढवीत गेल्यास शरीर ताकतवान होतें आणि रोजच्या अन्ना पेक्षां जास्त व पौष्टिक खुराकाची हि गरज लागत नाहीं.[1]

खडें सैन्य व सरंजामी सैन्य

त्या वेळीं सरकारचें खडें सैन्य थोडें असून ऐन वेळीं एकदम मोठी फौज उभी करण्यासाठीं सरंजामदारांची पद्धत प्रचारांत होती. अशा सरंजामदारांजवळ १०० पासून जास्तींत जास्ती ७००० पर्यंत फौज बाळगण्याचा हुकूम असे. या सरंजामदारांस त्यांच्या जवळ असलेल्या स्वारांच्या संख्येप्रमाणें व फौजांतील पथकां (१०० घोडेस्वारांचें एक पथक) प्रमाणें हजारी, पंचहजारी व सप्तहजारी अशीं नांवें असत.[1] ह्या फौजांच्या खर्चासाठीं त्यांना सरकारांतून जहागिरीवजा मुलूख तोडून दिलेला असे. वेळ प्रसंगीं सरकार बोलावील तेंव्हां ह्या सरंजामदारांना आपल्या फौजांनिशीं सरकारचाकरी बजावण्यास हजर रहावें लागे. ही सरंजामी पद्धति जितकी चांगली तितकी च एक प्रकारें तोट्याची हि असे. मध्यवर्ती सरकार दुर्बल झाल्यास हे सरंजामदार बंडाळी व पुंडगिरी करून स्वतंत्र बनत. मात्र जावत् काल मध्यवर्ती सत्ता सबळ असेल तों पर्यंत त्यांचे कांहीं चालत नसे. असलीं उदाहरणें मुसुलमानी राज्यांत घडलेलीं महाराजांच्या डोळ्यांपुढें असल्यामुळें त्यांनीं आपल्या राज्यांत ह्या पद्धतीस फारसा थारा दिला नाहीं.[2] आजच्या सारखें च त्यांचें बहुतेक सैन्य खास सरकारमालकीचें होतें. जेधे, भोंसले सिलीमकर, वगैरे सारखे अतिशय थोडे सरंजामदार त्यांनीं शिल्लक ठेविले होते[3].

१. आर्म. ९१. २. स. २३. ३. जे. क. शि. च. प्र; रा. खं. १५, ३६७.

## २०. लष्करी शिक्षणाची मुख्य रूपरेखाः

त्या वेळच्या सैन्यांतील सैनिक ज्या प्रदेशांत रहात असत त्या प्रदेशाची खडान् खडा माहिती त्यांना मिळवावी लागे. त्या साठीं पहाडांत व डोंगरांत हिंडून शत्रूला कोठें व कशा रीतीनें अडवितां येईल, तलवार, भाला बंदूक वगैरे हत्यारांचा उपयोग कोठें करतां येईल, गनिमी काव्याची लढाई किंवा हातघाईची लढाई करण्याला जागा कोणची सोईस्कर आहे, नुस्ते दगड वरून फेंकून हि शत्रूचा नाश कोठें करतां येईल, लपून छपून बसून आटोक्यांत आलेल्या शत्रूवर अचानकपणें तुटून पडून शत्रूची लांडगेतोड कोठें करतां येईल, वेळ पडल्यास एकदम पांगून जाऊन आसरा घेतां येईल अशा घळी व गुहा कोठें आहेत, थोड्या वेळांत दळणवळणाचा व रसद पुरविण्याचा बंदोबस्त करतां येण्यासारख्या जवळच्या वाटा व चोरवाटा कोठें आहेत, ह्या सर्व गोष्टींची माहिती व शिक्षण महाराजांच्या सैन्यांतील दरएक सेनापतीस तर मिळालेलें होतें च पण शिपाईप्याद्यास हि मिळालें होतें.

**शिस्त**

वरीलप्रमाणें आपल्या भोंवतालच्या प्रदेशाची माहिती व हत्यारांचें शिक्षण जसें महाराजांच्या सैन्याला होतें तसें च शिस्तीचें हि शिक्षण त्याला मिळालें होतें. अंगावर सोंपविलेली कामगिरी करतांना मिळेल ती ओली कोरडी भाकर खावयाची अथवा न मिळाल्यास तिची हि परवा न करतां आणि थंडी, वारा, ऊन्ह, पाऊस यांचा मारा सोसून ती कामगिरी वेळेवर पार पाडावयाची तसें च आपल्या वरिष्ठावर विश्वास ठेवून त्यांनीं सोडलेले हुकुम आपली फाजील अक्कल न चालवितां तंतोतंत अमलांत आणावयाचे आणि त्या वेळीं कोणत्या हि अडचणीस न जुमानतां प्राण जाण्याचा प्रसंग

आल्यास तो देऊन हि हुकुमाची तामिली करावयाची, असल्या प्रकारची कडक शिस्त महाराजांच्या सैन्यांत होती. खुद्द महाराज हे अतिशय शिस्तीचे असल्यानें त्यांच्या हातांखालील सेनापती व सैन्य हि तसें च असल्यास नवल नाहीं. ज्याला नवीन स्वराज्य स्थापावयाचें असतें त्याला अशा अत्यंत कडक शिस्तीची जरूर आहे.

शिस्तीचें उदाहरण

महाराजांनीं आपल्या किल्लेदारांना कांहीं धारे (नियम) घालून दिले होते; त्यांत असा एक नियम असे कीं, विशेष धामधुमीच्या प्रसंगीं सूर्यास्त झाल्यापासून दुसरे दिवशीं सूर्योदय होईपर्यंत किल्याचा दरवाजा बंद करावयाचा व त्या दरम्यान तो केव्हां हि उघडावयाचा नाहीं. अशा वेळीं म्हणजे रात्रीं प्रत्यक्ष महाराज जरी किल्याच्या दरवाज्यापाशीं आले तरी त्यांना हि दरवाजा उघडून आंत घ्यावयाचें नाहीं. ह्या आपल्या नियमाची तामिली बरोबर होते कीं नाहीं हें पहाण्यासाठीं एकदां महाराजांनीं दोन किल्यांचा अनुभव घेतला. परंतु, त्यांना रात्रींचा एका किल्यांत प्रवेश मिळाला नाहीं. मात्र एका किल्लेदारानें ते स्वतः आलेले पाहून व त्यांनीं आपल्यामागें शत्रू लागलेला आहे, सबब आपणांस किल्यांत घ्यावें असें फर्माविल्यावरून, त्यांच्या पूर्वीच्या हुकुमाकडे ते महाराज आहेत असें पाहून स्वाभाविकपणें दुर्लक्ष्य करून त्यानें त्यांना आंत घेतलें; परंतु महाराजांनीं आपली शिस्त मोडल्या बद्दल त्याला तेथल्या तेथें तत्काल शासन केलें. शिपायांनीं कोणास विनाकारण त्रास दिल्यास त्यांना फटके मारण्या पासून तों हात तोडण्या पर्यंत ते शिक्षा करीत.

१. स. २२–२५; ज. ३७३.

ह्यामुळें सर्व सैन्यावर त्यांचा फार दरारा असे व प्रत्येक सैनिक आपले काम बिन बोभाट करी. शिद्दीवरील एका स्वारींत मुख्य सैन्यास मदत पाठविण्या बद्दल प्रभानवल्लीच्या मामलेदारास हुकूम धाडला असतां मामलेदारानें थोडी कसूर केली, त्यावरून महाराजांनीं त्याला कळविलें कीं, तुम्हीं अधिकारी म्हणून मुलाहिजा होणार नाहीं. गनीमास सामील झाला असें समजून तुम्हांस जबर शिक्षा होईल[1]. त्यांनीं राजद्रोहाबद्दल खोपड्याचे हातपाय तोडले[2] व रामाजी पालकरास हि शिक्षा दिली[3].

फौजेचे कायदे

फौजेनें कसें वागावें, याबद्दल त्यांचे पुढील हुकूम लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. उन्हाळ्यांत फौजा छावणीस असतां त्यांनीं कोण कोणत्या गोष्टी लक्षांत ठेवाव्यात तें महाराजांनीं यांत सांगितलें आहे. " दाणागोटा व चाराचुरा जपून खर्च करावा; कारग गैर हिशोबी खर्च केल्यास भर पावसांत तो पाहिजे तेवढा मिळणार नाहीं. मग त्या करितां गरीब प्रजेवर धाड जाईल. तेव्हां प्रजा नाखुश होईल व तिला या जुलमामुळें मराठी स्वराज्यापेक्षां मुसुलमानी राज्य बरें वाटेल; शिवाय घोडीं वगैरे जनावरें मरतील. फौजेनें रयतेस त्रास देऊं नये, लागणारें सामान विकत घ्यावें, कोठीदारास जास्त सामानासाठीं तगादा करूं नये, जनावरें ताजी तवानीं ठेवावीं, उन्हाळ्याचे दिवस आहेत, म्हणून कोणीं रात्रीं दिवा ठेऊं नये, ठेवल्यास एखादे वेळीं उंदीर वात घेऊन जाईल, त्यामुळें जवळ च गवताच्या गंजी आहेत त्यांना (व बराकींना) आग लागेल, त्या सर्व जळतील मग पुढें प्रजेच्या माना तोडल्या तरी गवत फांटे मिळणार नाहीं,

१. राजवाडे खं. ८ ले. ३१. २. जे. क. शि च. प्र; रा. खं. १५. ३. चित्र.७८.

म्हणून दिवा ठेवूं नये." या प्रमाणें महाराजांचे हुकूम असत व ते हुकूम फौजेंतील सर्व शिपायांना समजून सांगण्यास सैन्यांतील अधिकाऱ्यांना फर्माविलें जाई[1]. या एकंदर गोष्टींवरून त्यांची शिस्त व सैन्याबद्दलचे नियम कसे होते हें लक्ष्यांत येईल.

**२१. सैन्याची कलमजारी** ( recruiting ) **व संघटनाः**

त्या वेळीं आजच्यासारखा हत्यारांच्या कायदा नसल्यामुळें लष्करी वृत्तीच्या वाटेल त्या माणसांजवळ हत्यारें असत व ते त्यांचा उपयोग करण्यांत तरबेज असत. ह्यांत महारांपासून ब्राह्मणांपर्यंत सर्व प्रकारचे लोक येत[2] ( येवढें च नव्हे तर बायकांना हि हत्यार चालविण्याचा सराव असे ). त्यामुळें सैन्याची कलमजारी करण्यास केव्हां हि आजच्यासारखी पंचाईत पडत नसे. जित लोकांना आपल्या ताब्यांत कायमचे ठेवण्यासाठीं जेते लोक त्यांना निःशस्त्र करतात. या निःशस्त्रीकरणाचा परिणाम जिंकलेल्या लोकांवर कांहीं पिढ्यांनीं इतका होतो कीं, एखादा चोर अथवा डाकू घरांत शिरून चोरी करावयास लागला असतां त्याचें निवारण करण्याचें सामर्थ्य अंगीं न रहातां ह्यांना पोलीसांकडे धांव घ्यावी लागते. अर्थात अशा दुबळ्या मनाच्या व शरीराच्या लोकांकडून स्वतःच्या इभ्रतीचा, देशाचा व धर्माचा बचाव करण्याची वेळ आली असतां त्यांना संरक्षण करतां येत नाहीं; असो. अशी स्थिति त्या वेळीं नसल्यानें[3] कोणत्या हि राजास अथवा सेनापतीस सैन्यभरती ताबडतोब करतां येई; शिवाय ही सैन्यभरती लवकर होण्यास दुसरें एक कारण असे. हातांतील शस्त्राच्या बळावर नांव कमा-

---

१. राज. खंड. ८. २३. २. शि. दि. १५४. ३. ऑर्म. ९५.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

वण्याची व इनाम वगैरे मिळविण्याची इच्छा त्या वेळच्या लोकांच्या मनांत वसत असे. मग त्या इच्छेच्या आड येणाऱ्या इतर कारणांकडे ते फारसे लक्ष देत नसत. उदाहरणार्थ, मुसलमानाची नोकरी पत्करल्या-नंतर जर हिंदूंवर चालून जाण्याचा प्रसंग आला, तर मी माझ्या धर्म-बंधूंशीं कसा लढूं ही कल्पना त्या हिंदू शिपायाच्या मनांत येत नसे. हिंदू विरुद्ध हिंदूला लढवून आपलें राज्य मुसुलमान घेत आहेत ही गोष्ट त्या हिंदू शिपायांच्या लक्षांत हि येत नसे. माझा मालक मुसुलमान आहे, तो मला खावयास देतो, तेव्हां तो सांगेल ती कामगिरी बजावा-वयाची एवढे च माझें काम आहे, अशी त्याची ठाम समजूत असे. म्हणजे राष्ट्र हें राजाचें, प्रजेचें नव्हें, ही कल्पना जास्ती रूढ असल्याचा हा परिणाम होय. उदाहरणार्थ, खंडोजी खोपडा हा जास्त इनामाच्या व वतनाच्या आशेनें महाराजांविरुद्ध अफजलखानास मिळाला होता[1] आणि त्यानें महाराजांस मी पकडून देतों असें खानास वचन दिलें होतें[2]. या प्रमाणें वेळ प्रसंगीं विश्वासघात करून हि हा हिंदू शिपाई आपल्या हिंदू बांधवाला मुसुलमानाच्या ताब्यांत देण्यास मागें पुढें पहात नसे. बाजी घोरपड्यानें शहाजी राजास पकडण्यांत व वाडीकर सांवतांनें महाराजांवर गुप्त हल्ला करण्यांत[3] ही च आत्मघातकी आणि देशहितविघातक वृत्ति दाखविली होती. खोपडे, घोरपडे व सांवत यांच्या सारख्या मोठमोठ्या समंजस, कार्यकर्त्या व नेत्या अशा वतन-दार व जहागीरदारांच्या मनांत जर राष्ट्रभावना व धर्मभावना नव्हती तर ती सामान्य हिंदू शिपायांच्या मनांत नसावी ह्यांत कांहीं मोठें

१. जे. क. शि. च. प्र. ४५. २. रा. खं १५. ३९३. ३. चित्र. १२४

आश्चर्य नाहीं ! भाडोत्री सैनिक बनून हिंदू हा हिंदूंचाच गळा कापण्यास तयार होतो ही मख्खी ओळखून तिचा फायदा आजपर्यंत हिंदुस्थानावर आलेल्या परकीय राज्यकर्त्यांनीं पूर्णपणें घेतलेला आहे. ह्यासाठीं हिंदूंना जर पुन्हां चांगले दिवस यावेत अशी इच्छा असेल तर त्यांनीं ही आत्मघातकी वृत्ती तत्काळ सोडून दिली पाहिजे.

**२२. महाराजांचें सैन्य:**

महाराजांच्या सैन्यांत घोडदळ, पायदळ व तोफखाना असे तीन मुख्य भाग होते. शिवाय बेलदार, कुऱ्हाडे, खलाशी, दारूगोळयाच्या बंदोबस्ताचे लोक व हेर[१] हे हि असत.

पागा व पथकें

घोडदळाच्या निरनिराळया पागा व पथकें त्या वेळीं असत. घोडेस्वारांत शिलेदार व बारगीर असे दोन प्रकार असत. बारगिराचा घोडा सरकारी असे व घोड्याचा व बारगिराचा खर्च चालण्यास सरकारांतून दरमहा १५ पासून २० रुपये पर्यंत पगार असे. बारगिराचीं हत्यारें सरकारी असत. शिलेदाराचा घोडा त्याचा खाजगी असे व हत्यारें हि खाजगी असत. त्याचा पगार बारगिरा सारखा च असे. तलवार, भाला व बंदूक हीं घोडेस्वाराचीं मुख्य हत्यारें होतीं. त्या काळीं हि घोडदळाची सर्वसामान्य रचना आजच्या सारखी होती व ती च महाराजांच्या सैन्यांत जारी होती[२]. प्रतापगडच्या युद्धाच्या वेळीं नेताजी पालकर हा महाराजांच्या घोडदळाचा सरसेनापती होता[३]. या घोडदळाच्या हेरखात्याचा मुख्य बहिरजी नाईक नांवाचा प्रसिद्ध अधिकारी होता[४].

---

१. ऑर्म. ९३. २. स. २२–२५. ३. स. ११. ४. शे. ब. ३९.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

पायदळाची ऊर्फ पावखलकाची व्यवस्था उत्तम व पद्धतशीर होती. जवळ जवळ आजच्या संघटनेच्या तत्वा प्रमाणें च ती बसविलेली होती. दर एक १० शिपायांवर एक नाईक असे. त्यानंतर हवालदार, जुमलेदार, हजारी, पंच हजारी, षष्ठहजारी, सप्तहजारी, दसहजारी, व ह्या सर्वांवर पायदळाचा सरनोबत असे ( ह्या बद्दलची साग्र माहिती मागें दिली आहे. ) एकंदरींत ही सर्व व्यवस्था आजकालच्या कोणत्या हि राष्ट्राच्या सैन्याच्या संघटणेकडे पाहतां त्या सारखी च आहे असें दिसून येईल. ह्या संघटणे मध्यें मुख्य तत्त्व हुकमत ( control व leading and directing and administration ) हीं आहेत. या वेळीं महाराजांच्या पायदळाचे मुख्य सेनापती मोरोपंत पिंगळे हे होते.

पावखलक व जमाती

**२३. महाराजांच्या सैन्याची हिंमत** (morale):

कल्याणची काबीजात, शिद्दीवरील मोहीम, आदिलशाही व तिच्या अंकित सरदारांच्या प्रांतांत चालविलेला धुमाकूळ, दिल्लीपतीच्या दख्खन सुभ्याच्या प्रत्यक्ष राजधानीवर हल्ला करून तेथील सुभेदाराचा केलेला पराभव, ह्या सर्व गोष्टींमुळें महाराजांच्या सैन्याची हिंमत फार च वाढली होती. खुद्द महाराजां सारखा अद्वितिय सेनापती व नेताजी, मोरोपंत, तान्हाजी या सारखे युद्धकलानिपुण दुय्यम सेनापती यांची जोड त्यांस असल्यामुळें सैन्याच्या उत्साहास काय विचारावयाचें ? त्या वेळीं अंबाभवानी ही महाराजांना प्रसन्न आहे, ती त्यांना प्रत्येक कामांत यश देते, खुद्द महाराज हे शंकराचा अवतार असून मुसुलमानांच्या तडाख्यांतून देवस्थानांची व गाईची सोडवणूक करण्यासाठीं त्यांनीं स्वधर्म व स्वराज्य-

मराठी सैन्याच्या हिंमतीचीं कारणें

स्थापनेचा उद्योग चालविला आहे, असल्या महत्कार्यास मारुतीचे अवतार जे श्रीसमर्थ रामदास त्यांची पूर्ण मदत आहे, तुकाराम, मौनीबाबा, रंगनाथस्वामी, जयरामस्वामी, रघुनाथस्वामी, मोरया देव वगैरे सर्व साधुसंतांचा त्यांना आशीर्वाद आहे, असल्या प्रकारच्या भावना महाराष्ट्रांत त्या वेळीं सर्वत्र पसरल्या असल्यामुळें आणि ह्या च महाराष्ट्रांतील स्वदेशाभिमानी महाराष्ट्रीयांची भरती महाराजांच्या सैन्यांत झाली असल्यामुळें या भावनांचा पगडा सैन्याच्या मनावर जबरदस्त बसून त्याची हिंमत वाढली असल्यास नवल काय! ह्यामुळें च ह्या सैन्यांत धडाडी, उत्साह, जोर, हिंमत वगैरे युद्धाच्या कामीं अवश्य असणारे गुण नांदत होते. ह्यांपैकीं फार च थोडे गुण आदिलशाही सैन्यांत असावेत. तशांत नुकतें च महाराजांच्या सैन्यानें संगमेश्वर हें मोंगली ठाणें धुळीस मिळविलें होतें, त्यामुळें हि त्यांच्या सैन्याचा जोम वाढला होता. अशा च संधींत खानासारख्या मुसुलमानाशीं झगडा देऊन स्वराज्यस्थापनेचें कार्य पुढें चालवावयाचें होतें. यामुळें या सैन्याचा उत्साह विशेष च वाढला असेल. खानानें तुळजापुर (?) व पंढरपूरच्या देवस्थानांना उपसर्ग दिल्याच्या बातम्या या सैन्यानें ऐकल्यामुळें त्याचा सूड घेण्यास हें सर्व सैन्य उत्सुक झालें होतें. ह्या च खानानें आपल्या वडील भावाला दगा दिल्याची आठवण महाराजांना त्यांच्या आईबापांनीं दिली होती. त्यामुळें महाराजांना हि त्वेष येणें सहाजिक होतें. ह्या एकंदर कारणांनीं महाराजांचा व त्यांच्या सैन्याचा जोम, हिम्मत व आत्मविश्वास सारखा वाढत होता. सरसेनापतीचा व सैन्याचा जोम वाढल्यास एकंदर हिंमत पुष्कळ वाढते, तसें च सेनापतीनें केलेल्या बेतांत फारसा फरक न होतां ते ठाम रहातात व म्हणून च त्यास यश येण्याची जास्त खात्री असते.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)

**२४. किल्ले व त्यांची व्यवस्थाः**

लढाईला सुरवात करण्यापूर्वी महत्त्वाच्या व लढाईच्या टापूंतील माऱ्यांच्या जागांचा सर्व तऱ्हेचा लष्करी बंदोबस्त करणें भाग असतें. त्या प्रमाणें महाराजांनीं रायगड, राजगड, पुरंदर, वज्रगड, खुद्द प्रतापगड, पारघाट, वर्धनगड[1] व शिद्दीच्या व आदिलशाहीच्या प्रांतांतील नाक्यांच्या जागा वगैरे सर्व ठिकाणांची लष्करी नाकेबंदी केली होती.[2]

**२५. महाराजांच्या दारूगोळ्याचा पुरवठाः**

प्रतापगड येथें बचावाचें धोरण पत्करून राहिल्यामुळें खुद्द प्रताप-गडावर दारूगोळ्याचा भरभक्कम पुरवठा महाराजांनीं करून ठेवला असला पाहिजे आणि तेथून च त्यांच्या सर्व ठिकाणच्या आघाडींवर व बगलांकडे वाटेल तेव्हां व तेथें तो पुरविला जात असावा. कारण, प्रतापगड हें महा-राजांच्या रणक्षेत्राचें केंद्र स्थान ( pivot ) होतें. मोरोपंतांचें पायदळ व नेताजी आणि बाबाजी भोंसले ह्यांचे घोडदळ यांची प्रतापगडापासून थोड्या दूर अंतरावर नेमणूक केली होती. त्यामुळें प्रतापगडाहून वाटेल तेव्हां दारूगोळ्याचा पुरवठा त्यांना होण्यांत अडचणी येण्याचा संभव होता. ह्यासाठीं त्यांना लागणारा दारूगोळ्याचा पुरवठा त्यांच्या जवळ च करून दिला असला पाहिजे. शिवाय, या दोन्ही लष्करांत ( घोडदळ आणि पायदळ ) तोफा व बंदुका थोड्या होत्या; बंदुकवाले त्या मानानें बरे च कमी होते. यामुळें त्यांना लागणारा दारूगोळ्याचा पुरवठा त्या त्या सैन्यांनीं आपापल्या बरोबर सहज च केला असावा. कारण ज्याची बंदूक असे तो आपापल्या पुरता दारूगोळा आपल्या जवळ ठेवीत असे. तो

---

१. शे. ब. २५. २. शि. दि. ११६, १५६, १७५. ऑर्म. ९३, ९४.

संपल्यावर त्याच्या सैन्यांतील सांड्यामधला दारूगोळ्याचा त्यास उपयोग होई; किंवा तो न मिळाल्यास दुसऱ्या हत्यारांचा म्हणजे तरवार, भाला वगैरेंचा तो उपयोग करीत असे. कारण, त्या वेळीं घोडदळ व पायदळांत बंदुका थोड्या असून ह्या च हत्यारांचा उपयोग जास्त केला जाई. महाराजांनीं खुद्द प्रतापगडावर दाणागोटा व दारूगोळा यांचा पुष्कळ दिवस पुरेल इतका पुरवठा करून ठेवला होता. ह्याशिवाय रायगड, पुणें, पुरंदर, प्रतापगड, ह्या मार्गांतील सर्व तटबंदीच्या ठिकाणीं रसदेचा पुरवठा हि त्यांनीं करून ठेवला होता.

**अघाडी व दळण-वळणाचे मार्ग**

रायगड ते प्रतापगड यांमधील दळणावळणाचे व पुरवठ्याचे मार्ग त्यांच्या च राज्यांतील असल्यानें व ते सुरक्षित ठेवण्याची काळजी घेतल्यानें वाटेल तेव्हां व वाटेल तितका पुरवठा व रसद महाराजांना प्रतापगडास थोडक्या अवधींत आणतां आली असती. हा पुरवठ्याचा मार्ग निर्वेध असल्यामुळें रसद आणण्यास शत्रू कडून कोणच्या हि प्रकारचा त्रास, भीति अथवा धोका होण्याचा संभव नव्हता. पुणें तें प्रतापगडाप्रमाणें महाड तें प्रतापगड, हे मार्ग हि महाराजांनीं रोखून ठेविले होते. रस्त्यांत जागजागीं त्यांच्या चौक्या पहारे असल्यामुळें व घाट दाबून ठेविल्यामुळें आणि खानाची फौज, घाटमाथ्यावरून खालीं जाऊं शकत नसल्यामुळें हे सर्व मार्ग अगदीं सुरक्षित होते. यदाकदाचित् खानाच्या फौजेनें किंवा त्याच्या एखाद्या चपळ तुकडीनें (mobile column) फार मोठें चक्कर घेऊन ( turning movement ) पारघाट, व ढवळ्याघाट यांच्या उत्तरेस कात्रजघाट आणि त्याच्या हि आसपासच्या इतर घाटांतून महाराजांच्या रसदेचे मार्ग मारले अथवा कापले असते

तर मात्र त्यांना रसदीची अडचण पडली असती. परंतु एवढें मोठें चक्कर घेण्याचा डावपेंच ( turning manouevres ) खानानें केला असता तर महाराजांनीं हि त्याचा प्रतिकार तावडतोब केला असता. खान अशा चक्कर घेण्याच्या तयारींत आहे ही बातमी, त्यांचें नजरबाज खातें आपल्या कामांत अतिशय तरबेज असल्यामुळें, त्याच्याकडून महाराजांना तत्काळ लागली असती. त्यावर, आपली हि एखादी सुटसुटीत व चपळ तुकडी पाठवून खानाच्या तुकडीला घाट चढू न देण्याची व्यवस्था त्यांनीं उत्तम तऱ्हेनें केली असती. अशा तऱ्हेनें खानाचें सैन्य निरनिराळ्या तुकड्यांत विभागलें गेलें असतें आणि महाराजांच्या सैन्याला त्या प्रत्येक तुकडयांच्यामध्यें घुसून (interpose) त्या तुकडयांचें व मुख्य सैन्याचें दळणवळण (communication) तात्पुरतें तोडतां आलें असतें. ह्यामुळें खानाची प्रत्येक तुकडी उघडी पडून तिला आपल्याजवळ असलेल्या तुटपुंज्या सामानावर च प्रत्येक ठिकाणीं व दरेक बाबतींत आपल्याहून भारी असलेल्या महाराजांच्या लोकांशीं तोंड द्यावें लागलें असतें. अर्थात् च त्यांत त्याचा पराभव झाला असता. ह्यामुळें खानाला हा चक्कर घेण्याचा डावपेंच ( turning movement and manoeuvres ) करून महाराजांचे दळणवळणाचे मार्ग तोडण्याचा प्रयत्न साध्य झाला नसता.

**महाराजांची सैन्य-शिक्षा**

कदाचित् साध्य झाला असता असें धरून चालल्यास, मराठी सैन्याला तो विशेष जाणवला हि नसता; कारण, त्या सैन्याला पुढीलप्रमाणें शिक्षण महाराजांनीं दिलें होतें. त्यांच्या फौजा लहान, सुटसुटीत व मुसुलमानांप्रमाणें मिजासखोर नसल्यामुळें, ज्या प्रांतांत लढाई सुरू होई

त्या प्रांतांत च उत्पन्न होणाऱ्या धान्यावर त्या आपला गुजारा बिनतक्रार करीत असत. (आर्म. ९२. ९३.)एकंदरींत महाराजांचे पुरवठ्याचे व दळणवळणाचे मार्ग आपल्या च प्रदेशांत व सुरक्षित असल्यामुळें या बाबतींत त्यांना फारसा विचार करावा लागला नाहीं. हे मार्ग सुरक्षित ठेवणें हें युद्धकौशल्याचें (strategy) एक मुख्य अंग आहे.

**२६. रणक्षेत्र व आघाडीच्या कोठींची निवड:**

खुद्द राजगड अथवा रायगड येथें लढाई न खेळतां, महाराजांनीं राजधानीपासून लांब असलेला प्रतापगडाचा टापू लढाईसाठीं पसंत केला; ह्यांत त्यांचें युद्धकौशल्य दृष्टीस पडतें. खुद्द राजधानीच्या जवळ केव्हां हि शत्रूशीं युद्ध करूं नये; कारण, यदाकदाचित् शत्रूचा जय झाल्यास त्याला अडविण्याचें सामर्थ्य आपल्यांत राहिलें नसल्यानें ताबडतोब राजधानी च त्याच्या ताब्यांत जाते व त्याचा फार अनिष्ट परिणाम सैन्याच्या हिंमतीवर होतो. शेवटची खडकीची लढाई झाली, त्या वेळीं, पदरच्या मुत्सद्यांनीं इंग्रजांशीं पुण्याच्या जवळ खडकी येथें आपण लढाई देऊं नये, लांब घाटाखालीं द्यावी, असा सल्ला रावबाजी यांस दिला होता; परंतु तो त्यानीं दुर्दैवानें ऐकला नाहीं. त्यामुळें, एका दिवसाच्या लढाईचा परिणाम, श्रीमंतांच्या मागें सरण्यांत व बिन बचावाची पुणें ही राजधानी एका तडाख्यांत इंग्रजांच्या हातीं जाऊन शनवार वाड्यावर युनियनजॅकचा बावटा लागण्यांत झाला. या प्रसंगानें पेशव्यांच्या सैन्याचें धैर्य खचून पुढें झालेल्या इंग्रजांच्या चकमकींत किंवा लढायांत त्याचा उत्तरोत्तर पराभव होत चालला आणि त्या च बरोबर राजधानीच्या लोकांची सहानुभूती हि श्रीमंत गमावून बसले.

राजधानी व रणक्षेत्र

म्हणून, राजधानीपासून होता होईल तो लांब शत्रूस तोंड देण्याची पद्धत असते. त्या ठिकाणीं पराभव झाल्यास, शत्रू राजधानीवर चालून येईपर्यंत पुन्हां जमवाजमव करून शत्रूला ठिकठिकाणीं अडवून त्याला जेरीस आणतां येतें. हिंदू लोकांची मन:प्रवृत्ति दुर्दैवानें अशी बनलेली आहे कीं, त्यांचा मुख्य सेनापती लढाईंत ठार झाला किंवा त्यांची राजधानी शत्रूच्या हातीं गेली म्हणजे त्यांचें धैर्य तत्काळ खचून ते सहज त्या शत्रूच्या कह्यांत जाऊन आपला सर्वस्वीं घात करून घेतात.

**रणक्षेत्राच्या निवडीस इतर कारणें**

वरील कारणांशिवाय दुसरी हि पुष्कळ कारणें प्रतापगडचा टापू हें रणक्षेत्र व अघाडीची कोठी करण्यांत होतीं. प्रतापगडचा प्रांत हा अडचणीचा प्रदेश होता, खानानें घेतलेला कूचाचा पहिला मार्ग (line of advance) रद्द करून त्याला दुसरा पत्करावयास लावणें व अशा तऱ्हेनें एक प्रकारचा त्याला त्रास देणें, कदाचित् आपला पराभव झाल्यास पारघाटांतून महाडाकडे निसटून जाणें, तसें च पारघाट दाबल्यानें शिद्दी व खान ह्यांचें एकीकरण न होऊ देणें वगैरे बऱ्या च कारणासाठीं प्रतापगडची निवड महाराजांकडून करण्यांत आली. खानाचें उद्दिष्ट स्वतां आपण च आहों हें महाराजांना माहीत असल्यामुळें, दर्वेशी ज्या प्रमाणें आस्वलाला आपल्या मागें नाचवितो त्या प्रमाणें आपण ओढूं तिकडे खानाला चुंबत यावें लागेल हें महाराजांनीं ओळखलें होतें; आणि त्या प्रमाणें घडलें हि. कारण आपलें उद्दिष्ट महाराजांना जिवंत पकडणें किंवा ठार करणें हें असल्यानें जिकडे महाराज तिकडे आपण, हें खानानें हि ओळखलें होतें.

खानानें आपला पहिला मार्ग सोडून व पुण्याकडील रोख वळवून वांईकडील दुसरा मार्ग पत्करला[1]. पहिला मार्ग न सोडतां खान जर थेट पुण्यावर आला असता व पुण्याहून प्रतापगडावर गेला असता, तर त्यांत त्याचा फायदा झाला नसता. कारण एक तर, त्याला एक मोठें चक्कर घ्यावें लागलें असतें, शिवाय पुणें ते प्रतापगड हा मार्ग तर शत्रूचा होता. तेव्हां अशा मार्गांतून जातांना त्याला प्रत्येक पावला गणीक अडचणीला तोंड द्यावें लागलें असतें. कारण, ह्या मार्गांतील सर्व माऱ्याच्या जागांची नाकेबंदी महाराजानीं केल्याचें मागें सांगितलें च आहे. हा मार्ग भौगोलिकदृष्ट्या अडचणीचा होता. म्हणजे, वाटेंत निरानिराळे डोंगर, घाट, नदी, नाले, जंगल, किल्ले, वगैरे होते. या सर्वांना टाळून सुरक्षितपणें प्रतापगडीं जाण्याला खानाला बऱ्या च अडचणी आल्या असत्या. अशा प्रसंगीं अडचणीच्या ठिकाणीं गांठून मराठी सैन्यानें आपल्या गनीमी काव्यानें त्याच्यावर हल्ले करून त्याच्या फौजेचा हळू हळू नाश केला असता. शिवाय खानाचे रसदेचे व संदेशमार्ग मराठ्यांनीं तोडले असते आणि पुणें प्रतापगड हा टापू मराठ्यांचा असल्यामुळें खानाला रसद हि मिळाली नसती.

**खानाच्या पहिल्या मार्गांतील अडचणी**

ह्या कारणामुळें खानानें पहिला मार्ग सोडून दुसरा मार्ग पत्करला होता. खान वांईस आल्या नंतर त्यानें थोडें फार सैन्य महाराजांच्या तोंडावर ठेऊन बाकीच्या सैन्या-सह तिकडून पुणें प्रांतांत चाल केली असती,

**ठरविलेल्या रणक्षेत्रांत शत्रूस खेंचणें**

---

१. शि. दि. १५८.

७



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ... सातारा

तर तो हि प्रयत्न वर सांगितलेल्या कारणांनीं साधला नसता. ह्यामुळें सरते शेवटीं, महाराजांनीं आदेशिलेल्या ( dictated ) रणक्षेत्रीं खानाला आपसूक यावें लागलें. आपल्या एकंदर परिस्थितीला अनुकूल पडेल त्या ठिकाणीं रणक्षेत्र व आघाडीची कोठी ठरविणें व शत्रूला तेथें खेंचून आणून लढाई देण्यास भाग पाडणें हें युद्धशास्त्रांतील अत्यंत चतुरपणाचें व महत्त्वाचें अंग आहे. असल्या कामांत महाराज अत्यंत तरबेज होते. यूरोपांत या बाबतींत महाराजांसारखा असा एक नेपोलियन च होऊन गेला.

**२७. बचावाच्या अथवा चढावाच्या धोरणावर रणक्षेत्र व अघाडीची कोठी यांची निवडः**

लढाई चढावाची अथवा बचावाची जशी करावयाची ठरविलें असेल, त्या विचारावर आघाडीची कोठी ( base ) ठरविणें बरें च अवलंबून असतें. कोठी ही कांहीं एक नेमका बिंदु ( point ) किंवा जमीनीचा लहानसा भाग किंवा तुकडा असूं शकत नाहीं. फौजेच्या संख्येच्या व इतर सर्व आटाळ्याच्या मानानें त्या त्या ठरविलेल्या टापूंतील वाटेल तितकी जागा या कोठी करितां व्यापावी लागते.

हल्लींच्या सारख्या जर पूर्वीं फौजा मोठ्या व असंख्य असत्या तर प्रतापगडच्या उत्तर दक्षिण बाजू कडील डोंगरांच्या मागचा किती तरी मोठा प्रदेश त्यांना व्यापावा लागला असता. मोरोपंत व नेताजी यांचें पायदळ व घोडदळ ज्या किनेश्वरच्या खोऱ्याच्या मागील पठारावर व कुडेश्वराजवळच्या पठारावर त्या वेळीं राहूं शकलें होतें तें तसें आजकाल रहाणें शक्य झालें नसतें. ह्यासाठीं फौजेच्या अंदाजानें एक किंवा अनेक अशीं जवळचीं महत्त्वाचीं गांवें हि व्यापून कोठी ( base ) ठर-

विण्यांत येत असते. त्या प्रमाणें च प्रतापगड ही कोठीची जागा महाराजांनीं ठरविली होती.

**२८. लष्करी धोरणाला अनुसरून एकीकरणाचे हुकुम** ( strategical concentration orders ):

सैन्याला तयार रहाण्याची पहिली कमरबंदीची सूचना मिळाल्यावर, अमक्या ठिकाणीं, अमक्या दिवशीं, फौजेसह हजर होण्याची जी दुसरी सूचना किंवा हुकूम पाठविला जातो त्यास ( concentration order ) सैन्य एकत्रित होण्याचे हुकूम म्हणतात. त्यास अनुसरून मागें सांगितल्या प्रमाणें, मोरोपंत, नेताजी, बाबाजी भोंसले, सिलीमकर, बांदल, जेधे वगैरे सरदार आपआपल्या फौजांनिशीं ह्या हुकूम मिळतां च एकत्रित झाले होते.

**२९. दोस्त** ( allies ):

लढाई सुरू होण्यापूर्वी प्रत्येक पक्षाचे कांहीं दोस्त असल्यास ते आपापल्या सैन्यांसह आपापल्या पक्षांस जाऊन मिळतात. लढाईस प्रत्यक्ष तोंड लागण्यापूर्वी लढाईस उद्युक्त झालेले दोन्ही पक्ष राजकारणाचे निरनिराळे डाव खेळून आपापल्या बाजूस जितकीं परराष्ट्रें अथवा परकीय सरकारें मिळवितां येतील तितकीं मिळविण्याचा प्रयत्न कसून करीत असतात. हे प्रयत्न परस्परांच्या दरबारीं असलेल्या परराष्ट्रीय वकिलां मार्फत करण्यांत येतात. अशा प्रकारचे दोस्त महाराजांच्या बाजूस कोणी च नव्हते. तसें च खानाच्या बाजूस हि फारसे नसावेत. कदाचित् जंजिरेकर शिद्दी, वाडीचे सांवत, श्रृंगारपूरचे सुर्वे अथवा दिल्लीचा मोंगल ह्यांची मदत खानानें मागितली असती, तर तिचा बंदोबस्त मागें सांगितल्या प्रमाणें महाराजांनीं आगाऊ च करून ठेवला होता.

 / क्र. ५१५३ ग्रं. ९१

**३०. तयारीचा अभाव व नाश** ( unpreparedness for war and disaster ):

युद्धशास्त्रांत लढाईच्या पूर्वीची व नंतरची तयारी जय्यत राखणें ही फार महत्त्वाची बाब असते. जो सेनापती याचा पूर्णपणें विचार करीत नाहीं किंवा आपल्या शत्रूच्या तयारीचा पूर्वी विचार करून स्वतःची तयारी करीत नाहीं त्याला लढाईंत धोका होण्याचा फार संभव असतो. ह्यामुळें शांततेच्या काळीं म्हणजे युद्ध सुरू होण्या पूर्वी च आणि युद्ध पुकारल्यावर हि जी फौज प्रथम पासून च युद्धाकरितां प्रसंगीं रणांगणावर सर्व बाजूंनीं कमजोर असून सुद्धां जर बचावाच्या धोरणाच्या तयारीनें सज्ज होऊन उभी असेल, तर तिला च यश मिळण्याचा ज्यास्त संभव व शक्यता असते. अशी तयारी महाराजांची अगदीं प्रथम पासून च असल्यामुळें त्यांना केव्हां हि धोका खाण्याचा प्रसंग कसा आला नाहीं व खानाला तसा प्रसंग बऱ्या च बाबतींत कसा आला हें पुढील विवेचनावरून कळून येईल.

---

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं १०८२२० ग्रंथानुक्रमांक ५१५३ ९१
किंमत — पाने १०२

# प्रकरण ३ रें

## १. खानाचे एकंदर धोरण व उद्दिष्ट अथवा साध्यः

महाराजांना ठार करण्याची प्रतिज्ञा

खानाचें उद्दिष्ट महाराजांना जिवंत पकडून विजापुरदरबारीं न्यावयाचें अगर त्यांना ठार करावयाचें हें होतें.[1] महाराज फौजबंद असल्यामुळें व दिवसें दिवस त्यांचें सामर्थ्य वाढत चालल्यामुळें ते सहजा सहजीं फसून आपल्या कह्यांत येणें शक्य नाहीं, हें खान जाणून होता. तेव्हां त्यांना ताब्यांत घेण्याला शेवटीं आपल्याला लढाईचें च धोरण पत्करावें लागेल असें त्यानें आपल्या मनांत ठरविलें असणें अशक्य नाहीं; आणि हें च धोरण लक्षांत घेऊन त्यानें आपले पुढील बेतबात व पांचपेंच चालविले होते.

## २. चढावाचें धोरणः

चढावाचें धोरण व सैन्यसंख्या

चढावाची लढाई खेळावयाची असल्यास अर्थात् च शत्रूच्या सैन्यापेक्षां आपली सैन्यसंख्या जास्त असावी लागते. तशी जास्त नसल्यास हिंमतीच्या भरांत शत्रूवर चालून जाऊन व निकराची लढाई खेळून एखाद्या वेळेस जय मिळूं शकेल; पण अशी गोष्ट अपवादात्मक होय. त्यानें वरील नियमास बाध येत नाहीं. सैन्याच्या संख्येबरोबर च

१. स. १०; इं. फ्या. २५८.

युद्धोपयोगी सर्व सामानाच्या बाबतींत व हिंमतींत हि शत्रूपेक्षां आपण श्रेष्ठ असलें पाहिजे.

**३. खानाच्या चढाईच्या धोरणाचा पुरावा:**

खुद्द खानाच्या मनांत, महाराज आपल्यास एकाएकीं सांपडणार नाहींत, त्यासाठीं आपल्याला हात पाय हालविले पाहिजेत असें होतें, हें वर आलें च आहे. एवढें च नव्हें तर ह्या गोष्टी पूर्वीं च ठरून गेल्या होत्या. विजापुरास बड्या साहेबिणीनें खानास तशा प्रकारें वागण्यास हुकूम दिलेला होता. आपण संभाजीला दगा केला होता ही गोष्ट शिवाजीला समजली असेल, अर्थात् तो आपल्याकडून सावध राहील, म्हणजे निव्वळ ह्या हि खेपेस दगा करून शिवाजी आपल्या हातीं लागणार नाहीं, ही गोष्ट खान पूर्णपणें जाणून होता. साधल्यास दगा करावा च; परंतु, तो न साधल्यास आपल्या कडून चढाईची सर्व तयारी असूं द्यावी अशी त्यानें खबरदारी घेतली होती.

पुढील मजकुरावरून समजून येईल कीं, खानानें ह्या आपल्या धोरणाला अनुसरून सैन्याची हालचाल केली होती. वास्तविक, सैन्य न घेतां फक्त एका वकिलानिशीं आणि दोन खासबरदारांनिशीं ( body guards ) एकमेकांनीं एकमेकांची भेट घ्यावयाची असें ठरलें असतां, खानानें आपल्याबरोबर निवडक दहा बारा हजार स्वार, तोफखाना, पायदळ, घूतरनाला, हत्तीनाला, बाणांचे उंट व जेजाला घेऊन आणि बाकीची फौज वांई येथें ठेऊन वांई सोडली आणि

**खानाच्या सैन्याची हालचाल**

१. शे. ब. २८; इ. स. ऐ. स्कु. ले. भा. २. ६८.

बरोबरच्या फौजेची कोयना-पार येथें व्यवस्था लाविली; म्हणजे त्याच्या समजुती प्रमाणें आपण चढाई केली असतां, महाराजांना दुसरी कडून मदत मिळूं नये अशी व्यवस्था त्यानें केली. शिवाय, पंताजी गोपिनाथानें, जेव्हां तुम्हीं ठरलेल्या अटी मोडतां असें पुन्हां पुन्हां सांगून अटीं प्रमाणें वागण्याचा हट्ट च धरला, तेथपर्यंत सुद्धां खानानें आपल्या फौजा थोडया थोडया पुढें सरकवीत भेटीच्या जागेच्या जवळ जवळ आणून ठेवल्या च होत्या. तसें च भेटीच्या जागेपासून एका बाणाच्या टप्याच्या आंत आपल्या बरोबरचे १५०० लोक ठेविले होते[१]. ह्यावरून त्याचा चढाई करून जाण्याचा उद्देश स्पष्ट होता. आतां तो साधला नाहीं ही गोष्ट निराळी. खानानें वरीलप्रमाणें आपलें युद्धकौशल्य जरी आपल्या आडाख्यांमध्यें उत्तम प्रकारें वठविलें होतें, तरी केव्हां हि युद्धांत दैव ( chances of war ) ही एक बाब ( factor ) जमेस धरावी लागते, आणि त्यामुळें च खानाचे सर्व आडाखे शवटीं फसले गेले.

### ४. परिस्थितीचें अवलोकन:

खानानें आपल्या भोंवतालच्या परिस्थितीचा थोडा फार विचार केला होता. तो या च प्रांतांत दहा अकरा वर्षें राहिला असल्यामुळें, ह्या प्रांताची, येथील लोकांची, त्यांच्या स्वभावाची व त्यांच्या गुणावगुणांची त्याला बरी च माहिती होती. हा प्रांत बिकट होता. प्रतापगडावर जावयाच्या मार्गांत चढउतार, नदीनाले, किर्र झाडी वगैरे अडचणी होत्या. शिवाय विजापूरच्या बादशाही मिजासखोर फौजेला असल्या डोंगराळ प्रांतांत महाराजांसारख्या हुन्नरबाज शत्रूशीं तोंड द्यावयाची ताकद नव्हती.

---

१. स. १६. शो. ब. २९.



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

ह्या प्रांतांत थोडया दिवसांपूर्वी बाजी शामराजाची व मोरे यांची महाराजांनीं काय अवस्था केली,हें आदिलशाही फौजेच्या डोळ्यां समोर होतें. तेव्हां कदाचित् आपल्याला पराभव घेऊन मागें जावें लागेल अशी हि शंका खानाच्या मनांत आली असेल. परंतु, त्याला आपलें उद्दिष्ट कसें हि करून साधावयाचें होतें व तें साधण्यासाठीं चढाई करून जाण्याशिवाय दुसरें गत्यंतर नव्हतें. कारण, महाराज तर वांईला येऊन भेट घेण्यास साफ कबूल नव्हते. तेव्हां एका ह्मणीप्रमाणें " पर्वत जर महंमदाकडे येत नाहीं, तर महंमदानें आपण उठून पर्वताकडे गेलें पाहिजे, " ह्या न्यायानें खानाला आपण होऊन स्वतःचें मुख्य उद्दिष्ट साधण्याकरितां त्या तसल्या सर्व अडचणी सोसून महाराजांवर चढाई करून जाणें भाग होतें.

**५. खानाचा युद्धबेत किंवा आडाखा** ( plan of campaign ):

एकंदर परिस्थितीचा विचार करून खानानें महाराजांवर चढाई करण्याचें ठरविलें व त्यासाठीं अवश्य लागणारी सर्व तयारी हि केली. त्यानें आपल्या अघाडीच्या कोठ्यांवर अवश्य तितकें सैन्य ठेऊन वर सांगितल्या प्रमाणें निवडक सैन्य व तोफखाना घेऊन तो पार–कोयना येथें आला. ही योजना त्यानें वांई येथें येण्यापूर्वी व वांईला आल्यावर मनाशीं ठरवून च ठेविली होती. आजकालच्या युद्धाचा बेत व विचार यांची सर्वसाधारण दिशा प्रत्यक्ष युद्धास सुरवात होण्यापूर्वी च आंखून ठेवितात. त्या वेळीं हि जरी तंतोतंत असें च करीत नसले तरी पण सर्वसाधारण दिशा अशी असावी; कारण एकदां युद्ध सुरूं झालें म्हणजे आपल्या हालचाली नेमक्या व पाहिजे तशा सुरूं करणें या अशा आगाऊ आखून ठेविलेल्या बेतांच्या अभावीं बरेंच मुष्किलीचें जातें. आज-

कालच्या लढाया झटपट न संपणाऱ्या, चेंगट व बरे च दिवस चालणाऱ्या असतात. त्यामुळें मधील काळांत पुढील बेत ठरविण्यास व धोरण आंखण्यास सेनापतींना बरा च वेळ मिळतो. त्या वेळच्या लढाया झटपट होत असत. कांहीं कांहीं तर एका च दिवसांत व एका च सामन्यांत खलास होत. त्यामुळें असल्या लढायांचें धोरण आखणें असल्यास तें लढाई पूर्वी शांततेच्या काळीं आंखणें सोपें जाई. तथापि, लढाईस तोंड लागल्यावर परिस्थित्यनुरूप आंखलेल्या धोरणांतहि फेरफार करीत असत.

**६. खानाच्या बेतांना अडथळे:**

महाराज हे त्या वेळीं एका विशेष प्रकारच्या युद्धपद्धतीचे जनक होते. तें शास्त्र म्हणजे गनिमी कावा होय. सावशीच्या लढाईचें वर्तमान ऐकल्यानंतर पुण्याहून पटवर्धनांच्या वकिलानें मिरजेस जें पत्र लिहिलें त्यांत गनिमी लढाईचा अर्थ आला आहे, तो असा- " शत्रूचें सामान भारी आल्यास बुनगें एकीकडे लाऊन द्यावें आणि सडी फौज करून आज या ठाण्या जवळ, उद्यां दुसऱ्या ठाण्या जवळ याप्रमाणें गनिमाई करावी. "

**खान व महाराज यांचे व्यक्तिमहात्म्य**

समर्थांनीं वर्णिलेल्या महाराष्ट्रधर्मांत गनिमी युद्धास वृकयुद्ध (लांडगेतोड) असें नांव दिलें आहे. ह्या युद्धांत थोड्या सैन्यानिशीं मोठ्या सैन्याला तोंड देऊन त्याचा नाश करतां येतो. शिवाय अशा युद्धास डोंगराळ प्रदेश असल्यास त्याची युद्ध करणारास चांगली मदत होते. अशा प्रकारच्या प्रतापगडा खालील डोंगराळ प्रदेशांत व महाराजां सारख्या

१. खरे. ऐ. ले. सं. २७९६; ऑर्म.

युद्धकलानिष्णात सेनापतीशीं खानाला लढायचें होतें. तेव्हां त्यानें ठरविलेल्या योजनेस यश येणें फार कठीण होतें. म्हणून च महाराजांच्या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीमुळें व तदनुषंगिक इतर कारणांमुळें खानाच्या आडाख्यां ( plans ) मध्यें बरे च अडथळे आले.

**७. प्रदेशाची अपुरी माहिती:**

ज्या प्रदेशांत युद्ध करावयाचें तेथील खडान् खडा माहिती सेनापतीस असावी लागते. ती माहिती महाराजांना जितकी होती तितकी खानाला नव्हती. कारण, स्वतः खान हा महाराजां इतका त्या प्रांतांतून युद्धशास्त्रांतील तजवीजींच्या व हालचालींच्या दृष्टीनें विचार करीत फिरलेला नव्हता. दुसऱ्यानें दिलेल्या माहितीवर त्याला आपल्या मोहिमेच्या तजविजी व हालचाली (plan & dispositions of forces) ठरविणें भाग पडलें होतें. दहा वर्षें या प्रांतांत राहिल्यामुळें इकडील थोडीफार माहिती त्याला होती, पण लढाईच्या वेळीं खास प्रसंगीं उपयोगीं पडेल अशी या प्रांताची पहाणी त्यानें केली नसावी.

महाराज, व्यावहारिक भूगोलज्ञ

महाराजांचें मात्र तसें नव्हतें. लढाई शिवाय इतर वेळीं हि ते असल्या प्रदेशाच्या सर्व भागांतून म्हणजे दऱ्या खोऱ्यांतून, जंगलांतून, घाटांतून फिरून वेळप्रसंगीं कोणत्या जागेचें काय महत्त्व आहे व तिचा पुढें कोणता उपयोग होईल याचा आपल्या आरंभलेल्या कार्यक्रमावर दृष्टी देऊन विचार करीत असत. फौजा लपविण्याच्या जागा कोठें आहेत, लहान लहान टोळ्यांनीं राहाण्यामध्यें जंगलाचा व झाडीचा किती फायदा होतो, रात्रींचा व अंधाराचा फायदा घेऊन शत्रूचे पहारे व चौक्या लुटतां येणें व चुकविणें कसें शक्य असतें, त्या चुकवून

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ... सातारा

त्याच्या छावणीमध्यें सड्या टोळ्यांनीं आंत घुसून त्याची नासधूस कशी करतां येते, त्यामुळें शत्रूचा गोंधळ होऊन त्या धांवपळींत अंधारामुळें त्याच्या च गोळागोळीनें त्याचीं माणसें कशीं जाया होतात, अशा अचानक हल्लयानें धाडशी सेनापतीचा वचक शत्रूवर कसा बसतो, यामुळें शत्रूचा जोम व हिंमत कशी कमी होते, त्याच्या गोळागोळीनें झालेली त्याची हानी ही स्वतःच्या माऱ्यामुळें झाली हें न कळून प्रतिपक्षाच्या छाप्यामुळें झाली असें वाटून हल्ला करणाऱ्या सैन्याचा दरारा व भय त्याला कसें वाटतें, ह्या कारणामुळें हल्लेवाल्या छोटेखानी सैन्याचा जोम कसा वाढतो वगैरे सर्व गोष्टी व युद्धांतील खांचाखोंचा महाराजांना पूर्णपणें स्वानुभवानें माहीत होत्या. ह्याप्रमाणें भौगोलिक माहितीचा फायदा घेऊन महाराजांनीं आपला हेतु तडीस नेऊन खानाची कशी दुर्दशा केली हें पुढील वर्णनावरून कळून येईल.

**८. सैन्याची घरकोठी** ( home base ):

खानाची घरकोठी ( home base ) जी विजापूर, ती रेणक्षेत्रापासून फार लांब असल्यामुळें, जरूरीच्या वेळीं तेथून मदतीच्या फौजा येण्यास बराच काळ लागणार होता. परंतु त्याच्या उलट महाराजांची घरकोठी रायगड ही अधिक जवळ असल्यानें व त्यांचे, मधील संदेशाचे व रसदेचे मार्ग मागें सांगितल्याप्रमाणें सुरक्षित असल्यामुळें त्यांना वाटेल तितकें ताज्या दमाचें उपराळा ( मदत ) सैन्य, खानाचें सैन्य विजापुराकडून येण्या पूर्वींच प्रतापगडीं आणतां आलें असतें. रणक्षेत्रापासून घरकोठी जितकी लांब असते तितका लढणाऱ्या सैन्याच्या मार्गांत अधिक अडथळा येतो आणि त्यामुळें आंखून ठेवलेल्या योजनेंत बरा च घोटाळा होण्याचा संभव असतो.

**९. उद्दिष्ट** ( objective ):

खानाचें उद्दिष्ट ( महाराजांना पकडणें ) जबर असल्यामुळें ह्या सर्व अडचणींकडे लक्ष्य न देतां तें साधण्यासाठीं त्याला त्यांच्यावर चालून जाणें भाग होतें. ह्यामुळें हि त्याच्या आंखून ठेवलेल्या पूर्वीच्या योजनां वर बरा च परिणाम झाला. त्याचा बेत राजकारणानें आपलें उद्दिष्ट साधावयाचें व तें न साधल्यास युद्ध करून साधावयाचें असा होता.

**१०. आडाख्यांत बदल व रणक्षेत्र** ( change of plan and theatre of operation ):

खानानें पूर्वी आपला बेत पुढील प्रमाणें केला. पारघाटा सारख्या घाटांतून खालीं उतरून शिवाजीला महाडा कडील भागांत आपण अचानक गांठूं व दुसऱ्या बाजूनें शिद्दी, सांवत, सुर्वे, वगैरे मंडळी कडून त्याला पायबंद देऊं आणि शेवटीं या कैचींत पकडून त्याला विजापुरास नेऊं, म्हणजे वांई प्रांत हें च आपल्या हालचालींचें मुख्य ठिकाण न ठरवितां त्यानें महाडा कडील भाग हें मुख्य ठिकाण ठरविलें होतें असें दिसतें व त्याला अनुसरून त्यानें आपल्या तजविजीं ( plans ) ची दिशा ठरविली. पहिल्या बेतांत वांई प्रांत हें खानाचें हालचालींचें क्षेत्र कां नसावें ह्यास पुढील कारणें दिसतात. ( १ ) पहिली गोष्ट ही कीं, खानानें भोर प्रांतांतील मातबर सरकारी नोकरांस व सरदारांस वांई प्रांतांत बोलविलें होतें; पण पुढें त्यानें त्यांना खालीं मावळांत जाण्यासाठीं लिहिलें, ह्यावरून मावळांत च महाराजांना भेटी पूर्वी गांठण्याचा त्याचा डांव होता असें दिसतें. ( २ ) महाराज

१. रा. खं. १७. ३१.

प्रतापगडीं आहेत हें त्याला माहीत असून सुद्धां, गडाच्या जवळ पार व जावळी सारख्या नजीक ठिकाणीं त्यानें आपल्या सैन्याचा तळ दिला होता. परंतु त्या घाटांत च लढाई होईल, प्रतापगड च लढाईचें केंद्र स्थान बनेल, गडाच्या आसपास महाराजांची फौज तळ देऊन पडली असेल, कोंकणांतून मोरोपंत, नेताजी, रघुनाथपंत हे येऊन गडाच्या आसपास दबा धरून बसले असतील वगैरे गोष्टी त्याच्या ध्यानींमनीं हि नव्हत्या असें स्पष्ट दिसतें. चढावाची अथवा बचावाची कोणती हि योजना घेतली, तरी ती पुरी पाडण्यास शत्रू कडील बातमी असावयास पाहिजे; परंतु तशी बातमी खानाला न लागल्यामुळें अर्थात त्याच्या तजविजींत व आडाख्यांत ( plans ) दोष व चुका राहिल्या हें लढाईच्या अखेरी वरून देखील दिसून येतें. महाराज आपल्या येवढ्या मोठ्या सैन्याशीं ह्या घाटांत लढाई घेतील, ही गोष्ट त्याला शक्य वाटली नाहीं व त्यामुळें बऱ्या च निर्धास्तपणें त्याच्या फौजेचा तळ गडाच्या इतका जवळ म्हणजे कोयनेच्या काठीं पडला. (शि. भा. अ. २० श्लो. ४८-५०)

**११. खानाचें उद्दिष्ट व रणक्षेत्र:**

खानाच्या उद्दिष्टामुळें त्याला आपलें पूर्वीचें रणक्षेत्र बदलण्याचा प्रसंग आला होता. महाराज राजगडास आहेत असें समजल्यामुळें प्रथम त्यानें आपला मोर्चा तिकडे फिरविला होता. पुढें ते प्रतापगडीं आले असें समल्यावर त्यानें रायगडचा रोंख सोडून प्रतापगडचा रस्ता धरला. आपलें उद्दिष्ट साधण्यास अनुकूळ असलेलें रणक्षेत्र निवडून काढणें व तेथें शत्रूशीं लढाई देणें हें सेनापतीचें मुख्य काम व युद्धशास्त्रांतील धोरणाच्या अनेक अंगांपैकीं एक मुख्य अंग आहे. महाराजांना पकड- ण्याचा विचार खानानें दोन तऱ्हेनें केला होता असें दिसतें. त्यांना

भेटीला बोलविण्याचें राजकारण साधलें ( म्हणजे त्यांनीं भेटीला येण्याचें कबूल केलें ) तर आपण त्यांना त्या भेटीच्या ठिकाणीं च दगा करून मारून टाकूं किंवा जिवंत पकडून विजापुरास नेऊं म्हणजे युद्ध करण्याचें विशेष कारण हि उरणार नाहीं; हा डाव हुकून महाराज भेटीला च येण्याचें नाकारतील तर आपण चढाई करून जाऊन त्यांना पकडूं च पकडूं. वरील पैकीं कोणत्या तरी एका गोष्टींत आपण यश मिळवूं असा त्यास दांडगा भरंवसा होता. अर्थात् पहिला मार्ग व प्रयत्न प्रथम करून पहाणें इष्ट होतें व त्या प्रमाणें खानानें केलें हि. त्यांत त्याला तात्पुरतें यश आलें; म्हणजे महाराजांनीं त्याची भेट घेण्याचें कबूल केलें.

**महाराजांनीं भेटीच्या पूर्वीं आंखलेलें बचावाचें धोरण**

खुद्द महाराजांना आपल्यावर आलेल्या या धाडीचा दोन च तऱ्हांनीं विचार करतां येण्या जोगा होता. एक तर खानाच्या हस्तगत होऊन तह करणें किंवा युद्ध करून आपला बचाव करणें. परंतु खानाच्या अजस्र सैन्याच्या मानानें, आपलें सैन्य तुटपुंजें आहे, हें ओळखून महाराजांनीं चढाईचें धोरण न स्वीकारतां फक्त आपला बचाव करण्याचें व जमल्यास तह करण्याचें ठरविलें. पुढें खानानें च कृष्णाजी भास्करास भेटीचें संधान बांधण्यासाठीं जेव्हां पाठविलें,[१] तेव्हां ह्यांतून हि कांहीं साधतां आल्यास साधावें व तूर्त लढाई टळत असल्यास पहावी, या साठीं त्यांनीं खानाची भेट घेण्याचें कबूल केलें.

---

१. स. १३.

हा उलट निरोप खानास समजल्यावर आपलें उद्दिष्ट साध्य होत आहे असें वाटून त्यानें आपला पूर्वीचा बेत बदलून आतां जावळी टापू हें आपलें रणक्षेत्र बनविण्याचें तात्पुरतें ठरविलें. जरी त्याचा पहिला बेत महाड अथवा मावळ इकडे रणक्षेत्र करण्याचा होता, तरी त्याचें जें उद्दिष्ट तें प्रतापगडीं असल्यामुळें, तें साधण्यासाठीं त्याला आपले पूर्वीचे आंखीव बेत बदलणें भाग पडून जावळी टापू हेंच रणक्षेत्र करावें लागलें.

खान रणक्षेत्र बदलतो

**१२. कूच व पहिला उपक्रमः**

खान आपल्या प्रचंड फौजेसह विजापुराहून एकदम कूच करून निघाला ह्यामुळें पहिला तडाखा मारण्याचा अथवा पहिला घाव घालण्याचा ( initiative ) फायदा त्याला च मिळाला. परंतु पुढील काळांत पहिल्या घावाचा अथवा तडाख्याचा फायदा त्याच्या कडून महाराजांना चटदिशीं ( परिस्थिती बदलून घेऊन ) आपल्याकडे खेंचून घेतां आला. पहिला तडाखा मारण्याचें काम ( initiative ) जो प्रथम उपयोगांत आणतो त्याला च विजयश्री माळ घालण्याचा बहुशः संभव असतो. परंतु हें कार्य ( इनिशिएटिव्ह ) शत्रू कडून काढून आपणांकडे घेणें हें युद्धकलेच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें व मुष्किलीचें आहे, पण तें महाराजांनीं पुरें केलें.

**१३. खानाच्या फौजेची विभागणीः**

आपण शिवाजीला सहज दगा देऊं, आपल्या सारख्या फौजबंद सरदारापुढें त्या डोंगरांतल्या उंदराचें कांहीं चालणार नाहीं, आपल्याला

---

१. रा. खं. १७. ३१.

त्यास सहज चिरडतां येईल, असा खानाला आत्मविश्वास असल्यामुळें स्वतःच्या फौजेच्या विशेष हालचालींची व तयारीची आवश्यकता त्याला वाटली नसावी व त्यामुळें त्याची फौज पुढें वेळ आली तेव्हां पार मुक्कामीं बेसावध व घोड्यावर सामान सुद्धां न घातलेली अशा अव्यवस्थित स्थितींत होती ह्यांत नवल नाहीं. ह्या बेसावधपणाचा परिणाम त्याला अखेर भोगावा लागला.

**१४. युद्धाचा पुकारा** ( declaration of war ):

विजापुरदरबारच्या युद्धमंडळानें महाराजांविरुद्ध कागाळ्यांची चर्चा करून, अखेर खानास त्यांच्यावर पाठविण्याचें ठरविलें. नंतर खानानें आपण शिवाजीवर निघाल्याचें व त्याला शिक्षा देण्याचें जाहीर करून त्या प्रमाणें मावळांतल्या ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना हुकूम सोडले. ही युद्धपुकारणी महाराजांना त्यांच्या बातमीदारांकडून कळली होती. आजकाल दोन राष्ट्रांत युद्ध सुरू होण्यापूर्वी जें राष्ट्र प्रथम चढाई करून जातें, तें आपल्या म्हणण्याच्या ज्या कांहीं अटी असतील त्या एका निर्वाणीच्या खलित्यावर (ultimatum ) लिहून त्या दुसऱ्या राष्ट्रास कळवितें. ह्या खलित्यांत २४ तासांपासून २।३ दिवसांपर्यंत मुदत दिलेली असते. ह्या मुदतींत त्या दुसऱ्या राष्ट्रानें जर अटी मान्य केल्या नाहींत तर हें पहिलें राष्ट्र त्या विरुद्ध तावडतोब युद्ध पुकारतें. अशी तंतोतंत परिस्थिती त्या वेळीं नसावी; तरी युद्ध पुकारण्यापूर्वी दुसऱ्या पक्षास थोडी फार सूचना देण्याचे कांहीं प्रकार असत.

**१५. वांई ते प्रतापगडचा मार्गः**

खान दहा बारा हजार फौजेनिशीं वांईकडून निघाला तो कुसगांव, चिखली, तायघाट, गुरगड, गुताड, लिंगमाळ, महाबळेश्वरचें पठार आणि

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ... सातारा



जावळीचें पठार ह्या रस्त्यानें पार कोयना मुक्कामीं येऊन पोहोंचला व तेथें त्यानें आपल्या फौजेचा तळ दिला. पुढें त्यांपैकीं १५०० लोक बरोबर घेऊन तो ढेप्या डोंगराच्या जनीटेंब या मुख्य पहाडाच्या सोंडे कडे आला. हा डोंगर प्रतापगडाहून साधारण अर्ध्या मैलावर आहे.

**१६. खानाचें मुख्य उद्दिष्टः**

आपलें मुख्य उद्दिष्ट साधण्यासाठीं खानाला महाराज जेथें असतील तेथें जाणें भाग होतें; तर उलट खानाचें उद्दिष्ट साधूं न देण्याकरितां व स्वतःचें उद्दिष्ट जो बचाव तो साधण्याकरितां महाराजांना खानाच्या फौजेला टाळण्याचा प्रयत्न करणें व मैदानांत त्याच्याशीं लढाई खेळण्याचा डाव न टाकणें भाग होतें. तसें च महाराजांची त्या वेळची लष्करी गणति ( strength ), त्यांचीं साधनें, त्यांनीं आंखलेल्या आयुष्यक्रमाची सुरुवात, मोंगलाशीं त्यांचा असलेला वांकडेपणा, त्यांचा मोठेपणा सहन न झाल्यामुळें मत्सरानें जळत असलेले आसपासचें मराठमंडळ इत्यादि गोष्टी लक्ष्यांत घेऊन त्यांनीं च प्रथम उपक्रम करून व पहिला तडाखा हाणून चढाई करणें शक्य नव्हतें व इष्ट हि नव्हतें. उत्तम प्रकारें बचाव करतांना सुद्धां शत्रूचें पहिला तडाखा हाणण्याचें कार्य आपल्याकडे खेंचून घेतां येतें व त्या प्रमाणें महाराजांनीं घेतलें हि. आपलें मुख्य उद्दिष्ट साधण्याकरितां प्रथम महाराजांच्या फौजेशीं लढून तिला नामोहरम करणें खानाला जरूर होतें. शिवाजीमहाराजांची फौज मारणें हें खानाचें दुय्यम ( secondary ) उद्दिष्ट किंवा स्थानिक ( local ) उद्दिष्ट बनलें होतें. पार घाट अथवा जावळी येथें असलेली

---

१. स. १५. २. स. १६.

८

महाराजांची फौज म्हणजे त्या वेळच्या स्थानिक परिस्थितीची किल्ली, ही प्रथम मारून म्हणजे स्थानिक उद्दिष्ट प्रथम साधून, नंतर प्रतापगडीं महाराजांनीं केलेली बचावाची तयारी तोडणें खानाला भाग होतें. ह्या दोन गोष्टी केल्यानंतर मग त्याचें मुख्य उद्दिष्ट त्याला साधतां आलें असतें ! परंतु हें मुख्य उद्दिष्ट साधण्याकरितां आपल्या फौजांचा नाश न होतां केवळ राजकारणाच्या डावांनें च महाराजांना भेटींत गांठून जर 'चढ्या घोड्या' निशी विजापुरीं घेऊन जाण्याची प्रतिज्ञा त्याला पुरी करतां आली असती तर त्याचें एक उद्दिष्ट त्याला साधतां आलें असतें व असें जर घडून आलें नसतें तर मग मात्र युद्ध करून आपलें उद्दिष्ट खानाला साधावयाचें होतें.

---

# प्रकरण ४ थें

## १. बचावाच्या लढाईचें धोरण:

चढाईची लढाई खेळण्याकरितां ज्याप्रमाणें कांहीं विशिष्ट धोरणें आंखावीं लागतात त्याप्रमाणें बचावाच्या लढाईंत हि कांहीं आंखावीं लागतात व त्यांत माऱ्यांच्या जागा, खिंडी, घाट, पहाडांच्या रांगा, रस्ते, परकीय राज्यांच्या सरहद्दी, त्या राज्यांचा कल व आपलें उद्दिष्ट वगैरे गोष्टींचा पूर्ण विचार करावा लागतो. त्याला अनुसरून महाराजांनीं राजगड हें आपलें रणक्षेत्र न करतां प्रतापगड हें केलें होतें. प्रतापगड सोडून महाडचा भाग त्यांना रणक्षेत्र करता आला असता. परंतु तिकडे शिद्दी वगैरे शत्रुपक्षीय सरदार असल्यामुळें तो बेत ठरविणें बरोबर नव्हतें. एवढें च नव्हें तर उलट घातुक होतें. शिवाय, महाड टापू हा रायगडाहून फार लांब पडतो आणि रायगड ते प्रतापगड यांमधील माऱ्याच्या जागा जशा सुरक्षित करता आल्या तशा रायगड ते महाड ह्या मधील जागा तितक्या सुलभ रीतीनें सुरक्षित करतां आल्या नसत्या व रस्त्याच्या अभावीं उपराळे हि वेळेवर न पोहोचते. घाट हातांतून गेल्यामुळें बचावाची लाईन तुटली असती व उलट रायगड किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या किल्ल्याच्या जागीं फौजेचा कोंडमारा मात्र झाला असता.

कारण महाराजांच्या स्वराज्याकडे व पश्चिम किनाऱ्याकडे येण्याचीं जीं नाकीं ( सह्याद्रीचे पुष्कळसे घाट व खिंडी ) होतीं तींच

दाबून धरण्यानें, पूर्वेकडील शत्रूला पश्चिम किनाऱ्याकडे येतांना रोखतां आलें असतें. म्हणजे ज्या मार्गानें व ज्या खिडींच्या दिशेनें शत्रुसैन्य येत असेल, तेव्हां ती खिंड व तिच्या उत्तर दक्षिणच्या जवळच्या कांहीं खिंडी रोखल्यानें शत्रूस चढाई करतां येणें फार च कठीण जातें. शिवाय थोडक्या सैन्यानें हें बचावाचें मोठें काम करतां येतें.

**महाराजांचें बचावाचें धोरण**

या वेळीं महाराजांचा आडाखा (plan) बचावाचा होता. हा त्यांच्या स्वराज्यस्थापनेचा सुरुवातीचा काल होता. आपल्या राज्याला परराज्यांतील विशेष जास्त असा मुलूख त्यांनीं जोडला नव्हता. त्यामुळें त्यांच्या खजिन्यांत हि त्यांच्या वाढत्या उद्योगाला पुरेशीं अशी भर पडली नव्हती. त्यांचा फौजफांटा हि खाना इतका मोठा व जास्त नव्हता, तेव्हां, अर्थात् महाराजांना वांई येथून घाटांत खालीं कोंकणांत उतरण्याचे घाट म्हणजे प्रतापगडच्या उत्तर दक्षिणेकडील घाट रोंखून धरणें हें च अवश्य होतें. त्यांनीं प्रतापगड हा किल्ला हि या च धोरणानें बांधला होता. म्हणून प्रतापगड व पारघाटच्या उत्तरेस असलेल्या ढवळ्या घाटांत थोडी चौकीची फौज ठेऊन मुख्य बचाव प्रतापगड येथें च केला. अर्थात् पुढें ती च जागा, बचावाचें रूपांतर चढाईंत करते वेळीं रणक्षेत्रांत झाली म्हणून सर्व बाजूंनीं उत्तम व मध्यावर असलेली अशी प्रतापगडाची सह्याद्रीच्या खिंडींतील जागा महाराजांनीं आपली आघाडीची कोठी ( base ) केली.

**२. संभवनीय रणक्षेत्रः**

वरील कारणांमुळें प्रतागडच्या लगतच्या डोंगरांचा व नद्यांचा फायदा घेऊन आसपासच्या ७-८ मैलांच्या टापूंत वेळ च आल्यास

खानाच्या फौजेचें नुकसान करतां येणें महाराजांना सहज शक्य होतें. ही जागा बऱ्याच अडचणीची होती. पलीकडे जाण्याला पारघाटाच्या वर उत्तरेला व खालीं दक्षिणेला १५।१६ मैलांच्या लांबींत वरध्या, ढवळ्या व निवळीचा घांट आहे. महाराज प्रतापगडावर असतांना खानाला एवढें चक्कर घेऊन ( turning movement ) वरील घाटाच्या मार्गानें प्रतापगडाच्या मागें पश्चिम दिशेला जाण्यांत वेढयाच्या लढाईच्या दृष्टीनें विशेष फायदा नव्हता. खान वांई महाबळेश्वराच्या टापूंत येण्यापूर्वींच महाराजांचें प्रतापगडावर येणें व तो वांई येथें येऊन पोहोंचतो न पोहोचतो तोंच मैदानांत लढाई न करण्याच्या व प्रतापगडावर च बचाव करण्याच्या महाराजांनीं आंखलेल्या धोरणा (strategy) मुळें खानाच्या पहिल्या धोरणाला अनिश्चित असें स्वरूप आलें. ह्या आपल्या धोरणाप्रमाणें गोष्टी घडवून आणण्यास महाबळेश्वराच्या टांपूतला प्रदेश लढाईकरतां ठरविणें महाराजांना जरूर होतें. महाराजांच्या बाजूनें विचार करावयाचा म्हणजे असल्या डोंगराळ प्रदेशांत व कृष्णा, कोयना, वेणा वगैरे नद्या असलेल्या प्रांतांत लढाई खेळण्याची, त्यांच्या बचावाच्या धोरणास अनुसरून अवश्यकता होती आणि असल्या च प्रकारच्या प्रदेशांत लढायांचें शिक्षण त्यांच्या मावळ्यांना मिळालें होतें. कारण, सुरुवातीपासून च डोंगरी व गनिमी काव्याच्या लढाया खेळून महाराज आपलें हिंदवी स्वराज्य उभारीत होते.

### ३. लढाई पूर्वीचें धोरण व परराष्ट्रीय राजकारणः

महाराज प्रतापगडीं असल्यामुळें तडजोडीनें व राजकारणाच्या डांवपेचानें कसें तरी त्यांना गाठावें हा खानाचा इरादा होता. गांठल्यानंतर त्यांना जिवंत विजापुरास नेणें किंवा ठार करणें मग

आपल्या हातचें आहे अशी त्याची घमेंड असल्यामुळें, त्याला ह्या प्रांतांत राहून आपलें उद्दिष्ट साधण्याचा मोह व भुरळ पडली असल्यास नवल नाहीं. त्याकरितां खानानें मावळांतील जितके देशमुख आपल्या बाजूला वळवून घेतां येणें शक्य होतें, तितक्या सर्वांस आपल्या बाजूस ओढण्याची पराकाष्ठा केली व त्या करितां त्यानें कांहीं मुख्य मराठे देश-मुखांचें वजन बाकींच्या देशमुखांवर घालण्याचें राजकारण केलें आणि तें बादशाही फर्मानांच्या जोरावर च त्याला करतां आलें. याचा हि फायदा महाराजांनीं हें च रणक्षेत्र निश्चित करण्यांत घेतला असावा असें अनुमान काढणें बरोबर ठरतें. आपण ठरविलेल्या रणक्षेत्रांत शत्रूस लढाई खेळ-ण्यास भाग पाडणें हें युद्धशास्त्रांतील एक मोठें महत्त्वाचें तत्त्व आहे व महाराजांनीं तें आपल्या मुत्सद्दीपणानें साधून घेतलें ही हि गोष्ट महत्त्वाची आहे. राजकारणाचा युद्धकौशल्याशीं ( strategy ) किती व कसा निकटचा संबंध असतो त्याचें हें एक उत्तम उदाहरण आहे. काल-क्षेप करणें हें जसें युद्धकलेंतील एक तत्त्व आहे, त्याप्रमाणें शत्रूचा उत्साह कमी करणें, आपली तयारी वाढविणें, शत्रूला गोंधळांत पाडून आपला कार्यभाग साधणें हीं हि त्यापैकीं च दुसरीं तत्त्वें आहेत.

**४. लढाईचें ठरविलेलें बचावाचें सामान्य धोरणः**

ह्या वरून महाराजांचा युद्धाचा बेत कसा होता ह्याची ढोबळ कल्पना होते. खानाच्या भेटीच्या अगोदर च लढाई करावयाचा प्रसंग आल्यास ती कशी करावयाची हें हि त्यांनीं पूर्वीं ठरविलें असल्याचें दिसून येतें. होतां होई तों लढाईस उभें राहावयाचें च नाहीं पण जर खान आपण होऊन घाटांत व गडाच्या टापूंत युद्ध खेळण्याकरितां फौजांच्या हालचाली करूं लागला, तर केवळ बचावाच्या दृष्टीनें च

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोर
नगर वाचनालय, सातारा



तेवढें त्यास तोंड द्यावयाचें व खानाच्या सैन्यास तात्पुरतें थोपवून धरावयाचें, तसें च भेटींत कांहीं कमीजास्त प्रसंग खानानें आणला व त्यांत आपलें कांहीं बरें वाईट झालें तर आपली पुढची व्यवस्था कशी करावयाची हें त्यांनीं ठरविलें[1] व तें पाहिलें म्हणजे त्यांचा लढाईचा बेत ( plan of campaign ) हा (active defence) म्हणजे प्रथम बचाव करून संधी येतां च चढाई करून शत्रूचा नाश करण्याचा होता असें स्पष्ट दिसतें.

### ५. सैन्याची विभागणी व नेमणूक:

किल्ल्याच्या रक्षणाचें काम महाराजांनीं खुद्द आपल्याकडे घेतलें होतें[2]. किल्ल्यावर नक्की फौज किती होती ह्याची माहिती मिळत नाहीं. नैऋत्य बाजूला पारघाटांत मोरोपंत पिंगळे हे आपल्या पायदळानिशीं किनेश्वरच्या खोऱ्यांत तयारीनें होते. ही च फौज महाराजांचें स्थानिक राखीव सैन्य ( local reserve ) होतें. गडाच्या वायव्येस नेताजी आपल्या घोडदळासह कुडेसराच्या पठारावर होता. ही फौज महाराजांचें सामान्य राखीव सैन्य (general reserve) होतें. प्रतापगडच्या पूर्वेस ज्या जागीं भेट झाली त्या जनीच्या टेंबाच्या किंवा धावणीच्या टेंबाच्या उत्तर दक्षिणेस जागजागीं खोऱ्यांमध्यें कान्होजी जेधे, बांदल, अण्णाजी दत्तो, पासलकर, वगैरे हुद्देदार आपापल्या जमावांनिशीं होते, पारच्या दक्षिणेला बाळाजी सिलीमकर होता, जावळीच्या बाजूला पारच्या उत्तरेस हैबतराव सिलीमकर होता आणि वांई व जावळी यांचे दरम्यान बाबाजी भोंसले आपल्या घोडदळासह होता. मोरोपंत ह्यांच्या

१. स. १२; पो. चौ.२२. २. शि. दि. १६४.

हाताखालीं, गडाच्या नैऋत्येस जों डोंगर आहे, त्यावरील दरडीच्या ( घाटाच्या ) उत्तरेला व कोयनेच्या बाजूला आणि रानांत त्यांनीं आपल्या फौजेला टोळ्याटोळ्यांनीं बसण्यास, म्हणजे खानास बातमी न लागूं देतां, त्याच्या तळाच्या आड, पण फार लांब नाहीं अशा ठिकाणीं, हालचाल न करतां रहाण्यास हुकूम दिला[1].

**६. खानाच्या चढाईचीं कारणें:**

खान दगा करून आपल्याला पकडून नेण्याच्या उद्देशानें आला आहे, त्या अर्थीं तो लढाई करणार हें महाराज जाणून होते. ह्या त्यांच्या अनुमानास पुढील सबळ कारणें होतीं.

( १ ) खानानें त्यांना जिवंत पकडून अथवा त्यांना ठार करून त्यांचें शव विजापुरीं नेण्याची केलेली प्रतिज्ञा.

( २ ) शहाजीला सोडविण्यासाठीं विजापुरदरबारला मोंगलाकडून दिलेल्या शहामुळें दरबारला आलेली चीड.

( ३ ) मोऱ्यांचीं मुलेंमाणसें विजापुरास पळून गेल्यानंतर त्यांनीं तेथें जास्त खळबळविलेलें वातावरण व अफझलखानाला त्यांनीं कबूल केलेली मदत.

( ४ ) नवीन किल्ले बांधून स्वतंत्र राज्य स्थापण्याची महाराजांची महत्त्वाकांक्षा व त्याप्रमाणें कृति.

( ५ ) मोऱ्यांच्या प्रकरणामुळें विजापुरदरबारीं असलेल्या इतर मराठे सरदारांना बसलेला वचक व त्यांची सहानुभूति थोडी

---

१. जे. क. शि. च. प्र. ४४; जे. श; शे. व. २५, २८, ३०, ३१; स. १२, १६; चि. ५५, ५७, ५९.

थोडी महाराजांकडे झुकल्यानें एक प्रकारें विजापुरदरबार कमकुवत होत जाणें.

( ६ ) दरबारांतील मराठ्यांशिवाय आदिलशाही राज्यांतील व आसपासच्या प्रदेशांतील इतर मराठ्यांचा महाराजांना उघडपणें मिळणारा पाठिंबा.

( ७ ) धर्मसंरक्षण, धर्मसंस्थापना, ह्यासाठीं स्वराज्य मिळविण्याच्या प्रयत्नास महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व समाजाची महाराजांना मिळणारी सहानुभूति.

( ८ ) खुद्द महाराजांचें धाडस, तडफ, वगैरे वैयक्तिक गुणे.

( ९ ) आणि त्यांची वाढती फौज.

ह्या सर्व कारणांमुळें त्यांच्या या प्रयत्नाला होईल तितक्या लौकर विजापुरदरबारला बांध घालावयाचा होता. परंतु त्या अचाट बुद्धीच्या माणसाचा वाटेंतला अडथळा एकदम नाहींसा करणें किंवा पुन्हां चळवळ न करतां येण्याजोगा लंगडा करणें अर्थात च कठीण होतें; म्हणून तें काम करण्यासाठीं दरबारनें आपली सर्व शक्ती वेंचली होती.

---

१. Carre who accompanied the French Director General was at Surat from 1668 to 1671. He has written two volms. In his second volume he writes that he admires Shiwaji's character and compares him to Gustavus Adolphus and Julius Ceasar and ascribes to him all the qualities of a consummate hero and a sovereign.

( Orme's H. F. pp. 174. )

खानाची चढाई व महाराजांचें धोरण

खान आपल्यावर चढाई करील व वेळ प्रसंगीं दगा हि करील अशी महाराजांना खात्री होती. त्यामुळें आपल्यांवर केवढें मोठें संकट आलें आहे ह्याची पूर्ण कल्पना त्यांना झाली. त्याची साक्ष त्यांनीं आंखलेल्या योजनांतील ( plan ) प्रत्येक बाबींत पहावयास सांपडते. खान बेइमान आहे, भेटीच्या समयीं कदाचित त्यानें बेइमानी केली तर त्याचें जें लष्कर पार व जावळीच्या आसपास आहे तें डोंगरा वर चढून येतां च त्याचा नाश करण्याचें काम बांदल वगैरे सरदारांकडे सोंपविलें होतें. सरळपणें भेट न होतां त्यांत विघ्न येऊन खानानें दगा केला व त्यांत आपण मेलों तर पुढचा हि बेत महाराजांनीं ठरवून ठेवला होता. बचावाच्या व प्रतिकाराच्या झटापटींत कदाचित् अंबाभवानीच्या वरें करून खान मरण पावला तर गडावरून इषारतीचे आवाज होतील तेव्हां पारघाटांत असलेल्या मोरोपंतांनीं व जनी टेंबाच्या जवळील सिलीमकर, जेधे वगैरे सरदारांनीं पार येथील सैन्य खानाच्या मदतीस येण्यापूर्वी च त्याच्यावर तुटून पडून तें नेस्तनाबूत करावें. खानाच्या बरोबर जो कांहीं थोडासा सरंजाम भेटीच्या जागे पर्यंत येईल त्याचा समाचार हिरोजी फर्जंदानें व महाराजांच्या बरोबरच्या इतर लोकांनीं ध्यावयाचा व नेताजीनें पार येथें व बोचेघोळीच्या घाटांत मदत पुरवून, शिवाय खानाच्या मुख्य सैन्याचा तळ किंवा अघाडीची कोठी, जी वांई येथें होती, तिच्यावर हल्ला करावयाचा; याप्रमाणें साधारणपणें लढाईच्या तजविजी महाराजांनीं आंखून ठेवल्या होत्या. या तजविजींपैकीं प्रत्येक योजनेंत महाराजांनीं युद्धशास्त्रांतील अनेक महत्त्वाच्या अंगांपैकी या जागीं उपयुक्त होतील अशीं निरनिराळीं अंगें अत्यंत दूर-

दर्शिपणानें उपयोगांत आणिलीं होतीं. भेट तिसऱ्या प्रहरीं व्हावयाची होती[1]. त्यानंतर, थोड्या च वेळानें अंधार पडणार, दिवस शुद्ध पक्षांतील सप्तमीचा असल्यामुळें, चांदणें हि मध्यरात्रीं नंतर फार वेळ रहाणारें नव्हतें. त्यामुळें अंधाराचा फायदा घेऊन शत्रूवर अचानक छापा घालून व त्याला जास्त गोंधळांत पाडून त्याचा पराभव करावयाचा हें हि एक धोरण महाराजांनीं प्रसंग च पडल्यास अमलांत आणविण्याचें ठरविलें होतें.

**तोफांच्या बारांचे संकेत**

भेटीच्या वेळीं जशा गोष्टी घडून येतील त्यांस अनुसरून तोफांचे निरनिराळया प्रकारचे संख्यानिदर्शक सांकेतिक बार होतील असें हि ठरलें असावें[2]. हे बार पुढील संकेता करतां असण्याचा संभव आहे. आपल्याला खानानें दगा दिला तर अथवा उभय पक्षीं तात्पुरता तह ठरला तर, किंवा कोणत्या हि निमित्तानें खानाशीं लढणें भाग पडलें तर. तेव्हां अशा वेळीं सैन्याच्या तयारीच्या व हुकुमाच्या दृष्टीनें तोफांचा निरानिराळया प्रकारचा संकेत असणें अगदीं अवश्य होतें. शत्रूवर तुटून पडून लढाई करावयाची किंवा लढाई द्यावयाची नसल्यास पुढें कसें वागावयाचें ह्या गोष्टींचे हुकूम देणें ह्या संकेतांच्या द्वारें ठरविलें असावें.

**७. गडावरील तोफा** ( guns upon the fort):

गडावर किती तोफा होत्या हें नक्की समजत नाहीं. त्या वेळीं प्रत्येक गडावर शत्रूनें वेढा दिला असतां ३।४ महिने त्याला दाद न

१. शि. भा. अ. २१ श्लो. ११–१८; शे. ब. २९,३१; शि. दि. १६६, १७०. २. शि. दि. १६४; स. १६, १८; म. सा. छो. ब. २३; ; जे. क; शि. च. प्र. ४४.

लागेल इतपत दारूगोळा व इतर युद्धोपयोगी सामान सतत ठेवण्याची चाल होती. त्यामुळें तोफांचा योग्य पुरवठा प्रतापगडावर असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या तोफांची मांडणी, पुढील धोरण ( खानाशीं होणारें बचावाचें युद्ध ) लक्ष्यांत घेऊन केली असली पाहिजे. भेटींत महाराजांचें बरें वाईट होऊन खानाची सरशी झाली व ती बातमी त्याच्या फौजेस कळली म्हणजे ती फौज भेटीच्या मांडवाच्या रोखानें किल्ल्यावर येऊं लागेल; अशा वेळीं तिला जेणें करून जोराचा प्रतिकार करतां येईल अशा प्रकारें ही तोफांची मांडणी केली असावी; म्हणजे खानाच्या फौजांचे घाटाकडे व गडावर येण्याच्या मार्गां ( lines of approaches ) वर तोफा रोंखून ठेविल्या असाव्यात.

**८. दळणवळण** ( communication ):

भेटीच्या जागेपासून गडाच्या दरवाज्या पर्यंत निरनिराळ्या प्रकारचे पानसुपारी व अत्तरगुलाबाची व्यवस्था करणारे नोकर त्या त्या कामांच्या सबबीवर हत्यारबंद असे उभे केले होते. म्हणजे हा एक छोटासा संदेशमार्ग कायम केला होता. मांडवा जवळ एक कर्णेवाला ठेवला होता[1]. भेट झाल्याबरोबर कर्णा वाजवावयाचा होता; आणि त्या कर्ण्याचा आवाज गडावरील गोलंदाजास ऐकूं गेल्याबरोबर त्यानें त्या प्रमाणें सैन्याच्या निरनिराळ्या ठिकाणीं अंतरावर असलेल्या सैन्यसमुहांना वेळ न लागतां तत्काळ तो विवक्षित इशारा मिळावा म्हणून तोफ डागावयाची होती. भेटीच्या वेळीं जो कांहीं प्रसंग घडेल त्यास अनुसरून कर्ण्यांचे निरनिराळ्या सुराचे आवाज ठरले होते व त्या प्रमाणें

१. शि. दि. १६४.

ते ऐकून गोलंदाजानें हि तोफांचे बारांची संख्या ठरल्या प्रमाणें कमी जास्ती करावयाची होती. महाराजांना दगा न झाल्यास व तह ठरल्यास कर्ण्यांचा आवाज जो एक विशिष्ट प्रकारचा ठरला होता तो काढावयाचा आणि तदनुसार तोफ डागून ठिकठिकाणच्या सरदारांनीं लढाई न करतां स्वस्थ रहावें अशी इशारत द्यावयाची होती[1]. उलट खानानें दगा दिला तर आणि महाराजांना आपला बचाव करण्याची वेळ आली तर, कर्ण्यांचा दुसऱ्या प्रकारचा आवाज काढावयाचा व त्याला योग्य असे तोफांचे विशिष्ट संख्येचे बार काढून आपल्या निरनिराळ्या जागांच्या सेनापतींना खानाच्या सैन्यावर एकदम छापा घालून जाण्यास सुचवावयाचें होतें. अशा तऱ्हेनें महाराजांनीं मंडपापासून किल्ल्याच्या दरवाज्यापर्यंत व किल्ल्यापासून ठिकठिकाणच्या सेनापतींपर्यंत केवळ या इषाऱ्याच्या सहाय्यानें संबंध ठेवला होता. जेना येथील लढाईंत नेपोलियननें आपल्यापासून बऱ्या च अंतरावर असलेल्या मार्शल डिव्हँट यास अशा च प्रकारचा हुकूम देऊन ठेविला होता, कीं, जर तोफेचे ५ बार होतील तर त्या वेळीं तूं अमक्या एका ठराविक रस्त्यानें आपली तुकडी घेऊन ये.

**९. भौगोलिक परिस्थिति व रणक्षेत्राची निवडः**

रणक्षेत्राची निवड करतांना स्वतःची तयारी, सैन्याची तरतूद, त्याला वरचेवर लागणारा लढाऊ सामानाचा पुरवठा, पुरवठ्याचे मार्ग, ताज्या दमाच्या शिपायांचा पुरवठा करतां येणाऱ्या कोठ्या ( bases ), व शत्रूविषयींची अशा च प्रकारची सर्व उलट सुलट बातमी वगैरे अनेक गोष्टींचा विचार प्रामुख्यानें करावा लागतो. त्या च वेळीं ज्या ठिकाणीं

१. शि. भा. अ. २३. श्लो. १९.

आपल्याला युद्ध करावयाचें असतें तेथील भौगोलिक परिस्थितीची खडानखडा माहिती असणें व तिचा फायदा घेऊन रणक्षेत्र ठरविणें अवश्य असतें. ह्याबद्दलची माहिती मागें आली च आहे.

**१०. युद्धाच्या निरनिराळ्या पद्धति व त्यांचें एकीकरण:**

युद्ध करण्याच्या ज्या अनेक पद्धती आहेत त्यांस अनुसरून फौजेची रचना, संघटना, धोरण, हत्यारांचें शिक्षण व सैन्याच्या हालचाली निरनिराळ्या कराव्या लागतात. या पद्धतींत सुधारलेली किंवा शास्त्रीय (civilized or scientific), माऱ्याच्या जागा बळकट धरून बसण्याची (standing), वरील प्रकारच्या जागा एकामागें एक ताब्यांत घेण्याची (moving), वेढयाची (siege), डोंगरी व पहाडी (hill & mountain), जंगली (savage), झाडीझुडपांतील (ambush), समयानुकूल शस्त्रशास्त्रांची (partisan) व गनिमी (guieralla) इत्यादि निरनिराळे प्रकार आहेत. लढाईंत हि एक एक पद्धत, अथवा ह्या सर्व पद्धतींचें उत्कृष्ट मिश्रण चतुर सेनापती, सुधारलेल्या व सुसज्जित अशा शत्रूच्या विरुद्ध उपयोगांत आणतो व यश मिळवितो. सर्व बाजूंनीं पारतंत्र्यामुळें हीन दीन झालेल्या राष्ट्रास असल्या प्रकारच्या मिश्रणाच्या लढाईनें, सर्व तऱ्हेनें संघटित असलेल्या व सुधारलेल्या जेत्यांशीं टक्कर देऊन युद्धांत यश मिळवितां येतें; मात्र वरील प्रमाणें हें यश मिळविण्यास या निरनिराळ्या प्रकारांच्या लढाईंतील सर्व बाबींची म्हणजे रचना, शिक्षण, हत्यार, धोरण, हालचाल वगैरेंची त्यास खडान् खडा माहिती असावी लागते. तशी ती नसल्यास युद्धांत बरें च नुकसान होण्याचा संभव असतो. अशा तऱ्हेच्या मिश्र युद्धपद्धति विरुद्ध लढण्याला अत्यंत शास्त्रीय शोधांनीं युक्त असें सैन्य सुद्धां कचरतें.

श्री छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा

**११. परिस्थितीमुळें रणक्षेत्र बदलण्याचा विचार:**

महाराजांनीं ठरविलेल्या लढण्याच्या पद्धती प्रमाणें लढाई देण्यास रायगड जवळील प्रदेश इतका सोईस्कर नव्हता. त्यांचें उद्दिष्ट स्वतःच्या बचावाचें होतें, त्यामुळें लढाई करून मैदानांत जाऊन, खानाशीं लढाई करणें त्यांना शक्य नव्हतें. बचावाच्या धोरणाला रायगडापेक्षां प्रतापगडाचा मुलूख डोंगराळ व नदी नाल्यांनीं व दऱ्या खोऱ्यांनीं भरलेला असल्यामुळें जास्त उपयोगी पडण्या सारखा होता आणि म्हणून तेथें च त्यांनीं आपल्या पुढल्या बेताची उभारणी केली. शिवाय, जर खानाला एकदां पारघाट किंवा दुसरा घाट ओलांडूं दिला असता तर त्याला त्या जागांचा (positions) फायदा महाराजांच्या हालचाली (movements) लंगड्या पाडण्यास व कमी करण्यास कारणीभूत झाला असता. तसें च मुख्य घाट व खिंडी आपल्या ताब्यांतून याप्रमाणें घालवून बचावाची लढाई रायगडाला करणें महाराजांना शक्य नव्हतें.

**रायगड नापसंत करण्याचीं कारणें**

रायगडचा टापू रणक्षेत्र न करण्यास तो भौगोलिक दृष्ट्या कसा अयोग्य होता हें पाहूं:–रायगडच्या उत्तरेस पुणें–मुळशी ही डोंगराची ओळ आहे, पूर्वेस सासवड–पुरंदर भाग आहे, पश्चिमेस कुलाबा जिल्हा आहे आणि दक्षिणेस थोडासा कुलाबा जिल्ह्याचा भाग व साताऱ्यापैकीं, वांई मेढें व महाबळेश्वर हा भाग आहे. ह्या प्रमाणें रायगडच्या चतुःसीमेचा विचार केला असतां असें दिसतें कीं, उत्तरेस व पूर्वेस म्हणजे सिंहगड–पुणें व सासवड–पुरंदर ह्या भागांत शत्रूला ओढून आणून त्याच्याशीं लढाई करणें हें केव्हां च शक्य झालें नसतें. कारण हा प्रांत एक प्रकारें आपलें घर च होय. तेव्हां, खुद्द

घरांत व राजधानीच्या जवळ शत्रूशीं लढाई करणें युद्धशास्त्राच्या दृष्टीनें अगदीं च चुकीचें झालें असतें. त्यामुळें स्वतःच्या प्रजेची हिंमत ( morale ) एकदम कमी होते व स्वतःच्या रसदीचा व पुरवठ्याचा उपयोग स्वतःस न होतां उलट शत्रूस होतो. राजधानी जवळ शत्रूशीं लढाई कां करूं नये ह्याबद्दल मागें कारणें व उदाहरणें दिलीं आहेत. अशासाठीं महाराजांनीं रायगड टापू हें युद्धक्षेत्र न करण्याचें ठरविलें. रायगड हें एक शेवटचें निर्वाणीचें आश्रयस्थान होतें. ह्या प्रांतांतून म्हणजे, रायगड, राजगड, सिंहगड, पुरंदर, वज्रगड वगैरे मुख्य ठिकाणांहून, महाराजांना पुष्कळ वेळां आपल्या हालचालींचीं सर्व सूत्रें हलवावीं लागल्यामुळें तेथें च शत्रूला आंत शिरकून घेणें हें चुकीचें झालें असतें. शिवाय, लढाईंत अपयश आलें असतें तर मराठे सरदारांची मदत व लोकांची सहानुभूती त्यांनीं गमाविली असती व त्यामुळें सैन्याचा जोम खचला असता. सारांश, रणक्षेत्र पसंत करतांना तत्कालीन परिस्थितीचा व राजकारणाचा सर्व बाजूंनीं विचार करावा लागतो.

**रणक्षेत्र व भौगोलिक परिस्थिती**

शिवाय, शिवळा घाट, कात्रज घाट, दिवा घाट, ही जी डोंगरांची ओळ आहे, तिच्या पिछाडीस, वायव्येस, उत्तरेस व ईशान्येस असलेला बरा च म्हणजे ५०।६० मैलांचा प्रदेश साधारण खुला असा मैदानी आहे. माघार घ्यावयाचा प्रसंग आल्यास, वायव्येकडील बोरघाटा खेरीज वरील दुसऱ्या कोणत्या हि भागांतून व्यवस्थितपणें सर्व सैन्यासह माघार घेण्यासारखी सोईस्कर अशी दुसरी जागा नाहीं; म्हणून रायगड टापू पसंत केला गेला नाहीं.

**१२. पिछेहाटीचा मार्ग व रणक्षेत्र:**

युद्धाचा विचार करतांना जर वेळ प्रसंगीं पिछेहाट किंवा माघार घेण्याचा प्रसंग आला तर त्या साठीं आधीं विचारपूर्वक रस्ता शोधून व ठरवून ठेवणें हें फार महत्वाचें काम समजलें जातें. असें म्हणतात कीं, अट्टल असा एखादा चोर देखील चोरी करण्यासाठीं घरांत शिरण्यापूर्वीं वेळ पडल्यास बाहेर निघण्याचे सुरक्षित व सुलभ मार्ग कोणते ह्याचा विचार प्रथम करून ठेवतो. थोड्या बहुत प्रमाणानें हें हि काम त्या सारखें च आहे. तेव्हां पिछेहाटीचा रस्ता प्रथम पाहून विचार करून ठेवण्यांत कोणत्या हि तऱ्हेचा अवसानघातकीपणा, अपुरेपणा अथवा भ्याडपणा ह्याचा शिक्का सेनापतीवर अथवा लढाईच्या धोरणावर ( plan ) बसत नाहीं. उलट, आत्मविश्वास वाढविण्याला व निर्भयतेला मात्र या मार्गानें मदत होते. युद्धकलेचा ज्यांना विशेष परिचय नाहीं किंवा केवळ भावनोत्कट स्वभावामुळें ज्यांनीं सारासार विचाराला फांटा दिला आहे, अशा लोकांना कदाचित् हा मार्ग म्हणजे एक प्रकारें अक्षम्य चुकीचा व भ्याडपणाचा आहे असें वाटेल. पण युद्धशास्त्राच्या दृष्टीनें अशी तजवीज करून ठेवणें, हें अत्यावश्यक समजलें जातें. म्हणून अशा तऱ्हेनें भावी अडचणीच्या प्रसंगासाठीं, निरनिराळ्या प्रत्येक तपशिलाचा विचार,लढाई सुरू करण्याच्या आधींच व लढाई चालू असतांना हि ( तींत जसे फेरफार होतील त्यास अनुसरून ) वेळोवेळीं करावा लागतो.

**१३. वस्तुस्थितीचें अवलोकन:**

युद्धाचा बेत ठरवितांना वस्तुस्थितीचें अवलोकन व तिचा पूर्ण विचार करणें ही एक महत्वाची बाब आहे.त्यामध्यें वरील सारखे अनेक

९

प्रश्न व अनेक बाबी (शत्रूकडील व आपल्याकडील हि) ह्यांचा तुलनात्मक विचार करावा लागतो. शत्रूची व आपली फौज, भौगोलिक परिस्थिती, पुरवठा, सरहद्दी,हत्यारें, दारुगोळा, उपराळा, चढाई व बचाव, सांपत्तिक परिस्थिती, राजकारण, वाहतुक इत्यादि गोष्टींचा सर्व तऱ्हेनें विचार करून आपलें धोरण ठरवावें लागतें. महाराजांनीं या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन च आपलें धोरण ( plan ) आंखलेलें दिसतें.

**१४. चढाई व बचावांतील पिछेहाट** ( retreat in offensive & defensive ):

चढाई व बचाव म्हणजे, एक तऱ्हेनें करावा लागणारा हल्ला व संरक्षण होय. ह्यांच्यांतील माघार हा एक शेवटचा दुवा आहे. कांहीं ठिकाणीं त्याचा उपयोग आपल्याला करावा लागतो किंवा करणें भाग पडतें. कांहीं ठिकाणीं त्याचा उपयोग शत्रूला करण्यास आपण भाग पाडतो; म्हणून माघार अथवा पिच्छेहाट संबंधीं पूर्वी च विचार करून ठेविल्यास आयत्या वेळीं विशेष अडचण न पडतां कसा मार्ग स्वीकारावा व कोणतें धोरण ठेवावें आणि कोणत्या जागांचा, गोष्टींचा, सोयींचा, रस्त्यांचा, सैन्यांचा, माऱ्यांच्या जाग्यांचा, लोकांचा वगैरे कसा उपयोग करून घेतां येईल हें समजण्यांत घोटाळा होत नाहीं. अशा वेळीं सेनापतीला तत्काळ निकाल quick decision देण्याची अत्यंत आवश्यकता असते. त्या वेळीं उत्पन्न झालेल्या अडचणींचा सर्व बाजूंनीं, जास्त वेळ न गमावितां, तात्काळ व निश्चयात्मक असा बेत ठरविणें फार जरूर असतें. त्यामुळें अडचण उत्पन्न न होतां ह्या पिछेहाटीच्या कामीं मदत मिळते. नाहीं तर सर्व च घोटाळा माजण्याचा संभव असतो; कारण, कोणीं काय करावयाचें, कोठें जावयाचें, बेत (plan ) कितपत व कां बदलला त्याचे परिणाम काय,

वगैरेचें नीट आकलन न झाल्यामुळें जो गोंधळ व घोंटाळा उडतो त्यामुळें अपयश येण्याचा हि संभव असतो. हा युद्धाच्या आडाख्यां ( plans ) मधील एक भाग आहे म्हणून च युद्धापूर्वी त्याचा सर्व बाजूनें विचार करून ठेवणें इष्ट असतें.

**१५. बेत किंवा आडाख्यावर होणारा वेळेचा व जागेचा परिणाम** ( time & space affects strategy ):

एका मिनिटाच्या उशीरानें कित्येक लढाया अयशस्वी झाल्या आहेत. म्हणजे वेळेचा प्रश्न हा या बाबतींत एक विचार करण्याजोगें मुख्य व महत्त्वाचें अंग आहे. म्हणून सेनापतीमध्यें जलद निकाल देण्याचा गुण (quick decision) असणें व त्याकरितां सर्व गोष्टींच्या चौबाजूनें खुलासा पूर्णपणें प्रथम च करून ठेवणें हें अवश्य असतें. प्रतापगडा जवळील सह्याद्रीची रांग ही त्या वेळीं साधारणपणें दोघांची सरहद्द समजली जात होती. तिच्या आंत खानाला येऊं देणें अव्यवहार्य व युद्धशास्त्राच्या दृष्टीनें अत्यंत चुकीचें ठरलें असतें. शत्रूला त्याच्या च देशांत राखणें व आपल्या टांपूत येऊं न देणें, म्हणजे त्याच्या पुरवठ्याचा (supplies) फायदा आपण घेणें व त्याला तो मिळण्यास मुष्कील करणें, हा युद्धशास्त्रांतील एक नियम आहे. सह्याद्रीच्या रांगेचा म्हणजे एवढ्या मोठ्या बचावाच्या तटाचा फायदा घेण्याचें जर महाराजांनीं सोडलें असतें ( व तें हि केवळ योग्य वेळ व प्रसंग मिळे पर्यंत बचाव करण्याच्या दृष्टीनें सोडलें असतें ) तर त्यांनीं घोडचूक केली असती असें म्हणावें लागेल. ह्या अनुकूल परिस्थितचा फायदा अत्यंत थोड्या फौजेनिशीं, बचावाच्या दृष्टीनें व वेळ पडल्यास खानाशीं टक्कर देण्यांत करून घेण्या सारखा होता व त्या प्रमाणें महाराजांनीं तो करून घेतला.

**१६. प्रतापगडची निवड कां केली ?**

कुलाबा जिल्ह्याचा पूर्व भाग पुढीलप्रमाणें आहे. माणगांव–महाड ह्या तालुक्याच्या पूर्वेला एक पहाडाची रांगच्यारांग एकसारखी उत्तर दक्षिणेकडे जाते. तिच्यांतील वरधा घाटा पासून पारघाट व तेथून तिवरा घाटापर्यंतच्या रोखानें खानाला ह्या पहाडी जागेंत ओढावा असें महाराजांच्या मनांत असल्याचें यावरून स्पष्ट दिसून येतें. म्हणजे कुलाबा जिल्ह्यांतील महाड प्रांताचा अर्धा भाग ( सावित्रीच्या दक्षिणेकडील प्रदेश ) व रत्नागिरी जिल्ह्यापैकीं दापोली व खेड ह्या तालुक्यांच्या पूर्वेच्या सरहद्दीचे डोंगर, ह्या टांपूंत ज्या अडचणीच्या जागा आहेत, त्यांचा फायदा घेऊन, आपल्या थोड्याशा फौजेनें खानाचा पराजय करण्याचा, निदान स्वतःचा बचाव करण्याचा तरी महाराजांचा इरादा असला पाहिजे, हें उघड आहे. ह्यामुळें प्रतापगडचा टापू, हा रायगडापेक्षां बचावाची लढाई करून संरक्षण करण्यांत जास्त फायदेशीर होता.

रायगड प्रांतांत वायव्येच्या व उत्तरेच्या बाजूस लढाई खेळणें शक्य च नव्हतें. त्या च प्रमाणें पश्चिमेस व दक्षिणेस हि रणक्षेत्र करणें सोईस्कर व शक्य नव्हतें. कारण, ह्या प्रदेशांत नद्या, मैदानें, वगैरे असल्यानें बचावाच्या दृष्टीनें लढण्यास हा प्रांत गैरसोईचा होता. त्या शिवाय सह्याद्रीच्या जवळ जवळच्या सर्व घाटांची नाकेबंदी थोडया च सैन्यानिशीं होणारी असल्यामुळें तेथून आणि दुसरीकडे सह्याद्रीच्या खिंडी व घाट सोडून रायगडकडे रणक्षेत्र ठरविणें युद्धकौशल्याच्या (strategy) दृष्टीनें चुकीचें ठरलें असतें; म्हणजे आडाखा चुकीचा ठरता व अपयश पदरीं घ्यावें लागलें असतें तें निराळें च. सारांश, अमक्या

एका कारणाकरितां रायगड प्रांतांत लढाई खेळणें युक्त नव्हतें, असें न म्हणतां, मागें सांगितलेल्या सर्व गोष्टींचा व खानाकडील हि सर्व बाबींचा विचार केल्यास, तसें करणें महाराजांच्या फायद्याचें व सोईचें नव्हतें, एवढें मात्र स्पष्ट सांगतां येतें. एकंदरींत महाराजांनीं ज्या ज्या तजविजी व जीं जीं धोरणें या लढाईच्या प्रसंगीं आंखलीं व दाखविलीं त्यांवरून एवढें सिद्ध होतें कीं, त्यांचा विचार चढाईची लढाई न करतां बचावाची लढाई करून आपलें संरक्षण करावयाचा होता. (नकाशा नंबर १ पहा.)

**१७. महाराजांचे राजकारणांतील डांवपेंच** ( diplomacy ):

खान विजापुराहून निघाल्यावर त्यानें आपल्या राजकारणाचे डांवपेंच टाकण्यास सुरुवात केली. त्यानें मावळांतील जेधे, बांदल, खोपडे, इंगळे वगैरे मराठे सरदारांना व जहागीरदारांना आपल्यास येऊन मिळण्याबद्दल बादशाही फर्मानें पाठवून इनामें वगैरे देण्याची लालूच दाखविली. ह्या त्याच्या राजकारणाला केदारजी, खंडोजी व धर्माजी खोपडे, मंबाजी भोंसले वगैरे मंडळी बळी पडली, हें मागें सांगितलें च आहे.

**कान्होजी व महाराजांची मुत्सद्दोगिरी**

जेध्यांपैकीं कान्होजी जेधे हा मात्र खानास मिळाला नाहीं. त्याला खानानें पाठविलेलें इनामाचें बादशाही फर्मान घेऊन, तो आपल्या मुलामाणसांसह राजगडीं महाराजांकडे आला व त्यांना तें फर्मान दाखवून त्यानें त्यांचा सल्ला विचारला. ह्या वेळीं महाराजांनीं त्याच्याशीं वागतांना जी मुत्सद्दोगिरी दाखविली, ती मोठी दूरदर्शीपणाची व धूर्ततेची होती. तूं आमच्या च बाजूस रहा, असें कान्होजीस आपण स्पष्ट

सांगितलें, तर कदाचित् तो आपल्या डोक्यांवर चढेल आणि माझी मदत यांस अत्यंत आवश्यक आहे, असा भलता च चुकीचा ग्रह करून घेईल व त्यामुळें सोंपविलेल्या कामांत कुचराई व ढवळाढवळ करून आपण आंखलेल्या धोरणांत नसत्या आडकाठी आणील. उलट जर त्याला सोडावें, तर तो खानाच्या फौजेस जाऊन मिळेल व त्यामुळें आपल्या विरुद्ध आपण च जास्त फौज खानाला मिळवून दिली असें होईल आणि कान्होजी हि आपल्या हातचा नाहींसा होईल. तेव्हां ह्या दोन्ही बाजूंचा नीट विचार करून महाराजांनीं कान्होजीस मोघम च उत्तर दिलें कीं, तुम्हीं जाणते आहांत तुम्ही वाटेल त्याला मदत करा; खानास मिळाल्यास तुम्हीं आमच्या वडिलांस, आम्हांस ( स्वराज्य-स्थापनेच्या कामीं ) सहाय्य करण्याविषयीं जें पूर्वी वचन दिलें आहे तें मोडेल; उलट, आम्हांस मदत केल्यास तुमचें वतन आदिलशहा हिसकून तर घेईल च परंतु तुमच्या जिवास अपाय हि करण्यास चुकणार नाहीं. ह्या दोन्ही गोष्टी ध्यानांत घेऊन तुम्हाला जें योग्य वाटेल तें करावें. तुम्ही धूर्तच आहांत; शिवाय, स्वधर्म, स्वराज्य व स्वातंत्र्य या त्रयींसाठीं मीं हा खटाटोप करीत आहें; जें मिळवाऊ तें तुमचें च आहे; तुम्हांस माझ्याकडून खानाप्रमाणें–विजापूरदरबारप्रमाणें–कांहीं जास्त वतन अथवा जहागीर वगैरे मिळेल, असें ह्या स्थितींत मला आज कसें बरें सांगतां येईल ? परंतु, एवढें खरें कीं, जें मिळवाल तें तुम्हां सर्वांचें च आहे. हें उत्तर खोलपणाचें व धूर्ततेचें होतें. तें ऐकून कान्होजी मनांत चूर झाला व विचार करून शेवटीं वतनावर पाणी सोडण्याचें व महाराजांस मिळून शहाजीराजांस दिलेल्या शपथेस जागण्याचें त्यानें ठरविलें.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थो
नगर वाचनालय, सातारा

## महाराजांचा दुहेरी डांवपेंच

जेध्याचा कबिला ओलिस ठेविला

ह्या नंतर, महाराजांनीं जेध्याशीं जी वागणूक केली ती तर फार मुत्सद्दिपणाची व धूर्त राजनीतीची ( double diplomacy ) होती. ज्यानें खानाचें फर्मान आपणास आणून दाखविलें, तो कदाचित् न जाणों आपल्यास वरून मिळाल्यासारखें दाखवून आपल्या हालचाली व तजविजींची बातमी आंतून खानास देण्याचा बरा च संभव आहे. ही वेळ इतकी आणीबाणीची होती कीं, कोणत्या हि असल्या एखाद्या माणसावर वाजवीपेक्षां जास्त विश्वास टाकण्यांत चूक होण्याचा संभव होता. यामुळें, परिणाम फार च भयंकर झाले असते. ह्या गोष्टी लक्ष्यांत घेऊन, महाराजांनीं कान्होजीस सांगितलें कीं, तूं आपलीं मुलें माणसें कारीस ठेऊं नको; कारण, तूं आम्हांस मिळाला आहेस हें समजतां च खान हल्ला करून तुझीं मुलें माणसें पकडील. ह्यासाठीं ती सुरक्षित ठिकाणीं ठेवणें जरूर आहे. तुझ्या भरंवशाचे सरदार दादाजीपंत लोहकरे हे ढमढेऱ्याच्या तळेगांवीं असतात. तेथील ठाणें त्यांनीं मजबूत केलें आहे. त्यांचा हि कबीला तेथें च आहे, तरी तेथें तूं आपलीं मुलें-माणसें नेऊन ठेवावीं म्हणजे खानाचा त्रास त्यांना पोंहोंचणार नाहीं. हें महाराजांचें म्हणणें कान्होजीला पूर्णपणें पटलें व त्यानें तें कबूल केलें. या युक्तीनें महाराजांनीं दोन गोष्टी साधल्या. एक तर, कान्होजीच्या मुलां माणसांच्या संरक्षणाची हमी व तजवीज आपल्यावर घेतली असें कान्होजीस दाखविलें व दुसरें याप्रमाणें त्याचीं मुलें माणसें पर्यायानें आपल्या ताब्यांत म्हणजे ओलीस ठेऊन घेतल्याप्रमाणें हि केलें. त्यामुळें कान्होजीच्या मनांत असलें, तरी त्याला महाराजांशीं दगा करण्याचा संभव व सवड च राहिली नाहीं. जर त्याचा कबिला कारीस ठेवला

असता, तर त्याच्या रक्षणाच्या लालचीनें तो महाराजांशीं फितूर होऊन आयत्या वेळीं खानास मिळाला असता. कारण, या वेळीं कारी हें गांव खानाच्या हद्दींत येत होतें व तिच्या आसपासचे बरेचसे देशमुख त्याला मिळाले हि होते. यामुळें खानाला चटकन कान्होजीचा कबिला पकडता आला असता. तळेगांव ( ढमढेरे ) हें महाराजांच्या हद्दींत व प्रतापगडापासून फार दूर असल्यानें तेथें खानाचा लाग साधला नसता व कान्होजीस हि कबिला पकडला जाण्याची काळजी राहिली नसल्यानें तो खानाला मिळण्याचा संभव राहिला नसता. ह्याप्रमाणें निरनिराळ्या लोकांशीं, निरनिराळ्या प्रकारचें राजकारण लढवून, बाळाजी सिलीमकर, बाबाजी भोंसले, वगैरे मंडळी महाराजांनीं आपल्याकडे मिळवून घेतली. ज्याला जें पटेल तें पटवून व ज्याला जें करतां येईल तें करण्यास सांगून महाराजांनीं निवडक लोकसंग्रह केला होता.

**१८. हालचालींच्या क्षेत्रांचें स्वरूप व साधनें:**

ज्या टापूंत हें युद्ध झालें तो टापू अतिशय डोंगराळ व अडचणीचा आहे. त्याच्या उत्तर दक्षिणेस एकसारखा ६०० मैल लांबीचा सह्याद्रि पसरलेला आहे. सह्याद्री पासून पश्चिमेस ५०।६० मैलांच्या आंत सर्व लांबीभर समुद्र पसरलेला आहे. कांहीं ठिकाणीं समुद्र वरील अंतरापेक्षां हि जवळ येतो. सह्याद्रीचा साधारण डोंगर पठाराचा भाग २० मैल रुंदीचा आहे. मुख्य मधली रांग, जिच्या घाटमाथ्यावर जातां येतां येतें ती साधारण ४।५ मैल रुंदीची आहे, परंतु ह्या मुख्य रांगेला जे पूर्व पश्चिम असे अनेक फांटे फुटले आहेत, ते सर्व लक्ष्यांत घेऊन लष्करी हालचालींच्या दृष्टीनें ह्या प्रांतांचा विचार करावा लागतो; म्हणून, पुढील थोडासा तपशील देण्यांत येत आहे.

सह्याद्रींतील कांहीं घाट

या प्रदेशांतील उत्तर दक्षिण जितके घाट अथवा खिंडी आहेत, तितक्या सर्वांचा विचार, फौजांच्या हालचाली करीत असतांना, दळणवळणाच्या, बचावाच्या व चढाईच्या दृष्टीनें करणें जरूर आहे. हे घाट म्हणजे बोरघाट, पिंपरीघाट, नाणेघाट, आंबोलीघाट, भीमाशंकरघाट, वरध्याघाट, आंबाघाट, पारघाट, भोप्याघाट, शिवळ्याघाट वगैरे होत.

युद्धशास्त्रदृष्ट्या घाटांचें महत्व

इंग्रज-मराठ्यांची जी लढाई बोरघाटाच्या खालीं पनवेल-खोपोली टापूत झाली होती, तींत परशुरामभाऊंनीं बोरघाट उतरून मुंबई व घाटावरील इंग्रजांचा तळ यांचें दळणवळण तोडलें होतें. इकडून हरीपंत फडक्यांनीं घाटावरील इंग्रजांच्या तोंडावर हल्ला करून त्यांस पळावयास भाग पाडलें. पुढून मागून मराठ्यांच्या कैचींत सांपडलेला इंग्रज पनवेलीस मोठ्या कष्टानें कसा तरी जाऊन पोहोंचला व शेवटीं पेशवे सांगतील त्या अटींवर स्वतःस नाचक्कीचा असा तह त्यानें चुंबत करून दिला. ह्या च प्रमाणें वणी-दिंडोरीच्या लढाई नंतर सुरतेकडील खंडणी आणतांना पिंपरीघाटाचा उपयोग महाराजांनीं केला आहे. इंग्रज-मराठ्यांच्या शेवटच्या युद्धांत व पेंढाऱ्यांच्या धामधुमींत अजिंठा व सातपुड्याच्या घाटांचा उपयोग दोन्ही पक्षांस झालेला आहे. थोरले बाजीरावसाहेब माळव्यावर चालून जात असतांना ज्या घाटांतून त्यांना पुढें जावयाचें होतें, तो शत्रूनें दाबला आहे असें पाहून, तेथें हुलकावणी दाखविण्यासाठीं, शत्रूच्या तोंडावर थोडी फौज ठेऊन, शत्रूनें दुर्लक्ष्य केलेल्या मांडवगडच्या दुसऱ्या च घाटानें चढून जाऊन, श्रीमंतानीं तिरला येथील लढाईंत राजा गिरधारास नामोहरम केलें. सारांश, डोंगरांतील घाट युद्धशास्त्रदृष्ट्या ताब्यांत ठेवणें हें फार जरूरीचें

असतें व केव्हां केव्हां त्यावर हि जयापजय अवलंबून असतो. कारण ह्या च घाटांतून त्याच्या आसपासच्या टापूंत लढाई चालू असतां आपल्या अथवा शत्रूच्या ( चढाई अथवा बचाव या दोहों साठीं ) हालचाली, दाणा–वैरणीचा पुरवठा, दळणवळण वगैरें करावें लागतें. आतां, ज्यास्त फायदेशीर उपयोग कसा व केव्हां होतो, हें त्या त्या वेळच्या सर्व उपलब्ध साधनांवर अवलंबून असतें व ह्या मार्गांतून सैन्याच्या हालचाली करतांना ह्या साधनांचा विचार करून नक्की बेत ठरवावा लागतो.

**महाराजांचा प्रतापगड व पारघाट येथील बचाव**

प्रतापगडच्या लढाईंत बचावाच्या धोरणाच्या दृष्टीनें (defensive strategy ) महाराजांना पारघाटाचा व प्रतापगडा सारख्या तटबंदीच्या जागेचा अतिशय उपयोग झाला. ह्या युद्धाचा जास्त बारकाईनें विचार करावयाचा असेल, तर गडाच्या पूर्वेंच्या २४ मैलांच्या व उत्तर दक्षिणेकडील ८।१० मैलांच्या सर्व टापूंची सूक्ष्म दृष्टीनें पहाणी करावी लागेल. ( नकाशा नं. १ पहा ).

**१९. रणांगण** ( field of fight ):

गडाच्या पूर्वेंस २४ मैल वांई पर्यंत, उत्तरेस जावळी, चंद्रगड ते ढवळ्या घाटांपर्यंत व दक्षिणेस पार पासून चतुरबेट व तिवऱ्या घाटा पर्यंत सह्याद्रीचा हा सर्व च भाग विलक्षण डोंगराळ व दाट जंगलाचा असा आहे. त्यांत उघडें मैदान असें फार च क्वचित आहे. ह्या दाट जंगलांतून पार निघून जाणें अतीशय धोक्याचें व अडचणीचें आहे. तुटलेले कडे, चढ-उतारांच्या बिकट जागा, घनदाट झाडी, मध्यें च उंच उंच निघालेली डोंगरांचीं शिखरें ह्या सर्व कारणांमुळें त्या प्रदेशांतून सैन्याच्या हालचाली व्यवस्थितपणें करण्यास, त्या प्रदेशाची पूर्ण माहिती

असलेल्या व त्यांत नेहमीं वावरणाऱ्या माणसांची च आवश्यकता आहे. (नकाशा नं. २ पहा.) हा नकाशा पहातांना खालीं लिहिलेल्या पहाडांच्या सोंडांचा, किल्लयांचा, नद्यांचा, घाटांचा व खोऱ्यांचा युद्धकौशल्याच्या दृष्टीनें किंवा स्थानिक डांवपेचांचा विचार करण्याच्या दृष्टीनें पहाणें अवश्य आहे. नकाशामध्यें हे सर्व प्रकार अडचणीमुळें देतां आले नाहींत. उदाहरणार्थ, घोडवन, पारचा ओढा, घोणासुराचा किल्ला निवळी, सुकराईचा रहाट, नामजाई नदी, नामजाई डोंगर, बिरमन खोरें, किनेश्वर खोरें, दाबाचा कडा, कोळदुर्ग, सिवाचें, टेंब, चौऱ्याचा डोंगर, पराचा डोंगर, किल्लयाची ओळ, वरदानीचा घाट वगैरे ठिकाणें या भागांत येतात.

आजकाल लष्करी हालचालींत डोंगर, निरनिराळ्या रांगा व स्थळें ओळखतां येण्यासाठीं त्यांना जे नंबर दिलेले असतात, ते फक्त नंबर देणाऱ्या लोकांना किंवा त्याचा अभ्यास करणाऱ्यांना च माहीत असतात. परंतु जर अमक्या नंबरचा डोंगर कोणता, असें त्या त्या ठिकाणच्या एखाद्या शेतकऱ्यास, धनगरास किंवा कुळंब्यास विचारलें तर त्याला तो सांगता येत नाहीं म्हणून ही पद्धति चुकीची आहे. हिच्या ऐवजीं त्या त्या स्थानाला असलेलें स्थानिक नांव च उपयोगांत आणणें हें जास्त फायदेशीर असतें.

**२०. रस्ते:**

वांई पासून प्रतापगडा पर्यंतच्या या डोंगराळ मुलखांत, त्या वेळीं आजच्या सारख्या पक्कया सडका नव्हत्या. त्यामुळें सैन्याला आपल्या एकंदर आटाळ्या (heavy baggages) सह जाणें येणें कठीण होतें. पायवाटा, म्हणजे जवळचे रस्ते (short cuts) आजच्या सारखे त्या वेळीं

हि असतील; परंतु, त्या सुद्धां बहुतेक अडचणीच्या, म्हणजे दरी-खोऱ्यांतून, नदी–नाल्यांतून व जंगलांतून जाणाऱ्या असतील. शिवाय, पावसाळ्यांत नदी-नाले भरल्यावर पायवाटा निरुपयोगी होतात. म्हणून सैन्याला आपल्या आटाळ्या सह व तोफखान्यासह चालून जाण्यास पायवाटां पेक्षां गाडीरस्ते ( cart tracks ) जास्त सुलभ व कमी त्रासाचे असतात. ते रस्ते पायवाटां पेक्षां थोडे फार लांबीचे व वळणा-वांकणाचे आणि चढ-उताराचे असतात, एवढेंच. (नकाशा नं. ४ पहा.)

**खानानें घेतलेला वांई ते प्रतापगड मार्ग**

आजचा वांई ते प्रतापगडचा जो रस्ता आहे, तो त्या वेळीं नव्हता असें अनुमान काढण्यास बरी च जागा आहे. कारण खानानें वांईहून गडाकडे जें कूच केलें, तें कुसगांव, चिखली, तायघाट, गुरगड, लिंगमाळ, महा-बळेश्वर–पठार, जावळी व कोयनापार ह्या मार्गांनें केलें ( नकाशा नं. ४ पहा ). हा मार्ग आजच्या वांई प्रतापगड ह्या रस्त्याशीं जुळत नाहीं. शिवाय, आजचा रस्ता हा डोंगरांच्या पायथ्यापायथ्यांनीं त्यांना वळसे घालीत घालीत असा केला आहे. म्हणजे, वाटेंतील शक्य तितके चढ उतार टाळलेले आहेत. जेथें अतिशय उतार आहेत तेथें थोडी फार भर टाकून ते नीट केले आहेत. साधारण चढ उतार असून जर अंतर कमी होत असेल तर असल्या चढ उतारांचा व दऱ्याखोऱ्यांचा फार विचार न करतां, त्यांचा तात्पुरता बंदोबस्त करून, तेथून हि पूर्वी रस्ते तयार करीत असत. ह्या मोठ्या रस्त्यांशिवाय, आसपासच्या प्रत्येक गांवांहून शेजारपाजारच्या दुसऱ्या गांवांस जाण्यासाठीं जशा आज पायवाटा आहेत, तशा त्या वेळीं हि होत्या. त्याशिवाय या गांवांचें परस्पर दळणवळण व बाजारहाट वगैरे होणें शक्य झालें नसतें.

२१. नद्या-नाले:

प्रतापगडच्या पूर्वेस युद्धक्षेत्राच्या टापूंत वांईपर्यंत नद्या-नाले व बारीकसारीक ओहळ पुष्कळ आहेत. कांहीं कांहीं नाले तर विशिष्ट जागीं नद्या इतपत मोठे आहेत. बहुतेक नद्यांचा प्रवाह उत्तरेकडून आग्नेयीकडे आहे व त्यांना मिळणाऱ्या बारीक सारीक ओढ्यांचा प्रवाह उत्तर-दक्षिण व पूर्व-पश्चिम असा आहे. म्हणजे, बहुतेक सर्व भागांतील जमीन ह्या नदी-नाल्यांनीं भरून गेली आहे. गडाच्या उत्तरेकडून सावित्री व कृष्णा या नद्या एक सारख्या थेट पश्चिमेस व पूर्वेस गेल्या आहेत. गडाच्या पूर्वेला कोयना नदी ही जवळ जवळ २॥-३ मैल दक्षिणोत्तर अशी वाहत आहे. तिला तीन ओढे येऊन मिळतात. त्यांचा उगम प्रतापगडाच्या जवळ च झालेला आहे. एक ओढा गडाच्या उत्तरेस ३-४ मैलांपर्यंत आला आहे, तर दुसरा गडाच्या दक्षिणेला २-२॥ मैलांपर्यंत गेला आहे, आणि तिसरा ओढा ह्या दुसऱ्या ओढ्यापासून दक्षिणेला २ मैलांवर किंवा गडाच्या दाक्षिणेला ५ मैलांवर वहात आहे ( नकाशा नंबर २ पहा ).

**नद्यांचे उतार.** (fords)

नद्यांपैकीं, कोयनेला ह्या भागांत पाय-उतार अतिशय कमी आहेत. शिवाय, जे उतार आहेत, त्यांच्या जवळ-पास असलेल्या डोंगरांच्या माऱ्यांच्या जाग्यांतून ते उतार उतरणें अत्यंत मुष्कीलीचें आहे. खेरीज, तिच्या कांठच्या दरडी उंच असून पात्र दगडांनीं भरलेलें आहे व पाण्याला ओढ हि बरी च आहे. त्यामुळें थोडया वेळांत सैन्याला एकदम ही नदी उतरून जाणें अशक्य आहे. पायदळा शिवाय इतर फौजेच्या ( घोडदळ, तोफखाना, वहातुकीच्या गाडया ह्यांच्या ) हाल-

चालींना ह्या उतारांच्या आसपासचा प्रदेश फार अडचणीचा व अवघड आहे.

**२२. पुरवठा व लोकसंख्या** ( supplies and population ):

प्रतापगडच्या खोऱ्यांत विशेषतः भाताची च शेती जास्त आहे. शिवाय वाल वगैरे कडधान्य थोडें फार पिकतें. जमीन त्या दृष्टीनें अत्यंत सुपीक आहे. ह्या वेळीं ह्या प्रदेशाची वस्ती आजच्या पेक्षां थोडी जास्त असावी. या टापूंतील पुरवठ्याचा सांठा, युद्धाच्या वेळे-करितां जागजागीं, गडोगडीं अंबरखाने तयार करून ठेवलेला असे. या भागांतलि रहिवाशी लोकांना लागणारा वर्षाचा धान्याचा सांठा सोडून बाकीचा सर्व सांठा वरील प्रमाणें ठेवण्याकरितां उपयोगांत आणतां येत असे.

**२३. बचावाच्या युद्धाची व छबिन्याची फौज** ( defence and outpost troops ):

गडाच्या पूर्वेला, मुख्य डोंगराची जी एक सोंड गेलेली आहे व ज्यावर हल्लीं खानाची कबर आहे त्याला जनीचें किंवा धांवणीचें टेंब म्हणतात (नकाशा नं.७ पहा.) या टेंबाच्या उत्तर व दक्षिणेस ३।३ व ४।४ ज्या समांतर सोंडी आहेत त्यांच्या उतारावरील झाडींत लपून महा-राजांच्या छबिन्याच्या चौक्यांचे लोक ( vedette, cossack posts, picquets, examining posts, sentry groups, patrols-visiting patrols or reconnatiring patrols ) टेहळणी करीत बसले होते ( पहा, नकाशा नंवर ७ ). या लोकांत जेधे, बांदल, सिलीमकर, बाजी सर्जेराव, अण्णाजी रंगनाथ, वगैरे सरदार आपापल्या सैन्यानिशीं होते. ज्या ठिकाणीं खानाची व महाराजांची भेट झाली

त्या सोंडेच्या पश्चिमेच्या बाजूला किल्ल्याच्या मुख्य दरवाज्या जवळ जी दरड किंवा गर्ता खणविली होती तिच्यांत हिरोजी फर्जंद आपल्या ४० लोकांच्या जमावासह होता[१].

**२४. छबिन्याच्या क्षेत्रांतील चौक्या** (outpost zone picquets):

गडावर महाराजांनीं यथाप्रमाण अशी शिबंदी ठेविली होती व गडावरून शत्रूचे गडावर येण्याचे मार्ग ( lines of approaches ) रक्षण करण्याकरितां गडाच्या बुरुजांवर योग्य जागीं तोफा हि लावल्या होत्या. म्हणजे गडावरील बंदोबस्तास पश्चिमेकडील म्हणजे मागील बुरूजांवर, दर बुरुजास व त्या बाजूच्या तटाच्या ( rampart ) भागास ५०।५० माणसें, पूर्वेकडील प्रत्येक बुरुजावर म्हणजें खानाच्या वर येण्याच्या दिशेकडील बुरुजा ( bastion ) वर व तटाच्या भागावर १००।१०० माणसें ठेविलीं होतीं[२]. रोखून ठेवलेल्या एकंदर तोफांची संख्या मात्र नक्की समजत नाहीं.

गडावरील शिबंदी
( garrison on the fort )

आदले दिवशीं रात्रीं महाराजांनीं खुद्द आपल्या देखरेखीखालीं आपल्यास हवी तशी सर्व चौक्या पहाऱ्यांची तपासणी करून व्यवस्था करून घेतली[३].

तसें च गडाच्या नैऋत्येस किनेश्वराच्या खोऱ्यांत मोरोपंत पिंगळे यांच्या हाताखालीं शामराज पद्मनाभी, त्र्यंबक भास्कर, नारायण ब्राह्मण, जेध्याचा दुसरा जमाव वगैरे पायदळी सैन्य होतें.

स्थानिक राखीव सैन्य
( local reserve )

१. म. सा. छो. ब. २३; २. शि. दि. १६५.; ३. शि. दि. १६३,१६४.

नेताजी व रघुनाथ बल्लाळ या घोडदळाच्या सेनापतींच्या हातांखालीं वायव्येस कडेसरच्या रानांत गडापासून अंदाजें अडीच तीन मैलांच्या अंतरावर घोडदळ होतें. हें घोडदळ महाराजांच्या एकंदर सैन्याचें सर्व साधारण राखीव सैन्य होतें.

**सर्व साधारण राखीव सैन्य** ( general reserve )

अशा प्रमाणें महाराजांनीं आपल्या बचावाच्या क्षेत्रां ( defence line ) मधील बचावी फौजांची व तुकड्यांची ( defence troops ) म्हणजे छाबिन्याची फौज, गडावरची शिबंदी, खिंडीमधील चौक्या, स्थानिक राखीव सैन्य व सर्व साधारण राखीव सैन्य अशी आपल्या एकंदर सैन्याची विभागणी करून त्यांस जागा नेमून दिल्या ( नकाशा नंबर २ पहा ).

गडाच्या बुरुजांवर व दरवाज्यावर ज्या तोफा होत्या त्यांशिवाय महाराजांच्या ठिकाठिकाणीं पसरलेल्या फौजांत व अघाडीवर किती तोफा होत्या ह्यांचा नक्की आंकडा सांपडत नाहीं. ह्या लोकांजवळ भारी तोफा नसल्या तरी हलक्या तोफा बऱ्या च असतील. नेताजी व मोरोपंत या दोघांच्या घोडदळांत व पायदळांत ह्या हलक्या तोफांचा भरणा विशेष असावा.

**रणांगणांतील तोफखाना** ( artillery in the field )

आजच्या सारख्या पक्क्या सडका त्या वेळीं ह्या प्रदेशांत नसल्यानें हत्तींकडून अथवा बैलांकडून वाहून न्यावयाच्या भारी तोफा या लढाईंत महाराजांनीं उपयोगांत आणल्या नसाव्यात-त्यांची जी नेहमींची लढाई खेळण्याची (गनिमी) पद्धत होती, तिला असल्या जड तोफांचा एक प्रकारें

**जड तोफा नेण्यास अडचणीचे रस्ते**

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) वाचनालय, सातारा



अडथळा झाला असता. दऱ्याखोऱ्यांच्या लढाईंत सुद्धां सैन्याला आपला सर्व आटाळा विंचवाच्या नांगीप्रमाणें आपल्या पाठीवर लादावा लागतो. त्या मुळें अशा अडचणीच्या जागीं जड तोफा नेणें म्हणजे एक प्रकारें सैन्याच्या भरारी, सुटसुटीतपणा व अचानकपणा यांस अडथळा आणण्यासारखें आहे. म्हणून किल्ल्याबाहेर असलेल्या महाराजांच्या सैन्यांत जड तोफा असणें शक्य नव्हतें.

डोंगरी तोफांचा संभव

जड तोफा बरोबर नसल्या म्हणजे असल्या सैन्यास अडचणीच्या रस्त्यांतून वाटेल तेव्हां चटदिशी जातां येतें. जर बरोबर जड तोफा घेतल्या तर पुढें मागें पिछेहाट करतांना त्या शत्रूच्या हातीं लागण्याचा संभव असतो व शत्रूला त्यांचा उपयोग आपल्या उलट करतां येतो. त्यामुळें आपलें दुहेरी नुकसान होतें. हें नुकसान गनिमी लढाईंत तर जास्त होतें. कारण त्या लढाईंत भरारी, सुटसुटीतपणा व अचानकपणा या तीन बाबी विशेषतः मुख्य आहेत. अर्थात या बाबींना अडथळा आणणाऱ्या जड तोफां बरोबर न घेतां महाराजांच्या सैन्यानें आपल्या बरोबर तट्टांवर अथवा उंटांवर नेतां येणाऱ्या हलक्या अशा डोंगरी तोफा ( mountain guns ) घेतल्या असण्याचा जास्त संभव आहे.

किल्यांवरील तोफा

गडाच्या बुरजांवर व दरवाज्यांवर ज्या तोफा होत्या, त्या तोफांचा मारा पाराजवळ कोयनेच्या कांठीं व जावळीच्या नैऋत्येला जी खानाची फौज होती तिच्यावर झाला कीं नाहीं हें कळत नाहीं. मारा झाल्याचा उल्लेख कोठें च आढळत नाहीं.

१०

इषाऱ्याचे आवाज एवढी च किल्यावरील तोफांची मारागिरी

पण कर्णा वाजल्यानंतर इषाऱ्या दाखल तोफांचे जे आवाज व्हावयाचे होते, ते मात्र ठरल्या प्रमाणें झाले असें दिसतें. ह्या वरून फक्त हुकूम पोहोंचविण्यापुरते तोफांचे आवाज या किल्ल्यावरील तोफखान्यांतून झाले. तोफांची मारागिरी ज्यास म्हणतात, तशी मारागिरी किल्ल्यावरून खानाच्या सैन्यावर फार झाली नसावी. कारण खानाचें सैन्य जरी गडाच्या तोफांच्या माऱ्यांत होतें, तरी त्या सैन्यावर एकदम चालून जाण्याकरितां त्याच्या लगत च त्याला न कळत जें मराठ्यांचें सैन्य छपवून ठेविलें होतें, तें हि ह्या तोफांच्या माऱ्यांत असल्यामुळें, लढाई सुरू झाली असतां, व तोफा डागून मारा केल्यास त्या पासून या छपलेल्या मराठी सैन्यास नुकसान पोहोंचण्याचा संभव असल्यामुळें तोफांची मारागिरी केली नसावी. या ठिकाणीं मराठ्यांचें किल्ल्यावरील सैन्य व खानाचें सैन्य इतक्या जवळ जवळ होतें कीं, पहिल्या च तोफेच्या आवाजा सरशीं शत्रूवर लगट व हातघाईची लढाई करावयाचें ठरलें होतें. म्हणून त्या दोघांच्या निरनिराळ्या फौजांमध्यें अंतर फार कमी ठेविलें होतें. (नकाशा नंबर ७ पहा.) या वेळीं गडावरच्या तोफा खानाच्या फौजेवर मारणें म्हणजे कदाचित् आपल्याहि लोकांचा नाश झाला असता. अशा वेळीं लढाईच्या आडाख्या प्रमाणें दोन्ही फौजांच्या तळाच्या सान्निध्यामुळें लढाईला सुरवात होण्यापासून ती वाढत जाण्यास व हातोहात हल्ले करण्यास पुरेसा अवसर नसतो. म्हणजे दोन्ही गोष्टी जवळ जवळ एका च वेळीं येतात. म्हणून अशा वेळीं तोफा चालविणें

तोफांच्या मारागिरीस अयोग्य अशा जागा

field of action unfavourable for artillery tactics

घातुक असतें. तथापि खानाच्या सैन्यांतून तोफांचा मारा झाला असावा असें आढळतें[1]. मग तो जावळी किंवा पार यांपैकीं कोठून झाला हें नक्की समजण्यास मार्ग नाहीं. त्यामुळें च तोफांच्या मारगिरीचे डावपेंच ( artillery tactics ), तोफांच्या मारगिरीचें शास्त्र ( gunnery ), तोफांच्या जागांची निवड ( selection of position ), तोफांच्या माऱ्यांचे टप्पे ( ranging ), तोफांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष मारा ( direct & indirect fire ), लढाईंत तोफखान्याचा एकंदर उपयोग व त्याचें कार्य ( artillery in battle & plan ) वगैरे सर्व गोष्टींवर प्रकाश पडत नाहीं. महाराजांनीं आपल्या तोफांची जरी मारगिरी केली नाहीं, तरी पण खानाच्या सैन्यावर त्या कशा रोखल्या असाव्यात हें समजण्यासाठीं तोफांचे निरनिराळे मारे ( ranges) घेऊन माऱ्याची रांग ( range cord ) तयार केली तर ती अंदाजानें खालीलप्रमाणें येईल. ( नकाशा नंबर ११ पहा. )

त्या वेळीं महाराज हे आपला बचाव-पण वेळ पडल्यास चढाई करून बचाव ( active defence )- करीत होते. आणि खान हि नुसती च चढाई ( offensive ) करीत होता. बचावाच्या (defence) वेळीं तोफांचा उपयोग फार होतो. त्यांतल्या त्यांत चढाई करून येणाऱ्या शत्रूस थोपवावयाचें असेल तर जास्त च उपयोग होतो. परंतु तसा लढाईचा प्रसंग आला नाहीं एवढेंच नव्हे तर उलट ( active defence ) चढाईच्या बचावाच्या लढाईंत तोफांचा उपयोग करण्याला वाव च नव्हता.

---

१. शि. भा. २२. ३७.

## २५. ठरविलेल्या ठिकाणीं खानास येण्यास भाग पाडणें:

महाराजांनीं रायगडीं राहण्याचें न ठरविल्यामुळें व त्यांना पकडणें किंवा बांधून विजापुरीं नेणें हें खानाचें उद्दिष्ट असल्यामुळें, जिकडे महाराज तिकडे खान असें झालें; म्हणजे महाराजांनीं जें रणक्षेत्र ठरविलें असेल तेथें च खानाला जाणें भाग पडलें व त्याला हि तें च रणक्षेत्र करणें जरूर झालें. खानानें आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न केला कीं, महाराजांनीं मैदानांत यावें व तेथें त्यांच्याशीं आपण लढाई द्यावी आणि आपलें उद्दिष्ट साध्य करावें. परंतु महाराजांना डोंगरी लढायांतील आपल्या युद्धचातुर्याची व डांवपेचांतील श्रेष्ठपणाची ( स्ट्रॅटजी टॅक्टीक्स ) खात्री असल्यामुळें ते मैदानामध्यें गेले नाहींत. वास्तविक कोणतें रणक्षेत्र फायदेशीर असावें, हें ठरविण्याचा अधिकार, खानानें चढाईचें धोरण स्वीकारल्यानें व पहिला उपक्रम ( initiative ) केल्यामुळें पहिल्यानें त्याच्याकडे आला होता. परंतु निरनिराळीं परिस्थिति उत्पन्न करून महाराजांनीं तो अधिकार आपल्याकडे ओढून घेतला. रणक्षेत्र ठरवितांना पुढील गोष्टींकडे विशेषतः लक्ष्य द्यावें लागतें. स्वतःचीं साधनें, युद्धां पूर्वीचे आडाखे, पुरवठा, चढाईचें किंवा बचावाचें धोरण, फौजेची संख्या, भौगोलिक परिस्थिती, आसपासच्या लोकांची सहानुभूति वगैरे.

**रणक्षेत्र ठरविण्याचे परिणाम**

महाराजांजवळ खानापेक्षां थोडें सैन्य असून हि ह्या प्रसंगीं त्यांनीं खानास आपण ठरविलेल्या रणक्षेत्रीं येण्यास भाग पाडिलें व त्याचा फायदा घेतला ही गोष्ट लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. ज्या पक्षाकडील सैन्य शत्रूपेक्षां संख्या, शस्त्रास्त्रें वगैरे बाबींनीं जास्त असेल त्याला च बहुतेक

चढाई घेतां येऊन रणक्षेत्र शत्रूला नेमून देणें (dictate) जास्त सुलभ व शक्य असतें. ज्या पक्षाची फौज लहान असेल त्यांना ह्या गोष्टी करणें क्वचित च साधतें. म्हणून महाराजांनीं वरील गोष्ट साधली हें मोठें कौतुक करण्यासारखें आहे. रणक्षेत्राचा फायदा शत्रूच्या तजविजीमुळें (plan) आपल्याला आपोआप मिळतो अथवा आपण होऊन आपल्या आडाख्यानें आपल्याला घेतां येतो. मात्र ह्या दोहोंत बरें च अंतर आहे म्हणून जो पक्ष दुसऱ्याला रणक्षेत्र नेमून देतो (dictate) त्याला लढाईचे बहुतेक फायदे मिळतात; दुसऱ्या पक्षाला ते घेतां येत नाहींत, म्हणजे पहिल्या पक्षाला दुसऱ्या पक्षावर आपलें वर्चस्व लादता येतें व आपलीं हिंमत वाढवितां येते आणि आपल्या फौजेचा जोम द्विगुणित करतां येतो. मागें सांगितल्याप्रमाणें हिंमतीवर लढाईचा परिणाम बराच अवलंबून असल्यामुळें ती वाढवून जय पदरांत पाडून घेणें हा सेनापतींचा मुख्य उद्देश्य असला पाहिजे व असतो.

**दळणवळण व हुकुम**
Communication & orders

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें महाराजांनीं आपले सगळे हुकूम आगाऊ-च आपल्या ठिकठिकाणच्या सेनापतींना देऊन ठेविले होते[1]. ते त्याचप्रमाणें अमलांत आणणें किंवा त्यांत फेरबदल करणें ते तोफांच्या बारांच्या संख्येवर करण्याचें ठरविलें होतें. तोफांचे आवाज त्यांनीं जागजागीं ठेवलेल्या सर्व सेनापतींना ऐकू जाऊं शकत होते. (नकाशा नंबर २ पहा.) भेटीच्या मांडवापासून तोफेच्या गोलंदाजांस इशारत देण्याचें

१. शि. दि. १६५; शे. ब. २८, २९; ए. क. ब. क. ३२; म. सा. छो. ब. २२.

काम मांडवापाशीं असलेल्या कर्णेवाल्या कडे सोपविलें होतें[१]. आणि विशेष प्रसंग पडल्यास मांडवापासून दरवाज्यापर्यंत निरनिराळ्या सबबींवर त्यांच्याकडे निरनिराळीं कामें देऊन माणसें पेरून ठेवलीं होतीं[२].

**महाराजांच्या सैन्याची एका च वेळीं सर्वत्र बाजूस चाल**

भेटीचा प्रसंग आल्यानंतर दिलेल्या इशारतीच्या हुकमाप्रमाणें महाराजांची फौज जी चार बाजूला पसरली होती, ती एका च वेळीं एकदम आपल्याला नेमून दिलेल्या ठिकाणच्या शत्रूच्या सैन्यांशीं टक्कर देण्याला पुढें निघाली[३]. ह्या एकसमयावच्छेदें करून झालेल्या चालीमुळें च महाराजांच्या सैन्याची हिंमत वाढली. एवढें च नाहीं तर त्यांना अचानकपणाचा आणि सैन्यसंख्येच्या अधिकपणाचा फायदा योग्य वेळेला व योग्य प्रसंगीं एकदम घेतां आला. महाराजांना मिळालेल्या यशाचें हें हि एक मुख्य कारण होतें. सर्व घोडदळ घेऊन खुद्द नेताजी हा वांई येथें असलेल्या खानाच्या मुख्य फौजेशीं लढाई करण्याकरितां तिकडे तडक निघून गेला.

**विशिष्ट कामागिरी करतां ठेवलेली फौज (detached post)**

कोयनेच्या पूर्वेस व महाबळेश्वराच्या नैऋत्येस असलेल्या बोचेघोळीच्या घाटांत महाराजांनीं घोडदळाच्या एका तुकडीसह बाबाजी भोंसले याला ठेविलें होतें[४]. त्याच्याकडे पुढील काम नेमून दिलें होतें. जर खानाच्या फौजेवर गडाच्या बाजूनें मारा होईल व ती मागें वांईकडे पळ (retreat) काढण्याचा प्रयत्न करील तर तिला मार्गांत अडवून

---

१. शि. दि. १६४. २. शि. दि. १६५. ३. शि. दि. १७०.
४. शे. ब. २५.

पार येथें घडलेल्या प्रकाराची बातमी वांई येथें असलेल्या खानाच्या फौजेला न कळूं देणें; म्हणजे खानाचें मागील दळणवळण तोडण्याचें व खानाची फौज पिछेहाट करीत असतांना तिच्यावर उलटून पडून तिला नेस्तनाबूद करण्याचें, अशीं दोन कामें बाबाजीवर सोंपविलीं होतीं.

उत्तरेकडील चौक्या-पहारे.

त्याचप्रमाणें प्रतापगडच्या उत्तरेला वरच्या घाटांतून जातांना ४-६ मैलांवर चंद्रगडावर, व ढवळ्या घाटांत, महाराजांनीं चौक्या ठेवून मजबूत नाकेबंदी केली होती. यांत त्यांचा मुख्य उद्देश येवढा च कीं, युद्ध-कौशल्याचे दृष्टीनें खानाच्या अघाडीच्या फौजेला बगल (flank turn) देतां येऊं नये, किंवा खानाला घेरा घालण्यास (enveloping movement) हि सवड मिळूं नये व खानाची सर्व फौज किंवा मोठी तुकडी त्या बाजूनें जाण्याचा प्रयत्न करूं लागल्यास त्या मजबूत चौक्यांना केवळ त्यांची खबर मिळावी व त्यांनीं ती खबर आपल्या जवळ असलेल्या नेताजी पालकराच्या घोडदळाच्या राखीव सैन्यांत पोंचवावी व वेळ पडल्यास तेथून मदत मागवावी आणि तोंपर्यंत खिंड रोखून धरावी, येवढें च नव्हे तर पर्यायानें खानाच्या घेरा घालण्याच्या हालचालींच्या खबरींचा फायदा घेऊन त्याचा योग्य व अनुकूल असा लढाईच्या अखेरीवर परिणाम घडवून आणावा.

**२६. नेताजीची कामगिरी व त्याच्या सैन्याची जागा** ( Netaji's position and his role) :

नेताजीची फौज जर मोरोपंताच्या जागीं असती तर त्याला अनुकूल रस्त्यांच्या अभावीं वांईला जाऊन खानाच्या फौजेवर अचानक हल्ला करतां आला नसता. तसें च मोरोपंतांचें पायदळ नेताजीच्या

जागीं असतें तर त्याला हि कोयनापारच्या फौजेवर ताबडतोब चालून जातां आलें नसतें. कारण, कोयनापार गांठण्यासाठीं त्याला लांबचा वळणाचा रस्ता पकडावा लागला असता. कोयनापारची जागा घोड-दळाला चालून जाण्यास अडचणीची असल्यामुळें, तेथें पायदळानें जाणें शक्य व सोईचें होतें. तसें च वांई ही गडा पासून लांबच्या पल्ल्या-वर असल्यामुळें व कुडेसर ते वांई हा रस्ता किनेश्वर–कोयनापार पेक्षां साधारण बरा असल्यामुळें, वांईवर एकदम हल्ला करण्यास पायदळा-पेक्षां घोडदळाला च थोडा वेळ लागला असता. शिवाय, घोडदळ हें पायदळाच्या जागीं म्हणजे किनेश्वरीं असतें, तर ती जागा खानाच्या सैन्याच्या तळा नजीक असल्यामुळें, घोडयांचें खिंकाळणें एखादे वेळेस खानाच्या सैन्याला ऐकूं जाण्याचा संभव होता.

**मोरोपंत व नेताजी यांच्या योग्य नेमणुकी.**

शिवाय नेताजी हा शिद्दीचा बंदोबस्त करून तडक प्रताप-गडच्या रोंखानें आला होता. कारण ह्या रस्त्याच्या दक्षिणेच्या बाजूला २॥ मैलांवर किनेश्वरचें खोरें आहे व तेथें जाण्या करितां घाटांतून गडाकडे वर येऊन नंतर च " किल्याच्या ओळीनें " किंवा " धारेनें " खालीं उतरून मग किनेश्वरच्या खोऱ्यांत जातां आलें असतें. ह्या सर्व कारणामुळें मोरोपंताला व नेताजीला ज्या जागा नेमून दिल्या होत्या त्या तशा च नेमून देण्यांत महाराजांचें युद्धचातुर्य दृष्टीस पडतें. त्या तशा दिल्या नसत्या, तर दोन्ही फौजांना स्थानिक जागा ( local situation ) अगदीं अयोग्य अशी मिळाली असती व त्याचा परिणाम लढाईच्या अखेरीवर घडून महाराजांस ह्या युद्धांत अपयश हि आलें असतें. ही आपल्या फौजांची योग्य मांडणी करण्यास, त्या

प्रदेशाची सूक्ष्म पहाणी जी पूर्वीं च महाराजांनीं करून ठेविली होती, ती या वेळीं कामास आली, असें म्हणणें भाग पडतें. अशी पहाणी खानानें पूर्वीं केली नव्हती त्यामुळें त्याच्या अंगावर बाजू उलटली. यासाठीं हुशार सेनापतीनें नेहमीं अशा पहाणी सतत केल्या पाहिजेत; असो. तोफेच्या इषाऱ्या बरोबर बचाव करणाऱ्या ठिकठिकाणच्या महाराजांच्या सेनापतींनीं आपापल्या स्थानिक परिस्थितीचा पूर्ण फायदा घेऊन ठरल्याप्रमाणें चढाई करून जाण्याकरितां वेळेवर एकदम कूच केलें.

**२७. बहुतेक सर्वसामान्य राखीव सैन्य केवळ घोडदळाचें नसतें**
(Usually the general reserve is not only cavalry.):

सर्वसामान्य राखीव सैन्या ( general reserve ) मध्यें नेहमीं च एकटें घोडदळ असतें असें नाहीं; तर प्रसंगानुरूप त्यांत तोफखाना व कधीं पायदळाचा हि, कांहीं प्रमाणांत, समावेश केलेला असतो. या सर्वसामान्य राखीव सैन्यामध्यें फौजेची संख्या किती असावी ह्याचा कांहीं नियम किंवा प्रमाण ठरलेलें नसतें. ती जितकी जास्त ठेवतां येईल तितकी ठेवण्यांत कोणत्या हि प्रकारचा प्रत्यवाय नसतो. परंतु युद्धाच्या बेतांत अघाडीची व इतर ठिकाणची फौजवांटणी झाल्यानंतर जी फौज शिल्लक राहते किंवा कामा शिवाय रहाते त्या पैकीं च कांहीं किंवा सर्व फौजेचा वेळेवर सर्व सामान्य राखीव सैन्य ( general reserve ) म्हणून उपयोग करतात.

**सर्वसामान्य राखीव सैन्य नुसतें घोडदळ च कां ?**

वरील प्रमाणें धारा असतां महाराजांच्या सर्वसामान्य राखीव सैन्यामध्यें नुस्तें घोडदळ कां होतें तें पाहूं. घोडदळाच्या लढाईला हल्ले करण्याला योग्य अशी जागा म्हणजे फक्त मैदानाची च होय. डोंगराळ व बिकट

जागेंत घोडदळाला लढतां येणें मुष्कीलीचें असतें. कोयना पार येथें असलेली खानाची फौज अशा च बिकट जागीं होती. तेथें घोडदळाचा कांहीं उपयोग नव्हता. शिवाय वांई येथें असलेल्या खानाच्या प्रचंड फौजेशीं ताबडतोब लढाई घेण्यास २२ मैलांचा प्रदेश पायदळाकडून थोड्या वेळांत कांटून वांईला पोहोंचणें शक्य नव्हतें. मोरोपंतांना वांईवर पाठविलें असतें तर वेळेचें महत्त्व लक्ष्यांत न घेतल्या सारखें झालें असतें. युद्धांत वेळ ही एक महत्त्वाची बाब आहे. ह्या प्रसंगीं तर वेळेचें जास्त महत्त्व होतें. म्हणजे मोरोपंत वांईला पोहोंचावयाच्या आंत कोयनापारचें खानाच्या सैन्यांतील घोडदळाचे " पळे " वांईला पोहोंचून तेथील आपल्या सैन्याला सूचना करून तयार हि करूं शकले असते. अशा स्थितींत नेताजीला तेथें सुलभ असा जय कसा मिळूं शकता ? म्हणून वांई येथें वेळेवर पोहोंचण्यासाठीं आपल्या सर्वसामान्य रांखीव सैन्यामध्यें महाराजांना घोडदळ ठेवणें जरूर होतें व त्या साठीं च त्यांनीं तसें तें ठेविलें होतें.

**२८. महाराजांचें नेताजीशीं दळणवळण:**

नेहमीं घोडदळाच्या सेनापतीचें दळणवळण मुख्य फौजेच्या सरसेनापतीशीं असावें लागतें. कारण, घोडदळाचा उपयोग जेव्हां योग्य व अनुकूल संधी येईल तेव्हां च करावयाचा असतो व तें ठरविण्याचें काम सरसेनापतीकडे असतें. म्हणून त्याच्यांत व घोडदळाच्या सेनापतींत असें दळणवळण नसेल तर आलेली संधी हातांतून गमवावी लागते. म्हणजे अखेरीला हातांतून यश हि घालविण्यासारखें होतें. घोडदळाच्या सेनापतींचें मुख्य फौजेच्या सरसेनापतीशीं असें जलद दळणवळण ( quick communication ) असल्यामुळें, काय काय फायदे

होणें शक्य असतात याचें उत्कृष्ट उदाहरण या लढाईंत दिसून येतें. कारण, दूरवर झाडीमध्यें कर्ण्याचा आवाज पोहोंचावयाचा नाहीं, एवढयाकरतां च तोफांचा आवाज हें जलद संदेशाचें किंवा सूचनेचें साधन म्हणून महाराजांनीं ठरविलें होतें.[1] ह्यावरून घोडदळाचा सेनापती जो नेताजी त्याचें, सर सेनापती जे महाराज, त्यांच्याशीं योग्य प्रकारें जलद दळणवळण होतें हें दिसून येईल. हें जलद दळणवळण नसतें तर या लढाईंत नेताजीचा व्हावा तितका उपयोग होता ना.

**२९. बचावाच्या लढाईचीं तत्वें:**

बचावाचें धोरण संभाळणें हें पुष्कळ अंशीं युद्धकौशल्याच्या एकंदर पसाऱ्या (strategical situation) वर अवलंबून असतें. म्हणून चढाईचें धोरण स्वीकारणाच्या पूर्वीं सर सेनापती शत्रूच्या हल्लयाची वाट पहात असतो. तो हल्ला होऊन गेला किंवा होण्याच्या मार्गाला लागला म्हणजे आपण स्वतः चढाईंचें धोरण स्वीकारण्याची योग्य संधी हुडकून काढून तो आपल्या पूर्वींच्या बेतांना व आडाख्यांना योग्य व निश्चयात्मक असें निराळें स्वरूप देतो. खानाची जंगी फौज लक्षांत घेऊन आपली स्थिती वर सांगितलेल्या युद्धकौशल्याच्या दृष्टीनें फार कमजोर आहे हें महाराजांनीं ओळखलें होतें.[2] म्हणून खानानें प्रथम चढाई करून येण्याची ते वाट पहात होते. परंतु खानानें चढाई केली नाहीं व मध्यें च भेटीचें राजकारण लाविलें[3]. पुढें भेटीचा

---

१. शि. भा. अ. २२. श्लो. १. २. शि. भा. अ. २३ श्लो. १८-२१; शि. भा. अ. १८ श्लो. ४६; अ. २१ श्लो. ३-९. ३. शि. भा. अ. २० श्लोक, ३०.

प्रसंग आल्यानंतर मात्र खानाची फौज आपल्यावर चढाई करून येईल हें ओळखून तत्क्षणीं महाराजांनीं आपलें बचावाचें धोरण टाकून चढाईचें धोरण स्वीकारलें आणि आपल्या आडाख्यांत व बेतांत त्या प्रमाणें फरक करून तसें वागण्याबद्दल आपल्या ठिकठिकाणच्या सर्व सेनापतींना ताबडतोब समज दिली होती.

**३०. रणक्षेत्रांत वावरण्याचे मार्ग** ( lines of operation ):

कोणत्या तऱ्हेचें युद्धक्षेत्र आहे व त्यांत हालचालीचे मार्ग किती लांब, जवळ किंवा कशा प्रकारचे आहेत, असल्यास ते आटोक्यांत आहेत काय, तसें च हल्ला चढविण्याच्या वेळीं या मार्गांपैकीं, कोणत्या मार्गाचा उपयोग शत्रू करील, ह्या सर्व बाबी लक्ष्यांत घेऊन त्या त्या मानानें तेवढया पुरतां च या बचावाच्या धोरणांत त्याचा विचार करणें शक्य असतें. अशा तऱ्हेनें प्रथम अंदाज केल्यावर त्याप्रमाणें मारक्याच्या व बचावाच्या जागा ( defensive positions ) तयार करणें सोपें जातें. महाराजानीं जें रणक्षेत्र पसंत केलें होतें, तें असें होतें कीं, तेथें यावयाचें असल्यास ठराविक मार्गानें च येणें शक्य होतें आणि हा मार्ग तर महाराजांच्या फौजेच्या माऱ्याच्या टप्प्यांत होता. तो प्रदेश डोंगराळ व दाट झाडीचा असल्यामुळें आणि कृष्णा नदीचा प्रवाह पूर्वपश्चिम वाहत असल्यानें हे रणक्षेत्रांतील वावरण्याचे मार्ग आपोआप च ठरले गेले होते.

**कौशल्याच्या हालचाली**

एखाद्या सेनापतीनें जाणून बुजून आपल्याला फायदेशीर अशी जागा रणक्षेत्रा करतां पसंत केली व त्या च जागीं शत्रूला हर प्रकारें आणून त्याच्या कडून चढाई घेवविली तर त्यानें फार च उत्तम रीतीनें व कुशलपणानें हालचाली

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा



केल्या असें म्हणण्यास मुळीं च प्रत्ययवाय नाहीं. शत्रूनें जरी आपल्या अंदाजा प्रमाणें चढाईचें धोरण स्वीकारलें नाहीं तरी त्याचा पहिला तडाखा हाणण्याची ( initiative ) संधि नाहींशी होते व त्यामुळें त्यानें आपल्यावर हल्ला चढविण्यासाठीं त्याच्या मनानें जी जागा योजून ठेवली असेल ती बाजूला च राहून, त्याच्या मनांत नसलेल्या जागेवर त्याला आपल्याशीं तोंड द्यावें लागवें. अशा वेळीं शत्रूला आपण त्याच्या वर घेतलेल्या चढाईच्या धोरणाला तोंड देण्या करितां स्वतःचें (शत्रूचें) सैन्य कसें तरी इकडे तिकडे पेरावें ( deploy ) लागतें.

**खानाची सैन्य-विभागणी**

खानाच्या मनांत महाराजांशीं मैदानांत लढाई करावयाचें होतें पण तें ओळखून महाराजांनीं त्याचा डाव फसविला व आपल्या थोड्याशा सैन्याला, जवळ असलेल्या थोडक्याच तोफांच्या बळावर, सुलभ रीतीनें हाल-चाली करतां येतील अशी योग्य जागा शोधून काढिली; आणि तेथें च खानाला युद्ध करण्यास भाग पाडलें. परंतु त्यांच्या अंदाजा-प्रमाणें खानानें चढाई च तेवढी केली नाहीं. मात्र त्यानें कोयना-पार गांवीं फौज आणून जी तिची विभागणी केली होती, ती महा-राजांच्या पथ्यावर पडली. यांत खानाचा उद्देश पारघाटांत हल्ला चढ-विण्याचा व खालीं महाडाकडे महाराजांना कोंडण्याचा असावा. परंतु वांई येथें व कोयनापारगांवाजवळ लढाई द्यावी लागेल, हें त्याच्या ध्यानीं मनीं नसल्यानें त्यानें त्या दृष्टीनें आपली तयारी केली नव्हती. कोयनापारगांव आणि पारघाट हे निरनिराळे असून त्या दोहोंमधील अंतर अडीच मैलांचें आहे. सारांश, खानानें विचार न केलेल्या जागीं च त्याच्यावर हल्ला करून त्याला लढाईला तोंड देण्यास महाराजांनीं भाग

पाडलें. त्यामुळें अर्थात् च खानाच्या सेनापतीला हि लढाई करण्यासाठीं आपली फौज बेतरतूद इकडे तिकडे पसरावी लागली.

**३१. पहिला तडाखा** ( initiative ) :

वेळेवर जर योग्य संधीचा उपयोग करून आपलें पहिला तडाखा मारण्याचें कार्य केलें नाहीं व अशानें शत्रूला हालचाली व डावपेंच करण्याला वेळ व संधी मिळूं दिली तर आपली कशी हि जरी मजबूत जागा ( strong position ) असली तरी तिचा कांहीं च उपयोग होत नाहीं व ती कुचकामाची ठरते; मग ती जागा कृत्रिम असो किंवा स्वाभाविक असो. खान मेल्याबरोबर महाराजांनीं जर त्या संधीचा फायदा घेतला नसता, म्हणजे मिळालेली पहिला तडाखा हाणण्याची (initiative) संधी गमावली असती तर वेळ मिळून खानाच्या वांई व कोयनापार येथील फौजा सुटया न राहतां एकत्रित झाल्या असल्या आणि त्यांना अनुकूल अशा हालचाली व डावपेंच करण्याला वेळ व फुरसत मिळाली असती. त्यामुळें अशा स्थितींत महाराजांची जागा (position) प्रतापगड अथवा पारघाट या सारखी स्वाभाविक मजबुतीची असती ( किंवा तींत कृत्रिम रीतीनें भर घालून ती जास्त मजबूत केली असती ) तरी तिचा कांहीं उपयोग झाला नसता. एवढें च नव्हें तर, त्या मुळें महाराजांना त्या युद्धांत यश हि मिळालें नसतें. म्हणून योग्य संधी आली असतां तिचा उपयोग करून घेऊन त्या वेळीं पहिला तडाखा हाणण्याचें कार्य अंमलांत आणावें लागतें व त्याप्रमाणें महाराजांनीं तें करून यश हि मिळविलें.

---

## प्रकरण ५ वें

### १. खान राजकारण करतो ( Khan's diplomacy ):

महाराज हे गनिमी लढाई लढण्याच्या कामीं वाकबगार आहेत व त्यांची तयारी हि चांगली आहे हें खान जाणून होता. त्यामुळें होतां होईल तो, लढाईचा प्रसंग टाळून आपलें उद्दिष्ट निरनिराळ्या डावपेंचांनीं साधण्याचा त्यानें विचार केला.[1] म्हणून प्रथम एकदम प्रतापगडावर चालून न जातां वांई येथें थांबून तेथून लढाईचा रागरंग पाहण्यास त्यानें प्रारंभ केला. महाराज आपल्या जाळ्यांत सांपडतात कीं काय, हें पहाण्याकरितां त्यानें कृष्णाजी भास्करास ठाव घेण्यासाठीं महाराजांकडे पाठविलें[2] व त्यानें आणिलेल्या बातमीवर आपले बेत व लढाईचें धोरण पूर्णपणें आंखलें.

### २. कृष्णाजी भास्कराची महाराजांशीं भेट:

कृष्णाजीपंत महाराजांना जाऊन भेटला व त्याचें त्यांच्याशीं बोलणें झालें. अर्थात जे मुद्दे साधण्यासाठीं तो गेला होता, त्याला अनुसरून व त्या नात्यानें च त्याचें महाराजांशीं बोलणें चालणें झालें.[3] कृष्णाजीपंत हा वांईचा कुलकर्णी असून खानाचा खासगी कारभारी होता आणि त्यानें हें काम पुष्कळ दिवसांपासून केल्यामुळें खानाची त्याच्यावर बहाल मर्जी असून भरंवसा हि होता.

---

१. शि. भा. अ. १८. श्लो. ४४-४६; अ. २०. श्लो. ६४; अ. २१ श्लो. २७. २. शि. भा. अ. २१, श्लो. ३-८. ३. शि. भा. अ. १८. श्लो. ६४.

## ३. महाराजांचें राजकीय धोरण:

कृष्णाजीपंत व महाराज यांची भेट

वरील बोलण्यामध्यें खानाचें उघडउघड म्हणणें काय आहे, हें वकीलाकडून महाराजांस प्रथम समजलें. त्यानंतर त्यांनीं त्याला उतरावयास वाडा देऊन त्याची एकंदर व्यवस्था उत्तम ठेविली. रात्र पडल्यावर महाराज पंताच्या बिऱ्हाडीं गेले व त्याच्याशीं इतर गोष्टी बोलतां बोलतां त्यांनीं धार्मिक गोष्टींवर, आणि मुसुलमानांकडून होणाऱ्या हिंदूंच्या छळांवर बोलणें आणिलें.[1]

ते पंतास म्हणाले, तुम्हीं हिंदु आहांत. सांप्रत मुसुलमानी राज्यांत गाई–देवस्थानांचा छळ होत आहे. तो तुम्हीं पहात आहां. पैशानें आपण नागावले जात आहों. अन्यायाबद्दल सरकारदरबारीं फिर्याद केल्यास त्याचा कांहीं च उपयोग न होतां न्यायाचा फार्स करून सरकार अपराध्यांस सोडून देतें.

तत्कालिन मुसुलमानी जुलूम

तसें च एखादा गरीब व बिनहत्यारी हिंदू माणूस मुसुलमान अधिकाऱ्याच्या अथवा शिपायाच्या इच्छेच्या आड आल्यास तो त्याला वेळ प्रसंगीं दाबून टाकतो, अशा वेळीं दरबारीं फिर्याद नेल्यास, वर सांगितल्याप्रमाणें फार्स करून हिंदु ऊर्फ काफीर ह्यांस दाबणें ह्यांत विशेष पाप नाहीं असा निकाल देऊन आरोपीस सोडण्यांत येतें. फार च झालें तर क्वचित् वेळीं मरण पावलेल्या हिंदूच्या कुटुंबास रांडरोटी ( compensation ) साठीं थोडीशी रक्कम बहाल करण्यांत येते; परंतु शेंकडा नव्याण्णव प्रसंगीं

---

१. शि. दि. १६०.

मुसलमानांविरुद्ध-हिंदू असल्या खटल्यांत मुसुलमानांचा पक्ष घेतला जातो, हिंदू लोक ज्या गोमातेस पूज्य मानतात तिचें मांस मुसुलमानांस थोरांपासून गरिबांपर्यंत सतत लागतें, दरबारीं असलेल्या हिंदू सरदारांनीं गोवध करूं नये म्हणून अनेकदां केलेल्या विनवण्या फुकट जातात व त्यांच्या धर्म-भावनेकडे मुद्दाम दुर्लक्ष्य केलें जातें, येवढें च नव्हें तर राजधानींत हिंदूंच्या मोहल्यांत, त्यांच्या डोळयांदेखत गाईंचा वध करण्यांत येतो, इत्यादि अनेक धार्मिक व राजकीय छळांच्या गोष्टी महाराजांनीं कृष्णाजीपंतास सांगितल्या.[1]

स्वराज्याची इच्छा

तसें च ह्या सर्व गोष्टींचा प्रतिकार व्हावा अशी इच्छा प्रत्येक जाणत्या हिंदूच्या मनांत उद्भूत झाली आहे, परंतु यादवांचें साम्राज्य नाहींसें झाल्यानंतर सतत अडी-चशें वर्षांच्या गुलामगिरीमुळें त्यांचीं मनें फार कम-कुवत झालीं आहेत, आपल्या हिंमतीवर त्यांचा बंदोबस्त करण्याची व नवीन राज्य स्थापण्याची कल्पना त्यांना अशक्य वाटते. पण कोणीतरी अवतारी पुरुष निपजून त्यानें देशांत स्वराज्य स्थापावें अशी ते मनांतून ईश्वराची प्रार्थना करतात. ह्याप्रमाणें महाराजांनीं चालू परिस्थितीचें खरें चित्र पंताच्या समोर हळू हळू मांडलें. त्याचा बराचसा परिणाम पंताच्या मनावर झाल्याचें त्यांना दिसून आलें. हा आतां आपल्या म्हणण्याच्या बाहेर फारसा जाणार नाहीं हें ताडून अखेरीस त्याला ते म्हणाले कीं, श्रीशंभूच्या कृपेनें आम्हीं स्वराज्यस्थापनेचें कार्य हातीं घेतलें आहे, त्यास सर्व देवब्राह्मणांचा व साधुसंतांचा आशीर्वाद आहे, जाणत्या हिंदूंची सहानुभूती व शक्य तो पाठिंबा हि आहे. अशा वेळीं आपल्या

१. बु. स. (बडोदा) ५२१; ज. ३४.

११

सारख्या ब्राम्हणश्रेष्ठानें यवनाच्या कच्छपीं लागून असल्या महत्कार्यास खो घालूं नये. आम्ही क्षत्रिय असून क्षत्रियोचित काम जें गोब्राह्मण-प्रतिपालन व धर्मसंरक्षण तें करीत आहों. तेव्हां आमच्यापेक्षां श्रेष्ठ व एकधर्मीच्या[1] अशा आपल्या सारख्या ब्राह्मणानें या कामीं आम्हांस मदत करावी अशी आपल्यास विनंती आहे[2]. याप्रमाणें पंताशीं महाराजांनीं भाषण करून त्याचें मन वळविलें.

**कृष्णाजीपंत खानाचा बेत उघड करतो**

महाराजांमध्यें अशी एक विलक्षण आकर्षक शक्ति होती कीं, ते ज्याच्याशीं बोलत त्याच्यावर तत्काळ आपली छाप बसवीत. त्याप्रमाणें पंताच्या मनावर त्यांची छाप बसली. महाराज हे च शंकराचे अवतार आहेत व त्यांच्या हातून हिंदवी स्वराज्य स्थापलें जाणार आहे, ही भावना जी त्या वेळीं सर्वत्र पसरली होती तिची सत्यता ह्या वेळेस पंतास पटली व तो पूर्णपणें महाराजांच्या कह्यांत गेला आणि ते सांगतील तसें वागण्यास कबूल झाला. ही संधि साधून महाराजांनीं खानाचा अंतस्थ बेत काय आहे तो त्याच्याकडून काढून घेतला. खानानें तुम्हाला जिवंत पकडून अथवा ठार करून विजापुरास घेऊन जाण्याची मनांत दृढ प्रतिज्ञा केली आहे व ती साधण्यासाठीं, साधल्यास तुम्हांस भेटींत च दगा द्यावयाचा व तो न साधल्यास चढाई करून तुम्हाला पकडावयाचें असें ठरविलें असून, भेटीचा प्रसंग ठरविण्यासाठीं व त्या च बरोबर तुमची सर्व तयारी पहाण्यासाठीं मी आलों आहें, असें पंतानें मन मोकळें करून महाराजांस सांगितलें[3]. पंतानें याप्रमाणें सांगितल्यावर ही मुलाखत संपली.

---

१. शि. दि. १६१. २. चित्र. १२, १३. ३. शि. दि. १५९; चि. १२.

महाराजांची खास बैठक

पुढें महाराजांनीं त्या बाबतींत आपल्या विश्वासांतील दोन चार मंडळींचा व मातोश्रींचा विचार घेतला. खानाची भेट घेतली असतां, तहाचा प्रसंग साधल्यास आणतां येईल व थोडेंसें पडतें घेऊन हें आरिष्ट टाळतां येईल, तरी त्याची भेट घेण्याचें ठरवावें असें या बैठकींत ठरलें.

दुसरे दिवशीं पंतास बाह्यतः महाराजानीं सांगितलें कीं, आम्ही खानाची भेट घेण्यास कबूल आहों. ते आम्हांस शहाजीराजांसारखे च आहेत[1]. त्यांच्या मनांत आमच्याविषयीं वांकडेपणा नसेल च. ते सांगतील त्याप्रमाणें आम्ही विजापूरदरबारचा मुलूख सोडून देण्यास व दरबाराशीं नमतें घेण्यास तयार आहों[2], तरी भेटीची वेळ वगैरे ठरवावी. खान फौजबंद सरदार असल्यामुळें आमच्यासारख्या तुटपुंज्या फौजवाल्याचें त्यांच्यापुढें काय चालणार ? तेव्हां ते सांगतील त्या अटी आम्हांस कबूल आहेत; वगैरे आशयाचा निरोप पंताबरोबर खानाकडे महाराजांनीं पाठविला. त्याचबरोबर पंताकडून अंतस्थ प्रकारें आपल्यास सर्वतोपरी सहाय्य करण्याचें वचन हि घेतलें. नंतर त्याच्या बरोबर आपला वकील पंताजी गोपिनाथ यांस हि[3] पाठविलें.

### ४. पंताजी गोपिनाथ खानाकडे जातोः

दोघे वकील वांई येथें आले व त्यांनीं महाराजांचा निरोप खानास कळविला. पंताजी गोपिनाथानें खानास सांगितलें कीं, आपल्या सारख्या विजापुरदरबारांतल्या सर्वश्रेष्ठ सेनापतीस व मुत्सद्यास महाराज भीत आहेत[4], आपण सांगाल त्या अटी कबूल करण्यास त्यांची तयारी

१. स. १४. २. शि. भा. अ. १९. श्लो. ८. ३. स. १५. ४. स. १४

आहे, आपण त्यांना शहाजीराजे यांचे ठिकाणीं असल्यामुळें आपली भेट घेण्यांत त्यांना कोणती च हरकत वाटत नाहीं, तरी भेटीचा दिवस वगैरे नक्की करावा. वकिलाच्या ह्या गोष्टी ऐकून खानास मोठा आनंद झाला. त्याच्या मनांत हा प्रांत अवघड असल्यामुळें महाराजांशीं लढाई न देतां भेटीच्या मिषानें आपलें कार्य साधावें असें होतें च. परंतु महाराज तें कबूल करतील किंवा नाहीं ह्याची त्याला खात्री नव्हती. आतां ते आपलें म्हणणें कबूल करीत आहेत हें पाहून त्यास आनंद होऊन, शिवाजी आपल्या हस्तगत झाला च अशा घमेंडींत तो चूर झाला[1] व गैरसावध होऊन महाराजांच्या मुत्सद्देगिरीच्या कचाटयांत सांपडला गेला.

**५. भेटीचा निष्कर्षः**

खानाचें व पंताजीचें बोलणें चालणें होऊन शेवटीं भेटीचा दिवस, वेळ आणि अटी वगैरे नक्की ठरविलें गेलें. या अटींत अनेक प्रकारांनीं महाराजांनीं आपल्या प्रमाणें च खानास हि बांधून घेतलें होतें. त्यामुळें अटींत एका हि शब्दाचा फरक करण्यास दोघांना हि सवड राहिली नाहीं.[2]

**मुत्सद्दी व त्यांची मुत्सद्देगिरी**

एकाद्या कमी किंवा जास्त शब्दानें पूर्वींच्या केलेल्या ठरावांत किंवा तहांत फेरफार करून मुत्सद्दी लोक त्याचा अर्थ आपल्याला पाहिजे तसा करून घेतात. मनांत असावयाचें एक, दाखवावयाचें एक, बोलावयाचें एक, ठरवावयाचें एक व मागावयाचें एक, म्हणजे खोटयाला खरें स्वरूप

१. स. १५. २. शि. भा. अ. २१ श्लो. १–९.

देऊन, दुसऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेऊन, त्याच्या डोळ्यांत धडधडींत धूळ फेकावयाची, ही च तऱ्हा केव्हां हि लढाईच्या वेळीं मुत्सद्यांच्या होणाऱ्या बैठकींत व खलबतांत दिसून येते. नवीन राज्य स्थापणाऱ्या व कमाविणाऱ्या पुरुषांच्या अंगीं अशा तऱ्हेचा मुत्सद्दीपणा असणें कांहीं वावगें नाहीं. परंतु, महाराजांनीं या वेळीं जो मुत्सद्देगिरीचा डाव खानावर टाकला होता, तो वरीलप्रमाणें बहुरंगी व लबाडीचा नव्हता. मात्र, आजकाल वरील प्रकारच्या राजकारणास उच्च दर्जाचें राजकारण अशी व्याख्या मिळाली आहे. स्वतःच्या राष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याकरितां मुत्सद्यांना असे डांव करावे लागतात.

पंताजी गोपिनाथाच्या म्हणण्याला कृष्णाजीपंतानें हि दुजोरा देऊन महाराजांबद्दल ग्वाही दिली व खानाकडून भेटीचा दिवस वगैरे मुक्रर करविला[1]. नंतर खानानें पंताजी गोपिनाथाचा मानसन्मान करून त्याची रवानगी केली व त्याच्या बरोबर महाराजांस दरबारी पद्धतीचा निरोप पाठविला. एकंदरींत सर्व बाजूंनीं खानाची भेट घडवून आणण्यांत महाराजांचें दूरदर्शित्व, मनुष्यस्वभावाचें उत्कृष्ट ज्ञान, आपल्या अंगीकृत कार्यार्थ वाटेल त्या अपवादात्मक गोष्टी करण्यास असलेली त्यांची तयारी, त्यांचें साहस, त्यांचें चातुर्य, त्यांची अचाट बुद्धि व उच्च दर्जाचा मुत्सद्दीपणा दिसून येत नाहीं काय ? या महाराजांच्या अनेक अलौकिक गुणांबद्दल त्यांचा समकालीन इतिहासकार ऑर्म यानें जे उद्गार काढले आहेत ते या च अर्थाचे असल्यानें पुढीलप्रमाणें मूळ स्वरूपांत देत आहों.

---

१. शि. दि. १६२-६३.

( Orme– pp. 93, 94, 95. )

He spared no cost to obtain intelligence of all the notions and intentions of his enemies and even of their minuter imports.

Cautious

Nothing was spared which might contribute to the internal defence of his country's regular fortifications well-armed, garrisoned, barred the open approaches. Every pass was commanded by a fort and in the closer hills; every steep and overhanging rock was occupied as a station to roll down rocks of stone making an effectual annoyance to the labouring march of cavalry, elephants and carriages. It is said that he left about 350 of these points (forts) in the Konkan alone.

Vigilent

Shivaji possessed all the qualities of a commander. Every influence, howsoever latent, was combined in his schemes, which generally comprehended the option of more than one success so that his intention could rarely be ascertained, and when accomplished did not discover the extent of its advantages until developed by subsequent acquisitions.

Other qualities.

In personal activities he exceded *all generals of whom there is a record.*

Superiority

The boast of every soldier was to have seen Shivaji charging sword in hand.

Daring.

No partisan appropriated to services of detachment alone ever traversed as much as he at the head of armies.

Practical geographer.

Quick decision, calmness.

He met every emergency of peril, howsoever sudden and extreme, with instant discernment and unshaken fortitude.

Inborn genius.

The ablest of his officers acquised to the eminent superiority of his genius.

Guardian of nation.

Thus respected as the guardian of the nation, he had formed, he moved everywhere amongst them with unsuspicious security and often alone.

Politican and tactician.

His policies were the continual terror of the princes with whom he was at enmity even in the midst of their citadels and armies.

Improving resourceful

When we shall obtain a history of his life, written in his own country he will doubtless appear to have possessed the highest resources of strategems.

Courage.

Joined to undaunted courage which if impracticable no arm exceeded his in open daring.

The born captain

Aurangzeb said that—"he was a great captain and the only one who had the magnanimity to raise a new kingdom, whilst I have been endeavouring to destroy the ancient sovereignties of India.

Thorough statesman and soldier

Left at his diseased, a permanent sovereignty, established on communion of customs, manners, observances, language and religion, united in common defence against the tyranny of foreign conquerors from whom they had recovered the land of their own inheritance.

**६. राजकारण व मुत्सद्देगिरी यांचा अखंड धागा** ( continuance of Politics and Diplomacy ):

लढाई होण्याच्या पूर्वीच्या, मधल्या व नंतरच्या काळाचा परिस्थित्यनुरूप आपल्या पक्षाला कसा फायदा मिळेल, या तजविजींत राष्ट्राचे सेनापती व मुत्सद्दी असतात, हे बहुतेक मोठमोठ्या नामांकित लढायां वरून दिसून येईल. प्रत्यक्ष लढाई सुरूं होण्याच्या पूर्वी, पुढील गोष्टींकडे जास्त लक्ष्य दिलें जातें. सैन्यांची हालचाल, त्यांचें पोषण, त्यांची विश्रांती, विसकटलेली घडी पुन्हां बसविणें, सर्व तऱ्हेची मदत येऊन पोहोंचण्यासाठीं अवसर मिळविणें, तटस्थ राष्ट्रांपैकीं एखाद्यास आपल्याकडे ओढणें, निदान शत्रूला हें राष्ट्र मिळूं न देणें वगैरे वगैरे गोष्टी घडवून आणण्यांत हे मुत्सद्दी गढलेले असतात.

**७. भेट ठरली:**

गोपिनाथपंत परत आल्यावर व खान भेट घेण्यास तयार आहे असें समजल्यावर महाराजांनीं भेटीची तयारी जारीनें चालविली. कोयनेच्या कांठीं गडापापासून दोन अडीच मैलांवर खानाबरोबर येणाऱ्या इतमामाच्या सैन्याची सर्व प्रकारची व्यवस्था करण्यांत आली.[१] या व्यवस्थेंत " यवनांस जो पदार्थ मनःपूर्वक प्रीतीचा ( गोमांस ) त्याचीं दुकानें, वाण्यांच्या, हलवायांच्या, भडभुंजांच्या व खाटकांच्या दुकानांच्या शिवाय घालविली " ( शि. दि. १६४ ). या उल्लेखावरून प्रसंग पडेल त्या वेळीं क्षुल्लक नैतिक व धार्मिक तत्त्वाचा उच्च असें राष्ट्रधर्माचें तत्त्व साधण्याकरितां कसा खून करावा लागतो, हें महा-

१. शि. दि. १६४

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थ
नगर वाचनालय, सातारा



राजांनीं या प्रसंगानें उत्तम तऱ्हेनें दाखवून दिलें. कारण, जे महाराज खुद्द विजापुरासारख्या राजधानीच्या ठिकाणीं खाटकानें गोमांसाची पाटी रस्त्यांत विक्रीस आणली म्हणून त्याचा तावडतोब शिरच्छेद करतात, ते च, या वेळीं आपण होऊन गोमांसाचें दुकान आपल्या लोकांकडून मांडवितात, यावरून काय सिद्ध होतें ? भेटीची जागा खुद्द गडाच्या पायथ्यापाशीं दोन फर्लांगावर ठरवून, तेथें मांडव घालण्याचें काम सुरू झालें. त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें पहातां, महाराजांनीं गडाच्या पायथ्याशीं ज्या जागीं भेट घेण्याचें ठरविलें होतें, ती जागा आपल्यास पसंत नाहीं असें जर खान म्हणता, तर आपण महाराजांस भ्यालों किंवा भितों, अथवा त्यांचा आपणांस संशय येतो, अशी एक प्रकारची कबूली त्यानें स्वतः च दिल्यासारखें झालें असतें. ह्या खोटया नामोशीच्या सबबीवर कदाचित खानानें या भेटीच्या जागेस पसंती दिली असावी; मात्र, तत्पूर्वी त्यानें त्या दोन्ही जागा आपल्या सरदारांकडून पाहून पसंत करविल्या होत्या.

### ८. भेटीच्या अटी:

भेटीच्या वेळेस खानानें आपल्या इतमामापुरता जो सरंजाम आणावयाचा असेल तो आणावा, मात्र तो कोयनेच्या कांठीं ठेवावा. तेथें त्याची योग्य प्रकारची बरदास्त केली जाईल. तेथून जेथें भेट व्हावयाची त्या मंडपाच्या जागीं खानानें फक्त बरोबर एक च खासबरदार ( A. D. C. ) व दोन हुद्देदार घेऊन यावें. या तिन्हीपेक्षां जास्त माणसें नेल्यास महाराज भिऊन जातील व त्यांच्या मनांत तुमच्याविषयीं

---

१. स. १५.

निष्कारण संशय येऊन, आतां पर्यंत मोठ्या मुष्कीलीनें साधून आलेला हा भेटीचा प्रसंग फुकट जाईल, अशी पंताजी गोपिनाथानें खानास विनंति केली होती व तिला कृष्णाजीपंतानीं हि अनुमोदन दिलें होतें. ह्या च वेळीं असें सांगण्यांत आलें होतें कीं, महाराज हि आपल्याकडून वरील अटी पाळण्यास तयार आहेत[1].

**९. भेटीसाठीं खान निघतो:**

खानानें वांई येथून आपला मुक्काम हालवून तो भेटीला जाण्याकरितां निघाला. आपल्या फौजेपैकीं निवडक दहा बारा हजार फौज, पायदळ व तोफखाना आपल्या बरोबर घेऊन बाकीची फौज त्यानें वांई येथें ठेवली. मागें सांगितलेल्या मार्गानें तो वांईहून निघून रड-तोंडीचा घाट चढून कोयनेच्या कांठीं येऊन पोहोंचला व तेथें महाराजांनीं आपल्या फौजेसाठीं जी उत्तम प्रकारची व सर्व तऱ्हेची तयारी केली होती, ती पाहून खूष झाला. त्याचबरोबर असली व्यवस्था आदिल-शाही दरबारास हि ठेवतां येणें अशक्य आहे असें पाहून त्याच्या मनांत मत्सरानें पेट घेतला.

**१०. भेटीपूर्वीं महाराजांची स्वत:ची तयारी:**

इकडे महाराजांनीं खानाच्या भेटीच्या तयारी बरोबर च आपल्या बचावयाची सर्व प्रकारची तयारी फार बारकाईनें व काळजीपूर्वक केली होती. मागें सांगितल्याप्रमाणें गडाखालीं तयार केलेला भेटीचा मंडप खानाच्या वकिलास व आणखी कांहीं सरदारांस नेऊन दाखविला व त्यांच्याकडून पसंतीची कबूली घेतली.

---

१. स. १५; शे. ब. २९; शि. भा. अ. २१. श्लो. ३-८

**११. अचानक हल्ल्याला रोकण्याकरतां फौजेच्या जागाजगच्या चौक्याः**

खानानें दगा करण्याच्या किंवा अचानक छापा घालण्याच्या इराद्यानें आपल्या फौजेला जर आंतून गुप्तपणें हुकूम दिले असले तर, म्हणजे भेट झाल्यावर अमुक वेळानें, अमुक ठिकाणीं हल्ला करा असें सांगितलें असेल तर, त्याचा वेळीं च बंदोबस्त करण्या-साठीं म्हणून महाराजांनीं, जागजागीं कोयनेपासून गडापर्यंत, आपल्या चौक्या, पहारे व टेहळणीच्या तुकड्या बसविल्या होत्या. चौक्या पहारे म्हणजे आजकालच्या छबिन्याच्या क्षेत्रांतील चौक्या (out post zone picquets.)

**१२. बचावासाठीं केलेल्या योजनाः**

कोयनापार पासून गडावर येण्याची एक च वाट खुली ठेऊन बाकीच्या सर्व वाटा झाडें तोडून व खड्डे वगैरे खोदून बंद करून टाकल्या होत्या. अशा तऱ्हेनें भेटीची सर्व व्यवस्था कशी करावयाची याजबद्दल बारीक सारीक गोष्टींचे एकूण एक तपशीलवार असे सर्व बेत करून ठेवले होते[1].

त्या प्रमाणें खानानें बेइमानी करून दगा दिल्यास त्याचा वेळीं च बंदोबस्त करतां यावा म्हणून व भेटींत काय ठरेल तें आपल्या सर्व सेनापतींना तात्रडतोब कळावें म्हणून एक कर्णेवाला मंडपाच्या बाहेर[2] च ठेवला होता. प्रसंग पडल्यास कर्ण्याच्या विवक्षित आवाजांवर तोफांचे सांकेतिक बार करण्याचें ठरविलें होतें व त्याबरोबर ठिकठिका-

१. शि. दि. १३२, १६३, १६४. २. शि. भा. अ. २२. श्लो. १.

णच्या सेनापतींनीं खानाच्या फौजेवर अचानक चालून जाऊन (surprise) तिला उधळून लावावयाचें अगर कापून काढावयाचें असें हि ठरलें होतें.

**१३. फौजेची विभागणी** ( distribution of forces ):

खानानें बेइमानी करून दगा दिला व चोहों बाजूंनीं, आपल्यावर पूर्वी ठरवून ठेवलेल्या बेताप्रमाणें त्यानें स्वतःच्या फौजा घातल्या तर त्यांना पायबंद लावतां यावा व त्यांच्याशीं टक्कर खेळतां यावी, म्हणून महाराजांनीं आपल्या फौजेचे दोन विभाग केले होते. मोरोपंतांच्या हाताखालील विभागाला गडाच्या नैऋत्येस जो किनेश्वराचा डोंगर आहे, त्यावरील दरडीच्या ( घाटाच्या ) उत्तरेला व आसपासच्या रानांत त्यांनीं टोळ्या टोळ्यांनीं दबा धरून, म्हणजे खानाच्या सैन्याला बातमी न लागूं देतां, व त्यांच्या दृष्टीच्या टप्याच्या आड, पण वेळ पडल्यास थोडक्यांत अंतर तोडतां येईल, इतक्या जवळ हालचाल न करतां राहण्यास हुकूम दिला.

दुसरा विभाग म्हणजे नेताजीच्या हाताखालील घोडदळाचा होता. तो मागें सांगितल्याप्रमाणें कुडेसराकडे ठेविला होता.

**चौक्या पहारे व इतर तयारी**

गड ते कोयनापार व पार ते जावळी यांच्या मधील उंच उंच पर्वतशिखरांवर झाडींत कोणांस न दिसेल अशा चौक्या ठेऊन नाकेबंदी केली होती. तसें च गड ते मंडप यांमध्यें अंतरा अंतरांवर कारकून, हवालदार, नाईक वगैरे लोक होते.[२] तसें च भेटीच्या मंडपाजवळ मागील

१. शि. दि. १७० . २. शि. दि. १६३.

बाजूस एका लहानशा घळीसारख्या ठिकाणीं हिरोजी फर्जंदास अत्यंत निवडक अशा चाळीस लोकांसह बसाविलें होतें. भेटींत महाराजांस कांहीं वरें वाईट झाल्यास खानावर तुटून पडण्यास त्यांस सांगितलें होतें. तसें च मंडप ते गड या दरम्यानच्या लोकांनीं हि हिरोजीस मदत करावी असें ठरलें होतें. इषारा होतांच कर्णा व्हावा, त्यानंतर किल्यांतून तोफांचे बार काढावे, ते ऐकून ठिकठिकाणच्या सेनापतींनीं एकसमयावच्छेदें करून शत्रूवर तुटून पडून त्याचा नाश करावा, ठिकठिकाणीं सैन्याचा जमाव न दिसेल अशा बेतानें झाडींतून व नाल्यांतून बसविण्याची व्यवस्था करावी म्हणजे उत्तम तऱ्हेनें कोणाला न दिसेल अशा आडोशाच्या जागा घ्याव्यात असें ठरलें होतें. भेटीकरितां अशी जागा तयार करविली होती कीं गडावरून तेथें काय चाललें आहे हें सर्व उत्तम तऱ्हेनें दिसत होतें. गडाच्या सभोंवतीं ठेविलेला सैन्याचा गराडा पुढें (भेटीची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसा) आंवळता (closed) केला. म्हणजे मंडपाच्या जागेच्या चौफेर लोकांचा घेरा बसविला. तसेंच खानाचें लष्कर जें पार येथें आहे, तें गडावर एकदम चालून येऊं नये, म्हणून त्यास अडविण्यासाठीं वर सांगितल्याप्रमाणें जनीच्या टेंबांच्या दाट झाडींत दोन्ही बाजूस जेधे, बांदल वगैरे मंडळी ठेविली. वांईची फौज पार येथें येऊं नये किंवा पारची फौज वांईस जाऊं नये म्हणून या दोन्ही जागांमधील बोचेघोळीच्या घाटांत बाबाजी भोसले यास ५०० स्वारानिशीं ठेविलें[1]. हा घाट महाबळेश्वराहून जरा खालीं उतरलें कीं साफ दिसतो. पार पासून सर्व रानभर, गडाच्या सभोंवार सर्वत्र महाराजांनीं जे आपले लोक ठेविले

१. शे. ब. २५.

होते, ते दाट जंगलांत व झाडांवर हि असल्यामुळें खानाच्या टेहळयांना त्या गर्द झाडींत त्यांचा पत्ता लागला नाहीं. गडावरील दरेक बुरुजावर व तटाच्या संरक्षणासाठीं तटावर शिबंदी व तोफा होत्या. तसें च गडाच्या दरवाज्यांवर व सदरे जवळ हि तोफा ठेविल्या होत्या.

प्रतापगडावर अशा माऱ्याच्या जागीं तोफा लाविल्या असाव्यात कीं, ज्यामुळें गडाखालीं भेटीच्या जागीं जर खानानें दगा दिला व त्याची फौज मंडपाकडे रोंख करून चालून आली, तर तिला तडाक्यानें उधळून देतां येईल व त्याचप्रमाणें पार येथील हि खानाच्या फौजेवर मारा करतां येईल, अशा दृष्टीनें ही तोफांची मांडणी केली होती. भेटीच्या जागीं जर खानानें दगा दिला व त्याची फौज मंडपाकडे रोंख करून चालून आली तर तिला तडाक्यानें उधळून देतां येईल व त्या च प्रमाणें पार येथील हि खानाच्या फौजेवर मारा करतां येईल, अशा दृष्टीनें हि तोफांची मांडणी केली होती.

**१४. जिजाबाईः**

खानानें दगा करून आपल्यास पकडून नेल्यास अथवा ठार मारल्यास, पुढें राज्याचा बंदोबस्त कसा करावयाचा याची निरवानिरव हि महाराजांनीं मातोश्रींच्या विचारानें करून ठेविली होती. यावरून त्यांची मातृभक्ति, आईवरील विश्वास, तिच्या मार्गदर्शकत्वाबद्दल अभिमान, इत्यादि बऱ्या च गोष्टी ध्यानांत येतात. प्रत्यक्ष संकट पुढें दिसत असतां, त्या प्रसंगाला तोंड देण्यास व अंगीकृत कार्यापासून पराङ्मुख न होण्याबद्दल जिजाबाईनें महाराजांस सांगितलें. अशा प्रकारच्या वीरमाता

---

१. शि. दि. १७०.

ज्या राष्ट्रांत जन्म घेतात त्या राष्ट्राची उन्नती च होते. पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या देशांतील मातांनीं या पासून बोध घेण्यासारखा नाहीं काय? मोठमोठ्या विभूती ज्या कधीं काळीं एकाद्या राष्ट्रांत कांहीं एका विशिष्ट कार्याकरतां उत्पन्न होतात, त्यांच्यांत ही एक गोष्ट ठळक दिसून येते कीं, त्या परम मातृभक्त असतात. त्यांची आईवरील श्रद्धा अवर्णनीय असते. नेपोलियनची मातृभक्ति अशी च निस्सीम होती ही गोष्ट इंग्रजी वाचकांच्या परिचयाची आहे, असो. वरील प्रसंगावरून महाराजांचा मुत्सद्दीपणा, त्यांची दूरदृष्टी, आलेल्या संकटांचा व प्रश्नांचा सर्व बाजूंनीं एकदम व अचूक अशी विचार करण्याची होतोटी व अचाट बुद्धिमत्ता हें गुण उत्कटत्वानें दिसून येतात व त्यांचें जितकें कौतुक करावें तितकें थोडें च आहे असें वाटल्यावाचून रहात नाहीं.

**१५. परिस्थितींचें पूर्ण आकलन व जलद निकालः**

लढाईंत वस्तुस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण इतक्या जलद व सर्व बाजूंनीं करावें लागतें कीं, उत्तम नेत्याचें व कुशल सेनापतींचें तें एक अवश्य व महत्त्वाचें असें अंग आहे. वस्तुस्थितीचें पूर्ण निरीक्षण व तात्कालिक निकाल देणें हे दोन गुण ज्या सेनापतीच्या अंगीं विशेष दिसून येतात त्यानें च यशाची किल्ली आपल्या ताब्यांत ठेवली असें म्हणण्यास हरकत नाहीं. ही गोष्ट महाराजांच्या ह्या व पुढील अनेक लढायांत दिसून येतें. कार्यांतील धडाडी हा हि एक ह्या जातीचा गुण आहे व त्याची हि जोड यशाच्या कामीं लागते. शुष्क, तर्कटी व शाब्दिक वादविवादांत व्यर्थ वेळ घालविणें म्हणजे युद्धाच्या कामीं हातचें यश सोडून अपयशाची कांस धरण्यासारखें आहे.

### १६. खान दगा देईल ही महाराजांची शंकाः

आपल्या पश्चात राज्याचा बंदोबस्त करण्याची इच्छा व तयारी जी महाराजांनीं या प्रसंगीं दाखविली, त्यावरून त्यांच्या अंतरंगाची स्पष्ट कल्पना येते. आपलें कांहीं झालें तरी स्वराज्य बुडतां कामा नये ही उदात्त आणि निष्काम भावना, या त्यांच्या व्यवस्थेंत दिसून येते. या वेळीं आपल्या अत्यंत विश्वासू अशा मुत्सद्यांस एके ठिकाणीं बोलावून मातोश्री देखत महाराजांनीं त्यांना सांगितलें कीं, ह्या भेटींत आम्हीं जय पावून येतों, व तसा अंबेनें कौल हि दिला आहे. तरी पण कदाचित वांकडें झाल्यास आमच्याबद्दल शोक करीत न बसतां संभाजीस पुढें करून स्वराज्य चालविण्याचें आमचें व्रत पुढें चालवा. हें राज्य माझें नसून देवां-ब्राह्मणांचें आहे. या स्वराज्यास श्रीसमर्थांचा आशीर्वाद आहे. तुमच्यासारख्या विश्वासू व जिवास जीव देणाऱ्या मंडळींच्या भरंवशावर व मदतीवर हें राज्य उभारलें गेलें आहे, मीं केवळ निमित्त-मात्र आहे. याकरतां शत्रूची तमा न धरतां त्यास बुडवून राज्य वृद्धीतें पावाविणें. राज्य चालवीत असतां राज्यवैभवांत राहून आलिप्तपणा राखणें व निष्काम कर्मयोग साधणें हें अतीशय कठीण काम असतें. याज्ञवल्क्याच्या उपदेशानें तो योग जसा पूर्वींच्या काळीं जनक राजानें साधला तसा ह्या वेळीं समर्थांच्या उपदेशानें महाराजांनीं साधला असें या त्यांच्या शब्दांवरून स्पष्ट दिसतें. ह्या निरवानिरवीच्या बंदोबस्तावरून हें हि उघड दिसतें कीं, खानाचा हेतु, आपल्याला दगा करण्याचा आहे, हें महाराजांना खात्रीपूर्वक ठाऊक होतें. खान वचनाचा धड

१. पी. ची. २५-२७.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थो
नगर वाचनालय, सातारा

राहणें शक्य नाहीं व आपला हेतु साध्य करण्यासाठीं तो वाटेल तें करण्याला मागें पुढें पाहणार नाहीं, ह्या करतां च आपल्या प्राणावर बेतल्यास, आपण अंगीकृत केलेल्या पवित्र कार्याची वाढ आपल्या मागें आपल्या लोकांनीं कशा तऱ्हेनें करावी हें महाराजांनीं आपल्या विश्वासू मंडळींना सांगून ठेविलें.

**१७. भेटीचा दिवसः**

खानाची भेट घेण्याचें ठरल्या नंतर तो पार येथें आल्याचें मागें सांगितलें च आहे. पार येथें खान तीन दिवस राहिला होता. भेटीचा दिवस शके १५८१ मार्गशीर्ष शुद्ध सप्तमी, गुरुवार, तिसरा प्रहर (तारीख १० नोव्हेंबर इ. स. १६५९) हा ठरला होता.

**१८. महाराजांचा वैयक्तिक बचावः**

गुरुवार उजाडला. त्या दिवशीं भेटीस जावयाच्या वेळीं, खानानें आपल्यास दगा करण्याचा बेत केला तर त्यांतून पार पडण्यासाठीं महाराजांनीं आपला स्वतःचा बचाव पुढील प्रमाणें केला होता. अंगांत चिलखत (जिऱ्याचें कुडतें) घालून त्यावर झगा चढविला होता व डोकीस जिरेटोप घालून, त्यावर मंदील बांधला होता; कमरपट्यांत बिचवा खोवून, वाघनखें डाव्या हातीं चढविलीं होतीं.[२] नंतर अंबेस व मातोश्रींस नमस्कार करून महाराज निघाले. बरोबर संभाजी कावजी व जिऊ महाला असे दोन हुद्देदार घेतले. त्या प्रत्येकांजवळ तलवार व

---

१. शि. भा. अ. २१. श्लो. ८३, ८४; अ. २३. श्लो. २८.
२. शिवभारत म्हणतें कीं, या वेळीं महाराजांच्या दोन हातांत पट्टा व तरवार होती. अ. २१. श्लो. २१, ५०.

१२

ढाल होती. शिवाय, महाराजांची नेहमींची तलवार जिऊ महाल्याजवळ होती. तसें च तान्हाजी मालुसरे यास खासबरदार म्हणून आपल्या बरोबर घेतलें होतें. म्हणजे आजचा ( A. D. C. ) या नात्यानें तान्हाजी महाराजांबरोबर होता. या शिवाय महाराजांनीं आपल्या बरोबर, ठरल्या प्रमाणें, कोणत्या हि तऱ्हेची फौज अथवा माणसें नेलीं नव्हतीं, किंवा नेण्याचा प्रयत्न हि केल्याचें दिसत नाहीं. ह्यावरून त्यांच्या मनांत आपलें वचन मोडावयाचें किंवा खानास दगा द्यावयाचा होता असें मुळीं च दिसत नाहीं.

**१९. खानाचा लवाजमा** ( Khan's escort ):

उलट पक्षीं खानानें मात्र पार येथें, कोयनेच्या कांठीं, ठरल्यापेक्षां जास्त फौज लवाजम्याच्या नांवाखालीं आणून मुक्काम केला होता. शिवाय मांडवांत भेटीला जाण्याच्या वेळीं, आणखी एकदां ठरलेली अट मोडून, आपल्या बरोबर बंदुकवाले व तरवारवाले मिळून १५०० शिपाई[1] त्यानें घेतले होते, आणि त्यांसह तो गडाकडे पालखींतून जाऊं लागला. या प्रदेशांत हातघाईच्या लढाईच्या वेळीं बंदुकीपेक्षां तरवारीचा उपयोग जास्त होण्यासारखा असल्यामुळें, वरील लवाजम्यांत तरवारवाल्यांची संख्या जास्त होती. यावरून असें दिसतें कीं, भेटीची जागा गोळागोळीच्या किंवा आगीच्या लढाई (fire action) पेक्षां हातघाईच्या लढाईला (shock action) जास्त योग्य व अनुकूल आहे, हें माहिती असल्यामुळें खानानें या वेळीं आपल्या बरोबर बंदुकवाल्यांपेक्षां तरवारवाले शिपाई च जास्त घेतले. इतके लोक बरोबर घेतलेले पाहून खानाच्या

---

१. शे. ब. २९.

जवळ असलेल्या पंताजीनें जनी टेंबाच्या खालीं आल्यावर त्यास सांगितलें कीं, भेटींतील अटीप्रमाणें फक्त दोन हुद्देकरी व एक खासबरदार यां शिवाय जास्त लवाजमा बरोबर घेतां येत नाहीं; इतका लवाजमा आपण बरोबर घेतल्यास महाराज कदाचित भेटीस येण्यास दहशत घेतील. ह्या करितां हे लोक बरोबर घेऊं नयेत. या म्हणण्यास कृष्णाजीपंतानें हि संमत्ति दिली. तें ऐकून खानानें त्या लोकांना जनीच्या डोंगराच्या पायथ्याशीं ठेविलें. यांत त्यानें असा विचार केला कीं, ह्या लोकांना नेल्यास शिवाजी आपल्या भेटीस येणार नाहीं व आपलें उद्दिष्ट साधणार नाहीं, म्हणून या लोकांना बरोबर घेणें शहाणपणाचें नाहीं. शेवटीं सर्व सैन्यांत शक्तीसाठीं नांवाजलेला असा एक मर्दाना पंचहत्यारी लष्करी सरदार, सय्यद बंदा नांवाचा आपल्या बरोबर, आपला खासबरदार म्हणून घेतला. याशिवाय आणखी दोन हत्यारबंद हुद्देकरी बरोबर ठेविले होते. ही गोष्ट अटींत ठरल्या प्रमाणें च होती.

**२०. खानाचा लवाजमा म्हणजे दग्याचा बेत:**

खानानें आपली १०।१२ हजार फौज कोयनेच्या कांठीं असतां व भेटींत बरोबर फौज घ्यावयाची नाहीं असें ठरलें असतां, वरील १५०० लोक बरोबर घेण्याचें कारण काय ? महाराजांना भिऊन कांहीं हे लोक त्यानें बरोबर घेतले नव्हते. पहिल्यापासून च तो आपण त्यांना सहज पकडूं अशा गुर्मींत होता व म्हणून च त्यानें त्यांची भेट घेण्याचें बिन दिक्कत कबूल केलें होतें. तेव्हां ही फौज बरोबर घेण्याचें कारण आपण महाराजांस दगा करून पकडल्यावर अथवा त्यांचा नाश

१. शे. ब. २९

केल्यावर तेथें असलेल्या महाराजांच्या लवाजम्याला कापून काढण्यास व कोयना-पार येथें असलेल्या आपल्या फौजेला ती बातमी कळवून तिच्याकडून गडावर तावडतोब हल्ला करण्यास सुलभ जावें हें होय. ह्यावरून हें उघड होतें कीं, स्वतःच्या बचावाची तयारी म्हणून हे १५०० लोक खानानें नेले नसून, महाराजांना पकडून, त्यांना दगा देण्यासाठीं, त्यांचा उपयोग करण्याचा त्याचा विचार असला पाहिजे व तसा तो होता हि.[1] कारण, खानाचें उद्दिष्ट महाराजांना पकडणें हें च असल्यामुळें, त्यानें असें कपट करणें, त्याचा बेत लक्ष्यांत घेतां आवश्यक व जरूर होतें.

### २१. दोघां प्रतिस्पर्ध्यांची भेटः

खान आपल्या दोन हुद्देदार व खासबरदार सय्यद बंदा अशा तीन असामींसह मांडवांत येऊन दाखल झाला व पालखी बाहेर च ठेविली. कृष्णाजी भास्कर व पंताजी गोपिनाथ हे दोन्हीं वकील त्याच्या बरोबर होते. इकडे महाराज, बरोबर संभाजी कावजी व जिऊ महाला व तान्हाजी मालसुरे यांस घेऊन मांडवाकडे आले. दुरून पाहिलें असतां खानाजवळ सय्यद बंदा महाराजांस दिसला. तेव्हां पंताजीस त्यांनीं बोलावून घेतलें, व बंद्यास दूर करण्याबद्दल खानास कळविण्यास सांगितलें व त्या वेळीं आपण हि तान्हाजीस दूर ठेविलें. पंतानें जाऊन खानास सांगितलें कीं, महाराज बंद्यास पाहून घाबरले आहेत. तरी त्यास आपण सदरेच्या बाहेर लावून द्यावें. महाराज हे तुम्हाला भतिजा ( पुतण्या ) प्रमाणें आहेत व ते हि आपल्याला शहाजीराजां प्रमाणें

१. शि. भा. अ. २०. श्लो. ६४; अ. २१. श्लो. २७.

समजून येत आहेत. तेव्हां यत्किंचित कारणासाठीं येथपर्यंत जुळवून आणिलेला बेत विसकटविणें हें आपल्यासारख्या मुत्सद्यास शोभत नाहीं. खान आपल्या गुर्मीत होता व कदाचित् समोर दिसत असलेल्या महाराजांच्या बुटक्या मूर्तीकडे, त्याचें लक्ष्य गेलें असेल व असल्या माणसाला आपण सहज पकडूं व आपलें उद्दिष्ट तावडतोब सिद्धीस नेऊं अशी त्याची तत्काळ खात्री झाली असेल, त्यामुळें व तान्हाजीस हि महाराजांनीं लांब ठेवलेला पाहून कांहीं एक कुरकूर न करतां त्यानें बंद्यास मांडवाबाहेर जाण्यास सांगितलें[1]. त्यानंतर महाराज सदरेंत आले. त्यांनीं बरोबर फक्त दोघे च हुद्देदार म्हणजे संभाजी कावजी व जिऊ महाला आणले होते. महाराजांस पाहून खान उभा राहून पुढें सामोरा आला व त्यानें पंताजीस विचारलें कीं, "शिवाजीराजे हे च कीं काय?" पंताजीनें सांगितलें "हे च!" ह्यावर महाराजांनीं कृष्णाजीपंतांस विचारलें कीं, "खान हे च कीं काय?" त्यानें हि "हे च!" असें उत्तर दिलें[2].

**२२. भेटींत खान दगा देतोः**

तेव्हां त्या वेळच्या शिरस्त्याप्रमाणें हात पसरून छातीस छाती लावून भेट घेण्याची वेळ आली. खानानें हात पसरले व महाराजांस आपल्या छातीशीं भिडविलें. महाराजांनीं हि हात पसरून खानाची भेट घेतली. इतक्यांत खानाचें उद्दिष्ट त्याच्या डोळ्यांपुढें उभें राहिलें. खानानें पाहिलें कीं, सदरेंत महाराजांकडील फक्त दोन च हुद्देकरी आहेत. त्यांशिवाय पुढें मागें अथवा आजूबाजूंस जवळ असें महाराजांच्या तर्फेचें कोणीं हि माणूस दिसत नाहीं, तेव्हां अशी

---

१. स. १७; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ७०. २. शि. दि. १६८.

सोन्यासारखी संधी फुकट दवडूं नये. हा विचार एका क्षणांत त्याच्या मनांत उभा राहिला व तत्काळ त्यानें पुढील प्रमाणें बेत योजला. महाराजांस एकदम ठार मारावें किंवा जखमी तरी करावें व आपल्या बरोबर ताबड-तोब कोयना पार येथें आपल्या फौजेंत घेऊन जावें असें त्यानें ठरविलें व त्या उद्देशानें तत्काल पुढील हालचाल केली. महाराजांनीं खानास हात पसरून भेट दिली, हें वर सांगितलें च आहे. त्याचा फायदा घेऊन खानानें झटकन त्यांचें मस्तक आपल्या डाव्या बगलेंत घालून दाबून धरलें. महाराज त्याच्यापेक्षां ठेंगणें असल्यामुळें त्यांचें मस्तक खानाच्या छातीशीं लागत होतें. त्यामुळें ही गोष्ट करण्यास खानास सोपें पडलें.

**खान महाराजांवर वार करतो**

महाराजांची मान डाव्या बगलेंत दाबून धरल्याबरोबर, खानानें आपल्या उजव्या हातानें कमरेच्या डाव्या बाजूस असलेली जमदाड म्यानांतून उपसून काढली; आणि महाराजांच्या डाव्या कुशींत खुपसण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या अंगांत जिऱ्याचें बख्तर होतें. त्यामुळें ती लागूं पडली नाहीं, नुसती खरखरली. या प्रमाणें खानानें दगा दिला हें पाहून महाराजांनीं भवानीचें व समर्थांचें स्मरण करून केवळ आपला बचाव करण्याचे हेतूनें खानाच्या या डावावर प्रतिडाव केला. हा डाव करण्यांत त्यांनीं जें प्रसंगावधान दाखविलें व सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन काय करावयाचें त्याचा जो जलद निर्णय (quick decision) मनाशीं ठराविला व तत्काल अंमलात हि आणला, तो पाहिला असतां त्यांच्या दूरदर्शीपणाची व धुरंधर सेनापतीच्या अंगीं जे गुण अत्यावश्यक लागतात, ते त्यांच्या ठिकाणीं असल्याची साक्ष पटते. महाराजांच्या डाव्या हातांत वाघनख होतें. त्यांचा डावा हात खानाच्या उजव्या

बाजूस होता, तेथून तो काढून त्यांनीं, आपल्या हातांतील वाघनखें खानाच्या पोटाच्या उजव्या बाजूस खुपसून मारा केला व त्याचें पोट चिरलें. खानानें अंगांत नुसता झगा च घातला होता, त्यामुळें महाराजांचा हात कारगीर होऊन खानाची आंतडीं बाहेर आलीं. इतक्यांत महाराजांनीं आपल्या कमरेंतील बिचवा बाहेर काढून उजव्या हातानें खानाच्या डाव्या कुशीकडे मारा केला. असे दोन वार केल्यानें खानाच्या डाव्या हाताचा महाराजांच्या मानेवरील दाब लटका पडला. ती संधी साधून महाराजांनीं आपली मान हिसडून घेऊन, ज्या चवथऱ्यावर भेट होत होती तेथून खालीं उडी ठोकली. इतक्यांत खानानें आपला बाहेर आलेला कोथळा आंत घालून, वर शेला घट्ट बांधून शेवटचा धडपडीचा प्रयत्न केला. त्यानें चौथऱ्याच्या खालीं उतरून आपल्या जमदाडीनें महाराजांच्या डोक्यावर व अंगावर एक दोन वार केले. परंतु त्यांच्या अंगांत व डोकीवर चिलखत व शिरस्त्राण असल्यामुळें ते कारगीर झाले नाहींत. इतक्यांत महाराजांनीं हि जिऊ महाल्यापाशीं असलेली आपली तलवार घेऊन खानाशीं त्याचे वार चुकवीत द्वंद्वयुद्ध सुरू केलें. वार करीत असतां खान एकीकडे "दगा ! दगा ! धांवा ! धांवा !" असें ओरडत होता. त्याची आरडाओरड ऐकतां च त्याचे दोघे हुद्देदार जे दुसऱ्या सदरेंत होते ते व सय्यद बंदा असे धांवून आले. आंत चाललेला प्रसंग बाहेर तान्हाजीस स्पष्ट दिसत होता. बंदा धांवून आंत गेला हें पाहून तान्हाजी हि एकदम पुढें आला व बंदा महाराजांवर हल्ला करण्यास सुरवात करतो न करतो तों च त्याच्याशीं त्याचें द्वंद्वयुद्ध जुंपलें. तान्हाजीनें थोडक्या च वेळांत त्यास यमसदनास पाठविलें. इकडे खानाचे दोन हुद्देदार जे तेथें होते त्यांच्यावर संभाजी कावजी व जिऊ

महाला यांनीं हल्ला चढविला. त्या दोघांनीं त्यांच्याशीं द्वंद्वयुद्ध खेळून थोडक्या च वेळांत त्यांना हि ठार केलें. इतक्यांत खानाची आरडाओरड ऐकून पालखीचे भोई पालखी घेऊन तेथें आले. त्यांनीं हीं वरील द्वंद्वयुद्धें चालूं असतांना च जखमी व जवळ जवळ मरणोन्मुख अशा खानाला पालखींत घालून पळविलें. इतक्यांत संभाजी कावजी यानें आपल्या प्रतिस्पर्ध्याला ठार करून भोयांवर चाल केली व त्यांचे पाय तोडून पालखी खालीं पाडली; आणि महाराजांना न विचारतां आपल्या च जबाबदारीवर व उत्साहाच्या भरांत खानाचें डोकें कापून तो मंडपाकडे वळला. शीर कापून आणलें हें महाराजांना पसंत पडलें नाहीं. परंतु ती वेळ व्यर्थ विचार करण्याची नसल्यानें त्या वेळीं जास्त न बोलतां सदरेंतील खानाच्या बाजूची सर्व मंडळी ठार झाली, हें पाहून सदरेच्या लगत असलेल्या कर्णेवाल्यास लढाई सुरूं करण्याच्या हुकुमाचा कर्णा फुंकण्यास महाराजांनीं आज्ञा केली व आपण गडाकडे निघून गेले. हा सारा प्रसंग येथें सांगण्यास जितका वेळ लागला, त्यापेक्षां अत्यंत थोड्या वेळांत फार तर १०–१२ मिनिटांत पार पडला.

---

१. स. १७; १८; चि. २८, २९; शि. दि. १६८, १६९; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ७०, ७१; शि. भा. अ. २१, श्लो. ३४-६५; म. सा. छो. ब. २३, २४; पौ. चौ. २८-३१; बुसातिनुस्सलातिन, ५६८, ५६९. बडोदें–प्रत. या ग्रंथकर्त्यानें, असें म्हटलें आहे कीं, " खान हा सरळ मनाचा शिपाई होता. शिवाजी हा खानाच्या डेऱ्यांत जाऊन खानाला भेटला व त्यानें त्याला गडावर मेजवानीस बोलाविलें. खान निष्कपटी असल्यानें व तह करण्याची त्याची मनापासून इच्छा असल्यानें तो निःशंकपणें गडावर गेला. तेव्हां

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा

ही वेळ सायंकाळची चार पांच वाजण्याची होती[1]. कर्ण्याचा आवाज ऐकल्याबरोबर गडावरून तोफेचे सांकेतिक बार झाले. त्या सांकेतिक बारांचा अर्थ, सर्व ठिकठिकाणच्या सैन्यांनीं एकदम शत्रूवर चढाई करण्याचा होता, व त्याप्रमाणें ते बार ऐकल्याबरोबर ठिकठिकाणच्या मराठी फौजांनीं आपल्याला नेमून दिलेल्या शत्रूच्या निरनिराळ्या भागांवर एकदम हल्ला केला. खानाच्या बरोबर आलेल्या सर्व च लोकांचा फडशा उडाल्यामुळें सदरेंत घडलेला वृत्तांत कोयनापार येथें किंवा पुढें जनीच्या टेंबाच्या खालीं आलेल्या १५०० लोकांना सांगण्याकरितां जाण्यास कोणीं च माणूस शिल्लक उरला नाहीं. भोयांस जखमी व बेकार करून कृष्णाजी भास्करास बरोबर घेऊन महाराजांची मंडळी, खानाच्या मुंडक्यासह गडावर गेली.

तोफांचे बार

---

खान हा मदतीशिवाय व थोड्या लोकांनिशीं आलेला पाहून शिवाजीनें त्याला सरबतांत विष घालून मारलें!! " ही या बखरकाराची नवलकथा वाचून हसूं येतें. असल्या भोळ्या खानाला विजापुरदरबारानें **चुक्वा** शिवाजीवर कसें पाठविलें ? व मेजवानीस आलेल्या खानाला वीष देण्याची तरी एवढी तसदी वेड्या शिवाजीनें कशाला घेतली ? एका तरवारीच्या झटक्यानें खानाचें काम उरकलें असतें व गडावर असलेल्या शिबंदीनें खानाबरोबर आलेल्या फक्त "बारा" (!!) लोकांना एका चुटकीसरशीं छाटून टाकलें असतें. एकंदरींत या भिकारड्या बखरीनें ह्या प्रसंगाची माहिती याप्रमाणें दिली आहे; तिचें स्वरूप समजण्यासाठी येथें हीं दोन तीन वाक्यें उध्दृत केलीं आहेत. असल्या खुळचट चोपड्यांना इतिहासकार किती किंमत देतील हें समजतें च आहे !

१. शि. दि. १७०; भावे, ३५.

**भोयांना बेकार करणें व त्याचा परिणाम**

भोयांना त्यांच्या पायांच्या शिरा तोडून बेकार केल्याची गोष्ट दिसण्यांत अगदीं क्षुल्लक दिसते. परंतु अशा क्षुल्लक गोष्टींनीं च पुष्कळ मोठमोठ्या लढाया बिघडतात. म्हणून प्रथमतः असल्या क्षुल्लक गोष्टींचा बंदोबस्त हुशार सेनापतींनीं संधी येतां च ताबडतोब करावा लागतो. भोयांना जर सोडून दिलें असतें, तर त्यानीं जे १५०० लोक जनीच्या टेंब्राच्या पायथ्याशीं होते, त्यांना ही वर्दी देऊन सावध केलें असतें व ती बातमी ऐकून १५०० लोकांच्या सेनापतीनें ताबडतोब महाराजांना गडावर पोहोंचण्यापूर्वीं च गांठण्याकरतां मंडपाकडे चाल केली असती व आपल्या मदतीसाठीं जासूद पाठवून कोयनापारची फौज हि मंडपाकडे आणविली असती. असें झालें असतें तर मोरोपंत, जेधे, बांदल वगैरे सेनापतींच्या फौजांना खानाच्या फौजेवर अचानकपणें तुटून पडून चढाईची लढाई करतां आली नसती, व त्यांचा जो चढाईच्या बचावाचा बेत होता तो सिद्धीस न जाऊन त्यांना अखेरीस नुसता बचाव (passive defence) करणें भाग पडलें असतें; व त्यामुळें त्यांच्या सैन्यांत बरा च गोंधळ माजला असता, आणि शेवटीं खान मारून हि अपयश पदरीं घेण्याचा प्रसंग आला असता. एकंदरींत महाराजांनीं ज्या ज्या गोष्टी ( मग त्या बारीक असोत अगर मोठ्या असोत ) केल्या, त्या, सर्व बाबींचा पूर्ण विचार करून व आपलें प्रसंगावधान कायम ठेऊन ताबडतोब केल्या आणि यामुळें त्यांना युद्धकलाविशारद असें म्हणण्याचा सुयोग आला. कोणत्या हि लहान अथवा मोठ्या संकटांत प्रसंगावधान अंगीं असणें हा सेनापतीच्या अनेक गुणांतील एक प्रमुख गुण आहे व तो तसा महाराजांच्या अंगीं होता हि.

**२३. दळणवळणाच्या जुन्या व नव्या पद्धतिः**

आजकालच्या नवीन शोधांची भर युद्धकलेंत पडल्यामुळें अंतर्दळणवळणा ( inter communication ) च्या साधनांत जास्त वाढ झाली आहे. त्यांत अंतराचा व वेळेचा प्रश्न लक्ष्यांत घेण्याची विशेष जरूरी असते. आजकालचीं दळणवळणांचीं व संदेशांचीं साधनें पुढीलप्रमाणें आहेतः-हरकारा किंवा जासूद (orderly), स्वार किंवा सांडणीस्वार ( galloper or dispatch-rider ), दृष्टि संकेत ( visual-signalling),आगगाडी, टपाल, हलके टेलिफोन (field telephone), तारायंत्र, विमानें, बिनतारी तारायंत्र व भारी टेलीफोन वगैरे. ह्यांपैकीं बऱ्याचशा गोष्टी किंवा साधनें त्या वेळीं नसल्या कारणानें त्वरित बातमी पोंहचविण्यासाठीं पुढील साधनांचा उपयोग करीत असत.आगट्या पेटविणें (bonefires) कर्णा व तोफांचे निरनिराळ्या प्रकारचे व संख्यांचे आवाज करणें, आणि आरशावर सूर्याचीं किरणें पाडून त्यायोगें संकेत कळविणें इत्यादि. ह्यांपैकीं महाराजांनीं या प्रसंगीं आपल्या सैन्यास आपले हुकूम कळविण्याच्या कामीं कर्णा व तोफांचे बार यांचा उपयोग केला होता.

**२४. तोफांचे बार व कर्ण्याचे आवाज या संकेतांचीं कारणें:**

कर्ण्याचा आवाज व तोफेचा आवाज असे दोन संकेत करण्याचें कारण पुढील प्रमाणें होतेंः-कर्ण्याचा आवाज गडावरील गोलंदाजास इशारा देण्यासाठीं व अगदीं नजीकचे लोक जे जनीच्या टेंबाच्या लवणांत होते, त्यांना कळण्यासाठीं होता. हा आवाज मोरोपंत, नेताजी व बाबाजी भोंसले हे फार लांब असल्यामुळें त्यांना ऐकूं जाणें शक्य नव्हतें, म्हणून त्यांच्यासाठीं तोफांच्या बारांची योजना केली होती. तोफांचा आवाज मोरोपंत, नेताजी वगैरे मंडळीस त्यांच्या त्यांच्या जागीं

पोहोंचण्यास जास्तींत जास्त दोन मिनिटें लागलीं असतील. कारण आवाज हा एका सेकंदांत ११०० फूट लांब जातो. अशा वेळीं निरोप पोहोंचविण्याच्या कामीं, तोफा ऐवजीं जर जासुदाची योजना केली असती तर सर्व कार्य बिघडून महाराजांचा आडाखा फुकट गेला असता. कारण, युद्धांत वेळ ही एक महत्त्वाची बाब आहे.

**हरकाऱ्यांची अडचण**

खानानें दगा दिल्यास चढाई घेऊन व त्यास नेस्तनाबूद करून आपल्या फौजांनिशीं एकदम त्याच्या फौजेवर जोरानें अचानकपणें हल्ला करावयाचा व तिचा फडशा उडवावयाचा असा महाराजांचा बेत होता. हा बेत साधण्याकरितां जर महाराजांनीं आपल्या सैन्यास हुकूम पोहोंचविण्यासाठीं हरकारे अथवा जासूद पाठविले असते तर वेळ ही बाब साधली गेली नसती व एका च वेळीं सर्व ठिकाणीं बातमी पोहोंचवून खानाच्या सैन्यावर अचानक हल्ला करण्याकरितां एका च क्षणीं सर्वांनीं कूच करावयाचें होतें, तें हि साधलें नसतें. आगें मागें जर शत्रूच्या सैन्यावर मराठी फौजेनें चाल केली असती, तर तेवढया वेळांत खानाची फौज सावध होऊन लढाईच्या तयारीनें उभी राहिली असती व मराठ्यांच्या आपणांवर येणाऱ्या एका एका तुकडीस तिनें तोंड देऊन त्यांचा पराजय हि केला असता, व तिचें स्थानिक उद्दिष्ट (local objective) जें प्रतापगड तें काबीज केलें असतें. असा प्रसंग घडूं नये येवढ्याकरितां च महाराजांनीं जासुदांबरोबर ठिकठिकाणीं निरोप न पाठवितां सर्वांना एके वेळीं ऐकूं जाईल व ते एकदम आपल्या नेमलेल्या कामगिरींवर चालून जातील, यासाठीं तोफांचे आवाज, इषारती दाखल करविले. त्यामुळें त्यांच्या सैन्याची हिंमत वाढून तें शत्रूवर फार जोराचे हल्ले करण्यास तयार झालें.

ईश्वर आहे साभिमानी ।
विशेष तुळजा भवानी ॥

अशा करण्यानें महाराजानीं भरारी, सुटसुटीतपणा व अचानकपणा ह्या युद्धाच्या निरनिराळ्या अंगांचा अथवा तीं सर्व मिळून झालेल्या एकत्र पद्धती (group system) चा फायदा घेऊन शत्रूला नामोहरम करण्याची संधी ताबडतोब साधली व आपल्यावरील आपत्ती टाळली. आणि त्या च प्रमाणें एकंदर गोष्टींचा विचार करून व त्या अन्वयें योजना अमलांत आणून आपल्यास अनुकूल अशी परिस्थिति करून घेतली. अशा प्रकारें परिस्थितीचें कल्पनातीत ज्ञान करून घेणें व त्यावर तत्काल उपाय योजणें हें काम लहानसहान बुद्धिमत्तेचें नसून एक प्रकारें ईश्वरी देणगी असते व ती महाराजांना परमेश्वरकृपेनें लाभली होती; तिचा च उपयोग करून घेऊन महाराजांनीं आपल्यावर व स्वराज्यावर आलेलें हें गंडान्तर मोठ्या शिताफीनें टाळलें आणि " बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी । परंतु प्रसंग पाहोनी । कार्य करणें ॥ " ह्या समर्थांच्या आज्ञेप्रमाणें महाराजांनीं हें कार्य पार पाडलें !

---

## प्रकरण ६ वें

**१. जनीटेंबची लढाईः**[1]

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें खान मेल्यावर खानाच्या सैन्यावर हल्ला करण्यासाठीं तोफांचे विशिष्ट बार झाले. हे बार ऐकून मोरोपंत, नेताजी, बाळाजी सिलीमकर वगैरे मंडळी, आपआपल्या ठिकाणांहून खानाच्या फौजेवर अचानक हल्ला करण्यासाठीं एकदम निघाले. हें बार, खानाच्या फौजेनें हि ऐकले. परंतु मनांत कोणच्या हि प्रकारची शंका नसल्यामुळें व महाराजांनीं खाण्यापिण्याची वगैरे व्यवस्था उत्तम ठेविली असल्यामुळें त्यांत खानाचे लोक गुंग झाले होते. हे बार, खान व महाराज यांच्या भेटीच्या वेळचे असावेत, अथवा खानाच्या सलामी प्रीत्यर्थ असावेत, अशा समजुतींत ते राहिले.[2] येवढें च नव्हें तर खान आतां डोंगरांतला उंदीर जो शिवाजी त्यास थोड्या वेळांत पकडील किंवा ठार मारील व त्याचें शीर घेऊन परत येईल आणि नंतर प्रतापगड लुटण्या करितां आपण जाऊं वगैरे मनोराज्यांत ते गुंग झाले होते. त्यामुळें तोफांच्या बारांचें त्यांना विशेष महत्व वाटलें नाहीं व ते बेसावध राहिले. इतक्यांत मराठयांची फौज अचानकपणें त्यांच्यावर चालून आली व तिनें लांडगेतोड करण्यास प्रारंभ केला.[3]

**तोफांचे बार**

---

१. स. १८. २. शि. दि. १६९. ३. जे. क. शि. च. प्र. ४५; जे. श. १८२.

**२. जनीच्या टेंबाखालील खानाची तुकडी:**

खान हा कोयनापार येथून गडावर जात असतांना त्यानें आपल्या बरोबर निवडक १५०० लोक घेतलेले होते.[1] परंतु इतके लोक बरोबर घेणें, हें भेटीच्या अटींच्या विरुद्ध आहे, या साठीं आपण हे लोक बरोबर नेऊं नका व येथें च ठेवा असा सल्ला पंताजीनें जनीच्या टेंबाच्या दरींत आल्यावर खानास दिला व त्याप्रमाणें खानानें ते लोक तेथें ठेविले. ते ज्या ठिकाणीं ठेविले होते, तें ठिकाण, गड ज्या डोंगरावर आहे त्याच्या आग्नेयेच्या सोंडेवर आहे. त्यास जनीचें टेंब असें म्हणतात.[2] या सोंडेपासून अर्ध्या फर्लांगावर आग्नेयीस कोयनापारच्या बाजूस महारवाड्याचें टेंक नांवाचा एक डोंगर आहे. तो डोंगर व जनीटेंबाची सोंड यांच्या मधील दरींत हे लोक होते.

**टेहळणीच्या क्षेत्राचें व प्रतिकाराच्या क्षेत्राचें काम**

त्या दरीच्या उत्तरेस जनीटेंबाच्या सोंडेच्या पलीकडील बाजूच्या ओहळांत व झाडींत महाराजांचे कान्होजी जेधे, बांदल, पासलकर, अण्णाजीपंत, बाजी सर्जेराव वगैरे सरदार हे आपल्या चार-पांचशें पायदळ जमातिनिशीं छबिन्याच्या चौक्यांत होते. त्यांना असा हुकूम होता कीं, गडावरील तोफेचे युद्ध सुरू करण्याच्या इषारतीचे जर बार होतील, तर खानाच्या जनी टेंबाखालील फौजेवर चालून जावें, नंतर कोयनापार येथील खानाची फौज गडाच्या रोखानें चालून आल्यास, मोरोपंत व सिलीमकर यांच्या फौजा येऊन त्यांस तोंड देईपर्यंत तिला अडवून धरावें. या रीतीनें खोऱ्यांत त्यांनीं टेहळणीच्या क्षेत्राच्या व प्रतिकाराच्या क्षेत्राच्या ओळीचें

---

१. शे. ब. २९. २. प्रत्यक्ष पहाणी.

( line of observation and resistance ) काम करावें. ज्यांत जेधे वगैरे मंडळी बसली होती त्या खोऱ्यास खाडयाचें खोंड असें नांव आहे. जनी टेंब्राच्या पायथ्याशीं बाजी सर्जेराव व टेंबाच्या दक्षिणेकडील उतारावर दाट झाडींत अण्णाजीपंत यांस ठेविलें होतें. अण्णाजीचा जमाव पार ते गड ह्या रस्त्यावरून कोणास हि न दिसेल, परंतु जेथून अण्णाजीला मात्र त्या रस्त्यावरील सर्व हालचाली दिसतील अशा जागीं ठिकठिकाणीं पसरवून ठेविला होता. खानाचे १५०० लोक ज्या दरींत राहिले होते तिच्या नैऋत्येस व सोंडपार गांवाच्या मागील बाजूच्या ओहळांत सिलीमकर यास आपल्या जमावानिशीं ठेविलें होतें. सोंडपारच्या पश्चिमेस जवळ जवळ एका मैलावर पार घाट आहे. घाटाच्या व सोनपाराच्या दक्षिणेस कुमठ्याचा ओढा वहात जाऊन पूर्वेस कोयनेस मिळतो. सोनपार व पारघांट ह्यामध्यें घोडवण नांवाचें निमुळतें खोरें आहे. पार घाटांत किनेश्वरापाशीं सरसेनापति मोरोपंत आपल्या ५००० पायदळानिशीं घाट दाबून बसले होते.[२] त्यांच्या हाताखालीं त्रिंबक भास्कर, शामराजपंत वगैरे सरदारांचीं पथकें होतीं. महाराज जर जिवंत हातीं सांपडले नाहींत व ते पारघाटांतून महाडाकडे निसटले तर पारघाट ताब्यांत घेऊन पूर्वेकडून त्यांना पश्चिमेकडे रेटावयाचें आणि त्या च बरोबर सिद्दीला उठवून त्याच्या कडून महाराजांस पश्चिमेकडून व वायव्येकडून पूर्वेकडे रेटावयाचें आणि दक्षिणेकडे महाराजांनीं निसटूं नये म्हणून वाडींचे सावंत व श्रृंगारपूरचे सुर्वे यांच्या कडून हि तिकडून उठाव करवावयाचा आणि अशा रीतीनें महाराजांस सर्व बाजूंनीं कोंडावयाचें असा

---

१. शि. भा. अ. २२ श्लो. ३३–३४. २. शे. ब. ३१.

श्री. छ. प्रतापसिंह ... (थोर

खानाचा बेत होता. हा बेत आगाऊ ओळखून तो सिद्धीस जाऊं नये म्हणून, महाराजांनीं पारघाट दाबून ठेवला आणि मोरोपंताकडे पुढील कामगिरी सोंपविली.

मोरोपंतांचें काम

खानाची कोयना पार येथील फौज गडावर चालून आल्यास तिला पाहिल्या प्रथम अडविण्याचें काम बांदल, जेधे, अण्णाजीपंत, सिलीमकर वगैरे मंडळी करणार च होती. परंतु खानाच्या फौजेची संख्या जास्त असल्यामुळें त्यांच्यांनीं तिचा पराभव केला जाणार नाहीं, यासाठीं मोरोपंतांनीं त्यांना वेळेवर मदत करून खानाच्या फौजेचा पूर्ण पराजय करावयाचा; म्हणजे हें एक प्रकारें स्थानिक राखीव सैन्या (local reserve) चें काम होतें.

**३. वकील पंताजीची मुत्सद्देगिरीः**

पंताजीपंताची हिकमत (Stratagem)

खानानें कोयनापार येथून फक्त दोन हुद्देदार व एक खासबरदार घेऊन च भेटीच्या ठिकाणीं यावयाचें ठरलें होतें. असें असतां त्यानें १५०० लोक बरोबर घेतले. तेव्हां हें नवीन अरिष्ट टाळण्यासाठीं व महाराजांनीं आंखलेला पूर्वीचा बेत बिघडूं नये म्हणून कांहीं तरी प्रयत्न करून या १५०० लोकांना गडावर जाऊं न देतां मध्यें च कोठेंतरी अडकवावयाचें येवढें च नव्हें तर त्यांचें कोयनापार येथील फौजेशीं दळणवळण हि होऊं द्यावयाचें नाहीं असें करणें जरूर होतें. ही कामगिरी करण्यास आयत्या वेळीं खानाच्या जवळ महाराजांकडील वकील पंताजीपंता शिवाय दुसरा कोणी हि इसम नव्हता. पंत नुसता च मुत्सद्दी नसून लढवय्या हि होता व लढाईतील खांचा खोंचा व डांवपेचांत निष्णात होता, ही गोष्ट त्यानें पुढें जी हिकमत लढविली व

डांवपेच केला त्यावरून सिद्ध होतें. वरील गोष्ट लक्ष्यांत ठेऊन जनीच्या टेंबाच्या पूर्वेस व महारवाड्याच्या टेंकाच्या पश्चिमेस जी दरी आहे, तेथें आल्यावर पंतानें खानास सांगितलें कीं, ह्या १५०० लोकांना पुढें नेल्यास महाराज घाबरून पुढें यावयाचे नाहींत; याकरितां तुम्हीं हे लोक येथें च ठेवा, पुढें नेऊं नका[1]. तेव्हां, आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं खानानें पंताचें बोलणें मान्य केलें. त्या वेळीं पंतानें हे लोक ठेवण्यास जी जागा खानास सांगितली ती लक्ष्यांत घेतली म्हणजे या ब्राह्मण-मुत्सद्याची युद्धशास्त्रांतील कुशलता तत्काळ लक्ष्यांत येते. या दरीच्या उत्तरेस धावणीच्या टेकाची सोंड येते व दक्षिणेस कुमठ्याचा ओढा येतो. ह्यामुळें भौगोलिक दृष्ट्या या दरीच्या चारी बाजूंनीं अडचणीची जागा होती. ह्या दरीच्या उजव्या व डाव्या हातास आपली फौज दबून बसविली आहे हें पंतास माहीत होतें, तसें च या दरींत १५०० लोक राहिल्यानें त्यांचें दळणवळण कोयनापारच्या सैन्याशीं रहाणें मुष्कीलीचें होईल, यासाठीं त्यानें खानास आपले लोक येथें च सोड-ण्याची विनंति केली. खानाला ह्या लपून बसलेल्या मराठी सैन्याची माहिती नसल्यामुळें त्यानें तावडतोब होकार दिला. ह्या कृत्यानें पंतानें खानाचा पार येथून १५०० लोक बरोबर घेऊन निघतांना मनांत ठरविलेला बेत, म्हणजे त्या लोकांकडून महाराजांना घेरा घालून पकडा-वयाचें हा बेत सपशेल फसविला. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं, पंताजी सारखीं जीं निरनिराळीं माणसें महाराजांनीं पदरीं ठेविलीं होतीं तीं युद्धकलाकुशल व मुत्सद्दीपणांत तरबेज होतीं.

---

१. स. १६; शे. ब. २९.

**४. छविन्याच्या फौजेंतील टेहळणीच्या क्षेत्रांतील चौक्याः**

शत्रूला पहिल्या झटक्यांत अडविण्यासाठीं जे चौकी पहारे बसविण्यांत येतात, त्यांना शत्रूची हालचाल व बातमी समजण्यासाठीं आपापले टेहळे शत्रूच्या साधारणपणें संभवनीय अशा चालून येणाऱ्या मार्गांवरील विविक्षित ठिकाणांची ( points) व आपल्या समोरील जागांची ( aria ) पहाणी व टेहळणी करण्याकरितां ठेवावे लागतात. हे चौक्या पहाऱ्यांतील लोक स्वतः शत्रूच्या अघाडीच्या टेहेळयां ( advance scouts ) ना दिसणार नाहींत अशा जागीं आडोशाला (cover) बसलेले असतात. पण त्यांना मात्र शत्रूच्या हालचाली दिसूं शकतात. ते शत्रूच्या हालचालींची बातमी ताबडतोब आपल्या चौकी पहाऱ्यांच्या तुकड्यांच्या सेनापतींना कळवितात. हें काम करितांना ते ( to see without being seen ) स्वतः न दिसतां शत्रूस पाहणें या तत्त्वास पूर्ण लक्ष्यांत ठेऊन वागतात. टेहळयांना ( scouts ) ही गोष्ट जितकी जरूरीची आहे, तितकी च ती टेहळणीच्या कामावर सोंपविलेल्या फौजेच्या तुकड्यांना ( patrols ) सुद्धा महत्त्वाची व आवश्यक आहे. या गोष्टी जशा आजकालच्या लढाईंत पाळल्या जातात तशा त्या वेळीं हि पाळल्या गेल्या होत्या हें सिद्ध होतें. या तत्त्वास अनुसरून जनी टेंबाच्या आसपास आडोशास बससेल्या जेधे, बांदल, वगैरे चौक्या पहाऱ्यांच्या तुकड्यांनीं आपापले टेहळे पार ते गड या मार्गावर खानाची बातमी काढण्यासाठीं जागजागीं झाडांवर सुद्धां योग्य ठिकाणीं लपवून ठेविले होते. पाराहून गडावर येण्याचा फक्त एक च मार्ग उघडा असल्या-

---

१. शि. दि. १७०.

मुळें ( बाकीचे सर्व मार्ग झाडें वगैरेंनीं बंद केले होते हें मागें सांगितलें च आहे ) ह्या टेहळ्यांना आपलें काम पार पाडणें बरें च सोपें गेलें.

**५. सेनापतीस मनुष्यस्वभावाच्या ज्ञानामुळें होणारा फायदा:**

१९१४ च्या यूरोपांतील महायुद्धामध्यें पूर्व आफ्रिकेंत जें युद्ध चालू होतें, त्यांत जो जर्मन सेनापति कर्नल लेटो फॉन फॉरबेक नांवाचा होता, त्यानें आपल्या " पूर्व आफ्रिकेंतील माझ्या आठवणी " या पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, मी आपल्या दोन यांत्रिक तोफा ( मशीन गन्स ) त्या प्रदेशांत असलेल्या विपुल खजुरीच्या रानांतील दोन झाडांवर ठेविल्या होत्या व त्यांवर त्या दिसूं नयेत म्हणून हिरवळ व वेली वगैरे आजुबाजूंनीं गुंडाळून त्या बाहेरून दिसणार नाहींत व त्यांची चमक हि पडणार नाहीं अशी व्यवस्था केली. या त्याच्या हिकमती ( strategy ) नें त्यानें शत्रूच्या अघाडीच्या फौजां ( advancing troops ) तील फार लोक घायाळ व ठार ( heavy casualties ) केलें. यांत एक गोष्ट जी विशेष नजरेस आणावयाची ती ही कीं, त्याला मनुष्यस्वभावाचें पूर्णज्ञान व बारीक निरीक्षण असल्यामुळें या हिकमतीनें थोडया लोकांनीं व थोडया साधनांनीं, अल्प मेहनतींत, जास्त परिणाम घडवितां आला; म्हणजे शत्रूचा जास्त नाश करतां आला. म्हणजे, दिसण्यांत यःकश्चित परंतु परिणामीं उपयुक्त अशा हिकमतीनें थोडया वेळांत शत्रु-सैन्यांतील पुष्कळ लोक ठार होऊन पुष्कळसे जखमी झाले व शत्रूच्या अघाडीच्या फौजेंत एकदम हुल्लड किंवा गोंधळ माजला. सेनापती मध्यें मनुष्य स्वभावाचें बारीक निरीक्षण करणें हा बहुमोल गुण जो अवश्य लागतो,

---

१. शि. दि. १६२.

तो या सेनापति फॉरबेकमध्यें इंग्रज सेनापती पेक्षां जास्त प्रमाणांत असल्यामुळें त्याला त्याच्यावर मात करता येऊन, आपल्या ज्ञानाचा फायदा, आपल्या कार्याला, थोडया श्रमांत व थोडया खर्चांत मिळवून देतां आला. या एका च गुणामुळें त्याला सर्व दृष्टीनें राष्ट्रीय काटकसर करतां आली; म्हणजे च सैन्यातील शिपायांची, दारू-गोळ्यांची, वेळेची वगैरे सर्व बाबतींत आपल्या राष्ट्राची काटकसर करतां आली.

महाराजांच्या हि अंगीं अशी माणूस हेरण्याची हातोटी अप्रतिम होती. त्याच प्रमाणें मनुष्यस्वभावाचें बारकाईनें निरीक्षण करून त्यांचा योग्य वेळीं फायदा घेण्याचा गुण हि त्यांच्या ठाईं होता.

कोणत्या हि एकाद्या उंच जागेवर बसलेला मनुष्य खालून जाणाऱ्या १०० लोकांना न चुकतां साहजीकपणें पाहूं शकतो पण खालून जाणाऱ्या १०० माणसांपैकीं फक्त शेंकडा ५ किंवा १० च लोक वरच्या मनुष्याला पहातात; या तत्त्वाचा अनुभव प्रत्यक्ष व्यवहारांत सहज पटण्याजोगा आहे. ही दिसावयास क्षुद्र अशी गोष्ट युद्ध चालविणाऱ्या सेनापतीनें आपल्या आडाख्याच्या पूर्ततेसाठीं उप-योगांत आणल्यास वरीलप्रमाणें फायदा मिळून काटकसर होते. महाराजांनीं हि हें तत्त्व या युद्धांत मागें सांगितल्याप्रमाणें, झाडांवर टेहळणी करण्याकरितां व वेळ पडल्यास हल्ला ( offensive ) साठीं माणसें बसविलीं होतीं, या माणसांना खानाचे खालून येणारे लोक दिसत होते, पण हे मात्र खानाच्या लोकांना दिसत नव्हते. हा च फायदा घेऊन या जनीच्या टेंबाच्या व पारच्या लढायांत महाराजांना जय मिळाला.

**६. जनी दरींतील टेहेळयांची कामगिरीः**

खान ठरल्याप्रमाणें तीन माणसांसह न येतां, बरोबर १५०० शिपाई घेऊन येत आहे हें ह्या जनी टेंब्राच्या टेहळयांनीं पाहिलें व त्या प्रमाणें ती बातमी आपआपल्या तुकडयांच्या अधिकाऱ्यांस तत्काळ पोंचविली व पुढें काय काय घडतें हें हि बारकाईनें ते पहात बसले. थोडया वेळानें खानानें जनीच्या दरींत हे लोक ठेऊन तो बरोबर तीन माणसें व दोन वकील घेऊन भेटीच्या मांडवाकडे निघून गेला. हें पाहून टेहळयांनीं आपआपल्या अधिकाऱ्यांकडे ही बातमी हि तावडतोब कळविली. नेहमीं टेहळयांची जोडी असते. त्यांपैकीं एक, जागेवर बसून एकसारखा शत्रूला आपल्या दृष्टी समोर ठेऊन त्याच्या हालचाली पाहतो व त्या तो आपल्या जोडीदाराला सांगून त्याच्या मार्फतीनें आपल्या अधिकाऱ्याकडे कळवितो. तो दुसरा टेहेळया ही बातमी अधिकाऱ्यास कळवून पुन्हां पहिल्यास येऊन मिळतो. ह्याप्रमाणें हि क्रिया त्यांचा पहारा पुरा होईपर्यंत चालू असते. अशा प्रकारें हे टेहेळे आपलें काम करीत होते.

**७. छबिन्याच्या फौजेच्या सेनापतींचा प्रथमोपक्रमः**

तोफांचे बार झाल्यावर पारच्या फौजेवर आपल्याला चालून जावयाचें आहे, हें सिलीमकर, अण्णाजीपंत, जेधे, मोरोपंत वगैरे मंडळींना माहीत होतें आणि त्याप्रमाणें त्यांनीं आपली तयारी हि करून ठेविली होती. इतक्यांत थोड्या वेळानें खानानें आपल्या बरोबर १५०० लोक आणल्याची बातमी टेहळयांनीं त्यांना कळविली. तेव्हां खान हा ह्या लोकांनिशीं मांडवाकडे जाणार हें बहुतेक निश्चित झाल्यासारखें च होतें. त्यामुळें आपला पहिला बेत बदलून ह्या सेना-

पतींना नवीन बेत आंखणें भाग पडलें. तेव्हां त्यांनीं विचार करून असें ठरविलें कीं, ह्या लोकांसह खान सदरेकडे गेला म्हणजे इशारतीचे बार झाल्यावर आपण जनीचें टेंब चढून जाऊन त्याची पिछाडी मारावी; व त्याच वेळेला त्याचें पारच्या फौजेशीं असलेलें दळणवळण तोडून तिकडून मदत न पोंहचेल असें करावें.

बेतांत बदल

ह्या प्रमाणें ते बेत ठरवीत आहेत नाहींत तों च टेहळ्यांनीं दुसरी बातमी आणली कीं, ते १५०० लोक खानानें जनीचें टेंब व महारवाड्याचें टेंक ह्यांच्या मधील दरींत ठेविले. ह्या अकल्पिक बदलाचें कारण काय असावें हें प्रथम ह्या सेनापतींच्या लक्ष्यांत आलें नाहीं. परंतु थोडया वेळानें त्यांच्या लक्षांत आलें कीं, खाना बरोबर आपले वकील पंताजीपंत हे आहेत; व त्यांनीं च बहुधां हा फरक घडवून आणला असावा. हा झालेला फरक ह्या मंळडींना अत्यंत फायदेशीर होता. कारण जनीचें टेंब चढून जाऊन १५०० लोकांची पिछाडी मारण्यामध्यें जास्त वेळ लागण्याचा व शत्रूला आपली हालचाल दिसून येण्याचा बरा च संभव होता, तो आतां वाचला. ही मंडळी ज्या लवणांत लपून बसली होती, त्या सर्व लवणांचीं तोंडें हे १५०० लोक जेथें राहिले होते तेथें मिळत होतीं. त्यामुळें लवणांच्या कांठानें व झाडींतून दबत दबत न दिसतां जाऊन, त्यांना सर्व बाजूंनीं घेरून, त्यांच्यावर अचानकपणें छापा घालून, त्यांच्यांतील एक हि माणूस जिवंत सुटणार नाहीं असें करणें सुलभ झालें असतें. लष्करीदृष्ट्या शत्रूच्या लोकांना इतक्या अड-चणीच्या जागीं आणून त्यांचा कोंडमारा करण्यांत पंताजी सारख्या ब्राह्मण मुत्सद्यानें जी चतुराई दाखविली ती पाहून त्याच्या दूर-दृष्टीचें

कौतुक कोणास वाटणार नाहीं? अशा च तऱ्हेचीं माणसें महाराज आपल्या पदरीं ठेवींत. या पुढें जेधे, बांदल वगैरे सरदारांनीं असें ठरविलें कीं आपण पहिला उपक्रम ( initiative ) घेऊन व पहिला तडाखा हाणून वेळ प्रसंग पडल्यास प्रथम या १५०० लोकांची ह्या दरींत च कत्तल उडवावी व मग आपल्यावर सोंपविलेलें काम, म्हणजे कोयना पारच्या फौजेवर हल्ला करावा. याप्रमाणें ठरवून ते सेनापती तोफेच्या आवाजा कडे आपले कान लावून बसले.

## ८. तोफेचे सांकेतिक बार:

वरील प्रमाणें जेधे, सिलीमकर, मोरोपंत वगैरे सेनापती कर्ण्याच्या आवाजा कडे व तोफेच्या बारांकडे लक्ष्य लावून बसले असतां, अर्ध्या तासानें हल्ला करण्याच्या इशारतींचे बार झाले. ते ऐकून जेधे, बांदल वगैरे मंडळींनीं आपल्या जागांतून एकदम बाहेर पडून या १५०० लोकांवर हल्ला केला. ती वेळ सायंकाळची सुमारें पावणेंपांच वाजण्याची होती. त्यापूर्वी भेट होऊन तिकडे खानाचा निकाल लागला होता. या नंतर अंधाराचा मुख्य फायदा महाराजांना घेतां आला. खानाचे लोक ह्या प्रदेशाला नवखे असल्यामुळें व मराठ्यांचा आकस्मिक हल्ला संध्याकाळच्या सुमारास त्यांच्यावर झाल्यामुळें ते गोंधळून गेले आणि त्यांत थोड्या वेळानें अंधार पडल्यामुळें तर त्यांची जास्त च धांदल उडाली. ती जरी शुद्ध पक्षांतील रात्र होती, तरी स्वच्छ चांदणें पडण्याच्या आंत जनींटेंब व कोयनापारची लढाई तास दीड तास चालून बहुतेक संपली होती. शिवाय या ज्या दोन्ही जागीं खानाच्या फौजा होत्या

१. शि. दि. १७०



श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं. १०८२४ ग्रंथानुक्रमांक २१७-११८८
किंमत — पाने १०२

तेथें झाडी किर्र असल्यामुळें चांदण्याचा प्रवेशहि फारच थोडा होत होता व जो कांहीं थोडासा प्रकाश झाडींतून खालीं जमिनीवर पडला असेल, त्यानें मदत होण्या ऐवजीं उलट जास्त गोंधळ झाला असावा. कारण अंधारापेक्षा असल्या अर्धवट प्रकाशानें जंगला मध्यें नवख्या माणसाची जास्त तारंबळ उडते.

**९. तोफांचे बार, संदेश व हुकूमः**

आपल्या ठिकठिकाणच्या सेनापतींना इषारा देण्यासाठीं व हुकुमाची अंमलबजावणी करण्यासाठीं महाराजांनीं तोफांचे बार केले. ही रीत, म्हणजे तोफांचे बार करून हुकूम देण्याची रीत, गेल्या शतकापर्यंत हि युद्धशास्त्रांत उपयोगांत आणीत असत व शास्त्रीय शोधांत भर पडून हल्लीं बिनतारी तारायंत्रासारखीं साधनें उपयोगांत आलीं नसतीं तर अजून हि ही तोफांच्या बाराची पद्धत कायम राहिली असती. इ. स. १८०६ मध्यें जेना येथील युद्धांत नेपोलियननें ह्या च रीतीचा उपयोग केला होता हें मागें सांगितलें च आहे. एकोणिसाव्या शतकांत सुद्धां जर तोफांच्या बारांमुळें हुकूम पाठविले जातात तर महाराजांनीं सतराव्या शतकाच्या काळीं ती रीत अमलांत आणली ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट नव्हे असें कोण म्हणेल? आजकाल उत्तम तोफांचा आवाज ५० ते ६० मैल पर्यंत हि ऐकूं जातो, परंतु आश्चर्य करण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं एखादे वेळीं तोच आवाज ५ ते ६ मैलांवर हि ऐकू जात नाहीं. आवाज ऐकूं जाणें हें त्या वेळच्या वातावरणांतील स्थितीवर अवलंबून असतें. हवा स्वच्छ असेल तर आवाजास कांहीं अडथळा येत नाहीं. परंतु हवेंत धुकें पसरलें असेल, पाऊस पडत असेल अथवा हवा सर्द झाली असेल तर मात्र ह्या आवाजास प्रतिबंध होतो.

**१०. रणक्षेत्रांतील प्रत्येक स्थलाची माहिती:**

ज्या टापूंत युद्ध खेळावयाचें असतें तेथील दरेक स्थळाची पूर्ण माहिती प्रत्येक सेनापतीला असावी लागते. त्या स्थळांना त्या प्रांतांत कोणत्या नांवांनीं ओळखतात हें त्याला ठाऊक असलें पाहिजे. ह्या नियमाला अनुसरून प्रतापगडच्या टापूंत जें हें युद्ध झालें, त्या टापूंतील दऱ्या, खोऱ्या, डोंगर, नद्या, गांवें, घाट यांची माहिती मराठी सेनापतींना होती.

**११. होकायंत्राचा उपयोग** ( use of compass ):

आजकालच्या लढाईंत ती स्वतःच्या देशांत असो किंवा शत्रूच्या देशांत असो, एका जागेवरून दुसऱ्या ठरविलेल्या जागीं सैन्यासह जातां यावें यासाठीं होकायंत्राचा ( magnetic compass ) उपयोग करण्यांत येतो. ज्या जागेवरून आपण हुकूम देतों, तेथून अमुक अंशावर, इतके मैल, इतके यार्ड जा, अशा तऱ्हेचे हुकूम सरसेनापती हा आपल्या हाता खालील सेनापतींना जेव्हां देतो,तेव्हां ते ते सेनापती आपआपल्या फौजा घेऊन त्या त्या ठिकाणीं जाऊन पोंहचतात. नाहीं तर, प्रदेश माहीत नसल्यामुळें कोणीकडच्या कोणीकडे सैन्य जाण्याचा संभव असतो. असें न केल्यास वेळेवर नेमलेल्या ठिकाणीं फौजा न पोहचल्या मुळें युद्धांत अपशय घ्यावें लागतें.

**डोंगरांस नंबर देण्याची दोषास्पद पध्दति.**

जागांचीं व डोंगरांचीं ठिकाणें ( पॉइंट ) बरोबर लक्ष्यांत यावीं म्हणून आजकाल त्या त्या डोंगरांना नंबर दिलेले असतात. जसें डोंगर नंबर १४, ७०, ७५ वगैरे. क्वचित प्रसंगीं डोंगरांना नावेंहि देतात. जसें, किचनेर डोंगर, कोबजी टेकडी, टॉमहिल वगैरे. पण हीं नांवें व नंबर, टेहळ्यांनीं

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) ... सातारा



( patrols ) तेथल्या एखाद्या माणसास विचारलीं तर त्याला तीं माहीत नसल्यामुळें टेहळ्याला पाहिजे असलेली माहिती मिळणें शक्य नसतें. ती जागा जवळ असून हि तिच्या शोधासाठीं तो फार दूर जातो. अशानें वेळेचा फार च व्यय होतो. महाराजांच्या वेळीं ही पद्धत नसून स्थानिक नांवें ठेवण्याची च पद्धत होती व ती फार च उत्तम होती. आज मित्तीला हि तिचा उपयोग उत्तम तऱ्हेनें व फायदेशीर रीतीनें करतां येण्याजोगा आहे. तुम्ही बोचेघोळीच्या घाटांत जा किंवा जनीच्या डोंगरात जा अथवा निसणीच्या डोंगराखालीं बसा, वगैरे जे महाराजांचे हुकूम होते, ते जागांची ओळख पटण्याच्या दृष्टीनें जास्त स्पष्ट व निःसंदिग्ध असे होते. एखादे वेळेस या जागांचीं नांवें सिलीमकर अथवा कान्होजी या सेनापतींना माहीत नव्हतीं, असें गृहीत धरलें तरी, जवळपासच्या शेतकरी, धनगर, गुराखी, वगैरे लोकांकडून ती माहिती त्यांस ताबडतोब काढतां आली असती व त्यामुळें भलत्या च जागीं भटकत फिरण्याचा व कालक्षेप करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला नसता.

**१२. अंतर व गोळागोळीची लढाई** ( distance & fire tactics ):

प्रथमतः एक गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे ती ही कीं, जोंपर्यंत आपणांत व शत्रूंत अंतर आहे तोंपर्यंतच गोळागोळीची लढाई ( fire tactics ) खेळण्याला संधी असते. तसें च जेव्हां अंतर तुटतें किंवा कमी होतें, तेव्हां तलवारीच्या खणाखणीची म्हणजे हातघाईची लढाई ( shock tactics ) उपयोगांत आणली जाते. प्रसंगानुसार गोळागोळीला हातघाईचें स्वरूप व हातघाईला गोळागोळीचें स्वरूप स्वतःला फायदा मिळविण्यासाठीं द्यावें लागतें.

**१३. लढाई सुरू झाली:**

खानानें असें ठरविलें होतें कीं, महाराजांस दगा करून नंतर लढाईस सुरवात करावयाची. महाराज जिवंत अथवा जखमी सांपडते म्हणजे खानाच्या फौजेची हिंमत फार च वाढली असती व मग खानाच्या दुय्यम सेनापतींनीं त्याचा हुकूम अमलांत आणण्यासाठीं ठरविल्याप्रमाणें महाराजांच्या फौजेवर एकदम हल्ला केला असता. नेहमींप्रमाणें म्हणजे दोन्हीं सैन्यांतील मुख्य सेनापतींच्या हुकुमान्वयें त्यांची बाजू राखण्यासाठीं व त्यांचा सूड घेण्यासाठीं, त्यांच्या हाताखालील दुय्यम सेनापती, ठरलेल्या बेताप्रमाणें आपण होऊन च युद्धास सुरुवात करतात. मात्र, येथें खानानें अप्रत्यक्षपणें युद्धाला निराळें स्वरूप आणलें होतें. कसें तें वर सांगितलें च आहे. परंतु खानाच्या डावांचा परिणाम त्याच्या ध्यानीं मनीं नसतां भलता च घडून आल्यामुळें महाराजांस त्याचा फायदा घेतां आला.

**१४. महाराज बचावाचें धोरण सोडून चढाई करतात:**

खानानें दिलेल्या दग्यामुळें द्वंद्वयुद्धांत तो पडला, ही बातमी आतां खानाच्या सैन्यास समजून तें आपल्यावर खात्रीनें चाल करून येईल, हें महाराजांस स्पष्ट दिसत होतें. म्हणून त्यांनीं ह्या प्रसंगीं युद्धशास्त्रांतील डावाप्रमाणें पहिला तडाखा हाणण्याचें कार्य आपल्याकडे हिसकून घेऊन, बचावाचें धोरण सोडून चढाई साधण्याकरितां खानाचें सैन्य आपल्यावर चाल करून येण्यापूर्वीं च, आपण च आपल्या फौजा हालवून त्याच्यावर मात केली व डावपेची चढाईचें धोरण अमलांत आणलें. इतके दिवस खानावर चढाई करून न जातां बचावाचें धोरण पत्करून आपलें संरक्षण करणाऱ्या महाराजांनीं योग्य वेळ येतां च, ह्या

पुढें बचावामुळें आपलें नुकसान होऊं नये म्हणून डावपेंची बचाव ( passive defence ) सोडून वाटेल तें करून बचाव ( active defence ) करण्याचें अंमलांत आणलें. ह्या वरून पुढें मागें आपल्याला वाटेल तें करून बचावाची (active defence) चढाई करावी लागेल हें ओळखून ठेवून, महाराजांनीं त्या दृष्टीनें पूर्वींपासून आपली तयारी करून ठेविली असावी हें स्पष्ट दिसतें. ह्या तत्त्वास अनुसरून च आपल्या सर्व फौजांची महाराजांनीं मांडणी कसकशी करून ठेविली होती हें मागें च सांगण्यांत आलें आहे.

**१५. भरारी, सुटसुटीतपणा व अचानकपणा:**

ह्या प्रसंगीं ह्या सर्व ठिकठिकाणच्या पसरलेल्या फौजांचें एकसमयावच्छेदें करून खानाच्या सैन्यावर हल्ले होणें अवश्य होतें. कारण त्या मुळें च बचावाची चढाई ( active defence ) उत्तम प्रकारें साधून व खानाचा बेत उध्वस्त करून भरारी, सुटसुटीतपणा व अचानकपणें हल्ला करणें यांचा योग्य असा उपयोग करता आला असता. खानाच्या सैन्याला महाराजांच्या सैन्याची हालचाल व जागा माहीत असती, तर खानाच्या फौजेवर अचानकपणें हल्ला करणें महाराजांच्या फौजेला शक्य नव्हतें. कारण, खानाच्या फौजेला जर ही माहिती मिळाली असती तर तिनें आपल्या संरक्षणाचा बंदोबस्त पूर्वीं च केला असता. जनी टेंबाच्या खालीं ठेवलेल्या १५०० लोकांना व कोयनापार येथील खानाच्या तळावरील फौजेला माघार घेण्यास किंवा लढाईस तोंड देण्यास अथवा घोड्यांवर सामान घालून पळून जाण्यास थोडी सुद्धां फुरसत महाराजांच्या सैन्यानें दिली नाहीं. ह्या वरून, बांदल, जेधे, अण्णाजीपंत, मोरोपंत, सिलीमकर वगैरे लोकांच्या तुकडया किती तांतडीनें जनीच्या

व कोयनापारच्या सैन्यावर हि एकसमयावच्छेदेंकरून अचानकपणें व तावडतोब तुटून पडल्या असतील ह्याची सहज कल्पना येईल. वरील सर्व गोष्टी घडवून आणण्यासाठीं युद्धशास्त्रांतील हालचालींत वेळ ही बाब किती महत्वाची आहे हें लक्ष्यांत येतें.

**१६. वेळेचें महत्त्वः**

सैन्य किंवा उपराळा पोहोंचण्यांत, हालचालीची ( tactical ) जागा काबीज करण्यांत, शत्रूची व आपली बातमी मिळविण्यांत, दारूगोळ्यांचा व इतर पुरवठा येण्यांत जर एक मिनिटाचा सुद्धां उशीर झाला तरी सुद्धां मोठमोठया युद्धांत अपयश आलें आहे. वॉटर्लूच्या लढाईंत नेपोलियनच्या एका सेनापतीला फौजेचा उपराळा घेऊन येण्यास जर १५ मिनिटें उशीर झाला नसता तर त्या लढाईचा निकाल निराळा च लागला असता. पानिपतच्या युद्धांत जर पुण्याहून भाऊसाहेबांना वेळेवर मदत पोहोंचली असती तर दख्खनची सव्वालाख बांगडी फुटण्याचा प्रसंग कदाचित् टळला असता. आसईच्या लढाईंत शिंद्यांचे सेनापती गोपाळराव भाऊ जर वेळेवर आले असते, तर शिंदे व भोंसले यांची फौज आसईहून सकाळीं रवाना होती ना व इंग्रजांना मराठयांच्या नुसत्या पिच्छाडीच्या तुकडी बरोबर लढाई खेळून जय मिळविल्याची फुशारकी मिरवितां येती ना. ह्यांवरून अनुकूल व योग्य वेळेवर अत्यंत जलदीनें फौजांच्या हालचाली घडवून आणणें हें अतिशय महत्वाचें काम असतें आणि तें फार च थोड्या सेनापतींना साधतें.

**१७. खानाच्या फौजेची नवीन हालचालः**

खानाच्या फौजांच्या विभागणींत त्या वेळीं कांहीं मोठासा फरक झाला नव्हता. त्याची जी पूर्वींची विभागणी होती ती च आतां हि होती;

फक्त भेटीच्या वेळीं त्यानें आपल्याबरोबर जे १५०० पायदळ घेतलें होतें तेवढी च काय ती नवीन हालचाल झाली होती. हे लोक धड भेटीच्या जागीं नाहींत व धड पार येथें हि नाहींत असें मध्यें च ठेविले गेले होते. परंतु खानाच्या या नवीन हालचालीचा बंदोबस्त महाराजांच्या छबिन्याच्या क्षेत्रांतील चौक्यांच्या सेनापतींनीं ( फक्त त्यांचा उद्देश समजून घेऊन ) आपण होऊन केला, यावरून त्या सेनापतींची पहिला उपक्रम साधण्याची हातोटी किती योग्य व प्रासंगिक होती याची कल्पना येईल.

**१८. मराठी दुय्यम सेनापतींचा प्रथमोपक्रम** ( initiative ):

खानानें जे १५०० लोक जनीच्या पायथ्याशीं ठेविले होते त्यांची बातमी टेहळ्या कडून कदाचित महाराजांना समजली असेल, परंतु ती समजल्यावर पुढें कोणती तजवीज करावयाची, ह्या बद्दलचे हुकूम तितक्याच्या तितक्यांत त्यांनीं आपल्या ठिकठिकाणच्या सेनापतींना पाठविले असतील किंवा नाहीं ह्याची शंका वाटते. कारण खानानें बरोबरचे लोक तेथें ठेवल्याची बातमी महाराजांना लागणें व त्यानंतर त्यांनीं खानाच्या भेटीस जाऊन त्याचा निकाल लागणें व तोफ होणें यांत कमींत कमी अर्धा तास गेला असावा. तेव्हां या अर्ध्या तासामध्यें महाराजांचे (१५०० लोकांबद्दल काय करावयाचें याबद्दलचे) हुकूम त्यांच्या ठिकठिकाणच्या सेनापतींना मिळणें जरा कठीण दिसतें. कारण ते सेनापती बिकट जागेंत छपून बसले होते व तेथें खानाच्या लोकांना न दिसतां अर्ध्या तासाच्या आंत जाऊन निरोप सांगणें हें थोडें मुष्किलीचें होतें. परंतु, महाराजांचा हुकूम पोहचो अगर न पोंहचो त्या सेनापतींनीं आपल्या स्वतःच्या मनांनीं ठरवून पहिल्या च उपक्रमानें व

तडाखा हाणण्यानें महाराजांच्या मनांत जे हुकूम द्यावयाचे होते त्या प्रमाणें कार्य घडवून आणलें; त्यावरून त्यांच्या या प्रथमोपक्रम घेण्याच्या बुद्धीची जितकी तारीफ करावी तितकी थोडी च आहे.

**१९. प्रथमोपक्रमाचें महत्त्वः**

युद्धांत ज्या वेळीं सरसेनापती जागेवर व वेळेवर आलेल्या खास परिस्थितीला तोंड देण्यासाठीं तेथें हजर नसतो, त्या वेळीं त्या त्या जागीं हजर असलेल्या मुख्य किंवा दुय्यम सेनापतीनें सरसेनापतीचे पहिले ठरलेले बेत व त्यानें आखलेली कार्यदिशा ( line ) पूर्णपणें लक्ष्यांत घेऊन परिस्थित्यनुरूप आपला प्रथमोपक्रम कामांत आणावा लागतो; नाहीं तर सरसेनापतीच्या आज्ञेची वाट पाहात बसल्यास आलेली वेळ व संधि निघून जाते व मग मागून नुसतें च हात चोळीत बसावें लागतें. अशा प्रसंगीं केलेल्या एखाद्या चुकीनें हि युद्धांत अपयश येऊं शकतें. म्हणून अशा वेळीं सरसेनापतीच्या हुकुमाची वाट न पाहतां त्याचें सर्वसाधारण धोरण व उद्दिष्ट लक्षांत आणून आलेला प्रसंग आपल्या प्रथमोपक्रमानें निभावून नेला पाहिजे. यासाठीं नेते व सेनापती यांनीं वेळ न गमावितां प्रथमोपक्रमानें काम करणें हा एक महत्वाचा मुख्य गुण आपल्या अंगीं आणावा लागतो.

**२०. जनी टेंबची लढाईः**

भेट होऊन खानाचा निकाल लागल्या बरोबर कर्ण्याचे आवाज व लगें च युद्ध सुरू करण्याच्या संकेताचे तोफांचे बार झाले. त्या सरशीं जेधे, बांदल, अण्णाजीपंत, पासलकर वगैरे जी मंडळी जनीचे टेंब व त्याच्या आसपासच्या लवणांत योग्य जागा (position ) घेऊन बसली होती, त्यांनीं नुकत्या च ठरविलेल्या आपल्या बेता प्रमाणें कोयना पार

वर न जातां प्रथम या नव्या फौजेवर म्हणजे १५०० लोकांवर एकदम सपाट्या सरशीं हल्ला केला. खान हा महाराजांना पकडून आपल्याला गडावर हल्ला करण्या साठीं हुकूम देईल येवढी च कल्पना फार तर या १५०० लोकांची आतां पर्यंत होती, व त्या साठीं ते वाट बघत बसले होते. त्यांनीं जो तोफांचा व कर्ण्याचा आवाज ऐकला, त्याचा अर्थ त्यांनीं हे बार खानाच्या भेटीच्या सन्मानार्थ झाले असावेत असा घेतला.

शत्रूचा आपल्यावर याप्रमाणें अचानकपणें जोराचा हल्ला होईल ही खानाच्या लोकांना मुळीं च कल्पना नव्हती. तशी असती तर लढाईच्या व आपल्या बचावाच्या दृष्टीनें हि योग्य स्थळाचा ( position ) व आडोशा ( cover ) चा फायदा घेऊन त्यांनीं आपल्या लोकांची विभागणी कांहीं ना कांहीं तरी केली असती. निदान, प्रसंग पडल्यास अघाडीची लढाऊ रांग ( fighting line ) तरी कोठें व कशी असावी हें ठरवून ठेवलें असतें. एका च ठिकाणीं घोळका करून, वेडेवांकडे व अव्यवस्थित असें ते राहिले नसते. निदानीला शत्रू अचानकपणें चालून येऊं नये म्हणून त्याची बातमी काढण्यास टेहळे तरी त्यांनीं ठेविले असते. पण ह्यांपैकीं कोणती हि गोष्ट त्यांनीं केली नाहीं. त्यांचें सारें लक्ष्य खान आपल्यास गडाकडे केव्हां बोलावितो इकडे लागलें असल्यामुळें समोर गडाच्या रस्त्याकडे त्यांची दृष्टी होती. ही गोष्ट जेधे वगैरे लोकांना ठाऊक होती. त्यामुळें त्या

बातमीचा अभाव
want of reconnaissance

१. शि. दि. १६९.

१४

सर्वांनीं या १५०० लोकांच्या पुढून अथवा मागून न जातां उजव्या व डाव्या बगलांवर च एकदम हल्ला केला. हा हल्ला अगदीं अचानकपणें झाल्यामुळें खानाचे लोक घाबरून व घोटाळून गेले. आणि त्यांच्या ध्यानीं मनीं नसलेली ही गोष्ट घडल्यामुळें त्यांची हिंमत खचली व ते अवसानखस्त ( demoralized ) झाले.

**२१. हिरोजी फर्जंद व त्याची तुकडी:**

गडाच्या दरवाज्याजवळ भेटीच्या मंडपाच्या मागें एका दरडी मध्यें हिरोजी फर्जंदाला निवडक ४० माणसांसह बसविण्यांत आलें होतें[1]. त्याला तेथून मंडपांतील लोकांच्या सर्व हालचाली दिसत होत्या. मात्र मंडपांतील लोकांना तो दिसत नव्हता. स्वतः न उमगतां शत्रूस पाहणें ( to see without being seen ) या तत्त्वाचा उत्तम उपयोग येथें केलेला दिसतो. त्याच प्रमाणें दृष्टीआड व गोळी न लागेल ( cover from sight and cover from bullet ) अशी ही हिरोजीची जागा होती. मंडपांत आणीबाणीच्या प्रसंगीं गरज लागल्यास अथवा महाराजांचें कांहीं वेडेंवाकडें होत आहे असें दिसल्यास, त्यानें त्या गर्तेंतून बाहेर येऊन ताबडतोब मदत करावी, अथवा गरज नसल्यास पुढें जाऊन जेधे वगैरे लोकांना कोयना-पारवरच्या लढाईंत मदत करावी हें काम त्याला सोंपविलें होतें. त्याच्या जागेपासून मांडवा पर्यंत येण्यास दोन तीन मिनिटांपेक्षां जास्त वेळ लागत नव्हता. तसें च ह्या ठिकाणापासून जनीच्या डोंगराचा पायथा अर्ध्या मैलाच्या

हिरोजीची डावपेचां लायक जागा
tactical position

१. म. सा. छो. ब. २३.

आंत च होता. म्हणजे तेथें जाण्यास फार तर ७।८ मिनिटें लागलीं असतीं. अशा सर्व गोष्टींचा विचार करून उत्तम अडोसा असलेल्या जागीं हिरोजीची तुकडी महाराजांनीं ठेविली होती.

हिरोजीची नेमलेली कामगिरी

खानाचा निकाल झाल्यावर हिरोजीचें जें पहिलें ठरलेलें काम म्हणजे, महाराजांचें रक्षण करून खाना कडून त्यांस दगा न होऊं देणें तें आतां उरलें नव्हतें. गडावर पुरेशी शिबंदी गडाच्या संरक्षणार्थ होती आणि तोफा हि खानाच्या मार्गावर रोखून ठेविल्या होत्या च. यासाठीं महाराजांच्या बरोबर त्यांच्या रक्षणासाठीं ( escort ) म्हणून परत गडावर जाण्याची हिरोजीस आवश्यकता नव्हती. त्यामुळें त्याचें जें दुसरें काम, जेधे वगैरे लोकांना उपराळा करावयाचें तें करण्यासाठीं तिकडे जाण्याची महाराजांनीं त्यांस आतां आज्ञा केली. जनी टेंबा खालीं खानाचे १५०० लोक बसले आहेत, ही बातमी खान मेल्यावर पंताजीनें महाराजांस सांगितली होती. त्यामुळें प्रथम त्यांच्या वर च जाण्यास व त्याबरोबर च जेधे, बांदल वगैरे लोकांना ती बातमी कळवून त्यांच्या मदतीस जाण्यास महाराजांनीं हिरोजीस सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें आपल्या ४० लोकांसह जनीच्या डोंगराकडे चाल करून १५०० लोकांच्या तोंडावर हल्ला केला. व जेधे, पासलकर, बांदल वगैरेंना वेळेवर उपराळा ( reinforcement ) केला.

वेळेवर मिळणाऱ्या उपराळ्याचें महत्त्व

ऐन वेळीं सैन्यास मदत मिळाल्यानें लढाईच्या निकालांत महत्त्वाचा फरक होण्याचा संभव असतो. ज्याप्रमाणें दोन्ही पारडीं समान असलेल्या तराजूंत एकादा दाणा टाकिला असतां हि तीं समान पारडीं खालीं

वर होतात, त्या प्रमाणें युद्धांत वेळेवर ताज्या दमाच्या सैन्याची मदत जर कोठून हि मिळाली, तर तो पक्ष त्या वेळीं लढाईत खात्रीनें यशस्वी होतो. पुष्कळ युद्धांत ऐन वेळीं एकादी टोळी येऊन मिळाल्यानें त्या पक्षास यश आलें आहे व प्रतिपक्षाचा पराभव झाला आहे. त्यामुळें हिरोजीच्या ताज्या दमाच्या टोळीचा उपयोग जेधे वगैरेंच्या सैन्याला अतिशय महत्त्वाचा झाला असला पाहिजे व लढाईचें तोंड फिरवून टाकण्यास सुद्धां मदत झाली असली पाहिजे, हें उघड आहे.

**२२. छबिन्याचें क्षेत्र व त्याच्या चौक्यांमधील अंतर:**

मागें सांगितल्या प्रमाणें प्रतापगडच्या जंगलांत जागजागीं महाराजांचे चौक्या पहारे होते. गडाच्या ईशान्येला जावळी आहे. जावळी व गड यांमध्यें ईशान्येला धावणीचें टेंब आहे. त्याच्या दक्षिणेला जनीचें टेंब आहे. ह्या दोन टेंबांच्या मध्यें खाडयाचें खोंड आहे. खोंड म्हणजे डोंगराच्या दोन रांगा मधील खोल अशी उताराची जागा. ह्या खोंडांत पूर्वीं सांगितल्या प्रमाणें महाराजांचें सैन्य पसरलेलें होतें. कोयनापार येथील खानाचें सैन्य गडावर चालून आल्यास या जनीच्या दरींत च त्याला अडविण्याचें काम या टेहळणीच्या सैन्याकडे सोपविलेलें होतें. त्यामुळें या दरीच्या आसपास १०।१२ मिनिटांच्या रस्त्यावर दरीच्या दोन्ही बगलांस हें मराठी सैन्य छपून बसलें होतें. यासाठीं हे लोक खानाच्या १५०० लोकांच्या इतक्या जवळ होते कीं, लढाई सुरू करण्याचे इषाऱ्याच्या कर्ण्याचे आवाजा बरोबर तोफेच्या आवाजाची वाट हि न पाहतां ते त्यांच्यावर एका सपाट्यानिशीं जाऊन पडले.

खानाच्या लोकांस आपल्या जागेवरून गडाच्या दरवाज्यापर्यंत जाण्यास अडथळा झाला नसता, तर २०-२२ मिनिटें लागलीं असतीं,

तसें च भेटीच्या जागेपासून खालीं या लोकांच्या तळाकडे येण्यास साधारण ७-८ मिनिटें लागतील. डोंगर उतरण्यास चढण्यापेक्षां फार च थोडा वेळ लागतो हें सर्वांस माहित च आहे. तोफ झाल्यापासून ७-८ मिनिटांच्या आंत म्हणजे खानाच्या लोकांना सदरेंतील बातमी कळण्यापूर्वी च त्यांच्यावर हल्ला करणें जरूर होतें. म्हणून कर्णा वाजल्या बरोबर जेधे, अण्णाजीपंत, पासलकर, वगैरे लोक एकदम त्यांच्यावर तुटून पडले. महाराजांच्या या सैन्यांत बंदुकवाले किती व कोठें होते आणि ते लांब राहून गोळ्या मारीत होते कीं काय, तसें च त्यांचा फायदा घेऊन भालेवाले व तलवारवाले ह्यांनीं हल्ले केले कीं काय, आणि ते एकदम केले कीं एकामागून एक केले, हा सर्व तपशील समजला तर महाराजांच्या डांवपेचांची जास्त माहिती मिळेल.

**२३. फौजांच्या टेहळणीच्या जागेची निवड व कामः**

खाड्याच्या खोंडा प्रमाणें दरवाज्याच्या खोंडांत व नाळींत सिलमकराची तुकडी होती. ही दाट झाडींतील नाळीची जागा १५०० लोकांच्या डाव्या हाताला म्हणजे पेठपारच्या वायव्येला आहे. ही तुकडी १५०० लोकां पासून १०-१२ मिनिटांत त्यांच्यावर तुटून पडतां येईल इतक्या अंतरावर बसलेली होती. १५०० लोक गडावर चालून जाण्यास सरासरी अर्ध्या तासाचा अवधी लागला असता. कारण मंडपा पासून खालीं बातमी देण्यांत येण्याकरितां ८।१० मिनिटें व खालच्या लोकांस वर जाण्यास २०।२२ मिनिटें मिळून खान मेल्यावर अर्ध्या तासानें हे लोक गडावर पोंहोचले असते. ह्या साठीं १०-१२ मिनिटांच्या आंत जेणें करून खिंडींत हल्ला करतां येईल अशा ठिकाणीं या टेहळणीच्या फौजेची लावणी केली असली पाहिजे.

वास्तविक ह्या च १५०० लोकां करितां कांहीं महाराजांच्या ह्या टेहळणीच्या तुकड्या त्या त्या जागीं ठेवल्या गेल्या नव्हत्या. त्यांचा मूळचा उद्देश असा होता कीं, खानाची कोयना पारची फौज जर गडावर चालून आली, तर तिला गडापर्यंत पोहचूं न देतां मध्यें याच खोऱ्यांत कसून अडथळा करावयाचा आणि गडाचें संरक्षण करावयाचें. इतक्यांत मोरोपंत हि आपल्या फौजांनिशीं चालून येणार होते. ते येईपर्यंत, खानाच्या फौजेस अडविणें एवढें च मुख्यतः या टेहळणीच्या फौजेचें काम होतें. म्हणजे असल्या फौजांचें जें मुख्य पहिलें काम टेहळणी करून बातमी देणें ( reconnaissance ) व दुसरें, वेळ पडल्यास अडथळा करणें ( resistance ) हें असतें, तें करण्याचा मूळ उद्देश असतां खानानें हे १५०० लोक मध्यें च आपल्या बरोबर आणले व त्यामुळें महाराजांच्या ठराविक बेतामध्यें थोडासा अडथळा उत्पन्न झाला. परंतु पंताजी गोपिनाथानें आपल्या तुकड्या लपवून बसलेल्या जागेपासून दहा बारा मिनिटांच्या आंत, त्यांना ह्यांच्यावर हल्ला करतां येईल अशा ठिकाणीं व जेथें खानाच्या फौजेला अडवावयाचें होतें, त्या च दऱ्यांत ठेवण्याची युक्ती योजली. त्यामुळें पूर्वीच्या ठरलेल्या बेतामध्यें कांहीं एक घोटाळा उत्पन्न झाला नाहीं. महाराजांच्या ठिकठिकाणीं पसरलेल्या ह्या टेहळणीच्या तुकड्या पंधराशें लोकांवर एका च वेळीं न येतां २।४ मिनिटांच्या फरकानें आगें मागें आल्या असतील. त्यामुळें मराठ्यांच्या आणखी किती टोळ्या आपल्यावर चालून येणार ह्याची धास्ती पडून पंधराशें लोकांची हिंमत खचली असली पाहिजे व ते अवसानखस्त झाले असले

टेहळणी फौजांचें काम

पाहिजेत. नकाशा नंबर सात मध्यें दिलेल्या ठिकाणां (positions) वरून म्हणजे त्यांच्या अंतरांवरून हें सर्व सहज दिसून येईल.

**२४. मराठ्यांचे यशस्वी प्रतिहल्ले** (successful counter attacks of Silimkar):

मराठ्यांची अगदीं पहिली टोळी ( बांदल यांची ) प्रथमतः या पंधराशें लोकांवर तुटून पडली, तेव्हां ते गोंधळून गेले. परंतु थोडेसें भानावर येऊन ते तिला बिलगले. म्हणजे त्यांचें सर्वांचें लक्ष्य मराठ्यांच्या त्या च टोळीनें वेधलें असलें पाहिजे. त्या हातघाईच्या लढाईंत मराठ्यांना हटविण्यासाठीं मुसुलमानांची अघाडी त्या च दिशेला असणें साहजिक आहे. इतक्यांत सर्जेराव, अण्णाजी रंगनाथ, जेधे वगैरे पहिल्या बांदलाच्या तुकडीला मदत करण्यास त्या च दिशेनें एका मागून एक तावडतोब पाठपुराव्याचा हल्ला ( subsequent attack ) करण्यासाठीं आले. त्यामुळें तर मुसुलमानांचें लक्ष्य सर्वस्वीं तिकडें च लागलें.

**सिलीमकराचा प्रतिहल्ला**

इतक्यांत त्यांच्या डाव्या बाजूकडून व विरुद्ध दिशेकडून सिलीमकर आपल्या सर्व जमावानिशीं येऊन त्यानें त्यांच्या वर अचानक हल्ला केला. त्या वेळीं त्या हल्ल्यानें तर त्यांचें धाबें च दणाणलें असेल व अत्यंत नुकसान झालें असेल. पहिला हल्ला झाल्यानंतर केलेल्या दुसऱ्या हल्ल्याला युद्धशास्त्रांत प्रतिहल्ला ( counter attack ) असें नांव आहे.

**प्रतिहल्ल्यांचें महत्त्व**

ह्या हल्ल्यांत जय मिळाल्यास शत्रूचें अत्यंत नुकसान होतें. तसें नुकसान इतर हल्ल्यांनीं होत नाहीं. कारण, त्यांना रोखण्या साठीं शत्रुपक्ष तयार असतो. ज्या वेळीं आपल्यांत व शत्रूंत समोरा समोर लढाई होत आहे

त्या च वेळीं अचानकपणें येऊन शत्रूच्या बगलेवर अथवा पिछाडीवर एकदम हल्ला केला, तर या हल्लयाला व हालचालीला तोंड देण्यास शत्रू गैरसावध असल्यामुळें त्याचें फार च नुकसान होतें. कारण त्याला असा हल्ला येणार याची कल्पना किंवा खबर नसते. ह्यामुळें तसा हल्ला आल्यावर त्याला तोंड द्यावयास अथवा त्याला परतविण्यास तो गैरसावध असल्यामुळें व त्याला बातमी नसल्यामुळें तो असमर्थ असतो. कारण तो दुसरीकडे आपल्या समोर असलेल्या प्रतिपक्षाच्या सर्व ओळभर ( line ) टक्कर देत च असतो व त्या च ठिकाणीं त्याची सारी फौज गुंतलेली असते. अशा स्थितींत नव्या व ताज्या दमाची शत्रूची टोळी जर अचानकपणें त्याच्या बगलेवर अथवा पिछाडीवर येऊन पडली तर तिला अटकाव करण्याला त्याच्या जवळ निराळी फौज त्या ठिकाणीं व त्या वेळीं नसल्यामुळें आणि तो गोंधळून गेल्यामुळें शत्रूच्या हल्लयास तोंड देण्यास त्याला फक्त एक च मार्ग उरतो. तो म्हणजे समोरील शत्रूशीं लढण्यास गुंतलेल्या आपल्या फौजेपैकीं कांहीं लोक काढून त्यांच्याकडून या आलेल्या लोकांस तोंड देणें.

प्रसंगावधान ( presence of mind )

परंतु अशा वेळीं इतकें प्रसंगावधान राखणें फार च कठीण काम आहे व तें एखाद्या च लोकोत्तर सेनापतीला साधतें. दिसावयाला ही गोष्ट साधी दिसते; पण मनुष्य स्वभावाची पारख असेल त्यास अशा वेळीं माणूस गोंधळून कसा जातो हें उलगडून सांगण्यापेक्षां अनुभवानें च जास्त कळेल. ह्याचा परिणाम असा होतो कीं, शत्रूच्या तोंडावर असलेलें सैन्य कमी होतें व त्या मुळें शत्रूला निःशंकपणें हल्ला चढविण्यास फावतें, व त्याची हिंमत हि वाढते. शिवाय,

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा



आपल्यावर जो हा शत्रूचा नवीन प्रतिहल्ला ( counter attack ) चालून आलेला असतो त्याला अडविण्यासाठीं (आपल्या ओळीं मधील) जी फौज काढून पाठवावी लागते, ती पाठविण्यास बरा च वेळ लागल्यामुळें एक प्रकारें शत्रूच्या या प्रतिहल्ल्यास जय मिळण्याची संधी मिळते. एकंदरींत प्रतिहल्ले करण्यानें शत्रूचें फार नुकसान होतें; अशा च प्रमाणें परिस्थित्यनुरूप या हल्ल्याच्या प्रकारांत वेळप्रसंगीं प्रतिहल्ला (counter attack ), फेरप्रतिहल्ला ( recounter attack ), जागा पकडून बसण्याचा हल्ला ( holding attack, ) हूल दाखविणें ( feint attack,) मुख्य हल्ला ( main attack ), स्थानिक हल्ला ( local attack ), तोंडावरील हल्ला( frontal attack ), बगली हल्ला ( flank attack ) व पिछाडीवरील हल्ला( rear attack ) इत्यादि निरनिराळ्या प्रकारांचे हल्ले करावे लागतात. प्रतिहल्ला जर अचानकपणें व योग्य ठिकाणीं करतां आला तर मग प्रतिपक्षी अगदीं भांबावून जाऊन प्रतिहल्ला करणारास खात्रीनें जय मिळवितां येतो.

**सिलिमकराचा यशस्वी प्रतिहल्ला**

प्रथम बांदल, जेधे वगैरे लोकांच्या एकामागून एक चालून येण्यानें च खानाचे लोक गोंधळून व घाबरून गेले होते. त्यांस कांहीं एक चाहूल व सुगावा न लागतां डाव्या बाजूनें सिलीमकराचा हल्ला एकदम सपाट्या सरशी आला. हा हल्ला बगलेकडून व पिछाडी कडून आल्यामुळें खानाचे लोक जास्ती च घाबरून गेले व त्यांची हिंमत सपशेल खचली. ह्या वरून सिलीमकराचा प्रतिहल्ला फार च योग्य वेळेवर झाला व त्यामुळें तो पूर्णपणें यशस्वी झाला असें म्हणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं.

इतक्यांत खानाच्या या मुसुलमानी सैन्यावर आणखी एक धोंड येऊन पडली. ती म्हणजे मोरोपंतांच्या हातांखालील एका लहान तुकडीनें त्यांच्यावर सपाट्यानें येऊन अचानक प्रतिहल्ला केला. मोरोपंताकडे कोयना पारचें सैन्य गडावर चालून आल्यास त्याला या जनीच्या खोऱ्यांत च अडवून त्याचा फन्ना पाडण्याचें काम होतें च. इतक्यांत त्यांना त्यांच्या टेहळ्यांनीं सांगितलें कीं, खानानें हजार बाराशें लोक खिंडींत ठेविले आहेत. टेहेळयांना सैन्य गणनेची अगदीं तंतोतंत बातमी लागणें कठीण असतें. कारण शत्रूचें सैन्य पहाण्याचें काम ते दुरून करीत असतात; त्यामुळें त्यांच्या गणनेंत थोडासा फरक पडण्याचा संभव असतो. पंतांना टेहेळ्याची बातमी समजल्यावर त्यांनीं आपल्या पूर्वीच्या महाराजांनीं ठरवून दिलेल्या बेतांत थोडासा फरक करून प्रथमोपक्रम करण्याचें ठरविलें. तोफ झाल्यावर त्यांनीं आपल्या फौजेंतून एक लहान टोळी एकदम खोऱ्याकडे पाठविली व ते कोयना पारकडे निघून गेले. या एका टोळीनें खानाच्या डाव्या बगलेवर च प्रतिहल्ला चढवून सिलीमकरास मदत केली. मोरोपंताची ताजी टोळी आलेली पाहून मराठ्यांची एकंदर हिंमत जास्त च वाढली व मुसुलमान तर अगदीं च गाय बनून गेले. त्यांच्यांत लढण्याचें मुळीं च त्राण उरलें नाहीं. या प्रमाणें मोरोपंताचा प्रतिहल्ला हि अत्यंत यशस्वी झाला.

**मोरोपंताच्या एका लहान टोळीचा प्रतिहल्ला व प्रथमोपक्रम**

एकंदरीत बांदल, जेधे, सिलीमकर, मोरोपंत वगैरे मराठ्यांच्या तेथील जितक्या टोळ्या होत्या त्यांनीं केलेले हल्ले हे थोड्या बहुत प्रमाणांत अचानक प्रतिहल्ले झाले, व त्या मुळें खानाच्या लोकांची दैना

**हिरोजीचा प्रतिहल्ला**

व दुर्दशा झाली. उजवी व डावीकडे मराठ्यांना तोंड देत असतां च गडावरून आणखी एक हिरोजीची ताज्या दमाची टोळी सपाट्या सरशी येऊन खानाच्या फौजेच्या बगलेवर पडली. त्यामुळें तर खानाच्या फौजेंतील लोकांचा धीर च खचला व होश बिघडून गेला. तसें च मराठे हे आणखी किती व कोणच्या बाजूंनीं चालून येतील ह्याची जास्त धास्ती पडल्यामुळें, ते गोंधळून च गेले व अशा स्थितींत त्यांच्यावर सेनापतीची हुकमत न राहिल्यामुळें ते जीव बचावण्या करितां सैरावैरा पळूं लागले. अशा प्रकारच्या पळूं लागलेल्या फौजेला केव्हां च नाहींसें करतां येतें. त्याप्रमाणें ह्या गोंधळाचा फायदा घेऊन मराठ्यांनीं मुसुलमानांना सर्व बाजूंनीं घेरून घेऊन त्यांचा सपशेल फन्ना उडविला. खानाचे लोक वरील प्रमाणें सर्व बाजूंनीं घेरले गेल्यामुळें त्यांना ही बातमी कोयना-पारच्या फौजेस कळवून तिच्या कडून मदत मिळविण्यास जासूद वगैरे पाठवितां आला च नाहीं. शेवटीं शेवटीं तर कोणी कडून मदत येण्याचा संभव नाहीं अशी खात्री झाल्यामुळें कत्तलींतून बोटांवर मोजण्या इतके, खानाचे लोक वांचले ते मराठ्यांनीं कैद केले.

**२५. जनीच्या लढाईतील मराठी फौजेची संख्याः**

ह्या जनीच्या लढाईत सर्व तुकडया मिळून महाराजांची एकंदर फौज ७०० पासून फारफार तर ८०० असावी. ह्या शिवाय जर जास्त फौज ठेवली असतो तर तिची गुणगुण खानाच्या फौजेस लागण्याचा संभव होता. कारण खानाची फौज वांई येथें तीन दिवस पडून होती[१].

---

१. शि. दि. १६६, शे. ब. २८; शि. भा. अ. २० श्लो. ५०—६५; अ. २१. श्लो. १—९.

**२६. खाना कडील गोळागोळीः**

खानाच्या लोकांजवळ इतर हत्यारां बरोबर थोडया बंदुका हि होत्या. परंतु त्यांचा फारसा उपयोग करण्याची पाळी च त्यांना आली नाहीं. कारण मराठ्यांच्या जवळ बंदुका फारशा नसल्यामुळें त्यांनीं जी लढाईला सुरवात केली ती एकदम व प्रथम पासून तरवारीच्या च हातघाईची व खणाखणीची ( shock action ) केली. त्यामुळें मुसुलमानांना बंदुकांनीं लढाई करण्यास फारसा वेळ च मिळाला नाहीं.

जखमी व मेलेल्या मुसलमानांच्या २००।३०० बंदुका, तरवारी, भाले वगैरे हत्यारें मराठयांना ह्या चकमकींत मिळालीं; ती गोळा करण्यासाठीं एक लहानशी टोळी तेथें ठेऊन बाकीची फौज कोयनापारकडे निघून गेली. कारण तिला आतां कोयना–पारच्या खानाच्या फौजेवर हल्ला करणाऱ्या मोरोपंतांस मदत करावयाची होती.

**२७. लढाईला लागलेला साधारण काळः**

जनी टेंबची लढाई साधारण एक तासांत आटपली असावी. सुमारें पावणे पांचच्या सुमारास खानाची व महाराजांची भेट होऊन खलास झाली हें मागें सांगितलें च आहे. त्यापुढें तोफेचे आवाज झाल्या नंतर ह्या लढाईस सुरुवात होऊन तासा भरांत लढाई आटोपली असावी. ही लढाई हातघाईची असल्यामुळें इतक्या लौकर संपणें साहजिक आहे. गोळागोळीची असती तर ह्या पेक्षां तिला ज्यास्त वेळ लागला असता.

आजकाल सुद्धां हातघाईची लढाई ही थोड्या च वेळांत खलास होते. हल्लीं ह्या लढाईत संगीन, भाला, तलवार, कुकरी हीं हत्यारें उपयोगांत आणतात. सांप्रतच्या गोळागोळीच्या लढाईमध्यें पुढील प्रकार आहेत. लांब-माऱ्यांची (long range fire), झपाट्याची (rapid fire)

व एककेंद्रक ( concentric fire) वगैरे. हीं साधनें पूर्वीं नसल्या मुळें हातघाईच्या लढाईला च त्या वेळीं विशेष महत्त्व होतें. हातघाईच्या लढाई मध्यें गोळागोळीच्या लढाईनें जर ज्यास्त मदत होत असेल तर ती हि सुरू करून तिचा फायदा घेतां येतो व ह्यामुळें लढाई हि फार वेळ टिकत नाहीं.

**२८. हातघाईच्या लढाईचा काळः**

हातघाईची लढाई बहुतेक एकएकट्याची च असते. म्हणजे चाल ( advance ) करून पुढें आलेल्या सर्व रांगेला अथवा रांगांना जवळ जवळ एका माणसाच्या युद्धाइतका च वेळ लागतो. मग त्या रांगेमध्यें २०० माणसें असोत किंवा २००० असोत. कारण कमी अधिक प्रमाणांत जवळ जवळ तितकीं च माणसें हि शत्रूच्या पुढील चाल करून आलेल्या रांगेमध्यें असतात. कदाचित शत्रूकडे कमीजास्त लोक असल्यास त्या प्रमाणांत त्यांच्याशीं लढण्यांत आपणांस थोडा कमी-जास्त वेळ लागेल येवढें च. शत्रूची संख्या कमी अथवा जास्त असली तरी मुख्यतः त्याची चिकाटी, जोम, हिंमत, दिलेरी, बहादरी, मरण्या-विषयीं बेफिकीरपणा, या गुणांच्या कमीजास्तपणावर ह्या हातघाईच्या लढाईचा परिणाम व अखेरी अवलंबून असते.

**ही लढाई लौकर आटोपण्याचीं कारणें**

शत्रूचें सैन्य दिलेर नसेल, त्याचा सेनापती जोरदार नसेल, शेवट पर्यंत लढण्याची त्याच्या अंगांत तडफ नसेल, त्याची फौज मरणाला भिणारी असेल, ती मुरब्बी ( seasoned troop ) नसेल, भाडोत्री फौज असेल व तिची हिंमत भारी दर्जाची नसेल तर ही हातघाईची लढाई जास्त वेळ टिकत नाहीं. कारण शत्रूचे लोक बेहिमती असल्यानें त्यांचा धीर

सुटून ते थोड्या च वेळांत माघार घेऊन पळ काढतात (जशी हातघाईची लढाई या कारणांनीं फार वेळ टिकत नाहीं, तशी गोळागोळीची हि लढाई या च कारणांनीं फार वेळ चालत नाहीं, कारण अशा वेळीं शत्रूचे लोक विस्कळीत होऊन सैरावैरा पळत सुटतात).

**२९. जनींची लढाई लौकर संपल्याचीं कारणें:**

ह्या जनीच्या लढाईंत बांदल व सिलिमकर वगैरे मराठयांच्या तुकडयांच्या जोराच्या हल्ल्यानें खानाच्या लोकांनीं माघार घेतली व पळ काढला. मुसुलमान सरदारांनीं लवकर पळ काढण्यानें व ते बेहिंमत होण्यानें ही लढाई जास्त वेळ चालली नाहीं. जर ह्यांत गोळागोळीची जोड असती तर मात्र ही लढाई आणखी थोडा वेळ चालण्यास कांहीं हरकत नव्हती. खानाच्या लोकांत मराठ्यांच्या शिपायां इतकी, चिकाटी, काटकपणा, दिलेरी व बहादुरी नसल्यामुळें ही लढाई कमी वेळ चालणें संभवनीय आहे.

मंबाजी भोंसले, खोपडे, जगताप, काटे वगैरे मराठे देशमुखांची जरी खानाकडे फौज होती, तरी महाराजांच्या फौजेइतकी हिंमत या फौजेची नव्हती. कारण, एक तर जावळीच्या मोऱ्यांची झालेली स्थिति, त्यांच्या डोळ्यांपुढें असल्यानें आपली हि स्थिती अशी च होईल कीं काय या भितीनें त्यांची हि हिंमत कमी होणें स्वाभाविक होतें; तशांत महाराजांची फौज स्वराज्य–स्वधर्मासाठींच्या झगडयांत मदत करीत होती, त्यामुळें अशा पवित्र कार्यास आपण मदत करीत आहों या भावनेनें तिची हिंमत वाढली होती. उलटपक्षीं खानाकडील मराठी सरदार महाराजांच्या विरुध्द फितूरी असल्यामुळें त्यांचें मन च त्यांना खात होतें म्हणून त्यांची हिंमत कमी झाली होती.

**२०. एकगठ्ठा, पिच्छेहाट, पाठलाग, व मदत** ( rally, retreat, pursuit & reinforcement ):

अशा हातघाईच्या लढाईनंतर जी फौज विखरलेली असते, तिला लढाईच्या दंगलीमुळें आपल्या पसरलेल्या निरनिराळ्या तुकड्यांचा पत्ता नसतो व अशा तऱ्हेनें आंवाक्याच्या बाहेर गेलेल्या त्या फौजेवर सेनापतीचा ताबा राहात नाहीं. त्यामुळें हल्ल्याच्या शेवटच्या वेळीं जोरदार परिणाम होत नाहीं. म्हणून सर्व विस्कटलेल्या अलग अलग तुकड्यांना पुनः व्यवस्थितपणानें एकगठ्ठा सांवरून व काबूमध्यें आणून शत्रूवर पुनरपि जोराचा हल्ला करावा लागतो व तो च जास्त परिणामकारक होतो. यासाठीं वाताहत झालेल्या शिपायांना नंतर सांवरून एकगठ्ठा करण्याची ( rally ) अवश्यकता असते. पण खानाच्या सैन्याला ही संधी मिळाली नाहीं.

**२१. खानाचें सैन्य एकगठ्ठा झालें नाहीं:**

मराठ्यांच्या ह्या निरानिराळ्या जमावांच्या टोळधाडी पुढें खानाचे लोक एकगठ्ठा झाले असतील व त्यांनीं पुन्हां दुसरा जोराचा हल्ला मराठ्यांवर केला असेल ही गोष्ट संभवत नाहीं. कारण ही लढाई जितक्या थोड्या वेळांत झाली, ती वेळ लक्ष्यांत घेतां पुनः एकगठ्ठा करून दुसरा हला चढविणें शक्य दिसत नाहीं. त्यामुळें खानाच्या राहिलेल्या लोकांची मराठ्यांनीं सररहा कत्तल चालविली व त्यामुळें खानाच्या उरलेल्या लोकांनीं कच खाऊन वाट फुटेल तिकडे माघार घेतली असावी व पळ काढला असावा.[1]

---

१. शि. भा. अ. २२ श्लो. ४०–४५.

मुसेखानाच्या एकगठ्याचा प्रयत्न

तथापि खानाचा एक सेनापति मुसेखान पठाण यानें आपल्या पळणाऱ्या, धीर सुटून हताश बनलेल्या शिपायांना हिंमत आणण्यासाठीं व त्यांनीं सावरून एकगठ्ठा व्हावें एवढ्याकरितां आवेशयुक्त व धीर येणारें असें भाषण केलें[1]! पण त्याचा उपयोग सैन्य एकगठ्ठा होण्यांत झाला नाहीं.

या सैन्याच्या पिछाडीचा रस्ता

खानाच्या वर सांगितलेल्या पंधराशे लोकांपैकीं सर्व च लोक कांहीं मेले नाहींत, किंवा जखमी झाले नाहींत. वास्तविक पाहतां हे पंधराशे लोक खानाच्या वांई येथील मोठ्या फौजेंतून आले होते. तेव्हां पराजय झाल्यावर त्या मुख्य फौजेच्या तळाकडे जाणें आजकालच्या सुधारलेल्या युद्धपद्धतीच्या व तिच्या नियमाच्या दृष्टीनें जरूर होतें. म्हणजे वांई ते प्रतापगड, हा जो त्यांचा संदेश मार्ग होता, त्या च रस्त्यानें त्यांना परत मागें फिरणें अवश्य होतें.

तसें च ही लढाई डोंगरी असल्यामुळें निरनिराळ्या दिशांनीं निरनिराळ्या जागीं, अलग अलग रस्त्यांनीं, अलग अलग तुकड्यांनीं जाणें; त्यांना इष्ट व शक्य होतें.[2] म्हणजे त्यांना आपला पाठलाग करणाऱ्या मराठ्यांपासून सुरक्षित रहातां आलें असतें. नाहीं तर मराठ्यांनीं केलेल्या पाठलागांत च त्यांचा फार नाश झाला असता. म्हणून निरनिराळ्या दिशांनीं खानाचे लोक गेले असतील[3]. अशा वेळीं, शेवटीं,

१. शि. भा. अ. २२. श्लो. १२–२०. २. शि. भा. अ. २३. श्लो. ४५–४६. ३. कित्ता. अ. २३. श्लो. २३.

सर्वांनीं जाऊन कोठें तरी एकत्रित होण्याच्या जागेची जरूरी असते. खानाच्या पळणाऱ्या लोकांची अशी जागा जास्तींत जास्ती वांई ही च असूं शकेल. अशा तऱ्हेनें खानाचे हे लोक परत कोयनापार व वांई येथें असलेल्या त्यांच्या फौजेंत जाऊन पोंहचले किंवा नाहीं हें समजणें कठीण आहे. परंतु, खानाच्या डावपेंचाच्या दृष्टीनें तें समजणें अवश्य आहे एवढें मात्र खरें.

**३२. खानानें केलेला अपुरा विचारः**

एकंदरींत खानाच्या ह्या पंधराशें लोकांची पिछेहाट अगदीं बेशिस्त व बिनलगामी झाली असें म्हणणें भाग पडतें.[१] जर ही च पिछेहाट शिस्तवार व सुसंघटित ( orderly or brilliant retreat ) झाली असती, तर ह्या राहिल्या साहिल्या लोकांची मदत ज्या फौजेंत ते सामील झाले असते, तिला झाली असती. सारांश ह्या युद्धाच्या पूर्वीच्या ठरलेल्या बेतांत प्रसंगोपात जर अशा तऱ्हेची परिस्थिती उद्भवली तर त्या संबंधींचा कांहीं आगाऊ विचार खानानें करून ठेवलेला दिसून येत नाहीं. खानाचा बेत चढाईचा असून हि ह्या कारणामुळें त्याच्या ह्या बेतांमध्यें एक प्रकारची कमतरता राहिली असें म्हणणें भाग पडतें. कारण जर त्यानें तशी कांहीं अगाऊ काळजी घेतली असती तर अशा प्रकारची ढोबळ चूक त्याच्या बेतांमध्यें व तो अमलांत आणण्यांत राहणें संभवनीय नव्हतें.

**३३. पाठलाग कां शक्य नव्हता ?**

अशा तऱ्हेनें शत्रूच्या फौजांचा मोड झाल्यावर पूर्ण यश पदरांत पाडून घेण्यासाठीं पळ काढलेल्या शत्रूचा पाठलाग करणें युद्धशास्त्र-

---

१. शि. भा. अ. २३. श्लो. २३.

१५

दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचें असतें. परंतु त्याला हि कांहीं मर्यादा आहे. ती म्हणजे जर शत्रू आजकाल प्रमाणें आपल्या संदेशाच्या मार्गानें च माघार घेत सुटला असेल तर च त्याचा पाठलाग करणें शक्य असतें. जर तो वाटेल त्या दिशांकडे लहान लहान टोळ्यांनीं किंवा एकटा जाऊं लागला तर त्याचा पाठलाग करणें मुष्किलीचें असतें. कारण मग पाठलाग करतांना पाठलाग करणाऱ्यांना हि शत्रूच्या प्रमाणें आपल्या सैन्याच्या लहान लहान टोळ्या करणें भाग पडतें, म्हणजे पाठलाग करणाऱ्याची फौज विखरून ती कह्या बाहेर रहाते; आणि त्यामुळें पाठलागापासून शत्रूवर घालण्यांत येणाऱ्या दाबाचा ( weight ) व जरबेचा ( pressure ) फायदा कमी मिळतो. महाराजांच्या टोळ्या सर्व पायदळाच्या च होत्या. तसें च लढाईचा प्रदेश हि डोंगराळ व जंगली असा होता, म्हणून मराठ्यांना फारसा पाठलाग करतां आला नाहीं. शिवाय एका च मर्यादित दिशेनें ( limited direction ) व ठरावीक तुकड्यांनीं खानाच्या सैन्याची पिछेहाट झाली नाहीं. तर ज्याला जिकडे वाट फुटेल तिकडे तो प्राण वाचविण्यासाठीं पळाला. त्यामुळें जरी मराठ्यांनीं त्यांचा पाठलाग सुरूं केला असला तरी पुढें त्यांना तो सोडून देणें भाग पडलें असावें.

**३४. लढाईंत पाठलागाची आवश्यकताः**

कोणत्या हि युद्धांत एका पक्षानें प्रतिपक्षावर हल्ला चढवून त्यास माघार घ्यावयास लाविली किंवा त्यानें पळ काढला म्हणजे त्याचा पाठलाग करणें ही गोष्ट ओघास च येते. पाठलाग केल्यानें पळत्या फौजेची हिंमत व जोम सहाजिक च कमी होतो. त्या पूर्वी च तो थोडा फार कमी झालेला असतो हि आणि म्हणून ते लोक माघार

घेऊन पळत असतात. उलट चढाईवाल्या पक्षानें त्यांना माघार घेण्यास भाग पाडण्यासारखी लढाई केलेली असल्यामुळें त्याचा जोम व हिंमत सहाजिक च वाढलेली असते. अशा वेळीं पळणाऱ्या फौजांना पूर्णपणें बेहिम्मत व अवसानखस्त ( demoralized ) करण्या करितां व त्याचा पूर्ण पराभव करण्यासाठीं पाठलाग करणें अत्यंत अवश्य असतें. लढाईत एका रणक्षेत्रांतील यशाच्या किंवा पराभवाचा बरा किंवा वाईट परिणाम, दुसऱ्या रणक्षेत्रांतील त्या पक्षाच्या सैनिकांच्या हिंमतीवर ती वाढविण्यास अथवा कमी करण्यास बऱ्या च अंशीं कारणीभूत होत असतो. पाठलाग करणें हें मुख्यतः घोडदळाचें काम असतें. कारण, त्याच्या जवळ घोडे असल्यामुळें पायदळापेक्षां त्याला शत्रूचा पाठलाग करण्याला सोपें पडतें.

### ३५. पायउतार मराठी फौजः

**महाराजांच्या पायदळाचा हातघाईचा हल्ला ( charge )**

बांदल, सिलीमकर वगैरे ज्या टोळ्या पंधराशें लोकांवर तुटून पडल्या, त्या घोडदळाच्या असाव्यात असें वाटत नाहीं.[1] कारण जनीच्या आसपासची जागा घोडदळापेक्षां पायदळास च छपून राहण्यासारखी होती; घोडदळाला आपल्या हालचाली करण्यास ती योग्य नव्हती व घोड्यांना लपून छपून बसण्याला हि ती सोईस्कर नव्हती. तसें च घोडयांवरून लढावयासाठीं जेवढें मोकळें मैदान लागतें तेवढें हि तेथें नव्हतें. कारण त्या ठिकाणीं मोठमोठया धोंडी, लहान लहान गोटे, खाच खळगे, खळया, लवण, मोठमोठीं झाडें वगैरे अस-

---

१. शि. भा. अ. २२. श्लो. ३२

त्यानें ती जागा अडचणीची होती[1]. शिवाय खानाच्या लोकांपासून ही जागा जवळ असल्यामुळें कदाचित् घोडयांच्या खिंकाळण्यानें हि यांचें अस्तित्व खानाच्या लोकांस समजलें असतें आणि त्यामुळें ते सावध झाले असते व मराठयांनीं ज्या वेळेस हल्ला केला त्या वेळीं ते गैरसावध न रहातां तोंड देण्यास सज्ज झाले असते. म्हणूनच ही जागा घोडदळाला योग्य नसून पायदळास च योग्य होती. परंतु मराठयांच्या सैन्यानें पूर्णपणें अचानक हल्ला केल्यामुळें वरील सर्व विचारांना जागा च उरत नाहीं. ह्यावरून जनीच्या आसपास मराठयांचें घोडदळ नसून पायदळ असावें हें सिद्ध होतें[2]. म्हणून त्यांना खानाच्या सैन्याचा पाठलाग पूर्णपणें करतां आला नाहीं.

**३६. खानाच्या सेनापतींमधील पहिला तडाखा हाणण्याची उणीवः**

कोयनापार येथें असलेली खानाची फौज जनी पासून जवळ जवळ दोन अडीच मैलांवर असतां तिच्याकडून जनीच्या फौजेला मुळीं च मदत मिळाली नाहीं. मराठयांची पहिली टोळी ज्या वेळीं या पंधराशें लोकांवर तुटून पडली असेल तेव्हां झालेल्या चकमकींत तरवारीच्या युद्धाबरोबर थोडया फार बंदुका हि उडाल्या असतील. त्या बंदुकांचा आवाज कोयनापार येथें ऐकूं जाणें मोठेंसें कठीण नव्हतें. तसें असून हि कोयनापारची फौज मदतीला धांवून आली नाहीं, यावरून असें दिसतें कीं, कोयनापार येथील फौजांच्या सेनापतींच्या अंगीं प्रथमोपक्रम ( initiative ) करण्याचें सामर्थ्य नव्हतें. तसें च स्वतःच्या बुद्धीनें आयत्या वेळीं काम करण्याची पात्रता व धूर्तता हि त्यांच्यांत

---

१. शि. भा. अ. २३. श्लो. २९  २. शि. भा. अ. २२. श्लो. ३२.

नव्हती; ते नुसते सांगकाम्ये होते. हे बंदुकांचे बार कशाचे झाले असावेत ! त्यामुळें आपली फौज धोक्यांत सांपडली काय ? अशी शंका मनांत येऊन त्या धोक्यास तोंड देण्यासाठीं अथवा आपल्या फौजेच्या रक्षणासाठीं ह्या सेनापतींनीं थोडी फार तरी फौज पंधराशें लोकांच्या मदतीला पाठविणें जरूर होतें.

**३७. संदेश-मार्गाचा अभावः**

जनी व कोयनापार या दोन ठिकाणीं असलेल्या फौजांमध्यें उत्तम प्रकारचें दळणवळण नव्हतें व संदेशाचा हि अभाव होता. तसें नसतें तर जनी येथें लढाई सुरू झाल्या बरोबर त्याची बातमी कोयनापार येथें पोंहचली असती व तेथून जनी येथें मदत आली असती. परंतु, ती ज्या अर्थीं आली नाहीं त्या अर्थीं या दोहोंमध्यें चांगलें दळणवळण नव्हतें हें स्पष्ट दिसतें. उंच पहाडावरील दृश्य संदेशाचा उपयोग आसपासच्या दाट झाडीमुळें कदाचित् झाला नसेल, परंतु कर्णा, तोफा, बंदुका, यांचा आवाज कोयनापार येथें ऐकूं गेला तरी तेथील सेनापतींचें लक्ष्य त्याकडे नव्हतें. ह्यावरून एकंदरींत ह्या दोन्ही फौजांत असावें तितकें दळणवळण नव्हतें असें म्हणणें भाग पडतें.

**३८. जासूद, हलकाराः**

जनीहून एकादा हलकारा किंवा एकादा शिपाई कोयनापार येथें पाठविला असता तरी हि काम झालें असतें व वेळेवर मदत आली असती. हलकाऱ्यास कोयनापार येथें जाण्यास अशा वेळीं १५।२० मिनिटें व तेथून फौज येण्यास ४० मिनिटें ह्या प्रमाणें जनीची लढाई सुरू झाल्या पासून १ तासांत कोयनापार येथील फौज जनी येथें यावयास कांहीं हरकत नव्हती; परंतु,ज्या अर्थीं असें घडलें नाहीं, त्या

अर्थी कोयनापार येथील फौजेच्या सेनापतींमध्यें पहिला उपक्रम करण्याची धमक नव्हती व या दोन्ही फौजांमध्यें दळणवळण हि नव्हतें. ह्यावरून, दुसरें असें ठरतें कीं, मराठ्यांनीं पंधराशें लोकांवर एकदम व जोराचा हल्ला केला आणि त्यामुळें गोंधळून जाऊन व अवसानखस्त होऊन त्या लोकांना कोयनापार येथें मदत मागण्याची सवड च मिळाली नाहीं व जीव बचावण्यासाठीं ते सैरावैरा पळून गेले.

**३९. वेळेवर पोंहोचलेल्या उपराळ्याच्या परिणामः**

वेळेवर जर मदत आली असती तर कदाचित् ह्या पंधराशें लोकांना हिंमत येऊन त्यांनीं मराठ्यांना सावरून व एकगठ्ठा होऊन तोंड दिलें असतें व कदाचित् त्यांना नामोहरम हि केलें असतें. कोयनापार येथील मुसुलमानांची ताज्या दमाची आलेली टोळी पाहून, कदाचित् थकलेल्या मराठ्यांच्या टोळ्यांचा जोम हि कमी झाला असता. म्हणजे वेळेवर मदत येण्याच्या या एका च गोष्टीमुळें लढाईनें उलट खाल्ली असती. परंतु तसें न झाल्यामुळें महाराजांना या लढाईंत सहज यश मिळालें.

**दळणवळण व उपराळ्याची आवश्यकता**

वेळेवर मदत न आल्यामुळें व त्या वेळीं स्वतःच्या सैन्यांत उत्तम दळणवळण नसल्यानें पुष्कळ लढायांत मोठमोठ्या नामांकित सेनापतींना व मुरब्बी (seasoned) फौजांना पदरीं अपयश घ्यावें लागलें आहे. ह्या करितां युद्धांत हमखास विजयश्री मिळविण्यासाठीं ज्या कित्येक महत्त्वाच्या बाबी असतात, त्यां पैकीं च अकुंठित दळणवळण, वेळेवर फौजेची मदत (उपराळा) मिळविणें वगैरे बाबी आहेत. हालचाली (tactics) व डांवपेंच (strategy) ह्या लढाईच्या दोन्हीं अंगांमध्यें या दोन बाबींचें विशेष महत्त्व आहे.

**४०. पहिला जय तोच शेवटचा जय** ( initial success a step towards final success ):

प्रथमतः पहिल्या सलामींत च ज्या पक्षाला यश येतें, त्याची हिंमत वाढून पुढील युद्धांत वाटेल तेथें त्याला यश येण्याचा जास्त संभव असतो, कारण प्रतिपक्षी हा पहिल्या झटापटींतील अपयशानें साशंकित व बेहिम्मत झालेला असतो व त्यामुळें त्याचा फायदा पहिल्या पक्षास आपोआप च मिळतो. ही गोष्ट प्रतिपक्षास अपयश येण्यास बऱ्याच अंशीं कारणीभूत होते. ह्या युद्धांत ह्या पहिल्या झटापटींतील यशामुळें महाराजांना अखेरीचें यश मिळवितां आलें व या पहिल्या झटापटींतील यशाचा फायदा त्यांनीं एकदम घेऊन आपले पुढील डाव तितके जास्त जोरदार चढाईचे, अचानकपणाचे व सुटसुटीतपणाचे केले.

**४१. मेलेल्यांची व जखम्यांची संख्याः**

ह्या लढाईंत साधारणपणें खानाचे चारपांचशें लोक मेले, सात आठशें लोक जखमी झाले व बाकींच्या लोकांपैकीं कांहीं शरण आले व राहिलेले सैरावैरा पळून गेले. जनीच्या जंगलांतील मराठयांच्या या छबिन्यांतील चौक्या पहाऱ्यांच्या तुकड्या टेहळणीच्या असल्यामुळें त्यांचें काम टेहळणीचें, प्रतिहल्ले व अटक ( resistance ) करण्याचें होतें. त्यासाठीं त्यांना मुसुलमानांशीं जोरानें लढून अडथळा करणें व त्यांना गडावर जाऊं न देणें भाग होतें. म्हणून ह्या वेळीं प्राणाची पर्वा न करतां आपल्यावर सोंपविलेलें काम तडीस नेण्यासाठीं त्यांनीं जोरानें लढून शत्रूचा सपशेल नाश केला. लढाईमध्यें मृतांपेक्षां जखम्यांची संख्या किती तरी जास्त असते, म्हणून त्याप्रमाणें या दोहोंची संख्या वर अनुमानानें दर्शविली आहे.

**४२. कैदी व रणांगणावर मिळालेलें सामान** (prisoners of war and capture):

या लढाईंत खानाच्या सैन्यांत जे लोक पडले व जखमी झाले त्यांचीं रणांगणांत पडलेलीं हत्यारें व इतर सर्व सामान हें मराठी फौजेच्या एका टोळीनें व्यवस्थितपणानें जमा करून आपल्या कोशागारांत पाठविलें. खानाचे जे लोक साधारण जखमी झालेले होते व गोंधळून गेले होते त्यांना मराठ्यांनीं युद्धकैदी म्हणून धरून नेलें व पुढें, एकंदर युद्धकैद्यांमध्यें यांना ठेवून महाराजांपुढें उभे करण्यांत आलें; त्याचा खुलासा शेवटीं देण्यांत येईल.

---

## प्रकरण ७ वें

### १. कोयनापारची लढाई:

खानानें वांईहून गडाकडे निघतांना दहा बारा हजार फौज, तोफखाना, पायदळ, जेजाला, बाणांचे उंट वगैरे घेतल्याचें मागें सांगितलें च आहे. महाराजांना पकडावयाचें म्हणून आपल्याकडून होईल तितका बंदोबस्त करावा, ह्या हेतूनें त्यानें ही जी फौज घेतली होती ती अत्यंत निवडक लोकांची होती. त्यांत पायदळ व घोडदळ होतें च. शिवाय, त्या अडचणीच्या रस्त्यांतून नेतां येणाऱ्या अशा तोफा हि त्यानें बरोबर घेतल्या होत्या.[१] खानाच्या फौजेंत बरेचसे हत्ती होते असा उल्लेख आढळतो.[२] त्यांतील कांहीं हत्ती स्वारीकरितां व निशाणाकरितां सोडल्यास बाकींच्या हत्तींचा उपयोग साधारण मोठ्या तोफा ओढण्याकडे झाला असावा असें वाटतें. अशा तोफांची संख्या मात्र थोडी असावी असें प्रदेशाच्या एकंदर स्वरूपावरून दिसतें. ह्या फौजेचा मुक्काम कोयनापार येथें तीन दिवस होता.[३] तिचा तळ कोयनेच्या पश्चिम बाजूस ह्मणजे तिला पाठीशीं घालून दक्षिणेस घोणासूर डोंगरापासून उत्तरेस जावळी पर्यंत पसरला होता, कारण नदीच्या दोन्हीं बाजूस खुली जागा अशी नव्हती. तरी पण, नदीच्या मागें व पुढें अशा दोन्ही ठिकाणीं खानाचें

खानाच्या बरोबरचें सैन्य.

१. शे. ब. २८. २. कित्ता; स. १९; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २, ७३. ३. शे. ब. २८.

सैन्य उतरलें होतें. त्यांत झुंजारराव घाटगे, घोरपडे, खंडूजी खोपडे, जगदळे, खानाचा मुलगा फाजलखान हे सेनापती होते व अफझल खान हा सरसेनापती होता. त्याचा डेरा जावळी जवळील उंच पठारावर होता. ह्या एकंदर फौजेपैकीं खानानें भेटीस जातांना आपल्या बरोबर फक्त पंधराशें लोक नेले होते. बाकीची फौज व तोफखाना येथें च राहिला होता. त्या फौजे कडे पुढीलप्रमाणें काम नेमून देण्यांत आलें असावें.

**कोयनापारच्या सैन्याचें काम**

भेटीच्या वेळेस खानानें दगा करून महाराजांस पकडावयाचें आणि नंतर त्याच्या बरोबर असलेल्या पंधराशें लोकांनीं महाराजांच्या संरक्षणार्थ जो लवाजमा येईल त्याच्यावर एकदम चाल करून त्यांना ठार करावयाचें आणि गड रोखून धरावयाचा व खानासह महाराजांस बरोबर घेऊन कोयनापार येथें यावयाचें. ह्या झटापटींत गडावरून जोराचा अडथळा आला, तर कोयनापारच्या फौजेपैकीं काहींनीं गडाकडे जाऊन आपल्या लोकांस मदत करावयाची व बाकीच्या फौजेनें खान व महाराज यांस वांई येथें सुरक्षित पोहोंचवावयाचें व त्या च प्रसंगीं आपली पिछाडी हि सांभाळावयाची.

**दुममारीची फौज :**

खानाच्या सैन्याची दुमदारीची फौज वांईहून कोयनेकाठीं येईपर्यंत व तेथें आल्यावर हि तिची पिछाडी किंवा दुमदारी संभाळण्याचें ( rear guard ) काम घोरपडे याजकडे होतें.

---

१. स्थानिक माहिती व प्रत्यक्ष पहाणी. २ जे. क. शि. च. प्र. ४४.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा



याप्रमाणें या फौजेची अघाडी ( van-guard ) फौज खंडोजी खोपड्याकडे होती. या फौजेंत त्या प्रांताचे व " रानचे हवेदार " असलेल्या मावळ्यांची संख्या ५ हजार होती. त्यांच्या मागें सैन्यसमुदाय असून त्याच्या मागें बुणगें होते.[1]

अघाडीची फौज ( van-guard )

**२. मोरोपंत पिंगळे यांची कामगिरी:**

गडाच्या नैऋत्येस पार घाट आहे. त्या ठिकाणीं पायदळाचे मुख्य सेनापति मोरोपंत पिंगळे यांच्या हाताखालीं तीनचार हजार पायदळ ठेविलें होतें. त्यांत शामराजपंत व त्रिंबक भास्कर हे सेनापती व मोरोपंत हे मुख्य सेनापती होते. तसें च इतरत्र इंगळे, कंक, ढोर, धुमाळ, गायकवाड वगैरे सरदार आपापल्या तुकड्यांनिशीं होते.[2] मोरोपंतांचें मुख्य काम, कोयनापारच्या फौजेला गडावर चालून न जाऊं देतां मध्यें अडथळा करून तिचा नाश करावयाचा हें होतें. कांहीं बखरींतून व कागदपत्रांतून मोरोपंतांच्या हाताखालीं एकंदर १२ हजार फौज असल्याचें वर्णन येतें; पण ती सर्व येथें असणें शक्य नाहीं. या पैकीं कांहीं फौज शिर्दीच्या तोंडावर मागें सांगितल्याप्रमाणें ठेवण्यांत आली होती व कांहीं ठिकठिकाणच्या गडांवर शिबंदी म्हणून ठेवली होती. शिवाय, पंतांनीं जी जागा व्यापिली होती, तेथें १२ हजार सैन्य राहणें शक्य नव्हतें. कारण या पारघाटाच्या आसपास डोंगर, ओढे, खळ्या, दऱ्या, चढउतार आणि झाडी असल्यामुळें जास्तींत जास्त चार हजार पायदळाशिवाय जास्त फौज राहणें अशक्य आहे.

---

१. शि. दि. १६५. २. शे. ब. ३०, ३१.

जनीच्या लढाईंत पाठविलेला उपराळा

मध्यंतरी खानानें पंधराशें लोक आणल्याची व नंतर त्यांना जनीच्या टेंब्राच्या पायथ्याशीं ठेवल्याची बातमी टेहळ्या कडून पंतांना समजली. त्यांना ठाऊक होतें कीं, या पंधराशें लोकांच्या डाव्या उजव्या बाजूस आपली मंडळी बसली आहे च, परंतु वेळवखत आहे, यासाठीं आपल्या कडून सावधगिरी असावी व हयगय होऊं नये, म्हणून पंतांनीं ढमाले, मराळ, ढोर आणि धुमाळ यांस आपल्या बरोबर कोयना पार येथें न नेतां, तोफेचा आवाज ऐकल्या बरोबर उपराळा म्हणून तडक बांदल, जेधे, सिलिमकर वगैरे मंडळींच्या मदतीस जनी टेंबाकडे जाण्याचा हुकूम दिला. वास्तविक महाराजांनीं नेमून दिलेल्या कामामध्यें व हुकमामध्यें ही बाब नव्हती.

पंतांचा प्रथमोपक्रम

पंधराशें लोकांचा हा प्रसंग मध्यें च उपटसुंभा सारखा उद्भवला होता; पण त्या वेळीं वेळ न गमावतां व आपल्या मुख्य बेताला धक्का न लागू देतां पंतांनीं प्रथम उपक्रम करून वरील योजना घडवून आणिली. हा प्रथमोपक्रम (initiative) ऐन वेळीं करण्यापासून कोणते फायदे होतात हें मागें सांगितलें च आहे.

### ३. कोयनापारच्या लढाईस प्रारंभः

गडावरील तोफ सायंकाळीं पावणे पांचाच्या सुमारास झाली. तिचा आवाज ऐकतां च, पंतांनीं सपाट्यांनें सर्व मंडळीसह निघून किल्ल्याची " सोंड " व " धार " ओलांडून, घोडवन येथें ढमाले वगैरे मंडळीस जनीकडे जाण्यास सांगून व तेथें कुमठ्या व पारचा ओढा

---

१. शि. दि. १६९–७०.

उतरून, निवळीच्या खोऱ्यांतून निघून, पूर्वेस तीन मैल असलेल्या कोयनापार येथील खानाच्या तळावर, निरनिराळ्या नागमोडी रस्त्यांनीं जाऊन तिन्ही बाजूंनीं हल्ला केला. तेथें पोहचण्यास पंतांना अर्ध्या तासा पेक्षां जास्त वेळ लागला नाहीं. ह्यावरून पंत ज्या ठिकाणीं होते ती पारघाटाची जागा कोयनापार पासून तीन मैलांच्या आंत बाहेर होती हें ठरतें.

**पारघाट व कोयनापार यांतील अंतर व वेळ**

शिवाय, पुढील कारणें ह्या दोन जागां मधील अंतर इतपत च होतें हें दर्शवितात. ( १ ) जनीची लढाई संपण्यापूर्वीं च अथवा जनीकडून एकादा हलकारा येऊन कोयनापारच्या सैन्यास सावध करण्यापूर्वीं च पंतांनीं हल्ला करून कोयनापारच्या सैन्याला गोंधळांत ( surprise ) टाकलें होतें. ( २ ) पंतांची फौज सर्व पायदळाची होती. घोडदळाला जितक्या लवकर कोयनापारचें अंतर गांठतां आलें असतें तितक्या लवकर पायदळाला गांठतां आलें नसतें. ( ३ ) खानाच्या लोकांनीं गडावर अचानक हल्ला चढविल्यास त्यांस ताबडतोब अडथळा करून हांकून द्यावयाचें अथवा गडाच्या जवळ खान तळ देऊन राहिल्यास त्याच्या अगदीं जवळच्या फौजेवर हल्ला करून ती कापून काढावयाची, ह्या कारणांमुळें कोयनापार येथून होतां होईल तों जवळ, पंतांचें सैन्य ठेवणें अवश्य होतें. पंतांचें हि धोरण हेंच होतें व त्याप्रमाणें संध्याकाळच्या आंत भेटीनंतर तो प्रसंग आला व पंतांच्या पायदळानें आपली कामगिरी बजाविली. खानाशीं बचावाची लढाई करावयाची असा महाराजांचा अडाखा ठरल्यामुळें गडाच्या आसपास म्हणजे ढवळ्या घाटापासून तिवऱ्या घाटापर्यंत जेवढे घाट व खिंडी होत्या

तेवढ्या बचावाच्या आडाख्याच्या दृष्टीनें दाबून ठेवणें महाराजांना अवश्य होतें. पारघाट हा गडाच्या नैऋत्येस थोड्या अंतरावर असल्यामुळें पारघाटाच्या खालीं च वेळेवर गडाकडे मदत पाठविण्याला मोरोपंतांची फौज याच जागीं ( position ) असणें अत्यंत अवश्य होतें.

**४. मोरोपंत व पारघाट:**

आतां पारघाटांत च मोरोपंतांची फौज कां ठेविली त्याचें कारण पुढील प्रमाणें होतें. खानाची फौज कोयना कांठीं होती, ती जर गडावर चालून गेली अथवा खालीं कोंकणांत जाण्यासाठीं घाटावर चालून आली, तर ती गडापर्यंत अथवा घाटापर्यंत येऊन पोहोंचण्यापूर्वीं च मध्यें तिला अडथळा करण्यासाठीं पंतांची फौज घाटाच्या जवळ ठेवणें भाग होतें. गडापासून कोयनाकांठ (खानाचा तळ) जितक्या अंतरावर होता त्या पेक्षां थोड्या अंतरावर गडापासून पारघाट होता. पंतांचा हल्ला झाला त्या वेळेस कोयनापारची फौज साधारणपणें गैरसावध होती. तिला खानानें पुढील प्रमाणें म्हणजे "माझ्याकडून बातमी येतां च माझ्या मदतीसाठीं गडावर या फौजेंतील कांहीं जणांनीं चालून यावें" असा हुकूम देऊन ठेवला होता. परंतु ती बातमी न आल्यानें ही फौज खानाकडे गेली नाहीं.

**पंतांच्या अचानक हल्ल्याचा परिणाम**

त्या प्रमाणें ज्यांच्यावर ही कामगिरी सोंपविली होती ते कोयनापारचे खानाचे सेनापती साधारणपणें तयारीनें होते. परंतु, आपणांवर मराठे एकदम चालून येतील ही गोष्ट त्यांच्या ध्यानींमनीं हि नव्हती. त्यामुळें पंतांच्या या अचानक हल्ल्यास ( surprise ) तोंड देण्यास ते जय्यत तयार नव्हते. शिवाय या वेळीं संध्याकाळची वेळ होती; अशा वेळीं खानाचें सैन्य

पंतांच्या सैन्याकडून चाऱ्हीं बाजूंनीं घेरल्यामुळें त्यांच्या टोळधाडीला बळी पडलें. हें काय आहे, काय नाहीं, याची कल्पना येऊन खानाचें सैन्य सांवरून एकगठ्ठा ( rally ) होऊं पावलें नाहीं. पंतांच्या फौजेवर तें तुटून पडणें शक्य नव्हतें. अर्थात खानाच्या लोकांना गडाकडे जाणें तहकूब करावें लागलें व खानाचें काय झालें हें कळण्यास हि मार्ग राहिला नाहीं. थोड्या च वेळांत अंधार पडल्यामुळें बचावाची लढाई व हालचाली करण्याच्या संधीचा फायदा सुद्धां त्यांना घेतां आला नाहीं. " अंधाराची मदत " ( darkness as an aiding obstacle ) हें तत्त्व मोरोपंतांच्या या ठिकाणीं झालेल्या हालचालींत दिसून येतें; त्याचप्रमाणें अंधाराचा अडथळा ( darkness as a hindering obstacle ) हें तत्त्व खानाच्या सैन्यांत उडालेल्या गोंधळावरून दिसून येतें. त्यामुळें व्यवस्थितपणें व नुकसान न होऊं देतां माघार घेण्याचें हि ( dis-orderly retreat ) खानाच्या सैन्याला साधलें नाहीं. कारण, अशा वेळीं तसें करण्यास आपली फौज आपल्या कह्यांत असावी लागते. पण या वेळीं ही फौज सांवरून, एकगठ्ठा करण्यास सुद्धां फुरसत मिळाली नव्हती मग व्यवस्थित पिछेहाटीची ( orderly retreat ) गोष्ट च कशाला? शिवाय, कांहीं फौजेच्या पाठीशीं कोयना नदी होती[1] व जेथें खानाची फौज उतरली होती तिच्या आसपास नदीला पायउतार नव्हता; वांईकडे जावयाचा जो एक च मार्ग तो हि मराठ्यांनीं रोंखिला होता[2]. पिछेहाटीच्या मार्गांतील नद्यांचे पायउतार रोखल्यानें पळणाऱ्या सैन्याचा तो मार्ग तोडतां येतो. याप्रमाणें ह्या कोयनापारच्या फौजेचा सर्व

१. शि. भा. अ. २२. श्लो. ४०–४४. २. शे. ब. २५.

गोंधळ होऊन मराठ्यांनीं तिची कत्तल उडविली. त्यावरून असें दिसतें कीं, पंतांचा हल्ला जोराचा व अचानक ( surprise ) असा होता.

**५. मोरोपंतांचा अचानक हल्ला व फौजेची हिंमत:**

पंतांची फौज कोयनापारपासून जवळ च असल्यामुळें त्यांचा हा अचानक हल्ला वरील प्रमाणें पूर्ण यशस्वी झाला व त्यामुळें त्यांच्या फौजेची हिंमत व आत्मविश्वास हि एकदम वाढला. शत्रूला चकवून तो तयार होण्यापूर्वीं, त्याच्यावर हल्ला करणें, हें लढाईंतील एक मोठें महत्वाचें अंग आहे. असा अचानक हल्ला करण्यांत शत्रूपेक्षां आपल्या-जवळ कमी फौज असली तरी हरकत नसते. आपण अचानक हल्ला करणार आहोंत या एका च गोष्टीनें या लहानशा फौजेला स्फुरण येऊन तिची हिंमत चढलेली असते. फक्त शत्रूला याचा यत्किंचित सुगावा लागूं देतां कामां नये म्हणजे पुरा अचानक हल्ला ( complete surprise ) झाला पाहिजे, तर च अशा वेळीं कमी फौज असली तर चालते.

**६. स्थानिक राखीव सैन्य** ( local reserve ):

छबिन्याच्या क्षेत्रांतील टेहळणीच्या फौजेपैकीं पहिला अडथळा करणाऱ्या फौजेस (first line of resistance in out-post zone) मदत करणें, आपलें उद्दिष्ट साधण्यासाठीं शत्रूला मागें रेटणें व रण-क्षेत्रांत लागेल त्या ठिकाणीं मदत करणें हें काम स्थानिक राखीव सैन्याचें असतें. त्याप्रमाणें पंतांची फौज ही स्थानिक राखीव ( local reserve) म्हणून ठेवण्यांत आल्यामुळें बांदल, जेधे वगैरे छबिन्याच्या क्षेत्रां-तील टेहळणीच्या फौजां (out-post zone) मधील लोकांना मदत करणें व पार येथील फौजेचा धुव्वा उडवणें, हीं दोन्हीं कामें पंतांकडे सोपविलीं होतीं, तीं त्यांनीं बिनचूक पार पाडलीं ( नकाशा नंबर ८ पहा ).

**७. लहान तोफाः**

पंतांची सर्व फौज पायदळ असल्यामुळें व ती अडचणीच्या जागीं असल्यामुळें, त्यांच्या जवळ मोठ्या तोफा असणें शक्य नव्हतें. कदाचित असल्या तर त्या तट्टांवरील अथवा उंटांवरील घूतरनाला, जेजाला वगैरे असाव्यात.

**८. मोरोपंतांच्या फौजेची विभागणीः**

कोयनापारचा प्रदेश अडचणीचा व डोंगराळ असल्यामुळें आपल्या सर्व पायदळ फौजेनिशीं खानाच्या फौजेवर तुटून पडणें पंतांना शक्य नव्हतें. शिवाय त्यांना अचानक हल्ला (surprise attack) करावयाचा होता. त्याकरितां त्यांनीं आपल्या सर्व पायदळ फौजांच्या निरनिराळ्या तुकड्या[१] करून खानाच्या कोयना-पार येथील फौजेवर तिन्ही बाजूंनीं (directions) म्हणजे दोन्ही बगला व आघाडीवर हल्ला करण्याचें ठरविलें असलें पाहिजे आणि त्याप्रमाणें शेवटीं पंतांचा अचानक हल्ला पूर्णपणें यशस्वी झाला. खानावरील अचानक हल्ल्याला यश येण्यासाठीं तेथील जमिनीचा फायदा घेऊन व वर सांगितल्याप्रमाणें तुकड्यांची रचना (formation) करून त्यांना खानाच्या फौजेवर पाठविणें अवश्य होतें. दोन बगलां पैकीं उजवी कडील बगल जावळी पर्यंत जास्त लांबवर पसरली होती, त्यामुळें पंतांनीं तिच्यावर फारसें सैन्य न पाठवितां खानाच्या डाव्या बगलेवर जास्त सैन्य पाठवून ती बगल दाबली व याप्रमाणें बगलां वरील हल्ले (flank attacks) व प्रतिहल्ले (counter attacks) करून खानाची

१. शि. भा. अ. २२ श्लो. ३१.

फौज नामोहरम केली. पंतांच्या ज्या टोळ्या सरळ खानाच्या फौजेच्या तोंडा ( front ) वर आल्या त्यांना येण्यास थोडा वेळ लागून, त्या सर्वांच्या आधीं आल्या व त्यांनीं लढाईस तोंड लावलें. त्यांच्या नंतर पंतांच्या उजव्या व डावीकडील तुकड्या ( त्यांना जास्त वळणांनीं यावयाचें असल्यामुळें ) मागाहून आल्या व त्यांनीं शत्रूच्या डाव्या बगलेवर प्रतिहल्ले ( counter attacks ) केले. ( नकाशा नंबर ८ पहा. )

**९. खानाच्या तोफाः**

खानाच्या सैन्यानें आपल्या तोफा गडावर हल्ला करण्यासाठीं, पूर्वीच्या ठरलेल्या बेताप्रमाणें त्या गडाच्या दिशेनें रोंखून ठेविल्या असाव्यात. परंतु पंतांचा हल्ला एकदम झाल्यामुळें त्या सर्वच्या सर्व उपयोगांत आणण्यास वेळ मिळाला नसावा. कारण, त्या जागीं अचानक हल्ल्यामुळें ताबडतोब हातघाईच्या लढाईची इतकी गर्दी झाली कीं, शत्रूचे लोक कोणते व आपले लोक कोणते हें ओळखणें कठीण झालें. अशा गडबडींत तोफांची मारगिरी एकसारखी सुरू ठेविली असती तर त्यामुळें कदाचित खानाचे च लोक मरण्याचा संभव होता. शत्रू इतक्या जवळ येऊन भिडल्यावर तोफा चालविणें शक्य नसतें. शत्रू लांब अंतरावर असतां तो ज्या दिशेस असेल त्या दिशेनें तोफा वळवून ठेवाव्या लागतात. वेळ असेल तर च तोफांची उंची ( elevation ) कमी जास्त करतां येते व त्यांचीं तोंडें इकडे तिकडे फिरवितां येतात. इतकें झाल्यावर मग तोफा डागण्यांत येतात. खानाच्या फौजेनें एवढ्या गडबडींत प्रारंभीं फार च थोडे आवाज केले, नाहीं असें नाहीं. परंतु जेव्हां चोहींकडून मराठ्यांची गर्दी उसळली तेव्हां आपोआप च खानाच्या तोफा बंद पडल्या.

## खानाच्या तोफांचा निरुपयोग

खानाच्या तोफांचा निरुपयोग

मोरोपंतांची फौज खानाच्या फौजेच्या अगदीं जवळ आल्यानंतर च म्हणजे हातघाईच्या लढाईला सुरुवात होण्या बरोबर च खानाच्या ज्या तोफा प्रथम पासून गडावर पारघाटाकडे रोंखलेल्या होत्या, त्यांपैकीं कांहीं तोफा येणाऱ्या मराठ्यांच्या तुकड्यांवर रोंखल्या ( lay and direct ) गेल्या असतील व कदाचित् त्यांत पंतांच्या पायदळांतील कांहीं सैनिक कामास हि आले असतील. पण त्यांची संख्या अगदीं च थोडी असली पाहिजे. कारण पंतांची फौज आली, तो रस्ता अडचणीचा, अरुंद, बिकट, चढावा वरून उताराकडे येणारा, झाडीझुडपांचा, खोऱ्यांतून जाणारा व मध्यें कुमठ्याचा ओढा असणारा असा होता. तशांत या गडावर रोखलेल्या ( lay & direct ) तोफांना नव्या निशाणा ( target ) वर रोखण्यासाठीं बराच वेळ लागणें अवश्य होतें. परंतु, इतक्यांत पंतांचें पुष्कळसें पायदळ पुढें वाढून आलें असेल व तेवढ्यांत जर या तोफा उडाल्या असतील तर पायदळांत थोडें च का होईना, पण अखेरीच्या पायदळी तुकडींत नुकसान जरूर झालें असेल, कारण ही तोफेची मारागिरी ( artillery fire ) जेव्हां प्रथम होऊं लागली असेल तेव्हां या मराठी पायदळाच्या लांब रांगा ( column ) या झाडी झुडपांच्या प्रदेशांत तितरबितर (इकडे तिकडे) अशा ओळीं ( lines ) च्या रचनेमध्यें पांगल्या असाव्यात. अशा तऱ्हेनें तातडीनें पुढें हल्ला करण्यास जाण्याकरितां मराठी पायदळ विखरल्यामुळें आपोआप च खानाच्या तोफांची मारागिरी कारगीर होऊं शकली नाहीं. तोफांचा मारा जमाव एकगठ्ठा असतो तेव्हां कारगीर होतो, जमाव नसून फौज विरळ व इकडे तिकडे पसरलेली असली तर त्या वेळीं कांहीं उपयोग होत नाहीं.

**१०. तपशिलाची उणीव व त्याचा परिणाम:**

लष्करी दृष्टीनें ह्या लढाईच्या डावपेचाच्या तपशिलांची ( tactical conditions ) पूर्ण व आवश्यक माहिती उपलब्ध नाहीं, त्यामुळें ह्या वेळीं महाराजांच्या तजविजी व धोरणें काय होतीं, येवढें च काय तें सांगतां येईल. त्यांच्या हालचाली नक्की कोणत्या व कशा तऱ्हेच्या होत्या, हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं; तरी पण जी थोडीशी माहिती आहे तिच्यावरून ह्या हालचालींचा बोध होतो. कारण, युद्ध-शास्त्रांत असणारीं सर्वसामान्य तत्वें कोणत्या हि काळीं एकच असतात. फक्त डाव पेंचाच्या साधनांत व पद्धतींत हल्लींच्या शास्त्रीय शोधांनीं थोडासा फरक झाला, परंतु तसा मूळ तत्त्वांत झाला नाहीं. म्हणून वरील अनुमानें आपल्यास आज हि बसवितां येतात.

**११. अंतर, डावपेच, अंधःकार:**

शत्रूंत व आपल्यांत जोंपर्यंत बरें च अंतर असतें तोंपर्यंत गोळा-गोळीच्या लढाईचे डावपेंच करतां येतात. अंतर नाहींसें झाल्यास हातघाईच्या डावपेचांचा अवलंब केला जातो. गोळागोळीच्या डांव-पेंचाचें हातघाईच्या डावपेंचामध्यें, रूपांतर करतां येतें. तसें च हल्लीं हातघाईच्या लढाईची पूर्वतयारी गोळागोळीच्या लढाईनें होते व दोन्ही फौजा एकमेकांत मिसळण्याच्या जरा आधीं गोळागोळीची लढाई बंद केली जाते, कारण ती चालू ठेवल्यास शत्रूच्या फौजेबरोबर आपले हि नुकसान होतें. अशा परिस्थितींत अंधकार व रात्र यांचा अनुकूल फायदा इतका मिळतो कीं, थोड्या वेळांत च निर्णय लागणाऱ्या लढाईंत, त्यामुळें जयाचें पारडें चट्दिशीं या पक्षाकडून त्या पक्षाकडे फिरतें. जय मिळविण्यासाठीं युद्धशास्त्राचें ज्ञान असणें अगदीं अवश्य आहे.

( unexpected movement ) अनपेक्षित हालचाली करणें, ( interception or interposing ) शत्रूच्या सैन्याच्या दोन मोठ्या भागांत घुसणें व पाचर मारणें, ( reinforcement of troops ) अडचणींतील सैन्यास पाठपुरावा देणें, ( complete surprize ) पूर्णपणें अचानक हल्ला करणें, ( forced march for surprize ) अचानक हल्ल्यासाठीं लांबची व भाग पडलेली दौड करणें, ( orderly retreat from the battle ground ) रणांगण सोडून शिस्तीनें माघार घेणें, ( keen observation of nature ) सृष्टीचें व वस्तुस्थितीचें पूर्ण व सूक्ष्म ज्ञान वगैरे सर्व गोष्टींची माहिती जर सेनापतीस असेल तर त्यास अंधकाराचा फायदा सहज घेतां येतो व शत्रूच्या मार्गांत जबर अडचण उत्पन्न करतां येते. नेताजीनें वांईस घोडदळ नेल्याचें व खानाच्या फौजेवर अचानक हल्ला केल्याचें उदाहरण या तत्त्वाचें च आहे; व त्यांत त्यानें अंधःकाराच्या फायदा पूर्णपणें घेतलेला दिसून येतो.

**अंधःकाराच्या अडचणीचें उदाहरण**

टिपू व इंग्रज यांच्यामधील दुसऱ्या मोहिमेंत जनरल ऑक्टरलोनी हा अंधारामुळें नेमलेल्या जागीं वेळेवर पोहोंचला नाहीं. टिपूनें मात्र फौजेचा एक विभाग घेऊन, भाग पडलेली जोराची दौड करून (forced march) रातोरात त्याच्याशीं लढाई खेळून, ऑक्टरलोनी व इंग्रजांचा दुसरा एक विभाग यांच्या मध्यें घुसून दोहोंची हि भेट होऊं न देतां त्यानें ऑक्टरलोनीच्या फौजेचा बरा च नाश केला; व पुढें जेव्हां दिवसां ते दोन्ही भाग एक झाले तेव्हां टिपू भरारीची हालचाल करून तेथून निसटून गेला. ह्याप्रमाणें अंधाराचा फायदा घेऊन जय मिळविल्याचीं

उदाहरणें इतिहासांत पुष्कळ आहेत. तान्हाजीनें सिंहगड अंधाऱ्या रात्रीं च घेतला हें प्रसिद्ध च आहे. आजकालच्या वाढत्या दळणवळणाच्या युगांत अंधाराचा संबंध युद्ध-कौशल्याच्या धोरणां पेक्षां हि डावपेंचा ( tactics ) शीं जास्त येतो.

**१२. खानाची फौज उधळली:**

मराठ्यांनीं चौफेर केलेल्या अनपेक्षित हल्ल्यानें खानाच्या फौजेंतील लोकांस हत्यारें घेण्यास किंवा पुरतेंपणीं घोड्यावर चढण्यास हि वेळ मिळाली नाहीं, त्यांत ह्या अंधाराचा पूर्ण फायदा कसा घ्यावयाचा हें मराठ्यांच्या सेनापतीला ( मोरोपंताना ) सर्वस्वीं माहीत होतें; म्हणून संपूर्णपणें अचानक हल्याचा फायदा मराठयांस मिळाला व त्यांनीं खानाच्या फौजेंत गोंधळ माजवून ती कापून काढली व उधळून लावली. या प्रमाणें ही कोयनापारची लढाई तास दोन तासांच्या आंत खलास झाली.

**१३. लढाईंत मिळालेली सामुग्री** ( capture ):

ह्या चढाईच्या अचानक हल्ल्यामुळें व लढाईमुळें मराठयांच्या हातीं खानाच्या कोयनापारच्या सैन्यांतील पुष्कळ सामान लागलें. सात हजार घोडे, साठांवर हत्ती, ४०० वर उंट, पुष्कळसे बैल व सर्व तोफा, तलवारी, बंदुका, पट्टे, वगैरे इतर हत्यारें, रोख पैसा, बरेचसें जडजवाहीर व धान्य इतकें सामान मराठयांस मिळालें[२]. तोफांबरोबर च त्यांचा दारूगोळा हि मिळाला, कारण मोरोपंतांनीं केलेल्या चढाईंत तो फारसा खर्च झाला नसावा. कारण खानाच्या फौजेला तितके बार काढण्यास वेळ हि मिळाला नाहीं. ह्याप्रमाणें

---

१. शि. दि. १७०. २. चित्र ३०.

निरनिराळ्या प्रकारचें युद्धोपयोगी बरेचसें सामान महाराजांच्या हातांत पडलें. ज्या ठिकाणीं शत्रू नामोहरम होतो व पळ काढतो तेथील सर्व सामान विजयी पक्ष काबीज करतो. या लढाईंत खानाचे दोन मुलगे, झुंजारराव घाडगे वगैरे मोठ्या दर्जाचे सेनापती मराठ्यांनीं कैद केले.[1]

**१४. युद्धांत पकडलेल्या लोकांची प्रशंसनीय व्यवस्था व विल्हेवाटः**

कैद केलेल्या लोकांपैकीं जे खुशी होते त्यांस महाराजांनीं आपल्या पदरीं ठेवलें व ज्यांची खुशी नव्हती त्यांना सन्मानानें परत जाऊं दिलें. जखमी लोकांची सेवा शुश्रूशा चांगली करण्यांत आली. ह्यावरून धर्म-युद्धांतील नियम महाराज पूर्णपणें पाळीत होते असें दिसतें. सांप्रत अशा प्रकारचे नियम राष्ट्रसंघासारख्या (league of nations) संस्था करतात. पण वेळप्रसंगीं त्यांतील सभासद राष्ट्रें हे नियम पाळीत नाहींत, म्हणजे त्यांची अंमलबजावणी कागदाच्या चिटोऱ्यांत च राहते.

**१५. परिस्थित्यनुरूप महाराजांचा बिनचूक आडाखा व अंमल-बजावणीः**

या लढाईंत महाराजांना जो जय मिळाला त्याचें मुख्य कारण त्यांनीं दूरदृष्टीनें आंखून ठेवलेले बेत किंवा आडाखे हें होय. मोरो-पंतांनीं कोयना पार येथें चालून जावयाचें, जनी दऱ्यांत असलेल्या जमावानें व वरधानीच्या[2] डोंगरापर्यंत पसरलेल्या तुकडीनें कोयनापारच्या फौजेस ती गडावर चालून आल्यास तिला अडथळा करावयाचा, अथवा

---

१. शे. ब. ३१; शि. भा. अ. २२. श्लो. ४७–५०. २. जे. क. शि. च. प्र. ४४.

चालून न आल्यास मोरोपंतांनीं तिजवर हल्ला केला असतां, पंतांना मदत करावयाची, बाबाजी भोंसल्यानें बोचेघोळीचा घाट ५०० स्वारांनिशीं दाबून खानाच्या कोयनापारच्या फौजेला वांईकडे पिछेहाट करितांना रोखावयाचें, अशा तऱ्हेचें महाराजांच्या आडाख्याचें धोरण होतें व त्याप्रमाणें पुढें अंमलबजावणी झाली हि. बचावाचें धोरण महाराजांनीं पूर्वी पासून च ठरविल्यामुळें गडाच्या आसपासच्या सर्व घाटांची नाकेबंदी करणें त्यांना अवश्य होतें. तसेंच गडाच्या उत्तरेला ढवळ्या घाटांत चंद्रगडाजवळ चौक्या वगैरे ठेऊन तिकडची हि नाकेबंदी केली होती. या वेळीं नुसता च गडाचा बचाव करणें हें मुख्य काम नव्हतें. कारण गड हा एक संरक्षित ओळी ( defence line ) मधील तटबंदीचा दुवा होता येवढें च. पारघाट दाबून ठेवण्याचें आणखी हि एक कारण खालील प्रमाणें होतें.

**पारघाट दाबण्याचें कारण**

खानानें ठरविलें होतें कीं, प्रथम आपण महाराजांना पकडण्यासाठीं त्यांच्यावर हल्ला करूं पण त्यांत ते निसटले व पारघाटांतून खालीं महाडाकडे जाऊं लागले तर त्यांना अडवितां यावें म्हणून पारघाट आपणच ताब्यांत ठेवावा. या त्याच्या आडाख्याप्रमाणें खान गडावर हल्ला करण्यापूर्वी जर घाट ताब्यांत घेईल व आपणांला महाडाकडे जाण्यास अडथळा करील, तर आपण तो प्रथम काबीज करून ठेवावा, ह्या उद्देशानें महाराजांनीं तो घाट दाबला होता. खानानें हें जाणून हि पंतांवर हल्ला केल्यास गडावरील तोफांच्या माऱ्यांत तो घाट असल्यामुळें व कोयनापार येथून गडाकडे येणाऱ्या मार्गांवर गडावरील तोफा रोखल्या असल्यामुळें खानाला घाटांत किंवा त्याच्या हि अलीकडे अडवितां आलें

असतें. मोरोपंतांच्या फौजेनें हि त्याला अडथळा केला असता; इकडे नेताजीनें आपल्या घोडदळांपैकीं एखादी तुकडी जावळी येथें खानाच्या सैन्याच्या उजव्या बगलेवर व दुसरी बोंचघोळीच्या घाटांत पाठवून, आपण स्वतः थेट वांई येथील खानाच्या फौजेवर जावैयाचें. या प्रमाणें महाराजांचा एकंदर बेत ठरला होता व तसा तो अमलांत आणिला गेला.

**खानाची पंधराशें लोकांची तुकडी**

मोरोपंतांनीं आपणावरील कामगिरी कशी पार पाडली हें वर आलें च आहे. जनीच्या जंगलांत अथवा दऱ्यांत असलेल्या बांदले[२], जेधे वगैरे मंडळींनीं वास्तविक पंतांना मदत करण्यासाठीं तोफ होतां च कोयनपार येथें यावयास पाहिजे होतें. परंतु, मध्यें च पंधराशें लोकांचें उपटसुंभ प्रकरण निघाल्यामुळें ठरलेला बेत एकीकडे ठेवून आपण प्रथमोपक्रम करून ( initiative ) त्या मंडळीनीं प्रथमतः त्या १५०० लोकांची कत्तल उडविली. ह्याकरितां पंतांच्या फौजेच्या एका तुकडीची मदत हि त्यांना मिळाली होती. येथील युद्ध संपल्यानंतर मग ती सर्व फौज पंतांच्या मदतीसाठीं कोयनापार वर चालून गेली. त्या च प्रमाणें या पंधराशेंची बातमी वेळेवर मोरोपंतांस समजल्यामुळें त्यांनीं हि आपलें प्रथमोपक्रम घेण्याचें धोरण ( initiative ) उपयोगांत आणून आपल्या सैन्यांतील मराळ, ढमाले, ढोर, वगैरे सरदारांना सिलीमकर जेधे वगैरे लोकांच्या मदती करितां पाठविलें होतें. पंधराशांचा पराभव झाल्यावर हे जेधे सिलीमकराप्रमाणें कोयनापार येथें पंतांना मिळाले.

---

१. शि. भा. अ. २३. श्लो. ७, ८, २२, २३, ४७,–५०. २. जे. क. शि. च. प्र. ४४.

**१६. नेताजीची कामगिरीः**

नेताजी हा जावळीपासून ३ मैलांवर वायव्येस कुडेसराच्या पठारावर होता. तोफ झाल्याबरोबर त्यानें ठरल्याप्रमाणें आपल्यापैकीं एक घोडदळाची तुकडी रघुनाथ बल्लाळाच्या हाताखालीं जावळी येथील खानाच्या फौजेवर पाठविली[1]. ही तुकडी बहुतेक तलवारवाली च होती. तिनें खानाच्या अगदीं उजवीकडील बगले (extreme flank) वर हल्ला करून तिला मागें रेटलें. मोरोपंतांचा हल्ला प्रथम झाल्यामुळें ह्या घोडदळाच्या तुकडीचा हल्ला एक प्रकारें प्रतिहल्ला च (counter attack) होता. ह्या लढाईंत बहुतेक हातघाईची लढाई च घडली, गोळागोळी फार कमी झाली. सारांश, महाराजांनीं आंखलेल्या बेताप्रमाणें सर्व गोष्टी त्यांच्या सेनापतींनीं अमलांत आणिल्यामुळें कोयनापारच्या लढाईंत त्यांना जय मिळाला.

**१७. सेनापतीचे गुण, युद्धाचा आडाखाः**

भावी संकटें व अडचणी किती प्रकारें येतील याचा युद्धापूर्वीं च अंदाज बांधणें व त्या प्रत्येक अडचणींतून कसें पार पडतां येईल ह्याचा विचार करून, त्याप्रमाणें बिनचूक काम करणें, हा एक ईश्वर-दत्त गुण असून तो मोठमोठ्या सेनापतींच्या अंगीं आढळतो. युद्ध-शास्त्राच्या कौशल्या वरील पुष्कळ पुस्तकें वाचिलीं असतां हि तो गुण अंगीं आणतां येत नाहीं; मात्र मूळचा थोडासा असल्यास वाचनानें त्याची वाढ होईल एव्हढें च. महाराजांना ही ईश्वरदत्त देणगी होती, म्हणून च त्यांना अगोदर ह्या गोष्टींचा पूर्णपणें सर्व बाजूंनीं विचार करून तयारी

---

१. शे. ब. ३०

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थो
नगर वाचनालय, सातारा



करतां आली व वेळेवर ठरल्याप्रमाणें ती कामगिरी घडवून आणतां आली. वास्तविक महाराजांची फौज खानाच्या फौजेपेक्षां पुष्कळ च कमी होती; आणि ज्याची फौज कमी असेल तो नेहमीं बचावाची लढाई खेळतो, असा साधारण नियम असतो. परंतु येथें महाराजांनीं च बचावाची चढाई ( active defence ) केली, व खानाच्या फौजेचा पराभव केला. ह्यावरून त्यांचे बेत व धोरण आंखण्यांतील चातुर्य दिसून येतें. खानाला ही देणगी नसल्यामुळें त्याचा बेत अर्धवट व सदोष राहिला. कोयनापार व जनी अथवा जनी व भेटीचा मांडव यांमध्यें खानानें संदेशमार्ग व दळणवळण ठेवलें नव्हतें (कशावरून तें मागें आलें च आहे). त्यामुळें भेटीच्या जागीं झालेली हकीकत पंधराशें लोकांस, व त्यांची उडालेली कत्तल कोयनापारच्या फौजेस कळली नाहीं. तसें च खानानें आपल्या फौजेच्या संरक्षणार्थ मजबूत व उत्तम चौक्या पहाऱ्यांचा हि बंदोबस्त केलेला दिसत नाहीं, त्यामुळें जनी व कोयनापारची त्याची सर्व फौज मराठ्यांनीं उधळून दिली. ह्यावरून खानाचा बेत अगदीं चुकीचा होता असें जरी म्हणतां येत नाहीं, तरी त्याची बातमी सदोष होती व त्यामुळें त्याला हा घोर परिणाम भोगावा लागला.

**पानीपतचें उदाहरण**

पानिपत येथें हि अबदालीची फौज यमुनेच्या उतारांवरील मराठ्यांच्या चौक्या मारून अचानकपणें यमुनापार झाली व त्याची बातमी मराठ्यांच्या मुख्य सैन्याला लागली नाहीं. म्हणून उताराच्या रक्षणार्थ ठेवलेल्या मराठ्यांच्या या चौक्यांना मुख्य सैन्याचा पाठपुरावा वेळेवर होऊं शकला नाहीं. त्यामुळें यमुनेचे उतार अबदालीच्या हातीं जाऊन अखेरीस

मराठ्यांवर खंदक खणून ( pitched ) लढाई खेळण्याचा प्रसंग ओढवला, हें सर्व सदोष बातमीमुळें झाले.

**१८. खानाचा डाव हुकण्याचीं कारणें:**

बुद्धिबळांतील डावाप्रमाणें युद्धांतील सैन्याच्या हालचाली करण्यास हजारों डावपेंच टाकावे लागतात. पण त्यांवर शत्रूसुद्धां असें च डावपेंच टाकील, हें आगाऊ च ओळखून ते मोडून टाकण्यासाठीं आगाऊ तजवीज करून ठेवणें हें हुषार सेनापतींचें मुख्य काम असतें. वर सांगितल्याप्रमाणें बुद्धिबळांतील डावाला अनुसरून म्हणजे आपला डाव फसल्यास महाराज आपल्या वर कोणता डाव उलटवितील व तो त्यांचा डांव सिद्धीस जाऊं नये अशासाठीं आपण कोणत्या तजविजी ठेवावयास पाहिजेत त्याचा विचार खानानें सर्व बाजूंनीं केला नाहीं असें दिसतें. त्यामुळें त्याचा डाव त्याच्या अंगलटीस आला. हें कदाचित, खानाला स्वतः बद्दल फाजील घमेंड, प्रतिपक्षी सेनापतीच्या गुणाबद्दलची अपुरी व चुकीची माहिती यामुळें घडलें असावें.

**१९. वांई व कोयनापार यांत दळणवळण नव्हतें:**

कोयनापार येथील खानाच्या लोकांना आपणावर मराठ्यांचा हल्ला येईल अशी कल्पना नसल्यामुळें, त्यांनीं वांई येथील आपल्या अघाडीच्या कोठी कडून मदत मागविण्याची व्यवस्था केली नाहीं, व जर आयत्या वेळीं केली असती तर ती साधली नसती. कारण वांई ही कोयनापार पासून २०–२२ मैल लांब असल्यामुळें, व तेथून कोयनापार येथें येण्यास अडचणीचे रस्ते असल्यानें पायदळाला ७–८ तास व घोडदळाला ४–६ तास व जड तोफखान्यास १–२ दिवस लागले असते. परंतु, कोयनापार व वांईमध्यें खानाचें चांगलें दळणवळण

नव्हतें, असें खानाची कोयनापार येथील फौज पराभव होऊन पळून गेल्यामुळें व वांईहून मदत न आल्यामुळें म्हणतां येतें. जर तसें उत्तम दळणवळण असतें तर वांईची फौज कोयनापार येथें मदतीस आली असती, व जरी ती पार येथें आली नसती, तरी शत्रूचा हल्ला पार प्रमाणें आपणांवर हि येईल या साठीं ती सावध तरी राहिली असती. निदान शत्रूचा लोंढा ( onrush ) थांबविण्यास व स्वतःच्या पळ्यांना व इतरांना सांवरून, एकगठ्ठा करण्यास तरी तिची मदत झाली असती; परंतु असें कांहीं च न घडल्यामुळें ह्या दोन फौजेंत उत्तम दळणवळण नव्हतें व असल्यास तें महाराजांच्या फौजेनें तोडलें होतें असें म्हणावें लागतें.

**२०. पिछेहाटीचा मार्ग** (line of retreat ):

ज्या मार्गानें खान कोयनापार येथें आला त्या च मार्गानें पराभवाची वेळ आली असतांना खानाच्या फौजेनें परत वांई येथें जाणें साहजिक होतें. परंतु खानाचें सैन्य त्या मार्गानें गेलें असें दिसून येत नाहीं. कारण पंतांच्या व नेताजींच्या जोराच्या हल्ल्यामुळें त्याची धुळधाण उडून व तें घाबरून त्याचा जोम नाहींसा झाला. त्यांत हि अंधार पडल्यामुळें तें वाट फुटेल त्या दिशेनें पळून गेलें. कोयनेला घोडदळ, तोफखाना व इतर जड आणि मोठें सामान उतरविण्यासाठीं एकच उतार होता व त्या च उतारानें खान कोयनापार येथें आला होता. पण तो उतार अरुंद असल्यामुळें सर्वच्या सर्व फौज एकदम तेथून पळून जाणें अशक्य होतें. त्यामुळें थोडी फार फौज तेथून नदी उतरून वांईच्या मार्गानें पळाली; ती बोचेघोळीच्या घाटापर्यंत बिन हरकत आली, परंतु येथें मात्र तिला जोराचा अडथळा झाला.

**२१. बाबाजी भोंसल्यानें केलेली अडवणूक व पाठलागः**

ह्या ठिकाणीं बाबाजी भोंसलें हा ४०–५० स्वारांनिशीं दबा धरून बसला होता[1]. कोयनापारकडील खानाची फौज जर शिस्तीनें माघार घेईल अथवा बेशिस्तीनें पळ काढील तर तिला वांईकडे जाऊं न देतां कोयनापारकडे च लोटावयाचें व तिच्या मागून पाठलाग करीत येत असलेल्या पंतांच्या फौजेच्या काबूंत तिला आणून सोडावयाचें, म्हणजे कोयनापार येथील कोणत्या हि प्रकारची बातमी यत्किंचित हि वांई येथें कळूं द्यावयाची नाहीं हें काम बाबाजीकडे सोंपविलें होतें. म्हणून त्यास तेथें पूर्वीं च ठेविलें होतें. तोफेचा इशारा झाल्याबरोबर बाबाजी सावध होऊन तयार झाला. बाबाजीची तुकडी घोडदळाची होती. तोफेच्या बारानंतर एकदोन तासांनीं कोयनापार येथील खानाची पळपुटी फौज जसजशी वांई येथें जाण्याकरितां ह्या घाटांत आली, तसतसा बाबाजीनें तिचा समाचार घेतला व त्यांपैकीं वांईकडे कोणास हि जाऊं दिलें नाहीं. त्याची फौज घोडदळाची होती व खानाचे पळे वांईकडे गेले असते, तर बाबाजीला त्यांचा पाठलाग सहज करतां आला असता. परंतु कोयना पारचे खानाचे पळे अत्यंत घाबरून गेल्यामुळें त्यांनीं वांईकडे जाण्याचा फारसा प्रयत्न केला नसावा.

---

१. शे. ब. २५; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ६५. बाबाजीला २ हजार रु. नालबंदी दिली होती. त्या काळीं वार्षिक वेतनाच्या $\frac{1}{4}$ रकम नालबंदीस देत असत (खरे. २८१६.). दर स्वारास त्या वेळीं सालिना २०० रु. पर्यंत पगार मिळे. हा पगार साधारणपणें आठवड्याचा ४ ते ५ रु. पर्यंत असे. (खरे. २८१७.) ह्या हिशोबानें बाबाजीच्या स्वारांची संख्या ४० होते.

**पाठलाग व घोडदळ** पाठलाग करण्याचे वेळीं पायदळापेक्षां घोडदळाचा जास्त उपयोग होतो. कारण अंतर तोडण्याचें काम त्याला पायदळापेक्षां लवकर करतां येतें, म्हणून वाटेल तितक्या दूरवर हि पाठलाग करण्याचें काम घोडदळाला साधतें. ह्या ठिकाणीं मोरोपंतांना फारसा पाठलाग करतां आला नाहीं; कारण त्यांची फौज लढाई खेळून दमली होती व ती पायदळाची होती. त्यांनीं फार तर एक दोन मैल पाठलाग केला असावा. परंतु तशी स्थिती बाबाजीची नव्हती. त्याची तुकडी घोडदळाची असून ताज्या दमाची होती. त्यामुळें त्याच्या जमावाला जोराचा पाठलाग करतां येऊन खानाची फौज बहुतेक कापून काढतां आली. जर बोचेघोळीच्या घाटांत बाबाजी नसता तर खानाची कोयना पारची फौज कदाचित वांई येथें गेली असती. परंतु रात्र असल्यामुळें तिला तेथें जाण्यास कमींत कमी ८–१० तासांपेक्षां कमी वेळ मुळीं च लागला नसता; म्हणजे पहाटें तीन चारच्या सुमारास ती वांई येथें पोहोंचली असती. तत्रापि अशा जाण्यानें तिचा कांहीं उपयोग झाला नसता; कारण वांई येथील फौजेवर नेताजीनें हल्ला अगोदर च केला होता. त्यामुळें ह्या खानाच्या पळ्याची वांई येथील फौजेशीं गांठ पडून, त्या दोघांनीं मिळून नेताजीच्या फौजेस तोंड देणें शक्य झालें नसतें.

**संदेशमार्ग तोडणें** माघार घेतलेल्या फौजेची म्हणजे पळ्याची व आघाडीच्या कोठीच्या फौजेची ( advanced base ) गांठ पडून त्या दोहोंनीं एकत्र होऊन शत्रूच्या पाठलाग करणाऱ्या फौजेवर त्यांना चालून जातां येते व स्वतःची संख्या जास्त झाल्यामुळें आणि ताज्या दमाची अघाडीच्या फौजेची मदत मिळाल्यामुळें

वेळ प्रसंगीं शत्रूचा पराभव हि करतां येतो. परंतु हें सर्व घडण्यास पिछाडीचा मार्ग व दळणवळणाचा मार्ग (line of retreat & line of c.) सुरक्षित असावा लागतो. येथें खानाचे संदेशमार्ग सुरक्षित नव्हते व असले तरी ते महाराजांच्या फौजेकडून तोडले तरी गेले असतील. म्हणून च खानाच्या फौजेची अशी स्थिती होऊन त्याचा अखेर पराभव झाला.

**२२. संख्याबलापेक्षां हिंमतीचें बल अधिक:**

ह्या लढाईंत महाराजांची सैन्याची संख्या खानाच्या सैन्यापेक्षां कमी होती हें वर आलेंच आहे. परंतु खानाच्या फौजेच्या हिंमतीपेक्षां मराठ्यांची हिंमत फार उच्च दर्जाची होती. त्यांच्या अचानक हल्ल्यामुळें खानाच्या फौजेची हिंमत अगोदर च नष्ट झालेली होती. तशांत कोठून आपणाला उपराळा (मदत) येईल अशी ही त्यांना आशा राहिली नव्हती व त्यामुळें लढाईचें तोंड बदलविण्याची सोय राहिली नव्हती. शिवाय खानाचे मोठमोठाले सेनापती मारले गेले होते, ह्या सर्व कारणामुळें खानाच्या फौजेचा धीर सुटून ती वाट फुटेल तिकडे सैरावैरा पळूं लागली.

शिवाय बोचेघोळींच्या घाटांत बाबाजी भोसले हा ४०।५० स्वारांनिशीं दबा धरून खानाचा पिछेहाटीचा मार्ग तोडण्यासाठीं बसला होता. ती जागा अडचणीची व बारीची असल्यामुळें ह्या ४०।५० लोकांना खानाच्या फौजेला सहज अडवितां आलें. असल्या बारीच्या ठिकाणीं आपल्यापेक्षां दसपट शत्रूला सहज अडवितां येतें. अशीं बारींत शत्रूंच्या सैन्यास थोडया लोकांनिशीं अडविल्याचीं उदाहरणें आपल्या इतिहासांत पुष्कळ च आढळतात.

**२३. कामास आलेले लोक:**

कोयनापारच्या लढाईंत खानाचे तीन हजार लोक मेले, बरेचसे जखमी झाले व बाकीचे पळाले[1] व मराठ्यांचे १७३४ लोक कामास आले व ४२७ जखमी जाहले.[2] महाराजांकडील दोन मोठे सरदार शामराजपंत व त्रिंबक भास्कर हे ठार झाले.[2] खानाकडील मंबाजी, जगदळे वगैरे सरदार मारले गेले; आणि झुंजारराव घाडगे व दोन तीन इतर मातब्बर सरदार कैद झाले.[3] अफझलचे दोन मुलगे कैद होऊन तिसरा मुलगा फाजलखान हा पळून गेला.[4]

**२४. देशद्रोह्यांस कडक शिक्षा:**

फाजलखान व त्याचा झनाना ह्यांना खंडोजी खोपड्यानें पैशाच्या लालचीनें कोयनापार करून साताऱ्याकडे पोहोंचविलें. तेथून फाजलखान उरलेल्या लोकांनिशीं विजापुराकडे पळून गेला. परंतु खंडोजीस मात्र महाराजांच्या लोकांनीं पकडून आणलें. खंडोजी सारख्या मराठ्यानें स्वराज्याच्या विरुद्ध मुसुलमानास मदत केली व एक प्रकारें स्वराज्य-स्थापनेच्या कार्यास अडथळा आणला. सारांश, हें धर्म व देशद्रोहाचें कार्य त्याच्या हातून घडलें, तेव्हां असल्या प्रकारचें कार्य करण्याचा मोह आपल्या सैन्यांतील अथवा परराज्यांच्या सैन्यांतील कोणा हि हिंदूस होऊं नये, म्हणून महाराजांनीं खंडोजीला कडक शिक्षा फर्माविली. महाराजांचा जय झालेला पाहून हरामखोर खंडोजीनें आपला महाराजांच्या बाजूस असलेला जांवई हैबतराव सिलिमकर यास व कान्होजी जेध्यास

१. इं. फया. २५०. २. इं. सं. ऐ. स्फु. ले. भा. १. ७२.
३. शि. भा. अ. २२. श्लो. ४६. ४. कित्ता श्लो. ४७–५५.

१७

सांगून महाराजांकडे क्षमेची याचना चालविली. परंतु असल्या निकटच्या सरदारांची भीड पडली असतां हि महाराजांनीं शिस्त बिघडूं नये म्हणून त्याचा डावा पाय व उजवा हात "ज्या हातानें त्यानें ( महाराजां विरुद्ध ) तरवार धरली व ज्या पायानें तो चालून आला" तो छाटून टाकला. त्यामुळें महाराजांच्या कडक शिस्तीची जरब मराठी सैन्याच्या मनांवर बसली.

**२५. सेनापती व फौजेची हिंमत:**

महाराजांचे दोन सेनापती शामराजपंत पद्मनाभी व त्रिंबकपंत वर सांगितल्याप्रमाणें युद्धांत पडले असतां हि त्यांच्या फौजांनीं घाबरून पळून न जातां मुसुलमानांशीं तोंड देऊन आपली कामगिरी उत्कृष्ट बजाविली, ही गोष्ट विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे व त्या वेळच्या मानानें कौतुक करण्यासारखी आहे. कारण त्याच्या पूर्वीं, त्या वेळीं व त्यानंतर हि हिंदु लोकांच्या लढायांत, हा एक ठळक दोष पुष्कळ वेळां स्पष्टपणें दिसून येतो कीं, लढाईमध्यें सेनापती पडल्यास हिंदू सैन्य शत्रूस तोंड न देतां पळून जातें; एवढें च नव्हे तर आपला जय झाला असतां हि आयत्या वेळीं सेनापति ठार झाल्यामुळें हिंदू सैन्य परत गेलें आहे.

**पानिपतच्या शेवटच्या अपयशाचें एक कारण**

पहिल्या प्रकारचीं उदाहरणें हिंदुस्थानच्या इतिहासांत वाटेल तितकीं सांपडतील. दुसऱ्या प्रकारचें एक ठळक उदाहरण देतों. पानपतच्या लढाईंत शेवटच्या दिवशीं तुंबळ व भारतीय युद्ध होऊन शेवटीं मराठ्यांनीं अबदल्लीचा जवळजवळ पराभव केला. इतक्यांत दुर्दैवानें विश्वासराव साहेबांना गोळी लागून ते ठार झाले. त्याबरोबर

जय पावलेल्या व त्यामुळें शहाजनें वाजवीत असलेल्या मराठी फौजांचें अवसान खचलें, येवढें च नव्हें तर भाऊसाहेबांनीं आपल्या फौजेची हिंमत पुन्हां वाढविण्यासाठीं दुराणीच्या फौजेंत घोडा घातला. परंतु, थोड्यां च वेळांत भाऊसाहेब बेपत्ता झाले. त्यामुळें त्या वेळीं जवळ असलेले मोठमोठे फौजबंद मराठे सरदार बेहिंमत होऊन मागें निघाले. अर्थात हें पाहून दुराणींना एके काळीं "भूतखान्या" प्रमाणें भासणारी मराठी फौज हि पळूं लागली, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सेनापती पडला असतां एका हातानें त्याचें प्रेत ओढून दुसऱ्या हातानें शत्रूंवर वार करण्यासाठीं धांवून जाणें अशा प्रकारचें युद्धाचें स्वरूप हिंदूंच्या इतिहासांत अपवादादाखल एखादें दुसरें सांपडतें. असलें अपवादात्मक उदाहरण रांगण्याच्या लढाईंत बाजी प्रभु हा पडल्यानंतर त्याच्या हाताखालील लोकांनीं घडवून आणल्याचें दिसून येतें.

**२६. जय का अपजय:**

कांहीं वेळीं तर जय झाला असतां व सेनापती जिवंत असतां हि रणांगण सोडून मागें हटल्यामुळें मराठ्यांनीं स्वतःचा नाश करून मिळविलेली विजयश्री शत्रूच्या गळ्यांत टाकली. इ. स. १८०३ पासून १८४३ पर्यंत मराठ्यांचीं इंग्रजांबरोबर जीं युद्धें झालीं आहेत, त्यांतील कांहीं युद्धांत मराठ्यांचा जय झाला आहे. परंतु जय झाल्यावर हि त्यांनीं त्याचा यथायोग्य फायदा न घेतल्यामुळें व माघार घेतल्यामुळें इंग्रजांना यश मिळून मराठ्यांचा मोड झाला असें इतिहास सांगतो.

कोरेगांवची लढाई

कोरेगांवच्या लढाईंत वास्तविक मराठ्यांचा जय झाला होता, व इंग्रज हरला होता. असें असतां हि रावबाजींनीं तेथून सर्व फौजेसकट निघण्याची घाई केल्यामुळें

त्यांना अपयश येऊन व सेनापती बापू गोखले यांनीं रावबाजींच्या हुकमाची योग्य छाननी न केल्यामुळें इंग्रजांना फुकटाफुकटीं यश मिळालें. इंग्रज व शिंदे यांच्यामधील महाराजपुरच्या लढाईंत शिंद्यांचा च जय झाला होता. परंतु, नंतर फौजा न लढवितां, शिंद्याचे सेनापती आपल्या फौजांना घेऊन ग्वाल्हेरला निघून आले, आणि मराठ्यांच्या हातांत आलेलें यश इंग्रजांच्या हातांत पडलें! ह्याप्रमाणें निरनिराळ्या घोडचुका महाराजांच्या शिस्तीखालीं तयार झालेल्या सेनापतींनीं व फौजांनीं न केल्यामुळें व आपल्यावर सोंपविलेली कामगिरी उत्कृष्ट रीतीनें तंतोतंत पार पडल्यामुळें, आपल्याहून दुप्पट, अडीच पटीनें शत्रूंवर हि त्यांना जय मिळवितां आला. अशा रीतीनें ह्या कोयना पारच्या लढाईचा शेवट झाला.

**२७. जावळीची लढाईः**

ज्या वेळीं महाराजांनीं नुसतें बचावाचें धोरण सोडून बचावाच्या चढाईचें धोरण बदलून घेऊन आपल्या आडाख्यांत व बेतांत अगदीं इष्ट असा प्रासंगिक फेरफार केला, त्या च वेळीं हें जवळ जवळ निश्चित ठरल्या सारखें च होतें कीं, रणक्षेत्रांत ज्या ज्या ठिकाणीं खानाच्या सैन्याचे निरनिराळे जमाव व थोक ( columns ) सांवरून आहेत त्या सर्वांवर अचानकपणानें बचावाची चढाई करावयाची.

ह्या धोरणा प्रमाणें जशा जनीटेंब व कोयना पार येथें लढाया झाल्या, तशी च त्यांना पोषक अशी जावळी येथें हि लढाई झाली.

कोयनापार येथें जें खानाचें सैन्य तळ देऊन राहिलें होतें त्या पैकीं च कांहीं हिस्सा जावळी कडे तळ देऊन होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे खानाच्या तळाच्या सैन्याचा (line) जावळी ही उजवी

बगल ( right flank ) होती. जावळी हीं गडाच्या ईशान्येकडे कोयनेच्या साधारण उत्तरेला दोन मैलांच्या अंतरावर आहे.

खानाच्या तळाच्या डाव्या बगलेला ( left flank ) त्याच्या तोफांकरितां योग्य अशी जागा होती. कारण जर ह्या तोफा जावळीकडे असत्या तर जास्त अंतरामुळें त्यांचा मारा मोरोपंताच्या हल्ल्यासाठीं आलेल्या लोकांवर किंवा गडाच्या विशिष्ट भागांवर असा झाला नसता म्हणून तसें करणें शक्य नव्हतें. ह्या करितां त्या तोफा खानाच्या डाव्या बगलेला म्हणजे कोयना-पार कडे होत्या हें उघड आहे. शिवाय खानाच्या पायदळाचा मुख्य हिस्सा कोयनेच्या जवळ तोफांच्या बरोबर (escort) म्हणून तोफांच्या संरक्षणासाठीं होता. कारण त्या जागेंत घोडेस्वारांना तोफांच्या रक्षणाकरितां, घोड्यावर स्वार होऊन अचानक हल्ला (surprize attack) करावयास आलेल्या मोरोपंताच्या व इतर पायदळाच्या टोळ्यांवर हल्ला करणें शक्य च नव्हतें. कारण हल्ला करण्याला लायक अशी जागा च तेथें नव्हती. म्हणून घोडेस्वारांचा जास्त भरणा तेथें-म्हणजे कोयनेच्या अंगाला-नसून जावळीच्या अंगाला च असला पाहिजे हें उघड आहे. जरी हें घोडदळ तेथें असेल असें धरून चाललें तरी त्या घोडदळाला पायउतार ( dismounted ) होऊन च युद्धांत जास्त चांगल्या तऱ्हेनें भाग घेतां आला असता. " घोड्यावर खोगीर व सामान हि घालण्यास फुरसत मिळाली नाहीं " असा जो उल्लेख आहे त्यावरून असा हि एक अंदाज व अनुमान करितां येईल कीं, त्यांना घोड्यांवर सामान ठेवितां आलें नाहीं असें नसून कदाचित् घोडयांवर स्वार होऊन त्या लढाईंत अडचणीच्या व घोडदळाच्या कामाला अयोग्य अशा जागेमुळें आपण पायदळ व

पायउतार होऊनच काम करावें असें ठरवून हि कदाचित् ते पाय-उतार झाले असतील व लढले असतील. परंतु ही गोष्ट बखरींत अशा तऱ्हेनें उल्लेखिली गेली असल्यास कांहीं विशेष नवल नाहीं.

आरोग्य पहाणी
Sanitation

तसेंच जावळीच्या बाजूला घोडदळाच्या सैन्याला उतरण्याला योग्य अशी मैदानाची जागा कोयने कडील जागे पेक्षां फार चांगली होती. ह्या हि कारणांमुळें कोयनेच्या बाजूच्या तळावर घोडदळाचा जास्त भरणा नसावा व पायदळाचा विशेष भरणा असावा असें दिसतें. तळ घालण्यांत पुढील गोष्ट जी विशेष पहावी लागते, ती ही कीं, चढ, उतार, मैदान व डोंगरी किंवा झाडी झुडपांची जागा, टेहळणी साठीं उंच व छुप्या अशा जागा, प्रसंगीं छापा पडल्यास बचावाला योग्य अशी जागा, निरनिराळया फौजांच्या शस्त्रां (arms) ना त्यांच्या शस्त्रांप्रमाणें च जनावरांस व माणसांस हि उतरण्यासाठीं व राहण्यासाठीं सोईवार जागा, त्या दोघांची पाण्याची सोय व आरोग्यशास्त्राच्या दृष्टीनें जनावरांची लीद, मुतारी वगैरे होणारी घाण व तिकडून वहाणारी हवा यांचा बंदोबस्त करतां येईल अशी जागा, अशा बऱ्या च गोष्टींचा विचार करून मग च तळाची जागा कायम व निश्चित केली जाते. पूर्वीं हि ही च पद्धत होती व आज काल हि ही च पद्धत आहे व केव्हां हि ही च पद्धत राहणार. मुख्य तत्त्वें ह्या बाबतींत बदलूं शकत नाहींत.

पाण्याचा बंदोबस्त

नदीवर जनावरें पाणी पितांना घाण करतात म्हणून जर तेथें जास्त माणसांचा भरणा असेल व जरी निर-निराळ्या ठिकाणीं माणसांनीं व जनावरांनीं पाणी पिण्यास वगैरे जावें व रहावें असा कडक निर्बंध घातला असेल

तरी खरें बोलावयाचें म्हटलें म्हणजे माणसांना व शिपायांना होणाऱ्या अडचणी व त्रासामुळें तो शब्दशः पाळला गेला नाहीं व केव्हां हि जात नाहीं, त्या मुळें सैन्यांत रोगराई फैलावयाचा संभव असतो. ह्या करितां माणसांच्या व जनावरांच्या साठीं निरनिराळ्या पाणवठ्यांवर म्हणजे वरच्या व खालच्या पाणवठ्यांवर पाणी पिण्याचा व धुण्याचा बंदोबस्त करणें श्रेयस्कर असतें. म्हणजे होतां होई तों जमावाच्या व प्रसंगाच्या महत्त्वा प्रमाणें ह्या घोडदळां मधील खास जनावरांच्या व माणसांच्या पाण्याच्या सोईमध्यें जितकें जास्त अंतर ठेवतां येईल तेवढें ठेवणें अवश्य असतें. ह्या करितां हि कोयनापार येथें तळावर घोडदळाचा विशेष भरणा नसावा असें वाटतें.

घोडदळाची बगल

बहुतेक तळ टाकतांना (allotment of ground to different units) तुकड्यांना निरनिराळ्या जागा नेमून देण्याचा प्रश्न, ज्या निरनिराळ्या दृष्टीनें विचार करून सोडवावा लागतो, त्यांपैकीं च घोडदळ कशासाठीं असतें व त्याला कोणती व कशी जागा असणें योग्य व जरूर आहे हा एक प्रश्न आहे. शत्रूच्या अचानक हल्ल्याच्या वेळीं, वेळेवर एकदम पडती बाजू सांवरतां यावी म्हणून घोडदळाचें काम जें शत्रूवर तुटून पडणें ( charge ) त्या कामा करितां सोईवार व हालचालीला योग्य अशी जागा पाहून च घोडदळाला जागा नेमून द्यावी लागते. त्या प्रमाणें खानानें जावळीकडे आपल्या उजव्या बगलेला तशी जागा नेमून दिली. कारण तेथें कोयनेपेक्षां योग्य अशी जागा होती म्हणून तिकडे च जास्त घोडदळ तळावर ठेवणें शक्य होतें आणि त्याप्रमाणें खानानें ठेवलें हि.

घाटांचा रोख

दुसरी एक गोष्ट लक्ष्यांत घ्यावयाची तीं हीं कीं, खानाचा बेत चढाईचा असल्यामुळें महाराजांना दगा केल्या नंतर गडावर एकदम हल्ला ( sally-assaults ) करून व गडावरच्या शिबंदीशीं लढाई करून त्याला गड ताब्यांत घ्याव-याचा होता, म्हणजे घाट ताब्यांत घेण्याची व ठेवण्याची किल्ली जो प्रताप-गड तो घ्यावयाचा. याप्रमाणें गड हातांत आल्यामुळें आपल्या भरारीच्या व सुटसुटीत अशा फौजेकडून महाराजांच्या इतर सैन्याशीं लढाई व पाठलाग करण्याकरितां म्हणजे कोंकणांत व महाडाकडे जाण्याकरितां घाटाची व खिंडीची भीती राहणार नाहीं; ह्या मुळें आपलें भरारीचें व सुटसुटीत असें जें घोडदळी सैन्य तें जितकें घाट व खिंडीच्या जवळ ठेवतां येईल तितकें ठेवावें, ह्या अडाख्याप्रमाणें त्यानें आपलें जास्त घोड-दळ जावळीकडे च अवश्य ठेवलें असलें पाहिजे. ( कोयने पासून पार घाटा पर्यंत जितकें अंतर आहे त्याच्या निम्यानें, नव्हें $\frac{1}{4}$ सुद्धां अंतर, जावळीच्या टापूंतून जवळच्या घाटाचें नाहीं ).

गनिमी शत्रू व दळणवळण

महाराजांसारख्या गनिमी लढाईच्या प्रणेत्याशीं आपल्याला लढा-वयाचें आहे, तेव्हां आपलें घोडदळ जावळीकडे च ठेवावें हा विचार खानाच्या मनांत आला असावा. कारण आपण महाराजांना दगा केल्यावर जर वेळ-प्रसंगीं त्यांच्या सैन्यानें आपलें कोयनापार तें वांई यामधील दळणवळण सपाट्यासरशीं तोडण्याचा प्रयत्न केला, तर त्याला तोंड देण्यासाठीं म्हणून सुद्धां या आपल्या दळणवळणाच्या मार्गांत जावळीपाशीं खानानें घोडदळ ठेवणें शक्य आहे. दळणवळण तोडणाऱ्या शत्रूचें सैन्य या वेळीं भरारीचें व सुटसुटीत अशा घोडदळाचें च असतें व त्याला

पायबंद लावण्यासाठीं आपल्याजवळ हि पायदळाऐवजीं घोडदळ च ठेवावें लागतें.

शत्रूच्या हालचालींचा विचार

अशा वेळीं प्रतिपक्षी हा घोडदळांची हालचाल कोणत्या दिशांनीं करतो व त्याच्या हालचाली कशा चालतात, आपण जर त्याच्या जागीं असतों, तर काय केलें असतें, इत्यादि सर्व गोष्टींचा विचार करावा लागतो. तसें च शत्रूच्या हालचालींना सोईस्कर अशा जागा कोणत्या आहेत व कोणत्या नाहींत हें हि लक्ष्यांत घ्यावें लागतें. हा सर्व विचार करून च खानानें आपलें घोडदळ जावळी जवळ ठेविलें असावें.

रघुनाथपंताची तुकडी

मागें सांगितल्याप्रमाणें जावळीकडे खानाच्या फौजेची उजवी बगल पसरलेली होती. तिच्यावर नेताजीनें पाठविलेल्या रघुनाथ बल्लाळ सबनिसानें आपल्या भरारीच्या व सुटसुटीत अशा घोडेस्वारांच्या तुकडीनें एकदम जोराचा व अचानक असा हल्ला करून तिचा सपशेल फन्ना उडविला. याप्रमाणें खानाच्या एका बगलेवर जोराचा हल्ला करून व तिला दाबून मारून दुसऱ्या बगलेवर [ मोरोपंत, जेधे इत्यादिकांच्या सैन्यानें ] हि जोराचे व अचानक हल्ले करून, त्या विस्कळीत व तितर भितर पसरलेल्या ( out of hand ) बगलेला चुरडून टाकण्याच्या कामीं महाराजांनीं जी धडाडी, समयसूचकता व दूरदर्शीपणा दाखविला त्याचें कोणास कौतुक वाटणार नाहीं ? असल्या प्रकारचे गुण फार च थोड्या सेनापतींच्या अंगीं असतात.

---

१. शे. ब. ३०; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ६७.

रघुनाथपंतानें जी पलटी ( turning ) हालचाल केली, ती व नेताजीनें जी बगली ( enveloping ) हालचाल केली ती, या दोन्ही हालचाली जवळ जवळ सारख्या च प्रकारच्या होत्या. रघुनाथ पंताच्या हल्ल्यानें खानाच्या उजव्या बगलेला पलटी ( turn ) खावी लागली व तिचा खानाच्या कोयनेच्या जवळील मुख्य सैन्याशीं व डाव्या बगलेशीं असलेला संबंध तुटला. या च वेळीं पंतानें खानाचा जावळी ते वांई हा दळणवळणाचा मार्ग हि तोडून टाकला. त्यामुळें खानाच्या कोयनापार, जावळी किंवा जनीचें टेंब येथील पळ्यांना वांईस पिछेहाट करण्यास रस्ता राहिला नाहीं. त्यामुळें ते वाटेल तिकडे पळाले. याप्रमाणें पंताच्या सुटसुटीत व भरारीच्या घोडदळाच्या तुकडीनें खानाच्या जावळीच्या सैन्याची बगल पूर्णपणें दडपून तिचा धुव्वा उडविला.

**रघुनाथपंताची पलटी हालचाल**

जावळीच्या या बगलेच्या फौजेंत खानाचे किती लोक कामास आले व किती जखमी झाले, तसें च महाराजांकडील ही संख्या कितपत होती, त्यांची नक्की नोंद आढळत नाहीं. कोयनापारच्या लढाईंत, बहुधां, ही संख्या धरली असावी. तसें च जावळीच्या लढाईंत मिळालेलीं हत्यारें, दारूगोळा, घोडे वगैरेंचा हि समावेश कोयनापारच्या लढाईंतील त्या त्या बाबींत झाला असावा. तसें च या जावळीच्या युद्धांत पकडलेल्या कैद्यांची संख्या कोयनापारच्या लढाईंतील कैद्यांत धरली गेली असावी. पुरेपूर माहितीच्या अभावीं, मिळालेल्या माहितीच्या आधारांवर इतपत या लढाईची हकीकत दिली आहे.

**कामास आलेले व जखमी लोक**

---

# प्रकरण ८ वें

## १. वांईची लढाई[१]

गडाच्या वायव्येस अडीच तीन मैलांवर कुडेसराच्या पठारावर नेताजी पालकर हा आपल्या पांच हजार घोडदळासह राहिला होता. त्याजवर पुढील प्रमाणें कामगिरी सोंपविली होती.

नेताजीची कामगिरी व स्थळ

तोफेचा बार झाल्याबरोबर त्यानें आपली एक तुकडी जावळी येथें असलेल्या खानाच्या सैन्याच्या एकदम उजव्या बगलेवर ( extreme right flank ) पाठवून हल्ला करावयाचा व त्या च वेळेस मोरोपंत, जेधे वगैरे मंडळी, जी खानाच्या समोरून व डावीकडच्या बगलेवर हल्ला करतील त्यांना अशा प्रकारें मदत करावयाची, आणि अशा रीतीनें खानाच्या कोयनापार येथील फौजेस तीन्ही बाजूंनीं घेरून टाकावयाचें. अशी ही एक तुकडी, रघुनाथ बल्लाळ सबनीस यांच्या हाताखालीं पाठवावयाची होती. या नंतर नेताजीनें स्वतः आपल्या सर्व घोडदळासह ( आणखी जास्त तुकड्या जावळीस पाठविण्याची गरज नाहीं, असें हेराकडून समजावून घेऊन) थेट वांईवर जाऊन तेथील खानाच्या मुख्य फौजेवर व तळावर तुटून पडावयाचें.

---

१. शे. ब. ३०; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २.६७.

**२. नेताजी, खानाचे पिछेहाटीचे मार्ग रोखून** ( threatens ) **उपयोगांत आणतो:**

गडावरची तोफ सुमारें पावणेपांच वाजतां झाली. ती ऐकल्याबरोबर, नेताजीनें आपली एक तुकडी रघुनाथपंताच्या हाताखालीं जावळीकडे पाठविली. त्या वेळेस हेराकडून जास्त तुकड्या जावळीवर पाठविण्याची गरज नाहीं असें समजल्यावरून, नेताजी हा आपल्या सर्व घोडदळ फौजेनिशीं वांईकडे दौडत निघाला. जातां जातां त्यानें बोचेघोळीच्या घाटांत बाबाजी भोंसल्यास सूचना देऊन व तेथें जास्त मदतीची गरज नाहीं असें पाहून तो पुढें गेला. हा घाट कोयना पार ते वांईच्या मधील ज्या रस्त्यानें खान पारास आला होता त्या रस्त्यावर आहे. खानाची फौज कोयनापारहून वांईकडे पीछेहाट करील तेव्हां, अथवा पळून जाईल तेव्हां, तिला अडथळा करून तिची व वांई येथील फौजेची भेट न होऊं देण्याचें काम या घाटांत ठेवलेल्या बाबाजी भोंसल्यावर सोंपविलें होतें; व त्यास जावळी येथें राहून रघुनाथपंतानें मदत करावयाची होती. नेताजीचें घोडदळ जें वांईकडे निघालें, त्यामुळें कोयनापारच्या फौजेला वांईकडे पिछेहाट करण्याची सोय राहिली नाहीं. कारण नेताजीचें घोडदळ त्या च रस्त्यानें वांईकडे जात असल्यामुळें, खानाचें पराभव झालेलें व बेहिंमत झालेलें सैन्य किंवा पळे मुद्दाम त्या च दिशेनें वांईकडे जाणें शक्य नव्हतें. मध्यें च बाबाजीनें व रघुनाथपंतानें एकदां अडविल्यामुळें पुढें हि अशी च कांहीं भानगड उपस्थित होण्याचा संभव असावा, अशी धास्ती ह्या पळपुटया फौजेनें घेतली असावी. अशा तऱ्हेनें, नेताजीच्या ह्या सर्व सामान्य राखीव सैन्याची ( general reserve ) चाल करून जाणारी रांग ( line

of advance) खानाच्या लढाऊ सैन्या (battle front) च्या बगलेनें च ( flank ) असल्यामुळें, खानाच्या पराभूत फौजेच्या पिछेहाटीचा मार्ग ( line of retreat ) आपोआप च धोक्यांत आला ( threatened ) व ते रस्ते खानाच्या लोकांना पिछेहाट करण्यास उपयोगी पडले नाहींत हें उघड आहे.

३. **सर्वसाधारण राखीव सैन्याचें कूच** ( advance of general reserve. ):

सर्व साधारण राखीव सैन्याची ( general reserve ) चाल ( advance ) केव्हां हि अगदीं पूर्ण अचानकपणाची ( surprize ) झाली पाहिजे, व तिचा हल्ला अतिशय जोराचा ( utmost vigour ) झाला पाहिजे. तसें च तिचा हल्ला दांडग्या निश्चयानें व चिकाटीनें केला पाहिजे. ह्या सैन्यांतील प्रत्येक शिपायांत ही भावना असली पाहिजे कीं, शत्रूला रणांगणांतून नामोहरम करून हांकून लावण्याकरितां च आपल्याला पुढें चाल करून जावयाचें आहे.

नेताजीची चाल व हल्ला अगदीं पूर्ण अचानक असा झाला. वांई येथील खानाच्या फौजेला कांहीं एक अंदाज व मागमूस नसल्यामुळें ह्या हल्लयानें तिचा सपशेल पराभव झाला. कारण खानानें अथवा त्याच्या वांईच्या सेनापतींनीं पुढील गोष्टींचा चौबाजूंनीं अगाऊ विचार करून ठेवलेला दिसत नाहीं. आसपासचा डोंगराळ मुलूख, महाराजांसारखा हुन्नरबाज गनिमी काव्याचा जनक असा प्रतिस्पर्धी, त्यांचे डावपेंच, त्यांचें सुसंघटित व सुटसुटीत सैन्य, त्यांची कर्तबगारी, व भरारी आणि त्यांचे एकंदर गुणावगुण, त्यांच्या सैन्याला ह्या प्रदेशांतली असलेली खडानखडा माहिती वगैरे सर्व मुद्दे लक्षांत घेऊन हि, मरा-

ठ्यांनीं जर वांई येथें आपल्यावर हल्ला केला, तर त्यांच्या बचावासाठीं, आपण काय काय तजविजी करून ठेवल्या पाहिजेत, ह्याचा खानानें व त्याच्या वांई येथील सेनापतींनीं सर्व तऱ्हेनें पूर्ण विचार न केल्यामुळें खालील प्रसंग ओढवला व असा विचार केला असला तरी महाराजांनीं आपल्या युद्धकलाचातुर्यानें तो हाणून पाडला.

**४. नेताजीचा अचानक हल्लाः**

वांईच्या मुसुलमानी फौजेला जर नेताजीच्या चालीची व हालचालींची खबर अगाऊ लागती तर तिनें बचावाची तयारी न करतां चढाईचें धोरण घेऊन तत्काळ गडाच्या रोखानें जावयास पाहिजे होतें. कारण कोयनापार येथें खुद्द खान व त्याची फौज तळ देऊन राहिली होती. तेव्हां त्या फौजेला जाऊन मिळणें अथवा आपल्या दोहोंमधील अंतर होईल तितकें कमीं करणें, हें युद्धकौशल्याच्या दृष्टीनें (strategy) वांई येथील फौजेस जरूर होतें. कोयनापार येथील फौजेला न कळत, ही नेताजीची फौज आली असावी, असें हि वांईच्या फौजेस वाटलें असावें. दुसरें कोयनापारच्या फौजेला त्यांच्या चौक्या व पहारे चुकवून पत्ता व खबर न लागूं देता, त्यांच्या गोटाला म्हणजे उजव्या बगलेला दूर च सोडून, मराठी घोडदळ अचानक हल्ला करण्यास आलें आहे असें तरी त्यांस समजावयास पाहिजे होतें; किंवा तिसरें, कोयनापारच्या फौजेशीं मराठी फौजेची लढाई होऊन त्यांत कोयनापारच्या फौजेचा पराभव होऊन पूर्ण मोड झाला असावा व तो हि असा कीं त्याची खबर हि आपणास त्यांना देता आली नसावी. म्हणजे शत्रूनीं आपल्या व कोयनापारच्या फौजांमधील व्यवस्थितपणानें दळणवळण मोडण्याची पूर्ण व अवश्य अशी खबरदारी घेतली असावी. म्हणून च मराठी घोडदळ वाऱ्यासारखें

आपणांवर एवढ्या जोरानें व अनपेक्षित रीतीनें व अचानक येत आहे. अशा तऱ्हेचा विचार तरी वांई येथील सेनापतींनीं करावयास पाहिजे होता. परंतु हा विचार करावयाचा कोणत्या खबरीवर (intelligence)? वांई येथील तळाच्या छबीन्याच्या चौक्यापहारे ( out-post zone picquets) वाल्यांना मराठी घोडदळाची बातमी लागते न लागते तों च तिच्या बरोबर च मराठी घोडदळ तळावर तुटून पडलें. तेव्हां बातमी पोहोचविण्यास वेळ तरी कोठें राहिला ? म्हणजे या ठिकाणीं छबीन्याच्या चौक्या पहाऱ्यांची चूक नसून कोयनापार व वांई या मधील दळणवळणाच्या चौक्या पहाऱ्यांच्या लोकांची तरी चूक असावी किंवा एकंदरींत कोणाला हि कळूं न देतां मराठी घोडदळानें केलेलें भरारीचें कूच हें तरी कारण असावें. सारांश हा नेताजीचा वांई येथील खानाच्या तळावर झालेला हल्ला अगदीं अचानक असा होऊन तो पूर्णपणें यशस्वी झाला, एवढें बरीक खरें.

५. **खानाचा दळणवळणाचा अभाव** ( Khan's want of communication ):

कोयनापार आणि वांई येथील फौजांमध्यें नेताजीनें जोरानें घुसून व पाचर ठोकून ( interpose ) त्या दोंहोंतील दळणवळण तोडूं नये म्हणून, या दोन्ही फौजांनीं तावडतोब एकगठ्ठा होणें व नेताजीच्या फौजेस तोंड देण्यास तयार होणें, अवश्य होतें. एवढें च नव्हें तर, नुसत्या एकट्या वांईच्या फौजेनें, नेताजीच्या हालचालींची खबर लागल्याबरोबर चढाई घेऊन त्याजवर चालून जावयास पाहिजे होतें. परंतु तसें कांहीं घडून न येतां नेताजीनें च उलट वांई येथील फौजेवर हल्ला करून तिला उधळून लाविलें. त्यावरून नेताजीची घोड-

दळाची चाल व हल्ला (advance) अगदीं पूर्ण अचानक (surprize) व धडार्डीचा होता एवढें च नव्हें तर, वांई व कोयनापार यांमधील दळणवळण हि त्यानें तोडून टाकिलें होतें, असें म्हणावें लागतें. म्हणून वांई येथील खानाच्या सेनापतींना आपला प्रथमोपक्रम करण्याचें धोरण या वेळीं उपयोगांत आणण्यास संधि मिळाली नसावी. म्हणून त्यांना चढाई तर घेतां आली नाहीं च पण बचाव हि पुरतेपणीं करणें अशक्य झालें. ह्याचें कारण मराठ्यांच्या कोणत्या हि हालचालीसंबंधींच्या योग्य बातम्यांचा अभाव ( want of intelligence or reconnaissance ) हें होय.

## ६. सर्वसामान्य राखीव फौज व तोफखाना:

सर्व सामान्य राखीव फौजेच्या चालीबरोबर ( advance ) आजकाल नेहमीं, सुटसुटीत फौजा ( mobile units ) असतात. नेताजी बरोबर कांहीं जड ( मोठ्या ) तोफा होत्या किंवा नाहीं, हें समजण्यास नक्की साधन नाहीं तरी पण अशा भरारीच्या व सुटसुटीत फौजांबरोबर जड तोफा केव्हां हि नसतात. जर नेताजीबरोबर तशा जड व मोठ्या ( heavy or field guns ) तोफा होत्या असें क्षणभर मानलें तर त्या बरोबर च हा हि विचार करावा लागेल कीं, कुडेसरचें रान किंवा प्रतापगड जावळीपासून वांईपर्यंतच्या रस्त्यांत असलेले नदीनाले व त्यांचे फांटे, खराब जमीन, चढ वगैरे अडचणीमुळें या घोडदळाला अशा जड तोफा बरोबर घेऊन शत्रूला न कळूं देतां जलदीनें जाणें व वांईच्या फौजेवर अचानक हल्ला घालणें शक्य झालें नसतें. म्हणून असें अनुमान काढण्याला हरकत नाहीं कीं ह्या सुटसुटीत फौजेबरोबर जड तोफा नसाव्यात. परंतु डोंगरी तोफा म्हणजे जेजाला, जंबूर,

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा

सुतरनाळा या मात्र जरूर असाव्यात. कारण वांईला जाऊन त्यानें नुसती हातघाईची लढाई केली असें जरी मानिलें तरी, खानाच्या तळावरील इतर ( लढवय्ये व बाजारबुणगे यांना ) लोकांना जास्त जरब बसविण्याकरितां, या जेजाला वगैरेंचा विशेष उपयोग झाला असता. म्हणून त्या नेल्या असण्याचा संभव आहे. साध्या तरवारीपेक्षां तोफांचा परिणाम मुख्य हल्ल्याला जास्त परिणामकारक झाला असता. कापाकापी होण्यापूर्वी या लहान तोफांच्या माऱ्यामुळें नेताजीस जास्त फायदा झाला असता यांत कांहीं संशय नाहीं. तसें च त्याच्या घोडदळाबरोबर अशा उंटावरच्या व तट्टावरच्या व घोड्यावरच्या तोफा हि असत. तेव्हां त्या हि नेल्या असाव्यात हें च जास्त संभवनीय होय. कारण त्या जर तळावर च कुडेसरच्या रानांतील जागीं टाकून दिल्या असें म्हणावें तर त्यांच्या त्या घोडदळास उपयोग तरी केव्हां व्हावयाचा व त्या घोडदळाबरोबर मारा करण्याचा फायदा, मुद्दा व महत्त्व तरी काय ?

**७. चढाईचें धोरण :**

चढाईचें धोरण जें स्वीकारावयाचें तें फक्त सर्वसामान्य राखीव सैन्याच्या हालचाली व कूच (advance of the general reserve) यांच्या पुरतें स्वीकारावयाचें नाहीं, तर तें खालील प्रसंगीं हि स्वीकारावें लागतें:—

बचावाच्या निरनिराळ्या क्षेत्रांतील ( defence-line ) जें सैन्य व सेनापती असतील व ज्यांना अशा तऱ्हेची अनुकूल परिस्थिति व क्षेत्र मिळालें असेल त्यांनीं चढावाचें धोरणास योग्य व अनुकूल संधि येतां च एकदम चलाखीनें चढाई सुरूं करून चोहों

१८

बाजूंनीं सर्व सामान्य हल्ला ( general attack ), करावयाचा ठरला असेल तर त्याला एकदम मदत करण्याच्या प्रसंगीं निरनिराळ्या सेनापतींना बचावाच्या क्षेत्रांमधील ( defensive line ) जर कांहीं ठराविक काम करावयाचें किंवा ठराविक ठिकाणीं जावयाचें असेल, तर त्यांना मात्र ह्यांत भाग घेतां येणार नाहीं. तरी सुद्धां निश्चित जय ( decisive success) जर बचावाच्या क्षेत्रांत एखाद्या जागीं होत असेल, तर मात्र त्याचा फायदा घेऊन, या बचावाच्या क्षेत्रांमधील सेनापतींनीं चढाई घेणाऱ्या फौजेला, आप-आपल्या निरनिराळ्या जागा सोडून, शत्रूवर चारी बाजूंनीं एकदम तुटून पडून, त्याला माघार घेण्यास लावण्यासाठीं मदत केली पाहिजे.

**८. सर्व साधारण राखीव सैन्य नुसतें घोडदळ कां ?**

घोडदळाच्या हल्ल्याला योग्य अशी जागा म्हणजे मैदान होय. कारण पहाड किंवा डोंगर त्याला विशेष उपयोगी पडत नाहींत. त्याच्या अभावीं डोंगराळ व बिकट जागेंत हा हल्ला होऊं शकत नाहीं. कोयना-पारची फौज अशा बिकट जागीं होती. त्यामुळें नेताजीस आपल्या सर्व सैन्यासह तेथें अखेरचा हल्ला करितां आला नाहीं. शिवाय खानाच्या फौजेचा सगळ्यांत मोठा विभाग वांई येथें वीस बावीस मैलांवर असल्यानें, त्या फौजेवर पायदळ पाठविणें म्हणजे वेळेचें, जमिनीच्या मांडणीचें व प्रदेशाचें महत्त्व न जाणण्यासारखें झालें असतें[1]. व या वेळीं युद्धांत यश मिळविण्यासाठीं तर तिचें च महत्त्व जास्त होतें. म्हणून या वेळीं पायदळापेक्षां घोडदळ च वांईस लवकर पोहचलें

१. शि. भा. अ. २३ श्लो. २९

असतें. एवढ्या च साठीं महाराजांच्या सर्व साधारण राखीव फौजेमध्यें पायदळ नसून घोडदळ होतें[1] व पायदळ च असल्यास तें जावळीच्या टापूंत रघुनाथ बल्लाळ घेऊन गेला असेल, कारण तो जावळीकडे गेल्याचा उल्लेख आहे. या सर्व साधारण राखीव फौजेमध्यें नेहमीं च घोडदळ असतें असें नाहीं, तर प्रसंगानुसार तोफखाना व पायदळ हीं कांहीं प्रमाणांत असतात. किंवा कधीं कधीं जितकी जास्त फौज हातांत ठेवतां येईल तितकी हि यांत असते. नेहमीं घोडदळाच्या सेनापतीचा सर सेनापतीशीं ( commander-in-chief ) संबंध असावा लागतो. कारण घोडदळाचा उपयोग केव्हां करावयाचा हें ठरविण्याचें काम सर सेनापतीचें असतें, इत्यादि माहिती पूर्वीं सांगितली च आहे.

**९. बचाव व राखीव फौजः**

महाराजांच्या बेताप्रमाणें त्यांनीं आपल्या फौजेची जी वांटणी केली होती ती त्यांच्या प्रथम बचाव करून नंतर चढाईच्या योजनेला (defensive & offensive plan) किंवा चढाईच्या बचावाला (active defense ) अगदीं परिपोषक अशी च होती. ज्या वेळीं लढाईंत अनपेक्षित अशा प्रसंगांना तोंड द्यावयाचें असतें ( शत्रूची फौज अचानकपणें कोणत्या हि एका बाजूनें आपल्या फौजेवर एकदम चालून येईल असा अंदाज असतो ) त्या वेळीं युद्धकलाकुशल असा सेनापती त्या च बाजूकडे व बगलेकडे आगाऊ आपली सर्वसाधारण राखीव फौज ठेवितो व तशी ठेविली नसल्यास वेळेवर तेथें आणवितो. बहुतेक प्रथमपासून च मुख्य फौजेची एक चपळ व सुटसुटीत तुकडी (mobile column)

१. शि. भा. अ. २३ श्लो. ७–८.

( साधारणपणें घोडदळ), अशा कामाकरितां राखून ठेविलेली असते. अशा तऱ्हेनें बचावाच्या लढाईसाठीं फौजेची विभागणी सर्व सामान्य-पणें करण्यांत येते.

**१०. सर्वसाधारण राखीव फौज व हल्ला:**

बचावाचें धोरण सोडून चढाईचें धोरण एकदम घेण्यास मुख्य सेनापती आपल्या सर्वसाधारण राखीव फौजेचा उपयोग लढाईंतील शत्रुपक्षाच्या अघाडीच्या क्षेत्रांत (front-line ) कोणत्या तरी कमजोर ठिकाणावर करीत असतो. मग तें ठिकाण आपल्या आघाडीच्या क्षेत्रांतील कमजोर स्थळ ( point ) असो, किंवा शत्रूच्या अघाडीच्या क्षेत्रांतील एखादें कमजोर स्थळ असो. अशा ठिकाणीं सर्वसाधारण राखीव फौजेचा उपयोग करणें जितकें महत्वाचें आहे, तितकें च तें अत्यंत कठीण हि आहे. सर्वसाधारण राखीव फौजेचा उपयोग करण्याची योग्य संधि बऱ्या च वेळां येते. ज्या वेळीं शत्रूची सर्व राखींव फौज कामांत येऊन चुकली असेल, किंवा आपलें अघाडीचें बचावाचें क्षेत्र ( defensive line) तोंडण्यांत गुंतली असेल, किंवा आपल्या फौजेच्या हालचालीमुळें (disposition) आपली अघाडी फार लांबलचक पसरलेली आहे असा शत्रूचा समज झालेला असेल, आणि अशा प्रसंगीं जर शत्रूच्या हातून चुका होत असतील किंवा झाल्या असतील, तर या सर्व वेळीं सर्व साधारण राखीव फौजेचा उपयोग करण्याची योग्य व अनुकूल संधि असते.

**खानाची घोडचूक**

महाराजांची सर्व फौज प्रतापगडाच्या जवळपास नसून फार दूरवर पसरलेली आहे असें समजण्यांत खानाची मोठी चूक झाली. ह्याकरितां आपल्या फौजेचे निरनिराळे भाग करणें

म्हणजे (strategy) युद्धकौशल्यांतील (division of force) सैन्य विभागणीचें तत्व ह्या वेळीं येथील परिस्थितीला लावणें व त्याप्रमाणें फौजाचे विभाग करणें त्याला विशेष चुकीचें वाटलें नाहीं. म्हणून त्यानें आपली मुख्य फौज वांई येथें ठेविली, व त्यापैकीं एक मोठा विभाग बरोबर घेऊन तो कोयेनापार येथें आला आणि त्यांतून हि १५०० ची तुकडी घेऊन तो पुढें गेला. अशा तऱ्हेनें त्यानें आपल्या सैन्याचे निरनिराळे भाग केले होते.

**११. महाराजांची सर्वसाधारण राखीव फौज व योग्य संधिः**

जर महाराजांनीं लढाई करण्याचें मनांत आणलें, तर त्यांची दूर असलेली फौज सांवरून एकगठ्ठा होई पर्यंत किंवा आपल्या फौजेवर चालून येईपर्यंत आपण या ठिकठिकाणच्या फौजा सांवरून व आंवळून घेऊं शकूं असा कदाचित् खानानें विचार केलेला असावा. म्हणून च वांईहून, म्हणजे अघाडीच्या कोठीहून, वीस मैलांवरील कोयनापार येथें आपली फौज ठेवण्यास त्यांस भीति किंवा चूक वाटली नाहीं. मात्र या त्याच्या चुकीचा फायदा, चढाई करून व सर्वसाधारण राखीव फौजेचा योग्य असा उपयोग करून महाराजांनीं मिळविला.

खानानें केलेल्या चुक्यासारख्या चुक्यांचा फायदा वाटेल तेव्हां घेतां येतो. मग ती संधि युद्ध सुरू होण्या पूर्वी येवो अथवा युद्ध सुरू झाल्यावर मिळो, किंवा दरम्यानच्या काळांत मिळो. ह्या ठिकाणीं असली संधि महाराजांना युद्ध सुरू होण्यापूर्वी च मिळाली, व तिचा त्यांनीं योग्य फायदा घेतला. बचावाची लढाई करणारा जेव्हां चढाईचें धोरण घेऊन शत्रूवर हल्ला करावयाचा असें ठरवितो; तेव्हां कोणी-कडून व कोणच्या बाजूनें हल्ला चढविणें सोपें व सोईचें जाईल हें तो

आपली व शत्रूची एकंदर पुढील युद्ध करण्याची परिस्थिती ( stratagical situation ), सैन्याची मांडणी व भौगोलिक परिस्थिती यांवरून ठरवितो. जरी शत्रूच्या अघाडीच्या क्षेत्रांच्या रांगेचे मधोमध कधीं कधीं हल्ला करण्याची संधि मिळाली, तरी पण बहुतेक शत्रूच्या कोणत्या तरी बगलेवर जाऊन तेथें एखादा जोराचा, निकाल लावणारा प्रतिहल्ला ( decisive counter stroke ) करतां आला, तर हा हल्ला दुसऱ्या प्रतिहल्लयापेक्षां जास्त चांगला असतो. कारण, ह्यामुळें शत्रूच्या पिछेहाटीचे मार्ग पुष्कळ अंशीं धोक्यांत आणले जातात.

**१२. खानाची वांईची फौज व स्थिति :**

खानानें वांई येथें वीस-बावीस हजार फौज ठेविली होती. त्यांत तोफखाना, पायदळ व घोडदळ होतें. तोफखान्याच्या मजबुतीच्या संरक्षणाकरितां लढाऊ फौज हि अगदीं अवश्य असते व आहे म्हणून वांई येथें मोठी च फौज असली पाहिजे. शिवाय वांई ही त्याची अघाडीची कोठी च होती. तेव्हां तेथील रसद व पुरवठयाचे सांठे, दारूगोळ्याचे बारुदखाने, त्याचा खजिना व बाजारबुणगे ( followers) ह्यांचे संरक्षणासाठीं व वांई हें विजापुरचें सरहद्दीचें लष्करी ठाणें असल्यामुळें तेथें फौज, पायदळ व घोडदळ बरें च मोठें असावें असें अनुमान आहे. तोफखान्यामध्यें जड तोफा व कांहीं हलक्या तोफा होत्या. वांई येथें असलेल्या या फौजेंत मुसुलमान सेनापती आणि शिवाय भोंसले, जगताप, घाटगे, इंगळे, पांढरे, बेंदरे, काटे, खोपडे, वगैरे मराठे

१. इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २ ७२–७३.

सरदार आपल्या पथकांनिशीं हजर होते. गुरुवारच्या दिवशीं संध्याकाळीं खान महाराजांची भेट घेणार हें ठरलें होतें. आज खान हा शिवाजीला दगा करून पकडणार व विजापुरला घेऊन जाणार ह्या आनंदानें हें सर्व सैन्य ख्यालीखुशालींत व मौजेंत वेळ घालवीत होतें.[1] त्यांना ही कल्पना हि नव्हती कीं, खानाचा डाव उलटून महाराजांची फौज आपल्यावर चालून येणार आहे. शिवाय मागें सांगितल्या प्रमाणें कोयनापार व वांई ह्यांमध्यें उत्तम दळणवळण नव्हतें, त्यामुळें खानाचा निकाल लागल्यानंतर ती बातमी ह्या सैन्यास मिळून तें सावध होण्यास सवड हि झाली नाहीं. डोंगरांतल्या उंदराला विजापुरचा बोका पकडणार, ह्या मनोराज्यांत तें गुंग असतां, सह्याद्रींतल्या वाघांनीं त्याच्यावर शठाशीं शाठ्य ह्या न्यायाप्रमाणें अचानकपणें झडप घातली ! ती रात्रीची (dusk or dawn) वेळ होती. तेव्हां लष्करचे लोक आपापल्या खाण्यापिण्याच्या तजविजीस लागले होते. सैन्याच्या संरक्षणार्थ ठेवलेल्या चौक्या पहाऱ्यांतील लोक आपापल्या कामावर होते. इतक्यांत एकाएकीं मराठ्यांचा "हरहर महादेव" ऐकूं आला !

**१३. नेताजीचा अचानक हल्ला** ( Netaji surprizes Khan's force ) :

सायंकाळीं सुमारें पावणेपांच वाजतां तोफ झाल्याबरोबर नेताजी कुडेसरच्या पठाराहून निघाला. तो ज्या रस्त्यानें आला तो सर्वांत जवळचा रस्ता होता. त्याची चाल साधारण दौडीची ( trot ) होती. डोंगराळ मुलखांत असल्या दौडीचा वेग साधारण ताशीं ५-६ (क्वचित् थोडासा

---

१. शि. भा. अ. २० श्लो. ४८.

जास्त ) मैल प्रमाणें असतो, व सपाट प्रदेशांत ८–१० मैल असतो· लांबच्या प्रवासाच्या वेळेस ८-१० मैल असतो पण अगदीं जवळचा च प्रवास करावयाचा असेल तर तो २०–२५ मैल हि असूं शकेल. ह्या वेगानें वांई येथें पोहोंचण्यास अंदाजें चार तास लागले असतील, म्हणजे पावणे-पांचाला निघून तो साडेआठ ते नऊच्या दरम्यान वांई येथें आला असावा ( वाटेंत प्रत्येक तासास पांच मिनिटें त्यानें आपल्या घोडदळास विश्रांति दिली असावी ). खानाच्या फौजेवर हल्ला करण्याच्या पूर्वी थोडी जास्त विश्रांति घेऊन आपल्या निरनिराळ्या सेनापतींना खानाच्या फौजेवर एक-दम कसें चालून जावें ह्याची पूर्ण कल्पना देऊन, नंतर त्यानें जोरानें शेवटच्या विश्रांतिस्थानापासून कूच केलें आणि वर सांगितल्याप्रमाणें नऊ वाजण्याच्या सुमारास खानाच्या फौजेवर एकदम जोराचा हल्ला चढविला (तेथील परिस्थिती प्रमाणें जर शत्रू रात्रींच्या वेळेस ( dusk ) जागृत असेल तर त्यानें पहांटेच्या वेळेला हल्ला चढविला असला पाहिजे).

**१४. लढाई सुरू झाली:**

खानाची कांहीं फौज कृष्णेला उजवीकडे व कांहीं पाठीकडे घालून, वांईच्या दक्षिणेस कृष्णापार पसरली होती. त्यामुळें नेताजीला कुडेसर पासून कोठेंहि कृष्णा न उतरतां सरळ खानाच्या फौजेवर चालून जातां आलें. त्यानें सपाट्यासरशीं प्रथम खानाच्या डाव्या बगलेवर हल्ला केला. खानाचे लोक हा हल्ला परतविण्यास मुळीं च सावध नव्हते. कदाचित् त्यांच्या चौकी-पहारेवाल्यांनीं येऊन त्यांना बातमी दिली असेल. परंतु नेताजीचा हल्ला इतका जोराचा व अचानक होता कीं, चौकीदारांची बातमी येऊन खानाचें सैन्य तयार होतें न होतें तों च, नेताजी त्यांच्या-वर येऊन आदळला. त्यामुळें गोळागोळीला सवड च राहिली नाहीं व

तोफांचें हि काम फारसें पडलें नाहीं; आणि खानाच्या लोकांना हातघाईची च लढाई शेवटीं आपला बचाव करण्याकरितां करावी लागली. पण त्यांची हिंमत नेताजीच्या जोराच्या अचानक हल्ल्यामुळें प्रथम च खचून गेली होती; त्यामुळें ओढून ताणून आणलेलें धैर्य व अवसान फार वेळ टिकलें नाहीं व थोड्या च वेळांत त्यांची दाणादाण झाली. शिवाय त्यांच्या सेनापतींना त्यांना सांवरून व आंवळून एकगठ्ठा करण्यास व कांहीं तरी आडाखा (plan) करून किंवा ठरवून ठेवलेला आडाखा अंमलांत आणण्यास व सैन्याला हुकूम देण्यास सवड हि सांपडली नाहीं; कारण हल्ला येण्यापूर्वीं, निरनिराळ्या पथकांतले लोक, त्यांतल्यात्यांत मुसुलममान लोक, तर आराम करण्यांत जास्त च गुंग झाले होते. कारण तो दिवस गुरुवारचा होता.

**गुरुवार निवडण्यांत महाराजांचें चातुर्य**

मुसुलमानांमध्यें गुरुवारच्या दिवशीं गाणें बजावणें व नाच तमाशे करितात व फकीर वगैरे लोकांच्या कबरींची पूजा करितात. कारण गुरुवार हा दिवस त्यांच्यांत पवित्र व सुट्टीसारखा मानला जातो. वांईहून निघाल्यानंतर मध्यें २ दिवस घालवून महाराजांनीं गुरुवारीं च खानाची भेट घेण्याचें च आपलें एकंदर कार्य त्या च दिवशीं आटोपण्याचें कां ठरविलें त्याची फोड ही अशी आहे. यावरून दिवस ठरविण्यांत हि महाराजांचें चातुर्य दिसून येतें.

ह्या कारणास्तव इतस्ततः पसरलेल्या आपल्या सैन्यास खानाच्या सेनापतींना एके ठिकाणीं ताबडतोब आणतां आलें नाहीं व पुन्हां एकत्र होऊन दुसऱ्यांदा जें शत्रूस तोंड द्यावें लागतें, तें त्यांना साधलें नाहीं. तरी पण ज्यांना साधलें त्यांनीं तोंड देण्यास कमी केलें नाहीं.

पण मराठ्यांचा जोर फार, त्यांतल्या त्यांत वेळ साधारण अंधाराची असल्या मुळें त्यांना आपले लोक व शत्रूचे लोक कोणते हें सुद्धां समजण्याची अडचण पडली व शेवटीं त्यांचें धैर्य अगदीं खचून जाऊन ते सैरावैरा पळूं लागले.

**१५. अंधकार—एक अडथळा** ( darkness as a hindering obstacle. )

ही लढाई जेव्हां संपत आली त्या वेळीं अंधार असल्यामुळें मराठ्यांना आपला पाठलाग करण्यास अडचणीचें जाईल असें खानाच्या फौजेस वाटून तिनें पळण्यास प्रारंभ केला. त्यांना पळण्याला किंवा त्यांच्या अव्यवस्थित माघारीला (disorderly retreat) फक्त साताऱ्याकडची बाजू तेवढी शिल्लक होती. त्यामुळें बरेचसे लोक त्या च बाजूनें गेले असावेत. खंडोजी खोपड्याच्या मदतीनें अफझलखानाचा मुलगा फाजलखान हा कसा बसा ३०० लोकांसह सातारा येथें जाऊन पोंहोचला. खानाच्या फौजेला मराठयांच्या निकडीच्या पाठलागापासून स्वतःचा बचाव करण्यांत अंधाराचा फायदा झाला असावा. नाहीं तर खानाच्या फौजेंत जखमी झालेल्यांची, ठार झालेल्यांची व कैद झालेल्यांची संख्या कितो तरी पटीनें होती त्यापेक्षां जास्त झाली असती. दिवस असता तर पाठलाग करणें मराठयांना सोपें झालें असतें व त्यामुळें खानाची पळणारी फौज थोडी सुद्धां सुरक्षितपणें विजापुरीं पोंहचतीना. दुसरे दिवशीं मराठयांनीं जरी पाठलाग सुरू केला असता तरी त्याला पहिल्या दिवसाची सर आली नसती; फार तर आणखी कांहीं पळे लोक ( deserters )हातीं सांपडले असते. पण तेवढ्यासाठीं दुसरे दिवशीं पाठलाग चालविण्यांत विशेष महत्त्व नव्हतें. सारांश, अशा रीतीनें ह्या लढाईचा शेवट झाला.

**१६. लढाईचा शेवट:**

दुसरे दिवशीं खानाच्या तळावरील शिल्लक राहिलेलें सर्व युद्धोपयोगी सामान मराठ्यांच्या हातीं लागलें. त्यांत मोठ्या तोफा, हत्ती, घोडे, दारूगोळा, रोकड धान्य वगैरें पुष्कळसें सामान होतें[1]. वांई हा आदिलशाहीचा सुभा असल्यामुळें, तेथें असलेला मूळचा च खजिना, धान्य वगैरे सर्व माल आयता च मराठ्यांच्या हातीं लागला. नेताजीनें तावडतोब वांई आपल्या कबजांत घेऊन, तेथील आदिलशाही अधिकाऱ्यांना हांकलून देऊन तेथें आपले अधिकारी नेमले आणि तो सर्व सामान, कैदी वगैरे घेऊन आपल्या फौजेसह प्रतापगडावर येऊन दाखल झाला. या लढाईंत महाराजांचे फार थोडे लोक मरण पावले व जखमी झाले.

या प्रमाणें या वांईच्या लढाईचा व एका दृष्टीनें अफझलखानाच्या एकंदर मोहिमेचा येथें शेवट झाला.

---

१. शि. भा. अ. २३. श्लो. २२.

# प्रकरण ९ वें

## समारोप

**१. युद्धकुशल सेनापतिः**

खानाची चौतीस पस्तीस हजार फौज बारा तासां मध्यें नामोहरम करून, स्वराज्यावर आलेलें संकट व आपल्या एकंदर ठरविलेल्या ध्येयावरील गंडांतर महाराजांनीं मोठ्या कुशलतेनें आतां पर्यंत सांगितलेल्या प्रकारांनीं पार पाडिलें, तें पाहून त्यांच्या अचाट बुद्धीचें कौतुक वाटतें. गुरुवारीं सकाळीं एकाद्यानें गडावरील परिस्थिती पाहिली असती व त्यानें च दुसरे दिवशीं शुक्रवारीं सकाळीं पुन्हां गडाकडे पाहिलें असतें, तर जणूं विशेष कांहीं घडलें च नाहीं, असें त्यास दिसून आलें असतें! इतक्या शांतपणें व आंखलेल्या बेतांप्रमाणें महाराजांनीं हें आलेलें संकट टाळलें होतें!

**२. सेनापतीचे आवश्यक गुण:**

असले प्रसंग इतक्या सुलभतेनें निभावून नेण्यास अंगांत अचाट कर्तव्यशक्ति व परिस्थितीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याचें सामर्थ्य असावें लागतें. नुसतें सैन्य, हत्यारें, डावपेंच, वगैरे युद्धांतील अंगें व उपांगें ह्यांची पूर्ण माहिती असून च केवळ भागत नाहीं, तर त्या बरोबर च मनुष्य-स्वभावाचें अचुक ज्ञान हि असावें लागतें. नेपोलियन, अलेक्झांडर, हॅनिबॉल, सीझर, वगैरे युद्धकलाविशारदांचा इतिहास पाहिला असतां काय आढळून येतें? सैन्याची हालचाल, डावपेंच, पुरवठ्याचा बंदोबस्त, चढाईची अथवा बचावाची लढाई ह्यांचा हे लोक नुसता च विचार करीत नसत. ह्या गोष्टी युद्धशास्त्रां-

तील मुख्य बाबी च आहेत. परंतु त्या शिवाय सुद्धां ह्या सेनापतींच्या युद्धांच्या इतिहासांत आणखी एक गोष्ट विशेष आढळून येते, ती म्हणजे युद्धाच्या वेळची एक विशिष्ट परिस्थिति व त्या परिस्थितींत असलेल्या आपल्या व शत्रूकडील लोकांच्या स्वभावाचें ज्ञान ही होय. कडक शिस्तीनें, भीतीनें, अन्नाच्या टंचाईनें, विश्वासानें, गैरविश्वासानें इत्यादि गोष्टींमुळें कोणत्या माणसावर कोणता परिणाम होतो, कोणाचे हित-संबंध कोठें गुंतले आहेत, कोणत्या राजकीय परिस्थितीमुळें आपल्याला हवे ते परिणाम ह्या लोकांच्या मनावर घडवून आणतां येतील वगैरे बारीक सारीक गोष्टींचें उत्कृष्ट ज्ञान असल्या सेनापतींच्या अंगीं असावें लागतें. नुसत्या सैन्याच्या यांत्रिक हालचाली व त्यांचे डावपेंच ह्यावर च अवलंबून न रहातां मनुष्य–स्वभावाची परीक्षा व जेणें करून त्यांच्यांत नैतिक जोम वाढेल अथवा खचवितां येईल वगैरे गोष्टींकडे हि अवश्य लक्ष्य द्यावें लागतें. असल्या गोष्टीं ज्याला करतां येतात त्याचा वचक शत्रूसैन्यावर बसतो व तो आपल्या सैन्याचा आवडता होतो. असा माणूस नुस्ता सेनापती च नसतो तर तो मोठा मुत्सद्दी हि असतो आणि असला सव्यसाची पुरूष म्हणजे एखाद्या ४०।५० हजार सैन्याच्या बरोबरीचा असल्यानें तो ज्या बाजूस असेल त्या बाजूस हटकून जय मिळतो!

**शिवाजी महाराज व नेपोलियन**

नेपोलियन विषयीं असें सांगतात कीं, स्वतः नेपोलियन म्हणजे च चाळीस हजार सैन्य होतें! इतका त्याचा वचक त्याच्या शत्रूवर बसला होता. महाराज हि त्याच योग्यतेचे पुरुष होते. पण नेपोलियनला स्वतःच्या महत्वाकांक्षेकरितां सिंहासन पाहिजे होतें, तर उलट महाराजांना गोब्राम्हणांच्या प्रतिपालनाकरितां वा हिंदुधर्माच्या पुनरुज्जीवना करितां

स्वराज्य स्थापावयाचें होतें! त्यामुळें असल्या कामीं ईश्वराचा जो आदेश मिळत असतो व असल्या कार्यांत जें भगवंताचें अधिष्ठान असतें तें महाराजांच्या पाठीशीं होतें तसें तें नेपोलियनच्या नव्हतें आणि त्यामुळें नेपोलियनचा जसा शेवटीं पाडाव झाला तसा महाराजांचा न होतां त्यांना उत्तरोत्तर यश च येत गेलें! सारांश, शत्रूचें संख्याबल, हत्यारें, किंवा डावपेंच ह्यांना विशेष महत्त्व न देतां, त्यांच्या व आपल्याकडील मनुष्यस्वभावाच्या निरीक्षणाचें काम महाराज विशेष बारकाईनें करीत व त्यांवर आपली योजना ठरवीत. कृष्णाजी भास्करास धर्माची व स्वराज्याची ओळख करून देऊन त्याला आपल्या बाजूस कसा वळवून घेतला व त्याच्याकडून खानाचा गुप्त बेत कसा काढून घेतला हें मागें सांगण्यात आलें च आहे. ह्या प्रमाणें माणसाच्या मनाचा (weak point) दुर्बलपणा कोणत्या गोष्टींत आहे, तें ताडून त्यावर घाला घालून आपलें कार्य साधून घेणें हें फार कठीण काम असतें; पण तें महाराजांना साधलें होतें!

**३. युयुत्सूचें कर्तव्यः**

ज्या कोणा महाराष्ट्रियास युद्धकलेचा अभ्यास करावयाचा असेल त्याला महाराजांच्या या चरित्राचें सूक्ष्मपणें निरीक्षण करणें जरूर आहे. तसें च त्यांनीं लढविलेल्या डांवपेंचांची व मुत्सद्दीपणाच्या कृत्यांची माहिती अशा जिज्ञासूनें जरूर मिळविली पाहिजे. ह्यावर कदाचित् अशी शंका येईल कीं, आज या माहितीची काय जरूर आहे? कारण, त्या वेळच्या युद्धाच्या स्वरूपांत व सांप्रतच्या स्वरूपांत पुष्कळ फरक पडला आहे. आजच्या सारख्या लांब माऱ्याच्या प्रचंड तोफा, यांत्रिक तोफा, विमानें, चिलखती मोटारी, विषारी धूर वगैरे युद्धाचीं साधनें त्या वेळीं

अस्तित्वांत नव्हतीं. तेव्हां त्या वेळचे उपाय आज कसे उपयोगीं पडतील ? या शंकेस असें उत्तर आहे कीं, युद्धांचीं साधनें जरी पूर्वींपेक्षां थोडी फार वाढलीं असलीं तरी एकंदर युद्ध-शास्त्रांतील ठराविक नियम व तत्वें यांत फारसा फरक पडलेला नाहीं. त्यामुळें महाराजांच्या वेळचीं धोरणें व डांवपेच थोड्या फार फरकानें आज हि अमलांत आणतां येतील ! अजून हि ते च डांवपेच व त्या च हालचाली आतां हि कराव्या लागतात व पुढें हि कराव्या लागतील ! त्या लढाया, तीं युद्धें जरी प्रथम दर्शनीं फार जुनीं पुराणीं वाटलीं, तरी देशाची भौगोलिक परिस्थिती बदलत नसल्यामुळें, तींच आपणास मार्गदर्शक व बोधपर आहेत, हें विसरतां कामां नये. ह्या साठीं आजच्या प्रसंगीं हि महाराजा सारखा मुत्सद्दी व योद्धा मार्गदर्शक मानण्यांत कांहीं हि अडचण नाहीं. युद्धशास्त्रांत पारंगत होऊं इच्छिणाऱ्या महाराष्ट्रांतील लोकांना महाराजांचें चरित्र उदाहरणा दाखल होईल. ज्या प्रमाणें नेपोलियन, अलेक्झांडर, सीझर, हानीबाल हे परकीय तद्देशजांना मार्गदर्शक झाले, अथवा इंग्रजांना मार्लबरो व वेलिंगटन हे पुढारी लाभले, किंवा फ्रेंचांना नेपोलियन, अमेरिकेंतील लोकांना वाशिंगटन लाभले त्या च प्रमाणें मराठ्यांना जर कोणी युद्धशास्त्रांत गुरुस्थानीं असतील तर ते शिवाजीमहाराज, महादजी शिंदे, थोरले बाजीराव, परशुराम-भाऊ व बापू गोखले हे होत. जॅक्सन, ली, ग्रँट, यांचीं उदाहरणें डोळ्यां-समोर वाटल्यास ठेवावीं. परिस्थितीभेदामुळें व आपल्या समोरील सेना-पतीच्या वकुबा प्रमाणें लढाईतले डांवपेंच बदलत असतात. एका च जागीं लढवलेला डांवपेंच तंतोतंत दुसऱ्या जागीं लागू पडणार नाहीं. सामनेवाला ज्या स्वरूपाचा असेल त्याला अनुसरून महाराज आपले

डांव टाकीत असत. त्यामुळें त्यांच्याशीं युद्ध खेळण्याकरितां जे सेनापती येत, त्यांना महाराजांच्या संपूर्ण युद्धशास्त्राची केव्हां च माहिती मिळाली नाहीं व त्यांच्या सर्व योजना ( methods ) हि त्यांना पूर्ण अवगत झाल्या नाहींत.

**४. युद्धकौशल्य व हिकमतः**

उदाहरणार्थ, प्रतापगडच्या युद्धांत उपयोगांत आणलेल्या योजना व वणी दिंडोरीच्या लढाईत येखलासखान व मोहबतखान या सेनापतीं-च्या विरुद्ध योजलेल्या योजना अगदीं निराळ्या होत्या ! पन्हाळा येथें सिद्दीजोहारास दाखविलेला गनिमी कावा एक होता, तर पुण्यास लाल महालांत शाहिस्तेखानास लाविलेली शास्त (शिक्षा) निराळी होती ! ह्या प्रमाणें महाराजांनीं निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या सेनापतींशीं तोंड देऊन निरनिराळे डांवपेच लढविले होते. आणि आश्चर्याची गोष्ट ही कीं, त्यांनीं मारलेल्या लढायां पैकीं एका हि लढाईत त्यांना पराजय मिळाला नाहीं ! कांहीं लढायांत महाराजांनीं लढविलेले डांवपेच व हालचाली प्रथम-दर्शनीं इतके विलक्षण व अप्रासंगिक वाटण्याचा संभव आहे कीं, जर त्या हालचाली व ते डांवपेच दुसरा एखादा कोणी साधारण सेनापती करता ( मात्र त्या च वेळीं महाराज प्रतिपक्षाच्या सेनापतीच्या मनाची जशी परीक्षा करीत असत तशी न करता ) तर त्याला कदाचित् अप-यश हि येण्याचा संभव होता. वर वर पहाणारास असें वाटेल कीं, असल्या हालचालीनें खुद्द महाराजांना हि पराभव येऊं शकेल, कारण प्रतिपक्षाच्या सेनापतीनें महाराजांच्या ह्या हालचालींवर तोड म्हणून अमुक अमुक साधी हालचाल केली तर महाराजांचा त्यांत सहज पराभव होईल !

**५. तत्त्वांचें उल्लंघन व सेनापतिः**

परंतु असें म्हणणाऱ्यांची एक च चूक होत आहे, ती ही कीं, प्रतिपक्षाच्या सेनापतीला ते म्हणतात तसल्या प्रकारची अमूक च हालचाल करतां आली असती हें गृहित धरणें च मूळ चुकीचें आहे. कारण हीं साधी हालचाल प्रतिपक्षाच्या सेनापतीला करतां येणें शक्य नाहीं! महाराजांना त्या सेनापतीचा विशिष्ट डावपेंच, (peculiarities) परिस्थिती, त्याचा जोम व त्याचा स्वभाव ह्यांची माहिती पूर्णपणें आधीं च कळून चुकल्यामुळें, ते वेळेवर युद्धकलेचे नियम व डाव धाब्यावर बसवीत, पण शेवटीं शत्रूला जिंकीत असत! ह्यांत च त्यांचा मोठेपणा भरलेला आहे. नियमांचें व तत्त्वांचें मुद्दाम च उल्लंघन करून हि महाराजां सारख्या अचाट बुद्धीच्या सेनापतींना युद्धांत अपयश न येतां यश कसें येतें हें पाहिलें म्हणजे कळून येईल कीं, शत्रूचा कमजोरपणा विशेष कोठें व कशांत आहे, ह्याला च ते जास्त महत्त्व देत असत; तितकें शत्रूच्या संख्याबलास किंवा हत्यारें वगैरे साधनांना म्हणजे एक प्रकारें शारीरिक व यांत्रिक बलाला महत्त्व देत नसत. असले चतुर पुरुष, प्रतिपक्षाच्या सेनापतीच्या साशंकवृत्ती ( susceptibility ), भीति, ( apprehension ) दया व कमजोरपणा ( weak point ) चा पूर्ण फायदा घेतात. त्यामुळें ते आपली प्रत्येक हालचाल व डावपेंच असे लढवितात कीं, शत्रूच्या सैन्याच्या व सेनापतीच्या मनांत एक प्रकारची धडकी भरते व त्याचा नैतिक जोम, हिंमत व बळ कमी होतें!

**६. युद्धकुशल सेनापती व दैवः**

युद्धकलेंत ज्यांना विशेष गम्य नाहीं त्यांच्या लक्ष्यांत वरील गोष्टी न आल्यामुळें ते ह्यांना विशेष महत्त्व देत नाहींत. पण युद्धकलेच्या

१९

नियमांचें व तत्त्वाचें उल्लंघन करून हि महाराजांसारख्या सेनापतीला यश कां येतें असें विचारल्यास मात्र त्याचें समाधानकारक उत्तर त्यांना देतां येत नाहीं! परंतु युद्धकलेंत तरबेज असणाऱ्यांना महाराजांच्या जयाचें कारण वरील महत्त्वाच्या गोष्टींत आहे असें सांगतां येईल. इतरांना तें सांगतां न आल्यामुळें हे लोक महाराजांसारख्या सेनापतींना युद्धकुशल न मानतां नुसते दैववान् व भाग्यवान् असें म्हणून स्वस्थ बसतील. आतां एवढें खरें आहे कीं, कांहीं वेळां कांहीं सेनापतींना त्यांच्या नशीबानें व दैवानें हात दिल्यामुळें च त्यांना जय मिळाला. परंतु तेवढ्यानें माणसाच्या अंगांतील कमजोरपणाचें मर्मस्थान ( weak point ) अचूक शोधून काढून (युद्धशास्त्रांतील सामान्य नियम एकीकडे ठेऊन हि ) नेमका तेथें च टोला मारणें ह्याचें महत्त्व कमी होत नाहीं. मात्र हा अधिकार फार च क्वचित सेनापतींच्या अंगीं असतो. जे सेनापती युद्धांत नेहमीं च यशस्वी होतात त्यांना च दैववान् म्हणणें म्हणजे युद्धांत चातुर्याची गरज च पडत नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. युद्धाशीं संबंध असलेल्या प्रत्येक बारिक सारिक गोष्टीचा पूर्ण विचार अगाऊ च करून ठेवणें सामान्य बुद्धीच्या माणसांना नेहमीं च पूर्णपणें साधतें असें नाहीं. तिचें पूर्ण आकलन करून ठेवणें, शत्रूच्या नैतिक जोमाचा व युद्धांत गुंतलेल्या एकंदर समाजाच्या म्हणजे सैन्यांतील लोकांच्या मनाची पारख करणें वगैरे गोष्टीस अचाट बुद्धि व विलक्षण धारणाशक्ती लागते. ती सामान्य माणसाच्या अंगीं नसते. ती मोठमोठ्या दैववान व चतुर महान् पुरुषांच्या च मात्र अंगीं दृष्टीस पडते! म्हणून अशा पुरुषांस वाटल्यास या दृष्टीनें दैववान् म्हटल्यास हरकत नाहीं!!

**७. युद्धकौशल्य, युक्ति व हिकमतः**

आणखी एक गोष्ट मोठ्या सेनापतींमध्यें दिसून येते ती म्हणजे युक्ती. शत्रूला जर बेमालुमपणें चकवितां आलें, तर युद्धांत तिचें महत्त्व किती असतें हें सहज कळून येईल. महाराजांच्या प्रत्येक लढाईंत त्यांनीं दाखविलेलें युद्धकौशल्य व त्यांनीं शत्रूला दिलेली हूल, लढविलेली शक्कल व चालविलेली युक्ती, प्रतापगडच्या युद्धांतील अप्रतीम असें बचावाचें युद्धकौशल्य ( strategy of defence), पन्हाळगडच्या वेढयाच्या अखेरीस लांबविलेल्या लढाईतील (delaying action ), धाडशी व धडाडीचें युद्धकौशल्य वगैरे काय दाखवितात ? शाहिस्तेखानावर छापा घालून परत सिंहगडास जातांना आपला पाठलाग होऊं नये म्हणून कात्रजच्या घाटांत बैलांच्या शिंगाला पोत लावून व ते पेटवून तिकडे च खानाचें सैन्य जाईल ही युक्ती लढविण्यांत महाराजांचें चातुर्य दिसून येत नाहीं काय ?

**८. प्रदेशाचा उपयोग** ( use of ground ):

युद्धांत गुंतलेल्या एकंदर प्रदेशाची माहिती स्वतः व दुसऱ्याकडून मिळविण्याची विलक्षण प्रकारची हातोटी महाराजांना साधली होती. तिच्या जोरावर शत्रूपेक्षां स्वतः जवळ थोडें सैन्य असतां हि ते जय मिळवूं शकत, व प्रसंगीं मोठमोठ्या संकटांतून पार पडत. शत्रूला चकीत ( surprise ) करणें, स्वतः उत्तम माऱ्याच्या जागेचा (position) फायदा घेणें, शत्रूला अडचणीच्या जागीं व आपल्याला पाहिजे तेथें खेंचून आणणें वगैरे गोष्टी करण्यास त्या त्या प्रांताची खडानखडा माहिती लागते. अशी माहिती महाराजांना असल्यामुळें त्यांचा सदोदित जय होत असे. प्रतापगड, जावळी, पारघाट, जनीटेंब व वांई ह्या

ठिकाणीं महाराजांना जो हा जय मिळाला त्याच्या अनेक कारणांपैकीं हें हि एक कारण होतें. खानाला ह्या प्रांताची माहिती महाराजां इतकी नसल्यामुळें त्याला आपल्या फौजांची विभागणी करणें धोक्याचें वाटलें नाहीं. त्यामुळें त्याच्या अपयशाला हें एक कारण झालें. ही माहिती मिळविण्यास खानाला व महाराजांना दोघांना हि सवड होती. ती मिळविण्याचे मार्ग हि एक च होते. परंतु त्यांचा कसा फायदा करून घ्यावा हें मात्र महाराजांनीं पूर्णपणें ताडलें आणि खानानें तिकडे दुर्लक्ष्य केलें. त्यामुळें शेवटीं तो गोत्यांत आला. वणी–दिंडोरीच्या लढाईतील पिंपरीघाट व पन्हाळगडच्या लढाईतील घोडखिंड ह्यांतून सुखरूपपणें निसटून जाऊन शत्रूच्या हातावर तुरी देण्यांत महाराजांनीं जें चातुर्य दाखविलें त्यास सुद्धां प्रदेशाची माहिती हें एक कारण होतें. थोड-क्यांत सांगावयाचें म्हणजे युद्धकौशल्याशीं प्रदेशाच्या माहितीचा निकट असा संबंध असतो.

**९. दगा कीं, द्वंद्व-युद्ध :**

महाराजांनीं खानाला दगा करून मारलें ही केवळ लुच्चेगिरीची थाप प्रथमतः ग्रँट डफ यानें ठोकून दिली. त्याची च री कांहीं लोकांनीं आतांपर्यंत ओढली आहे. परंतु हें सर्व खोटें आहे, हें महाराजांच्या बचावाच्या धडाडीनें व अतर्क्य आडाख्यानें तेव्हां च दिसून येतें. शिवाजी हा चोर व लुटारू होता, त्याच्यापुढें मोठें ध्येय नव्हतें वगैरे खोट्या गोष्टी सांगण्याचा च ज्यांचा मुळापासून उद्देश आहे त्यांनीं असें न बोलावें तर काय बोलावें ? आमच्या बखरींत सर्वत्र असें दिलें आहे कीं, खानानें च प्रथम दगा केला. तो कां केला त्याचें कारण हि बखरकारांनीं सांगून ठेविलें आहे. तें म्हणजे खानाची महाराजांना

जिवंत पकडून अथवा मारून विजापुरास घेऊन जाण्याची प्रतिज्ञा. म्हणजे च युद्धांतील खानाचें उद्दिष्ट; ती प्रतिज्ञा पुरी पाडण्यासाठीं खानास वाटेल त्या चांगल्या वाईट मार्गाचा अवलंब करणें भाग होतें. सरळ मार्गानें महाराज आपल्या हातीं लागत नाहींत, अशी त्याची खात्री झाली, तेव्हां त्यांना जबरदस्तीनें पकडून न्यावें, म्हणून ठरलेल्या अटींना हरताळ फांसून तो १५०० लोक बरोबर घेऊन भेटीच्या जागीं गडाकडे निघाला. परंतु पंताजी गोपीनाथानें आग्रह केल्यामुळें व त्याला उघडपणें नाहीं म्हणतां येणें शक्य नसल्यामुळें त्यानें आपल्या सैन्याला वाटेंत च सोडून दिलें. शेवटीं दगा केल्याखेरीज महाराज हातीं लागत नाहींत हें ठाम दिसून आल्यावर, त्यानें भेटीच्या वेळीं महाराजांवर प्रथम आपण च होऊन वार केला व याप्रमाणें आपण च महाराजांना दगा केला ! त्याचा विचार महाराजांना ठार मारण्याचा, निदान प्राणांतिक जखमी करण्याचा होता, हें ह्यावरून सिद्ध होतें.

## १०. विजापूर-दरबारचा महाराजांना दगा करण्याचा स्पष्ट हुकूम :

तो त्याचा च विचार होता असें नाहीं. तर विजापुरदरबारचा हि तो च विचार होता. कारण खान स्वतः तर पूर्वीपासून दगेबाज च होता ! त्यानें दग्यानें च महाराजांच्या थोरल्या भावास थोड्या च दिवसां पूर्वीं ठार मारलें होतें. खान बेइमान आहे, तो दगा करील अशी शहाजी राजांनीं महाराजांस सूचना हि केली होती. खानाच्या मनांत हा च विचार आहे असें कृष्णाजी पंतानें हि महाराजांजवळ कबूल केलें होतें. एवढें च नव्हे तर मैत्री दाखवून

शेवटीं तूं शिवाजीला दगा कर असें खुद्द विजापूरच्या बड्या बेगमनें हि खानास हुकूम केला[1] होता. ही गोष्ट राजापूर येथील इंग्रज व्यापाऱ्यांनीं सुरतेच्या मुख्य वखारवाल्यास लिहून कळविली होती. एकंदरींत ह्या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेतल्या असतां **खानाचें उद्दिष्ट महाराजांना दगा करावयाचा हें च होतें व त्या प्रमाणें त्यानें दगा केला; महाराजांनीं केला नाहीं !** महाराजांच्या मनांत जर खानास दगा करावयाचा असता तर लढाईच्या संकेता करतां म्हणून जे तोफांचे बार करावयाचें ठरलें होतें, त्यांचें प्रयोजन व महत्त्व कांहीं च रहात नाहीं. वाचकांना आठवत असेल कीं, तोफांचे बार दोन निराळ्या प्रकारचे व्हावयाचे होते. ते कसें, हें मागें सांगितलेंच आहे. खानाच्या सैन्याशीं लढाई करावयाची असल्यास एक प्रकारचे बार व्हावयाचे होते व नसल्यास दुसऱ्या प्रकारचे व्हावयाचे होते. उदाहरणार्थ, असें समजा कीं, लढाई करावयाची आहे, तर पांच बार व्हावयाचे व लढाई करावयाची नाहीं तर तीन बार व्हावयाचे. खानानें सामोपचारानें आपलें म्हणणें ऐकून घेऊन युद्ध न करण्याचें ठरविलें तर महाराजांना पाहिजे च होतें. कारण त्यांची या वेळची परिस्थिती जरा नाजूक झालेली होती. त्यामुळें होतां होईल तों युद्धाचा प्रसंग टाळून कसें बसें पानावर पान ठेऊन व तह करून हें अरिष्ट त्यांना टाळावयाचें होतें. त्याप्रमाणें जर खानानें ऐकलें असतें, तर खानाच्या फौजेवर तुटून पडूं नका असे त्यांनीं आपल्या ठिकठिकाणच्या सेनापतींना हुकुम हि दिले होते[2] व ते सुचविण्यासाठीं विशिष्ट प्रकारचे बार करण्याची त्यांनीं योजना हि केली होती. परंतु न

१. इं. फ्या. २५०. २. शि. भा. अ. २३. श्लो. १९.

जाणों मुसुलमान बेइमान आहे, बडे साहेबिणीनें त्याला आपल्याला दगा देण्याचा हुकूम केला आहे, खान तो हुकूम पाळणार आहे असें आपल्याला कृष्णाजी पंताकडून खात्री पूर्वक समजलें आहे, तेव्हां **आपल्या बचावाच्या तयारी साठीं आपण सावध रहावें** असें त्यांनीं ठरविलें. इतकें हि करून खानानें दगा केला च तर आपण आपलें रक्षण केलें पाहिजे. त्या झटापटींत खानास पकडून कैदेंत ठेवावें. मग खानाच्या सैन्यावर हल्ला करून ज्या प्रमाणें आपला बचाव करतां येईल तसा करावा, असें महाराजांनीं आपल्या मनाशीं ठरविलें असावें. त्यांत खानाच्या सैन्यावर हल्ला करण्यासाठीं आपल्या सेनापतींना जो संकेत कळवावयाचा होता, त्याच्या बारांची संख्या, लढाई करूं नका असा संकेत दर्शविणाऱ्या बारांच्या संख्येपेक्षां निराळी होती. सारांश, ह्या तोफांच्या बारांच्या कमीजास्त संख्येवरून व वर दिलेल्या इतर सर्व कारणांवरून असें निश्चित ठरतें कीं, महाराजांच्या मनांत खानास दगा करून ठार मारावयाचें नव्हतें. खानानें महाराजांवर दोनचार वार केल्यामुळें आपली मान त्याच्या खांकेंतून सोडविण्यासाठीं नाइलाजानें महाराजांना स्वतःच्या बचावासाठीं त्याजवर मारा करावा लागला. त्यामुळें खानानें त्यांना सोडून दिलें. ह्यामुळें तर दोघांमध्यें खणाखणीचें द्वंदयुद्ध च झालें व त्यांत खान जखमी होऊन खालीं पडला. म्हणजे ग्रँट डफच्या म्हणण्याप्रमाणें महाराजांनीं खानाला दगा करून त्याचा खून केला नाहीं तर **खानानें च दगा केल्यावर त्याच्याशीं उघड उघड द्वंद्वयुद्ध केलें.** प्रतापगडच्या युद्धांत एकंदर चार मोठमोठ्या लढाया झाल्या; एक जनीच्या टेंबाची, दुसरी कोयनापारची, तिसरी जावळीची व चौथी वांईची. या लढायांत महाराजांनीं जय कसा मिळविला तें मागें सांगितलें आहे.

**११. प्रतापगडच्या युद्धांत काबीज केलेली सामुग्री** ( capture ):

ह्या एकंदर लढायांत महाराजांना जी शत्रूकडील युद्धसामुग्री मिळाली ती पुढीलप्रमाणें:—

९५ हत्ती, १२०० उंट, ४००० घोडीं, १८०० बैल, ७० तोफा, तीन लाखांचें जडजवाहीर, मोहोरा होन वगैरे नक्त खजिना ७ लाखांचा, १० हजारांचें कापड, चौदा हजार राहुट्या, चौदा हजार डेरे, ह्यांशिवाय हत्यारें, दारूगोळा वगैरे सामान निराळें च मिळालें.[1]

**१२. युद्ध-कैदी व जखमी वगैरे लोकांची व्यवस्थाः**

ह्या युद्धांत एकंदर सरासरी ५।६ हजारांपर्यंत खानाकडील जखमी लोकांची संख्या भरली असावी व ३।४ हजार लोक ठार झाले असावेत आणि ३।४ हजार कैद झाले असावेत. रात्रीमुळें व बहुतेक रस्ते अडवून धरल्यामुळें त्यांना शरण जाण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. दुसरे दिवशीं या युद्धकैद्यांना व जखमी लोकांना महाराजांपुढें हजर करण्यांत आल्यावर त्यांची महाराजांच्या हुकुमाप्रमाणें ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणें व्यवस्था झाली. ह्या कैद्यांत मंबाजी भोसले, जगताप, झुंजारराव घाटगे व खुद्द खानाचे ( फाजलखानाशिवाय ) दोन मुलगे वगैरे बडी बडी मंडळी होती. महाराजांनीं खानाच्या लोकांना या वेळीं ज्यांची आपल्याकडे रहावयाची इच्छा होती, त्यांना रहावयास परवानगी दिली. ज्यांच्या जवळ प्रवासा पुरता पैका नव्हता अशांना खर्चण्यास पैका दिला[2] व त्यांचें गोड शब्दांनीं समा-

१. शि. भा. अ. २३, श्लो. ३,४; इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ७३; शि. दि. १७०. २. इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २ ७३.

धान हि केलें. त्यांतील जे हिंदू लोक होते त्यांना थोडक्यांत आपण कोणच्या ध्येयासाठीं हें काम उचललें आहे, त्याची माहिती करून दिली. महाराजांच्या उदारपणामुळें व महाराजांनीं स्वतःच्या माणसां-प्रमाणें आपली काळजी घेतली हें पाहून खानाच्या सैनिकांवर त्याचा इतका परिणाम झाला कीं, त्यांतील पुष्कळसे हिंदू व कांहीं मुसुलमान हि त्यांच्या नोकरीस रहावयास कबूल झाले.

**१३. बक्षिसें, मानसन्मान, गौरव, रांडरोटी, जखमी पेनशन** ( rewards, honours, dispatches, widow's pension & wounded pensions ):

यानंतर स्वतःच्या सैन्यांतील जखमी झालेल्या लोकांची व्यवस्था लावून त्यांच्या जखमे प्रमाणें त्यांना २५ ते ५० पासून १०० ते २०० पर्यंत होन बक्षिस दिले व जे जखमांमुळें अगदीं च कामांतून गेले होते, त्यांना तहाहयात नेमणूक करून दिली. जे लोक युद्धांत कामास आले होते त्यांच्या मुलांस बक्षिसें वगैरे देण्यांत आलीं व त्यांत जे लोक नोकरी करण्यासारखे होते त्यांना नोकरींत दाखल केलें. ज्यांस मुलें-बाळें नव्हतीं, त्यांच्या बायकांस रांडरोटी म्हणून त्यांच्या हयातीपर्यंत नवऱ्याच्या पगाराच्या निम्मा पगार पेनशनी दाखल देण्यांत आला. मोठ मोठ्या सेनापतींना त्यांच्या योग्यते प्रमाणें हत्ती व पालखी वगैरे-चा मान देण्यांत आला. आणि शिपाई लोकांस त्यांनीं केलेल्या मर्दु-मकी बद्दल रोख रकमे प्रमाणें कडीं, तोडे, चौकडे, मोत्याचे तुरे व तरवारी बक्षिस देण्यांत आल्या; आणि बाकीच्या उरलेल्या लोकांना

१. इ. सं. ऐ. स्फु. ले. भा. २. ७३.

शाबासकी दिली. एकंदर बक्षिसाची रक्कम एक लाख होनां पर्यंत गेली. पंताजी गोपीनाथास त्याचें रहातें हिवरें गांव वंशपरंपरा इनाम करून दिलें[1]. खानाचा वकील कृष्णाजी भास्कर ह्यास हि एक गांव इनाम देऊन तो वांईचा कुलकर्णी असल्यामुळें त्याला वांई परगण्यांत आणखी बरेचसे हक्क तोडून दिले.

**१४. अबदुल बुरुजः**

मागें सांगितल्या प्रमाणें खानाला जखमी करून पुढें त्याला कैद करून गडावर न्यावयाच्या विचारांत व मंडपांत तान्हाजी व जिऊ महाला यांना मदत करण्यांत महाराज गुंतले असतां तिकडे संभाजी कावजीनें त्यांचा हुकूम न घेतां खानाचें डोकें कापलें. पुढें ही बातमी ऐकून महाराजांस वाईट वाटलें. आपल्या इच्छेच्या विरुद्ध व धर्मयुद्धास न शोभेसें वर्तन केल्याबद्दल त्यांनीं संभाजीस ठपका दिला. नंतर त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं जिथें खान मारला गेला तेथें त्याचें त्याच्या इतमामास साजेल अशा प्रकारें दुसरें दिवशीं दफन करविलें व त्याचें शीर गडावर नेऊन देवीच्या देवळासमोरील अग्नेयेच्या बुरुजांत समारंभानें पुरलें. ह्या च बुरुजास हल्लीं अबदुल बुरुज असें नांव मिळालें आहे. याप्रमाणें खानाचें दफन करून च महाराज थांबले नाहींत, तर त्यांनीं त्याच्या थडग्याच्या खर्चासाठीं वार्षिक उत्पन्न हि लावून दिलें[1]. शत्रू विषयीं इतका मनाचा उदारपणा जगाच्या इतिहासांत दुसरा सांपडणें फार च मुष्कीलीचें जाईल. रणांगणावर समोरा समोर ठाकण्यापुरता शत्रू. तो मेल्यावर शत्रुपणा संपला. हें धर्मयुद्धांतील अत्यंत उच्च दर्जाचें तत्त्व महाराजांनीं

१. शि. दि. १७१.

प्रतापगड व अफझलखानाची कबर.



त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्या वेळीं दाखविलें. या ठिकाणीं प्रभु रामचंद्राची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. रावण मेल्यावर त्याची व्यवस्था कशी लावावयाची असें बिभीषणानें विचारलें असतां " मरणान्तानि वैराणि " असें तत्व सांगून भगवंतानें रावणाचा प्रेत-संस्कार मोठ्या समारंभानें करविला. नाहीं तर मेलेल्या शत्रूचें प्रेत त्याच्या थडग्यांतून उकरून काढणारे व लढाईंत मेलेल्या शत्रूच्या शिपा-यांचे नाक कान कापून ते संगीनीस टोंचून मिरविणारे या सुधारलेल्या विसाव्या शतकांत हि यूरोपांत कांहीं थोडे थोडके लोक नाहींत.

**१५. जाहीरनामा** ( proclamation ):

ह्या लढाई नंतर ७–८ दिवसांनीं महाराजांनीं वांई सुभ्यांतील लोकांस उद्देशून एक जाहीरनामा काढला त्यांत त्यांनीं ह्या लोकांना असें आश्वासन दिलें कीं, मुसुलमानी अमलांत ज्या प्रमाणें तुम्हांला वागविण्यांत येत होतें, त्या प्रमाणें किंबहुना अधिक चांगल्या प्रकारें आमच्या स्वराज्यांत वागविण्यांत येईल. कोणत्या हि धर्मांत हात घातला जाणार नाहीं. जातीचा प्रश्न न आणतां ज्याच्या त्याच्या योग्यते प्रमाणें सर-कारी नोकऱ्या देण्यांत येतील. हिंदूंच्या प्रमाणें मुसुलमानांच्या हि देव-स्थानांचीं इनामें वगैरे चालविलीं जातील[१]. ह्या प्रमाणें जाहीरनामा काढून नुकत्या च काबीज केलेल्या परराज्यांतील लोकांचीं मनें त्यांनीं आपल्या-कडे वळवून घेतलीं. आणि जाहीरनाम्यांतील आश्वासना प्रमाणें त्यांनीं शेवट पर्यंत वर्तन हि ठेविलें. आजच्या प्रमाणें आपल्या सोईस येईल तेव्हां, असल्या जाहिरनाम्यास शिरावर धरावयाचें अथवा गैरसोईच्या

१. शे. ४१.

वेळीं अशक्य सनद किंवा अव्यवहार्य चिठोरें म्हणून त्यास दृष्टी आड करावयाचें, ही २० व्या शतकांतील कला त्यांना अवगत नव्हती !

## १६. उपसंहार:

सारांश स्वराज्यावर आलेलें एक मोठें संकट महाराजांनीं आपल्या अप्रतिम युद्धकलाचातुर्यानें व मुत्सद्दीपणानें कसें टाळलें याचें युद्ध-कलेच्या दृष्टीनें आम्हीं आमच्या माहिती प्रमाणें सविरतर वर्णन येथ-पर्यंत केलें आहे. महाराजांवरील हा प्रसंग अत्यंत कठिण असा होता. स्वराज्याचें लाविलेलें बीज नुकतें च वर येऊन आपल्या नयनमनोहर स्वरूपाकडे महाराष्ट्रांतील लोकांचें लक्ष्य वेधित होतें ! विजापुरकरा-सारख्या जुन्या व साधनसामुग्रीनें सज्ज असलेल्या मुसुलमानी पात-शाहीशीं महाराज टक्कर देत आहेत व हिंदूंना यवनांच्या त्रासांतून सोडवीत आहेत ह्या बद्दल त्या वेळच्या बहुतेक व त्यांतल्या त्यांत सर्व मराठ्यांच्या ( महाराष्ट्रांत रहाणारे ते सर्व मराठे अशी या शब्दाची व्याख्या आहे) मनांत एक प्रकारें आनंद व महाराजांबद्दल आदर वाटत होता. परंतु हें अवघड काम कितपत शेवटास जाईल ह्या बद्दल हि तितकी च शंका वाटत होती.

हें खानाचें धूड महाराजांवर चालून आलें तेव्हां या मुसुलमानी जुलमां पासून व झंजावाता पासून स्वराज्याच्या रोपड्याचें रक्षण महा-राज कसें करतात ह्याकडें सर्व महाराष्ट्राचें लक्ष्य लागलें. थोडयाशा गफ-लतीनें सुद्धां रोपडयास इजा झाली असती; परंतु, समर्थांच्या व भवानी मातेच्या कृपेनें आणि आपल्या प्रखर बुद्धीच्या, शुद्ध वर्तनाच्या व दृढ आत्मप्रत्ययाच्या व स्वार्थत्यागाच्या बलांवर महाराजांनीं छातीचा कोट करून त्या झंजावाता पासून रोपडयाचें रक्षण केलें व महाराष्ट्रांतील

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.
दाखल नं ______ ग्रंथानुक्रमांक ____
किंमत ______ पाने ______

लोकांचीं मनें जीं धाकधुकीमुळें शंकित झालीं होतीं तीं स्थिर केलीं. जर दुर्दैवानें उलट प्रसंग घडला असता तर जाणत्या-नेणत्या, वृद्ध-तरुण, लोकांनीं त्यांची थट्टा केली असती आणि पुढील प्रमाणें उद्गार हि काढले असते. "आम्ही पूर्वीं च म्हणत होतों कीं, जबरदस्ताशीं गांठ घालूं नये, स्वराज्य-स्थापनेच्या भानगडींत न पडतां आदिलशाह देईल ती चतकोर, नितकोर भाकरी खाऊन आयुष्य घालवावें पण भलत्या च फंदांत पडूं नये. तें त्यांनीं ऐकलें नाहीं व स्वराज्याचें नांव करून आपलें व देशांतील तरुण पिढीचें सर्वस्वीं नुकसान केलें. आदिलशाह सारख्या बलिष्ठ राजाशीं विरुद्ध वागण्याचें काम सामान्य माणसाचें नाहीं. त्यास ईश्वराचा अवतार झाला पाहिजे. असल्या राजद्रोहानें व बंडानें कोठें स्वराज्य स्थापन होईल?" वगैरे वगैरे; असो. प्रसंगविशेषीं मारणाऱ्याचा हात धरता येईल पण बोलणाऱ्याचें तोंड कोण धरील? पण असें बोलणें निघण्यास महाराजांनीं सवड च ठेवली नाहीं!

हीं असलीं बोलणीं बेहिमती, नाकर्ते, व स्वतः कांहीं एक न करणाऱ्या लब्ध-प्रतिष्ठित माणसांचीं असतात; आणि त्यांच्या च मुळें तें राष्ट्र पारतंत्र्यांत खितपत पडलेलें असतें. परंतु कर्ता पुरुष तिकडे लक्ष्य देत नाहीं. त्याच्या मनांत अशी जाणीव असतें कीं, माझा जन्म च स्वराज्य-स्थापने साठीं झालेला आहे व मीं तें स्वराज्य वाटेल त्या मार्गांनीं, साधतील ते उपाय करून व परिस्थिती-भेदानें साधनांची बदला बदल करून माझ्या देशास, वाटेल तें झालें तरी सुद्धां मिळवून देईन च देईन, मग त्यांत माझा प्राण गेला तरी हरकत नाहीं! कारण स्वराज्य मिळाविणें हें कांहीं नेहमीं एका च पिढीचें काम नाहीं. ह्यासाठीं वेळ प्रसंगीं दोनतीन पिढ्या हि घालवाव्या लागतात. म्हणून

मनांत निष्कामबुद्धी ठेऊन आपण आपलें ध्येय गांठलें पाहिजे. ह्या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन च महाराजांनीं स्वराज्यावरील हें गंडांतर टाळलें ! !

जगांत आपलें ध्येय जबरदस्ताच्या हांतून सोडविण्यासाठीं ज्या प्रमाणें शक्तीची जरूरी असते, त्या च प्रमाणें युक्तीची हि आवश्यकता असते. जसें नुस्त्या शक्तीनें काम भागत नाहीं तसेंच नुस्त्या युक्तीनें हि भागत नाहीं. या दोहोंचा यथायोग्य प्रमाणांत मिलाफ करून कामास हात घातला तर यश हें ठेवलेलें च असतें. म्हणून च महाराष्ट्र राजगुरु श्री समर्थांनीं म्हटलें आहे कीं;--शक्तीनें मिळतीं राज्यें ॥ युक्तीनें यत्न होत असे ॥ शक्तीयुक्ती जये ठायीं ॥ तेथें श्रीमंत धांवती ॥ १ ॥ अशी शक्ती म्हणजे क्षात्रतेज म्हणजे शिवाजी महाराज व अशी युक्ती म्हणजे ब्रह्मतेज म्हणजे श्रीसमर्थ; हे ज्या वेळीं महाराष्ट्रांत अवतीर्ण झाले, तेव्हां च मुसुलमानांनीं मोडलेल्या व भ्रष्ट केलेल्या महाराष्ट्राचें **आनंदवनभुवन** झालें. हें प्रतापगडचें युद्ध महाराजांच्या पुढच्या स्वराज्य व स्वातंत्र्य वाढीला मूळ कारणीभूत झालें आहे. म्हणून च ह्यास फार महत्त्व आहे. या दोन महापुरुषांनीं च कर्माच्या ठिकाणीं कुशलतेची योजना करून महाराष्ट्रास स्वराज्ययोग घडवून दिला ! !

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

# युद्धशास्त्राचा शद्बकोश

A

Action–लढाईचा प्रसंग.
Action-shock–हातघाईचा प्रसंग.
Active defence-चढाईचा बचाव.
Advance–चाल, कूच.
Advanced base-अघाडीची कोठी.
Advanced guard–अघाडीची किंवा हरोळीची फाज.
Advanced troops–अघाडीची फौज.
Ambush–झाडी-झुडपांतील.
Ammunition–दारुगोळा, बारुद.
Apaulment–धमधमे.
Arms–सैन्याचीं अंगें.
Army–सैन्य, सैन्याचा मोठा विभाग.
Army of observation–सरहद्दीवरची टेहळणी फौज.
Army corps–सैन्याचा एक जमाव ( अजमासें २० ते २२ हजार शिपाई. )
Army training-सैन्याचें शिक्षण,
Alert–जागरूक.
Allies–दोस्त राष्ट्रं.
Allotment of ground to different units–निरनिराळ्या सैन्याच्या अंगांना त्यांच्या लायक अशी तळावरील सोईची जागा कायम करून देणें.
Arsenal–हत्यारें व दारूगोळ्याचें कोठार.
Artillery–तोफखाना.
Artillery ( Heavy )–भारी व जड तोफखाना.
Artillery in the field–रणांगणावरील तोफखाना.
Artillery tactics–तोफांच्या मारागिरीचे डावपेंच.
Assault–हातघाईकरतां चढाई.
Attack–हल्ला.
,, counter–प्रतिहल्ला.
,, feint–हूल दाखविण्याचा हल्ला.
,, flank–बगली हल्ला.
,, frontal–तोंडावरील हल्ला.
,, holding–जागा पकडून बसण्याचा हल्ला.
,, local–स्थानिक हल्ला.

Attack main–मुख्य हल्ला.
,, rear–पिछाडीवरील हल्ला.
,, recounter–फेरप्रतिहल्ला.
,, subsequent–पाठपुराव्याचा हल्ला.
,, surprise–अचानक हल्ला.

B

Baggage–सामानसुमान, आटाळा.
Base–कोठी.
Base advanced-अघाडीची कोठी.
Base immediate–अगदीं अघाडीची कोठी.
Base home–घरकोठी, मुख्य कोठी.
Bastion–बुरुज.
Battalion–सैन्याची तुकडी,(अंदाजें ८०० ते १००० शिपाई.)
Battery–तोफखाना.
,, (Horse)–घोड्याचा तोफखाना.
,, (Pack)-बंदिस्त किंवा जंबूरांचा तोफखाना.
,, (Mule)–खेचराचा किंवा जेजालांचा तोफखाना.
,, (Camel)–सूत्रनालांचा किंवा उंटांचा तोफखाना.
Battle–लढाई.
,, front-युद्धक्षेत्रांतील अघाडी.
Body guard–खासबरदार.
Bon-fires–आगट्या. आलावा.
Boundary–सरहद्द.
Bore–भोक, व्यास (तोफेचा, किंवा बंदुकीचा).
Breech-loader guns and rifles–काडतुसाच्या तोफा व बंदुका.

C

Canon तोफ.
Capture prisoners–युद्ध कैदी
Cart-tracks–गाडीरस्ते.
Censorship–कडक देखरेख.
Chances of war–युद्धांतील दैव.
Change of plan–आडाख्यांत बदल.
Charge–(संगिनीचा व तरवारीचा) हातघाईतील हल्ला.
Civilised–सुधारलेली.
Closed–आवळता केलेला–ली–लें.
Column–तुकडी, मोठा थोक किंवा सैन्य-समूह.
Commander–in-chief -- सर-सेनापती.
Communication–दळणवळण.
,, (line)–संदेशमार्ग.
Commissariat–मोदीखाना.

Company–फौजेची तुकडी ( अंदाजें २२० शिपाई ).

Compass–होकायंत्र.

Complete surprise–पूर्ण यशस्वी अचानक छापा.

Compensation-रांडरोटी, family pension, बाल परवेश.

Concentration–एकीकरण.

Concentration fire–एककद्रक मारा.

Concentration order-सैन्याच्या एकीकरणाचे हुकुम.

Concentration (strategical)- युद्धकौशल्याला पोषक असें सैन्याचें एकीकरण.

Continuance–अखंड धागा.

Control–हुकमत.

Cossack posts–छबिन्याच्या फौजेतील एक प्रकारच्या चौक्या.

Cover–आडोसा.

Cover from sight and bullet-दृष्टीपासून व गोळीच्या माऱ्यापासून आडोशाची जागा.

D

Declaration of war–हाकारा, युद्धपुकारा.

Decisive success–निश्चित जय.

Defence–बचाव.

Defence ( active )–चढाईचा बचाव.

Defensive–बचावाचा-ची-चें.

Defensive positions–बचावाच्या जागा.

Defence lines–बचावाच्या क्षेत्रांतील रांगा.

Defence troops-बचावाची फौज.

Defence (active)–चढाईचा बचाव.

Defence ( passive )–नुसता बचाव.

Delaying action–लांबविलेली लढाई.

Demoralization–अवसानखस्त होणें.

Deploy–पेरणें.

Deserters–पळे.

Detached post–विशिष्ट कामा करितां जरा दूर ठेवलेली फौज.

Dictate–नेमून देणें, भाग पाडणें.

Dictated–आदेशिलेल्या.

Diplomacy–डावपच.

Direct and indirect fire- तोफांचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष मारा.

Directing–नेतृत्व.

Direction-दिशा.

,, limited-ठराविक दिशा

Disaster-भयंकर आपत्ती.

Discipline-शिस्त.

Disorderly retreat-अव्यवस्थित पिछेहाट.

Despatches-गौरवाची सनद.

Disposition of forces-आडाख्याच्या दृष्टीनें फौजेची विभागणी.

Dismounted-पायउतार होऊन, उतारघोडा होऊन.

Distribution of forces—फौजेची वांटणी.

Division-सैन्याची मोठी तुकडी. (जवळ जवळ सप्तहजाराची फौज)

Division of forces-सैन्याची विभागणी.

Double diplomacy-दुहेरी व धूर्त डावपेंच.

E

Elevation-तोफेचा गोळा फेकण्याकरतां तोफेला देण्यांत येणारा कोन.

Engineer-बेलदार.

Enveloping movement-चक्कर किंवा वळसा देऊन फाजेची हालचाल करणें. (बगली हालचाल.)

Equipment-सैन्याबरोबरचें सर्व सामान.

Escort-शरीरसंरक्षक, लवाजमा, बरोबरीची रखवाली फौज.

Examining post-छबिन्यांतील चौकशीची चौकी (शत्रूचे टेहळे किंवा हेर यांना पकडल्या नंतर त्यांची चौकशी करण्याचें काम ज्या चौकीकडे असतें ती)

F

Factor-बाब.

Field of action-रणांगण.

Field guns-मैदानी तोफा.

Field of fight-रणांगण.

Field telephone-फौजी शब्दवाहक यंत्र.

Fighting line-लढाऊ रांग.

Fighting rank-लढाऊ रांग.

Fire-गोळीबार, आगीचा मारा.

Fire action-आगीची लढाई, गोळागोळीची लढाई.

Finance-पैका

Flank-बगल.

Flank-right-उजवी बगल.

,, left-डावी बगल.

,, extreme-बगलेचें एक टोंक.

Force march–भाग पडलेली जोराची दौड.

Fords–नद्यांचे उतार.

Formation–सैन्याच्या तुकड्यांची हालचालीच्या दृष्टीनें रचना.

Fortification–तटबंदी, माऱ्याची जागा.

Foreign embassy–परराष्ट्रीय वकीलात.

Front–तोंड, अघाडी.

Frontier–सरहद्द.

G

Galloper–स्वार, सांडणीस्वार.

Garrison on the fort–गडावरील शिबंदी.

General reserve–सर्वसामान्य राखीव सैन्य.

Group system–एकत्रपद्धती.

Guerrilla–गानिमि.

Guerrilla warfare--गनिमि लढाई

Gun–तोफ.

,, (Field)–मैदानी तोफ.

,, (Heavy)–जड व भारी तोफ.

,, (long range)–लांब पल्ल्याची ताफ.

Gun (light)–हलकी तोफ.

,, (mountain)–पहाडी तोफ.

,, (medium)–मध्यम तोफ.

Gunnery–तोफांच्या मारागिरीचें शास्त्र.

Guns on the fort–गडावरील तोफा.

H

Hand grenade-हातगरनाळा, बाण.

Heavy baggage–जड सामानसुमान, आटाळा.

Heavy cavalry-अवजड घोडदळ.

Hill and mountain–डोंगरी व पहाडी.

Home base–सैन्याची घरकोठी.

Honours–मानसन्मान.

I

Improvising–कल्पक.

Infantry–पायदळ, पावखलक.

Infantry officer-पायीचे सरदार.

Inter–communication-अंतर्दळणवळण.

Intelligence department–नजरबाज खातें.

,, (in peace)–शांततेच्या वेळचें बातमीखातें.

Interpose-मध्यें घुसणें, पाचर मारणें.

Initiative-प्रथमोपक्रम, पहिला तडाखा.

K

Key word-कोडें उकलणारा शब्द, संकेत.

L

Lay-नेम धरणें (तोफांचा)

League of Nations-राष्ट्रसंघ.

Leading-मार्गदर्शक.

Light cavalry-सुटसुटीत घोडदळ

Line-ओळ, दिशा, रांग.

Lines of approach-येण्याचे मार्ग

Line of advance-कूचाचा मार्ग.

Line of communication-दळणवळणाचे किंवा संदेश-मार्ग.

Line of observation-टेहेळणीची रांग.

Lines of operation-रणक्षेत्रांत वावरण्याचे मार्ग.

Line of retreat-पिछेहाटीचा मार्ग .

Line of resistance-प्रतिकाराच्या क्षेत्रांतील ओळ.

Line of supplies-रसदीचे मार्ग, पुरवठ्याचे मार्ग.

Local-स्थानिक.

Local objective--स्थानिक उद्दिष्ट.

Local reserve-स्थानिक राखीव सैन्य.

Long range guns-पल्लेदार तोफा

M

Magazine-दारुगोळ्याचें कोठार, बारुदखाना.

Manœuvre-हालचालीचे डावपेंच

Message-संदेश.

Message (cypher)-सांकेतिक संदेश.

Message code-सांकेतिक संदेश.

Mobile-सुटसुटीत, सडें.

Mobile units-सुटसुटीत फौजांच्या ठराविक तुकड्या.

Mobility-सुटसुटितपणा.

Mobilization-कमरबंदी, कटकबंदी.

Mobilization order-कमरबंदी, कटकबंदीचे हुकूम.

Mobile column-चपळ तुकडी; सुटसुटित थोक.

Morale-हिंमत, आत्मविश्वास.

Mounted-घोडदळी, घोडदळाचे.

Mountain guns-पहाडी तोफा, डोंगरी तोफा.

Muzzle loader–तोंडांतून दारू भरण्याची बंदूक.

O

Objective–उद्देश, साध्य.

Objective main–मुख्य उद्दिष्ट.

,, secondary–दुय्यम उद्दिष्ट.

,, local–स्थानिक उदिष्ट.

Offensive–चढाई.

Operations–हालचाली.

Organisation–संघटना, रचना.

Orderly--हरकार, जासूद.

Out-post--छबिना.

Out-post picquets–छबिन्याची चौकी.

Out-post line–छबिन्याच्या चौक्यांची ओळ.

Out-post troops–छबिन्याची फौज.

Out-post zone–छबिन्याचें क्षेत्र.

Out-post zone picquets–छबिन्याच्या क्षेत्रांतील चौक्या.

P

Parapet–धमधमे, मोर्चे.

Passive defence–नुसता बचाव.

Pass–घाट, खिंड.

Patrol–टेहळ्याची फिरती चौकी. किंवा टेहळे.

Physical features–भौगोलिक मांडणी ( प्रदेशाची ).

Picquet–छबिन्याची चौकी.

Pitched battle–गाडून लढाई.

Pivot–केंद्र.

Plan–बेत, आडाखा.

Plan of campaign–युद्धबेत, आडाखा.

Plan and disposition of forces–सैन्याच्या तजविजी व हालचाली.

Platoon–लहान जमात ( अंदाजें ३६ ते ५२ शिपाई ).

Point–बिंदु, स्थळ.

Position–जागा, डावपेंचास योग्य अशी जागा.

Position ( commanding ) मान्याची जागा.

Position ( strong )–मजबूत किंवा कुबल जागा.

Position (tactical)–डावपेंचास योग्य अशी जागा.

Position (strategical)–युद्धकौशल्याला योग्य अशी जागा.

Preparation of war-युद्धतयारी

Pressure–जरब.

Prisoner of war--युद्धकैदी.

Protection–संरक्षण.
Proclamation–जाहीरनामा.
Pursuit–पाठलाग.

Q

Quick decision–तत्काळ निकाल.
Quick communication–जलद दळणवळण.

R

Rally–सांवर, सांवरणें, एकगट्ठा करणें.
Rampart–तट.
Range–टप्पा (तोफेच्या माऱ्याचा).
Range card–माऱ्याच्या निशाणांच्या अंतराचें टिप्पण.
Range of cover–माऱ्याचें क्षेत्र.
Range of fire–माऱ्याचें क्षेत्र.
Rapidity–भरारी.
Rapid fire–झपाट्याची गोळागोळी.
Recruiting–कलमजारी, कटकबंदी.
Recruiting officer–भरणेवाईक.
Rifle–पेचदार बंदूक.
Regiment–तुकडी.
Reinforcement-कुमक, उपराळा.
Reserve–राखीव.
Reserve store–शिलकी सांठा.
Resistance–प्रतिकार, अडथळा.
Retire–पिछेहाट करणें, माघार घेणें.
Retirement–पिछेहाट.
Retreat–पिछेहाट.
Retreat in offensive and defensive–चढाई व बचावांतील पिछेहाट.
Retreat ( orderly) शिस्तवार, किंवा सुसंघटित पिछेहाट.
Role–कामगिरी.
Rout–उधळून लावणें, उध्वस्त करणें
Route–मार्ग.
Reconnaissance-तलाशी, बातमी
Recounter–प्रतिहल्ला.
Re-recounter–फेरप्रतिहल्ला.

S

Sally–हिकी, हल्ला.
Sappers and miners–बेलदार व कुन्हाडें.
Savage--जंगली.
Scientific--शास्त्रीय.
Seasoned troop--मुरब्बी फौज.
Secondary--दुय्यम.
Selection of position–जागेची निवड.
Shock–हातघाई.
Shock action–हातघाईची लढाई, खणाखणीची लढाई.

Shock tactics–हातघाईच्या किंवा खणाखणीच्या लढाईतील डावपेंच.
Short cuts–जवळचे रस्ते.
Siege–वेढा.
Siege--guns वेढ्याच्या तोफा.
Squadron–घाडदळाची तुकडी.
Standing army--खडी फौज.
Strategy--युद्धकौशल्य,
Strategical concentration orders--लष्करी धोरणाला अनुसरून एकीकरणाचे हुकुम.
Strategical situation--यद्ध-कौशल्याचा पसारा.
Strength--लष्करगणती.
Supplies--पुरवठा. रसद.
Supplies and population–पुरवठा व लोकसंख्या.
Surprise--अचानक.
Surprise attack–छापा, अचानक हल्ला.
Seasoned troops-कसलेलें किंवा मुरब्बी सैन्य.
Scout--टेहळ्या.

T

Tactics–डावपेंच.
Tactical points–डावपेंचाचीं ठिकाणें.
Theatre of war–युद्धक्षेत्र.
Theatre of operation-रणक्षेत्र.
Tractor–वाहतुकीच्या व यांत्रिक गाड्या.
Training–शिक्षण.
Transport–वाहतूक.
Transports–वाहतुकीचीं साधनें.
Trenches–खंदक.
Topography–भौगोलीक परि-स्थिति.
Turning–पलट.
Turning movement–फार मोठें चक्कर, पलटीची मोठी हालचाल.
Turning manœuvre–मोठें चक्कर घेण्याचा व मोठ्या पलटीचा डावपेंच.

U

Ultimatum--निर्वाणीचा खलिता.
Unpreparedness for war and disaster--युद्धाच्या तयारीचा अभाव व नाश.

V

Vedette--छयिन्याची चौकी.
Van gaurd-हरोळीची आघाडीची फौज.

W

Waggons--आराब्याच्या तोफांच्या गाड्या.

War--युद्ध.

Warfare--युद्धपद्धति.

Warfare (ambush) झाडी झुडपांतील लढाई.

,, civilised सुधारलेली लढाई.

,, gas--विषारी धुराची लढाई.

,, hill--पहाडी लढाई.

,, mountain डोंगरी लढाई.

Warfare moving--मान्याच्या जागा ताब्यांत घेण्याची लढाई.

Warfare partisan--समयोचित शस्त्रशास्त्रांची लढाई.

,, position--योग्य जागा धरून केलेली लढाई

,, standing--एकच जागा धरून बसावयाची लढाई.

,, savage--रानटी लढाई.

,, smoke--धुराची लढाई.

,, trench--खंदकाची लढाई.

Weight--दाब.

Widow's pension--रांडरोटी.

Wounded pension--जखमी पेन्शन.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

# आधारग्रंथ व संक्षेप

—:०:—

ऑर्म—Orme's Historical Fragments.

इं. फ्या. किंवा इं. फ्या. रे.— Records of the English factories in India by Foster.

इ. सं. किंवा इ. सं. ऐ. स्फु. ले. भा.—इतिहास-संग्रह, ऐतिहासिक स्फुट लेख भाग.

ए. क. ब.—एक्याण्णव कलमी बखर ( भारतवर्ष ).

ऐ. ले. सं.—खरेकृत ऐतिहासिक लेख-संग्रह.

किं.— A History of the Mahratta people—by Kincaid and Parasnis vol. I. ( 1918 ).

खरे.—वासुदेवशास्त्री खरे कृत ऐतिहासिक लेख-संग्रह.

चि.—मल्हार रामराव चिटणीस कृत " शिवाजी महाराजांची बखर. " काव्येतिहास संग्रह.

चित्र.—चित्रगुप्त-विरचित शिवाजी महाराजांची बखर. काव्य-इतिहास-संग्रह नं. २६.

ज.—Jadunath Sarkar-Shiwaji and his times (1916).

जे. क. शि. च. प्र.—जेधे करीना शिवचरित्र प्रदीप-पृ. ३९ ते ४७, भा. इ. सं. मंडळ. शके १८४७.

जे. श.—जेधे शकावली—चतुर्थ संमेलन वृत्त. भा. इ. सं. मंडळ.

द्वि. सं. वृ.—भा. इ. सं. मंडळ, द्वितीय संमेलन वृत्त.

प. या.—ऐतिहासिक पत्रें, यादी वगैरे; काव्येतिहाससंग्रह नं. ३१.

पा. म. आ.–पारसनीस कृत–मराठ्यांचें आरमार.

पो. किंवा पो. चौ.–शाळिग्राम व आक्वर्थ "ऐतिहासिक पोवाडे."
अगिनदास कृत अब्दुलखानाचा पोवाडा. १८९१.

प्र. र. मा.–प्रभुरत्नमाला गुच्छ, बडोदें (१८९६).

बर्नि.–Bernier's Travels.

बु. स.–बुसातिनुस्सलातिन–भाषांतर. बडोदें प्रत.

भावे–वि. ल. भावे कृत–अफझुलखानाचा वध.

म. रा.–मल्हार रामराव कृत.

म. सा. ब. किंवा म.सा. छो.ब.–मराठी साम्रज्याची छोटी बखर.

रा. खं–राजवाडे यांचीं मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड.

रा. नी. प्र.–आमात्य कृत राजनीति प्रकरण.

रा. मा. चं.–राधा-माधव-विलास–चंपू-राजवाडे (शक १८४४).

रा. व. रा.–रामदास व रामदासी.

शि. दि.–शिवदिग्विजय बखर.

शि. भा. अ.–शिवभारत अध्याय.

शे. किंवा शे. ब.–शेडगांवकर बखर–मराठी दप्तर. रुमाल १ ला. १८३९.

स.–कृष्णाजी अनंत सभासद कृत शिवछत्रपतीचें चरित्र–काव्येतिहास संग्रह नं. ४.

स. दे.–सरदेसाई कृत मराठी रियासत. पूर्वार्ध १९१५.

सा. ग्या.–सातारा ग्याझेटियर.

( अं.–अंक, क–कलम, पो.–पोवाडा, प्र.–प्रस्तावना, पृ.–पृष्ठ. भा.–भाग, ले.–लेखांक, व.–वर्ष, श्लो.–श्लोक. )

# सूचि

## अ

श्रीरामचंद्र २९९
अखेरची खणाणणी १८३
अगीनदास १४
अघाडीची कोठी ३६,४४
अघाडीची लढाऊ रांग २०९
अघाडीचे टेहेळे १९५
अचानकपणा ११,४४,२०५
अजिंठ्याचे घांट १४७
अण्णाजी दत्तो ११९
अण्णाजी, अण्णाजी पंत अण्णाजी रंगनाथ १४२,१९१,१९२, १९३,२०५,२०८,२१३,२१५
अंतर २४३
अंधार, अंधःकार अडथळा २३८ २८२,मदत२३९,२४४युद्धकौल्यांतील एक अंग २४६
अफझलखान, खान पहा
अबदाल्ली २५१, २५८
अबदुल बुरुज २९८
अलेक्झांडर २८४, २८५
असई २०६

## आ

आजच्या मराठयांचे युद्ध–शास्त्रांतील गुरू २८७
आडोसा १९५, २०९, २११
आदिलशाह १३४, अल्ली १३, आदिलशाही ३०१, दरबार १७०, प्रांताचें आक्रमण ६३, व स्वराज्य यांतील सरहद्द ५८, मधील हिंदू प्रजेची महाराजांस मदत ४२
आनंदवनभुवन ६५, ३०२
आबरक्रोंबी २४५
ऑर्म,महाराजांबद्दलचे समकालीन उद्गार १६५, १६६, १६७
आवाज वेग, १८८

## इ, ई

इंगळे १३३
इंग्रज २०६, पराभव १३७,

फुकटाफुकटी यश २५९,२६०
सुरतेचा वखारवाला २९३,
इशारतीचे बार १२१
ईश्वर आहे साभिमानी १८९

उ, ऊ

उपराळा ५०, आवश्यकता, २३०
महत्व २११

ए, ऐ

एकगठ्ठा २२२
एकंदर सैन्यांतील दारू गोळयाचा पुरवठा ४४, ४५
ऐतिहासिक युद्धाच्या माहितीची जरूर २८६

औ

औरंगझेब २२, गोवळकोंडयावरील स्वारी ६०, दिल्लीकडे प्रयाण ६१, चे महाराजांबद्दलचे उद्गार १६७, महाराजांशीं तह ६१, विजापुरावरील स्वारी ६०,

क

कडक देखरेख ६८
कमरबंदी ७४
कर्णा आवाजाचा संकेत १२४, १४६, १५०, १७३, १८४, १८५, २००, २१२; वाला १७१
कल्याण लूट १२,
कही टोळी ४९

का

कात्रज घांट ९३, १२८, २९१,
कान्होजी जेधे १९, २६, ७४, ११९, १३३-३४, १३५, १, ३६, २०३, २५७-५८
कारी १३५–३६
काशी दियानतराव १५१

कि, की,

किनेश्वर खोरें ९८, ११९, १४३, १५२, १७२
किल्ल्याची ओळ १५२, धार १५२, सोंड २३६
किल्ल्यावरील अंबरखाने व शिलेखाने ८१

कु, कू

कुडेसर (श्वर)पठार, कडेसर ९८, ११९,१४४,१५२,१७२,२५०, २६७,२७३,२७९,२८०
कुमठ्याचा ओढा १९२,१९४ २३६

कुऱ्हाडे वेलदार ३१,३९
कुलाबा जिल्ह्याचा पूर्वभाग १३१

कृ

कृष्णाजी भास्कर, पंत ७,११० १५९,१६२,१६५,१७०,१७९ १८०-८१,१८५, २८६, २९३, २९८
कृष्णानदी ५७,११७,१४१

को

कोंकण २
कोड मेसेजिस ६६,
कोयना नदी १०९, ११७, १२०, १४१, १९२, २३९, उतार २३९, २५३,
कोयना पार १०४, १०८, १४५, १४७, १५१, १५२, १५४, १५७, १६९, १७१, १७८, १८०, १८५, १८६, १९१, १९३, १९४, २००, २०५, २०८, २१२, खानाचा तळ १०३, १६८, २६३, खानाची फौज १९७, १९८, २००, २०८, २१०, २१४, २१८, २१९, २२०, २२८, २३५, फौजेचा पराभव २३९, २४६, फौजेचा तोफखाना २६१, २७०, तेथील कैदी २५७, व गड मार्ग १९५, प्रदेश २४१, लढाई २६०, २६१, आरंभ २३६, खानाकडील मृत्युसंख्या २५७, तपाशिलाचा अभाव २४३ लढाईतील सामुग्री २४६
कोरेगांव लढाई २५९

ख

खडकी लढाई ९५
खडें सैन्य २८, ८३,
खंडोजी खोपडे २५, ८६, ८८, १३३, २३४, २३५, देशद्रोहीपणा २५७, शिक्षा २५८, २८२
खडर्याची लढाई १६.
खवास खान १३

खा

खान ४, ३६, ५२, ८८, १६६, ३००; अपुराविचार २२५, अडाखा १०४, २५१, अघाडीची कोठी १०४,२७४,अघाडीची फौज १५१,२३५,इरादा

११७, उद्दिष्ट ५, १०१, १०८
११३, १४८, १८०-८१ एकंदर फौज ६, कबर १४२, कमरबंदींचे हुकूम ५८, कोयनापार उजवी बगल; २४१, २४९, २६१, डावी बगल २४१, २६१, २६५, बगल तळ २३३ २६१, २६४, तोफखाना २४२ २४३, दळणवळण २७१, कोयनापार व जनीटेंब २५१, फौज कोयनापार १७३, २२५, २३७, २४२, २५३, फौजेचें काम २३४, २३८, मुक्काम २३३, चें खरें नांव १४, गडावर येण्याचे मार्ग १२४, १४२, गुर्मी १७९, १८१, गुरू ४३, घमेंड १६४, घोडचुक २७६–२७७ चक्कर घेण्याचा डांवपेंच, ९४, ११७, चढाई १२२, १४७, १५५, चढाईचीं कारणें १२०, १२१, चढाईचें धोरण १४८, चढाई सोडतो १५७, चुकीची बातमी १०९, जनी तळ हरकारे २२९, जनी लढाई २२२, जहागीर १०,
जावळी उजवी बगल २६५, २६७, टेहळे १७४, डाव १०८ डाव हुकण्याचीं कारणें २५२, डेरा २३४, डोकें कापलें १८४ तहाची अट मोडतो १०२, तीन वर्षांची सामुग्री ७, ४७, ७१, तोफखाना ३३, दग्याचा हेतू १०२, दग्याचा बेत १७९, दगा करतो, २९३, २९४ दग्यानंतरचें द्वंद्व २९५, दळणवळणाचा मार्ग ४७, दारूगोळ्याचे छकडे ४५, ४६, दुमदारीची फौज २३४, दुय्यम उद्दिष्ट ११३, देवांवरील अत्याचार २२, दोन तऱ्हेचा बेत १०९-१०, पंधराशेंची तुकडी १०३, ११३, १७८, १७९, १८०, १८५-८६, १९१-९२, १९३, १९४, १९८, १९९, २०० २०५, २०६, २०९, २१०, २११ ते २१५, २२२ २२४, २३०, २३४, २४९, २९३, परिस्थितीचें अवलोकन १०३, पहाडी तोफा ३८,

पहिला बेत २४८, पहिलामार्ग ५६, पहिल्या मार्गांतील अडचणी ५६, ९७, पळे १५०, २५४,२५५, २६६, २६८-६९, २८२; पायदळाचीं हत्यारें ३१, पारचें दळणवळण १९९,पिछेहाटीचे मार्ग २५३, पुरवठयाचे मार्ग २३१, प्रतापगडावर चालून येण्याचा मार्ग १७४ प्रतिज्ञा, ७१, ११४, १२०, २६२, २९२, २९३, प्रदेशपाहाणी १०६, १५३, २९२ प्रथमोपक्रम १११, १४८, फर्मान १३५, फौज एकीकरण ५८, बेतरतूद १५८, बेसावध २७९, विभागणी १११ ११२, बरोबरीचा सरंजाम १२२, बादशाही फर्मान १४. बिब्यांस ठार मारतो ४३, बेत १९२, २०४, फसला १९४, भेटीच्या अटी मोडतो १७८, भेटीचें राजकारण १५५, भेटीच्या वेळचें सैन्य १७०, भेटीला निघतो १७०, मदतनीस २६, मदांध १६९ महाबळेश्वर टापू ११७, महाराजांच्या आडाख्याचें अज्ञान ५३, महाराज प्रतापगडीं गेल्याची बातमी ५६, महाराजांचे फितुरी सरदार ५३, महाराजांचें रणक्षेत्र बदलविण्याचा प्रयत्न १४८, महाराजांवर प्रथम वार करतो १८२, मांडवाकडे जातो १९८, मार्ग ५६, ६५, मावळांतील सरदार ७, मावळे देशमुख ११८, त्यांना फर्मान ४१, मिळालेले मराठे २१, मुत्सदेगिरी २४, २५, मोठ्या तोफा ३५, ३९, रणक्षेत्र बदलतो १११, रसदमार्ग ४८, ४९, राजकारण करतो १५९, लवाजमा १७८, लहान तोफा ३२, ३५, ३८, लांब पल्याच्या तोफा ३४, वध, चुकीचें नांव ५, वांई ११७, कोयनापार दळण वळण २५२, घरकोठी १०७, १५४, वांईचे दोन मार्ग २३, प्रतापगड रस्ता ११२, १४०, २२५, वांईचे एकंदर

सैन्य २७, २७८, बारूदखाना ४७, सुभेदार ४७, येतो ५७, निघतो २३३, निघतांनाचें सैन्य व तोफखाना २३३, वाडा ५७ ५८, विजापूर दरबारीं कागाळ्या १०, विजापूरहून निघाला १५, ५३, सदोष आडाखा २६९, २७०, सर्व साधारण आडाखा ५८, सेनापती ४२, सर सेनापती २३४, सेनापतीची नेमणूक १४, हाताखालील सेनापती, प्रथमोपक्रमाची उणीव, २२८, २३०, एकंदर सैन्य १७, १८, सैन्याची कमरबंदी १४, सैन्य व तोफांची मारागिरी १४६, १४७, सैन्याचे पळे २२३, सैन्यांतील फितूर २२, विभागणी १५७, सैन्यांतील हत्यारें व व्यवस्था ३१, सैन्याची हिंमत ४०, ४२, सैनिक महाराजांचे नोकर २९७, स्थानिक उद्दिष्ट १८८, स्वारीचा शेवट २८३, हालचाल २०६, २०७

खाडयाचें खोंड १९२, २१२-१३

खासबरदार १७८, व हुद्देदार, १६९

खिंडी १६६, महत्त्व ११६

खेड १३२

खोपडे १३३ २२२

ग

गड (प्रतापगड) ते भेटीचा मार्ग दळण वळण १२४, त्यावरील तोफा १५३, २११, २४८, शिबंदी २१२

गनिमी कावा व जड तोफा. ७९

गनिमी लढाई ३, १२६, अर्थ १०५, दळण वळण २६४-६५

गोपाळराव भाऊ २०६

गोपिनाथपत १६८

गोमांसाचीं दुकानें १६८

गोविंदपंत काळे १६

गोळागोळीची लढाई ३१, ३२, २४४, अंतर १०३, योग्यस्थळ १७८, प्रकार २२०

ग्रांटडफ २८७, २९५, थाप-२९२

ग्वाहेर २६९

घ
घरकोठी व रणक्षेत्र १०७
घांटमाथा १३६
घाटांचा रोंख २६४, चें महत्व ३, १३७–३८
घोडखिंड २९२
घोडदौडीचा वेग २८०
घोडदळ तळाची जागा २६१, २६३, डोंगरी लढाई १५३–५४ तत्कालीन हत्यारें ८१, पूर्वीचें ३२, बरोबरचा तोफखाना २७३, मैदानी लढाई १५३, व सरसेनापती २५४, २७५, हल्लींचें, रचना व हत्यारें ३२ हातघाईची लढाई ३३
घोडबन १९२, २३६
घोणासुराचा डोंगर २३३
च
चढाई धोरण, प्रसंग व काम २७३-७४, २७७-७८ बचाव १८६, पिछेहाट १३०, बचावाचें धोरण २, लढाई ३, व बातमी १०९, सैन्यसंख्या १०१
चतुरबेट १३८
चंद्रगड १५१, २४८
चंद्रराव मोरे ६, २०, ४१, ६२
चांभारगोंदे २२, ६०
चौक्या पहाऱ्यांची रांग ७५-७६
छ
छबिन्याचे फौजेंतील टेहेळणीच्या क्षेत्रांतील चौक्या १९४-९५
ज
जखमी पेन्शन २९७
जंजिरा शिद्दी १२; ६३
जडतोफा व डोंगरी तोफा ७८
जनी टेंब ११३, ११९, १२२, १४२, १७३, १७९, १८५-१८७, १९१ ते १९२, १९४, १९५, १९७, १९९, २००, २०५, २११-१२, २३५–३६, २६६, २९१, आसपासची जागा २५७, खानाचा संदेशमार्ग २२९, खानाची फौज २२५, २२८, खानाचे कैदी २३२, खानाकडील जखमी व मृत्यु २२०, २३६, खानाचे पळे २२३, मराठी फौज संख्या २१३-१४, २१९,

२४७, २४९, मराठ्यांचा हल्ला २००, मराठी फौजेचें काम २१४, मराठी छाबिन्याच्या फौजा १९१, डोंगर २०३, पायथा २१०, दरी १९४, १९९, २०७, २१२, खानाचे सेनापती २०९, मराठी टेहळे १९८, मराठी फौजेचा प्रथमोपक्रम १९९, २००, लढाई २०५-०६, २६०, लढाईचा काल २२०, लौकर संपण्याचें कारण २२२, लवण १९९, २०८

जलद निकाल १७५

जावळी १०९, १११, ११३, १३८, १४७, २१२, २३३, २३४, २३४; २४९, २७५, प्रांत २, ६२, मोरे ११, २२२, लढाई २६०, लढाईंतील मृत्युसंख्या २६६

जिऊमाहाला १७७, १८१, १८३, २९८

जिजाबाई २३, १७४

जुनीं व हल्लींचीं युद्धसाधनें २८६-८७

जेधे ११२, १३३, १७३, १८६, १९१, १९३, १९५, २००, २०५, २०८, २०९, २१०-११, २१३, २१५, २१८, २३६, २४०, २६५, २६७

जेना लढाई २०१

झ

झुंझारराव घाटगे २३५, २४६, २५७, २९६

ट

टिपू २७, इंग्रजांशीं लढाई २४५

टिऱ्हा स्वारी ३८

टेहळे १९५, २०३, जोडी १९८ फौजेचे चौकी पाहारे ६४, फौजेचें मुख्य काम २१४, बातमींतील अपुरेपणा २१५, क्षेत्रांतील प्रतिकाराचें काम १९१-९२

ड

डावपेंच २३०, २४४, जुने व नवे २८७, डावपेंची बचाव २०५

डोंगर नंबराची पद्धति १३९, २०९, रस्ते १४०

डोण नदी ५०,

ढ

ढवळया घाट ९३, ११६, १३८, १५१, २३७, २४८,
ढोपऱ्याचा डोंगर १

त

तटबंदीची जागा २, १६६
तत्काळ निकाल १३०
तत्कालीन कलम जारी ८७, ८८, तोफा ७९-८०, पगार २५४ टीप, मुसुलमानांचे जुलूम १५९, ६०, लष्करी शिक्षण ८२, सरंजामी सैन्य ८२, स्वराज्याची इच्छा १६२
तळ व आरोग्य पाहाणी २६२, पाण्याचा बंदोबस्त २६२
तळेगांव ढमढेरे १३५-३६
तानाजी मालुसरे ९०, १७८, १८१, १८३, २४६, २९८.
तिमाजी पंत ५१
तिरला १३७
तिवरा १३२, १३८, २३७
तुळजापूर ५५
तोफखाना २८, गाडीरस्ता १४० अवजड ३३, ३६, आवाज व वातावरण २०१, इशारा १२४-२५, काठेवाडी बैल ८०, जड व गनिमी लढाई १४५, चढाईचा बचाव १४७, डोंगरी ३७, १४५, रस्ते १४५, बचावाची लढाई १४७, मारागिरी १४६-४७, २४३, विशिष्ट बार १९०, सर्व साधारण प्रमाण ३४
तोफांच्या बारांचा इषारा १४६, १४९, १५५, १७१, १८५, २००, २६८, २९५, कारणें १८७-१८८, खानाची फोज १९० वेळ २००
तोरणा २
तोरवे ४३
त्र्यंबक भास्कर १४३, १९२, २३४, २५८

थ

थोरले बाजीराव १३७, २८७

द

दगा कां द्वंद्वयुद्ध २९२
दरवाजाचें तोंड २१३
दळणवळण २०७, २३०, संदेश

मार्ग ५०, मार्गांतील चौक्या ५१, जुन्या व नव्या पद्धति १८७, हल्लींचीं साधनें २०१
दळवी १२
दादाजी पंत लोहोकरे १३५
दापोली १३२
दारूगोळ्याचा पुरवठा ४४, लाद ४५, ४६
दिंडोरी १३७
दिवाघांट १२८
दुय्यम सेनापतीचें काम २०४
दृष्टीआड व गोळीआड २१०
देशाची भौगोलिक परिस्थिति २८७
दोघां प्रतिस्पर्ध्यांची भेट १८०
दोस्तमंडळ ९९
दंडाराजपुरी ७६

ध

धर्मासाठीं स्वराज्य १२१
धान्याचीं कोठारें ४९
धारणीचें टेंब ११९, १४२, १९४, २१२.

न

नद्यांचे उतार व महत्त्व १४१
नाइकजी राजे पांढरे २४
नारायण ब्राह्मण १४३
नालबंदी प्रमाण २५४ टीप
निर्वाणीचा खलिता १५, ११२
निवळीचें खोरें २३७
नेताजी ७३, ७५, ८९, ९२, ९८ १०९, ११९, १२२, १४४, १५०, १५१–५२, १५४, १७२, १८७, १९०, २४९, २५०, २५३, २६७, अचानक हल्ला २४५, २५५, २६९-७०, २७२, २८०, २८१, कामगिरी २६७ सैन्याची जागा १५१, खानाच्या फौजेंत पाचर ठोकतो २७१, तोफखाना ७८, २७२, खानाच्या पिछेहाटीचे मार्ग रोखतों २६८, बगली हल्ला २६९, वांईवर निघाला २६८, वांई येथील लढाई २८०, शिद्दीवरील स्वारी ६३, सर्व सामान्य राखींव सैन्य २६८–६९.
नेपोलियन ५, ९८, १२५, १७५, २०१, २०६, २८४, चाळीस हजार सैन्य २८५, पाडावाचें

कारण २८६-८७
नेमलेलें रणक्षेत्र १५६
नौशीरखान ६१-६२.

प

पनवेल १३७; व खोपोली युद्ध १३७
पन्हाळा २८८ लढाई २९१,२९२
परकीय खोटे इतिहासकार २९२
परराष्ट्रीय वकील १५, काम १६, वकीलात १७
परशुराम भाऊ १३७, २८७
पराजयानंतर तळाकडची पिछेहाट २२४
पलटी हालचाल २६६
पहाडी तोफा ३७, प्रमाण ३८, ३९
पहिला जय तोच शेवटचा जय २३१
पाठलाग २२२, २२६, व घोडदळ २५५, घोडदळाचें काम २२७
पानीपतचें युद्ध २०६, २५१ मराठ्यांची पिच्छेहाट लढाई २५२ शेवटच्या अपयशाचें कारण २५८
पायदळ तत्कालीन हत्यारें ८०, हल्लीचीं ३१
पार ३६, ११९
पार घाट २, ५, ११, ६२, ७५, ९३, ९६, १०८, ११३, ११७ ११९, १२७, १३२, १५७, १५८, १९२ २३५, २३७, २३८ २४८ व कोयना पार २३७, तटबंदिची जागा १३८
पालखीचे भोई १८४,१८६
पासलकर ११९, १९१, २०८, २१३
पिछेहाट २२२, मार्ग १२९, धोरण १३०
पिंप्री घाट १३७, २९२
पुरंदर २
पुरवठा व लोक संख्या १४२
पुणें ५६, ९७, २०६, २८८, सुपें ८
पूर्व आफ्रिका १९६
पेठ पार २१३
पंढरपूर ५३,५५,९१, पुजारी ६५
पंताजी गोपीनाथ १०३, १६३, १६५, १७०, १७९, १८०,

१८१, १९९, २११, २१२, २९३, २९८, मुत्सद्देगिरी १९३ १९४
प्रतापगड १,५६,५७,९२,९७, ९८, १०५, १०९, १११, ११३, ११४, ११५, १२७, १३१, १५८, १७१, १९०, २६४, अघाडीची कोठी ११७ आसपासचा प्रांत १०३, १३८ खोरें १४२, वरील तोफा १४३, १४६, गुरुवार-शुक्रवार २८४, जंगलांतील चौक्यापाहारे २१२, टापू १३२, महाराजांचे सेनापती १२५, पायथ्याचीं स्थळें १३९, युद्ध ४, युद्धांतील लूट २९६, युद्धाची तारीख १, युद्धांतील जखमी, कैदी, मृत्यू २९६, युद्धांतील चार लढाया ४, २९५, युद्ध नांवांचें कारण ५, व वांई रस्ता १४१, शिबंदी व तोफा १७४, क्षेत्रफळ १
प्रतिहल्ला २१७, २५०, २७८, प्रकार २१६, व्याख्या व महत्त्व २१५
प्रथमोपक्रम ११३, १५७, १५८ महत्त्व १११, २०८
प्रसंगावधान २१६

फ

फर्मानाचीं डौलें ५२
फाजल खान २३४, २५७, २८२, २९६
फौज हल्लींची व तिचीं अंगें, ८२ टेहेळणीच्या जागेची निवड २१३

ब

बखरकारांचें एकजात म्हणणें २९२
बगलेवरील हल्ला २४१
बचाव १८६, व राखीव फौज २७५, चढाई ३,११९,२०५, २७७,तत्वें १५५,बातमी १०९, धोरणें ११५, फौज २७६, रणक्षेत्र व अघाडीची कोठी ९८, पिछेहाट १३०
बजाजी निंबाळकर २३, २४, २५,
बडी बेगम २९३, साहेबीण १३ १०२

बंदूका काडतुसाच्या ८९
बहिर्जी नाईक ८९
बाजारबुणगे २७
बाजी घोरपडे ९, ७०
बाजी प्रभू २५९
बाजी शामराज ५, ११, ४९, ६२, १०४
बाजी सर्जेराव १४२
बातमी–अभाव २०९, खातें व सांपत्तिक जोड ६८, महत्त्व ५६,६८
बादशाही फर्मान ११८, १३३
बाबाजी भोंसले २६, ९२, ११९, १५०, १७३, १८७, २४८, २५७, २६८, खानाच्या सैन्याचा पाठलाग २५५, कामगिरी २५४
बापू गोखले २५९, २८७
बार-संकेत १२३
बारुदखाना ४४
बाळाजी सिलीमकर २५, २६, ११९, १९०
बांदल ११९, १२२, १३३, १७३, १८९, १९१, १९३, १९५, २००, २०५, २०८, २११, २१८, २२२, २२७, २४०
पाठपुराव्याचा हल्ला २१५
बिनधुराची दारू २१
बिभीषण २९९
बुसातिनुस्सलातिन, बाष्कळ गोष्टी १८४, १८५ टीप
बेशिस्त पिछेहाट (खान) २२५
बोचेघोळीचा घांट १२२, १५०, १७३, २०३, २४८, २४९, २५३, २५५, २५६, २६८
बोरघाट १२८

भ

भरारी ११, ४१, ५०, ७८, २०५
भाऊसाहेब--सदाशिवराव पेशवे, २०६, २५९
भाडोत्री हिंदु सैनिक ८९
भीमा ( नदी ) ५०, ५५
भेट-अटी १६९, जागा १६९, ठरते १६३, १६८, खान दगा देतो १८१, १८२, दिवस १७७, निष्कर्ष १६४, मांडव १७०, २१०, वेळ १२३, १८५

भोर प्रांत १०८
भोंसले २०६

**म**

मदत २२२
मराठी फौज भूतखाना २५९
मराठी सैन्य–दुय्यम सेनापतींचा प्रथमोपक्रम २०७, बक्षिसें २९७
मराठी सेनापती व प्रतापगडचा युद्ध टापू २०२
मलाकंद स्वारी ३९
मलिक-इ-मैदान ७९
महंमद आदिलशाह १४
महाड ११, १०८, १९२, २४८, २६२, टापू ११५, तालुका १३२
महादजी शिंदे २४, २८७
महाबळेश्वर १, ५७, १७३
महायुद्ध (१९१४) १९६
महारवाड्याचें टेंक १९१, १९४, १९९
महाराजपूर २५९
महाराष्ट्रधर्म १०५
महाराष्ट्राचा स्वराज्ययोग ३०२
महाराष्ट्रीय युयुत्सूचें कर्तव्य २८६
मानाजी फांकडे ६०
मावळ प्रांत १०८, अधिकारी ११२
मावळे देशमूख ४१, रानचे हवेदार २३५, गुण १८, १९
माऱ्याच्या जागा ३, बचावाच्या जागा १५६, क्षेत्र २९
मार्लबरो २८७
मार्शल डि॰हॉट १२५
मीर झूम्ला ६२
मुख्य हल्ला–तलवार कां बंदुक २७३
मुत्सद्दी व मुत्सद्देगिरी १६४, १६५
मुरब्बी फौज २३०
मुसेखान २२४
मोंगल ३, ९९, ११३
मोठ्या विभूति मातृभक्त १७५
मोरे २, १०४, १२०, खान १२०
मोरोपंत पिंगळे १, २, ७३, ७५, ९०, ९२, ९८, १०९, ११९, १२२, १४३, १५१, १५४, १७२, १८६, १८७, १९०, १९१, १९२, २००, २०५, २१४, २१८, २२०, २६५, २६७, जावळी ते वांई दळण-

वळण तोडलें २६६, टेहळ्यांची बातमी २३६, मोरोपंत यांचा पायदळीं तोफखाना ७८, २४१, प्रथमोपक्रम २१८, २३६, २४९, प्रतिहल्ला २१८, फौजेची जागा २३८, फौजेची हिंमत २४०, चे सरदार २३५, फौज विभागणी २४१, खानाचा पाठलाग २५५, शिद्दी वरील स्वारी ६३, सैन्य व संख्या २३५, अचानक हल्ला २४३, २५०, २५३, हल्ल्याचा परिणाम २३८, २४०, २४१, चें काम १९३, २३५, २३८, २४७, २४८, २४९, कोयना-पारवर हल्ला २४६, २५०
राखीव सैन्य २४०
मोहोबतखान २८८
मंबाजी भोंसले २५, १३३, २२२, २९६
मांडव ( भेटीचा ) ते गड १३७, दळणवळण १७२, जवळील गर्ता १४३, १७३, २१०.

य

यमुनेचे उतार २५१
यांत्रिक गाडे ८०,
यादवांचें साम्राज्य १६१
याज्ञवल्क्य १७६
युद्ध-आंडाखे सांप्रतचे १०४-१०५, २५०, कारण ८, कौशल्य १२, कुशल सेनापती व दैव २८९, २९०, टापू २३६, दैव १०३, निरनिराळया पद्धती व एकीकरण १२६, पुकारा १५, मंडळ ७२, ७३, युक्ती २९१, वेळ व जागा १३१, सेनापती व तत्त्वांचें उल्लंघन २८९, न बदलणारीं तत्वें २८७
येखलासखान २८८

र

रघुनाथ पंत १०९, जावळीवर हल्ला २६८
रघुनाथ बल्लाळ १४४, २५०, २६७, २७५, तुकडी २६५
रचना व हल्ले ३२
रडतोंडीचा घाट १७०
रणक्षेत्र आपण निवडणें १०९, ठरविण्याचे प्रयत्न १४८, निवड १२५, १४८, नेमून देणें

११८, नेमून देण्याचा फायदा १४९, अघाडीची कोठी ९८, माहिती २०२, वावरण्याचे मार्ग १५६, चा फायदा १४९
रसदमार्ग ४९, शत्रूच्या प्रांतांत मिळवणें ४८, ४९
रांगणा–लढाई २५९,
राघो बल्लाळ अत्रे ६३
राजगड २, ५६, ७७, ९९, १०९, ११५
राजकारण व मुत्सद्देगिरी २६८, व युद्धकौशल्य ११८
राजधानी जवळ लढाई कां खेळूं नये ९५, १२७
राजा गिरधर १३७
राजापूर—इंग्रज वखारवाला २९३
रामाजी पालकर ८६
रांडरोटी २९७
रायगड ९५, १२७, १३२, १४८, टापू १२७, १२८ प्रतापगड माऱ्याच्या जागा १५१ प्रतापगड मार्गांतील किल्ले १२८ प्रांत १३३
रावण २९९
रावबाजी (दुसरे बाजीराव) ९५, २५९
राष्ट्रधर्म व देवधर्म १६८.
राष्ट्रसंघ २४६
रांगण्याची लढाई २५९

ल

लढाई–डांवपेंच बदलण्याचीं कारणें २८७, पाठलागाची आवश्यकता २२६,
लष्करी शिक्षण ८४,
लहान तोफा व पाहाडी लढाई ७८, प्रकार ३६
लांब पल्ल्याच्या तोफा ३४, काडतुसाच्या बंदुका व तोफा २९
लाल महाल २८८
ली २८७
लेटो फॉन फॉरबेक १९६, १९७

व

वणी दिंडोरी लढाई २९२
वरधानीचा डोंगर २४७
वरधा घाट १३२
वस्तुस्थितीचें अवलोकन १२९

वांई २७, ३६, ४७, १५१, १५२, २८०, खानाची अघाडीची कोठी ४६, ४९, ५७, (घरकोठी) ११२, २२४-२५, २४९, २६८, कृष्णा नदी २८०, कोंकण घांट, ११६, खानाची फौज १७३, २१९, छबिन्याचे चौक्यापाहारे २७१, तळ २८०, जखमा व ठार २८२, सेनापती दोष २८१ सदोष आडाखा २६९-७०, २७२, प्रतापगड रस्ता १३९, प्रांत १०८, महाराजांचे अधिकारी २८३, महाराजांना मिळालेलें सामान २५३, विजापूर सरहद्दीचें लष्करी ठाणें २७८,

वाघनखें १७७,

विजापूर ३७, ४७, ४८, ५१, २८२, दरबार १२१, १३४, ३००, बादशाही फौज १०३, महाराजांबद्दल दग्याचा हुकूम १०२, २९३, दुर्लक्ष ९, दरबार मंडळ १११, महाराजांच्या कागाळ्या ९, युद्धमंडळ १३

विठोजी सिलीमकर २५

विश्वासराव नाना ७०

विश्वासराव साहेब पेशवे २५८

वेणानदी ११७

वेलिंग्टन २८७

वेळ महत्त्वाची बाब १८८, २०६

वॉटर्लू २०६

**श**

शक्ति, युक्ति ३०२

शनवारवाडा ९५

शत्रूच्या हालचालीचा विचार २६५

शहाजहान ६१, ८१

शहाजी राजे ९, ६९, १२०, १३४, १६३, १६४, १८०, ची कैद ९, राजाची सूचना २९२, शांततेच्या काळीं बातमी राखणें ६४, वेळची युद्धतयारी १००

शामराज पंत पेशवे ६३, १९२, २३५, २५८

शामराज पद्मनाभी १४३

शारीरिक व यांत्रिक संख्याबळ २९०,

शाहिस्तेखान २८८, छापा २९१

शिंगणापूर २३, भ्रष्ट ५८
शिद्दी ३, ७३, ७४, ९६, ९९, १०८, ११५, १५२, १९२
शिद्दीजोहार २८८
शिंदे २०६
शिवळ्या घांट १२८
शिवाजी महाराज किंवा महाराज २, ३४, ४०, ४१, ४८ ५४, ५९, १०४, १०९, अंगठेवण १८१, अचानकपणा १८९, अंबेचा कौल १७६, अंधाराचा फायदा २००, अहमदनगर वरील स्वारी ६१, आकर्षणशक्ति १६२, आडाखा ११८, १२२, १३०, २३७, २४८ आडाख्यांत बदल १५६, आदिलशाहि प्रांतांत स्वाऱ्या ४८, ६३, आदिलशाही मांडलिकांस ताब्यांत घेणें ८, केव्हां हि अपयश नाहीं २८८, इतर गुण १६६, ईश्वरी देणगी १८९, उत्तरे कडील चौक्या पाहारे १५१, उत्तरोत्तर यश २८६, उपजत गुण १६७, सेनापती १६७, २५०, कमरबंदी व एकीकरण ९९, किल्ले १६६, बांधणी १२१, तोफा १४५, रसद ९३, कोकणांतील स्वारी १२, कोयना ते गड छबिन्याच्या चौक्या १७१, कृष्णाजी भास्कर भेट १५९-६०-६१, खरें राजकारण ५, खानास प्रतापगडास येण्याला भाग पाडणें ९६, ९८, १४८ खानाच्या कबरीस इनाम २९८, खानाच्या चुकीचा फायदा २७७, दळणवळण १५१, द्वंद्वयुद्ध ८, २९५, प्रथमोपक्रम हिसकणें १४८, भेट घेण्याचें ठरलें ११०, सैन्यावर अचानक हल्ला १७२, खास बैठक १६३, गडाचा बंदोबस्त ७२, ९२, १७३, गनिमी कावा ९७, १०५, ११७, १४४, चे जनक २६४, गुरुवार निवडण्यांत चातुर्य २८०, घाट १३७, घोडदळांतील तोफखाना १४४, रचना ३०,

८९, चढाईचें धोरण १५५, २६०, बचाव १४७, चरित्र २८६, चरित्रकार १६७, चौक्या-पहारे ९३, १७२, छबिन्याच्या चौक्या १४२-४३, २३०, २४९, चे सेनापती २०७, फौज ७६, १४४, जनीच्या टेंबाजवळील फौजा १९१, जनी जवळील दळण वळण २०७, जय मिळण्याचें कारण २९२, जहागीर ५९, जाहीरनामा २९३, जुन्नर स्वारी ६१, टेहेळे १९७, २१८, डाव १५७, डांवपेंच १३३, २८८, डोंगरांतील उंदीर १९०, डोंगरी तोफा १४५, लढायांतील चातुर्य १४८, तात्काल निकाल १६७, १८२, तरबेज सेनापती ५०, तोफखाना पोर्तुगीज ८०, तोफा व दारूगोळा ७८, कारखाने ८०, बारांचें दळणवळण २००, माऱ्यांची रांग १४७, दगा न केल्याचीं कारणें २९४, दळणवळण १४९, दंडा राजपुरी ६३, दळण वळण पुरवठा मार्ग ९२, दारूगोळा पुरवठा ९२, दुहेरी मुत्सद्दीगिरी १३५, दूरदृष्टी १६५, दोन तऱ्हेचा विचार ११०, धर्म-युद्ध ५४, २९८, धाडस १६७, धोरण ७, ध्येय ३, नजरबाज खातें ६, १७, ५२, ९४, निरवानिरव १७४, निष्काम भावना १७६, नेताजीशीं दळण वळण १५४–५५, नेपोलियन २८५, परीस्थितीचें आकलन व जलद निकाल १७५, पायदळी तोफखाना १४५, पायदळ रचना ३०, ९०, हातघाई हल्ला २२८, पारघाट १९३, पारचें रान १७३, पुणें-प्रतापगड नाकेबंदी ९७, पुरवठ्याचे व दळण वळणाचे मार्ग ९५, पूर्ण मुत्सद्दी व लढवय्ये १६७, प्रतापगड १३८, अघाडीची कोठी ९५, ९६, ९९, ११७, प्रतिपक्षाचे सेनापतीचे डाव जाणतात २८९, प्रति–हल्ला २०२, प्रदेशाची सूक्ष्म माहिती

१०६, १५३, प्रथमोपक्रम १११, १५८, प्रसंगावधान १८७, फौजेचे कायदे, ८६, ८७, विभागणी १७२, २७५, हिंमत २२२, बचावाचा आडाखा ११६, बचाव च केला २९५, धोरण १५५, वैय्यक्तिक बचाव १७६, बचावाचें क्षेत्र १४४; बचावाची लढाई ७, २५१, बचाव सोडून चढाई २०४–०५, बातमीखातें ६४, ६५, ७१, ११२, १६६, बातमीपत्र ६७, बिनचूक आडाखा २४७, भरारी २८९, भूगोल–शास्त्रज्ञ १६९, भेटीच्या अटी १७८, भेटीपूर्वीची तयारी १७०, मठपती कडील बातमी ६५, मत्सरी मराठ-मंडळ ११३, मनुष्यस्वभावज्ञान १९७, २८५, महाराष्ट्रीयांचा आदर ३००, मांडव ते गड दळण वळण १५०, मुत्सद्देगिरी १३३, १६५, कडील मृत्यू व जखमी संख्या २५७, मोंगलाची मदत ९, मोंगलावर स्वाऱ्या ६०, युद्ध अखेरीचें सामान ३५, युद्ध आडाखा १३३, युद्धकुशल सेनापती २०९, कौशल्य १५२, २८८, २९१, युद्ध कैदी व्यवस्था २९६, युद्ध-तत्व-उल्लंघन २८९, युद्ध प्रदेशाची माहिती २९१, युद्धमंडळ ७२, युद्धाच्या निरनिराळ्या पद्धती १८९, रणक्षेत्र निवड १५६, रणक्षेत्र बदलतात १२७, रणांगणांतील तोफखाना १४४, राखीव फौज २७७, राजकारणी १६७, रायगड मुक्काम ५६, राष्ट्रसंरक्षक १६७, लष्कर गणती ११३, लढाईचें धोरण १२२, लवाजमा २११, लोकांना ध्येयाकडे वळविणें १०, विजापूर खाटीक शिरच्छेद १६९, विजापुर दरबार तह ६०, विशिष्ट कामगिरीची फौज १५०, वैयक्तिक गुण १२१, शहाजी कडील बातमी ७०, शिद्दीचा बंदोबस्त ७५, सरहद्द ७५, शिद्दी सर-

हद्दीवरील फौज ७६, शिस्त ८४, उदाहरण ८५,८६, शिक्षा ९४, श्रेष्ठत्व १६६, संगमेश्वर स्वारी ९१, सद्गुण १७५, सर्व साधारण राखीव सैन्य १४४, १५३, सर्व सैन्याची एकदम सर्वत्र चाल १५०, सरहद्दीवरील टेहेळी फौज ७६, साधुसंतांचा आशिर्वाद ९१, सार्वत्रिक सहानुभूती २१, सुटसुटीतपणा १८९, सेनापतीचे गुण १०५, १०६, २६९, सैन्य ८९, कमरबंदी ७३, गणती ११६, विभागणी ११९-२० १४४, संख्या ७७, स्थानिक राखीव सैन्य ११९, १४३, १९३, स्वदेशीय महाराष्ट्रीयांची भरती ९०, सैन्य-हिंमत ९०, ९१, १५०, २५६, स्वराज्य स्थापना कार्य १६१, गंडांतर २८४, टाळतात ३००, ३०२, स्वराज्य राखण्याची कळकळ १७६, हरकारे १८८, हिंदूंचा पाठिंबा ६८, १२१, हुन्नरबाज २६९

शिस्त ४०

शुद्धि २४

शंभू महादेव भ्रष्टीकरण ५३

**स**

सखुबाई २४

समर्थ रामदास ६५, ९१, १०५, १७६, ३००, महाराज संबंध ६५, ६६, महाराष्ट्र राजगुरु ३०२, सातशें मठ ६५

सय्यद बंदा १७९-८०-८१

सरंजामी सैन्य २८

सर्व साधारण राखीव सैन्य २७५, घोडदळ १५३, घोडदळच कां २७४, चाल २६९, तोफखाना हल्ला २६६, वेळ व उपयोग २६६

सर्जेराव २१५

सरसेनापती २०८

सरहद्दीची टेहळी फौज ७४

सह्याद्री किल्ले ४, घांट ४, १३६ घाटांची नाकेबंदी १३२, रांग १३६

सातपुड्याचे घाट १३७

सातारा २८२
सांवत १२, ७७, ८८, ९९,१०८ १९२
सावशी लढाई १०५
सावित्री नदी १४०
सासवड पुरंदर १२७
सिलींमकर ७४, १२२, १४२, १९१, १९२, १९३, २००, २०५, २२२, २२६, २३६, तुकडी २१३, यशस्वी प्रतिहल्ला २१५, २१७
सिंहगड पुणें १२७, २९१, युद्ध २४६
सीझर २८४, २८७
सींना नदी ५८
सुटसुटीतपणा ११, ४१, ५०, ७८, ७९, २०५
सुरत १३७
सुर्वे १२, ७७, ९९, १०८, १९२
सेनापती आडाखा १२९, आवश्यक गोष्टी २४५,२५०, २८४-८५, फौजेची हिंमत २५८, मनुष्यस्वभावाचें निरीक्षण १९६, २९१
सैन्य-आजचे विभाग २१, तोफा २३३, हत्यारें २८, हुकमत २९
सोंडपार १९२
सोनाजी पंत ६१
संख्या-बल, व हिम्मत-बल २५६
संगीन उपयोग ३२
संदेश पाहाडा वरील २२९,मार्ग २५५, २५८
संभाजी—महाराजांचा भाऊ ७०, १०२, मुलगा १७६
संभाजी कावजी १७७, १८१ १८३–८४, २९८
स्वराज्य–स्थापना सुरुवात ५९, चतुःसीमा ३, रोपडें ३००
स्थानिक राखीव सैन्य २४०

ह

हरिपंत फडके १३७
हातघाई—ची लढाई ३१, ३२, २०३,२४४,च्या लढाईचा काळ २२०, लढाईला लागणारे गुण २२१, ची लढाई व बंदुका १७८, ची लढाई व सांप्रतचीं शस्त्रें २२०, लढाईला लाग-

णारा काळ २२०
हालचाली २३०
हिकमत २९१
हिंदवी स्वराज्य १६२
हिंदूंची मनःप्रवृत्ति ९६, शिपायांतील एक दोष २५८, संघटना ५४, ची स्वाभिमान--शून्यता ५५
हिंमत १९, ४०, १२८, १४९, २८९
हिरोजी फर्जंद १२२,१४३,१७३ व त्याची तुकडी २१०, ची कामगिरी २११, ची टोळी २१२,हल्ला २११, २१८, २१९
हिवरें २९८
हुजुरात सैन्य २८
हैबतराव सिलीमकर ११९,२५७
हॅनिबल २८४
होकायंत्र उपयोग २०२
Carre, १२१.
Jackson २८७
Patrol १९५
To see without being seen १९५, २१०

## युद्धशास्त्रावरील कांहीं वाचनीय पुस्तकें.

--—:o:—--

1. General Hamley—Operations of War.
2. Col. Henderson—Science of War.
3. Clauswitz—Art of War.
4. Jomini—Art of War.
5. Gen. Hart—Reflections on War.
6. Gen. Bird—Direction of War.
7. Col. Furse—Information in War and other books.
8. Von der Goltz—Conduct of War.
9. Gen. Sir Ian Hamilton-Russo-Japanese War, Vol.I, II.
10. Col. Lettow von Vorbeck-My Reminiscences in East Africa from 1914-1918.
11. Gen. Remington, Bernhardi—Cavalry.
12. Col. Mayne—Infantry Weapon and its use in War.
13. Official Publication—Field Service Regulations.
14. Col. Brunker, Banning—Organization etc.
15. Official Publication—Training ( Infantry, Cavalry, Artillery. )
16. Gen. Bird, Macquoid, Tovey, Nash—Strategy.
17. Gen. Robinson—Napoleanic Campaigns Vol. I, II, III.
18. Col. Home, Clary, Callwell, L. Needham —Tactics.
19. Col. Younghusband and others—N. W. F. Warfare.
20. Gen. De Wet, Waters-Boer War, O. H. Vol. I, II, III, IV.
21. Col. Sisson Pratt and others—Artillery.
22. Col. Henderson—Stonewall Jackson, Campaign of Friedrickesburg and others.
23. Hutchinson and others—Waterloo.
24. Col. Philipps—Fortifications.

# OPINIONS OF THE LEARNED.

GOVERNMENT HOUSE,
GANESH-KHIND, POONA.

1. H. E. Lt. Col. the Rt. Hon'ble Sir **Leslie Orme Wilson**, P.C., G.C.I.E., C.M.G., D.S. O., Governor of Bombay & **Chancellor** of the **Bombay University**.

I have had the opportunity of seeing the proofs of Capt. Modak's work entitled "The Campaign of Pratapgad." Research work into the Military Campaigns in India is, in my opinion, of importance and value not only from a historical but from an educational point of view. Little has, unfortunately, been done in this direction up till now, and the scope for such research is great. I congratulate Capt. Modak on his efforts which deserve every encouragement.

2. The Hon. **Dewan Bahadur Harilal Desai**, M. A., LL. B., Minister of Education, Govt. of Bombay.

I presided over a meeting at the Deccan Gymkhana Poona, where Capt. G. V. Modak, of the Gwalior Army, delivered a very illuminating lecture as regards his researches in Shivaji Maharaj's campaign against Afzulkhan near Pratapgad. Capt. Modak has spared no pains to make his production as useful to students of Indian Military History, as similar works in European Military History. A work like this would advance the cause of Military training in India which is getting in demand. His enthusiasm and industry for his subject are really marvellous and deserve encouragement. Military training ought to find a place in the University. The Bombay University is now keen about Post-Graduate studies, and as regards Indian History, *I believe, research in Indian Military campaigns would be a proper subject for the University to tackle.*

3. Prof. **Jadunath Sirkar**, M. A., I. E. S., Vice-Chancellor, Calcutta University.

......He is to b econgratulated on *having opened a new line of investigation in Indian History*....... The results of our warfare can be correctly interpreted and the past campaigns truly reconstructed, if they are studied by Military officers trained in the modern science of war, who can employ the comparative and critical method and have visited the scenes of war they are describing. Capt. Modak has these qualifications and a book from his pen rouses our lively expectations.

4. Col. **K. N. Haksar**, B.A. C. I. E.-This young man... has for some years past devoted all his leisure, energy & his small fortune on research in the domain of India's Military History & he has endeavoured to prove that even over a hundred years ago, the principles of strategy & tactics applied by the generals who led the Mahratta armies were exactly the same as those which essentially later have been applied by the foremost Military strategists of Europe. In considering Capt. Modak's work which is worthy of all praise,......I am aiming rather of securing bare and tardy justice to the Military genius of India.

5. Prof. **B.K. Thakore**, B.A., History Board, Bombay University.

......He has been studying several of the battles & campaigns of Indian History as a Military man, on the spot and from the available records......To him it has been a labour of love......*If the Post-Graduate Board can take him up* for a set of six lectures on Pratapgad...... I believe the experiment would be thought highly of later on all over the University world when his lectures appear in print in book form.

6. Principal **Hamley,** M.A. I. E. S. ( Secondary Teachers' College ) Bombay University.

......*His subject has a place in the University.*

7. Pandit **Malviy**. M. A. L. L. B. (M. L. A.)

I consider the work of Capt. Modak of great national importance, I am of opinion that he should be helped to complete & publish it.

8. Principal **Meldrum**, M. A. D. Sc., ( Royal Institute of Science, Member of the Syndicate).

*I am convinced that* you are studying the subject in the right way and therefore *you are making a valuable contribution to it.*

9. Mr. **G. S. Sirdesai**, B. A. (Board of Studies, Bombay University, Bombay).

Capt. Modak has a singular patience and capacity to labour, has studied the account of various Maratha battles and campaigns, has travelled through the various places, and *achieved records immensely useful to the study of the history of Maratha wars*. Capt. Modak lucidly explains here the technical points of the Maratha tactics of very many Maratha battlefields which I had found inexplicable during the course of my studies.

10. Prof. **Potdar**, B. A. ( New Poona College ), Secretary, Bharat-Itihas Samshodhak Mandal.)

*This is entirely a new branch of study.* His work will be epoch-making and will open a new vista before the Indian youths in particular.

11. Dr. **Balkrisna**, M. A. Ph. D., ( Principal Rajaram College, Kolhapur, History Board, Bombay University. )

Capt. Modak has done unique work in Maratha History. *It is a specimen of original research* & labour of love. Original maps & sketches have enlivened the

whole subject. I an sure that his work will throw a new light on Maratha History.

12. Prof. **K. T. Shah**, B. A. B. Sc. Bar at law, (University--professor.)

I am fully in sympathy with the idea that the Military History should be properly studied, & *that it should be made a part of the M. A. curriculum.*

१३. श्री रा. रा. **श्री. कृ. कोल्हटकर**, बी. ए., एलएल्. बी. ( अध्यक्ष १२ वें साहित्य-संमेलन, पुणें. )

" प्रो. जदुनाथ सरकार यांना आपण आपल्या पुस्तकासंबंधानें सांगितलेल्या सांगोपांग माहितीवरून आपल्या इतिहास--प्रेमाचा, दीर्घोद्योगाचा व कल्पकतेचा मनावर विलक्षण ठसा उमटला. इतिहासाच्या सूक्ष्म अध्ययनास इतिहास--प्रसिद्ध स्थलांच्या प्रत्यक्ष अवलोकनास... ... ... ... ...युध्दशास्त्र विषयक ज्ञानाची जोड देऊन इतिहासांतील खरेखोटेपणा अजमावण्याची जी पध्दति आपण स्वीकारिली आहे ती महाराष्ट्रांत तरी अपूर्व आहे.... ... ...ही पध्दति इतर संशोधकांस अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक होण्यासारखी आहे. ... .... ... ... ...आपण वर्णिलेले प्रसंग वाचकांस प्रत्यक्ष पाहिल्याप्रमाणें वाटतील."

१४. **कै. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे**—

" तुमच्या सारख्या लष्करी बाण्याच्या व लष्करांत काम केलेल्या गृहस्थानें च महाराष्ट्रांतील या लुप्त झालेल्या, परंतु अत्यंत आवश्यक अशा लष्करी इतिहासाचें साधार लेखन केलें पाहिजे. "